TIGHT BINDING BOOK

TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_196169
UNIVERSAL LIBRARY

M GM262
294.592
B57U
भगवद्गीता.
श्री ज्ञानेश्वरी. 1954.
अध्याय १२.

OUP—390—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M 294.592 Accession No. GM 262

Author B57U

Title [illegible]
[illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

# श्रीज्ञानेश्वरी

( सुबोधिनी )

## अध्याय चौदावा

## "गुणत्रयविभाग योग"




फलटण
१९५४

डॉ. गोविंद रामचंद्र उपळेकर

OSMANIA UNIVERSITY
LIBRARY
HYDERABAD-1

## — श्रीज्ञानेश्वर माउलीचे चरणीं अर्पण —




॥ श्रीगुरु बोधला बाबा ॥

॥ श्रीविठ्ठल । श्रीवृंदावन । मातुश्री साखराऊ निंबाळकर फ. सन ११४९, सिद्धार्थी संवत्सरे ॥

॥ श्री ॥

विठो नित्य गावा। विठो नित्य ध्यावा ॥ १ ॥
विठो अंतरी। नित्य डोळा पाहावा ॥ २ ॥
विठो अंतरी। भेद सांडोनि द्यावा ॥ ३ ॥
विठो आपणालागि। देऊन घ्यावा ॥ ४ ॥

शके १६६१, भाद्रपद शुद्ध ११ मोर्तब कामा

विठो कारणें जीव वांचोनि (जियालो) ज्यालो।
विठो कारणें मृत्यू वांटूनि प्यालो।
विठो चिंतिता चिंतिता जे निवालो।
विठोच्या पदीं तें विठोरूप जालो ॥

---

## ॥ सप्तश्लोकी गीता ॥

ॐमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्। यः प्रयातित्यजं देहं स याति परमां गतिम् ॥ १ ॥ स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च। रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥ २ ॥ सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ ३ ॥ कविं पुराणमनुशासितार मणोरणीयांसमनुस्मरेद्यः। सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्य-वर्णं तमसः पुरस्तात् ॥ ४ ॥ ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्। छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद सवेदवित् ॥ ५ ॥ सर्वस्य चाहं हृदिसन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च। वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ ६ ॥ मन्मनाभव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवं (कौंतेय) आत्मानं मत्परायणः ॥ ७ ॥

॥ इति सप्तश्लोकी गीता ॥

हस्ताक्षर—जगन्नाथ व्यंकटाद्रि (येरंडे नोकर सरकार).

---

# प्रस्तावना

## ‘गुणत्रयविभाग योग’

### (त्रिगुणात्मक भाव)

‘भवस्वर्ग’[1][2] :—

तरी परमात्मा ऐसे। जे एक वस्तू असे।
ते जया दिसे। ज्ञानास्तव ॥ ६१६ ॥

ते एक वाचुनि आने। जिये भवस्वर्गादि ज्ञाने।
ते अज्ञान ऐसा मनें। निश्चय करी ॥ ६१७ ॥

स्वर्गा जाणे हे सांडी। भवविषी कान झाडी।
दे आत्मज्ञानी बुडी। सद्भावाची ॥ ६१८ ॥ —अध्याय १३ वा

परऱ्हीं ज्ञान हे आपले। परि ‘पर’ ऐसेनि जाले।
जे आवडोनि घेतले। भवस्वर्गादिक ॥ ४३ ॥

अगा याचि कारणें। हे उत्तम सर्वांपरी मी म्हणे।
जे वन्हि हे तृणे। येरे ज्ञाने ॥ ४४ ॥

जिये भवस्वर्गाते जाणती। यागचि चांग म्हणती।
पारखी फुडी आथी। भेदी जया ॥ ४५ ॥ —अध्याय १४ वा

तैसे होईजे जाईजे देह। ते आत्मसत्ते अविक्रिये।
निष्टंकिति गा मोहे। आंधळे ते ॥ ३८० ॥

येथ आत्मा आत्मयाचे ठाई। देखिजे देहिचा धर्म देही।
ऐसे देखणे ते पाही। आन आहाती ॥ ३८१ ॥

तैसा उपाधि उपहिता। सेवट जेथ विचारिता।
ते कोण्हातेही न पुसता। निरूपाधिक ॥ ४६७ ॥

ऐसिया वळंघोनि (वोघोनि) स्वप्ना। धांवत भवस्वर्गाचिया राना।
तया चैतन्या नांव अर्जुना। क्षरपुरूष गा ॥ ४९३ ॥

सांचचि पुढति वीरा। जरि न येति स्वप्नजागरा।
तरी ब्रह्मभाव सांचोकारा। म्हणो येता ॥ ५१९ ॥

परि प्रकृती पुरूष दोन्हीं। अभ्र जाली जीये गगनीं।
क्षेत्रक्षेत्रज्ञ स्वप्नीं। देखिला जीये ॥ ५२० ॥ —अध्याय १५ वा

---

१. भव = मूळ कारण, संसार, बढती, उत्कर्ष, अस्तित्व, उत्पत्ति, जन्म, शंकर, कल्याण, शरीर, लाभ, प्राप्ति (आजान = १ उत्पत्ति, २ मूळ कारण, उत्पत्तिस्थान. आजानदेवः = पूर्व कल्पांतील कर्मानें झालेला. आजातिः = उत्पत्ति).

२. स्वर्ग = देवांचें वासस्थान. निर्भेळ सुख.

अवधानाची सर्व सेना-(मन, बुद्धि, चित्त, अंतःकरण रूपी) मेळवून ह्या ज्ञानास झोंबावें असें भगवंतानीं सांगितल्यावरही ती ज्ञान-प्रतीती अर्जुनाच्या पोटीची होईना—कुसी निघेना म्हणून तेथीलचे मार्ग देवानीं शोधिले. पर म्हणजे सर्वांहून वेगळें असें श्रेष्ठ, श्रुतींनीं वाखाणिलेलें—प्रसिद्धीस आणिलेलें, गौरव केलेलें असें तें ज्ञान, देव पुन्हां सांगण्याचें करीत आहेत.

हें पर म्हणजे उत्तम ज्ञान जाणून सर्व मुनी परंपरासिद्धि कोटिप्रत पोहोचले.

जशीं बेलाचीं त्रिदळें श्रीशंकरास प्रिय तशीं चतुर्दशी गंगावती निर्गुडी (वनस्पती) त्रिदळें, अलंकारच तीं श्रीत्र्यंबकास प्रिय अशीं आहेत म्हणून आपण हीं त्रिदळें स्वीकारावींत अशी माझी नम्र विनंति आहे; सर्व विश्व प्रकाशणाऱ्या गभस्तीची आरती लहानशा काडवातीनेंही पण करतातच ना! तशीं हीं त्रिदळें कृपादृष्टीच्या प्रसन्नपणानें स्वीकारावींत. ज्यायोगें जशीं रत्नेंच तीं अथवा चतुर्दशाचा लोचन तो रत्नपणास आला. का चतुर्दश विद्याच त्या आपल्या देवतामयत्वाच्या देखणेपणास आणिल्या होतील.

एरव्हीं ज्ञान हें आपलें पण 'पर' असें परकें कां झालें तें, जें कां नेहमीं भव व स्वर्ग हेंच आवडून घेतलें म्हणून.

ज्ञानामधीलही उत्तम असें जें ज्ञान (ह्या १४ व्या अध्यायामध्यें भगवंत सांगत आहेत तें) तें सर्वांपरी उत्तम असें मी म्हणतों. कारण ह्या ज्ञान वन्हीच एक व त्यापुढें इतर ज्ञानें तीं तृणवत् होत. इतर ज्ञानें तीं भव व स्वर्ग तोषवितात—माहित आहेत असें म्हणतात (जाणतात, समजतात, ओळखतात, वाखाणतात, अनुभवतात) वर यागच—(एक म्हणजे तूप, जल, अग्नि, हवन करणें हेंच) उत्तम असें चांग चांग व तेथेंच भले म्हणवितात. पूजाउपाधि-भेदज्ञानांत—भेद घेण्यानें ज्ञान हें खरेपणास येतें असें मानतात. अशीं जीं विचारावर चालणारीं—तीं अवघीं सर्व ज्ञानें ह्या एका ज्ञानानें स्वप्नवत केलेलीं होत. हें ज्ञान उगवलें तर इतर ज्ञानजात लयास जाते, इतर जाणिवा लय पावतात; म्हणून हे धनंजया! हेंच एक उत्तम ज्ञान होय. ह्या ज्ञानानें आपली अनादि अशी जी मुक्तता आहेच आहे असा तो मोक्षच हातीं येणारा होतो. ह्या ज्ञानाची प्रतीती झाल्यावर जन्ममरण संसृती शिरजोर होत नाहीं. मनानें मन मागें घालण्यानें, अंगानें विश्रांती पाहिली होते. अंगास विश्रांती झाल्यानें ते ज्ञानी मग देहाजोगें होतच नाहींत (ते देह असल्यासारखे वागत नाहींत; देहच आत्मा मानणें करीत नाहींत; कां देहबुद्धीचे होत नाहींत; आत्मा देहाएवढा करून असत नाहींत) व मग ह्या देहाचें जें स्थूल व सूक्ष्म तें एकाच वेळेस ओलांडून माझ्या वजनाचे असें मीच होतात; मजसमतोल होतात. ते माझ्या नित्यतेवरच नित्य असे. माझ्या पूर्णतेवर परिपूर्ण असे जसा मी अनंत आनंद सत्यसिद्ध, तसे अभेदतेनें ते तसे होतात.

भगवान श्रीगोपालकृष्ण हेच येथें गुणातीत निर्गुण का ब्रह्मवस्तू तेच येथें प्रत्यक्षत्वानें असलेले.

सत्व प्रवृद्धीमध्यें मरण प्राप्त झालें तर सत्वाचा नवा असा तो होतो; तेथें अहो स्वर्गाहून पूर्वज पाहुणेच पक्कान्नें सेवन करण्यास येणारे, पिकलेले ते उपभोगण्यास येणारे होतात. कीर्तीचें होणें होऊन इहलोक व परलोक दोन्ही साधतात. (ओव्या २१६–२१७–अ. १४)

गुण म्हणजे मनुष्य पदार्थ इत्यादींचा मूळधर्म. तो मनुष्यत्वानें मनुष्य (आदर, आतिथ्य, पाहुणचार) गौरव होय. तसें रूपादिकरून जे चोवीस गुण तेही तेथें गौरवास पाहूं येणारे होत.

दान, औदार्य, विषय त्याग इत्यादीचे ते (देह, शरीर, माखण, मध, खनिज, सुवर्ण माक्षिक, मोहाचा नारळ, इत्यादि).

श्रीगीतेचा,–निगमवल्लीचा–ब्रह्मानंद लहरीचा का गीता अलंकाराचा, हा चौदावा अध्याय, हा तर गुणातीत भगवान जे, त्यांचा निर्गुणत्वाचा बाणा–निर्गुण तेज सर्व महत्व पावून अप्रतिमतेस आलेलें तें वर्णनच मुळीं पाहात नाहींत. तेथें गाईले तें कसें तर—

मी माझे म्हणता ठकचि ठेलिये।
आपुले जाति कुळ विसरूनि गेलिये ॥ १ ॥

गुणाचा दुकाळ पडला देशी।
निर्गुणाशी। कैसी रातलिये ॥ २ ॥

बाप रखुमादेवीवरू विठ्ठल सये।
शेजारासी न ये। काय करूं? ॥ ३ ॥

हा चौदावा अध्याय म्हणजे, गुणातीत का निर्गुण जे भगवान, त्यांचा विलासच एक, तो अति विस्तृततेच्या मोहकतेनें मांडिलेला असा होय. तेथें भक्तितत्व–अनन्य–अभेद–ज्ञानोत्तर–का मोक्ष तें सविस्तरतेनें ब्रह्मच एक निष्कर्षतेचें निःसीम जेथें सेवा हीच ब्रह्मत्वीं सोपान. माऊलीनी हा कठिणतर असा सेवा रुजू अध्याय आपल्या अमृत दृष्टीनें पूर्ण करून घेतला ही त्यांची मोठी एक कृपाच प्रसन्नतेची झाली आहे. संत भेटीचा योगच ह्या येथें **फलटणीं** जोडला गेल्यानें ज्ञानच मूर्तिमंत विलसत आहे जसें कां अशीच नेहमीं कृपाप्रसादाची दृष्टि, वृष्टि, सृष्टि, असावी अशी श्रीमाऊलीचे चरणीं मी नम्र विनंति करतों.

"गुरूकृपा भवन"
ज्ञानेश्वर कॉलनी,
फलटण,
१२-१-१९५५.

**संतांचा दासानुदास.**

---

**नोटः**—येथे एक सूचना करावीशी वाटते ती ही कीं ओव्यांच्या अनुक्रमावर ज्या गुण प्रलयासंबंधीच्या ओव्या (**२१५-२२७ व २६१-२६२ श्लो. १४ आणि श्लोक १५ च्या २३८-२४६ व २६३-२६५**) त्या ( जरी प्रवृद्ध, विवृद्ध, प्रलय हे तिन्ही मिसळलेले तरी व्याख्यान दृष्टया संदर्भासाठी ) श्लोक १४ व श्लोक १५ खालीं व्याव्यात. आणि श्लोक ८ च्या समजल्या गेलेल्या त्या १९६, १९७, १९८, १९९ श्लोक ९ खालीं व्याख्यान संदर्भ दृष्टया घ्याव्यात.

# अध्याय चवदावा
# गुणत्रय विभाग
## प्रवेश व सारांश.

तेराव्या अध्यायांत प्रकृति पुरुषाचें व क्षेत्रक्षेत्रज्ञाचें वर्णन झालें. आतां चवदाव्या अध्यायांत प्रकृतीच्या तीन गुणांचें वर्णन आलें आहे (श्लोक १ व २) व ज्ञानाची महती दिली आहे. **महद्ब्रह्म प्रकृतीपासून भूतमात्राची उत्पत्ती** कशी होते, हें थोडक्यांत निरूपिलें आहे (श्लोक ३-४). प्रकृतीपासून उत्पन्न होणारे **सत्व, रज, तम हे तीन गुण** जीवात्म्याच्या बंधनाला कारण आहेत (श्लो. ५). नंतर **गुणांचें स्वरूप, व त्यांच्या द्वारें होणारा बंधन प्रकार** हें क्रमानें स्पष्ट केलें आहे. **कोणता गुण या जिवाला कशांत प्रवृत्त करितो,** हें व या **तिघांपैकीं दोघांना दाबून एकच गुण कसा वर येतो** हें बोलिलें आहे. वाढलेल्या सत्व, रज, तम या तीन गुणांचीं क्रमानें लक्षणें अंतकाळीं कोणता गुण वृद्धिंगत झाला असतां कोणती गती प्राप्त होते हें निवेदिलें (श्लो. १४-१५). कर्माचें फळ, त्या त्या गुणाला अनुसरून असें मिळतें (श्लो. १६). **ज्ञानाच्या उत्पत्तीला सत्व गुण, लोभाच्या उत्पत्तीला रजोगुण** व **प्रमाद आणि मोहाच्या उत्पत्तीला तमोगुण कारण** (श्लो. १७). तिन्ही गुणांपैकीं प्रत्येकांत असणाऱ्या जीवात्म्याची असणारी अनुरूप गति (श्लो. १०). **गुणांखेरीज दुसरा कोणीही कर्ता नाहीं,** असें जेव्हां ज्ञानी समजतो आणि **गुणांच्या पलीकडचें म्हणजे त्याहून श्रेष्ठ असलेलें तत्व ओळखितो** तेव्हां तो गुणानां उल्लंघून माझ्या स्वरूपास पोहोंचतो आणि मोक्ष मिळवितो (श्लो. १६-२०) अर्जुनाच्या प्रश्नावरून **गुणातीत पुरुषाचीं लक्षणें** भगवंतांनीं वर्णन केलीं आहेत. जो **अनन्यभक्तियोगानें माझी उपासना करितो, तो गुणातीत होऊन ब्रह्मरूप होण्याला योग्य होतो** (श्लो. २६). **अमृत व अविनाशी अशा ब्रह्माची, शाश्वत धर्माची, आणि अखंड सुखाची प्रतिष्ठा** (प्रतिमा अथवा **आश्रय) मीच आहें** (श्लो. २७).

★ ★ ★

**बुद्धि:** आपल्या इंद्रियांनी ज्याचा अनुभव आपणांस होतो, त्यास **विशेष** असें नांव आहे. अत्यंत सूक्ष्म अगर तन्मात्र रूप तत्वास **अविशेष** असें नांव आहे. लिंगमात्र म्हणजे बुद्धि. प्रकृतीचा पहिला स्पष्ट गुण अथवा दृश्य गुण बुद्धि हा होय. बुद्धीपासून इतर गुण निर्माण होतात शेवटचा गुण अलिंग (अलिंग = स्वल्प चितारण) हा आहे. सांख्यदर्शनकारांनीं बुद्धितत्व आदि म्हटलें आहे. सांख्य असें म्हणतो कीं हें जग २४ तत्वांपासून निर्माण झालें आहे. उत्पत्ती करणारा किंवा सत्ता करणारा ईश्वर आहे हें ते मानीत नाहींत. त्याचा हेतू या जीवात्म्याला बंधनापासून मुक्त करण्याचा आहे. वेदांत म्हणतो जगताचा कर्ता आणि सत्तात्मक परमात्मा आहे. एवढाच काय तो या दोघांमध्यें फरक होय. बुद्धितत्वांत फरक उत्पन्न होऊन त्यापासून स्थूल जग निर्माण होतें, व त्या स्थूलरूपांत फरक होत होत त्यांत बुद्धि पुन्हां दृग्गोचर होऊं लागते. अशा रीतीनें ही क्रिया अखंड मंडलाकार रीतीनें सुरू आहे, ज्या प्रमाणें बीजापासून वृक्ष व त्याच वृक्षापासून बीज उत्पन्न होतें.

**चोवीस तत्वें:** ५ महाभूतें, १ अहंकार, १ बुद्धि, १ अव्यक्त, १० इंद्रियें, १ मन, इंद्रियगोचर ५ विषय (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) = २४ व पंचविसावें तें आदितत्व.

**भूतादिम्:** कर्तव्य व अकर्तव्य याचा निर्णय करण्याच्या कामीं शास्त्र हें प्रमाण आहे. शास्त्रांत जें कांहीं विधान सांगितलें आहे तें समजून घेऊन तदनुसार कर्म करणें तें तुला या लोकीं योग्य आहे. जो शास्त्रविधी सोडून आपल्या इच्छेप्रमाणें कामप्रेरित होऊन वागत असतो त्याला सिद्धि मिळत नाहीं, सुख मिळत नाहीं, व उत्तम गतीही मिळत नाहीं.

**गुण:** वृत्ति ही सुरत गेली, म्हणजे दृष्टि ही शुद्ध होत जाऊन चित्तचांचल्य बंद पडतें; व जे स्पष्ट व शुद्ध असे ते वेध जाणिवेस येऊं लागतात. येथें जर अस्थिर होणें केलें, तर, गोता खाणेंच होतें, व पुन्हां पहिला धडा. 'सत्व' जें त्यास उत्तम कां आलोकणारें असें म्हटलें, रज जें तें ह्या कामनादि वासनांना काम्यानें पाहाणारें म्हणून मध्यम लोकींचें असें, व तिन्हीमध्यें जें कनिष्ठतेमुळें हलकें असें विकाराचें, प्रमादाचें कां शून्य चित्ताचें तें तम होय. वृत्ति म्हणून जी आहे (कां सत्व म्हणून जें आहे) त्याजवर, किंवा तिच्या ठिकाणीं हें तिन्हीं गुणांचें येणें जाणें केव्हांही आवडेल तेव्हां हें गुणांचें येणें ह्या वृत्तीवर होऊं शकतें; जसें कां बाल्य कां तारुण्य का वार्धक्य (वृद्धाप्य) हें जसें या एकाच देहामध्यें त्या त्या विकारवशतेचें असें वाटेल तेव्हां, किंवा केव्हांही येत जात असतें, येऊं शकतें, किंवा अहो असें पहा कीं शुद्ध सुवर्णामध्यें पुरणाचें प्रमाण तें वाढतें जेव्हां, तेव्हां तें सुवर्ण जरी तरी पण तें कसास लाविलें असतां, उत्तम सुवर्णाचे पारखी जे त्यांना तें उत्तम अशा सुवर्णाच्या उत्तमत्वास पुरणारें असें होत नाहीं. त्या प्रमाणें देह हेंच जसें कां त्या उत्तम अवस्थेस आणण्याचें भावप्रामाण्यास कां तारुण्य भारास, तेथें तें आपल्या उत्तमत्वाच्या कसास उतरलेंच पाहिजे, तरच तेथें उत्तमत्व हें प्राधान्यतेचें होय. पण तें उत्तमत्व जर मळलें तर तें उत्तम असें नच म्हणतां तें मध्यम अथवा कनिष्ठ असें होतें (तरुण तर तुर्या कामिनी म्हटली गेलेली तेथें पुरुषभार हाच नेहमीं पाहिलेला) तसें सुवर्णाचें शुद्धपण हें, तेथें पुरणाचें प्रमाण जरी तरी पण सुवर्णाच्या बरोबरीचें असें वागवितां आलें तरच तें शुद्धसत्वाचे जे पारखी त्यांच्या कसास उतरणारें होय.

तसें येथें सावधपण हें जर आळसानें वाहविलें, ओहोटविलें, तर घनदाट झोंपच एक का सुप्तता किंवा गाढ असें अज्ञान हेंच मुळीं दृढ होऊन–घट्ट होऊन आंत दाटून येतें–बसतें. हें जसें तसें किंवा या बरहुकूम, वृत्तीनें अज्ञानाचा अंगिकार केला, तर ती वृत्ति बाहेर होऊन--येऊन–विखुरते–पसरते–वाहाते, वाऱ्यावर टाकिली होते, आणि एव्हांच मुळीं देहधारी जरी ते एका तत्वावरच उभे झालेले असे उत्तम जे तेथें तें उत्तमत्व जें तें काय कसचें साधारण जनाचें प्रमाण पाहातें, कां मध्यम स्थितीच्या दरवाज्यानें मध्यम असें कां यःकश्चित् असें कनिष्ठतेचेंही म्हणजे प्रमादाचें कां भ्रांतीचें होऊं लागतें. ही जी कांहीं एक विकारवशतेची स्थिति किंवा अवस्था, त्या वृत्तीवर उमटणारी हिलाच हे अर्जुना "गुण" अशी संज्ञा आहे.

**महति:** प्रकृतीच्या ह्या तीन गुणांनी रहित असा प्राणी किंवा पदार्थ ह्या पृथ्वीवर, आकाशांत किंवा देवलोकींही नाहीं, म्हटलें आहे कीं ज्याचें चित्त उत्तम अशा भाषणानें, तसेंच गीत गायनाचें जें उत्तम त्यानें, किंवा युवति रत्नाच्या, युवति जनाच्या लीलेनें द्रवपणास येत नाहीं तो एक मुक्तयोगि तरी म्हणावा किंवा एक तो पशूच जसा कां समजावा.

ह्या नरजन्माची का मनुष्यदेहाची महती ज्यांनी आदरास घेऊन जे तेथीलचे झाले नाहींत त्यांना स्वमहत्व, ईश्वरभावना किंवा योग्यता जी ती सांपडणारी होतच नाहीं जे ह्या जन्मांतच तें पद पावले असतात त्याच्याच मुळीं त्या ब्रह्मभावनेवर मागून येणाऱ्यांचें तें महत्त्वाचें येणें किंवा असणें तें असतें व तेंच मुळीं या बुद्धिभारापुढें मांडलें जावें–तेंच एक मांडलें जाणें नेहमीं होत असतें. तेथेंच संपूर्ण विश्वास हाच एका त्या रम्यतेनें नटलेला असल्यानें हें बोलणें अति हृदयंगम असेंच होऊन असल्यानें अंतःकरणपटावर अति उदात्ततेचे रंग उमटूं लागतात. या स्वभावानें अति उत्तम असें जें कांही एक भावरहस्य तेंच व्यवहारास वागवितें झाल्यानें, तेथें परमदिव्यच एक रमणीय–असें या स्वाभाविकतेस उचलून घेऊन असतें, आपल्या पोटीशीं धरून तेथेंच तें रमण्याचें करतें–तेथेंच तें रमतें, स्थिर होतें, आपलें तें असें म्हणतें–आदरणीय असें तें सामान्यपणाचें–मान्यतेचें असें सर्वांनी एकमतानें मानिलेलें असें होतें.

**स्वाभाविक पूजन:** भूतमात्रांची उत्पत्ति ज्याच्यापासून व ज्यानें हें सर्व जग व्यापिलें आहे, त्या परमात्म्याची, ईश्वरत्वाची पूजा आपल्या स्वाभाविक कर्मांनीं केली तर मनुष्यास परमसिद्धि मिळते–त्याला परमात्म्य प्राप्तिरूप सिद्धि मिळते.

स्वभावसिद्ध कर्म हें दिसण्यांत वैगुण्यतेचें जरी तरी उत्तम प्रकारें इंद्रियांच्या धर्मास आचरण्यापेक्षां श्रेष्ठ आहे; कारण स्वभावसिद्ध कर्माचें आचरण करण्यानें पाप लागत नाहीं. स्वभावसिद्ध कर्म, सहज असें जें, तें सदोष असें जरी दिसलें, तरी तें टाकूं नये, कारण कर्म म्हणजे जें सर्व किंवा जात तें कसल्या ना कसल्या तरी दोषानें व्यापून असतेंच. पण ज्याची बुद्धि आसक्तिरहीत व ज्यानें मन जिंकिलें आहे, व जो निःस्पृह किंवा निरिच्छ त्याला कर्मफलत्याग केल्यानें ( कर्तव्यच एक तेथें फल तें इच्छिणें, पाहणें केव्हांही नाहीं ) सर्वांत श्रेष्ठ अशी नैष्कर्म्य सिद्धि प्राप्त होते. ज्ञानाची परमसीमा जें ब्रह्म तें होण्याची योग्यता येते व प्रसन्न चित्तामुळें शोक किंवा इच्छा अथवा अपेक्षा नच करणारा होऊन तो सर्वाभूतीं सम होत्साता माझी साम्यसिद्धि अथवा साम्य-भक्ति प्राप्त होणारा होतो. मी कोण आहें, कसा आहे, कशा प्रकारचा आहें, याचें त्याला खरें ज्ञान होतें. याप्रमाणें माझी तात्विक ओळख झाल्यावर तो मींच होतो–मजमध्येंच तो प्रवेश करून असतो–तो मजमध्येंच प्रवेशानें असतो. आत्मपरायण झालेला तो, सर्व कर्में करीत असतांही त्याला माझ्या प्रसादानें शाश्वत व अविनाशी पद प्राप्त होतें. चेतसानें (चेतम्–मन, ज्ञान, सजीवता) सर्व कर्मे मला अर्पण करून मत्परायण हो, बुद्धियोगाचा आश्रय कर व निरंतर माझ्या ठिकाणीं चित्त ठेव, याप्रमाणें माझ्या ठाईं चित्त ठेवून राहाशील तर तूं सर्व संकटांतून तरून जाशील, पण अहंभावनेमुळें माझें नच ऐकशील तर परम म्हणजे श्रेष्ठ असा जो अर्थ त्यापासून च्युतीचा होशील.

**सर्व कर्म ईश्वरार्पण हाच त्याग :** भाव हाच अर्थ ईश्वरभावास आलेला, तेथें सहज स्वाभाविक आसक्ति का फलापेक्षा नच ठेवल्यानें ते मग लोक लोचनलीला–आज्ञापालन–लीलालालन–क्रीडाकुतुहल महत्त्वास येणारें झाल्यानें सहज ईश्वरार्पण झालें. फलेच्छेचा त्याग केल्याशिवाय कोणींही योगी होऊं शकत नाहीं. देहधारी पुरुषाला कर्माचा निःशेष त्याग करणें शक्य नाहीं म्हणून जो कर्मफलत्यागी आहे त्यासच त्यागी म्हणतात. निषिद्ध जें तें व काम्य कर्म जें तें सर्वथा त्यागावें हेंच बरें. १) नियत म्हणजे वर्णाश्रमास नेमलेल्या नित्य कर्माचा त्याग करणें केव्हांही उचित नाहीं ( पण कोणत्याही किंवा कसल्याही मोहानें त्यांचा त्याग केला असतां त्याला तामस त्याग म्हणतात ). २) शरिराला कष्ट होतील या भीतीनें कर्म करणें तें दुःखकारक का कष्टमय असें समजून त्याग करणें तो "राजस" त्याग असल्यानें त्यास खरा जो त्याग आहे त्याचें फळ मिळत नाहीं. ३) शास्त्रविहित कर्म, आसक्ति, अहंकर्तृत्वबुद्धि व फल सोडून किंवा टाकून 'एक कर्तव्यच तें करणें'च केव्हांही, असें म्हणून केलें असतां तो सात्विक त्याग समजला जातो. ४) अकुशल म्हणजे क्लेशकर वाटणाऱ्या कर्माचा जो द्वेष करीत नाहीं व कुशल म्हणजे सुखकर वाटणाऱ्या कर्मांत जो आसक्त होऊन असत नाहीं ( न अनुषज्यते ) संशयरहित ( छिन्नसंशयः ) असा खरा त्यागी होय.

**कर्म, काम्य, संन्यास, त्याग :** कामना, हेतू किंवा (बुद्धिपुरस्सर म्हटलें गेलेलें जं म्हणजे) कांहींतरी फलाची इच्छा धरून केलेलें कर्म तें काम्य कर्म होय; व तें सोडणें यास संन्यास म्हणतात. आपलें कर्तव्यकर्म करणें हेंच एक महत्त्व दिलेलें तेथें त्या कर्तव्याचें फळ अपेक्षणें नच जें तो संन्यास, व तोच योग-विरम्नि व अक्रिय असा कर्म करणारा कोणीच होत नाहीं–ना तो योगी–ना संन्यासी–ना योगी. म्हणून जो कर्मफलत्याग तो संन्यासच एक. सहजपणेंच तें फलापेक्षेशिवाय केलेलें कर्म ईश्वरार्पण होतें, व हाच त्याग म्हटला जातो ( कोणी म्हणतात कीं प्रत्येक कर्म सदोष असल्यामुळें कर्माचा त्यागच करावा, दुसरे कांही म्हणतात यज्ञ, दान व तपादि कर्म तें टाकूं नये–या बद्दलचा निर्णय तो असा कीं हे पुरुषव्याघ्र म्हणजे श्रेष्ठ, त्याग जो आहे तो तीन प्रकारचा आहे. यज्ञ, दान व तप हीं जीं कर्में तीं टाकूं नयेत–तीं करावींतच, कारण तीं बुद्धिमान् पुरुषांना पावन करणारीं आहेत. कर्मे हीं आसक्ति व फल सोडून व त्याग करून केलीं पाहिजेत असें माझें निश्चित मत आहे.

**कर्मफळ :** कर्माचीं फळें हीं तीन प्रकारचीं–अनिष्ट, इष्ट व मिश्र–अशीं आहेत. अनिष्ट म्हणजे पश्वादि योनि का नरकादि दुःख, इष्ट म्हणजे स्वर्गादि प्राप्ति कां संसारीक सुख व मिश्र म्हणजे मनुष्ययोनींतच कधीं दुःख तर कधीं सुख. हीं फळें कर्मफलाचा का फलासक्तीचा त्याग न करणाऱ्या पुरुषाला मृत्यूनंतर अथवा परलोकामध्यें मिळतात. पण संन्यासी जो कर्मफळें व कर्तव्याभिमान सोडून कर्म करणाऱ्याला हीं फळें (कदाचित् भोगावीं लागतात) भोगावीं लागत नाहींत.

**कर्मांचा अंत कसा लागणार :** आतां अशा या कर्माचा अंत कुठें सांपडणार का कसा लागतो तें वेदांतशास्त्रानें किंवा सांख्ययोगानें सांगितलें आहे (सांख्ये कृतांते प्रोक्तानि) तें असें कीं कर्मसिद्धि जी तिच्या पाठीं पांच कारणें तीं म्हणजे अधिष्ठान (कर्ता), कर्म, करण, व्यापार, व दैव अशीं होत. ह्या कर्मामुळेंच हा जन्म झालेला असल्यानें तेथें त्या कृतकर्माचा अंत किंवा शम् तो कसा साधावा तेथें ह्या सर्व क्रियांना आधारभूत असें शरीर एक, जीवात्मा दोन, भिन्नभिन्न इंद्रियें तीन, प्राण आदींचे निरनिराळे व्यापार चार, व अदृष्ट किंवा ईश्वरी इच्छा पांच हीं महत्त्व पावून असतात. ह्या शरिरानें, वाणीनें का मनानें मनुष्य जें कांहीं कर्म करितो तेथें न्याय्य म्हणजे शास्त्रविहित व अन्याय्य म्हणजे शास्त्राविरुद्ध किंवा निषिद्ध असें तें कर्म. त्याचीं वर दिलेलीं पांच कारणें का हेतू पुरस्तरता (मन, बुद्धि) होत. अशी वस्तुस्थिति असतांना देखील मनुष्य हा बुद्धिसुसंस्कृत न झाल्यामुळें, आत्म्यावर ह्या कर्माचें कर्तेपण लादतो. अशा त्या मति अदूरदर्शितांना कांहींच समजत नाहीं असें म्हटलें आहे. ज्याचा भाव मीं कर्ता असा नाहीं व ज्याची बुद्धि संसार वासनांनीं किंवा विषयांनीं लिप्त नाहीं असा तो स्वरूपी स्थिर असा त्यानें लोकांचा त्याग केला का जगत् नाहींसें केलें तरी तो त्या कर्मफळानें लिप्त किंवा बद्ध होत नाहीं.

**कर्मप्रेरणा, कर्मसंग्रह व गुणभेदानें ज्ञान म्हणजे काय :** कर्माला प्रेरक म्हणून जें आहे तें तीन प्रकारचें आहे. त्यास ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता म्हणतात. ह्या प्रेरणेस कर्मचोदना म्हणजे कर्मप्रेरक सामुग्रि म्हणतात. तसेंच कर्मसंग्रह म्हणजे कर्माचें संक्षिप्त स्वरूप एवढेंच बोलिलें, आता गुणभेदानें (गुण म्हणजे प्रकृतीपासून प्रकृतिमंततेचें असें जें कांहीं एक उभारणें किंवा रचनेचें तें निर्मळ अशा किंवा त्रिगुणसाम्य असलेल्या अशा शुद्ध स्वरूपापासून झालेलें तें प्रकृतिमंततेवर उभें होण्यानें गुणाचें झालेलें तें) ज्ञान, कर्म व कर्ता हीं तीन तीन प्रकारचीं झालीं असें गुणसांख्यानामधें सांगितलें आहे. आतां विभक्त अशा वेगवेगळया भूतामध्यें एकच अव्ययभाव अविभक्त भाव (तत्त्व अविनाशी) आहे हें त्या ज्ञानानें समजतें त्यास सात्विक ज्ञान म्हणतात. सर्व भूतांमध्यें भिन्न किंवा पृथक् असे भाव नानात्वानें आलेले असे ते भाव पृथक्तेनें जाणलें जातें ज्या ज्ञानानें त्यास राजस ज्ञान म्हणतात. ज्ञान हें सर्वस्वी एकाच कार्यरूप शरिरांत अहेतुकपणें सांठविलें आहे असें समजून तेथेंच आसक्त असणें जें व तत्वार्थरहित अतत्ववत् व अल्प (तुच्छतेनें) असें अहेतुकतेनें युक्तिहीन तेथेंच आसक्त होणें जें त्यास तामस ज्ञान म्हणतात. (तुच्छतेच्या कोटीस जाऊन बसणारें तें युक्तिहीनतेचें असें व तत्वअर्थरहित असें तें ज्ञान जें कां सर्वस्वपणें **एकाच कार्यरूप शरिरांत सांठविलें आहे** असें समजून तेथेंच आसक्त होणें तें (अहेतुकम्। अतत्वार्थवत्। अल्पं। च) यत्तु-कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम्। अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम्। (१८–२२)

जीवित हें सजातीय–प्रेमाची जातीच एक–असें करून ऐस तेथें अनुकार हाच चित्तासारखा (का मनाजोगा) मिळालेला रंग असून कां अनुरागाचें लक्षण होय. अहो जरी ह्या तिन्ही अवस्था तरी पण जें नेहमींच असतें व ज्याच्यावर ह्या अवस्था आहेत असें दिसतें तें काय केव्हांही आहेच आहे; असें जें त्या अन्वयावरून मुळीं हें प्रेमाचें व अनुकारानें हें करण्याचें झालेलें तें केव्हांही तो विश्व सोहाळाच पाहाणारे होय. तेथें सर्व महत्व जें जेथें टेकतें तें म्हणजे ज्या अवसरी (वेळेस-प्रसंगास) जें करणें पावें (पडतें). ज्या प्रसंगांत आहोंत तर तेथीचें उचित जें तेंच करावें–तें बद्धक असें समजूं नये–असें समजून सांडूं नये–टाकूं नये. तसेंच तेथीलच्या फळाची इच्छा केव्हांही करूं नये, पण जें कांहीं एक तें सम्यक् व्यवसित करण्यास

चुकूं नये, शरिरामधील धारणा ती आटोपशीर, म्हणजे आंवरून धरून आकुंचित केली असें न करितां, ती समृद्धतेनें प्रगमनशील उदार भावाची व प्रशस्तपणाची व मनाच्या मोठेपणाची करावी; तरच तें प्राणधारणेचें तें प्रशस्त भाराचें होऊन सर्व कांहीं आक्रमण्याचें करतें–व्यापकत्वच एक जसें त्या ईश्वरभावानें पाहिलें असें तें होतें तिथें मग देवत्वच एक दिव्य पाहाणारें असें तें कां नव्हे बरें.

येथें मग बंधु का बापच तो आपला आपण असेंच म्हणणें होतें, असें नव्हे कां ?

एकाच नांवाच्या दोन व्यक्ति आहेत, तेथें कर्म निवृत्ततेचा, का कर्मफळें नच पाहाणारा तो दोहोंमध्यें सारख्या प्रमाणानें वागत असलेला–तेथें दोहोंना ज्या ठिकाणीं पोहोंचणें आहे तें ठिकाण एकच तें. पण नांवानें हांक दिली तर तो कर्मनिवृत्ततेचा का कर्मफलत्यागाचा तो–अग्निसेवा संयमाचा दोहोंमध्यें असलेला तो बाणा, तेथें तो तसला भार उचलून तें बोलविलेलें, तोच मुळीं आपल्या रूपभाराचा जसा तसाच पुढें होणारा होतो. तेथें गांव तें प्रेमाचें सर्वमेव असेंच एक होय, तेथें अवकाश हा कसचा, कारण तें ब्रह्मावर टेकलें असल्यानें, तें जें आपल्या नाम योग्यतेनें का रूपधारणेचें जसें, त्या ब्रह्माचें असें झालें असेल, तेंच तें ह्याहीपुढें होणारें होतें. म्हणून ज्या प्रसंगाला जें उचीत आहे तेंच करीत असावें, असें हें म्हणणें आपलें सर्व महत्त्व घेऊन चालत असतें तें केव्हांही अनुलक्षणी करावेंच, मनांत बाणलेलें होऊन असावेंच असावें–तसेंच वागलें असतां प्रसंग हा आपला महत्वभार पाहू लागून व्यवस्थित असाच होऊन येतो; व प्रसन्नपण मग केव्हांही तेथें उगवलेलें असणारच हें काय सांगावयाचे तें ! ! !

येथें प्रेरणा का संग्रह का ज्ञानमीमांसा हीच थोडक्याशा शब्दांनीं व्यवहारास आणिली असें होय.

---

# अध्याय १४ वा

## सारांश

(**परज्ञान** :—सृष्टीची उत्पत्ति, गुणत्रयानें आत्मा कसा बद्ध होतो, पुण्यकर्म, अव्यभिचारी भक्ति म्हणजे काय? ब्रह्मत्व, सायुज्य अथवा मोक्ष).

आचार्यांचा जयजयकार. श्रीगुरुपाशीं ज्ञानासाठीं कृपेची याचना. **ज्ञानास पर, परम** (इत्यादि श्रुति उक्त) श्रुत्युक्त प्रतिशब्दावर उत्प्रेक्षा. ज्ञानाची थोरवी. महद्ब्रह्म, माया, अज्ञान, अविद्या–लक्षणें व एकरूपता. चार खाणींची उत्पत्ती–**जग, परमात्मा माया, विश्व यांचा आप्तसंबंध. जगासह सर्व परमात्माच. त्रिगुणादिकानीं भिन्नभास जीव**. गुणांची नावें, उत्पत्ती, वर्गिकरण· प्रत्येक गुणाचा जीवावर परिणाम. गुणानुरूप पुढील जन्म गुणानुरूप कर्मफळ. **केवळ सत्वगुण मोक्षद** त्रिगुणास कारण वस्तुसत्ता. गुणातीताचीं लक्षणें. **अनन्य भक्तीनें त्रिगुणनाश तोच ब्रह्मभाव परमात्माच ब्रह्म.**

---

# अनुक्रमणिका

## अध्याय १४ वा


| क्रमांक | विषय | | ओव्या |
|---|---|---|---|
| १] | अध्याय संगति किंवा प्रवेश ... ... ... ... | | १-३९ |
| | १] श्रीगुरूस्तवन; आचार्याचा जयजयकार, 'आचार्यवान पुरूषो वेद,' वेद पुरूष जे त्यांचा जयजयकार | १—५ | |
| | २] पंचतत्त्वाची समाराधना, महति पंचभूततत्वांनीं रूपास येणें तें. ... ... ... | ६-१५ | |
| | ३] श्रीगुरूंचे चरणीं भगवद्गुणवर्णनपर गीतार्थज्ञान, ज्ञानपद जोडीकरितां याचना ... ... | १६-२४ | |
| | ४] श्रीगुरूराज कृपाप्रसादाची अपूर्वता ... | २५-३२ | |
| | ५] पूर्वाध्याय, अनुसंधान, सिंहावलोकन ... | ३३-३९ | |
| २] | श्लोक १ ला ... ... ... ... | | ४०-५२ |
| | १] श्रुतीनें गौरविलेले ज्ञान, श्रेष्ठ असे ते स्व-आपलेच ज्ञान आपणांस परके (परतंत्र) असें झाले आहे | ४०-४९ | |
| | २] ज्ञान प्राप्तीची थोरवी ... ... | ५०-६० | |
| ३] | श्लोक २ रा ... ... ... ... ... | | ५३-६७ |
| | १] देवाशी संवाद (अर्जुन व देव श्रीकृष्ण यांच्या संवादाचा) केल्याचा परिणाम, गोडी, ज्ञानाची महति, ज्ञानाचें महत्व महिमान, भक्ति रहस्य ... | ६१-६४ | |
| | २] महत् ब्रह्म, अव्यक्त प्रकृति (माया) क्षेत्रयोगे जगवीते कसे ते ... ... ... | ६५-७१ | |
| ४] | श्लोक ३ रा ... ... ... ... ... | | ६८-११४ |
| | १] अज्ञानाचे स्वरूप ... ... | ७२-८० | |
| | २] अज्ञान थोरिवेस आणावें व आपणां स्वतःस नच जाणावें हेंच मुळीं क्षेत्रज्ञाचें जीवात्म्याचें रूप होय. क्षेत्रक्षेत्रज्ञाचा प्रकृति पुरुषाचा योग तो हाच नीट जाण; हा योग आत्मतत्वाच्या सत्तेचा नैसर्गिक म्हणजे स्वाभाविक धर्म आहे ... | ८१-८६ | |
| | ३] अविद्या जिचे नाहीं हेंच रूप असें हें तेथें प्रकृति फार व्यापक व मोठी जशी ती निद्रिस्ताच्या सान्निध्याची व जागृताला दूर अशी ... | ८७-९१ | |

| क्रमांक | विषय | ओव्या |
|---|---|---|
| | ४] प्रकृति पुरुषसंगानें प्रसवले बुद्धितत्व, त्यानें भारले ते मन, त्या मनाची ममता तो अहंकार, तो पंचमहाभूतांना रूपास आणतो. तेथें विषय इंद्रियेंहिपण रूपाचीं होतात. विकार क्षोभ त्रिगुण उभें झाल्यानें वासनारूपी जीव जन्मतो ... ... ९२–९५ | |
| | ५] प्रकृति मायेचें लेकरू रूपास येते. तेथें चारी खाणी ह्या त्यांचे हातपाय-तळ होत महाप्रकृती तें शिर कमरेच्या वरचीं ऊर्ध्वाचीं आठ आंगें देवयोनी होत–कंठ विलसित उल्हासला तो स्वर्ग, मृत्यूलोक तो कंबर किंवा मध्यभाग, अधोदेश तें पाताळ–ह्या बाळाचें बाळसें तेंच हे तिन्ही लोक होत–वेगळाल्या सृष्टीं ह्या आंगव्या असें हें बाळ प्रसवून प्रकृती स्वत:स धन्यवाद देऊन आहे–माझ्या सत्तेनें माया हें विश्वरूप बाळ व्याली. ब्रह्मदेव हा त्याचा प्रातःकाळ, श्रीविष्णू तो माध्यान्ह व सदाशिव हा सांजवेळ होय–महाप्रळयरूपी सेजेवर हें बाळ खेळ खेळून दमलेलें निजतें–कल्पाचा उदय झाला म्हणजे जागें होतें–वाढूं लागतें उभें होतें. याप्रमाणें दृष्टी म्हणजे आरोपलेली सृष्टीच. तिच्या घरीं युगापुढें दुसरें युग अशीं पावलें टाकीत क्रीडा करतें, पावलाची आवृत्ती करते. युगच मुळीं युगाच्या कौतुकाची आवृत्ती करते–संकल्प करणें ह्यांस आवडतें अहंकार हाच ह्याचा खेळगडी. आत्मज्ञान झालें की हें दृश्यरूपीं बाळ संपतें, आटोपलें होतें ... ९६–१०३ | |
| | ६] माझ्या सत्तेनें (सत्ता, आहेपण, सत्तारूप पुरुष) माया हे विश्व लेकरूं व्याली ... ... १०४–११६ | |
| ५] श्लोक ४ था | ... ... ... ... ... | ११५–१३६ |
| | बहुत शरीरें पाहून चित्त आपलें मेदूं नको, कारण मन बुद्धि भूतें हीं सर्व एकच होत. तीं बहुत अशीं नाहींत म्हणून विश्व आणि परमात्म्याचा संबंध तो अभेदतेचा असा जाण. | |
| | १] परमात्मा व विश्व याचा अभेद संबंध ... ११७–१२९ | |
| | २] जगत् बंधु, बांधव, बंधन ते कां ? कारण का बंधतेचे का मुक्ततेचे ते, लक्षण नुसते आक्षेपिलेले | |

| क्रमांक | विषय | | ओव्या |
|---|---|---|---|
| | कारण गुणानेंच गुण बांधला असा मी आवडत असतों ... ... ... | १३०–१३८ | |
| ६] श्लोक ५ वा | ... ... ... ... | ... | १३७–१४५ |
| | १] त्रिगुणाचे वर्णन ... | १३९–१४५ | |
| ७] श्लोक ६ वा | ... ... ... ... | ... | १४६–१६० |
| | १] सत्व गुणानें आत्मा कसा बद्ध होणारा होतो ते | १४६–१५९ | |
| ८] श्लोक ७ वा | ... ... ... ... | ... | १६१–१७४ |
| | १] रजोगुणानें आत्मा शरीरी कसा बांधला होतो ते | १६०–१७४ | |
| ९] श्लोक ८ वा | ... ... ... ... | ... | १७५–१९६ |
| | तमोगुणानें दारूण पाशाचें देहधारीपणानें देहास बंधन होणारे तें लाघव, कौशल्य ऐक ... | १७५–१९४ | |
| | २] ती श्लोकी त्रिगुण ते आत्म्यास कसें बांधतात ? ते सांगितले आतां त्रिगुणाचें निरूपण ते ऐका ... | १९५–२०४ | |
| १०] श्लोक ९ वा | ... ... ... ... | ... | १९७–१९९ |
| ११] श्लोक१० वा | ... ... ... ... | ... | २००–२०४ |
| १२] श्लोक११ वा<br>१३] श्लोक१२ वा<br>१४] श्लोक१३ वा<br>१५] श्लोक१४ वा<br>१६] श्लोक१५ वा | ... ... ... ... | ... | २०५–२६० |
| | १] सत्वगुणाच्या प्राबल्याची लक्षणें परिणाम ... | २०५–२२६ | |
| | २] रजोगुणाचे प्राबल्य झाले म्हणजे आपल्या कार्याचा धुमाकूळ देहगांवात माजवितो तेव्हां जी चिन्हें उदय पावून असतात ते सांगतो ... | २२७–२४३ | |
| | ३] तमोगुणाच्या प्राबल्याचे, माजाचें परिणाम ... | २४४–२६० | |
| १७] श्लोक १६ वा | ... ... ... ... | ... | २६१–२६२ |
| | १] (सत्वगुणामध्यें मरण आले असतां **गति मिळणारी** ती कोणती ? **सत्वगुणानें** जें **निपजतें तें पुण्यकर्म** होय असें श्रुतींनीं एकमतानें म्हटलें आहे म्हणून निर्मळ अशा सुखज्ञान जिवाच्या सात्विकांस अपूर्वच एक योग्यता, लायकी, काबिलपणा, येऊन आहे असा–२१५–२२७ ओव्या पहा.) **गुणाची फळें**–सत्वाचे सुकृत, रजाचे दुःख, तमाचे अज्ञान ... | २६१–२६२ | |

| क्रमांक | विषय | | ओव्या |
|---|---|---|---|
| १८] श्लोक १७ वा | ... ... ... ... | ... | २६३-२७१ |
| | १] रजोगुणामध्यें मरण आलें असतां कर्मासक्त लोकांत, मनुष्य लोकांत जन्मतो. त्याचप्रमाणें, तमोगुणांत मृत्यु आला असतां, पश्वादि मूढ योनित जन्मतो (२३८-२४५ व २५६-२६० ओव्या पहा) ... ... ... | २६३-२६५ | |
| | २] वस्तूच्या सत्तेने गुणचो परिणाम — १) (पुण्यकर्म फल), सात्विककर्म फल-पुण्य, राजसकर्म फल-दुःख, तामस-अज्ञान. २) सात्विक कर्माचा परिणाम-ज्ञान, रजाचा-लोभ, तमाचा-प्रमाद, मोह. ३) सत्वाची गति-ऊर्ध्व, रजाची गति-मंद, तमाची गति-अवनति ... ... | २६६-२७६ | |
| १९] श्लोक १८ वा | | | २७२-२७६ |
| | **सत्ब्रह्मवस्तु सत्ता-गुण देहाच्या निमित्तानें देहाचें रूप धारण करतात आणि बंधनास कारण होतात** त्यामुळें आत्म्याच्या गुणातीतत्वाला कमीपणा येत नाहीं | २७७-२९९ | |
| २०] श्लोक १९ वा | ... ... ... ... | ... | २७७-३०० |
| | १] देहाबरोबर उत्पत्ती हेतूचे झालेले जे तीन गुण त्याचे जो **अतिक्रमण** करतो-त्यांना अतीत होतो, निर्गुण होतो तो **अमरत्वाला** प्राप्त होतो, गुणातीत म्हणजे **गुण नाहिसें झाल्यावर जो उरतो तो मीच असा** आत्मा म्हण. असा विचार ज्याचे ठायीं उदय पावतो तो उन्नत्ति मार्गाला लागून गुणातीत होतो ... | ३००-३२० | |
| २१] श्लोक २० वा | ... ... ... ... | ... | ३०१-३२० |
| | (निर्गुण आणीक आहे-ते तूं अचुक जाण-जे का दर्शनानें त्यावर बोट लावून त्यावरच आपले ठिकाण केले आहे). भिंगाच्या घराचे, दीप प्रकाश आवरीत नाहीं-कात टाकून-सर्प पाताळीं गेला तेव्हां त्याची ती काया कशी कोण सांभाळितें असें झालें आहे ... ... ... | | ३०१-३१३ |
| २२] श्लोक २१ वा | ... ... ... ... | ... | ३२१-३२३ |
| | १] अर्जुनाचा प्रश्न गुणातीत कोणें चिन्हें दिसें वर श्रीकृष्णाचें उत्तर व गुणातीताची लक्षणें ... | ३२१-३२७ | |

| क्रमांक | विषय | | ओव्या |
|---|---|---|---|
| २३] श्लोक २२ वा | ... ... ... ... ... | | ३२४–३३६ |
| | १] गुणाधीन = गुणतंत्र व गुणातीत निर्गुण यामधील फरक व लक्षणें ... ... | ३२८–३४९ | |
| २४] श्लोक २३ वा | | | ३३७–३४९ |
| २५] श्लोक २४ वा | ... ... ... ... ... | | ३५०–३६२ |
| | १] या विश्वांत एका आत्मतत्वावांचून दुसरें कांहींही नाहीं. तेथें–गुणातीताची आचरणें [अहंकाराचे प्रकार–एक–मुख्य, दोन–गौण तीन–अज्ञानकाळी देह व आत्मा मिळून एक मुख्य ज्ञानकाळी–कधी मी ब्रह्म तर कधी मी देह] | ३५०–३७१ | |
| २६] श्लोक २५ वा | ... ... ... ... ... | | ३६३–३७१ |
| २७] श्लोक २६ वा | ... ... ... ... ... | | ३७२–४०३ |
| | १] गुणाच्या अतिक्रमणाचा उपाय ... | ३७२–४०३ | |
| | २] अनन्य भक्ति–सत्रूप ब्रह्म ... ... | ३७४–३८१ | |
| | ३] अभेद भक्ति ... ... ... | ३८२–३८८ | |
| | ४] ज्ञान योग वृत्ति–दृष्टि, ज्ञानोत्तर भक्ति ... | ३८९–३९५ | |
| | ५] ब्रह्मत्व, सायुज्यता, चौथा पुरुषार्थ ... | ३९६–४०२ | |
| २८] श्लोक २७ वा | ... ... ... ... ... | | ४०४–४१६ |
| | १] सेवाच कां माझें आराधन तें ब्रह्मत्वी सोपान. मी आणि ब्रह्मत्व भिन्न नाही. ब्रह्म निष्कर्षतेचे निस्सीम असे ... ... ... | ४०३–४०८ | |
| | २] धृतराष्ट्राचे देवाशी कां दैवाशीं द्वंद्व व संजयाची सदिच्छा ... ... ... | ४०९–४१३ | |
| | ३] संवादाचा सांभाळ, चित्तास हरिखाचा आनंदाचा महापूर, उत्साहाचें अवतरण इत्यादीनें श्रीकृष्णाचें बोलणें संजय सांगेल, त्या अक्षरांतील भावांनीं मी तुम्हांस तुमच्या ठाव ठिकाणावर पोहोचविन असें श्रीनिवृत्तीचें श्रीज्ञानदेव म्हणालें ते ऐका ... | ४१४–४१६ | |


[ **टीपः**—श्लोक ११, १२, १३, १४, १५, हे एकत्र असून त्यांच्या ओव्या २०५ पासून २६० अखेर आहेत हा बदल लक्षांत घ्यावा. ]

# — अनुक्रम —

## अध्याय १४ वा

## ‘गुणत्रयविभागयोग’

कार्यारंभीं विघ्नविनाशक जो गणपति त्यास मी नमस्कार करून चौदाव्या अध्यायाचा क्रम लिहिण्यास घेतो. श्रीआदिनाथ जे मायादिसागर त्यांना व श्रीज्ञानदेवांना तसेंच त्यांचा आनंद जे श्रीनिवृत्तिनाथ त्यांनाहि सर्व भावानें मी वंदन करतों.

**श्रीगुरु स्तवन :—आचार्यांचा श्रीगुरूंचा जयजयकार–आचार्यवान् पुरुषोवेद; वेदपुरुष जे त्यांचा जयजयकार— १–५**

अहो आचार्य श्रीगुरूराया! आपला जयजयकार असो. आपण सर्व देवांमध्यें श्रेष्ठ आहांत. आपण ज्ञानदाते आहांत. पहांटेचें प्रज्ञासूर्यच आनंदाचा (तसेंच सुखाचा) उदय करणारे आहांत. येथें बुद्धिरूप उषेचा उदय करणारे आपण प्रज्ञा प्रभा कांतीरूपी सूर्य आहांत.

हे आचार्य–श्रीगुरुराया आपला जयजयकार असो (१). अहो! आपण सर्वांना विश्रांति देणारे आहांत; तसेंच मी ब्रह्म हा भाव देणारे कां अंतर्यामास ब्रह्मभावानें सुशोभित करणारे असे, त्या आपला जयजयकार असो! सागरासारखे आपण तेथें लोक ते सागरावरील तरंग होत. समुद्ररूपच असे तुम्हीं तेथें चवदाही भुवनें तीं तुमच्या लहरीच होत (२). अहो श्रीगुरुराया! आपण दीनबंधु आहांत. दुःखग्रस्त झालेले जे त्यांचे आपण बांधव आहांत. आपण करुणेचें निरंतर असे सिंधू आहांत. अहो जी! आपण तर स्पष्ट अशी जी ब्रह्मविद्यावधू तिचे प्रियकर आहांत. अहो! असे आपण कीं माझ्या विनवणीकडे लक्ष द्यावें (३). ज्यांस आपण लपून असतां त्यांस हें जगच (विश्व) दिसतें. पण परमात्मा हा सर्व विश्व व्यापून आहे असा भाव होतो, तेव्हां त्यांना आपण प्रगट होतां. तेथें विश्वासहित सर्वकांहीं तुम्हींच स्पष्टपणें असतां (४). पुढील जे त्यांची दृष्टि चोरावी तेव्हां दृष्टिबंधच एक निपजतो. तेथें नजर-बंदी होते. पण आपलें लाघवी असें चातुर्य हें नवलाचें, जें तुम्हींच कीं स्वतःस चेष्टवून आपल्या आत्मस्वरूपाला लपवितां, स्वतःस चोरून असतां (५).

**पंचतत्त्वांची समाराधना, महति— ६–१५**

या सर्व विश्वाला तुम्हींच एक आधार होत. तेथें कसचा तो बोध! अथवा कसची ती माया, पण हें सर्व कांहीं आपलें सहज असें लाघवीपण होय. अशा आपोआपच लाघवीपाद श्रीगुरुराया तुम्हांला मीं नमस्कार करतों (६). अहो श्रीगुरुराया हें केव्हांही जगामध्यें आपणच कीं रस का पाणीरूपानें जिव्हाळा आहांत. तो तुमच्या बोलानेंच कीं सुखरूपणास आला आहे. हे श्रीगुरुराया अहो! आपल्या प्रभावावरच मुळीं पृथ्वी ही क्षमारूप झाली आहे (७). सूर्य व चंद्र या जशा शिंपाच त्या, त्या तिन्हीं जगांमध्यें जरी उदो करीत (बाहेर येत असल्या, वर येत असल्या का प्रभावाचे) असल्या तरी, ते तुमच्या दीप्तीकांतीमुळें कीं मूळच्या तेजासच सतेज करणारें–तुमच्या दीप्त तेजानें कीं तेजासच सतेज करणारे असे होऊन आहेत (८). वायूचें जें वाहाणें तेंहि देविकीच्या आपल्या नित्य निजबळावरच होणारें. आकाश हेंही पण तुम्हांमध्येंच कीं लपंडावच एक खेळत आहे जसें कां (९). एवढेंच काय पण मायेचा निःशेष निरास आपणांमुळेंच होऊन ज्ञान जें तेंहीपण आपल्याच ब्रह्मतेजानं डोळस झालें आहे. बरें असो! असें हें वानणें, तर श्रुतींना महत् सायासानें असेंच कीं एक तें (१०). (स्वरूप नेणूनच) वेदांनीं वानणें केलें व तें चांगुलपणास आलें, तरी

तुझें आंग कांहीं दिसलें-सांपडलें नाहीं व मग तर आम्हां व त्यांना मुग गिळून एकाच पंक्तींत बसणें असें झालें, होत आहे कीं (११). अहो सर्व जलमय तेथें प्रळयकाळच्या मेघाचा थेंबही पण उपमिला जात नाहीं, तेथें समुद्रास मिळणाऱ्या त्या मोठमोठ्या नद्या काय निवडतां येतील? (१२). सूर्याचा उदय झाला म्हणजे चंद्र जसा का काजवाच एक, त्याप्रमाणें आम्हांस व श्रुतींना काय तुमची बरोबरी होईल? (१३). द्वैताचा मागमूस नाहींसा होतो, तेथें परावाणीसह वैखरीही बुडून जाते, असे तुम्हीं वाखाणण्यास अशक्य असे आहांत! तेव्हां तुमची वाखाणणी करण्यास तोंड कुठून आणावें? तेथें शब्दच मुळीं नाहीं (१४). आणि म्हणूनमाठीं आतां तें तुमचें स्तुतीकरणें सोडून आपल्या चरणीं माथाच कीं मुकाट्यानें, निवांतपणें ठेवावा हेंच भलेपण होय (१५).

## श्रीगुरूंचे चरणीं ज्ञानाकरतां याचना— १६–२४

तरी तुम्हीं जसे आहांत तशांना, अहो! जी श्रीगुरुराया मी नमस्कार करतों—नमो नमो. अहो श्रीग्रंथरचनेचें काम फलद्रुप होण्यास आपण व्यवहारांत यावें! भांडवल पुरविणारें व्हावेत (१६). हे श्रीगुरुराया, आतां कृपारूपी द्रव्य जें व्यापारास लागणारें मुद्दल तें मजकडे द्या, पूर्ण कृपादृष्टीनें मजकडे पाहा: त्यावरच कीं मी ज्ञान मिळवीन. माझी बुद्धीरूपी पिशवी आपल्या कृपारूपी भांडवलानें भरा. सरस्वती ज्ञान चरणाची जोड करून मजला थोर करा (१७). मग मी शब्दरूपी संसारास येऊन सरसावेन व संतांच्या कर्णांना, शब्दवाक्यरूपी, शब्दब्रह्मरूपी, श्रवणरूपी, अभ्यास, कीर्ती, वेद, ऐकणें, रूपी अलंकार घालीन. त्यांना उत्तम, उत्कृष्ट अशा विवेक व साहित्यालंकारांनीं—लक्षणानीं विभूषित करीन (१८). श्रीगीतेचा अर्थ हाच कोणी एक ठेवा, तोच माझें मन हें काढूं लागेल—, वर्णनास आणील, असें करा व आपला प्रेमळपणा हेंच अंजन आपण माझ्या डोळ्यांत घाला (१९). ही शब्दमयसृष्टी—वाकसृष्टि, श्रीसरस्वती, वागश्री एकदमच माझ्या बुद्धीच्या डोळ्यांना दिसो. असे अहो श्रीगुरुराया आपण करुणारूप निर्मळ अशा कारुण्यबिंबानें उदयास यावें कीं जी (२०). माझी प्रज्ञारूपी आवडती वेल्हाळा वेली काव्यानें मुफळ होवो. आपण वसंतामध्येंही जो उत्कृष्ट असा उपायवनवसंत तो होऊन प्रीतीचें व्हा (२१). सिद्धांताना पूर आल्यामुळें ही माझी बुद्धीरूपी गंगा ज्ञानसंपन्नतेनें थोर होऊन आहे, ज्ञानसंपन्न झाली. अशा उदार कृपादृष्टीचा वर्षाव करा, माझी मतीगंगा ही महत्त्वास येत आहे—आली; ज्ञानविकासावर उभी झाली, आश्चर्याची झाली, असामान्य अशी झालीं असें करा, सर्व सिद्धांताचें सिद्धपण हें बुद्धीनें आकळल्यामुळें सर्व बुद्धीभार हा देवलोकचा जसा असा आश्चर्याचा, महत्त्वाचा, असामान्य असा व्हावा (२२). विश्व हेंच एक ज्याचें स्थान असे तुम्हीं त्या तुमचा प्रसादरूपी—अनुग्रह चंद्रमा-मुखचंद्र—मला स्फूर्तीची—मति विकासाची पूर्णिमा करा (२३) अहो श्रीगुरुराया आपण मजला कृपादृष्टीनें अवलोकन केलें असतां, ज्ञानसागरास भरती येऊन नवरस हे वृत्तीचे होऊन स्फूर्तीनें भरून वाहूं लागतील (२४).

## श्रीगुरुराज कृपाप्रसादाची अपूर्वता— २५–३२

तेव्हां श्रीगुरुरायांनीं संतुष्ट होऊन म्हणितलें कीं काय अहो! पहा! तुवा तर विनंतीचे निमित्त पुढें करून दुजेपणानेंच कीं स्तवन आरंभिलें आहे (२५). बरें असो! आतां असें कर कीं निष्फळ शब्द वापरूं नकोस परंतु जाणायचा विषय आहे तो चांगला गोडसा करून श्रोत्यांची श्रवणाची ती उत्कंठा भंगु देऊं नकोस, ग्रंथार्थ स्पष्ट करून सांग (२६). अहो जी स्वामी हो! याचीच मी वाट पहात होतों कीं श्रीमुखानें आपण म्हणावें कीं ग्रंथ सांग म्हणून (२७). परंतु हें मी केलें किंवा हें माझ्यामुळें झालें असें कांहींही मुळीं या वासनेमध्यें, इच्छेमध्यें, लालसेमध्यें ठेवलें नाहीं (२८). अहो! सहजपणेंच जो दुर्वेचा अंकुर तो आपल्या अंगानें अमर असलेला, तेथें तर अमृताचा पूरच आला, वर्षावच झाला (२९). म्हणून आतां येथें आपला

प्रसादच झाला व आतां सविस्तर अर्थप्रतिपादक पद्धतीनें, कलात्मक रीतीनें, विवेचनपूर्वक व चातुर्यानें मूळ गीताशास्त्राचीं पदें आपल्या कृपेनें स्पष्ट करीन, वाखाणीन, वानण्याचें करीन (३०). या जीवदशेचे नटनाट्य तेथें संदेहच नाहिंसा होवो-चित्तांतील सर्व संशय नाहिसे व्हावेत व श्रवण करण्याची आवड द्विगुणित होवो, श्रवण करावें ऐकावें अशी इच्छा वाढून दुपटीची व्हावी (३१). श्रीगुरुकृपारूपी गृहामध्यें घरीं, माझी बोली साचारपणानें मधूर अशी अवतरो ! अशी भिक्षाच मी मागून आहें (३२).

## पूर्वाध्याय, अनुसंधान, सिंहावलोकन-- ३३-४१

मागें तेराव्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास अशी गोष्ट सांगितली कीं (३३). क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगानें, प्रकृतिपुरुषांच्या संयोगानेंच हें जग उत्पन्न होतें, व गुणाच्या संगामुळें (संसर्गामुळें) आत्मा हा संसारीक होतो (३४). आणि हाच, मायोपाधिक म्हणजे पंचमहाभूतें, मन, बुद्धि व अहंकार या मूळ तत्वांनीं प्रकृतिगत असा म्हटलेला, प्रकृतीच्या आधीन, आत्मा झाल्यानें त्याला सुखदुःखें भोगावीं लागतात. एरव्हीं वस्तुतः आत्मा गुणातीत आहे (३५). तरी असंग अशा आत्म्याला संग (संसर्ग) कसा घडतो ? प्रकृतिपुरुषाचा संबंध (क्षेत्रक्षेत्रज्ञयोग) कोणता ? व सुखदुःखादि भोग हे त्यांस कशामुळें कां कसें तें ? भोगावें लागतात ? (३६). गुण ते कसे आहेत ? ते किती आहेत ? ते कोणत्या रीतीनें बांधतात ? ते आत्म्यास कसे बंधक होतात ! अथवा गुणातीतता जीं तिचीं चिन्हें-लक्षणें, लिंगें तीं कोणतीं ? (३७). याप्रमाणें ह्या सर्व अर्थाला-हेतूला, रूप देण्याकरितां वर्णन करण्यास, चौदाव्या अध्यायाचा विषय आहे (३८). तरी आतां तो, प्रस्तुततेचा असा, वैकुंठीचे भगवान् विश्वेश श्रीकृष्णांनीं, प्रियपणानें सांगितलेला, अभिप्राय तो, ऐका (३९). ते म्हणाले कीं, हे अर्जुना ! अवधानाची चतुरंग (बुद्धि, मन, अंतःकरण, चित्त) सेना एकत्र करून या ज्ञानास झोंबावें, लिगटावें (४०). आम्हीं पूर्वी केलेल्या प्रतिपादनामध्यें अनेक उपपत्तींनीं, युक्तीनीं हें सांगितलें आहे. परंतु अजुनहि तुजमध्यें ती प्रतीती-तो अनुभव उतरत नाहीं. तुझ्या पोटांत अनुभव किंवा प्रतीती ती शिरत नाहीं-असें दिसतें (४१).

## श्रुतीनें गौरविलेलें ज्ञान, श्रेष्ठ असें तें स्व (म्हणजे) आपलेंच ज्ञान आपणांस परकें (परस्वाधीन कां परतंत्र) असें झालें आहे-- ४२-४९

म्हणून जें, श्रुतीनीं वरचेवर, हेंच 'ज्ञान श्रेष्ठ' असें पुन्हाः पुन्हाः वाखाणलें आहें तें तुजला पुन्हा तेथींचें मार्ग शोधून सांगतों (४२). **'परज्ञान'**—एरव्हीं पाहिलें असतां ज्ञान हें आपलेंच स्वाभाविक, पण तें पलिकडचें अथवा दूरचें अथवा परक्याचें-इंद्रियांचें-परतंत्र श्रेष्ठ-असें झालें आहे. संसार व स्वर्ग इत्यादींच्या नादीं आपण लागल्यामुळें आपणांस तें परकें (म्हणजें आपलें नव्हे) असें झालें आहे (४३). याच कारणास्तव हें ज्ञान भवस्वर्गाहि ज्ञानापेक्षांही सर्व तऱ्हेनें उत्तम व श्रेष्ठ असें मीं म्हणतों, कारण इतर ज्ञानें हीं ह्या (अध्यात्म) ज्ञानरूप अग्नीपुढें तृणवत् होत, गवताप्रमाणें क्षुद्र होत (४४). जीं शास्त्रीय ज्ञानें भव व स्वर्गाला जाणून यागच चांगले म्हणूं लागलीं व दुजेपण कां भेद ज्ञानांतच खरी ओळख आहे-भेदानें, परीक्षा होते-असें म्हणूं लागलीं (४५). अशीं तीं सर्व ज्ञानें या अध्यात्म ज्ञानानें तर स्वप्नाप्रमाणें केलीं जशा कां वायूच्या लहरी गगनांतच लय पावतात, गगनानेंच गिळिल्या जातात (४६). सूर्य उगवल्यावर चंद्रादितेजें लोपतात किंवा जळप्रळयांत नदीनद असे भेद उरत नाहींत (४७). तसें हें अध्यात्म उदय पावल्यानें इतर सर्व ज्ञानें लय पावतात. म्हणून हे धनंजया ! हे उत्तम ज्ञान होय (४८). हें पंडुसुता ! अनादि अशी ती आपली मुळचीच मुक्तता-जो मोक्ष तो या ज्ञानानें हातीं येतो व आपली मूळची स्वयंसिद्ध स्थिति प्राप्त होते (४९).

## ज्ञानप्राप्तीची थोरवी— ५०–६०

ज्याची प्रतीती झाली असतां सर्व विचारच मुळीं संमत होऊन आला, तो समस्त झाला. तो समस्तक झाला व ज्ञान हें सिद्ध झाल्यामुळें, आतां संसृतीचें डोकें मुळींच वर होईना (५०). मग त्या ज्ञानी पुरुषांनीं (देहींनीं) विषयाकडची मनाची प्रवृत्ती मनानें हटवून, सर्व अंगच विश्रांतीस आल्यानें, ते देहच आवडून घेतल्यासारखे कां देहाजोगे वागत नाहींत (५१). मग जें देहाचें बळ (देहाचें बेले–स्थूल व सूक्ष्म देह) ते एकेच वेळीं ओलांडून ते विश्रांति पावतात आणि मत्समान होतात. त्यांच्यांत व माझ्यांत भेद उरत नाहीं. (ब्रह्मरूपी तराजूनें मीं व तो तोलला असतां समतोल होतो) (५२). माझ्या नित्यतेनें तें नित्य असें, माझ्या परिपूर्णतेवर ते पूर्ण असे हे पांडुसुता ते होतात (५३). मी जसा अनंतानंद आहें, सर्व आनंद अनंत असा–व सत्यसिद्ध–सिद्धसत्य असा, तसा (५४). जें मी व जेवढें मी जसें, तसें तेंच झालें, ज्याप्रमाणें घट फुटल्यावर घटाकाश हें महदाकाशच जसें (५५). किंवा ज्याप्रमाणें दिव्याच्या एका ज्योतींत अनेक ज्योती–प्रभा–शिखा–शाखा–असतात. त्या सर्व ज्योति शाखा मिळून एकच (दिवा) ज्योत होते. तो मूळचाच दिवा जसा (५६). त्याप्रमाणें हे अर्जुना! द्वैताची वारी संपते नाम–अर्थ (नाम–हरेक पदार्थ–वस्तुमात्राला जें नांव आहें तें नाम व तेथीलचा अर्थ म्हणजे जडाला जीवविता जो परमात्मा त्यास ओळखणेंरूपी पुरुषार्थ तो. असें हें नाम व अर्थ एकाच पंक्तीला बसून नांदूं लागोत, सुखरूपणें वर्तूं लागोत). हे एकत्र नांदू लागोत (५७). या कारणास्तव सृष्टीच्या मूळ उत्पत्तीच्या वेळीं त्यांचें जन्मणें घडत नाहीं, ते एकत्वानें असतात (५८). सर्व सृष्टीची (सृष्टीचें जुंपणें जें दृष्टीचें पाहाणें) जी आदि सर्व जगत् तेथें त्यांना देहाच्या बांधणीचें व्हावें लागत नाहीं. देहधारणेचें बंधन होत नाहीं. देहधारी व्हावें अशी त्याची बांधणी होत नाहीं. असे ते प्रळयाच्या वेळेस नाश पावतील काय? तर नाश पावत नाहींत–निमत नाहींत (५९). म्हणून हे धनंजया! जे या आत्मज्ञानाला अनुसरून मद्रुप झाले, ते जन्म का क्षयास अतीत झाले, त्यांना जन्मही नाहीं व निमर्णेही नाहीं (६०).

## देवाशीं संवाद (अर्जुन व देव श्रीकृष्ण यांच्या संवादाचा) केल्याचा परीणाम गोडी, ज्ञानाची महती, ज्ञानाचें महत्व, महिमान भक्तिरहस्य— ६१–६४

(तेथें पार्थासहिपण तेथीलची गोडी लागावी म्हणून तें ज्ञान वाखाणणें होत आहे.) अशी ज्ञानाची थोरवी देवांनीं मोठ्या आवडीनें वाखाणिली, वर्णिली न वर्णिली तोंच (६१). पार्थास कांहीं निराळीच ज्ञानाची अवस्था प्राप्त झाली. त्याचें सर्वांग हें श्रवण करूं लागलें तो संपूर्ण लक्षाने नटला (६२). स्नेहाच्या पान्हयानें देवासारखा अर्जुनहि व्यापला म्हणून गगन तत्व जें आहे त्या गगन तत्वास आवरून घेऊन त्याही पलिकडचें जसें हें निरूपण झालें (६३). देव आतां म्हणूं लागले कीं, हे बुद्धिवंता! हे बुद्धीच्या कांता! आज आमची वक्तृत्वता उजविली गेली, सफळ झाली, विवाहित झाली, जो कांहीं तूं आमच्या बोलाच्या मापाएवढा जसा श्रोता आम्हांस जोडून आहेस (६४).

## महत्‌ब्रह्म, अव्यक्त प्रकृति (माया) क्षेत्रयोगें जग वीतें कसें तें— ६५–७१

त्रिगुणरूपी पारध्यानीं देहरूपी पाश टाकून एक मी जो, तो अनेकत्वरूपी देहपाशानें कसा वेढला जातो (६५). या क्षेत्र–क्षेत्रज्ञ–योगानें हें जग कसें जन्मतें? या जगाचा कसा विस्तार होतो? ती पद्धती, तऱ्हा, पायरी, सांगतों (६६). परंतु क्षेत्र हेंच एक तेथें निमित्त असें म्हटलें गेलें. मायेच्या संगानें अनेक जगें मीं कशीं निर्माण करतों तें ऐक. माझ्या संगरूपी बीजानें हें क्षेत्र पिकतें, प्रकृतीला भूतमात्रांचें पीक येतें, म्हणून तिला क्षेत्र म्हणतात (६७). एरव्हीं पाहिलें असतां मूळ मायेला महत्‌ब्रह्म (महत्‌ब्रह्म–माया महत् म्हणजे तीन गुणांच्या साम्यावस्थेचें शुद्ध सत्व–असें हें नांव पडण्याचें कारण हें अज्ञान. महत्तत्वांचें विसाव्याचें

स्थान आहे) असेंही म्हणतात; कारण महदादिचें गुणमयीचें तें महत्‌ब्रह्म विश्रामस्थान आहे (६८). **सृष्टीची उत्पत्ती**—तिच्यावरच विकार बळावतात, गुणांचे परिणाम अतिशय वाढविले जातात, आणि म्हणूनच असें समज कीं ती महद्‌ब्रह्म होय (६९). अव्यक्तवादी जे आहेत त्यांच्या मतानें हिला 'अव्यक्त' म्हटलें व सांख्याच्या प्रतीतीनें 'प्रकृति' ती हीच होय (७०). हे प्राज्ञराया ! हे सूज्ञा ! वेदांती जे ते हिला 'माया' म्हणतात; असो. असें हें अज्ञान किती बोलावें तें ? म्हणून हिला 'महद्‌ब्रह्म', 'अव्यक्त', 'माया', 'अज्ञान', अशीं नांवें आहेत (७१).

**अज्ञानाचें स्वरूप— ७२–८०**

आपला आपल्यास जो विसर, (मी ब्रह्म असून मी देही का देहधारी का देहच) तेंच या अज्ञानाचें किंवा मायेचें रूप होय. [सत्य ज्ञान नसतें. विपरीत ज्ञान किंवा विज्ञानहि नसतें. अशी जी मधली अवस्था तें अज्ञान होय] (७२). आणखी एक गोष्ट आहे ती ही कीं, आत्मानात्म विचारावर ती पाहिली असतां दिसत नाहीं, जसें हातीं दिवा घेऊन पाहिलें असतां अंधार हा मुळीं दिसत नाहीं (७३). दुधावरील साय जशी तें दूध हलविलें असतां मोडतें व निश्चळ ठेविलें तर पुन्हा जमतें (७४). जागेपण नाहीं, कां स्वप्नीही नाहीं, किंवा स्वरूप समाधिही नाहीं–पण गाढ अशी सुषुप्ति जशी कां (७५). प्राणवायू उत्पन्न होण्यापूर्वीं आकाशाचें पोकळ वाजणें, त्यासारखें खरें पाहिलें असतां अज्ञान आहे (७६). हा खांब आहे का पुरुष आहे असा कांहीं निश्चय नाहीं, पण तेथें आभास तर दिसत आहे (७७). त्याप्रमाणें वस्तू अशी आहे तशी दिसत नाहीं, पण कांहीं तरी वेगळेंच दिसतें (७८). ना धड रात्र, ना धड तेज–दिवस–तेथीलची संधी–सांज जशी, त्याप्रमाणें ना विरुद्ध, ना आपलेपणाचें, कां स्वरूपहि नाहीं व जगहि नाहीं, असें तें अज्ञान होय (७९). अशी जी दशा तिला अज्ञान असा वाद किंवा वाज आहे. (विचार स्फुरण पावल्यावर अज्ञान टिकत नाहीं.) अज्ञानांत गुरफटलेल्या–, अज्ञानानें आच्छादिलेल्या–, आत्मतत्त्वाला प्रकाशाला–क्षेत्रज्ञ हें नांव आहे (८०).

**अज्ञान दशा तेथें गुंडाळलेला प्रकाश तो क्षेत्रज्ञ जीवात्म्याचें रूप, क्षेत्रक्षेत्रज्ञाचा, प्रकृती पुरुषाचा योग तो हाच; हा योग आत्मतत्त्वाच्या सत्तेचा नैसर्गिक म्हणजे स्वाभाविक धर्म आहे— ८१–८६**

अज्ञान थोरपणास आणणें व स्वतःच्या सर्वस्वाला नच जाणणें, हेंच रूप क्षेत्रज्ञाचें जाणावें–, हेंच क्षेत्रज्ञाचें विशिष्ट लक्षण समज (८१). असा हा (आत्मानात्म्याचा योग–किंवा) प्रकृती पुरुषाचा योग आत्मसत्तेचा–आत्मतत्त्वाचा का सत्ता ब्रह्म जें त्याचा स्वाभाविक (निसर्गसिद्ध) धर्म आहे (८२). अज्ञानामुळें आत्म्याला स्वतःच्या ठायीं अनेक रूपाचा भास होतो (८३). जसा का भिकारीच एक भ्रमित होऊन म्हणूं लागला कीं, मी स्वर्ग पाहून आलों आहें (८४) त्याप्रमाणें स्वस्वरूपावरून चळलेली, लचकलेली दृष्टी तेथें जें कांहीं देखणें होतें, त्यासच अंथरलेला नजारा म्हणजेच सृष्टि 'मीं'च म्हणतात (८५). स्वप्नभ्रांतीनें एकटा, एकाकी, जो तो बहुपण पाहातो, असेंच सारखेपणाचें महत्त्व स्मरणाशिवाय असलेल्या आत्म्याच्या ठिकाणीं असतें (८६).

**अविद्या–जिचें 'नाहीं' हेंच रूप–ती निद्रिस्ताला सान्निध्याची व जागृताला दूर अशी— ८७–९१**

हेंच भ्रांत न होता सिद्धांतांनीं स्पष्ट करून पुन्हा सांगू पण तूं याची प्रतीती घेच घे (८७). तरी माझी गृहिणी, (**संसार परमार्थास साहाय्य करणारी विवाहित, अर्धांगी स्त्री मजप्रमाणें ही**) अनादिपण नवी तरुणी, (**परस्पर विरुद्ध लक्षणांनीं युक्त अशी**) वर्णन करण्यास अशक्य,

अशी ही (**जी विद्यमान नव्हे ती**) अविद्या—ही अविद्या माया नांवाची माझी स्त्री, अनादि, सदा तरुण व मोठ्या गुणाची आहे. नाहींपण हेंच तिचें रूप आहे (८८). हिची आकृती ही फार मोठी व्यापक आहे–ही, निद्रित कां निजलेले जे त्यांच्याजवळ असते, व जागृतापासून दूर राहाते (८९). पण मी निजलेलों असलों म्हणजे ही जागी रहाते. (स्वरूप ज्ञान नसलें म्हणजे हिचे खेळ चालतात.) आणि माझें जें असणें त्यापासून म्हणजे आत्मसत्तेच्या संभोगानें ती गर्भिणी होते (९०). व महद्ब्रह्माच्या उदरीं म्हणजे मूळ मायेच्या पोटीं अष्टधा प्रकृति विकाररूप गर्भाची ही वृद्धि करते (९१).

## प्रकृती पुरुषसंगानें प्रसवलें बुद्धितत्व. त्यानें भरलें तें मन. त्या मनाची ममता तो अहंकार. तो पंचमहाभूतांना रूपास आणतो. तेथें विषय इंद्रियेंहि पण रूपाचीं होतात. विकार क्षोभ त्रिगुण उभे झाल्यानें वासनारूपी जीव जन्मतो— ९२–९५

आत्मा व प्रकृती यांच्या संयोगापासून पहिलें तत्व जें प्रसवलें तें बुद्धि होय. बुद्धितत्व भारलें गेलें तें मन जाण (९२). मन हें तरुण झालें म्हणजे तेथें ममताच ही तरुण अशी, तिनें अहंकार तत्व रचिलें. (भूतादिम् अव्ययन्) व त्या अहंकारापासून महाभूतें हीं जीवदशेस येतात (९३). आणि स्वभावेंकरूनच विषय व इंद्रियें यांचा परस्पर संबंध जडल्यानें भूतेंहीपण त्याचरोबरच रूपाला येतात (९४). विकार वाढल्यावर पाठोपाठ त्रिगुणांचें उभें होणें होतें. व तेव्हां वासनाच जशी तात्काळ गर्भास आली तेथें जीव निर्माण होतो (९५).

## प्रकृतिमायेचें लेकरूं रूपास येतें. तेथें चारी खाणी या त्याचे हातपाय तळ होत. ९६–१०३

बीजकणिका ही उदक भेटतां क्षणींच वृक्षाचा आकार आपल्या जीवींच बांधते, माझ्या संगानें मायेस अनेक जगें–ब्रह्मांडेंरूपी वाढ फुटते, कोंभ येतात (९६). त्याप्रमाणें माझ्या संगानें अविद्या ही अनेक जगरूपी अणुप्रमाणें अंकूर घेऊं लागते (९७). मग त्या गर्भगोलास कसला आकार का रूप येतें तें, हे सुजनांच्या राया ऐक (९८). त्याचे प्राणिज, स्वेदज, उद्भिज, जारज असें अवयव उमटूं लागतात, असे वर्गविभाग पडतात (९९). आकाश व वायूंच्या वशतेमुळें गर्भरस वाढलेला जो बाहेर पडतो तो **प्राणिज** अवयव जाणावा (१००). तम व रज यांच्या संयोगानें व पाणी आणि तेज यांच्या आधिक्यानें झालेला तो **स्वेदज** जाणावा (१०१). निव्वळ हलका असा तमोगुण व आप आणि पृथ्वी यांच्या संयोगानें स्थावर **उद्भिज** दृग्गोचर होतात (१०२). पांच ज्ञानेंद्रियांना, पांच कर्मेंद्रियें सहाय्यकर्ते होऊन, या दोघांची सहकारिता होऊन व मन बुद्धि यांची सहजींच जोड मिळणें हेंच **जारजा**च्या उत्पत्तीचें कारण–हेतू होय (१०३).

## माझ्या सत्तेनें (सत्ता, आहेपण, सत्तारूपपुरुष) माया हें विश्वलेकरूं व्याली— १०४–११६

याप्रमाणें हे उत्पन्न होतात. (असें हें मायेचें लेकरूं मोठें विचित्र स्वरूपाचें आहे.) अंडजादि सरळ अशा चार भूतयोनी हे हातपाय (करचरणतळ), स्थूल महा प्रकृति हें मस्तक होय (१०४). प्रवृत्तीनें दोंद वाढलें, पोट पेललें (प्रवृत्ती, त्याचें ढेरपोट), निवृत्ति ही सरळपाठ, अष्टदेव योनी (उपदेव, गंधर्व, किन्नर, इ.) हीं कंबरेच्या वरचीं आठ आंगें (१०५). स्वर्ग हा कंठ, मृत्युलोक ही कंबर, (मध्यअर्धभाग), पाताळ (लोक) हा नितंब, असें त्याचें स्वरूप आहे (१०६). आतां असें पाहा कीं, असलें हें लेंकरू ती प्रसवली ज्या लेकराचें तिन्ही लोक हें बाळसें होय (१०७). चौऱ्याऐंशी–८४ लक्ष योनी हे हाडापेरांचें सांधे (सांदणी) होत. असें हें बालक दिवसेंदिवस वाढत असतें (१०८). देहाच्या अनेक अवयवांना नामांचें अलंकार लेववितें. असें मायेनें त्याला अज्ञानरूपी दूध पाजून पुष्ट केलें (१०९). निरनिराळ्या

सृष्टि ह्या त्याच्या हातींची बोटें होत व भिन्नभिन्न ( भिन्नाभिमान, भिन्नाभिन्न ) प्रकृतीचा अभिमान वाहणाऱ्या आंगठ्या घातलेल्या आहेत (११०). हें एकुलतें एक अत्यंत सुंदर असें चराचर प्रसवून ती प्रकृती स्वतःस महत्त्व घेऊन आहे. **प्रकृती हें अत्यंत सुंदर असें विश्वरूप बाळ प्रसवून स्वतःस ती धन्य मानती झाली** (१११). ब्रह्मा हा त्याचा प्रातःकाळ, विष्णू हा त्याचा मध्यान्ह काळ आणि शंकर हा सायंकाळ आहे (११२). हें बाळ खेळून आलें म्हणजे महाप्रळयरूपी शय्येवर निजतें, आणि नव्या कल्पाच्या आरंभाला ( विपरीत ज्ञानानें ) अज्ञान मोहानें जागें होतें. महाप्रळयामध्यें जसें का खेळून भागून, दमून झोपेला आलें, झोपी गेलें व कल्पारंभ झाला असतां पुन्हां अज्ञानानें–विषमज्ञानानें जागें होतें (११३). **याप्रमाणें, हे अर्जुना ! भासमान होणाऱ्या जगामध्यें, युगांमध्यें, युगें हीच वृत्तीची पावले टाकीत टाकीत** क्रीडा करते ( ११४ ). याला संकल्प आवडतो. तोच त्याचा इष्ट किंवा मित्र असतो. अहंकार (भूतादिमव्ययम्) याचा खेळगडी होय. अशा या बाळाचा शेवट फक्त आत्मज्ञान झालें कीं होतो. अथवा असेंही म्हणूं कीं बाळाचा अंत सत्यज्ञानानेंच होतो (११५). आतां हें बहुत बोलणें असो. पण एवढें खरें कीं मायेपासून विश्वाची उत्पत्ती झाली. तेथें माझा आहेपणा हाच बरोबरीनें हातभार लावणारा होय. माझें मद्रुपत्व हेंच त्यांस माहात्म्य झालें (११६).

## परमात्मा व विश्व यांचा अभेद संबंध— ११७–१२९

आतां हें लेकरूं म्हणजे हें जगडंबर–भासमान जग होय. याचा पिता मी महत् ब्रह्म–परमात्मा होय व याची आई माया जाण (११७). आणि एवढ्याच करितां हीं अनेक शरीरें पाहून तूं आपल्या चित्ताचा भेद करूं नकोस. कारण मन बुद्धि आदि हीं सर्व एकच होत. यावरून असें पाहा कीं, हें विश्व मूलतः एकच आहे, जरी त्यांत नानाप्रकारचीं शरीरें दिसतात. भूताभूतांत भेद आहे असें मनांत आणूं नकोस (११८). असें पाहा कीं, वेगवेगळ्या अवयवांनीं एकच देह झाला त्याप्रमाणें हें सर्व विश्व विचित्र जरी तरी तें तत्वतः एकच आहे (११९). उंच अथवा खालीं असणाऱ्या, किंवा निरनिराळ्या अथवा लहान मोठ्या फांद्या ह्या जशा एकाच बीजापासून झालेल्या (१२०). आणि यांचा संबंध तो कसा म्हणशील तर मातीचें भांडें हें जसें मातीचें अपत्य, किंवा कापूस, त्याचा तंतु व त्याचें वस्त्र–म्हणजे पटत्व हें कापसाचा नातूच जसा (१२१). अथवा अनेक कल्लोळांवर कल्लोळ ही जशी सागराची संपत्ती, **त्याप्रमाणें आमचा व चराचराचा संबंध जाण** (१२२). असें आहे म्हणून काय वह्नि, काय ज्वाला, हीं दोन्हीं वह्निच होत. त्याप्रमाणें हें सर्व कांहीं चराचर मीच आहें याचा संबंध किंवा नातेंगोतें जोडणें हें व्यर्थतेचें होय, व्यर्थच जसें (१२३). हें जग उत्पन्न झाल्यामुळें जर माझा लोप होतो म्हणावें, तर जगद्रुपानें कोण प्रकाशतो ? माणिक रत्न आपल्या तेजानें काय झांकलें जातें ? (१२४). अलंकार घडविल्यानें काय सोनेंपण नाहिसें होतें ? कमळ हें उमलल्यावर काय त्याचें रंग रूप इत्यादि नाहिसे होतात ? (१२५). असें पाहा कीं, हे धनंजया ! अवयव हे अवयवीचें रूप नव्हे काय ? अवयवांनीं आच्छादिलेला जो अवयवी तोच त्याचें मूळ रूप होय. तेथें सर्व रूपच एक तें. (१२६). पेरलेल्या जोंधळयाचा दाणा जोरानें वाढीस लागला, तेथें कणसें आलीं, तर मूळचा पेरलेला दाणा कमी झाला, नाहींसा झाला काय ? जोंधळा पेरल्यानंतर तो वाढीस लागून कणसें आलीं–तेथें तें मूळचें रूप झांकलें गेलें कां उत्तमतेस आलें, उत्पन्नतेचें झालें, कां लाभाचें, प्राप्तीचें झालें म्हणावें ? (१२७). म्हणून जगाला पलीकडे सारून जगाहून मी वेगळा–अशा विचारानें मला पाहावें असें नव्हे,–मी दिसतों, स्पष्ट होतों असें नाहीं ; तर संपूर्ण जगासहित मीच एक आघवा होय. हें सारें विश्व मीच आहें. अभिन्नपणानें पूर्ण, सगळा मी परमात्माच ( १२८ ). असा हा सिद्धांत तूं खरेपणाचा व निश्चयाचा समजून आपला जीवच तेथें लाव. हें कधींही विसरूं नये अशी खूणगांठ पक्की करून ठेव हा सिद्धांत आपल्या हृदयाशीं बाळगून ऐस (१२९).

**(जगत्‌बंधू, बांधव,) बंधन तें कां कारण (बंधतेचें का मुक्ततेचें तें; लक्षण नुसतें आरोपिलेलें)— १३०-१३८**

आतां माझें मीच स्वतःला निरनिराळ्या शरीरांत दाखविलें, तेथें गुणच जसें घडीवतेचे केलें असें पाहाणें आवडतें, असें दिसतें. येथें गुणामध्यें मी गोंवला गेलों असें भासतें. स्वतःला निरनिराळ्या शरीरांत निरनिराळा भासवितो, तेथें गुणत्रयामुळें बंधनच झालें असें दिसतें याचें कारण मीच केलेल्या गुणत्रयाचें बंधन (गांठ) होय, त्रिगुणादि विकारांनी मीच शरीरी (आत्मा) बांधल्या सारखा वाटतो (१३०). स्वप्रामध्यें आपण आत्म्याला प्रकृतीचें गुण लावून ते प्रकृतीचें उभें भोगतो. जसें कां स्वप्नांतच स्वप्न पडून आत्मा प्रकृतीच मानली तसें. (असें हे कपिध्वज! जाण. तेथें प्रकृतीच जशी का आत्मसत्तेस भोगणारी व जीवितच तिनें भोगिलें असें होतें) (१३१). कावीळ झालेल्याच्या डोळ्यांस सर्वत्र पिवळेंच दिसतें व तसें तें देखणें दिसत आहे तेंहीपण त्यास त्यामुळेंच कळतें (१३२). अथवा सूर्यप्रकाशानें अभ्र स्पष्ट दिसतें. त्या अभ्राच्या मागें तो सूर्य लोपला हेंहीपण सूर्यामुळेंच दिसतें ना? (१३३). आपल्या स्वतःमुळेंच झालेली जी छाया तेथें त्या स्वतःच्या छायेस पाहून जर आपण भ्यालों तर तेथें काय दुसरेंपण असतें? आपण आपल्या सांवलीस भ्यालों म्हणून सावली काय आपल्यापासून निराळी असते? आपली छाया जी तीच मी म्हणजे आपलेपणाची झाली तर मग भिऊन जाऊन त्या भिण्यास अंत केव्हांही नसणारच. (येथें जसा मी स्वतःसच पारखा झाल्यामुळें असें होतें) (१३४). त्याप्रमाणें हीं अनेक शरीरें दाखवून मी नानात्वाचा होतों. तेथें नानात्वाचें होणें हा तेथील वरील प्रमाणें जो बंधबंधन आहे तोहीपण मीच पाहातों, हेंहीपण समजावें (१३५). असें नानात्वाचें होणें हा जो बंध (बंध=बंधन, बंधु=भाव) आहे तोच मी बांधून टाकिला, बांधीव केला, घडीवतेचा केला, गुणानें घडला, समजून घेतला, आपलासा केला, तेथें मीच स्वतःस गुणरूपानें घडविलें असें माझें केलेलें हें मी जाणावें पण असें तेथें मुळींच स्वतःकडून उमजणें हें होतच नाहीं. आपल्या नेणण्यामुळें—अज्ञानामुळें तें उगवत नाहीं, उपजत नाहीं, उमजत नाहीं. आपलें यथार्थ स्वरूप न कळल्यामुळेंच मी मुक्त आहें का बद्ध आहें असा प्रश्न उद्‌भवतो. बंधन का न बंधन करणारें? म्हणजे मुक्तता करणारें असें जें हें जाणणें तें मज माझे बंधन तें नच जाणून आपलेपणामुळेंच उत्पन्न होणारें मुक्त असें दोन्हीं भ्रामक कां म्हणूं नये? भाव तो बांधून कां न टाकावा? असें जें जाणणें तें माझें मजलाच समजणें व्हावें पण स्वतःस नेणण्यामुळें तें उगवणारें होतें (१३६). **प्रकृतीच्या गुणत्रयानें आत्मा देहाएवढा होतो का देहामध्यें कसा बद्ध होतो तें.** अहो! हें पाहा कीं, कोणत्या गुणानें—बंधाचा झालो—बंध, देहबंध, शरीर, संसारपाश संबंध—मीच मी आपल्या भावावर उभा झालों? भावाचा—बंधन स्थानाचा—झालों. तेथें आवडणेंच एक सर्व तें हे अर्जुन देवा! प्रिय अर्जुना! (अतिप्रेमादरानें देवा हे संबोधन दिलें.) ऐका. येथें अद्वितीयता हाच मुळीं तो गुण होय (१३७). गुण ते किती? ते कसल्या गुणधर्माचे? किंवा त्यांना रूप तें कसलें? नाम तें का? तें कशाचें झालेलें आहे? तें वर्म तुला सांगतों तें ऐक (१३८).

**त्रिगुणाचें वर्णन— १३९-१४५**

सत्व, रज, तम असे मायेपासून तीन गुण जन्मले आहेत. आणि प्रकृती हीच त्यांची जन्मभूमिका होय. येथें भूमिका—योगभूमिका, अभ्यासभूमिका हीच मुळीं ते गुण नाम पाहाणारी होते (१३९). तिघांमधील सत्व गुण जो तो उत्तम होय, रजोगुण तो मध्यम होय. तिघांमध्यें सहजच तमोगुण कनिष्ठ—लहान होय (१४०). हें असें एका देहाच्या ठायीं त्रिगुणत्व दिसतें, आवडतें, असतें, जसें कां बाल्य, तारुण्य, वार्धक्य या तीन अवस्था एकाच देहाच्या ठिकाणीं दिसून येतात. किंवा एका वृत्तीच्या ठिकाणींच जसे विकार त्रिगुणात्मक त्याप्रमाणें देह (वय) हे बाल्य, तारुण्य, वृद्ध या तिन्हीं अवस्थेंत एकच असतें (अहंकृति) एका देहावर बाल्य, तारुण्य, वार्धक्य हे विकार आढळतात. देहधारी जो आहे त्यास तीन

अवस्था जशा का भिन्नत्वाच्या अशा भोगाव्या लागतातच (१४१). अहो ! सोनें हें जसें हिणकट मिसळ-ल्यामुळें वजनांत वाढत जातें, तसतसें तें सोनें उत्तम कसाला उतरत नाहीं; तें पांचव्या प्रतीचें हिणकट असें होतें (१४२). किंवा सावधानता, जागतेपण यथार्थ स्वरूपाला जागणें तें जसें कां आळसामुळें पाहिलेंच नाहीं, दुर्लक्ष केलें गेलें, तेथें सुषुप्तिच मुळीं दृढ होऊन असते, तेथें घनदाट अज्ञानच मुळीं दृढ होऊन असतें (१४३). त्याप्रमाणें अज्ञानाचा अंगीकार केल्यामुळें वृत्ती ही बाहेर निघून पसरते, सत्व रज साधनानें तमहीपण उत्पन्न होतें (१४४). अगा अर्जुना ! ह्यासच गुण असें नांव आहे–म्हणतात. आतां त्याच्या बंधनाची खूण ती कशी ? तें सांगतों (१४५).

## सत्वगुणानें आत्मा कसा बद्ध होणारा होतो तें— १४६–१५९

तरी असें जाण कीं जीवदशेमध्यें (क्षेत्रज्ञ दर्शेन) आत्मा हा प्रवेश करतो न करतो तोंच हा देह मी आहें असें म्हणूं लागतो. असें म्हणण्यास आरंभ–कुमुहूर्त करतो (१४६). आणि हा सर्व देहधर्मा-विषयींचा अभिमान बाळगून सुख आणि ज्ञान यांच्या पाशांत सांपडतो. जन्मापासून–सर्व देहधर्माच्या महत्वाचा अभिमान घेऊन असतो, देहधर्माविषयींच्या अभिमानाचें विचारांना सर्व महत्व दिलेलें तेथें सर्व ममत्वच एक तो पुढें घेऊन असतो–तो मरण येईपर्यंत ममत्वाच्या विचारानें चालत असतो, महत्तत्वाबद्दल किंवा–मध्यें निद्रा किंवा अज्ञान जोपर्यंत घेत नाहीं (१४७). माशाच्या तोंडामध्यें आमिषाची उंडी पडली न पडली तांच जळपारधी (कोळी) जो तो गळ हिसकतो हांसडतो जसें (१४८). सत्वरूपी व्याधानें जीवास ज्ञानाचे व सुख देणारे पाश आपणांकडे खेंचतांच तो जीव जखडला जाऊन फांसांत अडकलेल्या हरिणा-प्रमाणें पराधीन होतो (१४९). तेव्हां ज्ञानानें वटवट करितो, तडफडतो, संसारसुखासाठीं धडपडतो, लाथाळपणामुळें जाणीवच वर येऊं देत नाहीं व परिणाम असा होतो कीं तो आत्मसुख गमावून बसतो, हातीं असलेलें आत्मसुख स्वयंसुख तें दवडतो–हरवून बसतो (१५०). तेव्हां विद्वत्तेबद्दल जरा कोणी मान दिला, अथवा विद्यमानत्वानें (महत्वानें) संतुष्ट होतो, थोडा बहुत लाभ झाला तर हरखतो म्हणजे त्याला वाटतें मीच खरा सुखी, मीच खरा विद्वान्; व संतुष्ट आहें हेंहि तो आत्मस्तुतीचा लागाबांधा त्यासच चिकटतो (१५१). व म्हणूं लागतो कीं काय माझें भाग्य अहो ! आतां आज माझ्यासारखें दुसरें कोणी सुखी नाहींच, मीच खरा सुखी; व अष्टसात्विक विकारांनीं फुगून बसतो (१५२). आणि एवढ्यावरच त्याचें तें संपत नाहीं तर दुसरें एक बंधन तें विद्वत्तेचें भूतच अंगी भरणारें होतें किंवा द्वैताचें भूतच आंगीं भरतें (१५३). आपण स्वत: ज्ञानस्वरूप असतां तें हरविलें, मावळलें, नाहिसें झालें याची मुळीं तो खंत करीत नाहीं. उलट कामवासना पदार्थ–ज्ञान विषय ज्ञानाच्या गर्वानें फुगतो, गगना एवढा होतो (१५४). राव जसा स्वप्नामध्यें आपल्या शहरांत भिकाऱ्याप्रमाणें हिंडून दोन दाण्याच्या भिक्षेनें स्वत:स इंद्र समजूं लागतो (१५५). त्याप्रमाणें हा देहातीत जो आत्मा आहे तो देहधारी झाल्यामुळें त्यास हे पांडुसुता ! बाह्यज्ञानानें हलक्या जातीच्या, परक्या किंवा बाहेरच्या म्हणजे बहिर्मुखत्वामुळें असें होऊं लागतें (१५६). प्रवृत्तीशास्त्रें समजतात, यज्ञविद्या कळूं लागते, एवढेंच नाहीं, तर तो स्वर्गापर्यंत पोहोंचला, स्वर्गामध्येंच आहे असें समजतो (१५७). आणि म्हणूं लागतो कीं आज मजशिवाय दुसरा कोणीहीं ज्ञानी नाहीं आणि माझें चित्त कसें आहे तर समानरूपी चातुर्यचंद्रच जसा एक गगनांत उगवला (१५८). अशा तऱ्हेनें मनच तें पांगुळलें गेल्यामुळें त्या जीवाचा सर्व कान हा सत्वाचें, सुखाचें कां ज्ञानाचें महत्व ऐकण्याकडेच लागला व आतां काय झालें तर बैलाचीच अवस्था आली, बैलाच्या उपमेस पाहूं लागला. त्याप्रमाणें सत्वगुण हा सुख व ज्ञान याची कादणी लावून त्याची नंदी-बैलासारखी स्थिती करून सोडतो (१५९).

## रजोगुणानें आत्मा शरीरीं कसा बांधला होतो तें— १६०-१७४

आतां हा आत्मा शरीरामध्यें रजोगुणानें कशाप्रकारें बांधला जातो तें ऐक (१६०). याच कारणास्तव हें रज म्हटलें जातें, कारण जीवास कसें रंगवावें ते तें जाणतें. जीवास रंजवितो तो रजोगुण, हें रज अभिलाषानें-इच्छेनें नेहमीं प्रौढ असतें. तेथीलची इच्छा ही नेहमीं वाढती असते, लोभानें रसरसलेली असते (१६१). रजोगुणाचा जीवामध्यें मनामध्यें का अंतरी थोडासा शिरकाव होतांच तो कामोपभोगाच्या मार्गीं लागतो व त्यास विषयवासना सुचूं लागतात. हांवच तेथें महत्व घेऊन येते-महत्वानें असते (१६२). घृतकुंड घृतानें शिंपडून पेटलेल्या रखरखित विस्तवाचें प्रदीप्त होणें तेथें त्या वज्राग्नीच्या ठायीं लहानमोठ्या वस्तु असा भेद उरत नाहीं. थोडें का बहुत असें उरत नाहीं. तो अग्नि सर्वकांहीं फस्त करतो (१६३). त्याप्रमाणें इच्छा ही खवळते व दुःख हेंहि पण सुखच वाटूं लागतें. विषयाची आवड वाढत जाते, दुःखमिश्रीत विषय त्याला गोड वाटूं लागतात, व इंद्रश्रीहिपण थोडीच असें तो घेऊन असतो (१६४). त्याप्रमाणें तृष्णा वाढली असतां सोन्याचा पर्वत जरी हातीं आला तरी एकाद्या अधिक साहसास प्रवृत्त होतो, एखादे साहसाकडे वळावें, प्राणाची पर्वा न करतां धाडस करण्याची बुद्धी होते. तरी म्हणूं लागतो कीं, (१६५). अहो ! आज आपल्याजवळ जें आहे तें जर सर्व खर्च केलें, वेंचले गेलें, तर उद्यां काय करावें ? अशा आशेनें मोठे उद्योग अंगावर घेतो. (१६६). जीवच ओवाळून टाकितो, कवडीलाही महत्व देतो. एखाद्या क्षुद्र गोष्टीच्या प्राप्तीनें गवताच्या काडीच्या जोडीनेंहि-कृतकृत्यता मानतो. काडीचाहि फायदा न झाला तरी जन्माचें सार्थक झालें असें त्यांस वाटतें (१६७). व म्हणूं लागतो कीं स्वर्गाला जाणें झालें तर तेथें खाण्यास कांही नको का ?-खावें काय? म्हणून यज्ञयाग करण्याकरितां धांवाधांवी करूं लागतो (१६८). व कामिकवासनांच्या इच्छेनें प्रेरीत होऊन व्रतापाठीं व्रत आचरतो. इष्टापूर्ती (मोठमोठीं जनहिताचीं कामें) करतो. व काम्यच एक, भोगेच्छाच एक त्या शिवाय कशास हात लावीत नाहीं (१६९). ज्याप्रमाणें ग्रीष्मांतीचा वारा न थांबतां वाहात असतो, त्याप्रमाणें रात्रंदिवस एकसारखा व्यापारधंद्यामध्येंच सारखा खटपटीनें असतो (१७०). ऐहिक व पारलौकिक विषयाच्या लालचीनें तो सारखा धडपडत असतो. मासा, स्त्रीकटाक्ष, व वीज यांस चंचल म्हणतात, पण रजोगुणाच्या चंचलतेपुढें हीं कांहींच नाहींत. विजेपेक्षांहि तो अधिक चंचल असतो (१७१). अशा प्रकारें हा देहधारी आत्मा स्वर्ग संसाराच्या आशेनें क्रिया करण्याच्या आगीमध्यें शिरतो (१७२). अशा तऱ्हेनें हा देहधारी जीवात्मा वस्तुतः देहाहून निराळा असून वासनाचीं बंधनें स्वतःला लावून घेऊन नसत्या व्यापाराचा खटाटोप गळ्यांत घेतो (१७३). असें हें रजोगुणाचें अतिशय क्लेशकारक, असे देहियानें आत्म्यास बंधन आहे. आतां तमोगुणाचें तें लक्षण ऐक (१७४).

## तमोगुणानें दारुण पाशाचे देहधारीपणानें देहास बंधन होणारें तें लाघव कौशल्य ऐक— १७५-१९४

व्यवहाराच्याहि दृष्टीला झांकून टाकणारा पडदा मोहरूपी रात्रींतला तमोगुण हा काळा ढग आहे (१७५). अज्ञानाचें जन्मलेलें तें त्याच एकास लागल्यामुळें विश्व भूलून जाऊन भलत्या कर्मात नाचत रहातें-असतें. त्याला अज्ञानाचा जिव्हाळा सारखा लागल्यामुळें त्यांत फसून जीव भ्रमिष्ट होतात व वाटेल तशीं कर्में करितात (१७६). अविचार हा त्यांचा महामंत्र असतो; तो जीवाला मोह पाडणारें मूढपणरूपी अज्ञान मद्याचें पात्र कां मोहनास्त्रच एक आहे (१७७). असें वर्मच एक तेथें उभें झालेलें जें देहालाच आत्मा जाणणाऱ्यास चहूंकडून घट्ट बांधतें (१७८). हें एकच सर्व शरीरांत माज घेतें-तेथें दुसरी मुळीं गोष्टच नाहीं (१७९). यांच्या योगानें इंद्रियें जड होतात, मनाला मूर्खपण येतें. व दृढपणें आळसाचा सर्व हा अंगिकार करतो (१८०). आंगास आळेपिळे दिले जातात, कामाची आवड नाहींशी होते, कसलीही हौस असत नाहीं, व नुसती जांभयांची रेलचेलच (१८१). डोळे उघडे असून दिसत नाहीं, आळविले नाहीं तरीसुद्धां

उगीचच 'ओ' म्हणणें होतें (१८२). अंगावर धोंडा पडला तरी त्याला कळत नाहीं किंवा कानावर किंवा कुशीवर वळत नाहीं (१८३). पृथ्वी रसातळास जावो, कां आकाशहि अंगावर पडो, तरी जागावें जीवें का प्राणें जगावें कां (उठावें) हा भावच मुळीं उत्पन्न होत नाहीं (१८४). झोपेनें पेंगला असतां, स्वस्थ निजला असतां कां निश्चेष्ट पडला असला, पेंग आला असला तरी हा जीव भावास आणावा असें आठवतच नाहीं पण बुद्धीही जेथींच्या तेथेंच लोळावें अशी होते. झोंप गोड वाटते (१८५). तळहात उभे करून डोक्यास आधार देतो, गालावर हात ठेवून बसतो, गुडघ्यावर डोकें ठेवतो, डोक्यास गुडघ्या-पायाचा आधार देतो (१८६). जीवाला निद्रेविषयीं अत्यंत आवड असते, व झोपेपुढें स्वर्गाचें महत्त्व मानीत नाहीं (१८७). ब्रह्मदेवाइतकें दीर्घायुषी व्हावें व निजूनच असावें, तेथें निजून असणें हेंच महत्व मानतो व यावांचून दुसरें व्यसनच महत्वाचें मानीत नाहीं (१८८). सहज ओघानें चाललें असतां, झोंके खात असतांनासुद्धां, कलतांनासुद्धां, सहज कुठें टेकला न टेकला तरी डोळा लागतो, व अमृत जरी पुढें आलें तरी झोपेपुढें तुच्छ मानतो (१८९). त्याचप्रमाणें जबरीनें एखादे वेळेस व्यापार प्रवृत्त झाला तरी जसें कां रागावलेल्या प्रेमाचें आंधळेपणच जसें (१९०). कुठें कसें वागावें? कुठें कशी रहाटणी करावी! कोणाबरोबर काय बोलावें ! हें साध्य आहे कां हें असाध्य आहे हें जाणत नाहीं (१९१). वणवा लागला तो पंखांनीं झांकून घेईन अशी हांवच घालीत बसणारा पतंगच जसा (१९२). साहसाकडे प्रवृत्ति होते, वेदबाह्य कर्मे करण्याची इच्छा होते कांहींहीं न करावें असें वाटतें असा प्रमादच एक आवडूं लागतो (१९३). सारांश निद्रा, आलस्य प्रमाद (विमोह, भ्रांति, मंदता) या तिहेरी बंधनांनीं तीन बंधांनीं मूळचा शुद्ध निरुपाधिक असा चैतन्य आत्मा जखडून जातो (१९४).

## त्रिश्लोकी त्रिगुण ते आत्म्यास कसे बांधतात तें सांगितलें, आतां त्रिगुणाचें निरूपण तें ऐका— १९५–२०४

अग्नि हा काष्ठास लागला असतां काष्ठाकारानें दिसतो (१९५). अथवा सरोवर भरलें तेथें चंद्रत्व बिंबलें तसें गुणपाशांनीं सर्वथैव बांधलेलें असें आत्मत्व दिसतें, गमतें होतें (१९६). कफ, वात कमी करून जेव्हां देहामध्यें पित्त वाढतें, तेव्हां जसा हा देह संतप्त केला जातो; तसें होतें (१९७). उन्हाळा हा पावसाळ्यास जिणून हिंवाळ्याचा होतो. तेव्हां हिंवच जसें थंडगार असें हें आकाश होतें. तेव्हां थंडी वाजूं लागते. तेजच थंडीचें (शांत असें) हें आकाश होतें. (१९८). अथवा स्वप्न व जागृती लोपल्यावर जशी सुषुप्ति येते तेव्हां चित्तवृत्ती ही क्षणभर नशीच सुषुप्तिची होते (१९९). [हे भारता! सत्व सुखाचा संग करतें. तें सुखाच्या अथवा खुषीच्या जोडीनें असतें. तें सुखास चिकटतें. रज हें कर्मामध्यें आवडीनें संगाचें होतें व तम शिवलेली का विणलेली अशी एक वासनाच मुळीं गति घेऊन आहे. अशा संयोगानें–जोडीनें–ज्ञान झांकून टाकून प्रमादाचा संग करते खुषी मानते.] रज तमाचा पाडाव करून जेव्हां 'सत्वगुण प्रबळ होतो तेव्हां' मी किती सुखी आहें, असें तो ह्या जीवदशेस म्हणायला लागतो (२००). त्याचप्रमाणें सत्व, रज लोपून तमाचें बळ वाढलें, म्हणजे गैरसावधपण येतें व जीवाच्या हातून प्रमाद घडतात (२०१). आणि सत्व तमास पोटांत घालून जेव्हां रजोगुण प्रबळ होतो (२०२). तेव्हां कर्मावांचून दुसरें कांहींही गोड कां आवडतें नाहीं असें देहराज आत्मा मानतो (२०३). त्रिगुणवृद्धीचें निरूपण **तीन श्लोकांनीं** (६, ७, ८ श्लोक) सांगितलें, आतां सत्त्वाच्या वृद्धीचें लक्षण सांगतो तें लक्ष देऊन ऐका (२०४).

## सत्वगुण प्राबल्याचीं लक्षणें परिणाम— २०५–२२६

रजतमावर विजय मिळवून सत्वगुण जेव्हां या देहराजामध्यें वाढतो, तेव्हां लक्षणें किंवा चिन्हें होतात ती अशीं (२०५). कमळाचा सुवास हा वसंतऋतूमध्यें कमळांत न मावता बाहेर पडतो, त्याप्रमाणें प्रज्ञा अंतर्यामी न मावल्यामुळें बाहेर सांडते (२०६). सर्वेंद्रियांवर विवेक नजर ठेवतो. विवेकामुळें सर्वेंद्रियांना

नियम येऊन तीं सेवा करणारीं होतात. हातापायानांही–तीं कर्मेंद्रियें असूनहि–योग्यायोग्य असें ज्ञान कळूं लागतें, हातपाय हे योग्यायोग्य पाहाणारे असे डोळेच होतात (२०७). राजहंसापुढें दूध व पाणी मिसळून ठेविलें असतांना जसें तो चोंचीच्या टोकानें पाण्याचे व दुधाचे झगडे तोडून दूधच तेवढें घेतो (२०८). त्याप्रमाणें दोषादोष पाहाण्याचें काम इंद्रियें करूं लागतात, दोषादोषांच्या ठिकाणीं विवेकानें निवाडा करणारी इंद्रियेंच होतात. इंद्रियनिग्रह आपोआपच होतो. इंद्रियनियम हाच त्यांची सेवा करण्यांस आला. जसा–येत आहे जसा कां (२०९). ऐकूं नये तें कानच मुळीं टाकून देतात, न पाहावें तें दृष्टीच मुळीं गाळून टाकते, व बोलण्यासारखें नाहीं तें जीभच मुळीं टाळते (२१०). दिव्यापुढें जसा काळोख पळूं लागतो. त्याप्रमाणें निषिद्ध हें इंद्रियांसमोर होतच नाहीं (२११). पावसाळ्यांत समुद्रास मिळणारी जी ती महानदी उचंबळून येते, त्याप्रमाणें बुद्धि ही सर्व शास्त्रांत प्रसर पाहाणारी होते, प्रसर घेऊन चालते (२१२). पूर्णिमेच्या दिवशीं चंद्रप्रभा ही सर्व आकाशभर धांव घेऊन असते, त्याप्रमाणें वृत्ति ही ज्ञानामध्यें पुष्कळपणानें प्रकाशते (२१३). वासना ब्रह्मप्राप्तीच्या ठायीं केंद्रिभूत होतात, संसाराची प्रवृत्ती कमी होते, व मन विषयांवर विटतें (२१४). याप्रमाणें सत्व वाढलें असतां अशीं चिन्हें खरोखरीनें पुढें येतात आणि अशा अवस्थेंत मरण आलें, तरी मग आनंदाला पारावार नाहीं (२१५). अथवा सुकाळ उगवल्यानें कां चांगल्या मुहूर्तावर पक्वान्नें केलीं व आतां आवडते पूर्वजच जसे पाहुणे म्हणून तीं पक्वान्नें सेवन करण्यास स्वर्गाहून आले (२१६). किंवा जशी काय घरचीच भरपूर असलेली संपत्ति आणि त्याचप्रमाणें औदार्य व धैर्याची वृत्ती उभी झाली तर तेव्हां आतां परलोकीची प्राप्ती कां न साधणारी बरें? आणि कीर्तिचे कां न होणें व्हावें? होणें होतेंच इहलोक व परलोक दोन्ही साधतात (२१७). मग सर्वच गोड झालेल्या अशा त्याला अगदीं जवळची उपमा म्हणजे मूर्तिमंत सत्वच तो, तेव्हां हे धनंजया! मृत्युनंतर त्याला गति सर्वथैव गति सत्वाचीच होणार–असणार (२१८). स्वधर्मानें उत्कृष्ट वागणारा भोगाचे स्थान जें हें शरीर तें सांडून बरोबर शुद्धसत्व घेऊन निघतो, सत्वगुण हा आपल्या चांगल्या गुणांनीं प्रसिद्ध अशा सत्वास घेऊन उपभोगण्याचें शरीर हें टाकून निघतो, तो सत्वच होतो.————————निमतो. व तो विष्णू अक्षरच होऊन असतो. मोक्षाच्या योग्यतेचे विष्णू अक्षर आत्मगुणच एक (२१९). एकदम असा जो जातो, तो सर्व सत्वाचाच पण नवा असा होतो, ज्ञानच तो, तो ज्ञानी जनांत ज्ञानीयांच्या घरीं जन्म पावतो (२२०). धनुर्धरा असें पाहा कीं, राजा हा राजैश्वर्य घेऊन डोंगरावर जरी गेला तरी त्याला कांहीं कां कमीं पडणारें होतें? तेथें कशाचीहि उणीव नसते, सर्व कांहीं पुरतें होऊन असतें पुरविलेलें होतें (२२१). अथवा असें पाहा कीं, येथला दिवा नजीकच्या गांवाला नेला तरी तो दीपच ना? तो केव्हांही प्रकाश करणाराच होय (२२२). तशी ती सत्वशुद्धि आपल्या आगळेपणानें ज्ञानास वृद्धिंगत करणारी ज्ञानाची वृद्धीच होय व मग बुद्धी ही विवेकयुक्त होऊन तीवर विवेकाचे तरंग येऊं लागतात–विवेकावर तरंगू लागते –तो जीव आत्मस्वरूपांत लीन होतो (२२३). महत्तत्वादि (महदादि) पदार्थाचा विचार करून शेवटीं विचारासहित ती बुद्धी पोटीं जिरून जाते–स्वरूपांत लीन होते (२२४). छत्तीस तत्त्वांच्याहि पलिकडील सदतिसावें जें किंवा चोवीस तत्त्वांच्या पलिकडचें पंचविसावें जें अथवा तिन्हीं गुणांच्या पलीकडचें चतुर्थ जें शुद्ध सत्व तें स्वभावें करूनच ती होते–तेथेंच ती स्थिर होते (२२५). असें जे कांहीं सर्वाहून उत्तम असें तें ज्यांस सहजपणेंच मिळणारें झालें, त्याबरोबरच तो निरूपमतेचा असा–उपमाच जेथें मुळीं पुरत नाहीं अशा ब्रह्मनिष्ठाच्या कुळांत जन्म घेतो (२२६).

## रजोगुणांचें प्राबल्य झाले म्हणजे जीं चिन्हें उदय पावून असतात तें सांगतों— २२७–२४३

याचप्रमाणें आतां असें पाहा कीं, तम व सत्व यांना खालीं बसवून रजोगुण हा आपली वाढ घेतो, तेव्हां तेथीलची आगळीक–महत्त्वाची गोष्ट ती ऐक (२२७). देहाच्या गांवात तो आला असतां जे कार्य

त्यानें अंगावर घेतलें असेल त्या कार्याचा धुमाकुळ देह गांवांत माजवितो तेव्हां कोणतीं चिन्हें तेथें स्पष्ट होतात, उदय घेऊन असतात तें सांगतों (२२८). वावटळ उठली म्हणजे वेगवेगळे पदार्थ एकत्र करते सर्व कांहीं वेटाळून घेते, त्याप्रमाणें इंद्रियांना विषयामध्यें मोकळीक होते. इंद्रियांना विषयांत मोकाट सोडतो (२२९). विषयलालसा अनिवार वाढते, बरें वाईट न पाहातां सर्व कार्यांकडे प्रवृत्ति होते. परदारादि हें निषिद्ध असें वाटत नाहीं व इंद्रियें हीं वाटेल तशीं शेळीच्या तोंडाप्रमाणें चरूं देतो (२३०). लोभ एवढा स्वैर संचार करतो कीं, जी वस्तू याच्यासमोर येत नाहीं तेवढीच सुटते. लोभ आपला ठाव पाहाणारा झाल्यानें स्वैरपणानें तो राबूं लागतो व जें कांहीं वेटाळतां न आल्यानें अलाभाचें तेवढेंच उरतें (२३१). हवे ते उद्योग पुढें दिसले कीं करूंच लागतो. विनविलें असतां त्याच्या आड केलें असतां नमस्कार केला तरी भलत्याच उद्योगाला प्रवृत्त होतो व प्रवर्तत असतांना येथून आपला हातच मुळीं बाजूस काढीत नाहीं (२३२). त्याचप्रमाणें एकादा प्रासाद बांधावा, कां अश्वमेध यज्ञ करावा अशा अचाट उद्योगाचे छंद घेऊन असतो. उद्योगांस प्रवृत्त होतो (२३३). नगरें रचावीं, जलाशयें निर्माण करावीं किंवा विविधतेचीं महावनें बागबगीचे लावावेत (२३४). अशा अवाढव्य कामाला हात घालतो, अफाट कामांना आरंभ करतो, आणि इहलोक व स्वर्गलोक या विषयींचा संकल्प करण्याच्या कामीं पुरे असें म्हणत नाहीं त्याची ऐहिक व पारलौकिक सुखलालसा कधीं तृप्त होत नाहीं (२३५). सागरही हार खाईल, भुकेमुळें पोटांतील अतृप्तिरूपी आगहि तीन कवड्या किंमतीची होईल असें इच्छेचें दुर्भरत्व तेथें वाढ घेऊन असतें— तेथें इच्छेचें प्रबळत्वच एक (२३६). हौस व लोभ यांच्या आशेनें एकसारखी धांव घेऊन त्यानें सर्व विश्वच आपल्या पायाखालीं घातलें आहे असा तो होतो. आपल्या पायाखालीं सर्व जग तुडवावें अशा इच्छेनें आशाळभूत होतो किंवा इच्छा मनाच्याहि पुढें धांव घेणारी, अनावरपणाची होते (२३७). अशा तऱ्हेनें रजोगुण वाढला असतांना हीं चिन्हें सहजासहजींच होऊं लागतात, आणि अशा गोंधळांत—स्थितींत देह पडला तर (२३८). आपल्या आशा, हौस, लोभ इत्यादी सर्व परिवारासह काम्य कर्में करणारा मनुष्य-समाज जन्मास येतो, कुटुंबी होतो (२३९). सुखानें भिकारी हा राजमंदिरामध्यें जरी राहाण्यास गेला, तरी काय अहो तो राव होईल ? (२४०). अहो ! जेथें बैल तेथें कडबा असणारच. समर्थांच्या वऱ्हाडा-बरोबर गेलेल्या बैलास कडबाच केव्हांही मिळणार ! त्यास पोळ्या, घेवर इत्यादि पक्वान्नें चुकूनसुद्धां मिळतील ? कां ? (२४१). आणि म्हणून व्यापाऱ्याच्या हातांत सांपडलेले जें त्यांस रात्रंदिवस विश्रांति म्हणून मिळत नाहीं, अशांच्या पंक्तीला तो जुंपला जातो (२४२). जो रजोगुण वृत्तीच्या डोहामध्यें बुडून असतो, तो कर्मठांच्या ठायींच—घरींच मुळीं देहधारी होतो. जन्म घेतो (२४३).

## तमोगुणाच्या प्राबल्याचे—माजाचे परिणाम— २४४-२६०

आतां त्याचप्रमाणें रजसत्ववृत्ती गिळून तमोगुण हा उन्नति घेऊन येतो तें कसें तें ऐका (२४४). आतां तीं तेथीलच्या देहाचीं लक्षणें लिंगें तीं आंत बाहेर कशीं ? तें सांगतों. तें कानाचे बळ एकवटूनच चांगल्या तऱ्हेनें ऐक (२४५). तरी त्यांचें मन असें असतें, जसें कां जेथें रविहि नाही व चंद्रहि नाही असें अमावास्येच्या रात्रीचें गगनच एक (२४६). त्याप्रमाणें अंतःकरण हें अज्ञानभरित होऊन स्फूर्तिहीन व शून्य असें तेथें विचाराची गोष्टच मुळीं आचार, विचार कां प्रायश्चित याचें नांव निशाणसुद्धां मुळीं तेथें दिसत नाहीं [भाष—भास (देह) भाक—प्रतिज्ञा] माणसाचें अंतःकरण शून्य, उदास व जड होतें. व सारासार विचार नाहिंसा होतो (२४७). स्मरणशक्ति देशोधडी जाते, दगडानेंसुद्धां बुद्धीचें माप घेववत नाहीं—असा दगड—असा ठावच तेथें होतो. स्वभावाचें मृदुत्व कां मार्दव, कां मृदुपण हेंच मुळीं सांडलेलें होतें. सर्व कांहीं जो आठव तोच मुळीं दिगंतरास गेला—दिगंताचा झाला असें होतें (२४८). अविवेकाचा अविचाराचा उद्दामपणा

येतो, तेथें मूर्खपणाच (मौढ्य) हाच एकटा जेथें सर्व घेणें देणें, व्यवहार करीत असतो (२४९). मरेपर्यंत त्याची क्रिया अनाचाराचीच असते. अनाचाराची क्रिया इंद्रियांत खुपून असते, रूतून असते, व त्यांत मेला जरी तरी आचारभंग करण्याकडेच त्याची क्रिया पाय घेणारी होते (२५०). परंतु यावर आणिक कांहीं एक होतें तें म्हणजे अनाचारदुष्कृती करण्यामध्येंच त्याचें चित्त उल्हास घेणारें होतें. जसें कां दिवाभीताचें बधीराचें अंधारांत पाहाणें स्वतःच्या पायावर उभें होणें म्हणजे त्यास मरणच जसें कारण तेथें कीडच एक लागल्यानें तें करकरणारें मन जसें कां कीडच उभी होईल असें केव्हांही नाहीं—म्हणजे तेथें दृष्टी मुळीं नाहीं डोळेच मुळीं नाहींत (२५१). त्याप्रमाणें निषिद्धाची गोष्ट पुढें आली तर तो भलभलत्याही हांवेनें भरून जातो व इंद्रियें हीं सर्वथैव विषयाकडेच धांवतात. माणसाला वाईट कृत्य दिसून स्फुरण चढतें (२५२) दारूनें नच घेतांही झिंगून डुलूं लागतो दिसतो, सन्निपात झाल्याशिवायच बडबडूं लागतो-तेथें त्याचे बोल म्हणजे बरळणेंच जसें व प्रेमाशिवायच प्रेमाची गोष्ट न जाणतांच मनांत प्रेम नसतांही मुळीं भूलून जातो—जसं कां पिसाटपणाचें वेडच एक (२५३). चित्त थाऱ्यावर नाहीं, पण ही कांहीं उन्मनी नव्हे. अशा उन्मत्तपणा आणणाऱ्या मोहानें पछाडला जातो, मोहाच्या स्वाधीन होतो, मोहाच्या पाशांत गुंतून पडतो मोहांत अडकून पडतो (२५४). अहो बहुत काय सांगावें ? तमोगुण हा आपल्या सामुग्रीसह, परिवारासह वाढ घेऊन असतो, वृद्धिंगत झालेला असतो, तेव्हां अशा तऱ्हेच्या चिन्हांना लक्षणांना तो गुण महत्त्व देऊन असतो (२५५). आणि जरी कदाचित् प्रसंगोपात्त-ह्यांतच मरण आलें-तेथें मरणाचें जरी बोलावणें (खागे) आलें तरीसुद्धां तो आपल्या वृत्तीवर न येतां (प्रेमाचा न होतां) तमोगुणाच्या वाईटपणांतच स्फुरणांतच रिगून असतो (२५६). राईराई एवढ्या बीजरूपानें मनच मुळीं तमोगुणाचें होऊन सांठविलें जातें. ही आधी जी आहे ती अति दमादमानें चालणारी असल्यामुळें, तेथें व्याधीचें बीज पेरलें जसें-तेथें आतां ती व्याधीच मुळीं आपल्या उभारास आली—प्रभावाची झाली व त्यास मुळीं ती आंगच टाकण्यास लावते. तेथें तो गुण आंगच टाकतो. पण जर कां तें बीज फळास आलें, जीवपणानें फुललें व वाढलें तर मात्र कदाचित् तेथें दुसरीच एक गोष्ट पुढें येणारी होते. (तेथें आतां मग रोगच जसा पार निवटून टाकला, काढून टाकला असें कां न म्हणावें बरें ! ) (२५७). पण ती एक लहानशी अशी दिव्याची ज्योत दीपकळिका होते इतर ज्या मोठमोठ्या आगी विझल्या तरी विझेनात कां पण ही मात्र जेथें लागेल तेथें अधिकाधिक होऊन—आगच होते (२५८). असें आहे म्हणून तमाच्या गांठोड्यांत जर संकल्प बांधून टाकला व तेथें मरण प्राप्त झालें तर, तेथें जें पुन्हां जन्मणें तें तमाचेंच होतें (२५९). आतां यापेक्षां आणिक अधिक कशास बोलायचें बरें ! पण एवढेंच आपण म्हणूं कीं, तमोगुण वृद्धि पावला असतांना तमोगुणाच्या वाढींत जो मृत्यू पावतो तो पशू, किंवा पक्षी अथवा झाड किंवा कृमी होतो: त्या त्या योनींत जन्मतो: यापेक्षां बहुत बोलणें तें कशास ? (२६०).

### गुणाचीं फळें : सत्वाचें पुण्य किंवा सुकृत; रजाचें दुःख परिणामी; तमाचें अज्ञान. २६१–२६५

या कारणास्तव जें कांहीं सत्वगुणामुळें निपजतें, हातून घडतें, उत्पन्न होतें, कृतीस येतें, आचरलें जातें, उगवतें तेंच मुळीं सुकृत होय असें श्रुतिसमूह—अनेक श्रुति वेद सिद्धांत, श्रुतिसमय, म्हणतो (२६१). म्हणून अशा त्या निर्मळाला, सत्वाला, सुखाला, ज्ञानियाला, सहज सरळ आहे त्याला, अपूर्व असें एक सात्विक फळ येतें—तेथें सर्व तऱ्हेची अपूर्वाईच—अपूर्वताच एक सर्वच्या सर्व उत्तमतेची: तेथीलची योग भूमिका ही सात्विक अशी उत्तमतेची तेथें सत्वगुणापासून सुख व ज्ञान हीं अपूर्व फळें मिळतात (२६२).

मग जेवढ्या म्हणून या रजोगुणाच्या क्रिया का कर्म का कामें आहेत तीं सर्व जशीं का कडू वृंदावनाच्या वेलास आलेलीं फळेंच होत, तेथीलचीं पिकलेलीं फळें होत. कारण त्या क्रिया सुखाचा रंग दाखवितात, पण फळ दुःखाचेंच देतात. चित्रिततेनें का विचित्रपणानें मन मोहविण्यानें मनच चितारलें गेलें, चित्रित केलें तेथें मन हेंच चित्र झालें जसें कां रजोगुणाची फळें दिसण्याला सुंदर, पण परिणामीं कडू वृंदावनाच्या फळासारखीं दुःख परिणामीं असतात (२६३). कडू निंबाच्या झाडाची पुष्कळ विपुल तीं फळें वर रंगानें पिवळीं सुंदर दिसतात अथवा निंबोळी जशी वरून दिसण्यास गोड अशी असते पण आंत पहावें तों कडू जहर विखच एक जसें, त्याप्रमाणें राजस कर्माचें सुख जें तें क्रियाफळ परिपाकी कडूच असतें (२६४). विषांकूर वाढला कीं त्याला तसलींच फळें येतात, त्याप्रमाणें तामस कर्माला अज्ञानाचींच फळें येतात. आतां तमोगुणाकडून जेवढें म्हणून होणारें कर्म होतें त्याचें फळ अज्ञानच एक, जसें कां विषयांकुरापासून विषय विखच जसें-किंवा विषांकुरापासून विखच एक जसें का जेवढें म्हणून तमोगुणात्मक कर्म तें अज्ञानरूप फळानें भरपूर असतें. विषारी वनस्पतीस विषारी अंकुरच फुटतात त्याप्रमाणें तामस कर्माचें फळ अज्ञान हेंच असावयाचें (२६५).

## वस्तूंच्या सत्तेनें गुणाचे परिणाम— २६६-२७६

असें आहे म्हणून, बा रे अर्जुना ! असें पाहा कीं येथें सत्वगुणच फक्त एकटा काय तो या ज्ञान हेतूवर उभा होणारा जाण-जसें कां दिनमान जें आहे तें त्या सूर्यामुळेंच होय-दिवसाचें माप हें सूर्यावरच उभें होणारें असतें (२६६). आणि त्याचप्रमाणें हेंही जाणून घे कीं, ह्या लोभाला कारण म्हणून जो आहे तो रजोगुण होय-तो सर्व रज होय. जसें कां द्वैतच मुळीं एक भय उत्पन्न करणारें-जेथें स्वतःला विसरणें हेंच एक पुढें झालेलें-किंवा आपलें विस्मरणच एक जेथें सर्व (२६७). मळलेल्या दोषादोषांची मिळणीच एक जेव्हां तेव्हां होणारी असा दोष, तेथें बहुतपण हेंच बहुततेस आलें, बहुततेचें झालें-तेथें पुन्हां पुन्हां, तोच, तो मोहाचा आवांका, अज्ञानाचा पसारा, का प्रमादाचे थेर कां थिल्लर असें तें, तेथें तमच मुळीं तें, कां तमोगुणच जो, हे जागा असलेल्या अर्जुना ! मूळ होय (२६८). याप्रमाणें, जेथें विचारच एक सर्व जागा असलेला, जेथें तो विचार हा बुद्धीच्या उघड्या डोळयांनीं ऐकत आहे, तेथें तिन्ही गुण हे वेगवेगळे करून दाखविले व आतां तेथें इतकें स्पष्टपण कीं इतकें उत्तम तऱ्हेनें ते समजेस आणून दिलेले आहेत कीं, जसें का तळहातावर ठेवलेला आवळा ( फळ आमलक ) जसा स्पष्ट दिसतो, तळहातीं असलेलें रत्नच जसें कां आंवळलें गेलें, तेथें तें आपल्या सर्व प्रकाशानें प्रकाशणारें होतें (२६९). रजोगुण, तमोगुण दोन्ही अधोगतीस नेण्यास समर्थ होतात. सत्वगुणांवाचून कोणीच ज्ञानाकडे आणीत नाहींत (२७०). म्हणून येथें सात्विकवृत्ति जी आहे तीच एक ह्या जन्माबरोबर आलेलें व्रतच होय-सात्विकवृत्ती हीच मुळीं सत्वानेंच व्रत अंगीकारलें असें, जसें कां सर्व कांहीं त्याग करून चतुर्थी भक्ति म्हणजे ज्ञानभक्तिच एक अंगिकारिली. आपली वृत्ति म्हणून जी आहे, ती सर्व सात्विकाची सात्विका जशी व हीच मुळीं वृत्ति त्याची ह्या जन्मास शोभणारी अशी वतनदारीच एक जशी का दुसरे कांहीं नच घेतां एक भक्तिच घेतली व तीही पण चतुर्थीच एक, ज्ञानोत्तर भक्तिच एक कां पराभक्तिच एक जशी कां ब्रह्मभूत झाला, ब्रह्मानंदाच्या योग्यतेस आला-ब्रह्मानंदांत अभिन्न भावानें स्थिर होण्यास योग्य झाला म्हणजे प्रसन्न चित्त होऊन तो कशाचाही शोक करीत नाहीं व कशाची इच्छाही पण करीत नाहीं. तो सर्वभूतींसम होत्साता माझी पराभक्ति प्राप्त करून घेतो व हिलाच ज्ञानोत्तर भक्ति म्हणतात (अ.१८-५४) (२७१). त्याप्रमाणें सत्वाच्या विकासानें किंवा आचरण्यानें सत्वामध्यें ज्याचें असणें, वर्तणें, येणें जाणें आहे, ते तनुत्यागानंतर स्वर्गामधील स्वर्गाचे अधिकारी होतात. सत्वगुणी मरणोत्तर स्वर्गाला जातात (२७२). याच-

प्रमाणें, रजोगुणांमध्यें ज्यांनीं का जगणें, मरणें, असणें, पाहिलेलें असतें, ते या मृत्युलोकामध्यें मनुष्य-योनींतच जन्मतात—ते मनुष्य-जन्मास येतात: रजोगुणीं, मृत्युलोकीं मनुष्य-योनींत जन्मून दुःखमिश्रित सुखें अनुभवतात (२७३). तेथें ते सुखाची, तशीच दुःखाची, एक अशी मिश्रित कांहीं सुख कांहीं दुःख, अशी खिचडीच एक जेवीत असतात व येथें ही म्हणजे एक मरणवाटच, तेथें जे पडलेले असतात, तेथून ते उठतच नाहींत हा देहच मुळीं त्या एकाच सुखदुःख मिश्रित ताटांत जेवीत असल्यामुळें त्याचा देहच मुळीं त्यावर वाढलेला असल्यामुळें (२७४). आणि त्याच रीतीनें, तमोगुणांमध्यें तें वाढून निमतात मरतात, ते नरक भूमीचीच मुळीं सनद घेऊन असतात. पत्रच जसें तें मुळीं तेथेंच जाण्याकरितां, तमोगुणी, नरकाचे धनी होतात (२७५). याप्रमाणें परम वस्तू जी आहे, तिच्या सत्तेनें त्रिगुणाची जी त्या त्या गुणावर उभारली जाणारी जी सकारणता, तीं सर्व कांहीं दाखविली, वस्तू जे सत्स्वरूप त्याची सत्ता म्हणजे अस्तित्वच त्रिगुणास कसें परिणाम तें, तें कारणासह सर्व दाखविलें (२७६).

### सत्-ब्रह्म वस्तुसत्ता— २७७-२९९

आपलें सर्वस्व गुणासारखें करून ब्रह्म हें ब्रह्मपणानें संपूर्ण असतें, निरपेक्ष असतें, तें गुणांस अनुसरतें, गुणाचें अनुकरण करतें, आपल्या सर्वस्वास गुणासारखें पाहून जें कांहीं कार्य विशेष असेल तें गुणाप्रमाणें करतें तें विशेष कार्य करतें (२७७). ज्याप्रमाणें, स्वप्नामध्यें राजा झाला, परचक्र, शत्रुसैन्य पाहिलें तेथें जय का विजय, हारी का जैत हे स्वतःच्या सर्वस्वाचेंच जसें, तेथें स्वतःचें सर्वस्वच जसें वागलें का वागविलें (२७८). त्याप्रमाणें, मध्य, उर्ध्व का अध म्हणजे रज, सत्व का तम हे त्या त्या गुणांना पोषण देणारे भेदाभेदाचे होत असें ते भेद दिसण्यापुरतेच होत. तेथें जर पाहाणें केलें नाहीं, तर शुद्ध वस्तूच ती होय, शुद्ध ब्रह्मच तें होय, ती एक सत्ताच कां न म्हणावी? (२७९). परंतु असें हें त्या गुणानाच पाठीवर घेऊन बोलणें तें असूं देत परंतु तुजला यामध्यें शुद्ध स्वरूपाशिवाय कांहींच न दिसूं देत तरी आतां मागील गोष्टी एकदमच जशा सांगून देत आहोंत—त्या ऐक (२८०). तरी असें जाण, कीं आपलेपणावर आपलेपण, उभे झालें तेथे, सहज सामर्थ्यानें, हे तिन्ही गुण देहाच्या निमित्तानें, देहामुळेंच गुणास येतात—गुणाच्या निमित्तानें गुण होतात. हे तिन्ही गुण देहाच्या निमित्तानेंच आपापलें सामर्थ्य प्रकट करतात (२८१). इंधनाच्या लाकडाच्या आकाराप्रमाणेंच, अग्नि जसा इंधनाचें रूप धारण करतो, झाडाच्या रूपानें जसा भूमिरस दिसतो, भूमींतील रसांचें आविष्करण वृक्षांमुळें होतें, किंवा तरुवरानी भूमीरसच (पोषक धर्म) आपल्या आगचा करून घेतला; तेथें त्या भूमिरसाप्रमाणेंच, ती तरूवरें झाली. त्या भूमीमधील जी माती व पाणी त्यातील रसच मुळीं तो तरू, आपल्या अंगानें घेऊन असलेला, तेथें सर्व वेग व धर्मच मुळीं त्या भूमीचा व रसांचा त्या तरू-वरामध्यें दिसणारा (२८२). अथवा दह्याच्या मिषानें दूधच जसें तें परिणमलेलें, का उसामधील रसांच्या गोडीनें ती गोडीच सर्व एक मूर्ततेस आली, मूर्त झाली (२८३). त्याप्रमाणें या देहामध्यें (किंवा देहच मुळीं) अंतःकरणासहीत तेथीलच्या सर्वस्वासहित, तिन्ही गुण होतात, म्हणून तेच मुळीं बंधास कारण होतात (देहाच्या निमित्तानेंच गुण आपापलें सामर्थ्य प्रकट करतात. जसा इंधनाच्या रूपानें अग्नि, झाडाच्या रूपानें रस, दह्याच्या रूपानें दूध रिणत दिसतें, तसें हे तिन्ही गुण देहाचें रूप धारण करतात आणि म्हणूनच बंधनाला कारण होतात) (२८४). परंतु तेथीलचें आश्चर्य तें काय सांगूं की, अशी एवढीही जरी गुंतागुंती आहे, तरी मोक्षाच्या सद्रुप जी वस्तू तिच्या संसारास कांहींही उणें पडत नाहीं (२८५). गुण हे आपआपल्या धर्माप्रमाणें ह्या देहीचें किंवा देहधारीचें मागलें पुढलें व पुढील सर्व क्रियमाणांवर परिणाम करीत असतांही आत्म्याच्या गुणातीतत्वाला उणेंपण येत नाहीं, आत्म्याची गुणातीतता उजी होत नाहीं, अपाय पावत नाहीं, टोचली जात नाहीं (२८६). त्याची जी स्वाभाविक मुक्तस्थिती ती त्याला मिळतेच.

कसें तें पहा. अशी ती त्याची स्वाभाविक मुक्तस्थिति ही सहजपणेंच कशी असते तें आतां सांगतों. अहो येथेंच तूं त्या ज्ञान गोडीचा सर्वस्वी असा मधुकरच एक या ज्ञानरूपी कमळांतील रस बहु आदरानें ग्रहण करणारा आहेस (२८७). गुणांमध्यें असतांना चैतन्य हें गुणधर्माप्रमाणें होत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे, त्याचप्रमाणें हेंहीपण एक तात्पर्यच (कां सिद्धांत) समज (२२८). हे पार्था ! आणि म्हणूनच जेव्हां कां उपदेशिलेलें जें तें जीव कीं प्राणाचें करून पाहिलें असतां दिसतें, जसें कां तें एक स्वप्नच जसें जागें झालेल्यानें पाहावें (२८९). अथवा असें पाहा कीं आपण तळयाच्या कांठीं असतांना जळामध्यें पडलेलें जें आपलें प्रतिबिंब दिसतें, तेथें, तें प्रतिबिंब अगदीं स्पष्ट असेंच असतें, जर तें अनेक लाटांनीं विचलीत झालें नाहीं तर (२९०). अथवा नट जो आहे तो नटलेपणाच्या कौशल्यानें ठकला जात नाहीं. त्याप्रमाणें ते गुण–जात न होतां गुण पाहावे. नट कितीही कुशल असला तरी, स्वतःच्या कौशल्यानें कधींही फसत नाहीं. आपलें स्वतःचें रूप तो ओळखून असतो. त्याप्रमाणें या त्रिगुणांत राहूनही आपण गुणातीत आहे असें पाहावें (२९१). आकाशानें ऋतुत्रयाचें होऊनही जसें कां आपलें वेगळेंपण विसरणें होत नाहीं, आकाश आपल्या वेगळेपणास न्यूनत्व येऊं देत नाहीं, मूळचेंच वेगळें असल्याकारणानें वेगळेपणाचें ओझेंच तेथें नसतें (२९२). त्याप्रमाणें गुणांमध्यें असतांना गुणाच्या पलिकडील जें स्वतःचें आपलेंपण आयतेंच असें तेथीलचें आहे हें मूळ अहं ब्रह्मास्मि या स्थितीच्या अहंतेवर उभे होतें (२९३). तेथून पाहिलें असतां असेंच तो म्हणणारा होतो कीं 'मी साक्षी आहें', 'मी अकर्ता आहें', 'आपण कांहीं करीत नाहीं' व या गुणाची नियोजनाच एक या सर्व क्रियाजातांना असलेली–हे गुणच मुळीं सर्व क्रियाजातांमध्यें 'नियोजित' ! असे आहेत (२९४). सत्वगुणाच्या, रजोगुणाच्या का तमोगुणाच्या भेदाभेदानें या सर्व कर्माचा प्रसर होत आहे तो मुळीं गुणांचाच विकार आहे. या सर्व कर्माचा व्याप या त्रैगुण्यामुळें पसरत आहे (२९५). यामध्यें मी असा जो, तो जसा एक वनामध्यें वनलक्ष्मी विलासाला हेतूभूत असा वसंतच (२९६). (सूर्य उगवल्यावर) तारासमूहानें लोप पावावें, सूर्यानें आपल्या प्रभावानें सर्व कांतीचें व्हावें, कमळानें प्रफुल्लित व्हावें, उमलावें, विकासावें व (तम) अंधारें नाहींसें व्हावें (२९७). त्याप्रमाणें हा सूर्य जो, तो कोणाच्याही कामामध्यें असत नाहीं, त्याप्रमाणें मी आत्मा अकर्ता असा असून सत्तारूप आहें. या कर्मापासून मी अलिप्त आहें (२९८). मी, गुण हे दाखवितों व गुण पाहातों. गुणता ही मी पोसतों. व या गुणांच्या निःशेषतेनें जें उरतें तें मी. मी, गुण प्रगट करणारा व त्याना पोसणारा आहें. हे गुण नाहीसें झाल्यावर जो उरतो तो मी आत्मा होय (२९९).

## गुणातीतता ३००–३२०

असा विवेकाचा विचार ज्याच्या ठायीं उदय पावतो, तो उन्नतीमार्गास लागून गुणातीत होतो. पुरुषार्थ मार्ग, पुरुषाप्रत आल्यानें पुरुष मायेच्या बंधनातून मुक्त होऊन माझ्याशीं सरूपता पावतो (३००). (गुणातीताचीं लक्षणें) निर्गुण म्हणून एक वेगळें तत्त्व आहे. तें नेमकें ओळख, कारण, ज्ञानानें आपलें स्थान निर्गुणांत केलें आहे. ज्ञानानेंच आपणांस निर्गुण असें भूषणास्पदतेचें केलें आहे (३०१). एवढेंच नव्हे तर, हे अर्जुना ! अशा तऱ्हेची माझी सत्ता, तो पावतो, सत्तेच्या अधिकारावर आरूढ होतो, जशी का नदी ही सिंधूच झाली (३०२). शुकाच्या बसण्याची जी नळी तीवरून तो उडला व शाखेवरच जाऊन बसला, त्याप्रमाणें तो आत्माच झाला, म्हणून मूळ अहंताच बाजूस झाली (३०३). (३०० ओवींतील वाक्य) कारण इतका वेळ तो घोरनिद्रेंत होता. तो आतां आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें जागा झालेला असतो. अहो ! अज्ञानाच्या झोपेनें जो बदबदा घोरत होता, तो आतां स्वस्वरूपीं जागा झाला–स्वस्वरूपास जागला (३०४). हे वीरेशा ! बुद्धीभेदाचा आरसा त्याचे हातून पडला, म्हणून प्रतिबिंबरूप दिसणाऱ्या आभासाचा तो होत नाहीं–त्याचा मोह गळाला (३०५). देहाभिमानच सुटला, म्हणजे

जीवशिव हे एक व्हायचेच. देहाभिमानाचा वारा आतां वाजण्याचा बंद झाला असा विरळाच एकादा, तेव्हां तेथें तरंगांची व सागराची भेटी झाली–जीवशिवाचें ऐक्य झालें (३०६). म्हणून माझ्या भावावर उभें झाल्यानें उत्तम अशा ज्ञानप्राप्तीचा–, ब्रह्मप्राप्तीचा तो होतो–जसें कां वर्षाकाळ संपला म्हणजे घनजात हें सर्व आकाशच झालें (३०७). त्याप्रमाणें खरेपणानें, सांचेपणानें मी होऊन मग या देहामध्यें असला तरी, देहधारीपणानें असला तरी, तो या देहापासून उत्पन्न होणाऱ्या गुणांना सांपडतच नाहीं. तो जेथें तेथें या देहांत असतोच असतो. असा मनुष्य आत्मबोध झाल्यावर देहपात होईपर्यंत देहांत राहिला तरी देहापासून उद्भवणाऱ्या गुणांच्या तावडींत सांपडत नाहीं. देहाचें भानच त्याला राहात असत नाहीं (३०८). दिव्याचा प्रकाश हा दिव्यालाहि न आवरणारा होऊन तो कांचेच्या चिमणींतून किंवा भिंगाच्या घरांतून बाहेर पडतच असतो, जसें कां सागराच्या अंगचाच जो वडवानल तो केव्हांही सागराकडून आडविला किंवा आवरला जाणारा नव्हेच (३०९). त्याप्रमाणें एकादा गुण आला किंवा गेला–आल्यागेल्या गुणांच्या येण्याजाण्यानें त्याचा बोध केव्हांही मळत नाहीं. आकाशांतील चंद्र जसा जळामध्यें दिसतो, तसा तो देहामध्यें असतो (३१०). तिन्ही गुण हे आपआपल्या प्रौढीप्रमाणें दिमाखानें हे देह क्रीडाकुतुहलाचे करितात. तो त्या गुणांच्या अहंतेस–ती अहंता कशी आहे हें पाहण्यास कोणासही पाठवीत नाहीं–तो तिच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहात नाहीं–तेथील अहंता आपल्यावर घेत नाहीं–त्या अहंतेचा होत नाहीं (३११). असा हा ठावच एक त्याच्या अंतःकरणास लिगटून असल्यानें आतां तो या शरीरांत काय वर्तत आहे हें कांहींही सुद्धां जाणतच नाहीं (३१२). अहो ! आपल्या आंगची कात टाकून सर्प जर बिळांत शिरला, तेथें त्याची ती टाकलेली त्वचा कोण सांभाळतें बरें !–तसें येथें होऊन असतें (३१३). किंवा फुलामधील सौरभ्य (शोभा) जीर्ण झाल्यावर त्याचा सुवास–आमोद हा आकाशासच मिळून गेला तो सुवास पुन्हां कमळकोशामध्यें येतच नाहीं (३१४). स्वरूपामध्यें समरसून गेल्यामुळें त्यालाहिपण तसेंच झालें कीं, देहधर्म हे कसे, हें देहास समजत नाहीं. किंवा कोणताहि देहधर्म असला तरी तें देह कांहीं जाणीत नाहीं (३१५). म्हणून जन्मजरामरण इत्यादि जे सहा गुण ते देहामध्येंच राहिले. कार्यच मुळीं बाजूस झाल्यानें कोणतेंही कारण मुळीं त्यास पाहात नाहीं. तो आत्मस्वरूपी झाल्यामुळें त्याचा त्या गुणांशीं कांहीं संबंध नसतो. जन्म, म्हातारपण, मरण इत्यादि देहाचे सहा गुण ते देहाचे देहासच, गुणातीतास नाहींत (३१६). महदाकाश खापराच्या घटामधील आकाश तो घट फोडून टाकला तरी तेथीलचें तें महदाकाश तेथें असलेलेंच असतें (३१७). त्याप्रमाणें देहबुद्धी नाहींशी झाली म्हणजे आपल्या सर्वस्वाचा जो कांहीं आठव येतो, तेथें सर्व जें कांहीं आहे तें आपल्या सर्वस्वाचा आठवच एक (३१८). देहामध्यें असूनही तो ज्ञानप्रधान अशा महत्वाच्या बोधांतच असतो, म्हणून तो गुणातीत होय असें मी म्हणतों (३१९). या देवांच्या बोलण्यामुळें–हें देवांचें बोलणें ऐकून, पार्थास अतिशय सुख झालें–जसा का मोर हा मेघास पाहून प्रेमास आला–पाचारला गेला–तृप्त झाला (३२०).

## अर्जुनाचा प्रश्न व श्रीकृष्णांचें उत्तर— ३२१–३२७

अशा तऱ्हेच्या संतोषावर उभें राहून त्या पार्थानें देवांस असें विचारलें कीं, असा बोध ज्याच्यामध्यें वस्ती करून असतो तो कसा दिसतो, त्याचें तें लक्षण किंवा चिन्ह सांगावें (३२१). अहो, तो निर्गुणच एक जो, तो काय कसें वागतो–आचरतो, तो गुणांस कसें निस्तरून असतो. हें कृपेच्या माहेरांनीं सांगावें कीं, जी गुणांच्या गोंधळांत असून तो गुणांच्या तावडींत कसा सांपडत नाहीं, तो गुणातीत कसें वागतो, गुणांचें निवारण कसें करतो हें कृपा करून सांगावें (३२२). या अर्जुनाच्या प्रश्नास षड्गुणैश्वर्य संपन्न अशा श्रीकृष्णांनीं आकर्णनेत्र असा एक परिहार देऊन बोलण्यास आरंभ केला. श्रवण नाम गोष्टी ही गोड व्हावी,

सर्व जीवच तेथें लागावा व त्याची शंका समाधानाची व्हावी (३२३). देव म्हणूं लागले की, बाबा, हे पार्था! तुझ्या विचारण्याचें आश्चर्यच वाटतें–एवढेंच काय तूं विचारून बसलास–तेथें गुणातीत असें नांवहिपण त्यास साचें लटकें असें (३२४). गुणांस उल्लंघून गेला म्हणावें तर तो गुणांच्या आधीनच मुळीं नाहीं. अथवा गुणाधीन आहे असें म्हणावें तर तो गुणांसच मुळीं सांपडत नाहीं (३२५). गुणांच्या हालचालीमध्यें असतांना तो गुणाधीन आहे कां गुणातीत आहे हें कसें जाणावें, असा संदेह जर तुला आला असेल तर तूं खुशालपणें विचार; तरी आतां ऐक. त्याचें आतां रूप करूं; तें स्पष्ट करून पाहूं (३२६).

## गुणाधीन व गुणातीत यामधील फरक व लक्षणें— ३२८–३४९

रजोगुणाची वृद्धि झाली असतां रजोगुणानें जर सर्व प्रवृत्ति वेटाळून घेतली व देहामध्यें कर्माना गोड गोड अंकुर आले. गुणातीत पुरुष जेव्हां प्रवृत्तीनें वेढला जातो व कर्में करतो तेव्हां मी कर्माचा कर्ता असा अभिमान त्याला स्पर्श करीत नाहीं किंवा कर्म निष्फळ झाल्याबद्दल त्याला खेद वाटत नाहीं (३२८). तेव्हां मीच काय तो एक कर्मठ कर्मयोग आचरणारा असा; अशा तऱ्हेचा अभिमान त्यास होत नाहीं किंवा कर्मयोगाच्या रहस्याचें फळ पदरांत नच पडल्यामुळें घरोबा घराचार घरदार हा सांपडेना व आतां घरदार संसारादि नसल्यामुळें दरिद्रपणाचा वीट बुद्धीनें जो घ्यावा तो ती घेत नाहीं—कर्मयोगच एक सर्व तेथें. तेथें जशी का ती श्री का नाम हेंच तेथें थाटून आहे, पुरून आहे, स्थिर होऊन ठेव्याचें आहे असें. तेथें दरिद्रपणास विटणें तेंहीपण ती बुद्धि घेत नाहीं. घरदार संसारादि नसणारा असाच एक हा जन्म निष्फळ झाला असें मानूनही पण त्यास खेद तो कसलाच होत नाहीं. कर्मयोगाचें वर्मच सांपडलें नाहीं व तें सांपडून घेण्याचा प्रयत्नही तो करीना तेथें वीटच येईना व आहे तीच घडी जरी विटलेली अशी तीसच तो पोटाशीं धरून बसत आहे असें होतें. सर्व बुद्धीच तेथें दळिली गेली असें करीत असतांना त्यास वीटच मुळीं येत नाहीं (३२९). अथवा असेंही होतें कीं सत्वच अधिकाहून अधिक झालें. सर्व इंद्रियेंही पण हातानें प्रकाशलीं तेव्हां सुविद्यता किंवा सुविद्यत्वाच्या परितोषामुळें तो भरून जात नाहीं, गढून जात नाहीं, उभा होत नाहीं, फुगून बसत नाहीं, गर्वानें ताठत नाहीं, उभयतेचें जें कांहीं एक तें तो पाहात नाहीं. सत्वगुण प्रबळ होऊन सर्व इंद्रियांत ज्ञान फांकतें तेव्हां ज्ञानगर्वानें तो फुगत नाहीं (३३०). अथवा तमाची वृद्धि झाली असतां मोहास कां भ्रमास हार जात नाहीं व अज्ञान आपल्यावर ओढून न घेतल्याकारणानें तो भ्रमत नाहीं, तमोगुणाचें आधिक्य झाल्यास तो मोहाला बळी पडत नाहीं व अज्ञानाचा खेद मानीत नाहीं (३३१). तसेंच मोहाच्या वेळेस ज्ञानाची इच्छा करीत नाहीं, व मोहाच्या जाणिवेच्या ज्ञानामुळें दुःखी न होतां कर्माचा अनादर करीत नाहीं. मोहप्रसंगीं ज्ञानाकरितां हपापत नाहीं, कर्माची प्रौढी मिरवत नाहीं, किंवा दुःखहि मानीत नाहीं. दुःखी न होतां ज्ञान अवस्थेंत कर्माचा आदर करीत नाहीं (३३२). सूर्याला जशी सकाळ, दुपार, संध्याकाळ अशी तिन्ही काळाची गणना नाहीं, तिन्हीं काळीं तो एकरूपच असतो (३३३). अशा पुरुषाला दुसरीकडून ज्ञानाचा प्रकाश येण्याचें कारणच नसतें तो स्वतःच पूर्ण ज्ञानी असतो. अहो! जळाचा समुद्रच एक, तो काय पावसानेंच ताजातवाना कां माजिरा होणारा? समुद्रपणास येणारा, समुद्र होणारा? (३३४). प्रवृत्तीनें कर्म करूं लागला तर त्यास, मी कर्माचा कर्ता असें कर्मठाचें कर्मठत्व हें असें वाटण्याचें कारणच मुळीं नाहीं. अहो सर्व प्रवृत्ती म्हणून जी आहे, तीच मुळीं त्या कर्मयोगावरच उभी आहे, तेथें सर्व कांहीं एक जें वर्तणें, करणें, प्रवर्तणें हें सर्व मुळीं कर्मयोगच म्हटला गेला; (ज्ञानामुळें तो कर्मयोग त्यास मुळींच बाधा करीत नाहीं) सर्वच बर्फाचा जो पर्वत आहे तो काय थंडीनें कांकडणारा होईल? (३३५). अथवा, मोह आला असतांना त्याचें तें ज्ञान हरवत नाहीं, तो ज्ञानाला मुकला असें होत नाहीं. अहो, ब्रह्माग्नी जो तो काय तिमिर तापाच्या उन्हाळणानें (उन्हाने) जाळवला–जाळला जाईल? नाहिंसा केला जाईल? 'उदासीनाचा देहब्रह्म,' तेथें सर्व वैराग्यच एकवटून असलेलें, असें तें त्रिविध–तापरूपी–उन्हाळ्यानें नाहीसें केलें जाईल?

(३३६). त्याप्रमाणें गुणकार्य किंवा गुणागुण कार्य हें सर्व कांहीं आपणच आहोंत, असें आहे. म्हणून तेथें एक एकाला वेगळेंपण होत नाहीं. गुणकार्य व आपण यांची ताटातूट नच होते–होत नाहीं (३३७). अडचणींत सांपडलेला वाटसरू जसा थोडा वेळ धर्मशाळेचा आश्रय करतो, तसा तो देहाचा आश्रय करून उदासीनतेनें असतो (३३८). तो जसा कां जय पावणारा कां हार खाणारा असा नसून तो गुणहि नाहीं व गुणांना घडवीतही नाहीं फक्त साक्षीभूत असतो जशी कां संग्रामीची भूमीच एक (३३९). ज्याप्रमाणें शरीरामधला प्राण, कां घरीं अतिथि म्हणून आलेला ब्राह्मण, अथवा चार रस्त्यावरील स्थाणु–खांब हे उदास असतात (३४०). गुणांच्या येण्याजाण्यानें तो गडबडत नाहीं. गुणांच्या येण्याजाण्यानें तो ढळतहि नाहीं, किंवा चळतहि नाहीं. जसा मेरू पर्वत हा मृगजळाच्या हेलाव्यानें हलत नाहीं, स्थिर असतो, अचल असतो (३४१). अहो! फार काय सांगावें, व्योम–अंतःकरणामधील आकाश हें हालत नाहीं, उडविलें जात नाहीं, किंवा सूर्य हा जसा कां अंधःकारानें गिळला जात नाहीं तेथें (आकाश, पाणी, अभ्रक) व्योम तें अंतरच एक व सूर्य तो सर्व प्रकाशच (३४२). ज्याप्रमाणें स्वप्न हें जागता जो आहे त्यास फसवीत नाहीं, त्याप्रमाणें असें पाहा की, तो गुणानें मुळींच बांधला जात नाहीं, गुणांमध्यें फसत नाहीं (३४३). खरोखर पाहिलें असतांना, गुणांकडून तो केव्हांही आकळणारा होत नाहीं. बाहुल्यांमधील गुणदोषांचा प्रेक्षकच एक नाटकगृहांतील प्रेक्षकांप्रमाणें तो गुणांचें कार्य कौतुकानें पाहात असतो (३४४). सत्वगुण, सात्विक कर्मांत, रजोगुण विषयादिकांत व तमोगुण मोहादिकांत असतो (३४५). पण त्या गुणातीताच्या सत्तेनेंच समस्त गुणांच्या क्रिया होत असतात, हें खरेंच असें जाण, जसा कां लौकिक व्यवहारांत लोकांच्या कामकाजांत जसा सूर्य हा साक्षीभूत (३४६). अहो, चंद्र तर मुळीं स्वस्थच पण समुद्राला भरती येते, सोमकांत द्रवतात, व चंद्रविकासिनी कमळें उमलतात, विकास पावतात (३४७). वारा हा वाजतो व वाहातो–शांत होतो, तरी गगन हें निश्चळच असतें. त्याप्रमाणें गुणांच्या गजबजेनें तो मुळींच अस्थिर होत नाहीं, डुलत नाहीं ढळत नाहीं, स्वतःकडे मुळींच महत्व मानीत नाहीं (३४८). अशा या लक्षणांनीं तो गुणातीत जाणावा. आतां त्याचीं तीं आचरणें कशीं तीं सांगतों ऐक (३४९).

## गुणातीताचीं आचरणें— ३५०–३७१

वस्त्राच्या पाठीं का पोटीं तंतूशिवाय दुसरें कांहींही नाहीं. अशा तऱ्हेनें, हे किरीटी! चराचर तो मद्रुप पाहतो. वस्त्रांत जसें सुतावांचून दुसरें कांहीं नसतें, तसें या विश्वांत एका आत्मतत्वावांचून दुसरें कांहीं नाहीं, हें ज्ञानी पुरुष तो पाहातो–चराचर आत्मरूपाचें आहे असें दृष्टींत घेतो. मद्रुपे (आत्मरूपाचें) ऐसें आहे, चराचर, दिठी (दृष्टींत), सुये (घालतो) (३५०). शत्रू आणि मित्र यांना भगवंताचें देणें सारख्याच प्रेमानें असतें तसें तो सुखामध्यें का दुःखामध्यें काटेतोल समान वागतो, सारखे वागतो, सुखदुःखाना समान मानतो (३५१). एरवीं पाहिलें असतांना सुखदुःख हें तेव्हांच भोगणें पडतें, सहन करावें लागतें, जर कां देहबुद्धीरूपी जळामध्यें मन हें लाविलें. देह हेंच कोणीं एक जळ तेथें मन हेंच कोणी मासोळी–तेथें त्या मनावर देहबुद्धीचें जडत्व परिणाम करणारें झाल्यानें सुखदुःख द्वंद्वांत फसणें होतें (३५२). आतां ही देहबुद्धीच मुळीं त्यानें टाकून दिली, मन हें तिकडे मुळींच लावण्याचें त्यानें केलें नाहीं, मन हेंच मुळीं त्यानें सांडिलें आहे, स्वस्वरूपासच पुढें घेऊन आहे, जसें कां धान्याच्या मळणीच्या शेवटीं बीज जसे निवडलें जाऊन रासच एक तेथें धान्याची (३५३). गंगेनें आपल्या ओघाचा वेग सोडून देऊन तिनें समुद्राचें अंगच होण्याचें केलें व आतां ती उथळपणाच्या खळखळाटाचें आक्रोशणें करीना. तिचे तें आक्रोशणें नाहीसें झालें–, केलें, निस्तरून टाकिलें, दूर केलें (३५४). त्याप्रमाणें जो आत्मस्वरूपाच्या वस्तीचा होऊन आहे, हे धनंजया! तेथें आत्मसत्ताच एक सर्व त्याला, मग सहजच देहाचें सुख कां देहाचें दुःख हें शरीराबरोबरच जाणारें, शरीरावरच टाकलें जाणारें–देहाचे सुखदुःख देहास दिलें जाणारें (३५५). देहामध्यें

आत्मारामच एक नटला तेथें धारणास (शास्त्र निश्चय का सिद्धांत जो खांबस) परमेश्वराचें जें व्यापक रूप उभरून आहे ज्यामध्यें त्याला, रात्र झाली का उजाडलें आहे सारखेंच, त्याप्रमाणें सुखदुःखाचें द्वंद्व त्यास सारखेंच होय (३५६). जो झोपला आहे त्याच्या आंगाला उर्वशी कां साप ही सारखीच त्याबरहुकूम स्वरूपस्थ जो आहे त्यास देहांतील द्वंद्वें होत तो आत्मस्वरूपांत रममाण असल्यामुळें, सुखदुःखें, लाभहानी इत्यादि द्वंद्वें त्याला भासमान होतच नाहींत (३५७). म्हणून अशा पुरुषाच्या दृष्टीला शेण व सोनें, हिरा आणि गार (गारगोटी), रत्न आणि दगड सारखींच दिसतात (३५८). स्वर्गसुख आपण होऊन त्याजकडे येवो, कां वाघाची उडी अंगावर पडो, तो तिळमात्र ढळत नाहीं, त्याची आत्मस्वरूपी स्थिर झालेली बुद्धी ही केव्हांही भंग पावत नाहीं (३५९). मेलेलें जसें जिवंत होत नाहीं (निमलें जें त्याचें पोट दुखत नाहीं), जळलेलें जसें उगवत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या साम्यबुद्धीस, केव्हांही फाटा फुटत नाहीं, एका साम्यावरच तो उभा असतो (३६०). हा ब्रह्मदेवच एक असें म्हणून त्याचें कोणी स्तुतीस्तवन केलें, कां कोणी त्यास नीच नवे म्हणोनि निंदिलें कां गांजिलें पण तो राखुंडी जशी केव्हांही जळणारी नसते, तसा तो निंदेनें जळफळणारा का स्तुतीनें मुळींच प्रसन्न होणारा होत नाहीं (३६१). ज्याप्रमाणें निंदा आणि स्तुती ही रूप व्यक्तीची होत नाहींत, सूर्याच्या घरीं जसें अंधाराला कां वातीला महत्व नाहीं, त्याप्रमाणें निंदा केली म्हणून कां स्तुती केली म्हणून अविशेष कां विशेष अशा व्यक्ती प्रकृतीचा होत नाहीं (३६२). तो गुणातीत ईश्वर म्हणून पूजिला गेला कां त्यास चोर म्हणून छळलें कां बैल व हत्ती यांनी महत्त्व देऊन त्यास राव केलें, राज्यावर बसविलें (३६३). सर्व तेज जें आहे त्यांस रात्र काय किंवा दिवस काय दोन्हींही सारखींच, त्याप्रमाणें आत्मस्वरूपी जो स्थिर आहे त्यांस मित्र जवळ आले तरी सारखेंच व वैरी वरचढ झाले तरी सारखेंच (३६४). जरी सहाही ऋतू आले तरी आकाश मुळींच लिंपत नाहीं, त्याप्रमाणें स्वरूपीं जो स्थिर आहे त्याचें मन विषमतेचें केव्हांही होत नाहीं. त्याच्या मनांत सगळी समता असते; विषमतेला वावच नसतो (३६५). आतां, आणिक एक तऱ्हेनें त्यास पाहा, कीं त्यानें केलेला जो आचार तो, तेथें व्यापार हालचाल कांहींही झाली असें दिसतच नाहीं (३६६). तो प्रवृत्तीचें मूळच नाहींसें करतो, मग कर्म कोठून येणार ? वासना त्याच्या ठायीं नसते, त्यामुळें जें सुख किंवा दुःख येईल तें, तो मुकाट्यानें स्वीकारतो. जेथें प्रज्ञाही सर्व स्थैर्य घेऊन आहे, तेथें प्रवृत्तीचा कस हाही आरंभ दूरच झाला, मावळला असें होतें, तेथें कर्माचीं जीं फळें तींहीपण त्याच्या वैराग्यरूप अग्नीमुळें नाहींशीं होतात. ब्रह्माग्नीच सर्व एक असा, तेथें कसलेंही कर्मफळ उगवत नाहीं (३६७). प्रारब्ध आणि क्रियमाण यांच्या नांवानें भावच मुळीं उगवणारा होत नाहीं, प्रारब्ध महत्व घेऊन असत नाहीं, जें कांहीं स्वभावें करून सेवन करतो, तेंच प्राप्ततेचें होतें, मापाचें होतें (३६८). त्याचें हृदय सुखामुळें वर उभरून आलें, कां शिणल्यामुळें खालीं बसलें, असें होत नाहीं, जसें कां पाषाणाचें प्रमाणच एक–संकल्प विकल्प सगळे त्यानें सोडलेले असतात. अमूक एक घ्यावें, व अमूक एक टाकावें–घेणें का टाकणें त्यानें वर्ज्य केलेलें असतें (३६९). आतां असा हा विस्तार किती बरें करून असावें ? पण एवढेंच जाणून ऐस कीं असा ज्याचा आचार आहे, अशा प्रकारचें ज्याचें वर्तन आहे, तोच खरा गुणातीत होय (३७०). यावर श्रीकृष्णनाथ असें म्हणाले कीं, गुणाचें अतिक्रमण ज्या उपायानें होईल तें सांगतों ऐक (३७१).

## गुणाच्या अतिक्रमणाचा उपाय— ३७२–३७३

अर्जुना, जो व्यभिचाररहित चित्तानें व अनन्य भक्तियोगानें माझी सेवा करतो, तो गुणांना आकळूं शकतो; जाकळू–जिंकू शकतो (३७२). तर मी कोण आहें, भक्ती ती कशी असावी ? अव्यभिचाराचें रूप तें कसलें, या सर्वांविषयीं निश्चय व्हावा लागतो (३७३).

## अनन्य भक्ति सद्रूप ब्रह्म— ३७४-३८१

तरी पार्था ! असें हें पाहा कीं मी कसा आहें म्हणशील तर रत्नांमधील तेज जसें. तेथें आतां तें तेज म्हणजे रत्नच नव्हे का ? (३७४). अहो ! द्रवपण जें तेंच पाणी नीर होय, अवकाश जो तें आकाश नव्हे कां, अंबर नव्हे का ? गोडी तीच साखर नव्हे का ? कां तेथें कांहीं दुसरें तिसरें असतें ? द्रवपण हें पाण्याहून वेगळें नाहीं, अवकाश जो आकाश–तो अंबराशिवाय असत नाहीं, गोडी ती साखरेहून निराळी असूं शकत नाहीं (३७५). अहो वन्हि जो तोच ज्वाळ नव्हे का ? दळामुळेंच कमळ हें नांव ना ? किंवा फळ, फांद्या मुळेंच अमका वृक्ष असें म्हटलें जातें ना ? (३७६). आतां हिंव का हिम जें आकर्षिलें गेलें तेंच हिमवंत झालें, अथवा दूध जें मुरालें तेंच दहीं (३७७). त्याप्रमाणें विश्व हें म्हटल्याबरोबर अवघा मीच एक तेथें. विश्व जें तें सर्व मीच एक. चंद्राचें चांदणें बाजुस सारून, सोलून टाकून, कांहीं चंद्र घेतां येणार नाहीं– चांदण्यासहित चंद्र घेणें होतें जसें. चंद्र हा शब्द उच्चारल्याबरोबर चंद्राचें पूर्णबिंब एवढाच काय तो पूर्ण बोध होतो. म्हणून त्या पूर्ण बिंबाला कलाचें करून पाहाणें होतच नाहीं (३७८). तूप थिजलेलें जरी, तरी तें तूपच– सोन्याचें कंकण आटलें नाहीं तरी तें सोनेंच (३७९). वस्त्र उकललें नाहीं तरी तेथें तंतूच एक स्पष्ट, घट विरविला नाहीं तरी मृत्तिकाच ती (३८०). म्हणून विश्व बाजूस करून मग मला ध्यावें असें नसून अवघ्या विश्वासहित मींच जाण (३८१).

## अभेद भक्ति ३८२-३८८

अशा तऱ्हेनें मला जाणणें जें तीच अव्यभिचारी भक्ति जाण. हें सगळें विश्व म्हणजे मीच अशा रीतीनें माझें ज्ञान होणें, म्हणजेच अव्यभिचारी भक्ति होय. या विश्वांत व माझ्यांत कांहीं भेदभाव पाहिला, तर तो झाला व्यभिचार ! आतां येथें भेद जर तूं कांहीं पाहिलास तर व्यभिचार केल्यासारखा होतो (३८२). असें आहे म्हणून भेद जो तो सोडून देऊन विश्वासगट मी आहें अशा अभेद चित्तानें आपल्या स्वतःसहित सर्व मला जाणावें. तेथें तें विश्व ( देह ) चित्त ( व आपण स्वतः ) असें अभेदतेनें सर्व एकच. तेथें तें निराळें असें पाहाणें नको, म्हणून सर्व भेद सोडून एकाग्रमनानें आपणां स्वतःस मजवेगळें न समजतां मला जाण (३८३). पार्था ! सोन्याची टिक सोन्याला लागली त्याप्रमाणें स्वतःच्या सर्वस्वाला व ( देह इत्यादिकी ) आणिकाला मानावें (३८४). अहो ! तेजाचा मुळीं जो तेजांतून निघालेला व तेजामध्येंच मान्यतेस आला असा बोधच एक, महत्त्वाचा, मान्यतेचा, मोठेपणाचा तो कसा म्हणशील तर, सूर्याच्या रश्मीप्रमाणें तेथें बोधसूर्यच एक प्रकाशला असें (३८५). या भूतलामध्यें परिमाणू महत्व घेऊन आहेत. हिमाचली, हिमकणिका महत्व घेऊन असते; त्याप्रमाणें त्या बोधसूर्यामध्यें त्या बोधामध्यें मला पाहा (३८६). अहो तरंग लहान जरी असला तरी तो सिंधूहून केव्हांही भिन्न असणार नाहींच; त्याप्रमाणें सर्वत्र ईश्वर परिपूर्ण भरून उरला आहे, तेथें त्या ईश्वराहून मी केव्हांही निराळा नाहींच कीं, अहो ! माझ्यामध्यें तूं आहेसच. समुद्राची लाट कितीही लहान असली तरी ती समुद्राहून भिन्न नाहीं. तसा मी ईश्वराहून निराळा नाहीं असें समज (३८७). याप्रमाणें, समरसलेल्या उल्हासानें दृष्टि जेव्हां भरून जाते, तेव्हां त्यासच मुळीं भक्त असें आम्हीं म्हणूं. अशी जी ऐक्य भावनेची आनंद दृष्टि तिचेंच नांव भक्ति (३८८).

## ज्ञानयोग वृत्ति दृष्टि; ज्ञानोत्तर भक्ती— ३८९-३९५

आणि ज्ञानाचें जें कांहीं एक चांगुलपण, जें चांग असें भलें असें, जें गावेंच गावें असें महत्त्व घेऊन असलेलें, तेंच मुळीं हें वर सांगितलेल्या, समरसलेल्या दृष्टीचें, दृष्टीच जेथें उल्हसते असें–, त्यासच मुळीं सर्वस्व असें नाव आहे. आणि हेंच मुळीं योग–योग सर्वस्व होय. ज्ञानाचा चांगुलपणा व योगाचें सर्वस्व म्हणजे हीच ऐक्याची विकसित दृष्टि होय (३८९). सिंधू आणि मेघवर्षाव यामध्यें अखंड अशी धारच

होय. त्याप्रमाणें हे अर्जुना ! त्या वृत्तीनें वागत अस, वर्तन कर, वर्तणारा हो (३९०). मेघापासून समुद्रापर्यंत जशी अखंड जलधारा असावी, त्याप्रमाणें, या पुरुषाची वृत्ति असते; म्हणजे जेथून वृत्ति उत्पन्न होते तें ब्रह्म, ज्याचे ठायीं ती वृत्ति असते तेंहि ब्रह्म आणि स्वत: वृत्ति ही ब्रह्मच, किंवा विहीरीच्या तोंडीं आकाशाचा सांदा नाहीं, जसा त्याप्रमाणें तो रस परमपुरुषीं एकवटतो (३९१). प्रतिबिंबापासून बिंबापर्यंत जशी ती कांती उत्कर्ष घेऊन असते, तशी ती सोहंवृत्ती जाण (३९२). अशा तऱ्हेनें मग परस्पर मेळ बसला म्हणजे जें कांहीं सोहंवृत्तीचें अवतरण होतें तें त्या सोहंवृत्तीसहीत आपोआपच लय घेतें (३९३). अशी वृत्ती एकदां कां बनली म्हणजे मिठाचा खडा समुद्रांत विरला म्हणजे जसें त्याचें विरणें थांबतें अथवा तृण जाळुनि वन्हिही आपोआपच विझतो त्याप्रमाणें भेदबुद्धी नष्ट झाली म्हणजे तें ज्ञानही उरत नाहीं पण त्याचा परीणाम उरून राहातो (३९४) (३९५).

## ब्रह्मत्व, सायुज्यता, चौथा पुरुषार्थ— ३९६–४०२

माझ्यात आणि भक्तांत अलिकडेपणा, आणि पलीकडेपणा दोन्हींही नष्ट होतात ; आणि दोघांतलें मूळचें अनादि ऐक्यच तेवढें उरतें (३९६). हे पार्था ! जेथें गुणांना जिंकण्याची गोष्टच राहात नाहीं तेथें एकपणच सर्व (३९७). हे मर्मज्ञ अर्जुना ! ही स्थिती म्हणजेच ब्रह्मत्व आणि तें माझ्या अव्यभिचारी भक्तांना लाभतें आणि त्यासच ब्रह्मत्व म्हणावें (३९८). या चिन्हांमुळें तो माझा भक्त म्हणविला जातो व ब्रह्मता हीच त्याची मुळीं तें व्रत चालवीत असते (३९९). गंगेच्या ओघामध्यें डळमळित जाणारें जें पाणी त्यास सिंधूपद मिळतें केंव्हांही. दुसरें तेथें काय मिळणार ? (४००). त्याप्रमाणें ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिलें असतां जो माझी सेवा करतो, तो ब्रह्मतेच्या मुगुटीं असलेलें चूडारत्नच–मुकुटमणीच होय (४०१). या ब्रह्मत्वाला सायुज्य किंवा मोक्ष म्हणतात. यासच चौथा पुरुषार्थ मोक्ष असें नांव आहे (४०२).

## सेवाच ब्रह्मत्वीं सोपान, मी आणि ब्रह्मत्व भिन्न नाहीं, ब्रह्मनिष्कर्षतेचें निस्सिम असें— ४०३–४०८

माझी सेवा हें ब्रह्मत्वाचें साधन होतें. म्हणून मलाही ब्रह्मत्वाचें साधन समजशील (४०३). तर तसें नाहीं मी आणि ब्रह्मत्व भिन्न नाहीं (४०४). ब्रह्म या नांवाला अभिप्राय जो तो मी (ईश्वरत्व) होय. या सर्व शब्दांनीं मींच बोलिलों गेलों माझें सर्व ईश्वरत्व बोलिलें गेलें (ब्रह्म या नांवानें ओळखण्याचा हेतु मीच, ब्रह्म माझेच नांव आहे. या सर्व शब्दांनीं मीच सांगितलों गेलों. ब्रह्मवाचक जेवढे शब्द आहेत तीं सर्व माझीं नावें होत) (४०५). चंद्र आणि चंद्रबिंब हीं जशीं दोन नाहींत तसाच हें वर्म जाणणाऱ्या अर्जुना ! मी आणि ब्रह्म यांच्यांत मुळींच भेद नाहीं (४०६). निष्कंप असें जें नित्यब्रह्माचें तें उघडें असें ब्रह्मरूप जाण. तें अद्वितीय अपार असें सुखच एक (४०७). विवेक आपलें काम सारून जें कांहीं धाम गांठतो तेथीलचा निष्कर्ष का निस्सिमता ही मीच होय (४०८).

## धृतराष्ट्राचें देवाशीं का दैवाशीं द्वंद्व व संजयाची सदिच्छा— ४०९–४१३

अशी ती गोष्ट, तो एकनिष्ठेचा अनन्याचा अनाथांचा सोयरा भगवान् श्रीगोपालकृष्ण, वीर पार्थास सांगत आहे तें तुम्हीं ऐकत आहांत ना ! (४०९). येथें धृतराष्ट्र म्हणूं लागला कीं, हे संजया ! मी तुला हें विचारलें नसतां उगीच कां तूं सांगत आहेस ? (४१०). माझी या वेळची शंका काढून टाक, विजयाच्या महत्त्वाचें चिन्ह सांगावें कीं. यावर संजय म्हणाला, या गोष्टी राहूं देत (४११). संजयास मनात अतिशय विस्मय झाला, अस्थिर वाटलें, संतापून जाऊन–आहाळून–तो असें म्हणूं लागला कीं अहो ! पाहा, देवाबरोबर का दैवाबरोबर त्याचे ठिकाणीं दुजा भाव, द्वंद्व कां द्वेष कसा आहे तो ! (४१२). तरी आतां कृपाळू तो गोपालकृष्ण संतुष्ट होवो; विवेक हा पुन: पुनः परिणाम करो; मोहरूपी महत् असा रोग तोच मुळीं आतां नाहिंसा होवो (४१३).

**संवादाचा सांभाळ, चित्तास हरिखाचा-आनंदाचा महापूर, उत्साहाचें अवतरण इत्यादींनीं, श्रीकृष्णाचें बोलणें संजय सांगेल त्या अक्षरांतील भावांनीं तुम्हांस तुमच्या ठाव ठिकाणावर पोहोंचवीन असें श्रीनिवृत्तीचे श्री ज्ञानदेव म्हणाले तें ऐका ४१४-४१६**

असें संजय चिंतीत असतां व तो कृष्णार्जुनाचा संवाद झेंपून धरतां धरतां त्याच्या चित्ताला आनंदाचा महापूर येऊन आहे (४१४). म्हणून आतां त्या उत्साहाचें बुद्धीरूप म्हणजे अवतरण पुढें घेऊन श्रीकृष्णाचें बोलणें तो सांगेल (४१५). त्या अक्षरांमधील भावानें तुम्हांस तुमच्या आपल्या ठिकाणीं पोहोंचवीन-असें जें, तें आतां ऐका, असें श्रीनिवृत्तीचे ज्ञानदेव म्हणाले (४१६).

इति श्रीगीता भावार्थदीपिकायां ज्ञानदेव विरचितायां गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥

ॐ तत्सत्

॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ श्री आदिनाथाय नमः ॥

॥ श्री निवृत्तिनाथाय नमः ॥

# श्रीज्ञानेश्वरी

## (सुबोधिनी)

## अध्याय चौदावा

— गुणत्रयविभाग योग —

" त्रिगुणात्मक भाव "

जय जय आचार्या। समस्त सुरवर्या।
प्रज्ञा प्रभा सूर्या। सुखोदया ॥ १ ॥

जय जय सर्व विसांवया। सोहंभाव सुहावया।
नाना लोक हेलावया। समुद्रां तूं ॥ २ ॥

आइके गा आर्तबंधु। निरंतर कारुण्यसिंधु।
विशद विद्यावधु। वल्लभा जी ॥ ३ ॥

तूं जयाप्रति लपसी। तयां जग हें दाविसी।
प्रगट तैं करसी। अघवेंचि तूं ॥ ॥ ४ ॥

कीं पुढिलांची दृष्टी चोरिजे। हा दृष्टी-बंधु निफजे।
परी नवल लाघव तुझें (घाव तुजें)। जें आपण पें चोर ॥ ५ ॥

जें तूंचि तूं सर्वांयियां। मा कोणाबोध कोणां माया।
ऐसेया आपेआप लाघवियां। नमो तुज ॥ ६ ॥

जाणो जगीं आप बोले। तें तुझिया बोला सुरस जालें।
तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वीयेसीं ॥ ७ ॥

रविचंद्रादि-शुक्ति । उदो करिती त्रिजगती ।
ते तुझियाचि दिप्ती । तेजतेजां ॥ ८ ॥

जें चळवळिजे अनिळें । तें दैवकें निजबळें ।
नभ तुजमाजीं खेळे । लपीं थपीं ॥ ९ ॥

किंबहुना माया असोस । ज्ञान जी तुझेंनि डोळस ।
असो वानणें सायास । श्रुतीसी हे ॥ १० ॥

वेद वानुनि चांग । जंव न दिसे तुझें आंग ।
मग आम्हां तया मुग । येकि पांती ॥ ११ ॥

जी एकार्णवाच्या ठायीं । पाहातां थेंबाचा पाडु नाहीं ।
मा महानदी काई । जाणिजती ॥ १२ ॥

कां उदेलिया भास्वतु । चंद्र जैसा खद्योतु ।
आम्हां श्रुती तुज आंतु । तो पाड असे ॥ १३ ॥

आणि दुजया थांव मोडे । तेथ परेसी वैखरी वुडे ।
तें तु मा कोणें तोंडें । वानावासि ॥ १४ ॥

यालागी आतां । स्तुति सांडुनि निवांता ।
चरणीं ठेविजे माथां । हेंचि भले ॥ १५ ॥

तरी तुज तैसयां । नमो जी श्रीगुरुराया ।
मम ग्रंथोद्यन फळावया । वेव्हारा होयीं ॥ १६ ॥

आतां कृपा भांडवल सोडी । भरी मती माझी पोतडी ।
करी ज्ञान-पद्य-जोडी । थारावी मातें ॥ १७ ॥

मग मी संसरेन तेणें । करीन संतासी कर्णभूषणें ।
लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥

जे गीतार्थ निधान । काढूं माझें मन ।
सुई स्नेहांजन । आपुलें तूं ॥ १९ ॥

हे वागसृष्टी एकें वेळें । देखतु माझे बुद्धीचे डोळे ।
तैसा उदयिजै जी निर्मळे । कारुण्य बिंबे ॥ २० ॥

माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सुफळ ।
तो वासंत होय स्नेहाळ । सिरोमणि ॥ २१ ॥

प्रमये-महापुरे । हे मतिगंगा ये थोरे ।
तैसा वरिष उदारे । दिठीवेनी ॥ २२ ॥

अगा विश्वैक धामा । तुझा प्रसादु चंद्रमा ।
करूं मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी ॥ २३ ॥

जी अवलोकिलिया मातें। उन्मेख सागरीं भरितें।
वोसंडेल स्फूर्तीतें। रसवृत्तीचे ॥ २४ ॥

तंव तोषोनि श्रीगुरूराजें। म्हणितलें विनंती व्याजें।
मांडिले देखो दुजें। स्तवन मिसें ॥ २५ ॥

हें असो आतां वाजटा। तो ज्ञानार्थ करूनि गोमटा।
ग्रंथ दावित्कठा। भोगों नेदी ॥ २६ ॥

हो कां जी स्वामि। हेंचि पहात होतों मी।
जें श्रीमुखें म्हणा तुम्हीं। ग्रंथ सांग ॥ २७ ॥

परी हें म्यां केलें। कीं हें माझेनि जालें।
ऐसें नाहीं ठेविलें। वासने माजी ॥ २८ ॥

सहजीं दुर्वेचा हिरू। आंगेंचि तव आमरूं।
वरी आला पूरू। पीयुषाचा ॥ २९ ॥

तरि आतां येणें प्रसादें। विन्यास विद्गदें।
मूळशास्त्रपदें। वाखाणीन ॥ ३० ॥

परी जीवां आंतुलीकडे। जैसी सवेहाचि डोणी बुडे।
ना श्रवणीं तरि चाडे। वाड दिसे ॥ ३१ ॥

तैसी बोली माझी साचारी। अवतरो माझी माधुरी।
माले मागोनि घरीं। श्रीगुरुकृपेचें ॥ ३२ ॥

तरी मागां त्रयोदशीं। अध्यायीं गोष्टी ऐसी।
श्रीकृष्ण अर्जुनेसीं। चावळले ॥ ३३ ॥

जें क्षेत्रक्षेत्रज्ञ योगें। होईजे येणें जगें।
आत्मा गुण संगें। संसारिया ॥ ३४ ॥

आणि हाची प्रकृति गतू। सुख दुःख भोगी हेतू।
अथवा गुणातीतू। केवळ हा ॥ ३५ ॥

तरी कैसा पां असंगा संग। कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञायोग।
सुख दुःखादि भोग। केंवी तयां ॥ ३६ ॥

गुण ते कैसे किती। बांधती कवणिये रिती।
नातरी गुणातीतीं। चिन्हें कायीं ॥ ३७ ॥

एवं यया आघवेयां। अर्थां रूप करावया।
विषो एथ चौदाविया। अध्यायासीं ॥ ३८ ॥

तरि तो आतां ऐसा। प्रस्तुत परियेसा।
अभिप्रावो विश्वेशा। वैकुंठाचा ॥ ३९ ॥

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।**
**यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितोगताः ॥ १ ॥**

तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना ।
मेळवुनी यया ज्ञाना । झोंबावें हो ॥ ४० ॥
आम्हीं मागां तुज बहुतीं । दाविलें हे उपपत्ती ।
परि अजुनि प्रतिती । कुसी न निघे ॥ ४१ ॥
म्हणौनि गा पुढती । सांगिजैल प्रतिपती ।
पर म्हणम्हणो श्रुति । डाहारिलें जें ॥ ४२ ॥
येऱ्हवीं ज्ञान हें आपलें । परि पर ऐसेनि जालें ।
जें आवडोनि घेतलें । भव स्वर्गादिक ॥ ४३ ॥
अगा याची कारणें । हें उत्तम सर्वांपरी मी म्हणे ।
जे वन्हि हें, तृणें । येरें ज्ञानें ॥ ४४ ॥
जिये भव स्वर्गातें जाणती । यागचि चांग म्हणती ।
पारखी फुडी आथी । भेदी जया ॥ ४५ ॥
तियें आघवीची ज्ञानें । केली येणें स्वप्नें ।
जैशा वातोर्मी गगनें । गिळिजेत अंती ॥ ४६ ॥
कां उदितें रश्मिराजें । लोपिली चंद्रादि तेजें ।
नाना प्रळयांबु माजे । नदीनद ॥ ४७ ॥
तैसें हें येणें पाहालेयां । ज्ञानजात जायलयां ।
म्हणोनि धनंजया । उत्तम हें ॥ ४८ ॥
अनादि जे मुक्तता । आपली असे जे पाण्डुसुता ।
तो मोक्ष हातां येतां । होये जेणें ॥ ४९ ॥
जयाच्निया प्रतिती । विचार वीरी समस्तीं ।
नेदिजेचि संसृति । माथां उधऊं ॥ ५० ॥
मनें मन घालूनि मागें । विश्रांति जालेया आंगें ।
ते देही देहाजोगें । होतीचिना ॥ ५१ ॥
मग तें देहाचें बेलें । वोलांडूनि येकेचि वेळे ।
संवतुकीं कांटाळे । माझे जाले ॥ ५२ ॥

**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।**
**सर्गेऽपि नोपजायंते प्रलयेन व्यथंति च ॥ २ ॥**

जे माझिया नित्यता । तेणें नित्य तें पांण्डुसुता ।
परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ॥ ५३ ॥

मी जैसा अनंतानंद। जैसाचि सत्यसिद्ध।
तैसेचि ते भेद। उरेचिना ॥ ५४ ॥

जें मी जेवढें जैसें। तेंचि तें जालें तैसें।
घटभंगी घटाकाशें। आकाश जेवीं ॥ ५५ ॥

ना तरि दिवा मूळि कीं। दीपशिखा अनेकीं।
मिनलिया अवलोकी। जैसे होय ॥ ५६ ॥

अर्जुना तयांपरी। सरली द्वैताची पैं वारी।
नांदो नामार्थ एका हारी। मी तूं विण ॥ ५७ ॥

येणेंचि पैं कारणें। जें पाहिलें सुष्टीचें जुंपणें।
तेंही तया होणें। पडेचि ना ॥ ५८ ॥

सृष्टीचिये सर्वादी। जया देहाची नाहीं बांधी।
ते कैंचे प्रळयावधीं। निमतील पां ॥ ५९ ॥

म्हणौनि जन्मक्षया। अतीत ते धनंजया।
मी जालो ज्ञाना येया। अनुसरोनि ॥ ६० ॥

ऐसी ज्ञानाची वाडी। वानिली देवें आवडी।
तेंविचि पार्थाही गोडी। लावावया ॥ ६१ ॥

तंव तया जालें आन। सर्वांगीं निघाले कान।
सपाई अवधान। आतलां पां ॥ ६२ ॥

आतां देवाचिया ऐसें। जाकळिजेत असे वोरसे।
म्हणौनि निरुपण आकाशें। वेंटाळेना ॥ ६३ ॥

मग म्हणे प्रज्ञाकांता। उजवण आजी जाली वक्तृत्वा।
जे बोला एवढां श्रोता। जोडलासी आम्हां ॥ ६४ ॥

तऱ्हि येक मि अनेकीं। गोंविजे देह पाशिकीं।
त्रिगुणीं लुब्धकीं। कवणे परी ॥ ६५ ॥

कैसा क्षेत्र (क्षेत्रज्ञ) योगें। विये ईये जगें।
तें परियेसी सांगे। कवणे परी ॥ ६६ ॥

परि क्षेत्र येणे व्याजे। हे यालागी बोलिजे।
जे मत्संगे-बीजे। भूतीं पिके ॥ ६७ ॥

**ममयोनिर्महत्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहं।**
**सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥**

येरवीं तरी महत् ब्रह्म। या लागि हें ऐसें नाम।
जे महदादि विश्राम। शाळिका हे ॥ ६८ ॥

विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेचि करी ।
म्हणौनि अवधारी । महत् ब्रह्म ॥ ६९ ॥

अव्यक्त वाद मती । अव्यक्त ऐसी वदंती ।
सांख्याचियां प्रतितीं । प्रकृतिचि हे ॥ ७० ॥

वेदांत इयेतें माया । ऐसें म्हणति प्राज्ञा राया ।
असो किती बोलो वायां । अज्ञान हें ॥ ७१ ॥

आपला आपणपेयां । विसरू जो धनंजया ।
तेंचि रूप येयां । अज्ञानासी ॥ ७२ ॥

आणीकही एक असे । जे विचारा वेळे न दिसे ।
वातीं पाहाता जैसें । आंधारें कां ॥ ७३ ॥

हालविलिया जाये । निश्चळी तरी होये ।
दुधीं जैसी साये । दुधाची ते ॥ ७४ ।

पैं जागरू ना स्वप्न । ना स्वरूप अवस्थान ।
ते सुषुप्ति कां घन । जैसी होये ॥ ७५ ॥

कां न वियेतां वायुतें । वोझे आकाश रितें ।
तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७६ ॥

पैल खांब कां पुरुषु । ऐसा निश्चय नाहीं एकु ।
परि काई नेणो आलोकु । दिसतसे ॥ ७७ ॥

तेंवी वस्तु जैसी असे । तैसें किर न दिसे ।
परि कांहीं अनारिसे । देखिजेना ॥ ७८ ॥

ना रात्रि ना तेज । ते संधी जैसी सांज ।
तेंवी विरुद्ध ना निज । अज्ञान आर्थी ॥ ७९ ॥

ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वाजु अज्ञान ऐसा ।
तया गुंडलेयां प्रकाशा । क्षेत्रज्ञ नांव ॥ ८० ॥

अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरी नेणिजे ।
तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८१ ॥

हाचि उभय-योगु । बुझे बापा चांगु ।
सत्तेचा नैसर्गु । स्वभावो हा ॥ ८२ ॥

आतां अज्ञाना सारिखे । वस्तु आपणपेंचि देखे ।
परि रूपें अनेकें । नेणो कोण ॥ ८३ ॥

जैसा रंक भ्रमला । म्हणे जारे मी रावो आला ।
कां मुर्छित गेला । स्वर्गलोकां ॥ ८४ ॥

तेंवि लचकलिया दिठी। मग देखणें जें उठी।
तयां नांव सृष्टि। मीचि पैं गा ॥ ८५ ॥

जैसें पां स्वप्न मोहावा। तो एकाकी देखिजे बहुवा।
तोचि तो पाडु आत्मया-वा। स्मरणेंवीण ॥ ८६ ॥

हेचि आ-निभ्रांति। प्रमेयें उपलवूं पुढति।
परि तूं प्रतिती। याची घे पां ॥ ८७ ॥

तरी माझी हे गृहिणी। अनादि तरुणी।
अनिर्वाच्य गुणीं। अविद्या हे ॥ ८८ ॥

इये नाहीं हेंचि रुप। ठाणें हें उमप।
हें निद्रितां समीप। चेतां दुरी ॥ ८९ ॥

पैं माझेनि आंगें। पहुडल्या हे जागे।
आणि सत्ता संभोगें। गुर्विणी होये ॥ ९० ॥

महद्ब्रम्हां उदरीं। प्राकृति आठै विकारी।
गर्भाची करी। पेलोवेलीं ॥ ९१ ॥

उभय संग पहिलें। बुद्धि तत्व प्रसवलें।
बुद्धि तत्व भरलें। होय मन ॥ ९२ ॥

तरुणी ममता मनाची। अहंकार तत्व रची।
तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होये ॥ ९३ ॥

आणि विषयां इंद्रियां गौसी। स्वभावें तंव भूतांसी।
म्हणौनि येती सरिसी। तिये ही रूपां ॥ ९४ ॥

जालेनि विकार, क्षोभे। पाठी त्रिगुणांचेंहि उभें।
तेव्हां ये वासना गर्भें। ठाये ठावो ॥ ९५ ॥

रूखाचा आवांका। जैसी बीज कणिका।
जेवीं बांधे उदकां। भेटत खेवो ॥ ९६ ॥

तैसी माझेनि संगें। अविद्या नाना जगें।
आर घेवो लागे। आणियांचा ॥ ९७ ॥

मग गर्भगोळां तयां। कैसें रूप तें यें आया।
तें परियेसी राया। सुजनांचिया ॥ ९८ ॥

पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज।
उमटती सहज। आवेव ही ॥ ९९ ॥

व्योम वायुवसें। वाढलेनि गर्भ रसें।
मणिज उमसे। अवेव तो ॥ १०० ॥

पोटीसूनि तम रजे। आगळिका तोय तेजें।
उठिता निफजे। स्वेदजु मा ॥ १०१ ॥
आपपृथ्वी उत्कटें। आणि तमो मात्रें निकृष्टें।
स्थावर उमटे। उद्भिज हा ॥ १०२ ॥
मग पांचा पांचही विरजीं। होती मन बुद्धयादि साजी।
हे हेतु जारजी। ऐसें जाण ॥ १०३ ॥
ऐसें चाऱ्ही हे सरळ। करचरण-तळ।
महा प्रकृति स्थूळ। तेंचि शिर ॥ १०४ ॥
प्रवृत्ति पेललें पोट। निवृत्ति ते पाठी नीट।
सुरयोनि आंगें आठ। ऊर्ध्वाची ॥ १०५ ॥
कंठ उल्हासतां स्वर्ग। मृत्यू लोक तो मध्यभाग।
अधोदेश चांग। नितंबु तो ॥ १०६ ॥
ऐसें लेकरूं येक। प्रसवली हें देख।
जयाचे तिन्ही लोक। बाळसें गा ॥ १०७ ॥
चौऱ्यासि लक्ष योनी। ते कांडा पेरां सांदणी।
वाढे प्रतिदिनी। बाळक हें ॥ १०८ ॥
नाना देह अवेवि। नामाची लेणी लेववीं।
मोहें स्तन्य वाढवी। नीचनवें ॥ १०९ ॥
सृष्टी वेगळवेगळिया। तया करांग्रीं आंगोळियां।
भिन्नाभिन्न सूदलियां। मुदिया तेथ ॥ ११० ॥
हें येकलौतें चराचर। अविचारित सुंदर।
प्रसवोनि थोर। थोरावली ॥ १११ ॥
पैं ब्रह्मा प्रातःकाळ। श्रीविष्णु तो माध्यान्ह वेळ।
सदाशिव सांजविळ। बाळां ययां ॥ ११२ ॥
महा प्रळई सेजे। खेळोनि आले निदिजे।
विषम ज्ञानें उमजे। कल्पोदई ॥ ११३ ॥
अर्जुना इया परीं। मिथ्या दृष्टिच्या घरीं।
युगानवृत्तीची करी। चोज पाउलें ॥ ११४ ॥

**सर्व योनिषु कौंतेय मूर्तयः सम्भवंति याः ।**
**तासां ब्रह्ममहद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥**

संकल्प ययाचा ईष्ट। अहंकार विनट।
ऐसयां होय तें सेवट। ज्ञानें ययां ॥ ११५ ॥

आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली।
ते जांघ घाली। माझी सत्ता ॥ ११६ ॥

या कारणें मी पिता। महत् ब्रह्म माता।
अपत्य पाण्डुसुता। जगडंबरू ॥ ११७ ॥

आतां शरीरें हे बहुतें। देखोन न भेद् हो चित्तें।
जें मन बुध्यादि भूतें। येकेचि येथ ॥ ११८ ॥

हा गा येकेचि देहीं। काई अनारिसें आवेव नाहीं।
तेंवि विचित्र विश्व पांहीं। येकचि हें ॥ ११९ ॥

पैं उंचा-निचां डाहाळियां। विषमा वेगळालिया।
येकाचि जेवी जालिया। बीजाचिया ॥ १२० ॥

आणि संबंध तोही ऐसा। मृत्तिके घट लेकु जैसा।
कां पटत्व कापसां। नातु होये ॥ १२१ ॥

नाना कल्होळ परंपरा। संतती जैसी सागरा।
आम्हां आणि चराचरां। संबंध तैसा ॥ १२२ ॥

म्हणौनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ।
तेंवि मी गा सकळ। संबंध बावो ॥ १२३ ॥

जालेनि जगें मी झांके। तरि जगत्वें कोण फांके।
किळेवरी माणिकें। लोपिजें काई ॥ १२४ ॥

अलंकारातें आलें। तरी सोनेपण काये गेलें।
कीं कमळ फांकलें। कमळत्वां मुके ॥ १२५ ॥

सांग पां धनंजया। आवेवीं आवेविया।
आच्छादिजे कीं तया। तेंचि रूप ॥ १२६ ॥

विरुढलिया जोन्हळा। कणिसाचा निर्वाळा।
वेंचला कीं आगळा। दिसतसे ॥ १२७ ॥

म्हणौनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें।
तैसा नोहे उखितें। अवघाचि मी ॥ १२८ ॥

हा तूं साचोकारा। निश्चयाचा खरा।
गांठी बांध वीरा। जीवाचिया ॥ १२९ ॥

आतां मिया मज दाविला। शरिरीं वेगळाला।
गुणीं मीचि बांधला। ऐसा आवडे ॥ १३० ॥

जैसा स्वप्नि आपण। उठउनियां आत्म मरण।
भोगिजे गा जाण। कपिध्वजा ॥ १३१ ॥

कां कवळातें डोळे। प्रकाशूनि पिंवळे।
देखती तेंही कळे। तयासीचि ॥ १३२ ॥

नाना सूर्य प्रकाशें। प्रकटितें अभ्र भासे।
तो लोपला हेंही दिसे। सूर्येंच कीं ॥ १३३ ॥

पै आपलेंपण जालया। छाया गा आपलिया।
बिहूनि बिहालिया। आंत आहे ॥ १३४ ॥

तैसी यिये नाना देहे। दाउनि मी नाना होये।
तेथ ऐसा जो बंदु आहे। तेही देखे ॥ १३५ ॥

बंदु की न बंधिजे। हें जाणणें मज माझें।
नेणणेनि उपजे। आपलेंन ॥ १३६ ॥

सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृति सम्भवाः ।
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

तरी कोणें गुणें कैसा। मजचि मी बंधु ऐसा।
आवडे ते परियेसा। अर्जुन देवा ॥ १३७ ॥

गुण (रुपा) किती किं धर्म। काइं यया रूप नाम।
के जाले हें वर्म। अवधारिजो ॥ १३८ ॥

तरी सत्व रज तम। तिघासि हें नाम।
आणि प्रकृती जन्म। भूमिका यया ॥ १३९ ॥

येथ सत्व उत्तम। रज तें मध्यम।
तिहीं मार्जी तम। साविधारें ॥ १४० ॥

हे एकीच वृत्तिच्या ठाइं। त्रिगुणत्व आवडे पांही।
वयसा त्रय देहीं। येकी जेंवी ॥ १४१ ॥

कां मीनलेनि किडे। जंव जंव तूक वाढे।
तंव तंव सोनें हीन पडे। पांचिका कसी ॥ १४२ ॥

पैं सावधपण जैसें। वाहविलें आळसें।
सुषुप्ति बैसे। घणावोनी ॥ १४३ ॥

तैसी अज्ञानांअंगिकारें। निगालि वृत्ती विखुरे।
तें सत्व रज द्वारें। तम ही होये ॥ १४४ ॥

अर्जुना गा जाण। यया नांव गुण।
आतां दाऊं खुण। बांधती ते ॥ १४५ ॥

तत्र सत्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयं ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥

तरी क्षेत्रज्ञ दशे। आत्मा मोटका पैसे।
हे देह मी ऐसे। कुमुहूर्त करी ॥ १४६ ॥

आजन्म मरणांतीं। देह धर्मीं समस्ती।
ममत्वाची सूती। घे ना जंव ॥ १४७ ॥

जैसी मीनाच्या तोंडीं। पडेना जंव उंडी।
तंव गळ आसुडी। जळ पारधी ॥ १४८ ॥

तेंवी सत्वें लुब्धकें। सुख ज्ञानाची पाशिकें।
वोढिजती मग खुडके। मृग जैसा ॥ १४९ ॥

मग ज्ञानें चडफडी। जाणिवेचे खुर खोडी।
स्वये सुख हें धाडी। हातिचें गा ॥ १५० ॥

तेव्हां विद्या मानें तोषे। लाभमात्रें हरिखे।
मी संतुष्ट हेंही देखे। श्लाघो लागे ॥ १५१ ॥

म्हणे भाग्य ना माझें। आजि सुखिये नाहीं दुजें।
विकाराष्टकें फुंजे। सात्विकाचेनी ॥ १५२ ॥

आणि येणें ही न सरे। लांकण लागे दुसरें।
जेवि द्वैताचे भरे। भूत आंगीं ॥ १५३ ॥

आपणचि ज्ञान स्वरूप आहे। ते गेलें हें दुःख न वाहे।
कीं विषयेज्ञानें होये। गगना येवढां ॥ १५४ ॥

रावो जैसा स्वप्नीं। रंकपणें निघे धानीं।
तो दोंदाणा मानी। इंद्र ना मी ॥ १५५ ॥

तैसें गा देहातीता। जालेया देहवंता।
हो लागे पांडुसुता। बाह्यज्ञानें ॥ १५६ ॥

प्रवृत्तिशास्त्र ( शास्त्रे ) बुझे। यज्ञविद्या उमजे।
किंबहुना सुजे। स्वर्गवरी ॥ १५७ ॥

आणि म्हणे आजि आन। मी वांचुनि नाहीं सज्ञान।
चातुर्य चंद्रा गगन। चित्त माझें ॥ १५८ ॥

ऐसें सत्वसुख ज्ञानी। जीवासी लावुनी कानीं।
बैलाची करी वानी। पाङ्गुळाचिया ॥ १५९ ॥

आतां हाचि शरीरीं। रजें जियांपरी।
बांधिजे तें अवधारी। सांगिजेल ॥ १६० ॥

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं।**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥ ७ ॥**

हें रज याचि कारणें। जीवातें रंजऊं जाणें।
हें अभिलाखाचें तरुणें। सदाचि गा ॥ १६१ ॥

हें जीवीं मोटकें रिगे। आणि कामाच्या मर्दीं लागे।
मग वारया वळघे। तृष्णेचिया ॥ १६२ ॥

घृतें आंबुखूनि आगियाळें। वज्राग्नीचें सातुकलें।
आतां बहु थेकुलें। आहे येथें ॥ १६३ ॥

तैसी खवळे चाड। होय दुःखासगट गोड।
इंद्रश्रीही सांकड। गमो लागे ॥ १६४ ॥

तैसी या तृष्णा वाटिनलिया। मेरूही हातां आलेया।
तऱ्हीं म्हणे एखादिया। दारुणाही वळघो ॥ १६५ ॥

आजि असतें वेंचिजैल। तरि पाहे काय कीजैल।
ऐसा पांगी वडिल। व्यवसाय मांडी ॥ १६६ ॥

जीविताची कुरूडी। वोवाळूं लागे कवडी।
मानी तृणाचिया जोडी। कृतकृत्यता ॥ १६७ ॥

म्हणे स्वर्गां हन जावें। तरी काय तेथें खावें।
ययालागीं धांवे। याग करूं ॥ १६८ ॥

व्रतापाठीं व्रतें। आचरे इष्टापूर्तें।
काम्या वांचूनि हातें। सिवणें नाहीं ॥ १६९ ॥

पैं ग्रीष्मांतीचा वारा। विसांवो नेणे वीरा।
तैसा न म्हणे व्यापारा। रात्रंदिवस (रात्रिदेवो) ॥ १७० ॥

कायि चंचळ मासा। कामिनी कटाक्षु जैसा।
लंवलंवा हो तैसा। विजू नाहीं ॥ १७१ ॥

तेतुलेनि गा वेगें। स्वर्ग संसार पांगें।
आगीमाजी रिगे। क्रियांचिये ॥ १७२ ॥

ऐसा देही देहा वेगळा। ले (इला) तृष्णेचिया सांखळा।
खटाटोप वाहे गळां। व्यापाराचा ॥ १७३ ॥

हें रजोगुणाचें दारुण। देही देहियासि बंधन।
परिस आतां विंदाण। तमाचें तें ॥ १७४ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्व देहिनाम् ।
प्रमादालस्य निद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

व्यवहाराचेहि डोळे। मंद जेणें पडळें।
मोहो रात्रीचें काळें। मेहुडें जें ॥ १७५ ॥

अज्ञानाचें जियालें। तया एका लागलें।
जेणें विश्व भुललें। नाचत असे ॥ १७६ ॥

अविवेक महा मंत्र। जें मौढ्य मद्याचें पात्र।
हें असो मोहनास्त्र। जीवासि जें॥ १७७॥

पार्था तें गा तम। रचूनि ऐसें वर्म।
चौखुरी देहात्म। मानी यातें॥ १७८॥

हें येकचि कीर शरीरी। माजो लागे चराचरीं।
आणि तेथें दुसरी। गोठी नाहीं॥ १७९॥

सर्वेंद्रिया जाड्य। मनामाजी मौढ्य।
माल्हाती दाठर्य (दाराढ्य)। आलस्याचें॥ १८०॥

आंगेंआंग मोडामोडी। कार्य जाती अनावडी।
नुसती परवडी। जांभयांची॥ १८१॥

उघडियाचि दिठी। देखणें नाहीं किरीटी।
नाळवितांचि उठी। "ओ" म्हणोनि॥ १८२॥

पडलिये धोंडी। नेणें कानीं मुरडी।
तयाचि परी मुरकुंडी। उकलूं नेणें॥ १८३॥

पृथ्वी पाताळे जावो। कां आकाशही वरी येवो।
परी "उठणें" (जीवें) हा भावो। उपजों नेणें॥ १८४॥

उचित अनुचित आघवें। झांसुरितां नाठवे जीवें।
जेथिच्या तेथ लोळावें। ऐसी मेधा॥ १८५॥

उभउनि करतळें। पडिघाये कपोळे।
पायांचें सिरियाळें। मांडू लागे॥ १८६॥

आणि निद्राविशि चांग। जीवीं आथी लाग।
झोपीं जातां स्वर्ग। वावो म्हणे॥ १८७॥

ब्रह्मायु होईजे। मा निजेलियाचि असिजे।
हें वांचुनि दुजें। व्यसन नाहीं॥ १८८॥

वाटे जातां वोघें। कलहातांही डोळां लागे।
अमृत परी नेघे। जरी निज आली॥ १८९॥

तेंवींचि आक्रोशबळें। व्यापारे कोण्हे वेळे।
निगाले तरी आंधळें। रोश जैसे॥ १९०॥

केव्हां कैसें राहाटावें। कोणेसि काय बोलावें।
हें ठाकते कीं नागवे। हेंही नेणें॥ १९१॥

वणवा मियां आघवा। पांखेंचि पुसूनि घेयावा।
पतंगु या हांवा। घाली जेवीं॥ १९२॥

तैसा वळघे साहसा। आकारणीचि धींवसा।
किंबहुना ऐसा। प्रमाद रूचे॥ १९३॥

एवं निद्रालस्ये प्रमादीं। तम इहीं त्रिबंधीं।
बांधे निरुपाधी। चोखटातें ॥ १९४ ॥

जैसा वन्हीं काष्ठीं भरे। तैं दिसे काष्ठाकारें।
व्योम घटे आंवरे। तैं घटाकाश ॥ १९५ ॥

नाना सरोवर भरलें। जै तें चंद्रत्व तेथें बिंबलें।
तैसें गुणापाशीं (गुणाभाशीं) बांधलें। आत्मत्व गमे ॥ १९६ ॥

पैं परिहरौनि कफवात। जैं देही आंटोपे पित्त।
तै करी संतप्त। देह जेंवीं ॥ १९७ ॥

कां वर्षा आतप जैसें। जिणोनि शीतचि दिसे।
तेव्हां होय हींव ऐसें। आकाश हें ॥ १९८ ॥

नाना स्वप्न जागृति। लोपुनि ये सुषुप्ति।
तैं क्षण एक चित्तवृत्ति। तोचि होये ॥ १९९ ॥

सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत।
ज्ञानमावृत्यतुतमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥
रजस्तमश्चाभिभूय सत्वं भवति भारत।
रजः सत्वं तमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥ १० ॥

तैसीं रजतमें हारवीं। जैं सत्वमाज मिरवी।
तैं जीवां करवी म्हणवी। सुखिया ना मी ॥ २०० ॥

तैसेंचि सत्व रज। लोपुनि तमाचें भोज।
वळघे तैं सहज। प्रमादी होये ॥ २०१ ॥

तयाचि परि गा धाटी। सत्व तमातें पाठी।
घालुनि जेव्हां उठी। रजोगुण ॥ २०२ ॥

तेव्हां (कर्मे) कर्मावांचूनि कांहीं। आन सौंदर्यचि नाहीं।
ऐसे मानी देही। देहराज ॥ २०३ ॥

त्रिगुण वृद्धि निरूपण। ती श्लोकीं सांगितलें जाण।
आतां सत्व (सत्वादि) वृद्धि लक्षण। सादर परियेसी ॥ २०४ ॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥

पैं रजतम विजये। सत्व गा देहीं इये।
वाढतां चिन्हें तिथें। ऐसीं होती ॥ २०५ ॥

जे प्रज्ञा आंतुलीकडे। न समाति बाहेरी वोसंडे।
वसंती पद्म-खंडे। दति जैसी ॥ २०६ ॥

सर्वेंद्रियाच्या आंगणी। विवेकु करी राबणी।
सांचचि करचरणीं। होती डोळे ॥ २०७ ॥

राजहंसापुढें। चांचूचेनि आगरडे।
तोडी जैंवी झडे। क्षीरानिराचें ॥ २०८ ॥

तेवि दोषादोषविवेकी। इंद्रियें होती पारखी।
नियेमु बारे पाईकी। वोळगे तैं ॥ २०९ ॥

नाइकणें तें कानुचि वाळी। न पहावें ते दिठीचि गाळी।
अवाच्य तें टाळी। जीभचि गा ॥ २१० ॥

वातीपुढें जैसें। पळोलागे काळवंखे।
निषिद्ध इंद्रिया तैसे। समोर नव्हे ॥ २११ ॥

धराधर काळें। महानदी उचंबळे।
तैसी बुद्धि पघळे। शास्त्रजातीं ॥ २१२ ॥

आगा पुनिवेच्या दिवशीं। चंद्रप्रभा धांवे आकाशीं।
ज्ञानीं वृत्ती तैसी। फांके सैंध ॥ २१३ ॥

वासना येकवटे। प्रवृत्ती वोहटे।
मानस विटे। विषयावरी ॥ २१४ ॥

एवं सत्व वाढे। तैं हें चिन्ह फुडें।
आणि निधनही घडे। तेव्हां जरी ॥ २१५ ॥

तऱ्हि जैसी घरीची संपत्ति। आणि तैसीचि उदार धैर्य वृत्ति।
मा परत्रा आणि कीर्ति। कां न व्हावें ॥ २१६ ॥

कां पाहालेनि सुयाणें। जालेया परगुणें।
पढियंते ये पाहुणे। स्वर्गींनियां ॥ २१७ ॥

मग गोमटेया तयां। जावळी असें धनंजया।
तेवीं सत्विकी जाणे देहा। के आथि गा ॥ २१८ ॥

जे स्वगुणी उद्भट। घेउनि सत्व चोखट।
निघे सांडूनि कोपट। भोग क्षेम (क्षम) हे ॥ २१९ ॥

अवचटे ऐसा जो जाये। तो सत्वाचाचि नवा होये।
किंबहुना जन्म लाहे। ज्ञानियां मार्जी ॥ २२० ॥

सांग पा धनुर्धरा। रावो रायेपणें डोंगरा।
गेलिया अपुरा। होय काई ॥ २२१ ॥

नातरि येथिचा दिवा। नेला सेजिया गांवां।
तो तेथें तरी पाण्डवा। दीपूचि कीं ॥ २२२ ॥

तैसि ते सत्वशुद्धि। आगळी ज्ञानासी वृद्धि।
तरंगावो लागे बुद्धि। विवेकावरी ॥ २२३ ॥

पैं महदादि परिपाटी। विचारून सेवटीं।
विचारासकट पोटीं। जिरोनि जाये ॥ २२४ ॥

छत्तिसां सदतिसावें। चोविसां पंचविसावें।
तिन्हीं तुरोनि स्वभावें। चतुर्थ जें ॥ २२५ ॥

ऐसें सर्वं जें सर्वोत्तम। जालें असें जया सुगम।
तया सर्वे निरोपम (निरोपण)। लाहे देह ॥ २२६ ॥

याचि परी देख। तम सत्व अधोमुख।
बैसोनि जैं आगळिक। धरी रज ॥ २२७ ॥

लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा।
रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥

आपलिया कार्याचा। धुमाड गावी देहाचा।
माजवी तैं चिन्हांचा। उदो ऐसा ॥ २२८ ॥

पांजरली बाह्याद्धुळी। करी वेगळ वेटाळी।
तैसी विषयीं सरळी। इंद्रियांतें होये ॥ २२९ ॥

परदारादिक पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे।
मग सेळियेचेनि तोंडें। सैघ चारी ॥ २३० ॥

हा ठावोवरी लोभ। करी स्वैरत्वाचा राब।
वेटाळितां अलाभ। तें तें उरे ॥ २३१ ॥

आणि आड पडिलिया। उद्यम जातां भलतेयां।
प्रवर्तना धनंजया। हातु न काढी ॥ २३२ ॥

तेंवींची एखादा प्रासाद (प्रसाद)। कां करावा अश्वमेध।
ऐसा अचाट छंद। घेऊनि उठी ॥ २३३ ॥

नगरेंचि रचावी। जलाशयें निर्मावी।
महावनें लावावी। नानाविधें ॥ २३४ ॥

ऐस ऐसा अफाटीं कर्मीं। समारंभ उपक्रमी।
आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरें न म्हणें ॥ २३५ ॥

सागरही सांडी पडे। आगी न ल्हाये तीन कवडे।
ऐसें अभिलाषी जोडें। दुर्भरत्व ॥ २३६ ॥

स्पृहा मना पुढांपुढां। आशेचा घे दवडा।
विश्व धांपे चाडा। पायातळीं ॥ २३७ ॥

इत्यादि वाढतां रजीं। इये चिन्हें होती साजी (सहजीं)।
आणि ऐसा समाजीं। वेंचे जरी देह ॥ २३८ ॥

तरि आघवांचि ईहीं। परिवारला आन देही।
रिगे पर योनीही। मानुषेची ॥ २३९ ॥

सुरवाडेसी भिकारी। रिघे (वसो) पां राज मंदिरी।
तरी काय अवधारी। रावो होईल ॥ २४० ॥

बैल तेथें करबाडे। हें न चुके गा फुडें।
नेयिजो कां वऱ्हाडे। समर्थाचेनि ॥ २४१ ॥

म्हणोनि व्यापारा हातीं। उसंतु देहा ना राती।
तैसयाचिये पांथीं। जुपिजे तो ॥ २४२ ॥

कर्म जडाच्या ठाईं। किंबहुना होये देही।
जो रजोवृत्तिच्या डोहीं। बुडोनि (निमे) निगे ॥ २४३ ॥

मग तैसाचि पुढती। रज सत्व वृत्ती।
मिळुनि ये उन्नती। तमो गुण ॥ २४४ ॥

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च।
तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥

तेंचि जिये लिंगें। देहींचे सबाह्य सांगे।
तिये परिस चांगे। श्रोत्रबळें ॥ २४५ ॥

तरी ऐसें होय (होय ऐसें) मन। जैसें रविचंद्र हीन।
रात्रीचें कां गगन। आंवसेचिये ॥ २४६ ॥

तैसें अंतर असोस। होय स्फूर्तिहीन उद्वस।
विचाराची भाष। हारपे तैं ॥ २४७ ॥

बुद्धि मेचवेना धोंडी। हा ठावोवरी मवाळे सांडि।
आठवे देशधडी। जाला दिसे ॥ २४८ ॥

अविवेकाचेनि माजे। सबाह्य शरीर गाजे।
येकलेनि घेपे दीजे। मौढ्य तेथे ॥ २४९ ॥

आचारभंगाची हाडें। रुपती इंद्रियांपुढें।
मरे जरि तेणेंकडे। क्रिया जाये ॥ २५० ॥

पाहि आणीक येकहि दिसे। जें दुष्कृति चित्त उल्हासे।
अंधकारि देखणें जैसें। डुडुळांचें ॥ २५१ ॥

तैसें निषिद्धाचेनि नांवें। भलतेंये भरे हांवें।
तिये विषी धांवे। घेती करणें ॥ २५२ ॥

मदिरा न घेतां डुले। सन्निपातेंविण बरळे।
निःप्रेमेचि भुले। पिसे जैसें ॥ २५३ ॥

चित्त तरी गेले आहे। परी उन्मनी ते नोहे।
ऐसे मान्हातिजे मोहे। माजिरेनि ॥ २५४ ॥

किंबहुना ऐसैसी। इये चिन्हें तम पोसि।
जैं वाढे आयतीशी। आपलिया ॥ २५५ ॥

आणि हेंचि होय प्रसंगें। मरणाचें जरि (पडे) खागें।
तरी तेतुलेनिही रिगे। तमेसी तो ॥ २५६ ॥

राई राईपण बीजी। सांठऊनि अंग त्यजी।
मग विरुढे तैं दुजी। गोष्टी आहे गा ॥ २५७ ॥

पैं होय दीपकळिका। येर आगी विझो कां।
कां जेथें लागेल तेथें अधिका। तोचि होये ॥ २५८ ॥

म्हणोनि तमाचिये लोथें। बांधोनियां सकल्पातें।
देह जाय तै माघौतें। तमाचेचि होये ॥ २५९ ॥

आतां काय हें बहुहे। जो तमोवृद्धि मृत्यु लाहे।
तो पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी (क्रिमि) ॥ २६० ॥

यदा सत्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदाँल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

येणेंचि पैं कारणें। जें निफजे सत्वगुणें।
तें सुकृत ऐसें म्हणें। श्रौतसमो ॥ २६१ ॥

म्हणोनि तयां निर्मला। सुख ज्ञानी सरळा।
अपूर्व येक फळा। सात्विकातें ॥ २६२ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

मग राजसा जिया क्रिया। त्या इंद्रावणी पिकलिया।
जे सुख चितारूनिया। फळती दुःखें ॥ २६३ ॥

कां निंबोळियाचें पीक। वरी गोड आत विख।
तैसें तें राजस देख। क्रियाफळ ॥ २६४ ॥

तामस कर्म जितुकें। अज्ञान फळचि पिकें।
विषांकुर विखें। जयापरी ॥ २६५ ॥

कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलं ।
रजसस्तु फलं दुःखं अज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

म्हणौनि बारे अर्जुना । येथें सत्वचि हेतु ज्ञाना ।
जैसा कां दिनमाना । सूर्य हा पैं ॥ २६६ ॥
आणि तैसेंचि हें जाण । लोभासी रज कारण ।
आपुलें विस्मरण । द्वैतां (अद्वैता) जेंवी ॥ २६७ ॥
मोह अज्ञान प्रमादा । येया मेळया दोष वृन्दा ।
पुढती पुढती प्रबुद्धा । तमचि मूळ ॥ २६८ ॥
ऐसें विचाराच्या डोळां । तिन्ही गुण वेगळ वेगळा ।
दाविला जैसा आवळा । तळहातीचा ॥ २६९ ॥

सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमाद मोहौ तमसौ भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

तंव रज तम दोन्हीं । देखिले प्रौढ पतनीं ।
आणि सत्वा वांचुनि नाणी । ज्ञानाकडे ॥ २७० ॥
म्हणोनि सात्विका वृत्ति । येक जाले जन्मवृत्ति ।
सर्व त्यागे चतुर्थी । भक्ति जैसी ॥ २७१ ॥

ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ।
जघन्य गुणवृत्तिस्था अधोगच्छंति तामसाः ॥ १८ ॥

तैसें सत्वाचेनि नटनाचें । असणे जाणे जयाचे ।
ते तनुत्यागे स्वर्गींचे । राये होती ॥ २७२ ॥
याचि परि पैं रजे । जिहीं कां जिजे मरिजे ।
तिहीं मनुष्य होईजे । मृत्युलोकीं ॥ २७३ ॥
तेथें सुखदुःखाचें खिचटें । जेविजे एकचि ताटें ।
जेथ ईये मरण वाटे । पडिले नुठी ॥ २७४ ॥
आणि तयाची स्थिती तमीं । जे वाढोनि निमे भोग क्षमीं ।
ते घेती नरक भूमी । मूळ पत्र ॥ २७५ ॥
एवं वस्तूचिया सत्ता । त्रिगुणासी पांडुसुता ।
दाविली सकारणता । आघवीचि ॥ २७६ ॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥

पैं वस्तु वस्तुत्वें आसके । तें आपणपें गुणासारिखें ।
देखोनि कार्य विशेषें । अनुकरें गा ॥ २७७ ॥

जैसें कां स्वप्निचेनि राजे। जैं परचक्र देखिजे।
तैं हारी जैत होईजे। आपणचि ॥ २७८ ॥

तैसें मध्यौर्ध्व अध। हे जे गुणवृत्ति भेद।
ते दृष्टी वांचूनि शुद्ध। वस्तुचि असे ॥ २७९ ॥

परि हे वाहाणी असो। तऱ्ही तुज आन न दिसो।
परियेसे ते सांगतसो। मागील गोष्टी ॥ २८० ॥

तरी ऐसें निजनिजें। सामर्थ्यें तिन्हीं साहजें।
होती देह व्याजें। गुणचि हे ॥ २८१ ॥

इंधनाचेनि आकारें। आगि जैसा अवतरे।
कां अवगे तरुवरें। भूमिरस ॥ २८२ ॥

नाना दहिंयाचेनि मिसें। परिणमे दूध जैसें।
का मूर्त होय उसे। गोडीजेंवी ॥ २८३ ॥

तैसें हें सां(स्वां)तःकरण। देहचि होती त्रिगुण।
म्हणोनि बंधासि कारण। घडे कीर ॥ २८४ ॥

परि चोज हें धनुर्धरा। जे येवढाहि गुंफिरा।
मोक्षाच्या संसारा। उणा नव्हे ॥ २८५ ॥

गुण आपलालेनि धर्में। देहीचे माघुते साउमे।
चाळितांही न खोये। गुणातीतता ॥ २८६ ॥

ऐसी मागुति मुक्ति असे सहज। ते आतां परिसवूं तुज।
जे तूं ज्ञानांबुज। द्विरेफ कीं ॥ २८७ ॥

आणि गुणी गुणाजोगे। चैतन्य नव्हे मागे।
बोलिलो ते स्वांगे। तेंवीचि हें ॥ २८८ ॥

तरी पार्था जै असें। बोधलेनि जीवें दिसे।
स्वप्न कां जैसें। चेइलेनि ॥ २८९ ॥

ना तरी आपण जळीं। बिंबले तीरौनि कळी।
विचलन होत कल्लोळीं। अनेक धा ॥ २९० ॥

कां नटलेनि लाघवे। नटु जैसा न झकवे।
तैसें गुणजात देखावे। न होनिया ॥ २९१ ॥

पैं ऋतुत्रयें आकाशें। धरुनिया जैसें।
ने दिजेचि येवो वोसे। वेगळेपणा ॥ २९२ ॥

तैसें गुणी गुणा परौतें। जें आपणपें असें आईते।
तिये अहं बैसे अहंते। मूळिकेचिये ॥ २९३ ॥

तै तेथुनि मग पाहतां । म्हणे साक्षी मी अकर्ता ।
हे गुणाचि क्रियाजातां । नियोजन ॥ २९४ ॥

सत्व रज तमाचा । भेदीं पसरू कर्माचा ।
होत असे तो गुणाचा । विकारु हा ॥ २९५ ॥

ययामाजि मी ऐसा । वनीं कां वसंतु जैसा ।
वन लक्ष्मी विलासा । हेतु भूत ॥ २९६ ॥

कां तारागणी लोपावे । सूर्यकांती उद्दीपावे ।
कमळीं विकासावे । जावे तमे ॥ २९७ ॥

ये कोणाच्या काजि कांहीं । सविति जैसि नाहीं ।
तैसा अकर्ता मी देही । सत्तारूप ॥ २९८ ॥

मी दाऊनी गुण देखे । गुणता हे मिया पोखे ।
याचेनि विशेषे । उरे ते मी ॥ २९९ ॥

ऐसेनि विवेकें जया । उदो होय धनंजया ।
ये गुणातितत्व तया । आर्थ पंथे ॥ ३०० ॥

**गुणानेतानतीत्य त्रीन् देही देहसमुद्भवान् ।**
**जन्ममृत्यु जरा दुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥**

आतां निर्गुण असे आणिक । तें तूं जाणे अचुक ।
जें ज्ञानें केले टीक । तयाचि वरी ॥ ३०१ ॥

किंबहुना पण्डुसुता । ऐसा तो माझी सत्ता ।
पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा ॥ ३०२ ॥

नळिके वरुनि उठिला । जैसा शुक शाके बैसला ।
तैसा मूळ हता वेठला । तो मी म्हणोनि ॥ ३०३ ॥

अगा अज्ञानाचिया निदा । जो घोरत होता बद्बदा ।
तो स्वरूपीं प्रबुद्धां । चेहला कीं ॥ ३०४ ॥

पैं बुद्धि भेदाचा आरिसा । तया हातौनि पडिला वीरेशा ।
म्हणौनि प्रतिमुखाभासा । मुकला तो ॥ ३०५ ॥

देहाभिमानाचा वारा । आतां वाजो ठेला वीरा ।
तैं ऐक्य वींचि सागरा । जीवेशा हे ॥ ३०६ ॥

म्हणौनि मद्भावेसी । प्राप्ति पाविजे तेणें सरिसी ।
वर्षांती आकाशी । घनजात जेवी ॥ ३०७ ॥

तेवि मी होऊनि निरुता । मग देहीचि ये असता ।
नागवे देह सम्भूता । गुणासी तो ॥ ३०८ ॥

जैसा भिंगाचेनि घरें। दीप प्रकाशु नावरे।
कां न विझेचि सागरे। वडवानळ ॥ ३०९ ॥

तैसा आला गेला गुणाचा। बोध न मैळे तयाचा।
तो देही जैसा व्योमीचा। चंद्र जळीं ॥ ३१० ॥

तिन्ही गुण आपलालिया प्रौढी। देहि नाचविती बागडी।
तो पाहोही न धाडी। अहंते ते ॥ ३११ ॥

हा ठाववरी। नेहटोनि गेला अंतरी।
आतां काई वर्ते शरीरी। (हें) कांहीं नेणे ॥ ३१२ ॥

सांडूनि आंगीची खोळी। सर्प रिगालिया पाताळी।
ते त्वचा कोण साम्भाळी। तैसें जाले ॥ ३१३ ॥

कां सौरभ्य जीर्ण जसा। (आमोद) मिळोनि जाये आकाशां।
माघारा कमळ कोशा। नयेचि तो ॥ ३१४ ॥

पैं स्वरूप समरसें। तयांही (ऐक्य) गा जाले तैसें।
तेथें किंधर्म हें कैसें। नेणे देह ॥ ३१५ ॥

म्हणौनि (जन्म) जरा मरण। इत्यादि जे साही गुण।
ते देहीचि ठेले कारण। नाहीं तया ॥ ३१६ ॥

घटाचिया खापरियां। घटाचा भंगी फेडिलिया।
महदाकाश अपैसयां। जालेंचि आहे ॥ ३१७ ॥

तैसी देह बुद्धि जाये। जै आपणपां आठौ होये।
तै आन काहि (चिन्हा) आहे। तैं वांचुनी ॥ ३१८ ॥

ग्रेणें थोरें बोधलेपणें। तया गा देहीं असणें।
म्हणौनि तो मी म्हणे। गुणातीत ॥ ३१९ ॥

या देवाचिया बोला। पार्थ अति सुखावला।
मेघें संश्रोखिला। मयोरु जैसा ॥ ३२० ॥

कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो।
किमाचारः कथं चैतान्स्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

तेणें तोषे वीर पुसे। जी कोणें चिन्हे तो दिसे।
जयामाजी वसे। ऐसा बोधु ॥ ३२१ ॥

तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण निस्तरे।
हे सांगिजो माहेरे। कृपेचेनी ॥ ३२२ ॥

या अर्जुनाचिया प्रश्ना। तो षड्गुणांचा राणा।
परिहारू आकर्णा। बोलतसे ॥ ३२३ ॥

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥

म्हणे पार्था तुझी नवाई । हें इतुलेंचि पुससी काई ।
ते नांवचि तया पाही । साचे लटिकें ॥ ३२४ ॥

गुणातीत जया नावें । तो गुणाधीन तरि नव्हे ।
ना होय तरी नागवे । गुणांयर्या ॥ ३२५ ॥

परि आधीन कां नागवे । हेंचि कैसेनि जाणावें ।
गुणाचिये उरवरवें । माजी असतां ॥ ३२६ ॥

हा संदेह जरी वाहासी । तरी सुखें पुसो लाहासी ।
परिस आतां तयासी । रूप करूं ॥ ३२७ ॥

तरी रजाचेनि माजें । देही कर्माचें आणोजें ।
प्रवृत्ति जें घेइजे । वेटाळुनी ॥ ३२८ ॥

तैं मीचि कां कर्मठु । ऐसेनि ये श्रीमाटु ।
कां दळिद्रलिये बुद्धि विटू । तोहि नाहीं ॥ ३२९ ॥

अथवा सत्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियांही ज्ञान फांके ।
तैं सुविद्यता तोखे । उभजेही ना ॥ ३३० ॥

कां वाढलेनि तमें । न गिळिजेचि मोह भ्रमें ।
तैं आज्ञानत्वें न श्रमे । घेणें ही नाहीं ॥ ३३१ ॥

पैं मोहाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी ।
ज्ञानें कर्मैं नादरी । होता न दुःखी ॥ ३३२ ॥

सायं प्रातर्माध्यान्हां । या तिही कालाची गणना ।
नाहीं जेंवी तपना । तैसा असे ॥ ३३३ ॥

तया वेगळाचि कायी प्रकाशें । ज्ञानत्व यावें असें ।
काय जळार्णव पाऊसें । सांजा होये ॥ ३३४ ॥

ना प्रवर्तलेनि कर्मैं । कर्मठत्व तयां कां गमे ।
सांगे हिमवंत हिमें । कांपे काई ॥ ३३५ ॥

नातरी मोह आलिया । काई पां ज्ञाना मुकिजेल तयां ।
हो मा आगी तें उन्हाळयां । जाळवतसे ॥ ३३६ ॥

उदासीनवदासीनो गुणैर्योनविचाल्यते ।
गुणावर्तंत इत्येव योऽवतिष्ठतिनेंगते ॥ २३ ॥

तैसें गुणागुण कार्य हें । आघवेंचि आपण आहे ।
म्हणौनि येकैके नव्हे । तडातोडी ॥ ३३७ ॥

येवढियां प्रतीती । तो देहां आलासे वस्ती ।
वाटे जातां गुंती । मार्जी जैसा ॥ ३३८ ॥

तो जिणता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवी ।
जैसी कां श्रोणिवी । संग्रामीची ॥ ३३९ ॥

कां शरीरा आंतुल प्राण । घरीं आतिथ्याचा ब्राह्मण ।
नाना चोहटां स्थान । उदास जैसा ॥ ३४० ॥

आणि गुणांचा यावां जावां । चळे ढळे ना पाण्डवा ।
मृग जळाचा हेळावा । मेरु जैसा ॥ ३४१ ॥

हे बहुत काय बोलिजे । व्योम वारेनें न वचिजें ।
कां सूर्य न गिळिजे । अंधकारें ॥ ३४२ ॥

स्वप्न कां गा जियापरी । जागतियाते न सिंतरी ।
गुणी तैसा अवधारी । न बंधिजे गा ॥ ३४३ ॥

गुणासी कीर नातुडे । (परि) दुरूनि जें पाहे कोडे ।
तें गुण दोष सांईखेडे । सभ्यु जैसा ॥ ३४४ ॥

सत्कर्मे सात्विकी । रजे ते रजो विषि ।
तममोहादिकीं । वर्ततसे ॥ ३४५ ॥

परी तयाचि गा सत्ता । होती गुणक्रिया समस्तां ।
हे फुडे जाणे सविता । लोकिकां जे ॥ ३४६ ॥

समुद्रचि भरती । सोमकांतचि द्रवती (पाझरति) ।
कुमुदे विकासती । चंद्र तो उगा ॥ ३४७ ॥

कां वाराचि वाजे विझे । गगने निश्चल असिजे ।
तैसा गुणाचिये गजबजे । डोलेना जो ॥ ३४८ ॥

अर्जुना येणे लक्षणे । तो गुणातीत जाणणें ।
परीस आतां आचरणें । तयाचीं(चे) जीं(जे) ॥ ३४९ ॥

**समदुःख सुख स्वस्थः सम लोष्टाश्म कांचनः ।**
**तुल्य प्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥**

तरी वस्त्रासि पाठी पोटी । नाहीं सुत वांचूनि किरीटी ।
ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ॥ ३५० ॥

म्हणौनि सुखदुःखा सरिसें । कांटाळे आचरे ऐसें ।
रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ॥ ३५१ ॥

येऱ्हवीं तरी साहजें । सुख दुःख तैंचि सेविजे ।
देहजळीं होइजे । मासोळी जैं ॥ ३५२ ॥

आतां तें तव तेणें सांडिलें। आहे सस्वरूपेसींचि मांडिले।
सस्यांतीं निवडिलें। बीज जैसे ॥ ३५३ ॥

कां वोघ सांडूनि गांग। रिघोनी समुद्राचें आंग।
निस्तरी लगबग। खळाळाची ॥ ३५४ ॥

तेंवि आपणपांचि जयां। वस्ती जालि गा धनंजया।
तया देहीं आपसयां। सुख तैसें दुःख ॥ ३५५ ॥

रात्रि तैसें पाहालें। हें धारणा जेंवि एक जालें।
आत्माराम देह आंतलें। द्वंद्व तैसे ॥ ३५६ ॥

पै निद्रिताचेनि आंगेसी। साप तैसी उर्वशी।
तेंवी स्वरुपस्था सरसी। देही द्वंद्वें ॥ ३५७ ॥

म्हणौनि तयाचा ठाईं। शेणा सोनया विशेष नाहीं।
रत्नां गुंडयां कांहीं। नेणिजे भेद ॥ ३५८ ॥

घरा येवो पां स्वर्ग। कां वरी पडो वाघ।
परि आत्मबुद्धिसी भंग। कदा नोहे ॥ ३५९ ॥

निवटलें न उपवढे। जाळिम्रळें न विरुढे।
साम्य बुद्धि न मोडे। तयापरी ॥ ३६० ॥

हा ब्रह्मा ऐसेनि स्तुतिजो। कां नीच म्हणोनि निंदिजो।
परी नेणें जळों विझो। राख जैसी ॥ ३६१ ॥

तैसी निंदा आणि स्तुति। न ये कोण्हेचि व्यक्ती।
नाहीं आंधारें कां वातीं। सूर्याघरीं ॥ ३६२ ॥

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः।
सर्वारंभ परित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

ईश्वर बुद्धि पूजिला। का चोर म्हणोनि गांजिला।
कीं वृष गर्जी (वृक जर्गी) वेढिला। केला रावो ॥ ३६३ ॥

कां सुहृद पासीं आले। अथवा वैरी वरपडे जाले।
परि नेणें रातीं पाहाले। तेज जेवीं ॥ ३६४ ॥

साही ऋतु येतां आकाशे। लिंपिजेना जैसे।
तेवि विषम (वैषम्य) मानसे। जाणिजेना ॥ ३६५ ॥

आणीक येक पाहीं। आचारू तयाचा ठाईं।
तरी व्यापारासि नाहीं। जाले दिसे ॥ ३६६ ॥

सर्वारंभा उटकलें। प्रकृतिचे तेथे मावळले।
जळती कां कर्मफळें। ते तो आगी ॥ ३६७ ॥

दृष्टादृष्टाचेनि नांवे। भावोचि जीवीं नुगवे।
(ते सेविजे (कां) स्वभावे। पैठे होये ॥ ३६८ ॥

सुखे, ना, [श्वसणें (सिंहासन)] शिणे। पाषाण कां जेणे माने।
तैसी सांडी मांडी मने। वर्जिली असे ॥ ३६९ ॥

आतां किती हाचि विस्तारु। जाणे ऐसा आचारु।
जयाचा तोचि साचारू। गुणातीत ॥ ३७० ॥

गुणांते अतिक्रमणे। घडे उपाये जेणे।
ते आतां आइक म्हणे। श्रीकृष्णनाथ ॥ ३७१ ॥

## मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।
## सगुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

तरि व्यभिचार रहित चित्ते। भक्तियोगे माते।
सेवि तो गुणाते। जाकळूं शके ॥ ३७२ ॥

परि कोण मी (मी कोण) कैसी भक्ति। व्यभिचारा काईसी व्यक्ति।
हे आघवीचि निरुती। होआवी लागे ॥ ३७३ ॥

तरी पार्था परियेसा। मी तंव येथ ऐसा।
रत्नीं कीळावो जैसा। रत्नचि (की) तो ॥ ३७४ ॥

कां द्रवपणाचि नीर। अवकाशचि अंबर।
गोडी तेचि साखर। आन नाहीं ॥ ३७५ ॥

वन्हि तोचि ज्वाळ। दळाचि नांव कमळ।
रूख तेंचि डाळ। फळादिक ॥ ३७६ ॥

अगा हिंव जे आकर्षले। तेचि हिमवंत जेवि जालें।
नाना दूध मुराले। तेंचि दही ॥ ३७७ ॥

तैसें विश्व येणें नांवें। हें मीचि पैं आघवें।
आतां चंद्रबिंब सोलावें। न लगे जेवी ॥ ३७८ ॥

घृताचें थिजलेपण। न मोडितां घृतचि जाण।
कां नाटितां कांकण। सोनेचि ते ॥ ३७९ ॥

नुकलितां पटु। तंतुचि आहे स्पष्टु।
न विरवितां घटु। मृत्तिका जेविं ॥ ३८० ॥

म्हणौनि विश्वपण जावे। मग (तैं) माते घेआवें।
तैसा नोहे आघवे। सकटचि मी ॥ ३८१ ॥

ऐसेनि मातें जाणिजे। ते अव्यभिचारी भक्ती म्हणिजे।
येथे भेद कांहीं देखिजे। तरी व्यभिचार तो ॥ ३८२ ॥

या कारणें भेदातें। सोडोनि अभेद चित्तें।
आपणया सकट माते। जाणावे गा ॥ ३८३ ॥
पार्था सोनयाची टिका। सोनयासी लागली देखा।
तैसें आपणपे आणिका। मानावे गा ॥ ३८४ ॥
तेजाचा तेजोनि निघाला। परि तेजीच असे लागला।
तया रश्मि ऐसा भला। बोध होआवा ॥ ३८५ ॥
पै परिमाणु (परमाणु) भूतळीं। हिमकणुका हिमाचळीं।
मजमाजीं न्याहाळीं। अहं तैसें ॥ ३८६ ॥
हो कां तरंग लहान। परि सिंधूसि नाहीं भिन्न।
तैसा ईश्वरू मी आन। नोहेचि मा ॥ ३८७ ॥
ऐसेंनि बा समरसें। दृष्टि जैं उल्हासे।
तें पैं भक्ति ऐसें। आम्ही म्हणों ॥ ३८८ ॥
आणि ज्ञानाचे चांगावें। येचि दृष्टी नावें (मानावें)।
योगाचें ही आघवें। सर्वस्व हें ॥ ३८९ ॥
सिंधु आणि जळधरा। माजीं लागली अखंड धरा।
तैसी वृति वीरा। प्रवर्ते ते ॥ ३९० ॥
कां कुहेंसी आकाशा। तोंडी सांदा नाहीं जैसा।
तो परम रसु (पुरुषीं) तैसा। एकवटे गा ॥ ३९१ ॥
(प्रति) बिंबोनि बिंबवरी। प्रभेची जैसी उजरी।
ते सोहंवृत्ति अवधारी। तैसी होये ॥ ३९२ ॥
ऐसेनि मग परस्परें। ते सोहंवृत्ति जैं अवतरे।
तैं तियेंही सगट सरे। अपसयां ॥ ३९३ ॥
जैसा सैंधवाचा रवा। सिंधु माजी पांडवा।
विरालिया विरावा (विरवावा)। हेंही ठाके ॥ ३९४ ॥
नातरी जाळुनि तृण। वन्हिही विझे आपण।
तैसें भेद नासुनि जाण। ज्ञान (ही) नुरे ॥ ३९५ ॥
माझें पैलपण जाये। भक्त हें ऐलपण ठाये।
अनादि ऐक्य जें आहे। तेंचि निवडे ॥ ३९६ ॥
आतां गुणाते तो किरीटी। (जिणे या) जिणया नव्हती गोठी।
जें येकपणांही मीठी। पडो सरली ॥ ३९७ ॥
किंबहुना ऐसी दशा। ते ब्रह्मत्व गा सुदंशा।
हें तो पावे जो ऐसा। माते भजे ॥ ३९८ ॥
पुढती इहीं लिंगीं। भक्त तो माझा जगीं।
हे ब्रह्मता तयालागीं। पतिव्रता ॥ ३९९ ॥
जैसे गंगेचेनि वोघें। डळमळित जळ जें निघे।
सिंधुपद तया जोगे। आन नाहीं ॥ ४०० ॥

तैसा ज्ञानाचिया दिठी। जो माते सेवी किरीटी।
तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं। चूडारत्न ॥ ४०१ ॥
या ब्रह्मत्वासीच पार्था। सायुज्य ऐसी व्यवस्था।
याचि नांव चौथा। पुरुषार्थ गा ॥ ४०२ ॥
परी माझे आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान।
येथ मी हन साधन। गमेन हो ॥ ४०३ ॥

ब्रम्हणो हि प्रतिष्ठाऽहममृतस्याव्ययस्य च।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥

तरी झणिं ऐसे। तुझ्या चित्तीं पैसे।
पैं (पर) ब्रह्म आन नसे। मी वांचुनी ॥ ४०४ ॥
अगा ब्रह्म या नांवा। अभिप्रावो मी पाण्डवा।
मीचि बोलिजे आघवा। शब्दीं इहीं ॥ ४०५ ॥
पैं मंडळ आणि चंद्रमा। दोनी नव्हेती सुवर्मा।
तैसा मज आणि ब्रह्मा। भेद नाहीं ॥ ४०६ ॥
अगा नित्य जे निष्कंप। अनावृत धर्मरूप।
सुख जे उमप। अद्वितीये ॥ ४०७ ॥
विवेक आपले काम। सारूनि ठाकी जे धाम।
(ते) निष्कर्माचे निस्सीम। किंबहुना मी ॥ ४०८ ॥
ऐसैसें हो अवधारा। तो अनन्याचा सोयरा।
सांगतसे वीरा। पार्थासी पैं ॥ ४०९ ॥
येथ धृतराष्ट्र म्हणे। संजया हें तूते कोणें।
पुसिलेनविण बायाणे। कां बोलसी ॥ ४१० ॥
माझी अवसर ते फेडी। विजयाची सांगें गुढी।
येरू जीवीं म्हणे सांडीं। गोठीं इया ॥ ४११ ॥
संजयो विस्मय मानसीं। आहा करूनी रसरसीं।
म्हणे केसें पां देवेसीं। द्वंद्व येया ॥ ४१२ ॥
तऱ्ही कृपालु तो तुष्टो। यया विवेक हा घोटो।
मोहाचा फिटो। महारोग ॥ ४१३ ॥
संजयो ऐसें चिंतितां। संवाद तो सांभाळितां।
हरिखाचा येतु चित्तां। महापूर ॥ ४१४ ॥
म्हणोनि आतां येणें। उत्साहाचेनि अवतरणें।
श्रीकृष्णाचें बोलणें। सांगिजेल ॥ ४१५ ॥
तया अक्षरांतील भावो। पाववीन मी तुमचा ठावो।
आईका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा ॥ ४१६ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ श्री आदिनाथाय नमः ॥

॥ श्री निवृत्तिनाथाय नमः ॥

# श्रीज्ञानेश्वरी

(सुबोधिनी)

## अध्याय चौदावा

— गुणत्रयविभाग योग —

" त्रिगुणात्मक भाव "

जय जय आचार्या। समस्त सुरवर्या।
प्रज्ञा प्रभा सूर्या। सुखोदया ॥ १ ॥

जय जय सर्व विसांवया। सोहंभाव सुहावया।
नाना लोक हेलावया। समुद्रां तूं ॥ २ ॥

आइके गा आर्तबंधु। निरंतर कारुण्यसिंधु।
विशद विद्यावधु। वल्लभा जी ॥ ३ ॥

तूं जयाप्रति लपसी। तयां जग हें दाविसी।
प्रगट तैं करसी। अघवेंचि तूं ॥ ॥ ४ ॥

कीं पुढिलांची दृष्टी चोरिजे। हा दृष्टी-बंधु निफजे।
परी नवल लाघव तुझें (घाव तुजें)। जें आपण पैं चोर ॥ ५ ॥

जें तूंचि तूं सर्वांययां। मा कोणाबोध कोणां माया।
ऐसेया आपेआप लाघवियां। नमो तुज ॥ ६ ॥

जाणो जगीं आप बोले। तैं तुझिया बोला सुरस जालें।
तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वीयेसीं ॥ ७ ॥

**रविचंद्रादि-शुक्ति। उदो करिती त्रिजगती।**
**ते तुझियाचि दिप्ती। तेजतेजां ॥ ८ ॥**

**जें चळवळिजे अनिळें। तें दैवके निजबळें।**
**नभ तुजमाजीं खेळे। लपीं थपीं ॥ ९ ॥**

**किंबहुना माया असोस। ज्ञान जी तुझेंनि डोळस।**
**असो वानणें सायास। श्रुतीसी हे ॥ १० ॥**

आदिनाथ (भूतादिम्)-भूत आदीनाथ, माया महत्, आदि मायादिसागर, अनाथांचें सनाथपण महादादीचें. आचार्या = उपदेश करणें, हांक मारतांना वापरलेलें नांव, संबोधन, पूज्य उपाध्याय, गुरुपदवी, उपनयन संस्कार करून वेद शिकविणारा (श्रीगुरो), अहो श्रीगुरुराया. समस्त सुरवर्या = सकळ देवांमध्यें श्रेष्ठ (कविवर, कविवर्य). प्रभा-प्रभात = बुद्धिरूप उषेचा उदय करणाऱ्या हे देवा, सूर्या. सुखोदया-सुखोदया जी = सुखाचा उदय करणाऱ्या अहो (१). सर्वं विसांवया-सर्व विश्रांतीच एक, सर्वांचे ठायीं विश्रांती आली. सोहंभाव सुहावया = मी ब्रह्म असा सोहंभाव शोभविणाऱ्या व सर्वांच्या हृदयास सुहावया म्हणजे सुशोभित करणाऱ्या. नाना लोक हेलावया समुद्रां तूं = चौदा वेगवेगळे लोक (भुवनें) समुद्ररूप जो तूं त्या तुझ्यांतल्या तीं भुवनें (हेलावया) लाटा होत-चौदा लोक जणूं काय लाटांप्रमाणें हेलकावे खात राहातात असा समुद्ररूप तूं झाला आहेस. समुद्रां तूं = स-मुद्रा-तूं (२). आर्तबंधु = पीडित का आतुर जे त्यांचा मित्र. कारुण्य = करुण रस, ममता समुद्र. विशद विद्यावधु = निर्मल, स्पष्ट, शुद्ध (ब्रह्म) विद्यारूपी वधु-नवरीच्या. वल्लभा - प्रियकरा (३). लपसी = चोरून असतोस, गुप्त आहेस. जग = विश्व. तूं जया प्रगट तै अघवेचि तूं करिसी = ज्यांस प्रगट (प्रकट = स्पष्ट, व्यक्त) आहेस त्यांस अवघें सर्व स्वरूप दिसतें-करिसी (४). पुढिलांची = दुसऱ्यांची. दृष्टी चोरिजे = दृष्टि बंद करतेस. दृष्टी-बंधु निफजे = नजरबंदीरूपी बंध (बंधन, करार) उत्पन्न होतो. नवल लाघव तुझें-नवल घाव तुजें। जें आपणपें चार (चोरे)-जे तुम्हीं आपण आपल्या आत्मस्वरूपाला लपवितां असें तुमचें नवलच एक चपलतेचें, कौतुकाचें-आरोग्याचें असें-तेथें चेष्टा प्रयत्न भार उपाय ते स्वतःजवळच ठेविलेले होत (५). सर्वांययां = ह्या सगळ्यांस, तेथीलच्या प्रत्येकास. मा = तर मग. कोणाबोध-कोण बंध (बंधु). आपेआप-आपल्या आपण-सहज-आपोआपच-लाघवियां = कोमल असे तुम्ही, लीलेचे, स्वशक्तीच्या खेळाचे (६). आप = पाणी. बोले = ओलावा, वोल्हांगु. बोला सुरस = तुमच्या बोलांनीं-बोलामुळें सुरसत्वाचें झालें-गोड झालें, स्वादिष्ट झालें. क्षमत्व = सहनशीलता, सोशिकपण, समर्थता, योग्यता (७). शुक्ति = शिंपा, शिंपले (मोत्याची शिंप, घोड्याचे कुरळे केश, डोळ्याचा एक रोग), डोळ्याची पाळ ही मोत्याच्या शिंपल्यांत उपमिली-तेथें मोतींच जसें तें. उदो-उदय = लाभ, वृद्धि, उत्कर्ष, वर येणें जें. त्रिजगती = तिहीं लोकीं, तिन्ही जगांमध्यें. तुझिया दिप्ति तेजतेजां = तेथीलच्या तेजास तुमच्या तेजामुळें सतेजता येणारी (दिप्ति = कांति, चमक, कीर्ति, प्रताप, तेज, उद्दीप्तता) (८). जें चळवळिजे अनिळें = वायू हालल्यावर (अनिल = वायु. अनिलसख = अग्नि). देवके-देवकेनि-दैविकेनि जी = देवाच्या, आपल्या. लपिथपि-लपथपि, लपंडाव (९). असोस-अशेष = निःशेष, निरासानें. डोळस = पाहाणारे, बुद्धीचे. वानणें = वर्णन करणें, वाखाणणें. श्रुतीसी सायास हे = ही अशेष-सर्व माया आहे असें ज्ञान तुमच्या तेजानें, तुमच्या योगानें डोळस व पाहाणारें होतें असें वर्णन करणें हें श्रुतींना बहु सायासाचें, धिटाईचें, कष्टाचें असेंच आहे (१०).

श्रीगणेशायनमः। गुरुपरंपरेमधील जें आद्य आदिमाया आदिसागरनाथ-अनादिवासना आदितत्व -महत् आदिनाथ ज्यांनीं मत्स्येंद्रनाथांना उपदेश केला, त्या आदिनाथांना नमस्कार असो! तसेंच गुरु

श्री शंकरांना नमस्कार करून त्यांचा कृपाशीर्वाद घेऊन आतां भलेपणाचें अथवा सहजच नमस्कारणें झालें असें श्री निवृत्तिनाथांचें जें प्रसन्नत्व म्हणजेच श्रीज्ञानेश्वर महाराज अशा श्रीगुरु निवृत्तिनाथांना नमस्कार करून पुढें लिहिण्याचें करतों (ह्या जगताची कर्त्री-मूळमाया-गुणमयी का शांत असे जे अक्षरब्रह्म विष्णु त्यांस नमस्कार असो. त्या गुणमयीस नमस्कार असो.)

जय जय हे श्री आचार्य श्रीगुरो-हे श्रीगुरो आचार्य आपण सर्व देवलोकामध्येंही श्रेष्ठ असेच आहांत म्हणून आपलाच आश्रय आम्हास हवा आहे. आपण प्रति सूर्यच! त्या प्रज्ञेच्या प्रभेनें प्रभाततेजानें झळकणारे असे आहांत. ज्ञानसूर्याचा उषःकालच ह्या प्रज्ञेनें पाहिला आहे. आनंद हाच आपलें रूप आहे. प्रज्ञा व प्रभा असें सूर्यानें सूर्यो असें द्विवचन घेऊन येणें केलें आहे. (प्रज्ञा-प्रभे) (प्रभाःप्रज्ञः)! सच्चित् सुख हेंच जेथें उगवलें आहे असे आपण आहांत. तेथें सुख हा शब्द शब्दपणाचा नसून तेथें तें सुख सर्वथैव सुखाचें असेंच आहे. ह्या बुद्धीची पहांट झाली, व ज्ञानसूर्य आतां उगवणार, आनंद हा उदय घेऊन येणार आहे. आनंद हा आनंद आहे. असें तें सुखाचें उदयास येणें असून तेथें आतां (असत् अथवा जड अथवा दुःख याचें नांव नाहीं). तेथें सच्चिदानंद परमात्मा हा सर्व सुखाचा आनंदच उदयास आला असें आहे.

येथें अगोदर ह्या प्रकृतीनें आपली योग्यता पाहून स्वतःस ज्ञानप्राप्तीची योग्यता प्राप्त करून घेऊन तेथें धर्म म्हणजे काय? ब्रह्म कशास म्हणतात? असें जें कांहीं एक (आचर=सेवा करणें) आचार्य पदवीनें पाहिलें, परिव्राट-प्रव्रजा-लक्षण तेंच आतां सर्वसंग परित्याग करून आपलें एकान्ताचें कसें तें पहावें, म्हणूं केलेलें, हा अभ्यासच अंतरांत बाणविला. सद्गुरु कृपेमुळें ज्यांनीं त्या ज्ञानाचा ध्वजच जसा लाविला व नंतरच ज्यांना आचार्य ही पदवी प्राप्त झालेली. पूर्वकालीन जे अनेक आचार्य होऊन गेले तेच ह्या महत्त्वानें असलेले होत. त्यांना ब्रह्मयज्ञामध्यें तर्पणांत घेतले जाणारे असे जे ते जसे सुरश्रेष्ठ अशा पदवीस पावलेले. त्यांना अगोदर वंदन करून मी हें पुढें लिहिण्याचें करतों.

हे आचार्य श्रीगुरो! आपला जयजयकार असो. आपण सकल जे देव त्यांच्यामध्येंही श्रेष्ठ अशीच पदवी पावून आहांत. आपल्या येण्यानें माझी बुद्धि ही सूर्योदयच पाहूं लागत आहे. व दिवसच जसा उगवला, असा तेथें आनंदच होऊन आहे. आपण ज्ञानसूर्यच आहात. आनंदच ह्या 'सच्चिदानंद स्वरूपामधील हा उदय घेऊनच आला आहे. हे आचार्य श्रीगुरो आपला जयजयकार असो! (१)

हे आचार्य! हे श्रीगुरो! ह्या अनेक व्यवसायांनीं जें कांहीं ह्या देहावर परिणाम करणें त्याचप्रमाणें अविश्रांतपणें जें कांहीं परिणाम करीत रहाणें तें ह्या देहाचें तें आतां विसवणें घेऊन आहे. त्याचप्रमाणें ह्या मनानें घेतलेलें जें अनेक व्याप्त काम लक्षण तें आतां आपल्या येण्यानें विसावाच जसा मिळाला असें झालें आहे. तेथील वृत्ती-व्याप्ति ही विश्रांतीस आल्यासारखें असून तेथें मजला ह्या विश्रांतीमुळें परम समाधान वाटत आहे. व त्या समाधानानें प्रसन्न असा होऊन आपला जयजयकार करीत आहें, कीं हे श्रीगुरो! आपला जयजयकार असो!! ह्या विश्रांतीमुळें मजला, जसा एक भावच आला, असें होऊन आहे. तेथें त्या भावास जो मी जसा असावयास पाहिजे, तसा, जसा कांहीं, मीच तो, किंवा मीच तें ब्रह्म असें शोभविणारें असें एक सोऽहं लक्षणच मजमध्यें गृह करीत आहें. अनेक लोक हे त्या मुद्रेसाठीं, ज्ञानरम्य असें जें उभारणें ह्या स्वभावाचें, त्यासाठीं, हेलणें जें, स्वरोच्चार अथवा बोलणें, हें आपआपल्या परीनें त्या मुद्र महतीचें होऊन असतें, असेंच ज्या त्या लोकांचें एक परोपरीनें विनवणेंच ह्या प्रकृतिधर्मास होत असलेलें व तेथें, जें दर्शन अथवा वृत्तिभार, हा जसा श्रीगुरूना एक विनंतिभार पोहोंचविलेला अथवा आचार्यांचें एक धर्मप्रतिष्ठेनें प्रकृतिधर्मासाठीं पुरून असणें होय. येथें सहजत्व हें परिणमत असल्यानें तेथें

वरील बोलणें हेंहीपण न बोलणेंच एक असेंच होऊन आहे. जसें मतिपत्र हें रावो जो त्यानें आपला भार ओतूनच चालविण्याचें होतें, तसेंच येथें जर मुद्रेचें अंकणें अंकित तरच तें सहज योगाचें एक मित्रभावन होऊन असतें. तेथें मग कर्मभार किंवा देवभार अथवा ऋणभार हा त्या लोकलीलेचें प्रधान अंगच मुळीं सर्व संसार हा सुखाचा असाच होऊन जाणारा. येथेंच ज्याचें त्याचें महत्त्व हें कसें त्याचें त्याचेंच (त्यासच) परंतु आपल्यासहीपण तें पुरवूनच घेणारें झाल्यानें मग तेथें ऋण हें काय लक्षाचें अथवा कोटीचें तें तेथीलच्या तन्वंगीचें प्रमाणशुद्ध असें सौंदर्यच ईश्वर होऊन आलें व आतां तें तुम्हांस 'आभार आहेत' असेंच म्हणूं लागणारें होतें–म्हणूं लागतें–व आतां मुद्रा म्हणून जी आहे, त्या मुद्रेचें सहिततेनें असणें असें जें एक, तेथील अंतच पाहावा–ठावच धुंडावा, असें तें, मुद्रेचें–चर्येचें–दिनचर्येचें–आचाराचें–असें एक लक्षण तें जसें, ह्या अनंत लोकांना हेलकावेच देत असून त्या लोकांनी (प्राण सधन असे) त्या समुद्रतेच्या अंगानें असावें. लोकांना तें मुद्र अंगाने असणें अतिप्रिय असें आहे, त्या शिवाय त्यांना चैनच मुळीं पडणारें नव्हे असेंच जसें, त्यांना आंदोलनच एक तसा स्वभाव आनंद, उत्कर्ष, उत्साह देत असून, तें अतिरम्य असेंच ह्या प्रकृतीस वाटत आहे. तेथें आनंद सुख–महत्त्व–विश्रांति ह्यांनींच तें मुद्रतेचें लक्षण (मुद्रभार) ह्या लोकांना परम सुखाचें निधानच असें होऊन आहे.

आपण हे श्रीगुरो! हे आचार्य! जसें प्रज्ञान घनतेचें ऐश्वर्यरूपी प्रभवन, प्रभाव, प्रभा, प्रभातच होऊन आहांत. तेथें सूर्यासारखें महातेजच, दिव्य घेऊन आलें आहे, असें आपण असून, त्या आपणामधून, जें कांहीं, मुद्रलक्षणानें आमचें येणें जाणें तें म्हणजे समुद्राच्या तरंगरूपी लहरीच होत. ज्ञानमुद्रच एक सहिततेचें असें त्या ब्रह्मसागराचा अंतच पाहाणारें आहे. त्या 'भा' अंत प्रज्ञा प्रभारूपी सूर्यामधूनच जाणें येणें हें होत असणारें असें आहे. व आपणच त्या सूर्यासारख्या–अथवा सूर्यरूपी प्रभेमध्यें असल्यानें तेथें अंतच पाहिला, ठावच मिळाला–असें आपल्या चरणाचें येणें हे गुरो! आहे. अनेकांना जसें कांहीं आनंदाचें करून तेथील लोकणें, पाहाणें हें, त्या अनेक अशा लोकांना लोकांचें केलें, लोकांना दिवसाचें केलें, लोकांना दिवस उगवल्यासारखें, एक आलोकणेंच, मिळाल्यानें तेथें त्या लोकांनी अनेकवार जय जय श्रीगुरो! जय जय आचार्य! असेंच आपलें अभिनंदन केलें–स्वागत केलें!! व ते लोक अतिप्रसन्नतेचा बहार घेऊन आल्यानें आतां तेथें जसें कांहीं एक प्रेमच लोकबंधुत्वाचें झालें. (२)

सविद्य विद्यमानाचें जसें एक स्पष्टपणच, ह्या विद्यारूपी सुरवधूचें येणें, हें आपलें वल्लभच धुंडीत असणारें असें आहे. शब्द ब्रह्मरूपी विद्यारूपी वधूच्या प्रियकरा–वल्लभा जी अहो, आईके गा!! तेथें आर्तता ही हृदयास प्रेमाचा, सर्व प्रीतीचा असाच एक, जसा कांहीं विरहच–त्या बंधुत्वाचा! तेथील बंधुत्व हें आर्ततेच्या कोटींनी शतगुणीत झाल्यानें काय करुणास्पदच ह्या बंधुत्वाची अथवा विद्यारूपी वधूची कहाणी ही ऐकिली असतां तेथें परम प्रीति हीच जशी बंधुत्वाचे शेजारीं बसणारी–करुणाकर प्रेमा कारुण्य वेळ ही सिंधूच्या भाराची होऊन आहे. तेथील वधू ही वल्लभानेंच जशी आतां अलिंगिली गेली. असें तेथील आर्तलक्षण आहे, जी अहो! अहो! असेंच एक महान् महत्त्व देऊनच ती आहे. हे लोकबंधू! हे परिश्रांत बंधो! आईके गा! अहो आईका तर खरें अहो! आइकावें बरें!! आपलें लक्ष देऊन हें श्रवण करण्याचें करावें अशीच ही आर्ततेची कहाणी जिथें मी अति म्लान होऊन आहें, वाट पाहून पाहून दमून गेलें आहे, असें तें विद्यारूपी वधूचे हृदयास कळवळा आणणारें लक्षण हें त्या आपल्या वल्लभास कसें विनवणें करीत आहे पहा—अगा हे बंधू! अगा हे आर्तबंधू! माझ्या अंतःकरणामधील जी आर्तता ती इतकी स्पष्ट झाली आहे कीं, तुम्हीं हे वल्लभा! आपलें नीट नैरंतर्याचें जें कारुण्य वेळेचें, सिंधूसारखें महत्वानें असणें, तें आतां स्पष्टपणें समजून घेऊन, उघडतेचें होऊन तेथें आपलें वल्लभत्व हें जी अहो! महामान्यतेचें असेंच करून घेऊन असावें. तेथें विद्या ही आपल्यास वल्लभानें परिणत करावीच अशा आर्ततेची होऊन आहे. (३)

सविद्यत्व हें स्पष्ट दाखविणारें असें तुमचें वल्लभत्व असून तेथें विद्यमान विद्येचें जसें पाणिग्रहणच झालें–तेथें दिवसच उगवला, ज्ञान ज्योत प्रगटली, असेंच तें वल्लभत्व होय.

परंतु ज्यापासून तुम्ही लपून बसतां त्याला हें जगच नुमतें दिसूं लागतें–परंतु जेव्हां ही वधू प्रकृतीभार आपल्या पुरुषभारानें पुरुषानें अंगीकृत केलेली अशी दिसली जाते–पाहिलेली होते, तेव्हांच तेथें हें सर्व जें जगत् तें, अवघेपणानें 'त्वद्रुप' तुम्हीच हे श्रीगुरो आहांत असेंच होऊन असतें. (४)

हें जें स्पष्टपणें दिसणें–तें म्हणजे एक पुढितांची दृष्टीच आपल्या उपयोगास घेऊन तिनेंच तें पाहाणें केलेलें असें होय. तेथें हें जें तुमचें लपणें अथवा स्पष्ट होणें किंवा प्रगट होणें–सगुणत्वाचें होणें–हें त्या एक दृष्टिबंधावरच, दृष्टि–बंधनावरच–(नजरबंदीवरच) अवलंबिलें गेल्यानें तेथें जसें ह्या देहामधूनच तें निपजणारें असें तें सगुणत्व असून–सगुण असून तेथें तुम्हीं आपणच आपणांस जसें विज्ञानांचें असेंच एक चोरणें होत असलेलें. तेथें ह्या महाकारणाचें जसें एक चोरलें म्हणणें जाणें हें एक चार चौघांनीं आडविलेलें व आपल्या महत्त्वास येच ये म्हणणारें असें असून तें ह्या लोकांना जसें एक नवलच पहाण्यास मिळालें असें होय. हें चोरापोरीच जाणारें परंतु आतां पहावें तों आपलें हें एक नवलच त्यांना ह्या दृष्टिबंधामुळें सांपडलेलें असें होऊन आहे. असेंही तेथें म्हटलें जात आहे कीं तें लाघवी म्हणजे कौतुकाचें असेंच असून तें आपणच आपल्यास चोरून असतें. तुम्ही आपणच आपणास चोरून आहांत, आपणच आपणांस लपवून आहांत, आपणच स्वतःस लपवितां. (५)

असें हें श्रीगुरुराया आपलें रूप–जें तुम्हीच तुम्हीं ह्या सर्वांना होऊन असणारें, तेथें तुम्हीच ह्या सर्व जगाला एकलेच एकटे असल्यानें तेथें आतां बोध तो कुणास झाला कोण जाणें किंवा ह्या मायेनें कुणावर परिणाम केला! तें काय; किंवा जग कसें जें आहे तें तुमचें तुम्हासच माहीत असल्यानें, तेथें तुमच्या लाघवीपणाची, खेळाडूपणाची कमालच झाली. असें जें सहजासहजींच असणारें–होणारें–जें आपलें लाघवीपण हें स्वतःशींच खेळण्याच्या त्या लाघवीपणानेंच असणारें–स्वलीलेच्या ठिकाणीं विनटणारे असे जे तुम्ही त्या तुम्हाला हे श्रीगुरो नमो नमो–नमस्कार असो–मी नमस्कार करतों. (६)

हें लाघवीपण प्रेमसूत्रच जसें आपल्या सांवळ्या तेजानें ह्या विश्वामध्यें भक्तिरूपानें वागत असल्यानें तेथें पाणीरूपी ओलावा–सूर्यानें शोषण केलेलें पाणी हें (मेघधारांमधील) ओलावा होऊन आहे व हाच ओलावा चंद्रामधील जी ज्योत्स्ना ती होय तेथें 'ओलावा' केवढ्या महिमानाचा बरें! (३९९।१५). हाच पसू म्हणजे पैस पाहाणारा होऊन आहे, तेथें तुमचें जें येणें किंवा असणें हें इन्द्रियांना चरणच इंद्रियांस–रण–रज स–रण, रणसहित–जसें लाभलें असें असून काय तेथें एक चटकाच ह्या मनानें घेतला,–छंदच घेतला. ह्याच छंदास तुम्हीच आपला आमचा असें म्हटल्यानें तेथें सुरसपण हें रसभारच! तेथील बोल तुम्हीं वागविल्यानें त्यास अतिरम्य असें ह्या जिव्हेसच जणूं दिसूं लागल्यानें तेथें बोलणें हें प्राणच जसा! काय जें ब्रह्म, ब्रह्म! तेंच तो होऊन आला. ह्या वाणीनें अमृतासारखें गोड असें रसनाचातुर्य पाहिल्यानें वैकुंठच आतां ह्या भूलोकावर उतरलें! असें एक रामनामाचें येणें हें घटकेंत सगुण, घटकेंत निर्गुण, असेंच पाहण्यास मिळाल्यानें ह्या बोलणाऱ्या मधूनच जें निर्माण होणारें तेंच बोलण्या–बोलण्या चालण्याच्या कसोटींनीच हातीं येणारें होतें; अंजनच ह्या दृष्टीस मिळालें असें एक 'ज्ञान बीजास येणें' झाल्यानें आतां श्रीगुरुच सर्व कांहीं तेथीलचें गुज होऊन असणारे होत. तसें तुम्हीं हे श्रीगुरो येथें आहांतच–तें आपलेंच एक येणें असल्यानें मजला नमो नमो जी श्रीगुरुराया! असेंच एक भलेंपण पाहाणारें होत आहे.

ह्या कसोटींनी जी कांहीं एक योग्यतामापन अथवा प्राणासच प्राणाचें करणें तें जीव कीं प्राण असें ह्या जीवदशेनें वागविलें जाणारें देहधारण तें योग्यतेचें क्षमापण पाहाणारें होतें. तुम्हीं जें हें स्नेहधारेनें

वागविणें करतां, वागविणें करून असतां, तें आपलें वात्सल्य ह्या पृथ्वीसच आपल्या परम योग्यतेची अशी नवाई पाहविणारी असल्यानें तेथें खंत ही मुळींच नसून सर्वथैव क्षम–योग्य–रमणीय–पडणाऱ्यांस पृथ्वीनेंच कळवळून आधार दिला–उचलून धरिलें, पृथ्वीच कळवळली यथाभार–जीवन योग्य–प्राण धारण क्षम असेंच तें आपलें वात्सल्य ह्या पृथ्वीस एक परम क्षमत्वच–योग्यत्व–योग यौगिक असेंच करून आहे. (७)

तुमच्या तेजानेंच तेजवान होणारें, सतेज असें दिसणारें असें जें परावर्तनानें होणारें लखलखित तें तुमच्याच तेजानें शिंपलेच जसें ह्या कर्ण किंवा मदन कुहरानें श्रुति श्रवणाचें प्रकाशन पाहाणारें ह्या शुक्तींनी चमकावें–प्रकाशावें–असेंच तें एक वडवानळावरच घर्षण झाल्यानें स्वतःस पण काय तेजाचें एक तवानेपण. तेथें तवानेपणानें असेंच होऊं लागलें की अनंत शक्ति ही जसा कांहीं आपला सर्व प्रकृतिभार घेऊन आली आहे; व तिनेंच ती प्रकाशाचें लख्ख असें एक 'उदोच' करणें होत असलेली. तुमच्या तेजानें त्या रविचंद्रादींना दीप्तिमंत केलें. शिंपल्याचें जसें मौक्तिकांना पाहाणारें तसें एका रवीसच किंवा एका चंद्रासच तें उपमेस घेऊन आलेलें. मूळचें जें तेथील तेज, तेंच जसें एक प्रकर्षण झाल्यानें, तेजावरच तेज पडून, तेजासच तें तेज न सहन झाल्यानें, आतां त्यानें आपलें सर्व तेज बाहेर टाकलें, व अनंत तेज असेंच तें होऊन महा प्रखर अशी एक दीप्त तेजाकृतीच 'उदो' करूं लागली–प्रकाशूं लागली–आपलेपणास आली–कृतीची झाली–तेजास तेज चढलें. तें श्रीगुरुराया आपल्याच पादपद्माच्या दीप्तीनें होत असल्यानें त्रिजगतामध्यें आतां पहावें तों "उदो" "उदो" असाच त्या आकृतीस भार पोहोंचविला जात असून तेथें ह्या अंतरिक्षामधील ज्या परमदेवता त्यांना ह्या लहानसाहानांनीं आपलें सर्वस्वीपण देत राहिल्यानें तेथें सर्व तेज जें त्या सूक्ष्म (ताऱ्यांचें) 'स्व' चें तें अतिशय असेंच होऊन आलें आहे. तेथें परम भार हाच हाताचा होऊन परमैश्वर्य असेंच तें आतां रविचंद्रादींनी व्यक्त करून तेथें ह्या उदोचा प्रभावच जसा कांहीं, सूर्यच ह्या भूमंडळावर आला–जन्मला असें होऊन आहे. परम शांतरूप असें जें सत्वमूर्तीचें प्राधान्यतेनें असणारें तें जसें आतां एका परम सौजन्याचें झाल्यानें तेथें साधुकृतीच एक निर्माण व्हावी, असेंच तें होऊन आहे. मोत्यांचा चुरा जसा ह्या चित्तानें पाहावा–चिदाकाशांत पसरावा–तो सर्वच्या सर्व एकत्रित होऊन त्यानेंच जसें आपल्या मूळच्या उत्पत्तीस पाहावें असें तें असल्यानें आतां तो चित्त-भार हा सूर्यच जसा उगवला. अथवा शांत लक्षणानें चंद्रच जसा एक सर्व सत्वप्रधान असा होऊन आला आहे. असें तें त्यांचें उगवणें हें उदोच एक करूं लागून, तेथें आतां तेजानें तेजच जसें दीप्तिमंत तसें झालें–दीप्तिमंत केलें–सतेज असें दिसूं लागलें, प्रकाशास आणलें, प्रकाशाचें केलें, ऐश्वर्यवान् केलें, तिन्ही जगामध्यें आतां उदोच होऊं लागल्यानें तेथें चित्त हें परम तेज घेऊन आलें व त्यानें आतां अनेक चंद्र, अनेक रवि असें करण्याचें पाहून त्या अनेकांमधून एकत्व जे ते श्रीगुरूच–ते त्या श्रीगुरूचें–असेंच आहे–असें हे श्रीगुरो! आपलें प्रभाव सामर्थ्य असून आपण सर्व तेज असेच आहांत. (८)

ह्या दैविकी शक्तीनें त्या अनिलास म्हणजे वायूसच एका प्राणधारणेचें करून तेथें निजसत्ता अथवा बळ हेंच एक देव रहस्यच पाहाण्यास लावून आतां ह्या नभासच उलटपालट ही दिली गेल्यानें तेथें आड होणें एक लपंडावच खेळांतील अथवा लपणें हेंच ह्या दैविकीनें आश्रयास घेऊन तेथें थपणें अथवा थापच्या–थापच एक देवत्वास पाहूं लागून आहे. ह्या नभानें अनेक बोलणीं चालणीं दैविकींनीं केलीं जाणारीं–तीं आंत सामावून घेऊन तेथें एक जसें ह्या दैविकी इच्छेनें–स्वतःस लपवून–लपणेंच प्रस्थापित करून तेथें तें प्रतिष्ठाच घेऊन आहे. (९)

ह्या ज्ञानानें आतां जसें आपलें प्रस्थान ठेविलें, तेथेंच तें रमूं लागलें–रातणें हेंच त्यानें घेतल्यानें तेथील जीं मायेचीं सोस वाहाणारीं गृहें हीं सडोळसच झालीं–ही अशेष माया आहे असें ज्ञान तुमच्या तेजानें डोळस आहे. अशी ही माया बहुविधतेनें नटलेली असून, तेथें जें सज्ञतेचें, डोळस अथवा जागें तें

तुमच्यामुळेंच होत असून आतां काय हें जवळ जवळ अगदीं जवळच जें असणारें असें तें खेळणें (चळवळणें) हे सायासच नव्हेत काय! कीं हे श्रुति आदि ग्रंथांनीं परोपरींनी, अथवा सायासें करून सांगण्याचें केलेलें असें हें प्रस्थानच एक त्या ज्ञानाचें असून तेथें आपणच हे श्रीगुरो तें सडोळस करणारे असे आहांत. आपल्या-मुळेंच हे श्रीगुरो तें ज्ञान हें ज्ञानबीजांस येऊं लागून, येणारें होऊन, डोळस होणारें होतें—डोळस असतें—सज्ञानतेचें, ज्ञानघनतेचें, केवळच जें ज्ञानाचें असें आपल्याच प्रभावानें होत असून तेथें आपणच एक सुखसर्वस्वानें आनंदाप्रत येणारे असे आहांत—व आपण सर्व कांहीं हें विश्व भरून आहांत त्या आनंदघनतेस जेव्हां पाहावें कसचें आनंदाचें आतां व्हावें हेंच बरें! काय त्या श्रुतींनी आपला अमूल्य वेळ हें वानण्याचें करावें ते महासायासच! (१०)

वेद वानुनि चांग। जंव न दिसे तुझें आंग।
मग आम्हां तया मुग। येकि पांती ॥ ११ ॥

जी एकार्णवाच्या ठायीं। पाहातां थेंबाचा पाडु नाहीं।
मा महानदी काई। जाणिजती ॥ १२ ॥

कां उदेलिया भास्वतु। चंद्र जैसा खद्योतु।
आम्हां श्रुती तुज आंतु। तो पाड असे ॥ १३ ॥

आणि दुजया थांव मोडे। तेथ परेसी वैखरी बुडे।
तें तु मा कोणें तोंडें। वानावासि ॥ १४ ॥

यालागी आतां। स्तुति सांडुनि निवांता।
चरणीं ठेविजे माथां। हेंचि भले ॥ १५ ॥

तरी तुज तैसयां। नमो जी श्रीगुरुराया।
मम ग्रंथोद्यन फळावया। वेव्हारा होयीं ॥ १६ ॥

आतां कृपा भांडवल सोडी। भरी मती माझी पोतडी।
करी ज्ञान-पद्य-जोडी। थारावी मातें ॥ १७ ॥

मग मी संसरेन तेणें। करीन संतासी कर्णभूषणें।
लेववीन सुलक्षणें। विवेकाचीं ॥ १८ ॥

जे गीतार्थ निधान। काढूं माझें मन।
सुईं स्नेहांजन। आपुलें तूं ॥ १९ ॥

हे वागसृष्टी एकें वेळें। देखतु माझे बुद्धीचे डोळे।
तैसा उदयिजै जी निर्मळे। कारुण्य बिंबे ॥ २० ॥

चांग—तवंचि चांग (चांगला, चतुर). आम्हां तया मुग येकि पांती=आम्हांस व त्यांस एकाच (पंक्तीस) समुदायांत बसणें प्राप्त होतें—मौन धरणें प्राप्त होतें—मूग खाणें प्राप्त होतें (११). एकार्णवाच्या ठायीं=सर्वच जलमय झालें म्हणजे. थेंबाचा पाडु—प्रळय मेघाचा पाडू=जळप्रळय योग्यता नाहीं. महानदी=मोठी नदी. जाणिजती—निवडू येती (१२). उदेलिया—उदयलिया=उगवल्यावर. भास्वत—भास्वत=सूर्य, प्रकाश, तेजस्वी. खद्योत=काजवा (सूर्य, डोळा, दृष्टिबंध). श्रुति=वेदाला (आम्हां वेदाला तुज ब्रह्मामध्यें, जसा

चंद्र हा सूर्य उगवल्यावर खद्योताप्रमाणेंच एका, तशी योग्यता येऊन आहे-असते) (१३). दुजया थांव मोडे-द्वैताचा ठावच नाहींसा होतो, दुजेपणच तेथें मोडून असतें-संकोच पाहाणारें नसतें. परेसी वैखरी बुडे=तेथें तर परावाणी समट मुळीं ती वैखरी वाणीच बुडून जाते असें तें ब्रह्म अथवा असा तो शिव. कोणे तोंडें वानावासि=कसा बरें वानण्याचें करूं-कसा वानला होईल, वाखाणणी का वर्णन करून सांगावा तो (१४). स्तुति सांडुनि निवांता=तुम्हांस स्तुतिस्तोत्राचें न करितां निवांतपणें (आपल्या चरणीं माथा ठेवावा हेंच भलेंपण शोभणारें होय) (१५). तरी तुज तैसया (ब्रह्म). तरी तूं जैसा आहासि तैसया. श्रीगुरुराया-जी श्रीगुरुराया. ग्रंथोद्यम फळावया=गीतार्थ कथनरूप ग्रंथ रचनेचें काम, उदीम, कर्तव्य लाभाचा होवो, आनंदाचा होवो. व्यवहारा-वेव्हारा होई=सावकार होई, व्यापारी भांडवल पुरविणारा हो (१६). कृपा भांडवल सोडी-कृपारूपी थैली सोडा, मोकळी करा=आपली कृपा हीच भांडवल होऊन असो. मति माझी-माझे मतीची. पोतडी=(पोत, पोतड, पोतड, आड) जुनेंपण जेथें यथेच्छतेनें वागत आहे-आतां तें नवेपणास आणून नाविन्यानें तें एक आतां श्रृंगारलें, गौरविलें, नवीन असें केलें तेव्हां तें जें जुनेंपणाचें (मातेरें का पोतेरें), भोळें भावाचें तें आतां सहजतेनें सुरेखतेस आणिलें गेलें. आतां तें जें आळलेलें असें जीवित आपला प्रसर पाहूं लागून जीवदशेचें जें प्रियेचें लाघव तें पाहूं करूं लागलें तेथें ही जिव्हा-नटीच ती श्रृंगारिली-महत्त्वास आणिली गेली. व्यवहार, व्यवसाय, कामकाज, अनेक अशीं जीं कांहीं देहाच्या उद्यमास योग्य करण्यास लागणारें जें कांहीं कौशल्य तें जिव्हानटीनें आपल्या भारास आलें, प्रमाणाचें केलें असें हे श्रीगुरो करा, त्यायोगें मजला जुनेंपण हें आतां नवलाचें असें नवीनपणच तेथें आतां शोभा काय, सुरेखपण काय, आपलेपणाच्या गोडीची ती जीवदशेची, चातुर्यतेची सीमा तेथें जीवित श्रृंगारविलें, आपलेंपण उगवलें व आतां काय बिनदिक्कत चरणावर मस्तकच ठेवणें झालें असें हे श्रीगुरो आपल्या कृपेनें माझेंपण मजप्रत आणिलें-तेथें आतां सहजपणेंच आपल्या चरणावर माझें मस्तक नम्र होणारें सहजच तुम्हांस माझें असेंच वरचेवर पुन्हा पुन्हा नमन झालें. ज्ञानपद जोडीकरी माते थोरावी=ज्ञानपद जोडीच्या हस्तें करून मजला आश्रय द्या, मजला थोर करा, ज्ञानपद जोडीचा असा करा. थोरवा-थारवा, थोर होऊन मी आहें, थोरावून मी आहें असें करा, ज्ञानाच्या पाउलांच्या जोडीच्या हस्तें मजला थोर करा, थारा द्या, आश्रय द्या, शरणार्थतेचा करा, ज्ञानाच्या पाउलांची जोडी करी-हस्तानें मजला थोर करा. ज्ञान-पद्य-जोडी-ज्ञानपद जोडी. थारावी-थोरावी-थोरा. माते-थोरामाते, (थोर=विश्वरूप)=ज्ञानप्रधान काव्याची थोरा जोडी म्हणजे मोठा नफा, ज्ञानपद हें कसें तर जेथें सर्व सिद्धांत हें आपल्या भारानें महत्त्व पाहून आहे. जेथें सरस्वतीचे चरणच जसे उभरून आलें माते थोरा ज्ञानपद जोडी थोरावी=मजला थोर अशी ज्ञानपदाची जोडी देऊन थोर करा—जोडी, गोडी, संलग्नता, श्रेष्ठपद (१७). संसरेन तेणें करी-संसरेन तेणें करीन (तेणे करी संसरेन) त्याने सरसावून त्याने सरसवीन. कर्णभूषणें=(कर्ण टोंचणें, भोंक पाडणें, ऐकणें हींच भूषणें अलंकार अलंकारणें) कानाचें भूषण अलंकार संतांना करीन. सुलक्षण=उत्तम, अनायासेंच, प्राप्त, शुभ, गुणवर्णन. विवेकाची=सारासार विचाराची, वैराग्याची. सुलक्षणा=वाच्यार्थाहून निराळा सूचित अर्थ (१८). जे-जी. गीतार्थ निधान=गीतार्थरूपी गुप्त ठेवा. सुई-सुयी-घाल. स्नेहांजन=स्नेहरूपी अंजन (नेत्रांत घालण्याचें औषधी द्रव्य, काजळ, शाई). आपुले=आपलेपणाचें असें स्नेह वात्सल्य-स्नेहत्व, मित्रत्वरूपी अंजन डोळ्यांत घाला. सुई स्नेहांजन आपुले तूं=तुम्ही आपलेपणाचें असें स्नेह कां मित्ररूपी अंजन माझे डोळ्यांत घाला-नेत्राचें प्रसवणें कृपा दृष्टीचें जसें (१९). वाग्श्री-वाक्सृष्टी=वाक् श्रृंगार, शब्दमय सृष्टि, वागीश्वरी. देखतु-देखोतु=पाहातें. उदयिजे जी-उदैजो जी. निर्मळे=शुद्धे, स्वच्छ अशा तुम्ही. कारुण्य बिंबे=करुणरसरूपी, करुणारूपी सूर्य बिंबाचा निर्मळ प्रकाश करा (२०).

श्रुतींनीं तर हें महाकष्टें करून प्राप्त झालेले सायास करून महाप्रयासानें वानिलें, वाखाणिलें व त्या वाखाणण्यामुळें वेदांना चांगुलपण पाहूं लागले–तेथें जशी काय गंगा सरस्वतीच ह्या भूमंडळावर आली, व तिनें त्या वेदांना चतुर चतुर अथवा वेदांनी त्या तिला चांग चांग असेंच म्हणूं केलें. आतां सरस्वतीच तें तेथीलचें चांगपण पाहूं लागल्यानें तिनें त्या (स्वर) गंगेसच ह्या पृथ्वींतील एक देवता होय असें करून ठेविलें आहे. परंतु हे श्रीगुरुराया! हें सर्व जरी आहे तरी आपण जर कां तेथीलचें तें तिचें येणें हें अंगिकारिलेलें नच जर, तर मग काय आम्हीं जसें काय मूगच गिळून गप्प आहोंत–व चांगुलपणाचे वेदही पण आमच्याच पंक्तीस येऊन बसणारे झाल्यानें तेथें आतां हे श्रीगुरो आपले अंगाचें आम्हांस केव्हां बरें कराल! असें एक उत्कंठितपणच परिणाम करीत आहे. आम्हासही पण व वेदांसही पण जसें कांहीं चांग चांग ते काय असें मूग गिळून गप्प बसावें, बसवावें असें एकाच पंक्तीस बसविलें गेलें तेथें अंगच मुळीं श्रीगुरूंचें दिसेना–श्रीगुरूंनी अंगीकृत केलेलें असें तें (कामाकाजांनीं, कामानी, काजांनीं) –काम-काज (कामिनी–काजिनी–हृदयाब्जिनी) दिसेचना! म्हणून जोपर्यंत तुमचें अंगीकृत असें तें नच होईल–तें तुमचें अंगीकृत असें व्हावेंच व्हावें तरच बरें !! (११)

असें तें तन्वंगीचें महत् सुंदर नगरी नसून नवरीच एक तुम्हांस वरण्यास आलेली असें नेत्रकटाक्षानें पाहाणें तें काय स्वर्गसुखासच खालीं पाहाण्यास लावणारें होतें व आतां एक अर्णवच! सर्व भार हा–जलमयाचा–एकाच त्या अर्णवाचा झाला. तेथें एक थेंब जरी तरी तो म्हणजेही पण अर्णवभारच घेऊन आल्यानें तेथें त्यास काय एक थेंब असें म्हणणें–म्हणजे कोठें तें तुलनात्मकच मुळीं! एका थेंबाला योग्यता अथवा महत्त्व काय–आपणांस विसरलें होऊन तेथें एक जीवतेनें सजीवत्वाचा भार पाहणारा तो होतोच होतो. सर्व एक अर्णवच झाल्यानें तेथें महत्त्व एका थेंबास तें (एक बुडबुडाच जसा तो असलेला तें). कसें काय पाहविलें जाणारें कोण जाणें–असें असल्यानें, तेथें नदी ही जी त्या अर्णवासच मिळणारी ती आपलें 'महा' पण घेऊन आली तरी तेथीलचें जें क्षीरार्णवाचें गुह्य हें तिजला कसें काय कळणारें होणारें बरें! किंवा अर्णवामधून महानदी ही निवडली कधीं कां जाईल? महानदीनें घेतलेलें जें एक जीवित चक्र–सवाचें करणें तें तिजला मुळींच न समजणारें होऊन तेथीलची गतीही पाहावी तों लांबच लांब अशी एक मकराकारच होऊन असल्यानें तेथीलचें जें मदनाचें आयुष्मापन हें मकरध्वजास पाहाण्यास दिलेलें असें तें द्विजांचें एक उदार लक्षणच होय. तेथें ती महानदी ही मुळींच न गिवसणारी अशीच. तेथील ऋषींचें जें नामभवन तें भृगुच जसें असें होऊन असल्यानें तेथील कथा काय कुणी सांगावी बरें! तेथील परम दैदीप्यतेनें प्रकाशणारें जें श्रीगुरु भुवन हेंच न समजलें किंवा उमगलें जाणारें होय. आणि म्हणूनच तर येतें तें तन्वंगीस देऊं केलेलें जें झांकण तेंच अक्षरांस प्राणाचें करणारें होतें–प्रेमाचें असें होतें. (१२)

म्हणून तेथील जें लोकणें हें 'ईशसृष्टीच' एक आपलीशी केली असें असून तेथें काय सहज लक्ष हें केव्हांच तेथीलच्या भारास उचलणारें होतच नाहीं तें कां? ह्या जीवदशेचें जें जीवितचक्र हें एक थेंब (किंवा बुडबुडाच) अर्णवाशीं मिळून गेलेला तो कसा बरें निराळा निवडला जाणारा.

भास्वान् अथवा सूर्य जेव्हां उदयास येतो तेव्हां चंद्र हा जसा कांहीं सर्व वेदांत सागरानें प्रकाशणारें ज्ञान, हे जेथें श्रीगुरु तेथें असणारें होय. तेथें एकादी श्रुति घेतली तर तेथें महत्त्व हें काय कसचें असें असून नसून तेथें आम्हीच तें असें प्रमाणच एक पुढें होऊन असतें. तेथें सर्व महत्त्व हें नसून एक सहजासहजचें असें, महत्त्वाचें असे नच दिसणारें सहजपण हेंच, तेथीलचा भार हा सहजतेचा करून असणारें होय. त्याचप्रमाणें येथें भास्वान् हा जर उदय घेऊन आला, तेथें दीपच जसा ज्ञानदिव्यतेनें प्रकाशमान झाला तरी पण काय, तें चंद्राचें जसें एकाद्या काजव्याप्रमाणें असणारें, अथवा किंचितही पण महत्त्वास न पावणारें

असें तें चंद्राचें असणें हें काय खद्योताचें–दृष्टीबंधाचें–म्हणावें, कां स्वयंप्रकाशाचें अंगानें असणारें जें अंग तें त्या दीपाच्या ज्ञानापुढें किंवा ज्ञानरूपी दीपापुढें काय कसचें अगदीं नाहींच असें होय, दीप हा महाखोल असा समुद्रतेच्या गंभीरतेनें असलेला–महागंभीर असा. तरीपण तेथें ती खद्योताची प्रभा ही परीघ किंवा वलय होऊन येणारी असतेच ती शब्दानें, मुद्रेनें तशी ती आहे असें होतेंच. भास्वता ही जरी खद्योताच्या उपमेनें तुल्य चंद्राचें असें एक तेवढेंच किंवा तितकेंच, अंगापुरतेंच असें चमचमणें, चंद्रासारखेंच जसें असें असणारें, तें आपलें महत्त्वानें असतेंच असतें म्हणण्यापेक्षां तें उच्चारानें केलें जातें, होतें तसें आहे हें समजतें. ज्ञानसूर्यच जेथें उदय घेऊन आला आहे, तेथें चंद्र हाहीपण जरी खद्योताच्या दीप्तिवत्–य:कश्चित्–असा उपमेनें पाहिला तरी तेथें महत्त्व हें व्यक्तीनें व्यक्ती पाहाणारें होय. जसा तो ज्ञानार्णव हा श्रुतीनेंही पण आम्हीच ते जसे वेद होऊन आहोंत असा एका सहजतेच्या भाराचा. तेथें महत्त्व हें बोलण्यास मुळींच येगारें नसून ज्ञानच एक 'भा' घेऊन आलेलें तें 'स्वन' असें झाल्यानें तेथें आतां अनेक परीघच–चंद्राचें पुरतेपणानें असणें हें–ह्या श्रुतींनीं पुरविले गेले–पुरते केले गेले–तसाच परीघ तो ह्या खद्योताच्या उपमेनें पाहिलेलें जें चंद्रकलेचें संपूर्णत्व प्रकाशमान झालेलें जसें. तेथें उपमा ही कशी पुरती होते–तो सूर्याचा चरण जो भास्वान् तेथें चंद्रच जसा कांहीं खद्युतीच द्योतक होऊन असलेली त्याप्रमाणें आम्हाला श्रुत असणें अथवा आम्ही ज्या श्रुति त्यांना त्या उपमेनें असणें होत आहे–तें पाहाण्यास येतेंच. तसें आम्ही जे कोणी ते त्या पुरतेपणानें स्वतःस पाहविणारे आहोंतच आहोत. आणि म्हणून येथें आम्हांस तेथीलचें महत्त्व हें बरोबरीचें असें असून नसून, हे श्रीगुरुराया हे श्रीआचार्य तें तुमचेंच जय जय असेंच एक नमन–महत्त्व होय. जयजय श्रीगुरो! तुम्हांस माझें नमन असो, तुम्हांस माझें नमन आहे. मी आपणांस नमस्कार करितों–नमस्कार करून मी आहें. असलें तें महत्त्व हें काय महत्त्व असें नसून एक आदरणेंच होय–सत्कारच होय. (१३)

तेथें एकच एकलें असें सहजार्णवाचें, अद्वितीयत्व असल्यानें, आतां दुजेपण हें मोडलेंच म्हणा. व आतां ही वैखरी ही त्या परावाणीमध्यें बुडूनच गेली. आणि म्हणून आतां येथें तुमचें वानणें करणें, हें मुळीं सर्व तुम्हीच झाल्यानें, त्या तशा वानण्याकरतां मी काय कांहींच नसल्यानें, तेथें मी एक कोणी तरी आहें असें म्हणणारे, मजला तोंडच नाहीं म्हणून ह्या तोंडानेंच मुळीं अथवा ह्या वैखरीनेंच मुळीं परेसहित ही एकत्वच पाहिलें–सहज एक असें तें झाल्यानें आतां कोणत्या बरें तोंडानें तें जें तुमचें वानणें तें करूं! वानणें, स्तुति करणें, स्तुतिपाठ करणें हें करण्यास आतां निराळें तोंडच मुळीं नाहीं–वाणी उच्चारास येईना तेथें वैखरी हें मुख होऊन त्या मुखानें परेसही आलिंगन दिलें व तें तुमच्यांतच समरसून गेलें तेथें अद्वितीय-त्वच झालें. (१४)

येथें वानणें अथवा स्तुतिपाठ करणें याजकरितां निराळें तोंड–दुसरेपणानें असणारें तोंडच मुळीं नसल्यानें आतां मजला असेंच वाटत आहे कीं आपणच सर्व कांहीं होऊन आहांत आणि म्हणून येथें आतां दुसरेंपणच मुळीं नसल्यानें एक लिंगतेचें जसें एकी एकच आणि म्हणून नम्रता, विनय ह्यांनीं नमनच एक पत्करिलें–नमन आदरिलें व आपल्या चरणावर माथा ठेविला. येथें सहजच एक भलेपणच लाभलें व त्यानें एका महत्त्वाच्या अशाच एका 'बाप भाग्य कैसें न सरेचि कर्म' न कळेचि वर्म अरे! भाग्य निधीचें होणें करूं आदरिलें. येथें सहजच सेवा अथवा आनंदाचें बीजच जसें पेरून ठेविलें असें भलेपण आपोआपच पदरांत बांधलें गेलें येथें बाः भलें केलें असेंच म्हणणें झालें. (१५)

अशा तुम्हांस हे श्रीगुरुराया! नमो नमो, मी नमस्कार करितों व विनंति करतों की हा जो ग्रंथ उद्यम आहे, ग्रंथ रचनेचा उदीम आहे तो सफल असा होऊन ग्रंथामथूनच ग्रंथ जसा निघावा असा जो

कांहीं एक तेथील व्यवहार हा व्यवहारांनी अनेक अशा तेथें लागणाऱ्या ज्या कांहीं त्या देवतांनींच उचलून धरून तेथें लागणारें सामान हें पुरविण्याचें करावें न कां ! व्यवहार्य होणें हें वेल्हारा होऊनच व्यापार मात्र होऊनच न ठकवितां तेथें लागणारें जें धन तें पुरविलें जावें–गेल्यानें आतां आर्जव हेंच मैत्री घेऊन येत आहे–आलें आहे व त्यांनी ह्या कामास अथवा उद्यमास हातभार लावण्याचें करावें–केलें. आपले थोरपणा-वरच मजला टेकणें आहे तेथें उपयोगानें असणारे अनेक हस्त, अनेक साहित्यें हींच पुरविलीं जाणारीं तीं आपल्या कृपेनेंच होत. अनेक सेवा विधानें हीं येथें आतां पुरतेपणानें यावींत व हें एक व्यवहाराचें उत्तम असेंच अंग असल्यानें तेथें आपणच हे श्रीगुरुराया वेल्हारा व्हावें–मजला भांडवल पुरविणारे व्हा ! माझे सावकार व्हा–याशिवाय दुसरें म्हणणेंच नाहीं. तरच हा जो ग्रंथ मी हातीं घेतला आहे, तो जसा एक उद्यमच उद्यमास प्रसवणारा, उद्यमामधूनच उद्यम उगवणारा ! तेथें फळणें हें जसें महत् भार घेऊन येथील कामकाजास, आडी नडीस, उचलून धरून तेथें फलद्रुपतेचें एक अगोदरचें जें प्रेम, आदर, सर्वस्व, हेंच पुरविल्यानें तेथें सहज फल हेंच वर्तमानाचें सर्वथैव असेंच होऊन आहे. (१६)

आपली कृपा हेंच माझें भांडवल होय. म्हणून आतां कृपारूपी भांडवलाची थैली सोडा, मतीची पोतडी भरा, माझी बुद्धि ही मतिभारांनी जशी कांहीं तेथील पोतडीच भरून आहेत असें तें कांहीं 'पोथीच वाचणें' हें एक त्या पोथींतील अक्षरें ह्या त्या भवाब्धी तरणास लागणारी नौकाच पोत–ज्ञानाचा प्रकाश–होऊन (आली) तिनें येथील उद्यमास तसेंच उदीमास लागणारा जो मतिभार हाच प्रकाशित करावा–केला. तेथें आपलेपणाचा हात हाच पांघरविला जाऊन ह्या माझ्या बुद्धीस एक सर्व डोळ्यांचें असेंच होऊन जावें. पांघरुणाचा तो हात झाल्यानें–मजला आतां आपलेंपण हें येऊं लागलें आहे. मजला ज्ञानाचें जें पद तीच जोड देऊन आपला आश्रय द्यावा. ज्ञानपदानें जसें कांहीं मधुर गीत गाऊं केलें व त्यानें–ज्ञानप्रधान काव्यानें–त्या ज्ञानास एक अपूर्वताच येऊं लागल्यानें आपला आसरा हेंच आपण जो मला आश्रय देत आहांत तेंच माझें थोरपण होय. मजला स्थिरच जसें आपण केलें असें तें आपल्या आश्रयाचें होऊन असावें. मजला स्थिर होण्यामुळें एक जन्मणें अथवा उगवणें हेंच लाभून तेथें थोरपणाचें एक पांघरुणच जसें असें आपल्या आश्रयाचें झालें तेथें नफाच मोठ्याहूनही मोठा त्यानेंच मला जसें संसरणेंच देऊं केलें द्यावें हा शब्द जो आतां हा जन्म झाल्यामुळें आपणांस नमन करीत आहें, साष्टांग प्रणिपातच तो आपणांस करीत आहें. व आपणांस एक थोरपण, जें प्राप्त झालेलें तें आपण आसरा दिला म्हणून, असेंच त्याचें एक नम्र असें सुलीनतेचें होऊन असणें आहे. (१७)

आतां संसरेनतेणें मी संसरण्यानें जन्मासच जसा आलों–जन्मणारा जो मी तो–संसरलेला–संसारच प्रसवला, संसरला जणूं ह्या वाक्सृष्टीचा, तसा मी होऊन ह्या संतांना अंगद–अंग–गद, अनंग दर्पण, मुद्राभार हीं सांग साहित्यें प्रिया–शब्द श्रवण–रूपी भूषणेंच लेववीत आहें—कर्णभूषणेंच त्यांना होऊन आहें. संसरणारा जो मी जीवसृष्टीभार तो ह्या संतांना भूषविणें, राम नाम ध्वनीनें भरून घेणें, श्रवणभूषणेंच शब्दरूपी करीत आहें व त्यामुळें जशीं कांहीं विवेकाचीं चांगलीं अर्थरसभरित जेवढीं म्हणून लक्षणें तींच त्यांना लेववण्याचें करीत आहें काय त्या निर्मित्याची निर्माण कला (जी ह्या देहास जीवन कळा घालते) ती सहज लक्षांत येण्यासारखी मुळींच नाहीं. सत्चिदानंद स्वरूप हें आपआपल्या पदानें दर्शित होणारें असें नाहींच, तें स्वयमेव असेंच आहे ! तेथें जगत् भावच सर्वस्वी अत्यंत सूक्ष्म कणही डोळ्यांत खपणारा होत नाहीं पण हें व्यापक असें जें परमात्मरूप तें कसें बरें डोळ्यांत मावणारें, डोळ्यास सहन होणारें, म्हणून हे श्रीगुरो ! आपण अशा ज्ञानाचा व्यवहार माझ्या ठिकाणीं होणारा मजला साहाय्य व्हावें असें म्हणणें जें तें वेल्हारा होई देवरावा असेंच होय. प्रसन्नतेचा परिणाम हा त्वरितता पाहाणारा असल्यानें तेथें तो जो ज्ञानभार हा ज्ञानास आला तेथें केवळ ज्ञान हेंच ज्ञानाचें स्वरूप झालें, तेथे लेववीन असें म्हणणें म्हणजेच त्वरिततेनें

प्राप्त होणारें, सहजतेस येणारें परिणातमक हें एक लेववी. हेंच वर्तमान भविष्याचें अथवा भविष्य वर्तमान होऊन असल्यानें तेथें संतच तेथीलचे राहस्यतेस–राहस्यिकतेस जाणणारे, तेथीलची गोडी जाणणारे, असे होत. विवेक हा लक्षणाप्रत तेव्हांच येणारा जेव्हां तो सूक्ष्मतेचा होऊन असतो. म्हणून मी जें कांहीं करीत आहें तें म्हणजे विभूषित काया ज्यायोगें तीं भूषणें अथवा लक्षणें हींच संतांना लेवविण्याचें करीत आहें—कर्णभूषणें करण्यानें लक्षणें हीं लेवविलीं गेलीं व आतां तेथीलचा जो परिणाम तोच मुळीं पुढें घेऊन असल्यानें लेववीन हें सहजच झालें. तेथें 'आपण वसोनी अंतरी मज जागवा निर्धारी' असेंच एक आपल्या आश्रयावरच उभें राहाणें असल्यानें तेथें जो भार तो हा आपलाच होय, म्हणून करीन अथवा लेववीन हीं दोन्हीं पदें आपल्याच मोठेपणाचीं होऊन तीं त्या ज्ञानाचें थोरपणच घेऊन आहेत. 'तेणें मी संसरेन व करीन संतांसी कर्णभूषणें' असें हें पद 'मी संसरेनतेणे करी–संसरणारा जो मी तो करी–येथें शब्दावरच सर्व भार टाकला गेला व तोच आपलें गुह्य समजून आहे—करी म्हणजेच करीन हा वर्तमान भविष्य होय. (१८)

संत कर्णभूषणें, सुलक्षणें व विवेक हींच आतां माझीं साधनें होवोत–झाल्यानें त्यांनीं माझे मनांतून ह्या गीतार्थरूपी जे निधानाचें एक पृथक्करणानें पृथक्तेनें यावें अथवा हाती लागणें व्हावें (गीतार्थरूपी गुह्य ठेवा हा माझ्या मनानें काढावाच–जसें कांहीं भूमिगत द्रव्य–मोठा ठेवा सांपडविला गेला–सांपडला असें माझे मनास व्हावें) त्यांनी तेथील जें महत् भाराचें जेवढें तेवढेंच घेण्याचें केलें–करोत व याजसाठीं हे परम गुरो आपलें स्नेहसूत्र हेंच माझे डोळ्यामध्यें घाला–स्नेहरूपी अंजन हेंच मजला त्या सळईनेंच माझे डोळ्यास यावें असें करा अथवा आपलें स्नेह हेंच एक अंजन तेंच आपण प्रसवा, तेंच आपण व्या. हे श्रीगुरू माऊलीये आपलें स्नेह स्निग्ध मृदु असें जें वात्सल्य तेंच आपण पुढें घेऊन माझे डोळयांना एका ज्ञानदृष्टीचें करा. माझें मन हें गीतार्थ निधान काढो. जसें कांहीं पायाळाच्या दृष्टीनें जमिनींतील द्रव्य हें दिसणारें होतें तसें येथें गीतारूपी निधानच जसें तें आपल्या स्नेहरूपी अंजनानें प्रीतिरसायनरूपी अंजनच ह्या डोळयांत घातलें व आतां तो ठेवा हा मजला सहजच सांपडणारा होईल असें करा. माझें मनच मुळीं सर्व ज्ञानदृष्टीच घेऊन आहे असें तें आपण करावें हीच आतां माझी विनंति आहे. (१९)

ही जी सर्व वाक् सृष्टी–शब्दमय सृष्टी आहे ती सर्वच्या सर्व एकदमच माझ्या बुद्धीनें पाहावी असेंच ज्ञान उदय घेऊन हे निर्मळें आपण आतां सर्वकरुणा हीच (ज्ञान) सूर्यबिंब होऊन आली आहे–करुणारूप सूर्यबिंबाचा प्रकाश करा–असें आपण व्हावें जी. (२०)

**माझी प्रज्ञावेली वेल्हाळ। काव्यें होय सुफळ।**
**तो वासंत होय स्नेहाळ। सिरोमणि ॥ २१ ॥**

**प्रमये-महापुरे। हे मतिगंगा ये थोरे।**
**तैसा वरिष उदारे। दिठीवेनी ॥ २२ ॥**

**अगा विश्वैक धामा। तुझा प्रसादु चंद्रमा।**
**करूं मज पूर्णिमा। स्फूर्तीची जी ॥ २३ ॥**

**जी अवलोकिलिया मातें। उन्मेख सागरीं भरितें।**
**वोसंडेल स्फूर्तीतें। रसवृत्तीचे ॥ २४ ॥**

**तंव तोषोनि श्रीगुरूराजें। म्हणितलें विनंती व्याजें।**
**मांडिले देखो दुजें। स्तवन मिसें ॥ २५ ॥**

**हें असो आतां वाजटा। तो ज्ञानार्थ करूनि गोमटा।**
**ग्रंथ दावित्कठा। भोगीं नेदी ॥ २६ ॥**

**हो कां जी स्वामि। हेंचि पहात होतों मी।**
**जें श्रीमुखें म्हणा तुम्हीं। ग्रंथ सांग ॥ २७ ॥**

**परी हें म्यां केलें। कीं हें माझेनि जालें।**
**ऐसें नाहीं ठेविलें। वासने माजी ॥ २८ ॥**

**सहजीं दुर्वेचा हिरू। आंगेचि तव आमरूं।**
**वरी आला पूरू। पीयुषाचा ॥ २९ ॥**

**तरि आतां येणें प्रसादें। विन्यास विद्‌गदें।**
**मूळशास्त्रपदें। वाखाणीन ॥ ३० ॥**

वेल्हाळ=विस्तार पावलेले, आवडती. सुफळ–सफळ. होय–होई. प्रज्ञावेली=बुद्धीरूपी वेली, लता, लतिका, वेल. स्नेहाळ=प्रेमी. सिरोमणि=अग्रस्थानीं, शिरस्थानीं शोभणारें रत्न, मुख्य स्थानीं शोभणारें रत्न, वडीलपणाचें असें (२१). प्रमये–प्रमेय=सिद्धांत. मतिगंगा थोरे=बुद्धिभार मति प्रवाह हा ज्ञान विलासानें असामान्य अशा श्रीगुरो आपण आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव करा. दिठिवेनी–दिठीवेनी=दृष्टीनें (२२). विश्वैक धामा=सर्व विश्व हेंच आपलें स्थान, एक विश्व हेंच आपलें धाम (ठिकाण). प्रसादु=श्रेष्ठ अनुग्रह. प्रसाद–चंद्रमा=श्रीमुखचंद्र, प्रसन्न. चंद्र–चंद्रमा=कापूर, पाणी, सोनें, लाल मोतीं, छत, चांदवा, श्रेष्ठ, आल्हादक वस्तु, मोराच्या पिसावरील डोळा. स्फूर्ति=वृत्ति. पूर्णिमा=अवचितपणें उमलणें, मति विकासरूपी पूर्णचंद्राचें उगवणें. प्रसाद=कृपा, अनुग्रह, शांति, स्वास्थ्य, निर्मलता, सुबोधता, कल्याण (२३). उन्मेख सागरीं भरितें=उन्मेषरूपी विघ्नराजाचे अगाधतेनें भरतीस येणें हें वोसंडेल=कांठोकांठ भरून येईल (स्फूर्तीनें), रसवृत्तीचे=नवरस वृत्ति स्फूर्तीनें भरून राहातील. नवरस= प्रीति, १ शृंगार, २ वीर, ३ करुण, ४ अद्‌भूत, ५ हास्य, ६ रौद्र, ७ भयानक, ८ बीभत्स व ९ शांत. रस=सौंदर्य, सुख, आनंद, शृंगार, प्रीति, पारा, अमृत. रसात्मक=चवदार, रसप्रधान. रसतेजस्=रक्त. रसा=पृथ्वी (रसवीर्यकृत =सोमल). वृत्ति=अस्तित्व, स्थिति, क्रियाचलन वर्तन, वागणूक, व्यवसाय, वर्तनक्रम, जीवनयात्रा, निर्वाह, पोटाचा धंदा, व्यवहार, वेतन, सेवा, परिघ, मनःस्थिति, अवस्था, नाटक, रचना (२४). तोषोनि–संतोषोनी. विनंति व्याजें=विनंतीच्या निमित्तानें. मांडिले=आरंभिले. देखो–देखोनि=पाहा, पाहून. दुजें=दुजेंपण पाहून. स्तवन मिसें–स्तवूं तुवां. श्रीगुरुराजांनी म्हटलें कीं स्तुती करण्याच्या–विनंतीच्या निमित्तानें द्वैतभाव दाखवून दुजेपण आरंभिलेंस कीं (२५). वाजटा=निष्फळ असे शब्द बोलणाऱ्या अगा! ज्ञानार्थ–ज्ञान कर्पुर–ज्ञापनार्थ=जाणण्याचा विषय. गोमटा=सुरेख, चांगला. ग्रंथ=ग्रंथार्थ. दावित्कंठा= दावि उत्कंठा. भंगोनेवी–भोगों नेवी=श्रोत्यांना श्रवण करण्याची उत्कंठाच मुळीं ती नुसती वाट पहाणारी करूं नको तर लवकर ग्रंथार्थ सांगून ती पुरती कर, त्यांचा उल्हास निरुत्साहाचा करूं नकोस (२६). ग्रंथ–ग्रंथु. स्वामि–स्वामी. पाहात–पाहत. तुम्हि–तुम्ही (२७). माजि–माजी (२८). सहजीं–सहजे. (दुर्वेचा) अमृता जी दुर्वा तिचा हिरु–डिरु=अंकुर. आंगेचि–अंगेचि. आमरूं–अमरु=अमर. वरि–वरी. पुरु–पुरु=पूर पियूषाचा. पियुषाचा=अमृताचा (२९). प्रसाद=कृपा, अनुग्रह. विन्यास–विद्‌गदे–विन्यासे विदग्धे= विवेचनपूर्वक, सविस्तर, अर्थप्रतिपादक पद्धतीनें व चातुर्यानें, कलात्मक रीतीनें. वाखाणीन=वर्णन करीम, स्पष्ट करीन. मूळ शाखापदे=मूळ गीताशास्त्राचीं पदें (पद्धती) (३०).

सुजाण अशी जी माझी बुद्धि–प्रज्ञा तिनें काव्यरूपी वेलीच पांघरून ती आवडती झाली—विस्तार पावलेली अशी झाली–जशी का एखादी वेल्हाळाच गर्भवती अशी–जिला मातेचें जें प्रेम त्याचें जें वात्सल्यच त्यानें 'सर्व संपदाच लेइली' अशी–तेथें आतां काव्याचें जें कांहीं प्रबोधन तेंच गर्भ घेऊन आलें आहे असें

व्हावें. वेलीच ती वेल्हाळा झालेली तेव्हां ऋतु वसंत हा जो राजाच सर्व ऋतूंचा त्यानें आपलें स्नेह नाविन्य तसेंच 'नवलावो नवलावो' देखिला गे माये! सारखें प्रामुख्यत्वानें वागविलें जाणारें तेथील महत्त्व हेंच स्नेह दाढर्य नवलाचें झालें असेंच होऊन यावें. हे कुसुमाकरा तूं सर्व उपायाचें जें एक रम्य निवासस्थान तेथीलचा असाच शिरोमणी असा होऊन ये-येच ये. येथें पण्डित म्हटले जाणारे जे ते स्वतःचें असेंच एक निर्माण कळा पाहाणारें असें स्वानंद जीवनच अनेक उपाय शोधून पाहाणारें तेथें हा तर सर्व उपायाचा राजाच म्हणून तेंच आपलें कौशल्य ह्या माझ्या प्रज्ञेस कलेचें करीलच. (२१)

ह्या प्रज्ञेचें जें मतीचें अंग त्यानें जसें कांहीं गंगेचें भरपूर धवलत्व घेऊन ती थोर होऊन आली आहे तसेंच हे श्रीगुरुमाये तुम्हीं आपलें उदारपण हें सर्व दृष्टीच ओतली आहे असें सर्व प्रज्ञेचें एक येणेंच आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव करा-ह्या देहाचें जें करणें तें प्रमाणांनी भरून गेलें आहे. (२२)

अनेक विश्वांनीं आतां ह्या एकाच विश्वास पाहूं लागून तेथील जें श्रीगुरुचें धाम तेथेंच तीं विश्वें विसावलीं-फोवळें कोवळें असें जें ज्ञानतुषाराचें धवलत्व त्यानें तर चंद्रमाच तेथें आला व हा काय प्रसाद नव्हे असेंच विचारूं लागला अशीच जी स्फूर्ति तिनें तर रहस्य बीजच ह्यांत ओतलें व पूर्णिमाच आतां रसपूर्णतेनें ज्ञानरूप होऊन यावी असें प्रार्थणें करीत आहे. मनःप्रसाद हा अति उत्तमतेचा होऊन स्फूर्तीनें पूर्णिमा पाहिली, परिपूर्णत्व तेथें ह्या रसांना असें होऊन यावें. (२३)

मजला अवलोकन केल्याबरोबर तेथें ज्ञानसागराला भरतीच आली आहे असें व्हावें—नवरस हे स्फूर्तीनें भरून वाहातील. (२४)

यावर श्रीगुरु हे संतुष्ट होऊन त्यांनीं म्हटलें कीं, पहा ह्यानें तर विनंतीच्या निमित्तानें दुजेपणच मांडलें आहे. (२५)

आतां येथें व्यर्थ शब्दाचा काथ्याकूट कशास? येथील जाणण्याचा विषय जो कांहीं विज्ञापना घेऊन आला आहे तोच स्पष्ट करून सांग, तोच मोहक असाच ह्या दृष्टीला दिसावा, ह्या ग्रंथाचा अर्थ पुढें करावा व श्रोत्यांची श्रवणाची जी उत्कंठा तिजला आपला विषय ग्रहणास द्यावा. (हें आतां जसें कांहीं एक व्यर्थतेचें बोलणें हें कशास बरें?) तेथील ज्ञानार्थ जो अथवा विज्ञापनच एक ती तेथील विज्ञापना म्हणते तरी काय तें जरासा ह्या मनास सुंदर असेंच दिसावें-कोमलपण त्यांत असावें, मोहनच त्यांत असलेलें तें मनास मोहूनच टाकणारें असें करून सांग. येथें नुसतें उत्कंठितपण हेंच कोठवर बरें भोगून असावें-उत्कंठेचा भंग नको व ती भोगणेंही पण नको, करितां तें ज्ञान सांगण्याचें करावें—विरसविणें नको. (२६)

अहो जी स्वामी मी तरीपण तेंच आपण आपले श्रीमुखानें सांगावें कीं ग्रंथ सांग म्हणून पहात होतों कां आपण स्वामी हें श्रीमुखानें म्हणावें कीं ग्रंथ सांग, स्वामीनीं स्वामिमुखानें-श्रीमुखानें म्हटल्यावर मग ती आज्ञाच जशी-व आज्ञा ही केव्हांही आपलें देवपणच घेऊन असल्यानें तेथें कशाचीही वाण म्हणून नाहीं व हें सांगणें हें केव्हांही-भरास पोहोंचेलच. तें सांगणें तें करवून घेणारच असें निश्चयाचें एक आतां मजला सार्थकताच ह्या ग्रंथानें दिसूं लागली. (२७)

परंतु हें मी केलें, किंवा हें माझ्यामुळें झालें असा अभिमान अभिप्रायच ह्या वासनेमध्यें उरूं दिला नाहीं, वासनेचें जें एक महत्त्वानें असणें तें सहजप्रियतेचें असेंच होऊन असल्यानें तेथें मजला मी आठवतच नाहीं किंवा माझ्यामुळेंच ती प्रेमार्द्रता पुढें झाली हेंही पण मान महत्त्वास येऊं दिलें नाहीं.

तेथें सहजत्वच एक ह्या दुर्वेचें अलंकारणें जसें मुद्रा शृंगार किंवा हार पुष्पादिनी सुशोभित केलें जाणारें असें सहजत्वच तेथें ह्या दुर्वेनें अलंकृत झालेलें तें सहज पूजनीयत्वच शोभून आलें-तेथील अंकर

हा अंकूच एक अलंकारलेला ह्या दुर्वेनें तेथें अमर देवच जसा अमरत्व पाहून अमरपणानें अमर झाला तेथें प्रकृति लयत्व हें अलंकारिलें गेलें तें सहजच दुर्वेचें झालें व तेथील मूल दिव्य हेंच पुढें आलें व काय तेथें वर्षावच जसा पीयूष धारेचा–पूर्वसुकृताच्या राशीच उगवल्या व त्यांनी सर्व पीयूष धारा हीच पूर होऊन आली. (२८)

जसें कांहीं सिंहाच्या नाकामधील केंस घेऊन त्यावरच अमृत हें सांपडणारें होतें असें जें कांहीं ह्या वृत्तीचें, मनोवृत्तीचें मंडण–अमरपण म्हणजे नेहमींच आहे तरुणपण ज्याचें असें एक अमर दर्शनच तेथें जरा जीर्णता ही नाहींच व याहीवर जर पीयूषाचा पूरच आला तर मग काय बहारच आली, फळाफुलांनीं बहरलेलें असेंच हें स्फूर्तीचें होणें.

अंक हा अंकूर घेऊन आला. त्यानें देहाचें अलंकारणें केलें–बाळसें सर्वांग सुंदर असें मनहरण करणें, मनोरम्य, वृत्तिरम्य, हास्यरम्य असें–तेथें त्वरित असेंच तें अमर म्हणजे नाममहत्त्वानें त्वरितता पावलें व आतां पीयूषभार हाच आपल्या आपणच आपलेपणास आला.

काय ह्या मौक्तिकाचा लवलवां असा चित्त प्रसाद तेथें जावळ हेंच निळेपणाचें कुंतल भार ह्यांनी तर दूरच असणारें असें तें दुर्वा अमृता भर पाहून ती यष्टी इतकी लवणारी झाली कीं तेथें तरुणपणच ह्या निर्जराचें झालें व तें अमरपण नामानें घेऊन आल्यानें तेथें अष्टांग योग हाच सर्व स्फूर्तीच देणारा झाला व त्यानें पीयूषधारा हीच ओतली तेव्हां आतां काय पाहावें तो सर्व प्रसादच! कापुराचें जसें सुवासणें, अग्निमय (म्हणजे तेजोमय) व सहज शुभ्र असें तें ज्ञान कलेचें येणें हें एक प्रसादन चित्ताचें झालें. (२९)

विन्यस्त पदानें तेथील सगद्गद हें विद्गद असें होऊन त्यानें मुळांतून उगवणें केलें व आतां प्रीति पदें जीं ह्या शास्त्रांनीं आपलीं म्हटलेलीं आहेत तीं स्पष्ट करून त्यांना आदरास घेऊन सांगण्याचें करीन. (३०)

**परी जीवां आंतुलीकडे। जैसी सदेहाचि डोणी बुडे।**
**ना श्रवणीं तरि चाडे। वाड दिसे॥ ३१॥**

**तैसी बोली माझी साचारी। अवतरो माझी माधुरी।**
**माले मागोनि घरीं। श्रीगुरुकृपेचें॥ ३२॥**

**तरी मागां त्रयोदशीं। अध्यायीं गोष्टी ऐसी।**
**श्रीकृष्ण अर्जुनेसीं। चावळले॥ ३३॥**

**जें क्षेत्रक्षेत्रज्ञ योगें। होईजे येणें जगें।**
**आत्मा गुण संगें। संसारिया॥ ३४॥**

**आणि हाची प्रकृति गतू। सुख दुःख भोगी हेतू।**
**अथवा गुणातीतू। केवळ हा॥ ३५॥**

**तरी कैसा पां असंगा संग। कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञायोग।**
**सुख दुःखादि भोग। कैंवी तयां॥ ३६॥**

**गुण ते कैसे किती। बांधती कवणिये रिती।**
**नातरी गुणातीतीं। चिन्हें कार्यीं॥ ३७॥**

**एवं यया आघवेयां। अर्थां रूप करावया।**
**विषो एथ चौदाविया। अध्यायासीं॥ ३८॥**

**तरि तो आतां ऐसा। प्रस्तुत परियेसा।**
**अभिप्रावो विश्वेशा। वैकुंठाचा॥ ३९॥**

डोणी=नांव. चाड=आवड. वाड दिसे=वाढी दिसे, वाढ दिसे. आंतुलिकडे (अवधानानें) ह्या जीवदशेचें नटनाट्य तेथें संदेहच सर्व एक, चित्तांतील सर्व संशय नष्ट होतील (डोणि बुडे) अथवा श्रवणाची आवड चाड दुणावेल (३१). बोली=बोलण्यानें. साचार=यथार्थतेनें. अवतरो=प्रकट करो. मधुरि–(बुद्धिप्रभाव, भावलक्ष्मि). माधुरी=वाणीचें ऐश्वर्य, ऐश्वर्याची वाणी, मधुर वाणी, गोडी [मधुत्रय=साखर, मध, तूप. मधुमाधव=लक्ष्मि. मधुर=मधुवणी, गोड, मोहक, प्रिय, रम्य. मधुरिमन्=माधुर्य (मृदु रसाळ उत्तरे मधुरे संतच ते)]. मागोनि–मागुनि. माळे=भिक्षा, श्रीगुरु कृपेची धरी. माळे मागोनि=खंडोबाचें माळें मागणें म्हणजे गळ्यांत नांगर घालून भिक्षा मागणें (३२). आध्यायि–अध्यायी. चावळले=बोलले (३३). प्रकृति गतू=मायोपाधिक (प्रकृति=पंचमहाभूतें, मन, बुद्धि व अहंकार हीं मूलतत्वें). ओगि–भोगी. हेतु भोगित हेतु=कारण. केवळ–केवळु (३५). तरि–तै (३६). कवणिये–कवणें. गुणातीतीं–गुणातिति. चिन्ह कायें–चिन्हे काई (कायी) (३७). येवं–एवं. येवा–इया. अर्था रूप करावया विषो=अर्थाचें व्यक्तिरूपाचें वर्णन करण्यास विषय. आध्यायासि–अध्यायासि (३८). परियसा–परियेसा=ऐकावा. अभिप्राय–अभिप्रावो =प्रीतिहेतु, प्रिया हेतु, सुरम्यतेचा हेतु, प्रियकर कां प्रियापणाचा प्रीति हेतु तो कसा तें ऐक. वैकुंठाचा–वैकुंठाचिया–वैकुंठीचिया [ इताः गतः श्लोक १=ह्या जगांतून, हें ज्ञान जाणलें म्हणून इतस् इतः (इदम्) ह्या येथून, ह्या जगांतून, संसारांतून, जन्ममरणांतून. सिद्धिंगतः=सिद्धिरूप झाले] (३९).

मूळ माया जी ह्या ब्रह्मांडाची स्वामिनी आहे–तिनेंच जसें आपलें रहस्य बोलूं आदरिलें असें झालें तेव्हां ती जी क्रिया सिद्धी देणारीं जीं पाउलें–पदें तीं आतां शास्त्रशुद्ध दृष्टीनें सांगण्याचें करितों. (३१)

हा जीव जो आहे तो संदेहच वागविणारा असा असल्यानें ती संदेहाची जी भरोवरी ही निःसंदेहानें–निःसंदेह होऊन आल्यानें तेथें सर्व विश्वास हाच प्रस्थापिततेचा झाला व आतां ती संदेहाची जी एक डोहाची डोहणीच बुडविणें करणारी–आवर्तात फसविणारी तीच आतां बुडून गेली–ती आवर्तरूपी डोणीच बुडून गेल्यामुळें–नाहिंशी झाल्यामुळें सर्व संदेह मावळला व त्यास निश्चिततेचें रूप आलें, निश्चित निश्चयच झाला त्याचप्रमाणें ऐकणारें ऐकणें, त्यानें चाडपण घेतल्यानें जसें तें वोहटीचें होणारें तें आतां वरील संदेहाच्या नाहिंसें होण्यानें तेंहीपण आपलें श्रवण लक्षण हें यथार्थतेचें करून आहे. म्हणून येथें श्रवण हें एक सौंदर्यास पाहूं लागल्यानें तेथें निश्चितपण हेंच या वाणीरम्यतेचें प्रेमभावरूप जिंकून आहे, प्रेमभार हाच सर्वभार होऊन आला आहे.

म्हणून आतां श्रीगुरुकृपा हीच एक भिक्षा मागणें होय त्या कृपेनेंच माझी वाणी ही परम मधुर असेंच बोलणें करील–माझी बोली ही मधुरत्व जेवढें म्हणून आहे त्याचें एक अवतरणच झालें–तें जसें कांहीं स्वर्गातूनच खालीं उतरलें आहे असें मधुर मधुर अशी माधुरी ह्या जिव्हेस आली—मधुरता ही ह्या जिव्हेस प्राप्त होवो, असें तें श्रीगुरुकृपारूपी माळे मागणें असून–श्रीगुरुकृपेच्या घरीं हेंच एक मी मागणें मागीत आहें कीं हे परम श्रीगुरो मजला हीच ज्ञानभिक्षा द्यावी–घालावी कीं माझी बोली सर्व मधुरतेचें अवतरणच घेऊन आली आहे. जेवढी म्हणून मधुरता आहे ती सर्वेच्या सर्व ह्या माझ्या बोलीमध्यें बसावी –बोली ही सर्व धुरतेची माधुरी होऊन आली–आहे–ती परम साचारतेची एक सर्व योग्यता घेऊन आली आहे व हीच ती श्रीगुरुकृपा होय. परम रमणीय असेंच स्थिरत्व सुस्थिर असेंच ह्या प्राणांनीं होऊन तेथें ह्या बोलीस परम रसाचें एक नाविन्य मधुर असेंच होऊन आलें आहे.

मौक्तिकें हीं परम रमणीय खरीं तरीपण तेथें तीं ज्या एका मुळावर उभारलीं गेलेलीं–जीवितास आलेलीं अशीं काळेपणाचीं जीं तींच मुळीं ह्या दृष्टीचें एक सुख सौभाग्य असल्यानें तीच कुठें कशीं सांपडणारीं–जेथें ह्या देहाचें स्थिर स्थिरत्व देह समर्थन हेंच जोडून घेत असलेलें तेंच सर्व मूळ असल्यानें तें एकट्या त्या श्रीगुरूच्या कृपेनेंच पावणारें, मिळणारें असल्यानें तेथें ज्ञानभिक्षा हीच महत्त्व, जाड्य, व देह

धारण जीव प्रेमाची गोडी ही बोलणारी, प्रेम हेंच जीवित्वास आलेलें तें ह्या जडण्यानें जडणें सांधून घेतलें आहे. असें एक मातीचें असेंच म्हटलें जाणारें तें सौंदर्य तर पाहिलेंच पाहिजे व तेंच भिक्षा मागणें असून नव्हे–तें भिक्षा मागणें नव्हे. तें एक सर्व प्रेम प्रेमास यावें, प्रेम प्रेमाचें व्हावें, आपलेपणाचें व्हावें असें निष्ठतेचें एक परम रमणीय ध्यान तें श्रीगुरूंनी वास्तव्यास आणिलेलें असून तेंच त्यांना आपल्या घरचें–शरण शरण असें जसें कांहीं अग्निशरण म्हणणारें एक योग समर्थन–योगाग्नि समर्थन तें ह्या वाचेचें जसें एक मुळांत मिळणारें असें जीवित चैतन्यानें त्याचें अश्रित होऊन–जीवित हें सर्वथैव ह्या श्रीगुरूंना सर्व शरण असेंच म्हणणारें असल्यानें तेथें काय ती भिक्षा म्हणावी !! नव्हे ! तें एक प्रेमच कृतीस आलें ! प्रेमाचें झालें ! प्रेमांत बसलें ! असें सहजस्थितित्व ज्यास सुंदर असेंच म्हटलें जाणारें ! तेथें त्यास भिक्षा म्हटलें नसून तें एक प्रेमच ! सर्वांगसुंदर असें रमणीयत्व ह्या प्रेमास पाहूं यावें असेंच श्रीगुरूंच्या गृहाचें–आश्रयाचें–पाउलांचें दर्शनाचें सौख्यच सुखास आलें, कर्तव्यनिष्ठ झालें, तेथेंच रमूं लागलें येथें काय तें जें कर्तव्यानें कृतीचें होणें तें काय लिहून भागणारें मुळींच नव्हे तेथें जसें कांहीं धीटपणच त्या षडंघ्रीनें घेतलेलें त्या फुलांतील मधुर रस चाखण्याकरितां असें तें असून तेथें एक प्रेमसर्वस्व असेंच तें होऊन असलेलें !! म्हणून येथें कशाही तऱ्हेनें तें लिहिण्याचें केलें तरी तें तेथपर्यंत पोहोंचूं शकतच नाहीं–जर त्यास शरण गृहाचा आसरा नाहीं–जर तेथें आपलेपणाचा बाणा नव्हे–श्रीगुरुकृपादृष्टि ही तेथें पोहोंचली नाहीं तर ! म्हणून हे परम श्रीगुरो तुम्ही मजला ह्या जीवत्व चैतन्यास ह्या मजमध्यें वास्तव्य करणारे जें कांहीं जीव धारण त्यास आपलेसें करा–त्याम प्रेमाचें करा, त्यास आश्रयास घ्या–आश्रय द्या–ते सर्वथैव शरण शरण असें एक गृहच मागणारे असल्यानें तेथें आपण उदार अंतःकरणानें आपले प्रेमाचें असें ह्यांस करावेंच करावें–तेथें शरण असेंच म्हणणें होत आहे–ह्या जीव दशेची जी अंतःस्थिति ती काय बोलण्यानें, लिहिण्यानें किंवा दुसऱ्या कशानेंही ती आपले खरेपणास पाहूं मुळीं देत नसल्यानें तेथें मौल्य हेंच एक परम स्थान पाहून आहे–व अंतर रंगांतील जें एक परम सुंदर असें अक्षरच जीव दशेनें घडलेलें सहज माधुर्य तेथील मधुरता ही आपणच आपल्या आश्रयाची करून जेव्हां त्यांत बसाल तेव्हां तेथें कृतीही परम कर्तव्याचें जसें पूजनच झालें, संभावणें केलें–भक्ति बीजच पेरलें असें एक अंग असल्यानें तेथें शरण असेंच एक बोलणें जें सर्व दृष्टिरम्य अहो डोळ्याचें निवणेंच समाधान सर्व सुंदरता घेऊन आलें असें होऊन असणारें आहे–म्हणून आपण हे श्रीगुरो हें जें माझें मागणें की आपली कृपा ही मजवर असावी व त्या कृपेचें सर्वथैव मी व्हावें असें एक स्थान किंवा स्थळ ह्या माझ्या मनानें पाहिलें असें आहे. तेथें कृपारूपी पीयूषधारा हीच आपल्या प्रेमपान्ह्याचा पूर घेऊन यावी अशी आपली कृपा मजवर व्हावी असेंच श्रीगुरुकृपारूपी अमृताचें मागणें होय. तेथें माझी बोली, बोलणें, प्रेम लक्षण हें जसें कांहीं स्वर्गामधून अवतरण घेऊन आलें असें देवलोकचें एक पुष्प जसें आपल्या चरणीं वाहिलें असें व्हावें–मग तेथील जिव्हेचा जो मधुररस हा इतर सर्व रसांना पोषक असल्यानें तेथें ह्या जिव्हेस माधुरी असेंच म्हटलें गेलें काय ती सरस्वती नव्हे ! प्रेम नव्हे ! प्रेम मार्दव नव्हे ! प्रेम आर्द्र नव्हे ! प्रेमच शोभणारें नव्हे ! प्रेमच प्रेमास आलें असें नव्हे ? तेथें प्रेमच एक माधुरीचें झालें असल्यानें दुसरें कोणतेंही तेथें पुरतेपण–पुर्तेपणच पाहात नाहींत ! तेथें 'माधुरी' हीच जशी मधुव्रत लोचनाची झाली–लोचन हें 'सर्व मधुर' असें होऊन आलें. (३२)

श्रीगुरुकृपा अवतीर्णच झाली असें माहात्म्य पुढें येऊन असावें व तिनेंच जशी कांहीं ही ज्ञान-भिक्षाच, ज्ञानशिक्षाच 'अथ शिक्षां प्रवक्ष्यामि' असें एक जें ज्ञानदानाचें अंग तेंच उगवूं लागून त्यानेंच हें उचलून धरिलेलें बरें !!! श्रीगुरुकृपेच्या आधारानें हें चालणें चालत असावें असेंच एक सहज सौम्याचें तें वळलेलें असलेंच असावें !!

आतां येथून पुढें जो प्रसंग तो म्हणजे जो कांहीं एक मागील अध्यायीं बोलिलेली जी गोष्ट ती म्हणजे श्रीकृष्णार्जुनाचा संवाद हाच एक गोष्टच होऊन असलेली–कानगोष्टच बोलिलेली अथवा एक बुद्धिवाद हाच मतीनें घेतलेले जे कांहीं एक स्वभावाचें महत्त्व तें गोष्टरूपाचें असें बुद्धीनें पाहाणें तेथेंच मति ही पण स्थिरतेची कशी होणारी हेंही पाहिलेलें असणारच। तेव्हां तें जें त्यांचें जसें एक स्वप्नसृष्टीचें चावळणेंच–कोण बोलतो आहे कोण जाणें! असें सहज लक्षांत नच येण्यासारखें व एक नेहमीं आश्चर्याचें अंगच पुढें होऊन आलेलें किंवा तसें तें आहे अशीच एक समजूत प्रत्येकाची। तेव्हां येथें तें चावळणें जें तें कोणी हिताची बुद्धि समजतो। कोणी देवता ऐक्य म्हणतो। कोणी कांहीं स्वभावाचें एकीकरण ज्यायोगें होईल अशी क्रिया सांगितली असें म्हणतो। कोणी तर तें सर्व चिंताच आतां दूर झाली असें लेखतो। असे अनेकांचे अनेक रंग ह्या बुद्धीनें उचलिते झाल्यानें जो तो आपआपल्या वृत्तीनुरूप त्यास रंग चढवीत असणारा होतो. (३३)

कीं जें कांहीं ह्या विश्वाचें, जगाचें जगतास येणें, जीवित्वास येणें, विश्वाचें वरतीं येणें तें म्हणजे एका शब्दाचें जसें महत्तत्त्वाशीं मिसळून चालणेंच होत आहे असें असणारें व त्यानें असेंच भासमान होणारें कीं आत्मा जो आहे। विश्व 'भा' जी आहे ती विकास घेऊन येणारी–प्रकाशच जसा ह्या उच्चारानें उचल दिला गेला किंवा तो अंकुचित केला–किंवा तो उच्चार हा जसा जसा गुण धनुष्याचा टणत्कारच जसा तसा होऊन तेथें तें जें टणत्कारणें तें कसलें कोण जाणें–येथें गुणाप्रमाणें त्याचें त्या शब्दाचें उच्चारणें होत असल्यानें तेथें काय ह्या गुणांना एकदोन शब्दांत आपल्या गुणगुणितत्तत्वास येणेंच जसें करणें तें सहज असें होणेंच नाहीं–तेथें गुणाचें चालणें हेंच अनेक भार घेऊन असल्यानें तेथें वेळप्रसंग ज्याच्याशीं बोलणें होत असणारें तोच मुळीं ज्या तत्त्वावर स्थिर झालेला त्यानेंच जसा एक गुण लाविला असें होत असणारें असून तेथें–जरासा थांवून, दम घेऊन, आपल्या वृत्तीवर येऊन जर–आपला स्वभाव अगोदर स्थिर करून पाहाण्याचें केलें तर मात्र तेथें गुणत्व हें आपल्या स्थिरत्वानें दुसऱ्या व्यक्तीशीं समेट करून असणारें होतें. परंतु जर कां स्वतःची वृत्ति ही भरमसाट किंवा अलक्षाची तर मात्र तें गुण लावलेलें (बोलणारें) बोलणें हें कुठें फेंकतें तें कांहीं सहज समजणारें नव्हेच! तेथें स्वतःचा भाव–स्वभावभार हा कसा लांबविला जाणारा होतो तें कांहींच लक्षांत येणारें नव्हे! व असेंच जर चालणें होत राहिलें तर दिवसाचे दिवस गेले तर आपल्या वृत्तीवर येणें ह्या मनुष्यांस होणेंच नाहीं–तेथें वृत्ति हीच हरवली असें होऊन असल्यानें–तेथें स्वभाव म्हणजे काय! किंवा पुरुष लक्षण हें कुणाचें असावें! असेंच ह्या मनानें घेतलेलें एक वृत्तिशून्य लक्षण हें काय 'दुसराच कोणी एक सर्व' महत्त्व घेऊन असलेला असून तेथें स्वतःचें मग पुरुष लक्षण हें कोणत्या गांवीं गेलें हें समजत नाहीं. येथें संसरणें हें प्राणवायूनें जसें गळून जाणें विकलत्व असून तेथें प्राण हाच मुळीं दुसऱ्या वायूंना एक आपणच प्राण आहोंत असें वाटविणारें लक्षण हें त्या अपानादि वायूंना आपला भार देणारा होतो. तेथें व्यान अपानादि वायूच मुळीं हंसूं लागले कीं आपणच मुळीं खरे प्राण आहोंत–जीव कीं प्राण–हें जीवित धारण हें त्या प्राणाचें नसून आमचें आहे व तो जो प्राण म्हणून म्हटला जाणारा तो म्हणजे कोणीतरी एक आमच्यावर अधिकारच आपल्याच बळें करून चालविणारा असल्यानें तो आतां कांहीं मुळींच दिसणारा नच झाल्यानें ह्या इतर वायूंना मुळीं एक स्फुरणच चढलें व आतां व्यान उदानादिनी आपणच खरे प्राण लक्षणाचे आहोंत व आपलेंच हें विश्व आहे असें भासवून घेऊन तेथेंच शून्यत्वाचें आहे असें जसें अंग दिलें गेल्यानें ह्या मनाची, बुद्धीची किंवा वृत्तीची जी काय त्रेधा ती काय विचारावी बरें! गुणच आत्म्यास लागला व त्यानें प्राणाचें संसरणें हें सर्व कांहीं एक कोठीलचा तरी संसार हाच पुढें होऊन त्यानें आतां गुण हा जसा कांहीं व्याख्याच दिला गेला! गुण गुण म्हणजे काय! गुणगुणणें, गुणगणित, गुणानुवाद, आत्मगुण, गुणला गेला आहे आत्मा असें अनेक तऱ्हांनी तेथील आत्मा–किंवा गुण किंवा संसरण हेंच जसें उघड करून सांगणारें होतें. गुणाची व्याख्याच दिली व शब्द संसरण हें म्हणजे ह्या देहास पाहाणारें तें कुठें बरें

परिणाम करीत असावें असें एक पाहाणें ह्या बुद्धीच्या डोळ्यांना कदाचित् दाखविणारें होतें. येथें एकच गोष्ट ही महत्त्वाची ती म्हणजे विराग किंवा समता ही जर महत्त्वानें असेल तरच तें फार दूर नच जाऊं दिलें जाऊन, लवकरच ह्या स्वभावास सांपडणारें होतें. येथें लज्जाच मुळीं आपलें अंग पाहूं लागल्यानें तेथें ती ह्या मनुष्यांस आपल्या स्वभावाची महती ही पाहून असावें असें म्हणूं लागणारी होते.

हें विश्व जें वर आलें आहे, जन्मलें आहे, हा देह जो जन्मला आहे, तो ह्या क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगाचा परिणामच एक! व आतां, येथें ही भूतात्मक जी प्रकृति, तिनें जसें कांहीं एका सोक्षमोक्षासच पाहिलें असें होय. आतां आत्मा म्हणून जो, तो ह्या भूतसृष्टीचा भारच एक आपलेपणास आलेला, जीवित्वाचा झालेला असा असल्यानें, तेथें तोच ह्या विश्वाचा अभिमानी होऊन, तो गुण लागेल तसाच, जणूं उचल घेऊन, ह्या देहाचा अथवा विश्वाचा अभिमान बाळगणारा होतो. येथें संसारिया, म्हणजे जसें कांहीं, ते ते गुण लागणें, हेंच वाणीनें उचल दिलें जाऊन श्वासोच्छ्वासरूपी जो श्वसनभार हाच त्या त्या गुणाचा, प्रकृतिधर्माचा, अथवा गुणासच गुण लावणारा होऊन तेथें संसरणें हें होऊन असतें. कर्म विपाका प्रमाणेंच तेथें अनंत असें वैचित्र्यच एक जें तेंच जसें गुण म्हटविलें गेलें तेथें लक्ष्य हें त्याच्या कर्माचें एक निराकारणेंच जसें, किंवा आकाराचें जसें, तसें होऊन असल्यानें तेथें काय मग त्या आत्म्यास संसारिया तरी म्हणावें कसें? किंवा तो अभिमानी असा असल्यानें तेथें अक्षराचें किंवा बोलानें बोललेलें जें बोलणें, परिणाम करणारें अथवा वागणारें, अथवा परिणाम करवून घेणारें असें एक (आ) प्रकृतीचें दीनत्व म्हणावें कां नाहीं तें, त्या अध्यात्म-ज्ञानानेंच सोडविलें जाऊन तेथें एकादा पर आत्मा जसा एक परमतेचा श्वास भार घेऊन असलेला व त्यानेंच जर आपलें सगुणत्व–गुणत्व ह्या अशा कर्म वैचित्र्यावर चढविलें तरच तें आपल्या यथाधर्मास पाहूं लागणारें होतें. येथें दुसरीकडूनच तेथीलचीं जीं आयतींच झेंपलेलीं अंगें हींच त्या अशा विचित्रतेच्या कर्मभारानें जखडलेल्या आत्म्यास आपल्या योग्यतेस आणणारें होतें आणि येथें तर ती एक ज्ञानसीमाच जशी दान अथवा कृपारूपी असून तेथें सहजच मग गुरुपण हें उगवलेलें! तें काय बोलून दाखविलें जाणारें नव्हेच नव्हे! (३४)

ह्याच श्रीगुरुसामर्थ्यानें तो आत्मा आतां प्रकृतीचा झाला, कां भोगहेतूचा झाला, कां गुणातीत झाला, असा एक पर निर्णयच (पर तत्त्वानें केलेला निर्णय) पाहाण्यास मिळतो. (३५)

गुणाच्या संगानें असणें, अथवा त्या अतीत असणें हें कसें असतें बरें! क्षेत्र व क्षेत्रज्ञ योग जो तो कसा असतो किंवा तो म्हणजे काय असतो तें आतां सांगण्याचे करूं. सुख व दुःख म्हणून जें असतें, तेथें सुख म्हणजे तरी काय, किंवा दुःख तें कसलें असतें, याचा आतां विचार करण्याचें करूं. (३६)

गुण ते कसे असतात, ते कशा प्रकारानें बांधतात, अथवा त्या गुणापासून मुक्तता जी मिळणारी होते ती कशा प्रकारची असते, तें आतां सांगण्याचें करूं. (३७)

येथे जो कांहीं अर्थ पिकणारा, त्यास रूपरंग रेखा ती ज्या योगें येईल तशा तऱ्हेनें तें सर्व व्यव-स्थितपणें सांगण्याचें करितों. ह्या चौदाव्या अध्यायाचा विषय म्हणजेच जसें कांहीं एकरूपच रूपास आणिलें. तेथील अर्थ हा पुरुष प्रकाराच्या योगें योग्यतेचा होऊन आपल्यास पाहील असेंच एक सांगणें करण्याचें करूं. (३८)

तरी, तोच त्या श्रीवैकुंठाधिपतीचा हेतु किंवा अभिप्राय हाच आपल्या प्रियपणास येऊन तें सांगण्याचें करील तो प्रसंग ऐकावा. (३९)

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।**
**यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितोगताः ॥ १ ॥**

॥ भक्ति सिद्धि देणारें तें उत्तम ज्ञान ॥

ज्ञानानां उत्तमं ज्ञानं=(श्रेष्ठ असा पुरुष अर्थ साधणारे जे ते) ज्ञानामधीलहि उत्तम असें ज्ञान. यत् ज्ञात्वा=जें जाणल्यानें. परं=पलिकडचें, परलोकीचें, परमार्थाचें असें. भूयं=पूर्वीं सांगितलें आहे तरी पुन्हां, आणिक एकदां. प्रवक्ष्यामि=शिक्षां प्रवक्ष्यामि=तेथीलची शिकवण–छंद स्पष्टपणें सांगतों. सर्वे मुनयः=सर्व मुनि (ऋषि, मुनि, सिद्ध साधक अपार असें जें तेथें मुनि जे ते सिद्ध प्रज्ञतेस आल्यानें ते मुनि म्हणजे ज्ञानी म्हटले गेले). इतः परां सिद्धिं गताः=जे ज्ञान जाणलें म्हणून, प्राप्त करून घेतलें म्हणून ते ह्या जगांतून जन्ममरणांतून–संसारांतून–जन्ममरण संसारांतून–जगामधील मायोपाधि तरून जाऊन सिद्धिरूप झाले. ज्ञानामधील ही उत्तम भक्ति जी ज्ञानोत्तर पराभक्ति त्या भक्तीची सिद्धि त्यांना मिळाली–सिद्धीला–मोक्षाला पावले आहेत.

अन्वय—ज्ञानानां परं उत्तमं-उत्तमं परं–ज्ञानम् । भूयः । प्रवक्ष्यामि । यत् सर्वे मुनयः इतः ज्ञात्वा । परां सिद्धिं (इतः) गताः ।

(शिक्षा छंदादि जे कांहीं एक ह्या मायेस उचलण्यास, किंवा धर्माचार्यांची जी कांहीं योजना, ह्या प्रियपणास पाहाणारी होते, ती कशी असेल बरें ! तें आतां पाहूं.)

सर्व ज्ञानामध्यें अत्यंत उत्तम व जें परमात्म साधनाचें श्रेष्ठ ज्ञान तें पुन्हः पूर्वीं अनेकदां सांगितलें तरी, आणखी एकदां तुला स्पष्टपणें येथें सांगतों. जें ज्ञान जाणून म्हणजे प्राप्त करून घेतल्यानें सर्व ज्ञानी ह्या जन्ममरण संसारांतून श्रेष्ठ सिद्धीला–मोक्षाला गेले आहेत. (१)

**तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना ।**
**मेळवुनी यया ज्ञाना । झोंबावें हो ॥ ४० ॥**
**आम्हीं मागां तुज बहुतीं । दाविलें हे उपपत्ती ।**
**परि अजुनि प्रतिती । कुसी न निघे ॥ ४१ ॥**
**म्हणौनि गा पुढती । सांगिजैल प्रतिपत्ती ।**
**पर म्हणम्हणो श्रुति । डाहारिलें जें ॥ ४२ ॥**
**येऱ्हवीं ज्ञान हें आपलें । परि पर ऐसेनि जालें ।**
**जें आवडोनि घेतलें । भव स्वर्गादिक ॥ ४३ ॥**
**अगा याची कारणें । हें उत्तम सर्वांपरी मी म्हणे ।**
**जे वन्हि हें, तृणें । येरें ज्ञानें ॥ ४४ ॥**
**जियें भव स्वर्गातें जाणती । यागचि चांग म्हणती ।**
**पारखी फुडी आथी । भेदी जया ॥ ४५ ॥**
**तियें आघवीची ज्ञानें । केली येणें स्वप्नें ।**
**जैशा वातोर्मी गगनें । गिळिजेत अंती ॥ ४६ ॥**
**कां उदितें रश्मिराजें । लोपिली चंद्रादि तेजें ।**
**नाना प्रळयांबु माजे । नदीनद ॥ ४७ ॥**

तैसें हें येणें पाहालेयां । ज्ञानजात जायलयां ।
म्हणोनि धनंजया । उत्तम हें ॥ ४८ ॥

अनादि जे मुक्तता । आपली असे जे पाण्डुसुता ।
तो मोक्ष हातां येतां । होये जेणें ॥ ४९ ॥

जयाचिया प्रतिती । विचार वीरी समस्तीं ।
नेदिजेचि संसृति । माथां उधऊं ॥ ५० ॥

मनें मन घालूनि मागें । विश्रांति जालेया आंगें ।
ते देही देहाजोगें । होतीचिना ॥ ५१ ॥

मग तें देहाचें बेलें । वोलांडूनि येकेचि वेळे ।
संवतुकीं कांटाळे । माझें जाले ॥ ५२ ॥

यया–इया. झोंबावें–लगटावें (४०). बहुतीं–बहुत प्रकारें. दाविलें–दाविली. उपपत्ति=युक्ति. परि–तरी. आज्ञुणि–अझुनि. प्रतीती कुसी न निघे–प्रतीती कुशी न रिघे=प्रतीती पोटीं दिसत नाहीं, पोटांत कांहीं ते अनुभव अद्याप शिरत नाहींत (४१). पुढति–पुढती=पुन्हा पुन्हा. प्रतिपत्ति–प्रतीती–तुजप्रती= मार्ग शोधून. परि–पर=सर्वाहून निराळें. म्हण म्हणो–म्हण म्हणोनि–म्हण म्हणोन=म्हणणेंच म्हणून– म्हणणेंच करून. श्रुति–श्रुती=वेद. डाहारिलें=वाखाणिलें, प्रसिद्ध केलें, वर्णिलें (४२). ये्हवि–एरव्हीं– येरवीं. आपलें–आपुलें. पर=पलीकडचें (इंद्रियाच्या अफाटपणाचें). आवडोनि घेतलें भव स्वर्गादिक= (मनाचा लावण्य बाणा वेधी वेधक तूं सहज गुणा) संसार व स्वर्गलोक आवडून घेतल्यामुळें, संसरण्यानें स्वर्ग हा आवडता, नेहमींचा (४३). सर्वोपरि–सर्वापरि. जे वन्हि हे, येरें ज्ञानें तृणें=हें ज्ञान अग्निरूप असून इतर ज्ञानें यापुढें तृणप्राय आहेत (४४). जी ये–जिये. याग=पूजा, पूजन, उपाधि. पारखि फुडी आथी भेदी जया=द्वैतामध्यें, भेद ज्ञानांत भेदांमध्यें अनोळख भेदण्यानें ज्ञान हें खरेपणास येतें (४५). वातोर्मी=वायूच्या लहरी. गिळिजेत–गिळिजति (४६). रश्मिराजे=रश्मिराज, सूर्य, सूर्याचें. नाना=अथवा. प्रळयांबु माजे नदीनद=जळप्रळय झाला म्हणजे नदी का नद असे भेद (नाहींत) लोपतात (४७). येणे=ज्ञानें. पाहालिया–पाहालेया=ज्ञान उगवल्यानें, ज्ञानाचा उदय झाल्यानें. ज्ञातजात–ज्ञानजात=इतर सर्व ज्ञानें, सृष्टीमधील कौशल्यें, कारागिरीचीं जीं ज्ञानें तद्विषयक पदार्थ ज्ञान जात (४८). होये–होय (४९). प्रतिति–प्रतीती. विचार वीरी समस्तीं=इतर सर्व विचारांवर चालणारीं समस्त ज्ञानें. (मस्तिष्क=मेंदू, समस्त समस्तक, समग्र) समस्त, समस्ती, संमती, समस्त विचार तेथें हेंच ज्ञान असें सिद्ध झालें, प्रतीतीस आलें व आतां नेदिजेचि (नेदिजेति) संसृति (संश्रृति) माथा उधऊं=जन्म- मरणाला संसाराला डोकें वर करूं देत नाहींत (५०). जालेया–जालिया. देहि–देहाजोगे होतीचिना (होतिचीना)=देहधारी जरी तरी देह असल्यासारखें वागत नाहींत (५१). मग–मग तें. देहाचे बेले= देहबळ, देहरूपी कुंपणाचा आडा, देहरूपी बेळकें. संवतुकीं–समतुकी=समतोल. कांटाळे=सारख्या तोलाचें वजन, समतोल पदार्थ=देहाचें बळ ओलांडून एकाच ह्या देहाच्या मापानें, वेळानें माझें समतोलाचें झालें (ताजव्यानें तुलणाऱ्या काट्यांत समतोलानें) (५२).

(श्रीभगवानुवाच) श्री भगवान् म्हणाले कीं, हे अर्जुना! अवधान हेंच मुळीं आपल्या योग्यतेचें होण्यास जी कांहीं उपयोजना ह्या नेत्र, श्रवण, वाणीनें पाहावी लागते तीच तूं एकत्रित करून ऐस; व मग येथीलचे ज्ञानास लिगट, झोंब, प्रतिमल्लतेचें जसें असेंच करून ऐस. (४०)

आम्ही पूर्वींच या उपपत्तीसंबंधानें दाखविले आहे, स्पष्ट केलें आहे—पण अद्यापपावेतों त्या ज्ञानाची प्रतीति ही कुसी–पोटीं निघत नाहीं–पोटीं उमाळा घेत नाहीं–ती पोटापाण्याची–जिव्हाळ्याची–ती प्रेमाची गोष्ट तेथें तेथें अन्नपाण्याची ती कुस कोणत्या प्रमाणानें आपल्या जीवभावाच्या प्रकृति आरोग्य हेतूची ती गोष्ट, आरोग्य, तरच रस हे सरसतेचे होणारे–अशी ती आरोग्याची सीमा गोष्ट–प्रकृती निरोगतेची गोष्टच मुळीं पोटची होईना. तेथें प्रेम हेंच पाहविलें कां वर उचलिलें जाईना; ऐकण्यास, बोलण्यास, ती प्रतीति अद्याप कांहीं येईचना. (४१)

(भूयः) असें आहे म्हणून पुन्हः (प्रवक्ष्यामि) ती प्रतिपत्ति मार्ग शोधून सांगण्याचें करतों. पण, सर्वाहून निराळें असेंच कांहींतरी एक आहे; असेंच वरचेवर म्हण म्हणून वेदांनी, श्रुतींनी, तें ब्रह्म वाखाणिलें, प्रसिद्धीस आणलें, वर्णिलें, डाहारिलें आहे. (४२)

(परम्) येऱ्हवीं पाहिलें असतां ज्ञान हें आपुलें असेंच जरी, तरी तें इंद्रियाच्या अफाटपणाचें–असें इंद्रियाच्याहूनहि दूरतेचें तें, पलिकडचें झालें. (संसार व स्वर्गलोक आवडून घेतल्याकारणानें–स्वर्गलोक आवडून घेतल्याकारणानें, संसरण्यानें, स्वर्ग लोकच नेहमींचा झाल्यानें, तेथें हृपापलेपणाचें आधलें झाल्यानें भव, स्वर्ग, महदादि हींच मुळीं आवडून आहेत. म्हणून हें ज्ञान निराळेंच एक असें झालें आहे; असें तें निराळेंच एक, आणि ह्याच कारणामुळें हें ज्ञान सर्वतोपरी उत्तम आहे असें मी म्हणतों. (४३)

(ज्ञानानाम्) कारण हें ज्ञान, वन्हीच केवळ एक त्यापुढें 'येरे ज्ञाने,' इतर तीं ज्ञानें तर ह्या उपशमतेस येणारीं होत. ह्या ज्ञानापुढें तृणवत् होत हें ज्ञान अग्निरूप असून इतर ज्ञानें तीं यापुढें तृणप्राय आहेत. (४४)

जीं हीं ज्ञानें संसार व स्वर्ग जाणतात, पूजा–पूजन उपाधि यागच चांग म्हणतात–भेद ज्ञानांत म्हणजे द्वैतांत, अनेकत्व भेदण्यानें दुजाभाव तेथें भाव संशुद्धि तप पाहूं करणारी झाल्यानें, ज्ञान हें खरेपणास येतें. भाव पारखण्यानें खरेपणा हा खरेपणाच्या प्रामाण्यास आला. भाव देव प्रमाण प्रामाणिक झाल्यानें तेथें ती पारखच मुळीं तीच योग्य अशा ज्ञानावर उभी होऊन खरेपणास येते. (४५)

अशीं तीं सर्व ज्ञानें ह्या एका ज्ञानानें तर स्वप्नवत् करून ठेविलीं. (ज्ञानमुत्तमम्) वायूच्या लहरी ह्या गगनामध्येंच मुळीं अंतीं लय पावणाऱ्या त्या गगनानें गिळिल्या, पोटीं सामावल्या होतात. (४६)

रश्मिराज जो भगवान् सूर्य त्याच्या उदयानें तर चंद्र आदिकरून तीं तेजें लयच पावतात–नाहींशीं होतात. अथवा प्रळयकाळचा अंबोदधि! (अंबु हें माज घेऊन असतें तेव्हां) तेथें ही नदी, अथवा तो नद असें हें बोलणेंच नाहीं. (४७)

त्याप्रमाणें ह्या ज्ञानानें रश्मिराजा प्रमाणें होणें, उदयास येणें, अथवा अंबुमाजाचे तें, लयाचें तें, जर घेतलें—, त्याचें झालें, तर ज्ञान–ज्ञानजात सृष्टीमधील कौशल्यें–कारागिरीचीं जीं ज्ञानें, तद्विषयक पदार्थज्ञान जात जें कांहीं म्हणून आहे तें सर्वच्या सर्व लयाचें होतें–नाहींसें होतें. आणि असें आहे म्हणून, हे धनंजया! हेंच एक उत्तम असें ज्ञान जाण. (४८)

(यज्ज्ञात्वा) आत्मा हा अनादि असा आपल्या मुक्तपणावरच मोक्ष आपलासा करणारा. आत्मा अनादि असा तो तेथें मुक्तपण मिरवणारी जी विमुक्तता, निर्लेपता–तिजवरच मुळीं मोक्ष हा मुक्त आत्म्यांच्या हातीं येणारा, अगदीं आपल्या हातचा असा होणारा. (४९)

(मुनयः सर्वे) समस्त विचार संमत असें येथें हेंच एक ज्ञान सिद्ध झालें, प्रतीतीस आलें व आतां मोक्षाच्या प्रतीतीनें इतर जीं विचारावर चालणारीं सर्व ज्ञानें त्यांचीं डोकीच मुळीं वर होणारीं होत नाहींत. (५०)

( परां सिद्धिमितोगतः ) मनानेंच, मन हें पाठीमागेंच घातल्यामुळें, आतां अंगास विश्रांतीच आली, अंगानें सुखाचें होणारें तें देहधारी जरी, तरी ते देहाच्या उपयोगाचे होत नाहींत, ते देहबुद्धिचे विकारावर टेकणारे होत नाहींत. ते आत्माच एक असे होत. तेथें देहच पूज्य मानिला–देहच सर्वस्व–असें देहाची आराधना करणारें, नुसता देहच पाहाणारें, देहाची आवड घेऊन असणारे असत नाहींत. (५१)

ह्या देहाचें बळ ( कुंपण, बेळकें, टरफल, कवची, नारळाच्या वरील कवची अर्धी तीं बेलें–बेंडें अथवा वेल ) ही अटकच एक. तेथें देहबुद्धि म्हणजे देहाएवढें होणें जें तें तर अथवा देहधारीच एक असें समजणें ती एक अटक जी, तीच त्यांनी एकाच वेळेस ओलांडिली, व समानतेच्या तुलनेनें तेथें माझें होणें, मी होणें तें एकाच पारड्याचें केलें, एकाच समबुद्धिच्या पारड्यांत मला बसविलें; येथें ' एकेचि वेळे ' हेंच मुळीं महत्त्वाचें असें बोलणारें अंग असून तेथें देहबुद्धीचें तें बेंडच ( आडकाठी ) मुळीं त्यांनीं नुसत्या देहाचे नच होतां उल्लंघिले व मीच झाले. (५२)

## इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
## सर्गेऽपि नोपजायंते प्रलयेन व्यथंति च ॥ २ ॥

इदं ज्ञानं उपाश्रित्य = ह्या ज्ञानाच्या अगदीं जवळचें होण्यानें, अगदीं जवळचा आश्रित जसा असा होऊन असल्यानें. मम साधर्म्यम् आगताः ( सिद्धाः ) = माझ्या साधर्म्यतेप्रत आले ते माझ्या दैवी स्वरूपाला आलेले असे सिद्ध पुरुष, माझ्या ईश्वरत्वाच्या समानधर्मास आलेले सिद्ध पुरुष. न उपजायंते सर्गे अपि = सृष्टि उत्पत्तीच्या वेळीं ते पुन्हा जन्मत नाहींत–भूतसृष्टि प्रकाराची उत्पत्ति होते त्यावेळीं. न व्यथंति प्रलये च = प्रळयकाळींही संसाराच्या व्यर्थतेचे होत नाहींत–संसाराची पीडा त्यांना होत नाहीं–कारण जन्म-मृत्यूमध्यें जें फिरत रहाणें तें त्यांना बाधत नाहीं, ते पूर्ण असे होऊन ब्रह्ममय झालेले होतात.

अन्वय—इदं ज्ञानम् उपाश्रित्य । मम साधर्म्यम् आगताः ( सिद्धाः ) । सर्गे अपि न उपजायंते । ( तथा ) प्रलये ( अपि ) न च व्यथति । (२)

**जे माझिया नित्यता । तेणें नित्य तें पांण्डुसुता ।**
**परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ॥ ५३ ॥**

**मी जैसा अनंतानंद । जैसाचि सत्यसिद्ध ।**
**तैसेचि ते भेद । उरेचिना ॥ ५४ ॥**

**जें मी जेवढें जैसें । तेंचि तें जालें तैसें ।**
**घटभंगी घटाकाशें । आकाश जेवीं ॥ ५५ ॥**

**ना तरि दिवा मूळि कीं । दीपशिखा अनेकीं ।**
**मिनलिया अवलोकी । जैसे होय ॥ ५६ ॥**

**अर्जुना तयांपरी । सरली द्वैताची पैं वारी ।**
**नांदो नामार्थ एका हारी । मी तूं विण ॥ ५७ ॥**

**येणेंचि पैं कारणें । जें पाहिलें सृष्टीचें जुंपणें ।**
**तेंही तया होणें । पडेचि ना ॥ ५८ ॥**

**सृष्टीचिये सर्वादी । जया देहाची नाहीं बांधी ।**
**ते कैचे प्रळयावधीं । निमतील पां ॥ ५९ ॥**

म्हणौनि जन्मक्षया। अतीत ते धनंजया।
मी जालो ज्ञाना येया। अनुसरोनि ॥ ६० ॥

ऐसी ज्ञानाची वाडी। वानिली देवें आवडी।
तेंविचि पार्थाही गोडी। लावावया ॥ ६१ ॥

तंव तया जालें आन। सर्वांगीं निघाले कान।
सपाई अवधान। आतलां पां ॥ ६२ ॥

आतां देवाचिया ऐसें। जाकळिजेत असे वोरसे।
म्हणौनि निरुपण आकाशें। वेंटाळेना ॥ ६३ ॥

मग म्हणे प्रज्ञाकांता। उजवण आजी जाली वक्तृत्वा।
जे वोला एवढां श्रोता। जोडलासी आम्हां ॥ ६४ ॥

तन्हि येक मि अनेकीं। गोंविजे देह पाशिकीं।
त्रिगुणीं लुब्धकीं। कवणे परी ॥ ६५ ॥

कैसा क्षेत्र (क्षेत्रज्ञ) योगें। विये ईये जगें।
तें परियेसी सांगे। कवणे परी ॥ ६६ ॥

परि क्षेत्र येणे व्याजे। हे यालागी बोलिजे।
जे मत्संगे-बीजे। भूतीं पिके ॥ ६७ ॥

माझिया–माझी. माझियाचि पूर्णता परिपूर्ण (५३). अनंतानंद = अनंत आनंद. सत्यसिद्ध = सत्यसंध, सत्यप्रतिज्ञ, सत्यरूप, सत्यधूत. भेद–भेदु (५४). तेचि ते–ते तेचि (५५). ना तरि दिवा मुळिकि (ज्ञानसूर्य)। दीप शाखा अनेकी। मिनलिया अवलोकी। जैसे होये ॥ ना तरी दीप मूळकी। दीप शिखा अनेकी। मीनलिया अवलोकी। होय जैसे ॥ = मूळ ज्योतीच्या ठिकाणीं, मूळच्या ज्योतींत, मूळ ज्योतीपासून लाविलेल्या दिव्याच्या अनेक ज्योती मिळाल्या, मिसळल्या तेथें मागेपुढें जागजागीं दीपच जसे कां (होते) (५६). वारी–पै वारी = फेरी, येरझार. नांदो (लागे)–नांदे. नामार्थ = खरें पाहिलें असतां नाम हाच हेतु. अनुमंत आज्ञार्थ जी आज्ञा नामार्थ रूपी आश्रय हाच हेतू. येका हारी–एका पंक्तीला = मी तूं विण. नाम = संभावना, वितर्क, निश्चय, स्मरण, क्रोध इत्यादि अर्थी. नामधेय नामन् = नांव, किताब. नाम = खरोखर नांवानें (५७). जे–जै. सृष्टीचें जुंपणें = सृष्टीची उत्पत्ती, रचना. तैहि–तेहि. तया होणें पडेचि ना = तेव्हांही पण त्यांना द्वैताच्या वारीचें होऊन जन्मणें तें असतच नाहीं–त्यांचेवर येत नाहीं (५८). बांधी = बंधन. निमतिल पां = निमतील कसे ते, मरण ते कां पावतील, ते नाश तो कां पावतील (५९). अतीत ते = अतीततेप्रत गेलो–जे ह्या आत्मज्ञानाला अनुसरून (अतीतपण तेंच झाले) मद्रुप झाले. जालो–जाले. येया–इया (६०). वाढि–वाढी, वाडी. तेवींचि–तेविची (६१). आंतला पा–आतमा पां–आपादतल पां = सपाई अवधान = संपूर्ण अवधानानें तो नटला (६२). देवाचिया ऐसें = देवासारखाच. जाकळिज तसे वोरसे = कृपेच्या वर्षण्यानें, स्नेहभरित पान्ह्यानें अर्जुन व्यापला. निरुपण आकाशें वेंटाळेना = गगन तत्वापलिकडे निरूपण वेढलें जाईना, वर्तुळाचें केलें होईना, गुंडाळलें होईना (पुतळेंपण–ब्रह्माचें तें आकळिलें जाईना). निरुपणास, अवलोकनास–विचारासच मुळीं कांहीं तो स्पर्श आकाशाचा–आकाराचा–होईना (६३). म्हणे–म्हणे गा. प्रज्ञाकांता = बुद्धिवंता–बुद्धीचा पति. उजवण आजि जाली वक्तृत्वा = (वक्तृत्वतारूपी) सारस्वत–वाङ्मय–वक्तृत्व, भाषाशैली, कन्या आज उजविली–विवाहित झाली, वराला दिली, वक्तृत्व कला सफल झाली. बोला एवढा श्रोता जोडिलासि आम्हा = बोलाचें माप (हा मनुष्य सर्व) विश्वच सर्व एवढा थोर श्रोता

आम्हांस तूं मिळालास (६४). तन्हि–तरी. येक–येकु. अनेकि–अनेकी. गोविजे=ओविजे, आडवावा, सांपडावा. देह पाशिकी–(पाशकी)=देहरूपी पाशानें. त्रिगुणी लुब्धकी=त्रिगुण लोभी, त्रिगुणाच्या हावरेपणानें, त्रिगुणाच्या जारकर्मी जे, त्रिगुणरूपी पारध्यांनी. परि–परी=तन्हा, सीमा, प्रकार (६५). क्षेत्र क्षेत्रज्ञ योगे–क्षेत्र योगे–क्षेत्रज्ञ योगे, विये, इये. जगे=ह्या जगामधून क्षेत्र योग का क्षेत्रज्ञ योग तो कसा जन्मतो तें सांगतों ऐक. क्षेत्र योगानें अथवा क्षेत्रज्ञ योगानेंही जगें कशीं उत्पन्न होतात, निर्माण केलीं जातात तें सांगतों ऐक. परियेसि–परिस. कवणेपरि–कोणेपरि=कोणती रचना, प्रकार, तन्हा तें. सांग=सर्व कांहीं (कैसा क्षेत्र योगे विये इये जग । कैसा तो क्षेत्रज्ञ योग । ते परी सांग ॥ (६६). परि–पै. व्याजे=निमित्तानें. हे यालागि–यालागि हे. मत्संगे बीजे–मत्संग बीजे. भुति–भूती (मत्–अनादि–मत् परं ब्रह्म–अनादि अशा ह्या वासना–मत=बुद्धि वासना) (६७)

(मम साधर्म्यमागताः) माझ्या नित्यतेमुळेंच (नित्य ब्रह्म) जें नित्य असें (ब्रह्मच) होऊन आहेत, हे पांडु कुमारा! ते माझ्याच मुळीं परिपूर्णतेमुळें पूर्ण ब्रह्म ओतप्रोत असे. (५३)

मी जसा अनंत आनंद–आनंदच एक व्यापकत्वानें असलेला जसा कां—सिद्धच तो, सत्य प्रज्ञा भाव सिद्धतेस आलेला, तेथें भेदभाव तर मुळींच नसणारा. भेदभाव हे मुळींच तेथें रहातच नाहींत. (५४)

मी जेवढा का जसा–व्यापक ब्रह्म जें मी जेवढें अथवा जसें तेंच तें तसें, व्यापकतेचें झालें जसें का. घट फुटल्यावर त्यांतील आकाश हें व्यापकत्वाचें मूळचें तेंच आतां सर्व व्यापक असें होणारें. (५५)

मूळचा जो दिवा तो ज्ञान सूर्यच म्हटला तेथें दीपाच्या ज्या अनेक शाखा, त्याच आंत मिळवून घेऊन पाहाण्याचें केलें तर दिव्याचें होणें असणें जसें तसें तें होतें दिसणारें होतें दिसतें अथवा मूळ ज्योतीपासून निघालेल्या दिव्याच्या अनेक ज्योती एकत्र मिनल्यानें अवलोकणें शब्दाचें होतें जसें का. (५६)

(मी व्यापक जसा तसें तेजाचें जसें घट फुटल्यावर आकाश व्यापकत्व गुणामुळें व्यापकत्वाचें होतें. जसें मूळ ज्या एकाच दिव्यावर अनेक दुसरे दिवे लाविले तरी त्या मूळच्या दिव्या=स्नेह, वात, दिवा=प्रमाणेंच तें–तेथें आंत बाहेर प्रकाशच प्रकाशणारा,–तेथें एक त्या दिव्याचे गुणच मुळीं चहुंकडे) हे अर्जुना! त्याप्रमाणें द्वैत भावाची–(दुजेपण मानणें नच जें) द्वैताची वारीच संपली; तेथें तर ह्या नाम महत्त्वाचा अर्थच एक मुळीं खरें पाहिलें असतां नाम अर्थ हाच हेतु, एकाच पंक्तीला मी तूं नच करतां बसला, एकाच पंक्तीमध्यें नांदणारा तेथें अनुमंत आज्ञार्थरूपी आश्रयच एक तेथें मी कां तूं असें म्हणणेंच नाहीं. (५७)

(सर्गेऽपि नोपजायंते) याच कारणास्तव पहिलें जें कांहीं सृष्टीचें उत्पन्न होणें तेथेंही पण त्यांना देहधारी होऊन यावें लागत नाहीं–जन्म घ्यावा लागत नाहीं—ते देहधारीपणास जुंपले जात नाहींत. (५८)

सृष्टीच्या अगोदर सर्व जें विश्व आहे त्याचेहि अगोदर–जेथें भूतमात्र हेंहीपण सर्व ब्रह्मावरच टेकलेलें–तेथें त्यांना पंचभूतात्मक देह जाड्याची बांधणी ही होत नाहीं—ते त्या भूत गोठलीच्या बांधणीचे होत नाहींत–(प्रलये न व्यथंति च) असें तें कसें बरें (विचारानें पाहिलें असतां) प्रळयाच्या वेळेस निघतील कां नाहिंसे होतील ते? (५९)

(इदं ज्ञानमुपाश्रित्य) म्हणून हे धनंजया! ते जन्मापासून मुक्त होत. त्यांना क्षय (हिंसा, ऱ्हास) हाहीपण नाहीं, ते पूर्ण कलेचे असेच होत. तें कलेचें होणें कां न होणें जसें, अशा क्षयाचे होतच नाहींत. ते तर ह्या ज्ञानास अनुसरण्यानें मीच झाले. मी तें एक झालों–तेथें मीच एक. (६०)

(भक्ति रहस्य) अशी देवांनीं ती ज्ञानाची घटिका–महत्त्व–सीमा–वृद्धि–वाढ ही मोठ्या आवडीनें, प्रेमानें वर्णनाची केली–वाखाणून सांगितली–स्तुत्य अशी म्हटली. ज्ञान लक्षण सीमा ही तर केव्हांही वर्णिली जाणारीच एवढेंच नव्हे, तर तेथें, ह्या पार्थास एक विशेष गोडी लागावी, पार्थास अभ्यासाची आवड सांपडावी म्हणून त्यांनी ह्या ज्ञानाबाबत विशेषतेनें फोड करून सांगितलें. (६१)

आतां तें देवाचें सांगणें ह्या पार्थास तें गोडीचें व्हावें म्हणून तेथें देवच ते, ती गोडी ज्ञान अभ्यासास यावी अशी ती सीमा पोहोंचती करणारें. तेथें आतां तर त्यास एक नवीनतेचेंच मुळीं नवीनपण भासूं लागलें. हें ज्ञान श्रवण करण्यास त्याच्या सर्वांहि अंगास कानच उगवले व पीठच एक सर्व अधिकार घेऊन अवधान एक तें नटलें (६२)

स्नेहभरित पान्ह्यानें, कृपेच्या वर्षण्यानें, देवासारखाच हुबेहूब देवच एक जसा असाच तो अर्जुन (व्याप्य व्यापक भाव तेथें ब्रह्मच एक त्यानें) व्यापला आहे–म्हणून आतां गगन तत्त्वापलिकडे निरुपण वेढलें जाईना, वर्तुळाचें केलें होईना, गुंडाळलें जाईना, पुतळेंपण ब्रह्माचें तें आकळलें जाईना म्हणून निरूपणास –अवलोकनास–विचारास मुळीं कांहीं तो स्पर्श आकाशाचा होईना–आकाराचा होईना. तेथें ज्ञानच एक सर्व बोलिलें गेलें—निरूपण तें इकडचें तिकडचें असें होईना. (६३)

नंतर देव म्हणूं लागले कीं, हे प्रज्ञा (वेल्हाळा जी बुद्धि तिच्या कांता, बुद्धिवंता)–प्रियकरा, आज जेवढी म्हणून वक्तृत्व कला आहे—तीच आज उजविली गेली–आपल्या भारास आली–गौरवाच्या शृंगारास आली आहे. कारण ह्या देवाच्या बोला एवढा महागंभीर असाच मुळीं एक तूं श्रोता येथें आम्हांस भेटलास, संलग्नतेचा असा जोडलेला आहेस, मिळाला आहेस. (६४)

**(स्पष्ट असें गद्यात्मक तात्पर्य)** त्रिगुण लोभी–म्हणजे त्रिगुणाच्या हांवरेपणानें, त्रिगुणाच्या जार कर्मीचे, त्रिगुणरूपी पारध्याची तऱ्हा, प्रकार, सीमा (अनु अनु × परि परि) तऱ्हातऱ्हांनीं–प्रकारा-प्रकारांनीं देहरूपी पाशानें अनेक तऱ्हांनी गोविलें जाणें, सांपडलें होणें, आडविलें जाणें, जें एक मी अनेकी —आत्मबल हें जसें एकच नांव अनेक ठिकाणीं दिलेलें तेथें जीवभाव हा आत्मभावानें तो कसा उत्कंठा वाहणारा, तो तेथें कोणती ती तऱ्हा—गोंवण्याची ती लुब्धा अशा गुणानें देहासच पाशांत आडकविणेचें केलें जाणारें तें. तेथें त्रिगुणावरच लुब्ध होणें केलें व देहाच्या सर्वथैव असाच एका पाशांत अडकला. (६५)

आतां तो प्रकृतिविकाराचा सर्वथैव असा क्षेत्रयोग ह्या जीवास वीतो—ह्या देहावर परिणाम करितो–तेथें क्षेत्रज्ञ योग तो कसा वागविला जातो, क्षेत्रज्ञ योगानें कसा तो ह्या जगाचा अधिष्ठाता तो पुरुष वीतो, जन्मास येतो, जन्मविला जातो, उगवतो, उपजतो–ते परी म्हणजे सीमा, तऱ्हा, प्रकार ती तऱ्हा कां परी म्हटलेली अशी ती सांगावी. (६६)

तऱ्हा, प्रकार, सीमा (देह) क्षेत्रच एक, ह्या देह निमित्तावर उभें होण्यानें [हेतु, कारण, संगति, आसक्ती] माझ्या संगामुळेंच मुळीं भूतमात्रीं पिकणारें असल्यानें येथें देह हेंच एक निमित्त होय. मी हेतु असल्यानें देह निमित्त तेंच मुळीं (मी हेतु हेंच बीज–बीज हेंच हेतु) हेतूवर उभें झालें व तेंच भूतमात्रीं पिकतें, व तेंच भूतीं पिकणारें होणारें होतें. हेतु हाच मुळीं मायारूपी कोटिच्या कोटि सृष्टि उत्पन्न करणारा (भूती = ज्याच्यावर सगुणाचा परिणाम होणारा तेथें प्रकाश धारण जें होतें तेंच मुळीं–भूत असेंही म्हणतां येत नाहीं–तेथें भूत असें बोलणेंच नाहीं.) (६७)

**ममयोनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहं ।**
**सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥**

सर्व भूतांची उत्पत्ति महत् ब्रह्मापासून—जड व चेतन संयोगापासून झालेली आहे.

मम योनिः = मूळ प्रकृती माझी जी तीच योनी म्हटली. ती गुणमयी अशी जेथें त्रिगुणसाध्य असल्यानें ती ब्रह्मच जशी अशी. महत् ब्रह्म = अमर्यादतेचें असें आकाशासारखें मोठें व्यापक असलेलें जें तें पदार्थमात्राचें अधिष्ठान असल्यानें ब्रह्म म्हणजे महत्त्वाचें असें म्हटलें गेलें. अहं तस्मिन् गर्भं दधामि = त्या महत्-ब्रह्मरूप योनीमध्यें--वस्तुमात्राच्या–पदार्थमात्राच्या, भूतमात्राच्या, अधिष्ठानामध्येंच मी पुरुष बीजरूप गर्भ स्थापन करतों. ततः सर्वभूतानां संभवः भवति = तेथून सर्व भूतमात्रांची उत्पत्ति होते. बीजरूप म्हणजे सर्व जीवाच्या जन्माचें कारणरूप जें बीज, तें गर्भच एक जसा का. त्रिगुणाचें व्यापकत्व सांठविलेलें जेथें असा. हे भारत = हे भारता, अर्जुना (महत् ब्रह्म = सामर्थ्यवान्, विकाराचें अधिष्ठान, पोषणादि भरण, जेथें ह्या भूतमात्रांचें होणारें तेथें ती आदि शक्तीच म्हटली गेली आहे; तिलाच गुणमयी हें नांव आहे, हीच त्रिगुणांची जन्मदात्री, त्रिगुण हिजपासून उत्पन्न होतात.

अन्वय—मम । महत् ब्रह्म । (महत्तत्व) प्रकृति । भूतानाम् योनिः । तस्मिन् । अहं चिदंश । गर्भम् । (चेतन समुदायरूपी गर्भ स्थापन करितों) । दधामि । सर्वभूतानाम् संभवः । हे भारत । ततः भवति । (त्या जड चेतन संयोगापासून सर्व भूतांची उत्पत्ति होते). (३)

**येरवीं तरी महत् ब्रह्म । या लागि हें ऐसें नाम ।**
**जे महदादि विश्राम । शाळिका हे ॥ ६८ ॥**

**विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेचि करी ।**
**म्हणौनि अवधारी । महत् ब्रह्म ॥ ६९ ॥**

**अव्यक्त वाद मती । अव्यक्त ऐसी वदंती ।**
**सांख्याचियां प्रतितीं । प्रकृतिचि हे ॥ ७० ॥**

**वेदांत इयेतें माया । ऐसें म्हणति प्राज्ञा राया ।**
**असो किती बोलो वायां । अज्ञान हें ॥ ७१ ॥**

**आपला आपणपेयां । विसरू जो धनंजया ।**
**तेंचि रूप येयां । अज्ञानासी ॥ ७२ ॥**

**आणीकही एक असे । जे विचारा वेळे न दिसे ।**
**वातीं पाहाता जैसें । आंधारें कां ॥ ७३ ॥**

**हालविलिया जाये । निश्चळी तरी होये ।**
**दुधीं जैसी साये । दुधाची ते ॥ ७४ ।**

**पैं जागरू ना स्वप्न । ना स्वरूप अवस्थान ।**
**ते सुषुप्ति कां घन । जैसी होये ॥ ७५ ॥**

**कां न वियेतां वायुतें । वोझे आकाश रितें ।**
**तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७६ ॥**

पैल खांब कां पुरुषु। ऐसा निश्चय नाहीं एकु।
परि काई नेणो आलोकु। दिसतसे ॥ ७७ ॥
तैंवी वस्तु जैसी असे। तैसें फिर न दिसे।
परि कांहीं अनारिसे। देखिजेना ॥ ७८ ॥
ना रात्रि ना तेज। ते संधी जैसी सांज।
तैंवी विरुद्ध ना निज। अज्ञान आर्थी ॥ ७९ ॥
ऐसी कोण्ही एकी दशा। तिये वाजु अज्ञान ऐसा।
तया गुंडलेयां प्रकाशा। क्षेत्रज्ञ नांव ॥ ८० ॥
अज्ञान थोरिये आणिजे। आपणपें तरी नेणिजे।
तें रूप जाणिजे। क्षेत्रज्ञाचें ॥ ८१ ॥
हाचि उभय-योगु। बुझे बापा चांगु।
सत्तेचा नैसर्गु। स्वभावो हा ॥ ८२ ॥
आतां अज्ञाना सारिखे। वस्तु आपणपेंचि देखे।
परि रूपें अनेकें। नेणो कोण ॥ ८३ ॥
जैसा रंक भ्रमला। म्हणे जारे मी रावो आला।
कां मुर्छित गेला। स्वर्गलोकां ॥ ८४ ॥
तैंवि लचकलिया दिठी। मग देखणें जें उठी।
तयां नांव सृष्टि। मीचि पैं गा ॥ ८५ ॥
जैसें पां स्वप्न मोहावा। तो एकाकी देखिजे बहुवा।
तोचि तो पाडु आत्मया-वा। स्मरणेंवीण ॥ ८६ ॥
हेचि आ-निभ्रांति। प्रमेयें उपलवूं पुढति।
परि तूं प्रतिती। याची घे पां ॥ ८७ ॥
तरी माझी हे गृहिणी। अनादि तरुणी।
अनिर्वाच्य गुणीं। अविद्या हे ॥ ८८ ॥
इये नाहीं हेंचि रुप। ठाणें हें उमप।
हें निद्रितां समीप। चेतां दुरी ॥ ८९ ॥
पैं माझेनि आंगें। पहुडल्या हे जागे।
आणि सत्ता संभोगें। गुर्विणी होये ॥ ९० ॥
महद्ब्रम्हां उदरीं। प्राकृति आठै विकारी।
गर्भाची करी। पेलोवेलीं ॥ ९१ ॥
उभय संग पहिलें। बुद्धि तत्व प्रसवलें।
बुद्धि तत्व भरलें। होय मन ॥ ९२ ॥
तरुणी ममता मनाची। अहंकार तत्व रची।
तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होये ॥ ९३ ॥

आणि विषयां इंद्रियां गौसी। स्वभावें तंव भूतांसी।
म्हणौनि येती सरिसी। तिये ही रूपां ॥ ९४ ॥
जालेनि विकार, क्षोभे। पाठी त्रिगुणांचेंहि उभें।
तेव्हां ये वासना गर्भें। ठाये ठावो ॥ ९५ ॥
रूखाचा आवांका। जैसी बीज कणिका।
जेवीं बांधे उदकां। मेटत खेवो ॥ ९६ ॥
तैसी माझेनि संगें। अविद्या नाना जगें।
आर घेवो लागे। आणियांचा ॥ ९७ ॥
मग गर्भगोळां तयां। कैसें रूप तें यें आया।
तें परियेसी राया। सुजनांचिया ॥ ९८ ॥
पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज।
उमटती सहज। आवेव ही ॥ ९९ ॥
व्योम वायुवसें। वाढलेनि गर्भ रसें।
मणिज उमसे। अवेव तो ॥ १०० ॥
पोटीसूनि तम रजे। आगळिका तोय तेजें।
उठिता निफजे। स्वेदजु मा ॥ १०१ ॥
आपपृथ्वी उत्कटें। आणि तमो मात्रें निकृष्टें।
स्थावर उमटे। उद्भिज हा ॥ १०२ ॥
मग पांचा पांचही विरजीं। होती मन बुद्ध्यादि साजी।
हे हेतु जारजी। ऐसें जाण ॥ १०३ ॥
ऐसें चाऱ्ही हे सरळ। करचरण-तळ।
महा प्रकृति स्थूळ। तेंचि शिर ॥ १०४ ॥
प्रवृत्ति पेललें पोट। निवृत्ति ते पाठी नीट।
सुरयोनि आंगें आठ। ऊर्ध्वाची ॥ १०५ ॥
कंठ उल्हासतां स्वर्ग। मृत्यू लोक तो मध्यभाग।
अधोदेश चांग। नितंबु तो ॥ १०६ ॥
ऐसें लेकरूं येक। प्रसवली हें देख।
जयाचे तिन्ही लोक। बाळसें गा ॥ १०७ ॥
चौऱ्यासि लक्ष योनी। ते कांडा पेरां सांदणी।
वाढे प्रतिदिनी। बाळक हें ॥ १०८ ॥
नाना देह अवेवि। नामाची लेणी लेववीं।
मोहें स्तन्य वाढवी। नीचनवें ॥ १०९ ॥
सृष्टी वेगळवेगळिया। तया करांग्रीं आंगोळियां।
भिन्नाभिन्न सूदलियां। मुदिया तेथ ॥ ११० ॥

हें येकलौतें चराचर । अविचारित सुंदर ।
प्रसवोनि थोर । थोरावली ॥ १११ ॥

पैं ब्रह्मा प्रातःकाळ । श्रीविष्णु तो माध्यान्ह वेळ ।
सदाशिव सांजविळ । बाळां ययां ॥ ११२ ॥

महा प्रळई सेजे । खेळोनि आले निद्रिजे ।
विषम ज्ञानें उमजे । कल्पोदई ॥ ११३ ॥

अर्जुना इया परीं । मिथ्या दृष्टिच्या घरीं ।
युगानवृत्तीची करी । चोज पाउलें ॥ ११४ ॥

येन्हवी–एरवीं. तन्हि–तरी. महत् ब्रह्म = मूळ माया [बुध्देरात्मा महान् परः । महतः परम अव्यक्तः । अव्यक्तात् पुरुषः परः । पुरुषान्न परः किंचित् । सा काष्ठ सा परागतिः ।] या लागि हें ऐसें नाम–हे इये ऐसें नाम. महत् आदि विश्राम (विसांवा, थांबणें). शाळिका (पाळ) हे = महत् तत्वादिकाचें विश्रांतिस्थान, भूमि. शाळिका = युक्त, शोभणारें, श्लाघ्य, नम्र (शालिहोत्र = घोडा) (६८). नाम = महत् ब्रह्म असें खरोखरीचें नांवानें नामास एका आलेलें. विकारा = रूपांतरास, फेरफारास. थोरी = संज्ञा, नांव, खूण, बुद्धि, नाम. अवधारय = निश्चयानें का निर्णयानें जाण. महत् = मोठें, श्रेष्ठ, थोर. ब्रह्म = महत्त्व, चैतन्य, ईश्वरत्व, तेज, दैव, वेद, शक्ति, विचार, मूळ तळ, मूळ कारण, भांडवल (मेघाचा एक प्रकार–आवर्त.) (६९). अव्यक्त वाद मती = अस्पष्ट, अव्यक्त अशी, सूक्ष्म असें जें अव्यक्त त्याविषयींची जी चर्चा, भाषण, वृत्तात. वदंती = अस्पष्ट कीं, अहो ! सूक्ष्मच तें अशी जी लोकांची फिर्याद तेथें बोलण्याची धाटी, कां तन्हा. प्रतीती = अनुभव, आनंद, सत्कार. प्रकृतिचि हे = आदिमाया हीच (मूळ स्वभाव, अविद्या, सात राज्यांगांपैकी एक, प्रत्येक, जीवात्मा, प्रजा, शब्द व धातू प्रकार प्रजा) (७०). माया = अविद्या (ममता, इंद्रजाल, कपट, म्हणजे ठकविणारी). प्राज्ञा = राया. बुद्धिरूपी स्त्रीचा राय, बुद्धिवान् स्त्रीचा राय, बुद्धिमान् ज्ञाता = प्राज्ञाप्राज्ञ = बुद्धिरूपी अथवा बुद्धिमान् स्त्रीचा ज्ञाता (७१). विचारा वेळे न दिसे–विचारा वेगळें नसे = विचारा वेगळें नसे परी विचारा वेळे न दिसे. वार्ता = बोलण्यानें, तेलवातीच्या दिव्यानें, वायू, चंद्र, सूर्य इत्यादिकांनीं (७३). हालविल्या–हालविलया. जाये–जाय = नाहींसें होतें. निश्चळ–निश्चयी. होये–होय. साये–साय. दुधाचि–दुधाची (७४). जागरू = जागृत अवस्था, जागे असे. स्वरूप–ना स्वरूप. अवस्थान = रहाण्याचें ठिकाण. अवस्थान = समाधि. घन = गाढ, कठिण. त्रिघात = त्रिगुणांचा गुणाकार अथवा समुदाय, घट्ट, (मेघ), स्वप्न, स्वरूप अवस्थान—स्वप्न ना स्वरूप अवस्थान. कां = अथवा (७५). न वियेता (वियता)—निवांता वायूतें = वायू उत्पन्न होण्यापूर्वी. वाजे–वांझें. निरुतें = उत्तर देण्यास असमर्थ. अज्ञान – अजाण. अविद्या = मूर्खता (७६). खांब—खांबु (खांब, महादेव, झाडाचें खोड, स्थिर, स्थरणु). पुरुष = नर, विष्णु, ईश्वर. निश्चय = खात्री, निर्णय, संकल्प. येकु–एकु. काई–काय. अलौकु–आलौकु–आलोकु–आलेख–आलेख्य–दिसत असें. अलौकु = आभास [अलोक = उजाड, निर्जन. अलौकिक = अद्‌भूत. आलोक = पाहाणें, प्रकाश. आलोल = कंपित. आलेख्य = चित्र, रंगविण्याची क्रिया] तरी सुद्धां काय तें नेणो, जाणतां येत नाहीं, पण पाहाणें दिसत आहे. उजाडतेचें अद्‌भुतपण, कंपितपणामुळें पाहाणें तें [प्रकाश तो आकाशच प्रकाशलें तेथें] चित्रच एक असें (७७). तैसे–तैसी. ना–न. अनारिसें–आनारिसें = वेगळें. वस्तू अमुक तन्हेची अशीच असली पाहिजे कां वेगळी अशी, असेंही देखणें नाहीं (अन्न + अरि + से–अन्न + अराति + से = वेगळें, निराळें) (७८). रात्री–रात्रि–रात्र [रात = देणगी, द्रव्य]. संधि = [संधिवेळा = सायंकाळ] मिलाफ, काळ, वेळा. संधिप्रकाश = संध्या [सांधा, सायंकाळ]. जैसी–जेवि, विरुद्ध ना निज = स्वरूप नाहीं व जगही नाहीं.

[अजाण–आज्ञान] अज्ञान (अविद्या). ज्ञान=बोध, जाणीव बुद्धी. आथी–अथि=सर्व योग्य (७९). ऐसि कोणि एकि [आ–ज्ञान] दशा—ऐसी कोणी एकीं ज्ञान अज्ञान दशा. वाजो={ वादु–वाद–वाजू [वाज=तूप, अन्न, पाणी. वाद=चर्चा, भाषण, वृत्तांत]. (आवास=राहाण्याचें ठिकाण, गृह) } वाजविणें, वक्ता, वृत्तांत, वाद करते जी ती चर्चा. तिया–तया. गुंडलिया (गुंठलिया). आच्छादिलेल्या=वेष्टिलेल्या, झांकलेल्या. क्षेत्रज्ञु–क्षेत्रज्ञ (क्षेत्रविद्)=आत्मा, ज्ञानी पुरुष. नांव–नाम (८०). थोरिये आणिजे=वाढविते करणें, थोरपणास आणणें. आपणपे=स्वतः आपणांस, आपल्या सर्वस्वास (क्षेत्रज्ञाचें रूप). अज्ञान=अज्ञानाचें [कां ज्ञानाचें] आवरण झालेल्या चैतन्यास अज्ञान म्हणतात (८१). उभय योगु [उभ–उभय (सर्वनाम) दोघें]=आत्मा व प्रकृति, क्षेत्र व क्षेत्रज्ञ. बुझें=जाण. सत्तेचा=आत्मतत्त्वाचा, अस्तित्वाचा. नैसर्गु=स्वाभाविक मूळचा धर्म. स्वभावो=सहज कर्म, प्रकृति, याथातथ्यता (८२). सारिखे–सारखे. वस्तु=सत्य, मूळ गुण. आपणपेचि—आपणपयेचि—आपणपांचि=स्वतःच. नेणो कोण=नेण कोणे (८३). रंक–रंकु=कृपण, दरिद्रि. मूर्छित गेला स्वर्गलोकां=बेशुद्ध झालेला, घेरी आलेला, मूर्च्छा आलेला (मूर्छागत) तो स्वर्गींच गेलों, स्वर्ग पाहून आलों–म्हणतो (८४). लचकलिया दिठी=दृष्टि स्वरूपावरून चळली. जे–जे जे. नाम–नांव, नामसृष्टि. मीचि पैं गा=मीचि विये पै गा. तया नाम मीचि सृष्टि=नामसृष्टि मीचि. नाम=खरोखर, खलु (८५). कां–पा. स्वप्न मोहां=स्वप्न भ्रांतीनें. येकाकि–एकाकि. देखिजे–देखे. बहुवा=अनेकत्वानें. पाड=महत्त्व, विस्तार, पवाड. स्मरणेविण–स्मरणेंविण असें (८६). अनिभ्रांती–(आणि–भ्रांती) निभ्रांति. प्रमेय–प्रमेये. उपलवूं पुढती=सिद्धांत स्पष्ट करून सांगतों (८७). गृहिणी=पत्नि. अनादि तरुणीं=अनादि आरंभ, उत्पत्ति रहित, सोळापासून तीस वर्षापर्यंतची स्त्री. अनिर्वाच्य गुणीं=(गुणीं=शुभ, मुख्य)=न सांगण्यासारखी, मुख्य, गुणयुक्त. अविद्या=न विद्यते सा अविद्या. अविद्या–ही पंच क्लेशांपैकीं एक आहे हिजला अज्ञान म्हणतात. आतां पंच क्लेश ते म्हणजे १) अविद्या. २) अस्मिता. ३). राग. ४). द्वेष. ५) अभिनिवेश हे होत.

१. अविद्या—सर्व क्लेशाचें–दुःखाचें कारण अज्ञान हेंच होय. क्लेश कधीं निद्रावस्थेंत असतात, कधीं सूक्ष्म स्वरूपांत असतात, तर कधीं गुप्तरूपांत असतात. क्लेशाचें स्वरूप कसलेंहि असलें तरी त्याची उत्पत्ति अज्ञानापासून झालेली असते. नित्य, शुद्ध व सुखमय असा आत्मा असतां, तो सोडून अनित्य, अशुद्ध आणि दुःखमय अशा अनात्म वस्तूचें ग्रहण करणें हेंच अज्ञान (या विषयींचें योग सूत्र तें 'अनित्याऽशुचिदुःखानात्मसु नित्यशुचि सुखाऽऽत्मख्यातिरविद्या'). २. अस्मिता–'दृग्दर्शन शक्त्योरेकात्मतास्मिता' द्रष्टा आणि दर्शन साधन यांची एकात्मता होणें हीस अस्मिता म्हणतात व हाच अहंकार (भूतादिमव्ययम्) होय. ३. राग–'सुखानुशयी रागः'=सुखमय वाटणाऱ्या वस्तूचा विचार एक सारखा करणें यास राग अथवा आसक्ति म्हणतात. ४. द्वेष–'दुःखानुशयी द्वेषः'=दुःखकारक वस्तूचा विचार द्वेषास कारण होतो. आपल्यास ज्या वस्तूपासून दुःखाची प्राप्ति होते त्या वस्तूचें चिंतन करूं लागल्याबरोबर आपलें मन आपोआपच तेथून परावृत्त होतें. ५. अभिनिवेश–'स्वरसवाहीविदुषोऽपितयारूढोभिनिवेशः'=विद्वानाच्याहि चित्रास अत्यंत चिकटून राहाणारा असा तो केवळ स्वभावतः असणारा असा विकार त्यास अभिनिवेश, म्हणजे देह धारणेची अत्यंत आवड म्हणतात.

ठाणें हें (अति) उमप=आकृती ही फार व्यापक व मोठी. समीप=जवळची, सान्निध्याची. चेतां दुरी=जागृताला दूर अशी (८९). माझेनि–माझेनीचि. पहुडलिया–पहुडल्या. जगे–जागें. सत्ता संभोगें=आत्मसत्तेच्या संभोगानें. गुर्विणी होये=गरोदर होते, अतिशयतेची होते. गुर्वी–गुर्विणी=गर्भार

स्त्री, गुरुपत्नि,–सुपारी (९०). महद् ब्रह्मा–महत् ब्रह्म = मूळ माया (उदरीं–पोटीं). प्रकृती–प्राकृती. आठै विकारी = अष्टधा प्रकृती (सविकारमुदाहृतम्) प्राकृती (रूपी) विकारांची. पेलोवेली = वृद्धी, वाढ करते (९१). उभय संग = उभय म्हणजे आत्मा प्रकृती ह्यांच्या संयोगानें. पहिले–प्रथम = अगोदरचें असें जें. भरले–भारैले = भारलें गेल्यानें, भरलेलें झाल्यानें, भारानें तें भरलें होऊन (९२). तरुणी ममता मनाची–तारुण्यता ममता मनाची. अहंकारतत्व = भूतादीम् (अव्ययम्). अभिव्यक्ति = उत्पत्ती, स्थूल देहाभिमानी जीव उत्पत्ती. होये–होय (९३). विषयां इंद्रियां गौसी–विषयेंद्रिया गौसी = विषय व इंद्रिय यांचा परस्पर संबंध जोडते. तिये = विषय व इंद्रियें, विषय हें इंद्रियांस गवसून तेथें तीं भूतें स्वभावासच आलीं आणि म्हणून तीं विषय व इंद्रियेंही पण सरिसेपणानें रूपास आलीं–होतात (९४). जालेनि–झालेनि = झाल्यावर, जन्मल्यावर रूपास आलेलीं. विकार (क्षोभानें) पाठि त्रिगुणांचेंहि उभें = पाठोपाठ त्रिगुण उत्पन्न होतात. तेन्हां ये–ते वाये. वासना गर्भे ठाये ठावो ये = वासनेचें अनादिपण हें जसें तात्काळ ठावच पाहाणारें असें होतें (९५). रूखाचा आवांका = वृक्षाचा आकार. जीवी–जेवी. मेटत खेवो = पाण्याची गांठ पडतांच (९६). आर–अंकूर = अंकुरास येण्याचें करूं लागते (आयणियाचा–आणियांची). आणियांची = अणकुचीदार अणू-प्रमाणें अशा सूक्ष्म अंकुराची (अणिया–अणोरणीयान्) (९७). गर्भगोळां तयां = अंतर्भागीं असलेल्या गोळयाचें रूप तें, गर्भस्थ गोळयाचें (पिंड, गोळा, मांस, संख्या, पराक्रम, पोटरी, गोळा). तें आया–ते ये आया = आकारास येतें. परियेसी–परियेसे. सुजनांचिया–सुजन, सुजात = कुलीन, सुंदर, सुकुमार (९८). मणिज = अंड्यापासून पक्षी. स्वेदज = ढवेचें अंडें, लिखा, घामापासून ऊ, कृमी इत्यादि. उद्‌भिज् = पृथ्वी (जमीनी) पासून वृक्ष. जारज = वारेपासून झालेले मनुष्य. अवेव हीं–अवयव–अवयव वर्ग विभाग हें (९९). वसे–वशे. मणिज = मणिजु = अंड्यापासून जन्मलेले. उमसे–उससे = बाहेर पडतो, जीवन (जीवित) पावतो. अवयव = वर्ग, विभाग (१००). पोटी सूनि = (तमरजात्मक) गर्भ वाढल्यानें. आगळिका तोय तेजे = तोय म्हणजे पाणी व तेज म्हणजे प्रकाश (आकाश) यांचा अंश जास्त असा तो उठला तर घामापासून जसा (निफजे) निफजला असा तो प्रकार स्वेदजांचा होय. तोय तेज प्रकाश आप आगळिका उठिली त्यानें स्वेदज जन्मतो. गा–मा (१०१). पाणि व जमीन उत्कटे = अतिशयतेनें, अधिकपणानें (गर्विष्ठ, उत्तम). तमो मात्रे निकृष्टे = निंद्य, अधम, हलका असा निव्वळ तमोमात्रच त्यानें. स्थावर = अचल वस्तु, स्थितिशील, स्थूल (शरीर), वृक्ष, निश्चल, स्थिर. उमटे = उत्पन्न होते, मोड आलेला होते, जशा कां रेषा काढल्या, लिहिल्या, कां चित्र काढलें. उद्‌भिज = जमीन भेदून वर येणारे अंकूर, वनस्पती, मीठ (१०२). पंच भूत = आत्मा. पंचप्राण = भूत, भूतात्मा, जीवात्मा. विरजी = साह्यकर्त्री, शुद्ध, निर्मळ, रजोगुण रहित (विरजस् तमस्–विरजस्तमः) = सत्वैकनिष्ठ. होति–होत. साजी–सहजीं, सज्ज, तयार. हे–हीं. जारजी = उपपत्तिपासून जन्मलेलीं होतात (१०३). करचरणतळ = दोन हात व दोन पाय (१०४). प्रकृति–प्रवृत्ति. पेललें = पुढें आलें, दोंद वाढलें. सुरयोनि आंगें आठ ऊर्ध्वीची = कमरेच्या वरचीं, उर्ध्वीचीं, आठ आंगें. 'उर्ध्वे उजूं' = देवयोनि (उपदेव, उपदेवता = गौण देवता = गंधर्व, किन्नर इत्यादि) उपमान, उपदेव, अप्रधान, कमी महत्त्वाचें, नुसतें औपचारिक, गुणसंपादित (१०५). कंठ = गळा, आवाज, समीपता. उल्हासतां = विलसित (उल्लसित = पसरलेला, विलसित. उल्लास = सुखदायक, आनंद, तेज, भाग, वाढ, समृद्धि, काव्यालंकार विशेष. (कंठ वर्तिन् = गमनोन्मुख प्राण, अश्व कंठ रज्जू. कंठलता = हार). स्वर्ग = देवलोक. मध्यभाग–मध्य अर्ध भाग. अधोदेश = पाताळ. नितंबु = कुल्ला (१०६). बाळसें = पुष्टता (१०७). ते–तिये (१०८). मोहे स्तन्य–मोह स्तन्यें. नीच–नित्य (१०९). वेगळ वेगळिया–वेगवेगळिया. तया–तिया. कराग्री–करांग्री. आंगोळिया = बोटें. भिन्नाभिन्न–भिन्नाभिमान –भिन्नाभिमानी = भिन्नभिन्न प्रकृतीच्या अभिमान वाहाणाऱ्या. सूदलियां = घातल्या. मुदिया = आंगठ्या

(११०). एकलौते–एकोलते. अविचारित=अत्यंत. प्रसवोनि थोर थोरावली=प्रकृती हें विश्वरूप बाळ प्रसवून थोरावली आहे. थोरांची आवलीच जशी स्वतःस धन्य मानिती झाली (१११). माध्यान्ह–माध्यान. सांजविल=सायंकाळ (११२). महाप्रळईं जैसे–महाप्रळयसेजे. आले निदिजे=निवांत निजे. विषम ज्ञानें= विपरीत (विजोड, उंच सखल) ज्ञानानें. उभजे–उमजे=जागें होतें. कल्पोदुई–कल्पोदयीं=कल्पाच्या आरंभीं. उत्कर्षी=उत्पत्ती, वर येणें जें (११३). ईया परी–इयापरी. युगान वृत्तिचि करी=युगानु वृत्तीची करी=(चोज पाउलीं) युगापुढें युग हींच पाउलें टाकीत–चोज–क्रीडा करतें. युग हेंच युगाची कौतुक वृत्तीरूपी पाउलांनी आवृत्ती करते (११४).

(मम योनिर्महद्ब्रह्म). येन्हवीं पाहिलें असतां महत् (तत्त्व जें तेंच) ब्रह्म–शांत असें जें, तेंच ब्रह्म म्हटलें आणि ह्या शांतपणावरच मुळीं त्यास महत् असें नांव आलें–महानतेचें, गहनतेचें समृद्धतेचें, प्रशस्ततेचें कारण तेथेंच मुळीं ती गुणमयी, जेथें तिन्ही गुण हे समतोल स्थितीनें असणारे (महदादि विश्राम्) असें शांतपणाचें तें, शाळुंकाच जशी का अथवा विसांव्याची विश्रांतीची जागा का पाळच एक, तेथेंच महत्तत्वादिकांनीं थांबणें होणारें, शोभणारें असें नम्रपणच एक, श्लाघ्यताच एक (शालिहोत्र जें त्यास तर घोडा असेंच म्हटलें). (६८)

रूपांतर करणारी, विकारांत फेरफार करणारी बुद्धि, संज्ञा, खूण ही ती थोरीची करते, तेथें महत्त्व आहे असें मानते. नांवास एका आलेलें असें खरोखरीचें तें एक नांवास येणें हेंच ती करिते म्हणून तिजला महत्-ब्रह्म–नामब्रह्म म्हटलें, कारण तेथें संभावना, वितर्क, निश्चय, स्मरण, क्रोध, इत्यादि ऊर्मि नामच म्हटल्या गेल्या–नांवासच आल्या होत. [अर्जुना, असें हें नाम–महत्‌ब्रह्म (प्रतिष्ठाच एक ब्रह्मास आलेली ती)–अशा खरोखरीनें नामासच एक बुद्धिरूप आलेलें तें विकारांना म्हणजे फेरफारांना वा रूपांतरांना बहुवसतेची–मी अनेक व्हावें असा जो ब्रह्माचा संकल्प त्याची–संज्ञाच, खूणच, नांवच एक देऊन असणें आणि म्हणूनच तर त्यास महत्‌ब्रह्म असें म्हटलें तेंच जसें कां खलु ! खरोखर ! असें रूपांतरास विकारांना बहु ठिकाणीं वास्तव्य करून असलेलें असें असल्यानें तेथें व्यापकत्वामुळें थोर, मोठें का श्रेष्ठ असेंच तें ब्रह्म आहे असें म्हटलें सहजतेचें तें असें जाण–अवधारय. (शंकेचें–ढोंगाचें, संमति स्वीकाराचें–ओघाचें–स्मृतीचें–विस्मयाचें–निंदेचें–खरें असें–प्रसिद्धीस येणारें असें तें नाम जाण)]. (६९)

अव्यक्ताविषयींचा जो वाद तेथें अव्यक्त अशीच ती वदंती–लोकवार्ता–बातमी म्हटलेली, लोकांनी बोललें जाणारें, लोकांनी वार्तेमध्यें घेनलेलें असें प्रसर घेऊन असणारें बोलणें तें, अनुवद एकासारखें दुसरें बोलणें–निंदणें–नमस्कारणें–विरुद्धतेचें–उघड रीतीचें, उत्तर देणारें–वाद करणारें–करार मोडणें तें बोलणें व्यापास लागणारें असें–टीकेचें तें. सांख्य शास्त्राच्या प्रतीतीनें तर हीच प्रकृती मानलेली (परस्तस्मात्तुभावोन्यो-व्यक्तोव्यक्तात्सनातनः)=अव्यक्त, प्रकृति, अज्ञान, माया, अविद्या, ममता इत्यादि नांवें मूळ मायेचीं असून (तीच ही होय) स्वस्वरूपाचा विसर हेंच हिचें रूप आहे. (७०)

वेदांतामध्यें हिजला माया म्हणतात; व त्यानीं म्हणजे वेदांनीं इजला माया म्हणावें हें कांहीं नवल नव्हे, कारण वायाच असें हें बोलणें तें कितीही बोलिलें तरी तें अज्ञानाबाबतच असें हें अज्ञान वायापणें म्हणजे उगीचच बोलणें तें कशास कोण जाणें तें करावें ! अज्ञानाबाबत बोलणें अधिक तें नको. (७१)

आपला, आपल्या स्वतःस जो विसर (दैवैश्वर्य रूपवैभव विस्मरण, विस्मृती) तें ह्या अज्ञानास रूप असलेलें होय, तेंच ह्या अज्ञानाचें रूप जाण. (७२)

येथें आणिक एक गोष्ट आहे ती अशी कीं जें अज्ञान विचाराच्या म्हणजे सारासारविचाराच्या अथवा आत्मानात्म विचाराच्या वेळेस तें एकरूपच दिसतें–वेगळें असें दिसत नाहीं. असें आकाश, वायू,

चंद्र, सूर्य ह्यांना बोलण्याचालण्याच्या आधाराचें करून पाहिलें असतां, अंधारें दिसत नाहींत, नाहिंसें होतें, अज्ञान मावळतें जसें तेल वातीच्या दिव्याच्या उजेडानें पाहिलें असतां अज्ञान अंधारे दिसत नाहींत, नाहिंसें होतें. (७३)

हालविलया–हालल्या–विलयास जाते, निश्चळीतर सांचते—दुधामध्यें जशी दुधाची साय ती. (७४)

पण जागर म्हणजे जागें असणें असें ही जागृत अवस्थाही नाहीं, अथवा स्वप्न असेंही नाहीं, अथवा स्वरूपी राहाण्याच्या ठिकाणचें होणें एक असेंही नाहीं—अशी ती गाढ (घन–कठिण–सामुदायिक, घट्ट जसें मेघाचें मेहुडें) निद्राच—सुषुप्तीच जशी का त्रिगुणांच्या समुदायाचा गुणाकारच जसा. (७५)

वायू उत्पन्न होण्यापूर्वी जसें आकाश हें रिकामें–रितें असतें, खरोखरी (तेथें दुसरी उपमाच पुरत नाहीं) निःसंगतेचें म्हटलेलें–अगदीं तशीच ही मूर्खता अविद्या, अजाणपण का अज्ञान जाण–होय–असतें–आहे. (७६)

पैल पैल–लांब–दूर का समोर असलेला, पलिकडे असलेला, तो खांब म्हणावा का महादेव म्हणावा का झाडाचें खोड म्हणावें का स्थिर म्हणावा, पुरुषच एक तो, असा ज्यास कां ज्याचा कांहींही निश्चय होत नाहीं, करितां येत नाहीं असा निश्चय होईना ! पण काय करावें अहो ! कीं तेथें तर आलेख, अलेख, अलोफु–आभास, अद्‌भुत पाहाणें का प्रकाश असा (का अलोक असें उजाड का निर्जन) तेथें त्या आभासाबाबत कांहीं निश्चयच होईना। अहो तेथें कंपित असें तें, तेथें चित्र का रंगविण्याची क्रियाच ती, तेथें तें काय आहे तें कांहीं जाणतां येत नाहीं, पण पाहाणें दिसत आहे (उजाळा का) उजाडतेचें अद्‌भूतपण कंपितपणामुळें पाहाणें तें–प्रकाश तो चित्रच एक जसें. (७७)

त्याप्रमाणें वस्तू ती जशी कांहीं असते तसें तें (देखणें) दिसणें दिसत नाहीं–पण वस्तू अमूक तऱ्हेची अशीच असली पाहिजे का वेगळी–निराळी अशी असते असेंही देखणें तेथें नाहीं. (७८)

तेथें रात्र नाहीं अथवा तेजही पण नाहीं अशी ती संधिवेळा (सायंकाळ) जशी सांज म्हटली जाते, तसें तेथें स्वरूपही नाहीं व जगही नाहीं तसें तें जाणपण, अजाणपण (अज्ञान कां अविद्या) महत्त्व पाहून असतें. (७९)

अशी जी कांहीं एक ज्ञान अज्ञान दशा तिजला देहपाणी वृत्तांत असा एक वाद करणें, कां चर्चा ती, तेथें त्या गुंडाळलेल्या, आच्छादिलेल्या प्रकाशासच मुळीं क्षेत्रज्ञ असें नांव आहे. (८०)

अज्ञान थोरपणास आणणें–महत्त्वानें वाढविणें करणें जें, जेथें कां स्वतःस कां आपल्या सर्वस्वास तर नेणूनच तें क्षेत्रज्ञाचें रूप जाणण्याचें करावें. (अज्ञानाचें कां ज्ञानाचें आवरण झालेल्या चैतन्यासच अज्ञान म्हणतात). (८१)

असा हा क्षेत्र व क्षेत्रज्ञासंबंधीं का पुरुष व प्रकृती अशा उभयांचा योग मिलाफ बाप्पा ! चांगल्या तऱ्हेनें समज—जाण. हा तर सत्तेचा म्हणजे आत्मतत्त्वाचा का अस्तित्वाचा स्वाभाविक असा मूळचा धर्म म्हणजे सहजकर्मप्रकृती याथातथ्यता होय. (८२)

अज्ञानास सारखेंपण जें कां वस्तू ही आपणच आपल्यास पाहाते, आपल्या स्वतःस देखणें देखते, पण रूपें अनेक जीं, जेथें उत्कंठितताच एक परिणभूत असलेली (एकच नांव अनेकांनीं धारण केलेलें तेथें सर्व उत्कंठाच एक वागत असलेली) म्हणून तेथें तो आत्माच एक पण त्याचें तें रूप जाणणें हें जाणलें जात नाहीं–तें कुणी जाणावें असेंच तें त्या आत्मतत्त्वाचें असणें होय. (८३)

कृपण, दरिद्री, रंक, भ्रमहत होऊन भ्रमला व म्हणूं लागला कीं कां कोणी एकास तुच्छतेच्या कोठींत बसवूं लागल्यानें, तेथें तो तर 'जा'! मी रावच एक मोठ्या मोठेपणाचा असा येथें आलों आहें. अथवा बेशुद्ध झालेला–घेरी आलेला–मूर्छित झालेला तो तर स्वर्ग पाहून आलों, स्वर्गास गेलों होतों असें म्हणतो. (८४)

त्याप्रमाणें दिठी म्हणजे दृष्टि ही स्वस्वरूपापासून चळली म्हणजे जें जें कांहीं एक देखणें देखिलें होतें–पाहाणें होतें–त्यासच मुळीं सृष्टि हें नांव आहे. त्यास खरोखर–खलु नाम सृष्टीं मीच्–त्या सृष्टीस तर खरोखर मीच वीतों–अंथरतों कीं, डोळयांनीं जन्म दिलेली–ठाकलेली, निर्माण केलेली सृष्टि म्हणजे उत्पत्ति, स्वभाव, अथवा जग हें मीच होय–हें मीच वीतों–उत्पन्न करणें–दिसण्यास देतों, अंथरतों. (८५)

जसें कां पाहा! पाहा! स्वप्न हेंच मोह भ्रांति व्यालें–तेथें तर एकाकिन् एकला एकच पण तोच बहुविला गेला, अनेकतेचा देखिला, असें जें कांहीं तोच मुळीं पाड म्हणजे विस्तार, पवाड, महत्त्व, कां इच्छा स्मरणा-शिवायच मुळीं असून आत्म्यासच पाहाणारी, आत्म्यासच वीणारी, अशी होय–आत्म्याचें व्यापकपणच एक असा तो विस्तार कां आत्माच उपमिला गेला जसा. (८६)

असें आत्म्याचें व्यापकत्व तेंच भ्रांति आणतें–भ्रांति उत्पन्न करतें. यासंबंधीं पण मोहून न जातां कां भ्रांत न होतां याची प्रतीती–अनुभव घ्यावा व पुढें कां मागें स्पष्ट असे ते सिद्धांत स्पष्ट करून सांगण्याचें करूं, पण तूं भ्रांत न होतां, न गोंधळता ह्या आत्म्याच्या व्यापकपणाची ती प्रतीती–प्रचीती अगोदर घे. (८७)

अविद्या–न विद्यते सा अविद्या–इये नाहीं हेंचि रूप–नाहीं हेंच हिचें रूप–ही माझी गृहिणी म्हणजे पत्नि असून, अनादि म्हणजे आरंभ उत्पत्ति रहित अशी तरुणी सोळा वर्षापासून तीस वर्षापर्यंतची स्त्री न सांगण्यासारखी गृहस्थाश्रमीची शुभ अथवा मुख्य अंगभूत गुणयुक्त अशी होय. (८८)

ह्या अविद्येस तर नाहीं हेंच रूप–हिचें ठाण का आकृती ही फार मोठी व्यापक. ही निद्रित जो आहे त्याच्या अगदीं जवळची असून–निद्रिस्ताच्या सान्निध्याची असून जागृताला दूर अशी होय. (८९)

माझें अंग जेव्हां का निजतें, झोपी जातें, मी निजलों असतां ही जागते—दिसते, प्रगटते, 'तें हें जग होय' आणि आत्मसत्तेच्या संभोगानें ही गरोदर होते–अतिशयतेची होते. (९०)

महत् ब्रह्म म्हणजे मूळ मायेच्या उदरीं, पोटीं, अष्टधा प्रकृती ही प्रकृती विकाररूप गर्भाची पेलोवेली वृद्धि, वाढ करिते. (९१)

उभयसंग पहिले– आत्मा व प्रकृती यांच्या संयोगानें पहिल्या प्रथम अगोदरचें असें तें बुद्धितत्त्व प्रसवलें–उगवलें होतें व ह्या बुद्धितत्त्वाच्या भरानें का भारानें (कां बुद्धितत्व भरलें गेल्यानें–भाराचें तें भरलें होऊन, भारलेलें बुद्धितत्त्व, तेंच मन) मन हें उत्पन्न होतें–मन मनपणास येतें. (९२)

तारुण्यता तीच मनाची ममता, ममता मनाची ही तरुणी भूतादीम् अव्यक्त तत्व—अहंकार रचते, बांधणीचें करते व ह्यामुळेंच पंचमहाभूतांची अभिव्यक्ति व्यक्ति उत्पत्ति होते. महाभूतें हीं स्थूल देहाभिमानी जो जीव त्या जीवदशेस येतात. (९३)

आणि विषयांचा व इंद्रियांचा परस्पर संबंध जोडते. तेथें सहज स्वभावेंकरूनच तीं पंचमहाभूतेंही पण गवसलीं होतात. आणि म्हणून तीं पंचमहाभूतेंही पण आपआपल्या सरसेपणानें रंगारूपास येतात; कां विषय व इंद्रियेंही पण ह्या पंचमहाभूतांबरोबरच उत्पन्न होतात–रूपास येतात. (९४)

विकार क्षोभ–विकार वाढल्यावर पाठोपाठ त्रिगुण उत्पन्न होतात. तेथें वासना हीच गर्भाची–परीघाची –व्यासाची ती होऊन आपली सीमा पाहाणारी होते–वासना महत्तीनें तें ठावाचें होतें, ठिकाणाचें होतें. वासनांचें अनादिपण हें तात्काळ ठावच पाहाणारें होतें. (९५)

झाडाच्या आंवाक्यानें- आकारानें जशी बीजकणिका–पाण्याची व तिची भेट झाल्याबरोबर–पाण्याची गांठ पडतांच घट्ट बांधीत अशी बी बनते. (९६)

तशी माझ्या संगानें अविद्या जगाजगाच्या, अनेक जगाच्या अंकुरास येते, तेथें अनेक जगें उत्पन्न होतात. (९७)

मग जसा का गर्भाचा गोळाच एक–अशा त्यास जसें का एका रूपास येणें तेंच महत्त्व पावून असतें– भूषविलें होतें; तें कसें तें हे राया, सुजनाच्या कुलीन, सुंदर, सुकुमार जे त्यामध्येंदी श्रेष्ठ अशा तूं हे अर्जुना ऐक. (९८)

पण अंड्यापासून पक्षी, वासापासून उवा, कृमी, पृथ्वीपासून उद्भिज वृक्ष, व वार जी तिच्यापासून झालेलीं मनुष्यें हे वर्ग अवयव विभाग उमटतात-चित्रित होतात–उगवतात. (९९)

व्योमीच्या वायूमुळें मणिज म्हणजे अंड्यापासून जन्मलेलें तें वाढलेल्या गर्भरसानें बाहेर पडतें– जीवन जीवित पावतें. (१००)

तम रजात्मक गर्भ वाढल्यानें तोय म्हणजे पाणी व तेज म्हणजे प्रकाश यांचा अंश ज्यास्त अशा घामापासून निपजला असा तो प्रकार स्वेदजांचा होय. (१०१)

आपाचें म्हणजे जलाचें का पाण्याचें तसेंच पृथ्वीच्या जमिनीच्या अंशाचें उत्कटपण–अतिशयपणानें तसेंच निखळ तमोमात्रच असें हलकें त्यावरच मुळीं अचल वस्तु, स्थितिशील वस्तु, स्थूल शरीर, वृक्ष इत्यादींचें जसें जमिनीपासून उत्पन्न होणारें तें उगवतें, उत्पन्न होतें. (१०२)

पंचप्राणांना (आत्मा) पंचतत्वें हीं रजरहिततेनें मन, बुद्धि इत्यादि सहज सज्ज साजी–अशा उपपत्ति पासून जन्मवितात–उत्पन्न करतात, जन्मलेलीं होतात. (१०३)

असे हे सरळ तळ चार म्हणजे दोन चरण व दोन हात ह्यांचे तळ हे सरळलेले होतात तेथें स्थूळ जी महाप्रकृती तीच शीर म्हटलें आहे. (१०४)

प्रवृत्ती हीच दोंद वाढलेलें–निवृत्ती ती सरळ का नीट अशी पाठ जाण. येथें कमरेच्या वरचीं–ऊर्ध्वाचीं तीं आठ आंगें ही सुरयोनी होय (उपदेव, गंधर्व, विद्याधर, गौण देवता–नुसतें औपचारिक गुणसंपादित, अप्रधान, कमी महत्त्वाचें, ऊर्ध्व उजू–देवयोनी–कमरेच्या वरचीं आंगें). (१०५)

कंठ समीपता गळा आवाज विलसित–शब्दानें प्रसर घेऊन विलसित झालेला–उल्हासला–असतां– स्वर्ग. मृत्युलोक तो मध्य भाग–मध्यार्ध भाग. अधोदेश–पाताळ. चांग म्हणजे भला तो असा तो नितंब म्हणजे कुल्ला जाणावा. (१०६)

असें एक लेकरुं प्रसवली ती–असें जाण. ज्याचें बाळसें–ज्याची पुष्टता ही म्हणजेच हे तिन्ही लोक होत. (१०७)

चौऱ्याऐशीं लक्ष योनी ह्याच ह्या बाळकाच्या वाढीसाठीं उपयोगाच्या होऊन, कांडा पेरांना सादणीच्या– सादाच्या झाल्यानें, हें बाळक दिवसेंदिवस वाढत राहातें. (१०८)

अनेक देहाच्या देहांनी–देहा अवयवांनीं–अवयवाच्या ठायीं नामाचीं लेणी लेते. नामरूपी अलंकाराचे अलंकार पेहनते व मोहामुळें मोहिततेनें, नवें नवें असें वाढीचें खाद्य पेय—लोभाचें का मोहाचें तें करीत राहाते. मोहरूपी दुग्ध पिण्यास मिळाल्यानें नित्य नवें हवें असेंच एक इच्छा वाढीचें करून असतें. (१०९)

वेगळाल्या–वेगवेगळ्या सृष्टी ह्याच कर अंघ्री घातलेल्या आंगोळिया, बोटें–आंगठ्या. तेथें भिन्नभिन्न प्रवृत्तीचा अभिमान वाहाणाऱ्या मुदिया म्हणजे आंगठ्या घातल्या आहेत. (११०)

हे एकुलते एक एकौलते–एकोलते–चराचर हें अत्यंत सुंदर असें हें विश्वरूप बाळ प्रसवून प्रकृती ही स्वतःस धन्य मानिती झाली—प्रकृती थोरावली आहे, प्रकृती ही थोराची आवलीच जशी. (१११)

येथें आतां ह्या बाळास ब्रह्मदेव—कां ब्रह्मा हाच प्रातःकाळ होय. श्रीविष्णु तो माध्यान्ह जाणा, व सदाशिव तो सायंकाळ–सांजवेळ होय. (११२)

महाप्रळयरूपी सेजेवर–खेळ खेळून दमून आलेलें तें निजतें. व पुन्हां कल्पाचा उदय झाला म्हणजे विषय ज्ञानानें (उमजूं लागतें)—जागें होतें–कां विषय ज्ञानानें म्हणजे विपरीत ज्ञानानें हें विजोड उंच-सखल असें उभजे वर येतें, उत्कर्षास येतें, उभें होतें, वाढूं लागतें. (११३)

हे अर्जुना! याप्रमाणें दृष्टी ही (सृष्टी) आरोपलेली तेथें तिच्या घरीं युगापुढें दुसरें युग अशीं पाउलें टाकीत क्रीडा करते. युग हेंच युगाच्या कौतुकाची अशी वृत्ती—वृत्तिरूपी पाउलाची आवृत्ति करते. (११४)

**सर्व योनिषु कौंतेय मूर्तयः सम्भवंति याः ।**
**तासां ब्रह्ममहद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥**

सर्व योनिषु=भूतभेदामुळें, भूतप्रकारामुळें, अनेकत्व, म्हणून येथें योनि म्हणजे उत्पत्तिस्थान किंवा अधिष्ठान हेंहीपण अनेकत्वानें असलेलें म्हणून, येथें योनि म्हणजे भेद हे अनेकपणामुळें अनेक–म्हणून सर्व योनीमध्यें. हे कौंतेय=हे कौंतेया अर्जुना. याः मूर्तयः संभवन्ति=ज्या मूर्ती शरीरधारी प्राणी जन्मतात. तासाम् मूर्तयः=त्या मूर्तींची, त्या शरीरधारी प्राण्याची. महत्ब्रह्म योनिः=जरी अनेकपणानें असलेले ते भूतमेद तरी योनी ती एकच तें महत्ब्रह्म होय व बीजप्रदः पिताऽहम् बीजप्रद—जन्माचें कारण जें बीज तें तेथें स्थापन करणारा मी पिता जाण.

अन्वयः—(महत् ब्रह्म मम योनिः। ततः सर्व भूतानाम् संभवः। अतः महत्ब्रह्म मम योनितः भूतयोनि–भूत प्रकाराः संभवन्ति। भूत मेदाः, प्रकाराः, योनितः संभवः। अतो सर्वे योनिः। सर्वे प्रकाराः–मेदाः भूततः–योनितः संभवः॥ अतः) याः मूर्तयः व्यक्तयः सर्व योनिषु संभवन्ति। कौंतेय, तासाम् मूर्तयः। योनिः महत् ब्रह्म। तथा। बीजप्रदः पिता अहम्। (४)

**संकल्प ययाचा ईष्ट। अहंकार विनट।**
**ऐसयां होय तै सेवट। ज्ञानें ययां ॥ ११५ ॥**
**आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली।**
**ते जांघ घाली। माझी सत्ता ॥ ११६ ॥**
**या कारणें मी पिता। महत् ब्रह्म माता।**
**अपत्य पाण्डुसुता। जगडंबरू ॥ ११७ ॥**
**आतां शरीरें हे बहुतें। देखोन न भेद हो चित्तें।**
**जें मन बुध्यादि भूतें। येकेचि येथ ॥ ११८ ॥**

हा गा येकेचि देहीं। काई अनारिसें आवेव नाहीं।
तेंवि विचित्र विश्व पांहीं। येकचि हें ॥ ११९ ॥
पैं उंचा-निचां डाहाळियां। विषमा वेगळालिया।
येकाचि जेवी जालिया। बीजाचिया ॥ १२० ॥
आणि संबंध तोही ऐसा। मृत्तिके घट लेकु जैसा।
कां पटत्व कापसां। नातु होये ॥ १२१ ॥
नाना कल्होळ परंपरा। संतती जैसी सागरा।
आम्हां आणि चराचरां। संबंध तैसा ॥ १२२ ॥
म्हणौनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ।
तेंवि मी गा सकळ। संबंध बावो ॥ १२३ ॥
जालेनि जगें मी झांके। तरि जगत्वें कोण फांके।
किळेवरी माणिकें। लोपिजें काई ॥ १२४ ॥
अलंकारातें आलें। तरी सोनेपण काये गेलें।
कीं कमळ फांकलें। कमळत्वां मुके ॥ १२५ ॥
सांग पां धनंजया। आवेवीं आवेविया।
आच्छादिजे कीं तया। तेंचि रूप ॥ १२६ ॥
विरुढलिया जोन्हळा। कणिसाचा निर्वाळा।
वेंचला कीं आगळा। दिसतसे ॥ १२७ ॥
म्हणौनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें।
तैसा नोहे उखितें। अवघाचि मी ॥ १२८ ॥
हा तूं साचोकारा। निश्चयाचा खरा।
गांठी बांध वीरा। जीवाचिया ॥ १२९ ॥
आतां मिया मज दाविला। शरिरीं वेगळाला।
गुणीं मीचि बांधला। ऐसा आवडे ॥ १३० ॥
जैसा स्वप्नि आपण। उठुउनियां आत्म मरण।
भोगिजे गा जाण। कपिध्वजा ॥ १३१ ॥
कां कवळातें डोळे। प्रकाशूनि पिंवळे।
देखती तेंही कळे। तयासीचि ॥ १३२ ॥
नाना सूर्य प्रकाशें। प्रकटितें अभ्र भासे।
तो लोपला हेंही दिसे। सूर्येच कीं ॥ १३३ ॥
पै आपलेंपण जालया। छाया गा आपलिया।
बिहूनि बिहालिया। आंत आहे ॥ १३४ ॥
तैसी यिये नाना देहे। दाउनि मी नाना होये।
तेथ ऐसा जो वंदु आहे। तेही देखे ॥ १३५ ॥
बंदु की न बंधिजे। हें जाणणें मज माझें।
नेणणेनि उपजे। आपलेंन ॥ १३६ ॥

संकल्प ययाचा ईष्ट–संकल्पु जयाचा इष्टु=संकल्प करणें हेंच ज्यास प्रिय कां आवडतें असे. अहंकार विनट–(भूतादिमव्ययम्) अहंकार तो निकट [विनट=खेळगडी, सेवक]. ऐसया–ऐसिया. तो सेवट–सेवट. ज्ञानें ययां=आत्मज्ञान झालें कीं, हें विश्व–दृश्यरूपी बाळ संपतें (११५). विश्व–विस्व. ते जांघ [जांघ= जासूद, शीघ्रगामी (उंट, मृग)]. झाली–तेथ साद्य झाली (११६). शरिरे हे–शरीरे. देखोन न भेद– देखोनि न भेदे हो चित्तें=भूताभूतांत भेद आहे असें मनांत आणूं नकोस, चित्तामध्यें अथवा चित्तानें भेदला जाऊं नकोस, फोडला जाऊं नकोस, चुगलखोरीनें वेगळा केला जाणें जें तें भेदलेपण घेऊं नको. येकेचि–एकेचि. येथे–एथ (११८). येकेचि देहीं–एकचि देहीं. काई–काय. अनारिसें=वेगवेगळें. आवेव–अवयव. येकचि–एकचि (११९). उंचा नीचा=विजोड, उंच असलेल्या कां खालच्या (१२०). संबंध–समबंध–अंध सम संबंध= संमाद, आनंद, संपर्क, संयोग [संबंधिन्–नातलग, मित्र. संबद्ध=संलग्न, निकटचा]. लेकु=अपत्य. कापसां –कापुसा (१२१). नाना=अथवा. संबंध=संयोग, नातें. अद, अध=हपापलेल्या प्रमाणें आवळलेला. संबंध बावो (वाव)=नातलगपणा हा व्यर्थच (१२३). जगें–जागे. किळेवरी–कळिकेवरी–कीळेवरी माणिकें लोपिजें काई=माणिक आपल्या किळेनें म्हणजे तेजानें काय कधीं कां झांकलें आहे? झांकलें जातें? (१२४). अलंकारातें आलें–भूषण चमत्कृतिजनक. भाषण प्रकार–का अलंक्रिया म्हणजे अलंकार घालणें, भूषित करणें. सोनेपण=जीवदशेस जोडलेलें वालभ तेंच सोनेंपण अथवा असेंही म्हणूं कीं सोन्याचे अलंकार केले तेथें सोनेंपण तें काय नाहीसें झालें म्हणावें? (१२५). आवेवीं आवेविया=अवयव अवयविया. [आच्छादिजे (झांकावे, वस्त्राचे करावेत, पोषाखाचे केले, कापडानेंच जसें झांकलें) कीं तया तेचि रूप]=अवयव (विभाग) हे अवयवीचेच–शरीराचे म्हणजे अवयव असलेलें जें शरीर त्याचें तें रूप नव्हे काय? (१२६). जोन्हळा–जोंधळा. निर्वाळा=निर्वाळणें, शुद्ध करून घेणें, दाणे काढून घेणें, प्राप्ति, लाभ. वेंचला=कमी झाला. कीं आगळा= का महत्त्वास आला, वाढला (१२७). म्हणौनि–म्हणोनि. जग परौतें–जगापरौते. सारूनि–सारोनि. पाहिजे–पाहावें. नव्हे–नोहे. उखितें=अवघें, एकंदर, संपूर्ण. आघवाची मी–अघवे मीची (१२८). हा तूं सांचोकारा=सांचेपणाच्या सिद्धांताचा हात (स्वचारिका=युग्म, दंपत्य, जोडपें). गांठी बांध=पदरीं बांध, पदरांत घे, पदरांत बांधून ऐस. जीवाचिया–जिवाचिया (१२९). बांधला=घडला, घडीव केला. आवडे=दिसतो (१३०). स्वप्नि–स्वप्नी. उठउनिया–उठोनिया. बुद्धि ही स्वप्नांतलें मरणें मरण्यासारखी वृत्ति घेऊन असते म्हणून तिला दृष्टि सांपडत नाहीं.

'एरव्हीं होय ते वस्तु तोचि आहे।
परि काय कीजे बुद्धि तैसी नोहे।
देखा स्वप्नीचेनि घाये। की मरे सांचे ॥ ७५(६)

(एवमात्मारणौ)

एवं आत्मा अरणौ ध्यानमंथने सततं कृते।
उदितावगतिर्ज्वाला सर्व अज्ञान इंधनं दहेत् ॥ ४१ ॥ (आ. बो.) (१३१).

अवगति=ज्ञानबळ.

कवळातें=काविळीस (१३२). नाना=अथवा. प्रकाशें=प्रकाशानें. प्रकटितें=प्रगटतें. प्रकटी तै= प्रगट ऐसे. भासे–दिसे. लोपला=तो सूर्य अभ्रामागें लोपला. हेहि–तेही (१३३). आपलेंपण–आपणपेनि. आलया–जालिया, आपलिया, आपुलिया. बिहूनि–बिहोनि (१३४). दाउनि–दावुनि. बंधु–जो बंधु. तेहि–तोहि (१३५). बंधु कां न बंधिजे–बंधचि की न=बंध अथवा मोक्ष. आपलेन–आपलेनि स्वयं जें त्यास नेणण्यानें (आत्मबोध ८/९).

सच्चिदात्मन्यनुस्यूते नित्ये विष्णौ प्रकल्पितः ।
व्यक्तयो विविधाः सर्वा हाटके कटकादिवत् ।
यथाकाशोऽहृषीकेशो नानोपाधिगतो विभुः ।
तद्भेदाद्भिन्नवत्भाति तन्नाशेसति केवलः ॥ (१३६)

संकल्प करणें हेंच ज्यास प्रिय कां आवडतें असें–, अहंकार तो खेळगडी–, आत्मज्ञान झालें कीं हें विश्व दृश्यरूपी बाळ संपतें–, आटोपलें होतें. (११५)

आतां अशीं हीं पुष्कळशीं बोलणी असोत–पण हें असें एक बाळ, ही विश्वमाया व्यायली आहे; तेथें माझी सत्ता तीव्रगामी जांघ साह्य झाली. (११६)

या कारणास्तव मी पिता होय. महत् ब्रह्म ही माता जाण. व हे पांडुसुता ! अपत्य तें हा जगडंबर (जगत्=स्थावर जंगम वस्तु, वायु, जग, देह. डंबर=प्रसिद्ध, समूह सादृश्य अवडंबर ) जाण. (११७)

आतां हीं बहुत शरीरें–अशा ह्या शरीरावरच मुळीं हें बहुनतेचें होणें तें, तेथें तूं आपलें चित्त हें भेदलें असें करूं नको–चित्त हें अनेकपणाचें करूं नको. एकाच ह्या चित्तावरच मुळीं तें मनपणाचें होणें, कां बुद्धि अशा लक्षणाचें तें तीं जशीं भूतेंच मुळीं हीं अनेक जरी तरी तीं एकपणाची जशी कां होत असल्यानें तूं आपलें चित्त हें अनेकपणाचें होऊं देऊं नको–करूं नको. चित्त हें चित्तच एक देवदिव्यपणाच्या कायमपणाचें असेंच करून ऐस. (११८)

असें पाहा कीं, ह्या एकाच देहाच्या ठायीं असलेले ते अवयव ते कांहीं निरनिराळया देहाचे नव्हत; ते तर एकाच देहाचे होत. तसें विचित्र जरी हें विश्व तरी पण तें एकच–आहे कीं–एकच हें विश्व चित्र विचित्र जरी. (११९)

झाडाच्या डाहाळया ह्या कांहीं उंच, कांहीं खालपट, कांहीं विषम, अशा वेगळाल्या त्या तर एकाच मुळीं बीजाच्या झालेल्या नव्हत का ? (१२०)

येथें संबंध कसा तर घट हा मातीचा बनलेला, तो मृत्तिकेचें अपत्यच जसें अथवा, तंतूचें वस्त्र विणलें होतें म्हणून तंतू हा कापुसाच्या ( कापसाचें सूत, सुताचें कापड, कापडांतील तंतू हा–कापसाचा नातू होय ना ) नातूच जसा कां. (१२१)

सागरास जशी लाटांची–कल्लोळाची–परंपरा ही सागराची संतती म्हणावी तसा (आमचा) आम्हांस आणि ह्या सर्व चराचरास तशा तऱ्हेचा संबंध आहे. (१२२)

आणि म्हणून वन्हि का ज्वाला हीं दोन्हीही जशीं एक केवळ वन्हीच त्याप्रमाणें सकळ कांहीं मीच आहें—येथें ज्वालेचा वन्हीशीं संबंध कां नातेवाईकपणा तो कसचा न् काय ! (१२३)

जगाच्या होण्यानें मी झांकतों म्हणावें तर मग जगपणानें जो प्रकाशतो तो कोण ? जगरूपानें तो कोण प्रकाशतो म्हणावा तो ! अहो रत्नाची, माणकाची प्रभा, ही प्रगटली–उघड, स्पष्ट, जाहीर झाली, प्रकाशली तेथें माणिकाचा का रत्नाचा लोप झाला नसून दोन्ही ती प्रभा व रत्न रत्नच कीं एक प्रकाशासहीत असें. (१२४)

भूषण, अलंकर घडला जरी तरी पण ज्या सुवर्णाचा–जीवित सुवर्ण वालभाचा, प्रेमाचा तो केलेला, घडलेला तें (वालभ) सुवर्ण कोठें गेलें ? तें, जीवदशेचें जोडलेलें वालभ–सुवर्ण काय नाहिंसें झालें म्हणावें ? अथवा, कमळ हें विकास पावलेलें तें तेथें त्याचें कमळपण काय नाहिंसें होतें ? त्यास कमळ असें जें म्हणणें होतें तें काय तसें तें कमल असे म्हणणें ठरत नाहीं, सरत नाहीं, रहात नाहीं काय ( पाहाणारांनीच मुळीं तें कमळपण नटविलें होय ) ? (१२५)

हे धनंजया ! सांग बरें, कीं अवयवांनीं अवयवास (अवयवीस) आच्छादिलेलें जें तेंच तर मुळीं अवयवाच्या–शरीराच्या अवयवीच्या एका रूपास येणें होय नव्हे का ? (१२६)

जोंधळा उगवलेला तो काढून टाकला, तेथें कणसामधील दाणे ते काढून घेतले, ते स्वच्छ करून घेतले, तेथें तो जोंधळा वेंचला म्हणजे खर्च झाला म्हणावा कां आपल्या महत्त्वास का आगळेपणास आणला असें म्हणावें तें ! (१२७)

या करितां असें नव्हे कीं जग हें परौते–परतें करून, पलीकडे सारून मजला पाहावें; तसा मी पाहावा असें नाहीं पण, उखितें म्हणजे संपूर्ण हें कांहीं जें जगत् तें अवघें तो एकंदर अवघा मीच होय. (१२८)

असा हा पाहाणारा हात, खरेपणाच्या सिद्धांताचा हात–तूं खरेपणानें, निश्चयाचा खरा असा होऊन, आपल्या जीविताशीं हें जग अवघा मीच ही गोष्ट तूं आपल्या जीविताशीं पक्की बांधून ठेव. (१२९)

याप्रमाणें मीच मी आपल्यास दाखविला तो कसा तर वेगवेगळया शरीराच्या ठायीं वेगवेगळा असा तसेंच गुणामध्येंही पण मीच घडला आहें असाच मी आवडून आहें कीं अहो ! (१३०)

बुद्धि ही स्वप्नातलें मरणें मरण्यासारखी वृत्ति घेऊन असते म्हणून येथें स्वप्नामध्यें आत्ममरण उठवून, उठोन–उठल्यानें आपणच तें भोगण्याचें करावें. तसें हे कपिध्वजा ! हें आहे–आत्ममरण उठून तें भोगूं लागलें, स्वप्नामध्येंच असलेलें, तें बुद्धि जीवितलिंग जसें. (१३१)

काविळीनें डोळे पिवळे असे ते, ते जें कांहीं पाहाणार, दर्शविणार का प्रकाशविणार तेंही पण पिवळेंच व असें तें देखणें हेंही पण त्यांनाच म्हणजे त्या पाहाणाऱ्या डोळयांनाच मुळीं तें कळतें, समजतें, उमजतें,–कीं कामिनीमुळेंच असें होत आहे तें पिवळें दिसत आहे तें. (१३२)

अथवा सूर्यप्रकाशानें प्रगट, उघड, स्पष्ट, असे ते अभ्र हेंच दिसूं लागतें–भासतें, तेथें तो सूर्य त्या अभ्रामागें लोपला आहे हेंहीपण त्या सूर्यामुळेंच कीं अहो दिसतें–समजतें ना ! (१३३)

आपणा स्वत:चे ठायींच स्वत:मुळेंच जी छाया जाहाली, ती आपलीच छाया जरी तरीपण तेथें भिऊन जाऊन मिणेंच एक घेतलें तर तें मग कांहीं आन म्हणजे निराळेंच असें मानणें होय–मानणें तें होतें पण तेथें कांहीं कां एकादें दुसरेंपण असतें काय ? (१३४)

त्याप्रमाणें हे अनेक देह दाखवून मी अनेकपणाचा होतों–तेथें जो कांहीं एक नानात्वाचा बंध (रचणें, मन लावणें, वृत्ति धरणें), रचनाभार आहे तोहीपण मी पाहातोंच पाहातों. (१३५)

असा हा रचनाभार कां न बरें रचना कौशल्यानें आपलासा करावा, बांधावा, रचावा ? असें मीच मजला जें कांहीं जाणणें तें आपल्या स्वत:स नेणण्यानें समजूं–उमजूं लागतें–उत्पन्न होतें–उगवूं लागतें. (१३६)

## सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृति सम्भवाः ।
## निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

विवरण शब्दार्थ—प्रकृतीचे गुण हे तीन प्रकारचे ! ते आत्म्यास देहामध्येंच बंधतेचे करतात–कसे ते सत्त्वामुळें सुख, रजामुळें सुख दु:ख मिश्रित प्रवृत्ति, व तमामुळें अज्ञान. मन, बुद्धि, चित्त इत्यादि भूत, का वस्तू, का प्रकार, का पदार्थ, हे जरी बहुत का अनेक तरी तेथें चित्तास न भेदतां पाहिलें तर ते सर्व

एका शरिरामधूनच असलेले असल्यानें तेथें चित्त हें भेदता जर पाहिलें तर एका देहाचे ते होत. मन, बुद्धि इत्यादि भूतांच्या भेदाभेदामुळें व शरीराच्या बहुतपणामुळें ती मन, बुद्धि, भूतें हीं अनेकपणाचीं अशीं नच पाहावीं. तेथें एक जें चित्त तेंच मुळीं सर्वांठायीं चिंतितत्तेचें असल्यानें तेथें अनेक शरीरें जरी तरी चित्त तें एकच होय–तसेंच मन, बुद्धि हींहीपण एकच होत. गुण म्हणजे चित्तानें भेद पाहिल्यामुळें मन, बुद्धि इत्यादि भूतें किंवा पदार्थ हीं एकाच देहापासून किंवा देहाच एकापासून असल्याकारणानें एक देहच तेथील अधिष्ठान होय. असें तें चित्तभेदानें देह अधिष्ठान जसें, देहाच्या आश्रयाचें असणें जसें तसें येथें एकाच देहाचे अवयव तेथें वेगवेगळाले पण जितके अवयव निराळे देह हा एकाच देहाचे ते नाहींत पण एकाच देहाचे ते. ते जर वेगवेगळे मानिले तर तेथें सहजच मग अनेकत्व नसलेले जरी तरी बहुत का अनेक अभाच आरोप जर केला तर तें बरें कसें! कारण एकाच देहाचे ते अवयव असल्यानें हें विश्व एकच जरी तरी अनेकत्वानें भासमान होणारें होतें असे हे चित्तास गुण लागल्यामुळें ज्या प्रकारचें तें भासतें तेथें नांव-हीपण येतें. म्हणून येथें उत्तमत्व हें सत्व होय; मध्यम तें रज, व कनिष्ठ तें तम जाण. जर चित्तानें हे सर्व अनेक न मानतां एकच मानले, मानावे तर एकच विश्व तेथें पण मायेच्या बहुविधतेच्या भासामुळें तें विविधतेचें असें, असा त्या चित्तास लागलेल्या गुणामुळें मुळीं तेथे भेद का प्रकार मानले जाणारे. म्हणून गुण–प्रकृती–कृतीप्रत आलेली रचना ती, योनी–तबीयत, तब्येत, प्रकृति–अशी हीं अनेक नावें हींपण जरी मुळीं नाहींत तरी तीं मायेमुळें भासमान होणारीं तीं जाणून घ्यावींत. इति गुणाः हे गुण होत (चित्तानें चित्ताचा भेद केल्यामुळें भासमान होणारें जें वैचित्र्य). सत्व रज तम=त्यांचीं नांवें सत्व, रज व तम जाण. प्रकृति संभवा:=आतां भूत संभव योनितः व प्रकृति संभव गुणत: हें कसें तें जाणावें. योनीपासून भूतें तेथें प्रकारामुळें ती योनी एकच जरी तरी सर्व योनी ज्या, त्यामध्यें जन्मणारी अनेक अशी ती तेथें सर्व योनितः भूत प्रकाराः अनेक प्रकृति वशतः गुणभेदाः तेथें एकावर अनेकत्व आरोपिलेलें तें जसें भासवून घ्यावें त्याप्रमाणें पण वास्तविक पाहिलें असतां, देहाचें का विश्वाचें तें, तेथें भेद नाहींच, असें तें भासवून घेणें, तेथीलचें होणें–तेथीलच्या महत्त्वास उत्थापन देणें, मोठें मानणें, आपलेपण त्यांना देणें, ते गुणच होणें, तेच मुळीं त्या प्रकृतिमंततेस पाहूं लागल्यानें तेथें ती प्रकृतीच मुळीं पूजिली गेली किंवा आपलेंपण सर्व तेथेंच दिलें त्यामुळें तेथें तेंच एक उत्तम व दुसरें तें मध्यम, तिसरें तें कनिष्ठ असें मानणें होतें–वास्तविक पाहिलें असतां विश्वाच्या एकपणाचें तें–पण त्या प्रकृतीच्या आटोक्यांत गेल्यामुळें त्या त्या बुद्धीनें तें तें स्वतःचें महत्त्व हें आटविलें गेलें–म्हणून आतां सहजच तेथें तें मोक्ष देणारें का स्वर्गास पोहोंचविणारें का साधारणतेचें असें निराळेंच एक–असें प्रकाराचें झालें. म्हणून त्याच प्रकृति-मंततेस बांधलें गेलें, व तेथीलच्या संसाराचें कां गुणदोषाचें झालें. आतां येथें व्यवहार्य तेंच महत्त्व असें ह्या जगानें घेतलें असल्याकारणानें एक सर्व साधारण बोलणें तें म्हणजे विश्व निश्चयानें एकच वृत्ति ही जरी प्रवृत्तीवर टेकली तरी आपलेपणाचें जें तें ती विसरत नाहीं. पण कामना भेदानें किंवा श्रद्धा हीच मुळीं जर तेथेंच स्थिर असली तर तिजला जरी अनेक ठिकाणचें होणें झालें तरी ती आपलें मूळ विश्वरूपाचें तें न विसरल्यामुळें ती ह्या क्षणिकतेच्या बंधनांत न फसतां आपल्या मुळासच चिकटून राहाते. त्यामुळें ह्या विश्वाचा जो उत्तम असा गुण उपास्तीची योग्यता देणारा, सगुणत्वास आणणारा, कां भाव देवास आणणारा त्या गुणांस ती विश्वभावना आंचवत नाहीं व त्यामुळें कल्याणच एक तेथें महत्त्व पाहून असतें. महाबाहो=हे वीर पुरुषा अर्जुना! अव्ययम् देहिनम् देहे निबध्नन्ति=ते गुण ह्या आत्म्यांस जरी आत्मा गुणातीत तरी त्यास ह्या देहामध्येंच बंधन का बंध का मोक्ष अशा कल्पनांनी बुद्धीच्या आटोक्यांत घेऊन तें तें गुणाचें परिवर्तन स्पष्टतेस आणणारें होय.

अन्वय:—प्रकृति सम्भवाः । सत्व रज तम । इति गुणाः । देहे अव्ययम् । देहिनम् । हे महाबाहो । (एते गुणाः — सत्व, रज, तम इति ) निबध्नंति ।

अर्थ:—आपलें विश्वाचें जें मूळ तें विसरून देहाएवढेंपणच घेतल्यानें, देहबुद्धीचें झाल्यानें तेथें जडत्व हें परिणाम करूं लागून ह्या जीवात्म्यास देहांतच–देहामध्यें–देहबुद्धींतच बांधून टाकतात–त्या त्या विशेष अशा गुण–देह–अभिमानाचें करून जरी तें अव्यय, कांहींही कमी न होतां तेथील कांहींच खर्च न होतां आपल्यास –तरी अव्ययत्वास व्ययत्वाचें समजून ह्या आत्म्यास बंधन करणारें होतें. येथें बंधन जें समजलें गेलें तें पण ह्या भावप्रेमावर उभें झालें तर तेथें मोक्षच एक, का भावच एक, का प्रेमच एक व मग तेथें जे बंध का मोक्ष असे म्हटलेले ते निव्वळ ह्या देहापुरतेच–तात्पुरतेच असें जाण. (५)

तरी कोणें गुणें कैसा । मजचि मी बंधु ऐसा ।
आवडे ते परियेसा । अर्जुन देवा ॥ १३७ ॥

गुण (रुपा) किती किं धर्म । काई यया रूप नाम ।
के जाले हें वर्म । अवधारिजो ॥ १३८ ॥

तरी सत्व रज तम । तिघासि हें नाम ।
आणि प्रकृती जन्म । भूमिका यया ॥ १३९ ॥

येथ सत्व उत्तम । रज तें मध्यम ।
तिहीं मार्जी तम । साविधारें ॥ १४० ॥

हे एकीच वृत्तिच्या ठाईं । त्रिगुणत्व आवडे पांही ।
वयसा त्रय देहीं । येकी जेंवी ॥ १४१ ॥

कां मीनलेनि किडे । जंव जंव तूंक वाढे ।
तंव तंव सोनें हीन पडे । पांचिका कसी ॥ १४२ ॥

पैं सावधपण जैसें । वाहविलें आळसें ।
सुषुप्ति बैसे । घणावोनी ॥ १४३ ॥

तैसी अज्ञानांअंगिकारें । निगालि वृत्ती विखुरे ।
तें सत्व रज द्वारें । तम ही होये ॥ १४४ ॥

अर्जुना गा जाण । यया नांव गुण ।
आतां दाऊं खुण । बांधती ते ॥ १४५ ॥

तरी कोणें गुणें=अहो कोण गुण. परियेसा–परियसा (१३७). गुण–गुण ते. किं धर्म्य–किं धर्म. यया–इया. रूपा नाम–रूप नाम. अवधारिजो–अवधारी पां (१३८–१३९). सत्व–सत्व ते. साविधारें–साविया (सहज) धारे (लहान, अधम) (आधरे=खालचें, कनिष्ठ) (१४०). येकीच–एकेचि. वृत्तिचां ठायीं–वृत्तिच्या ठायीं=अंतःकरणाच्या वृत्तीमध्यें. आवडे=कोणासही, वाटेल त्याला. वयसा त्रय=अवस्था, वयोमान, मित्रत्व (बाल्य, तारुण्य, वार्धक्य) अवस्था घेऊन आहे. येकि–एकी=वृत्ति मित्रत्व घेऊन असते. वयोमानाच्या त्या अवस्था एका देहाच्या त्या आवडत्या होत (१४१). मीनलेनि किडे=हिणकस सोनें. हिणकसपण वाढलें कां मिसळलें. तुक=वजन. सोनेहिन पडे–सोनें हीन पडे. पांचिका कसी=पांचव्या प्रतीचें हिणकट तें पंचत्व शिवात्मकाच्या कसामध्यें तें हीन पडतें (१४२). घणावोनी=दृढ होऊन (१४३). निगालि–निघाली. विखुरे=पसरते (१४४). नांव–नाम. दाऊं–दावूं–दाखवूं. बांधती ते–बांधिती ते=(गुण) बांधती ते खुण आतां दाऊं (१४५).

कोणत्या गुणानें कसा तो मीच मजला रचावा असा आवडणारा तो अहो अर्जुन देवा तें ऐकावें–तो ऐकावा. (१३७)

गुण ते किती आहेत–गुण=मूळ धर्म, उपयोग, परिणाम, कार्य, दिव्याची वात, ओज, प्रसाद, माधुर्य, काव्यगुण, श्रेष्ठत्व, आधिक्य–त्याचा धर्म तो काय आहे, त्यांना रूप तें कसें व त्या रूपास नांव तें कसें आलें, तसेंच कसें तें झालें, तें वर्म ऐकण्याचें कर. (१३८)

ह्या तिघांना अनुक्रमें सत्व, रज, तम हें नांव आहे. तसेंच हे प्रकृतीपासून जन्मलेले म्हणजे ह्यांच्या जन्माची भूमिका ती प्रकृती जाण. (१३९)

येथें सत्व जें, तेंच उत्तम म्हटलें आहे. रज तें मध्यम असें जाणावें व ह्या तिहींमध्यें जें तम सहज लहान, खालचें, का अधम, का कनिष्ठ असें होय. (१४०)

ह्या एकाच वृत्तीच्या ठिकाणीं हे त्रिगुणत्व वाटलेले आवडीनें असें आहे, आवडतें असें पाहा. (वाटेल तसें पाहिलें तरी तेथें वृत्ति ही एकच आहे) जसें एकाच देहाच्या ठायीं तिन्ही वयसा–बाल, तरुण, वृद्ध ह्या–होऊन असतात (अवस्था, वयोमान, भिन्नत्व तिन्ही अवस्था वाटेल तशा त्या आवडून असतात).

(१४१)

हिणकटपण सुवर्णामध्यें मिसळलें तेथें जसजसें वजन वाढतें तसतसें सोनेंहीपण पांचव्या प्रतीचें हिणकट असेंच तें हीन पडतें–तेथें जसें कां एक पंचमांश असेंच तें, पंचतत्व शिवात्मकाशीं तोललें असतां, हीन पडतें.

(१४२)

पण सावधपण हें आळसामुळें वोहटीस लागलें तेथें गाढ अज्ञान हेंच दृढतर असें होऊन धर धरून राहातें. (१४३)

त्याप्रमाणें अज्ञानाचा अंगिकार करून वृत्ति ही निघाली असतां पसरते तेव्हां सत्वाच्या अथवा रजाच्या मधून तमच उगवूं होतें–उगवूं लागतें. (१४४)

अगा अर्जुना! येथें असें जाण कीं ह्यासच गुण म्हटलें. आतां ते गुण बांधतात, कां बंधनकारक कसे होतात, त्याची खूण दावूं–दाखवूं. (१४५)

## तत्र सत्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयं ।
## सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥

विवरण–शब्द स्पष्टार्थ :—सत्वं निर्मलत्वात् तत्र=चित्त हें निर्मळ व शुद्ध असें–आपल्या निर्मळपणानें त्या देहामध्यें एक सुख व ज्ञान काय तें महत्त्वाचें असें पाहूं लागल्यानें. प्रकाशकम्=प्रकाश व प्रकाशक ह्यांमध्यें फरक आहे. नुसता प्रकाश हा म्हणजे जसा कांहीं सूर्याचा सर्व प्रकाश तेथें अंधार हा नाहींच म्हणून तसलें तें सर्व प्रकाशाचें होणें आपलें केलें तरच मग तें विद्यमानत्वें करून वापरलें असें होय. आतां प्रकाशक जें आहे तें ह्या दृश्य सृष्टीस दृष्टीपुढें करणारें तें–तेथें भूत सृष्टि हीच मुळीं दिसणारी व येथेंच जें कांहीं ह्या सत्वगुणाचें जें चित्त आपल्या निर्मळपणानें गुण महत्त्वास पाहातें तें अतितर गम्यतेचें असें आहे. जग हें दिसणारें तें म्हणजे आपलें जगत्व हेंच दृष्टीपुढें करणारें. पण प्रकाशक जो गुण ह्या सत्वाचा तो तेथें आपल्या बरोबर दुसऱ्या चांगुलपणाच्या गुणांना दृढतेस आणून प्रस्थापित करणारा झाल्यानें तेथें सहजपणेंच ह्या जीवात्म्याचें जें ज्ञान रहस्यास येणें होणारें होतें, सत्व प्रकाशक तें क्रियारूप पाहातें व शीलही पण पुढें घेतें–तेथें भूत का इंद्रिय हाच आत्मा असें जें ज्ञान निकृष्टतेचें रहस्य तेंच भोग का मोक्ष देणारें असें तें दिसणारें जेव्हां, तेव्हां–असें तें तेंच मुळीं दृश्य द्रष्टा व दर्शन ह्यांच्या पृथक्करणानें एक जें निर्मळपण तेंच घेऊन तेथेंच

आत्मदर्शन पाहाणारें असें झाल्यानें तें आपल्या उत्तमत्वास येऊन उत्तम अशा निर्मळपणाचें का निर्मळ अशा लोकाचें होऊन तेथें नेहमीच्या नेहमीच दर्शन एक–सगुण म्हणजे तेथें स्थितीच ती क्रिया का शील पाहाणारी अशी उत्तमता होय. तेथें जगतामधील जी कांहीं रचना तीच मुळीं नच पाहातां तेथीलची जी सात्विकता ती प्रकाशक का स्थिति वा शीलत्वाची ती भोगाची का मोक्षाची तेवढेंच ती पाहाते, व ह्या सत्वगुणासच सर्वथैव शोभविणारी अशी होते. म्हणून असा हा ह्या लोकांमधील अर्थ परम दिव्यच एक पदरीं बांधून असलेला जरी, तरी तो पाहिला नच गेल्यानें तें सुख–सुख का ज्ञान–ज्ञान असेंच घोकणें हांवेचें झालें व ह्या सात्विकतेच्या उत्तमतेवर पांघरूणच जसें पडलें व तें झांकलें गेलें असें आहे (सुखाची का ज्ञानाची–जाणण्याची फक्त हावच एक आपले महत्त्वास आली) तेथें हेतू किंवा कारण हेंच महत्त्वाचें झालेलें असतें, आपल्या महत्त्वावर उभें असतें. अनामयम् = अन् म्हणजे नाहीं, आमय म्हणजे दुःख, जेथें दुःखच मुळीं नाहीं अशा स्थितीस प्रकाशूं लागतें–प्रकाश स्थितीचें होण्यानें–प्रकाशतें. सुखसंगेन, ज्ञानसंगेन = सुखाच्या संगानें व ज्ञानाच्या जोडीचें व्हावेंच अशी जी ज्ञानप्राप्तीच्या जोडीची अभिमानास्पदता. अनघ–हे निष्पाप अर्जुना. बध्नाति = सुखच जेव्हां तेव्हां पाहिजे म्हणण्यानें तेथें तें तसें पाहाणें हें बुद्धीसच मुळीं बांधून टाकतें व तेवढ्यांतच नेहमीं वावरूं लागल्यानें तें इतर गोष्टी न जाणणारें होऊन फसतें तसेंच ज्ञानामध्येंही पण त्याचें तसलेंच होणें होतें.

अन्वयः—निर्मलत्वात् । सत्वं । प्रकाशकं । (दुःख रहित निर्दोषपद प्रसिद्ध करणारा, प्रकाशणारा) अनामयम् । तत्र । अनघ । सुखसंगेन । ज्ञानसंगेन । च । बध्नाति । (तत् अत्र सत्वम् × सत्वम् अत्र तत् × तत् सत्वम् अत्र) असंगतः न बध्नाति ।

'योगसूत्र–प्रकाशकक्रियास्थितिशीलं भूतेंद्रियात्मकं भोगापवर्गार्थं दृश्यम् । तत्र निर्मलत्वं हेतुत्वात् ।'–पुरुषाला मुक्ति प्राप्त करून देणें हाच त्याचा हेतू आहे.

अर्थ :—हे निष्पाप अर्जुना! ह्या गुणांपैकीं प्रकाशक, ज्ञान संवेदन वाहक, ज्ञान प्रकाश वाहक, निर्दोष (विकार रहित) व निर्मळ असा सत्वगुण तो सुखाच्या आसक्तीनें व ज्ञानाच्या अभिमानानें, लालसेनें जीवात्म्यास बद्ध करतो, आच्छादित करतो, देहबुद्धि दृढ करून देहाएवढेपणांत बांधून टाकतो. (६)

**तरी क्षेत्रज्ञ दशे । आत्मा मोटका पैसे ।**
**हे देह मी ऐसे । कुमुहूर्त करी ॥ १४६ ॥**

**आजन्म मरणांतीं । देह धर्मीं समस्ती ।**
**ममत्वाची सूती । घे ना जंव ॥ १४७ ॥**

**जैसी मीनाच्या तोंडीं । पडेना जंव उंडी ।**
**तंव गळ आसुडी । जळ पारधी ॥ १४८ ॥**

**तैंवी सत्वें लुब्धकें । सुख ज्ञानाची पाशिकें ।**
**वोढिजती मग खुडके । मृग जैसा ॥ १४९ ॥**

**मग ज्ञानें चडफडी । जाणिवेचे खुर खोडी ।**
**स्वये सुख हें धाडी । हातिचें गा ॥ १५० ॥**

**तेव्हां विद्या मानें तोषे । लाभमात्रें हरिखे ।**
**मी संतुष्ट हेंही देखे । श्लाघो लागे ॥ १५१ ॥**

**म्हणे भाग्य ना माझें । आजि सुखिये नाहीं दुजें ।**
**विकाराष्टकें फुंजे । सात्विकाचेनी ॥ १५२ ॥**

आणि येणें ही न सरे। लांकण लागे दुसरें।
जेवि द्वैताचे भरे। भूत आंगीं ॥ १५३ ॥

आपणचि ज्ञान स्वरूप आहे। ते गेलें हें दुःख न वाहे।
कीं विषयेज्ञानें होये। गगना येवढां ॥ १५४ ॥

रावो जैसा स्वप्नीं। रंकपणें निघे धानीं।
तो दोंदाणा मानी। इंद्र ना मी ॥ १५५ ॥

तैसें गा देहातीता। जालेया देहवंता।
हो लागे पांडुसुता। बाह्यज्ञानें ॥ १५६ ॥

प्रवृत्तिशास्त्र (शास्त्रे) बुझे। यज्ञविद्या उमजे।
किंबहुना सुजे। स्वर्गवरी ॥ १५७ ॥

आणि म्हणे आजि आन। मी वांचुनि नाहीं सज्ञान।
चातुर्य चंद्रा गगन। चित्त माझें ॥ १५८ ॥

ऐसें सत्वसुख ज्ञानी। जीवासी लावुनी कानीं।
बैलाची करी वानी। पाङगुळाचिया ॥ १५९ ॥

आतां हाचि शरीरीं। रजें जियांपरी।
बांधिजे तें अवधारी। सांगिजेल ॥ १६० ॥

मोटका पैसे=अल्पप्रवेश तो, थोडासा शिरतो, पैस अथवा थोडेसें व्यापकपण घेऊन. कुमुहूर्त-मुहूर्त =आरंभ, शकून, वेळेस कां वयास येणें जें (१४६). महत्वाची-ममत्वाची (महत्तत्व, महदादि, महत्त्वी, महत्वाची, महत्तत्वाची). सूती=अभिमान, वृत्ति (१४७). आसुडी=हिसकतो. जळ पारधी=कोळी (१४८). लुब्धके=लोभीपणाची ती, सुख-ज्ञान अथवा ज्ञान हेंच सुख, अशा पाशांनी. वोढिजति= ओढली जातात. खुडके-सुडके-अडके=अडकतो (१४९). चडफडी-चरफडी. जाणिवेचे खुर खोडी- सुखवरी खुर खोडी=सुखाकरितां लाथाळी करितो, लाथाळपणानें जाणिवेचीच मुळीं खुर (जाणीव) ती लाथाडून टाकतो. स्वये सुख-स्वयं सुख. धाडी=दवडतो (१५०). विद्यमाने=उपस्थिततेचें सुविद्यत्व. तोषे-तोखे=संतोष पावतो, संतुष्ट होतो. हारिखे=हरकतो, हर्षतो. श्लाघो लागे=स्तुति आवडून घेणारा होतो (१५१). विकाराष्टके फुंजे=काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, राग, द्वेषादि अष्ट विकारांनी अथवा ज्या प्रकृतीचे ते झालेले तेथीलच्या अष्टधापणाचें तें पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, मन, बुद्धि, अहंकार -इत्यादींनी फुंजतो, फुगतो-पण येथें सात्विकाचें मुळीं तें विकाराष्टक केल्यानं तेथें प्रकृतीचे ते विकार हेच मुळीं सत्वावरच चालणारे असे (१५२). लांकण=क्लृप्तिक-विकत घेतलेलें, रचनेचें, युक्तीचें, सिद्धीचें, समृद्धीचें. क्लृप्त=व्यवस्थापत्र केलेलें, रचलेलें, ठरविलेलें, कापलेलें, नेमलेलें, तोडलेलें. क्लृप्ति=सिद्ध, युक्ति, रचना, समृद्धि. लांकण=बंधन, कळकटपण, कुडणें, लंघन (अन्नमय कोशास दिलें जाणारें तप आचरण नाहीं म्हणून). जेंवि द्वैताचे=जें विद्वत्तेचें (१५३). विषये ज्ञाने-विषय ज्ञाने=पदार्थ ज्ञानानें (१५४) धानि- धानी=शहरांत. दोंदाणा मानी=दोन चार दाणे भिक्षा मिळाली म्हणून, त्यानें दोन दाण्याच्या भिक्षेनें (१५५). गा-या. दृश्य='योगसूत्र'-"प्रकाशक्रियास्थितिशीलं भूतेंद्रियात्मकं भोगापवर्गार्थम् दृश्यम्" (१५६). शास्त्रे-शास्त्र. सुजे-सुझे (स्वर्गवरी)=स्वर्गातच आहे असें समजतो, स्वर्गाच्याहीपेक्षां श्रेष्ठ- पणाचा स्वतःस म्हणतो (१५७). चातुर्य चंद्रगगन-चातूर्य चंद्र गगन-चंद्र-चंद्रा (१५८). जीवासी लावुनी कानीं=जीवदशेस लोकलज्जेचें, तसेंच मनी संकोचाचें करून. बैलाची करी वानी=बैलाची वानी दशा

प्रकार उपमेचा करून, पाङ्गुळला प्राण करतो (जसें पाङ्गळा जो त्यानें, सर्वत्र वाहणाऱ्या वायूबरोबर स्पर्धा करावी कां हेवा करावा तसें ) (१५९). सांगिजैल–सांगिजेल (१६०).

अहो ! क्षेत्रज्ञ दशेवर आत्मा थोडीशी पैस घेऊन येतो, व हे देह जें आहे तें मी होय असें आत्मा म्हणतो. असें तें त्या आत्म्याचें देह मी म्हणणें हें वेळेस का वयास येणें होय, आरंभाचें का शकुनाचें तें होणें होय. (१४६)

जन्मल्यापासून तो मरणापर्यंत, सर्व हा जो देहधर्म आहे त्या समस्त देहधर्मामध्येंच मुळीं ती ममत्वाची गुंती–महत्वाची–महतत्त्वाची सुती अभिमान वृत्ति जोपर्यंत घेऊन असत नाहीं–घेऊन असतोच जेव्हां कां. (१४७)

अहो ! माशाच्या तोंडीं ती अमिषाची–कणिकेची उंडी पडते ना पडते तोंच मुळीं तो जळपारधी गळ आसुडतो, ओढतो, हिसकतो. (१४८)

त्याप्रमाणें सत्वाच्या लोभीपणाचीं तीं लुब्धकें ज्ञान–सुख–पाशांनी, ज्ञान हेंच सुख अशा पाशांनी ओढलीं जातात, व मग जसा पारध्यांनी पाशामध्यें आडविलेला–अडकविलेला मृग जसा तसा अडकतो, खुडकतो. (१४९)

व मग ज्ञानानें चरफडतो, जाणिवेचे खूर खोडतो–जाणिवेच्या सुखाकरितां लाथाळी करतो–लाथाळ-पणानें जाणिवेची जाणीव मुळीं ( सुरवाड ) ती लाथाडून टाकतो व स्वयेंच म्हणजे स्वतः होऊनच हें हातीं आलेलें सुख तें दवडतो. (१५०)

तेव्हां उपस्थिततेचें सुविद्यत्व जें त्यानें तोष पावतो–तोखे. कांहींही लाभ झाला तरी हारकतो–हर्षतो व मी संतुष्ट आहें असेंच पाहूं लागतो, स्वतःची स्तुतीच एक आवडून घेणारा होतो, श्लाघाच एक पदरीं बांधून असतो. (१५१)

तो म्हणूं करतो कीं अहो ! माझें दैवच कीं, भाग्यवान् कीं मी अहो ! आज दुसरें कोणीही मजसारखें सुखी नाहीं, व सात्विक अष्टविकारावरच मुळी फुगतो ( काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, राग, द्वेषादि अष्ट विकारांनीं ज्या प्रकृतिमंततेचें तें झालेलें तथीलच्या अष्टधापणाचें तें पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, मन, बुद्धि, अहंकार इत्यादींनी फुगतो येथें सात्विकाचें तें विकाराष्टकच येण्यानें येथें प्रकृतीचे विकार ज्ञानाढ्य हेच मुळीं सत्वावरच–आढ्यतेवरच चालणारे ). (१५२)

आणि एवढें करूनही तो स्वस्थ असत नाहीं–तेथें दुसरेंच एक बंधन, लांकण ( कळकटपण, कुडणें, अन्नमय कोशास तप आचरण दिलें नाहीं म्हणून ) लागतें, जें कां भूतच एक ह्या द्वैताचें का विद्वत्तेचें तेंच आंगीं भरून घेतो जसा कां. (१५३)

आपणच ज्ञानरूप कां ज्ञान स्वरूप आहे जें, तें गेलें, नाहींसें झालें, हरवलें, ह्याचें दुःख नच वाहातां कीं अहो ! विषयोपभोग ज्ञानामुळेंच, कां पदार्थ ज्ञानानेंच तर तो गगनाएवढा होऊं लागतो, त्याचा आनंद गगनांत मावेनासा होतो. (१५४)

जसा कां राव जो तो स्वप्नामध्यें रंकपणानें आपल्या राजधानीमध्यें म्हणजे शहरांत निघाला तो तर दोन चार दाण्यांची भिक्षा मिळाली म्हणून स्वतःस, इंद्रच कीं एक जसा मानतो. (१५५)

त्याप्रमाणें जो देहातीत–देह होऊन गेलेला–देह दूर गेलेला आहे त्या देहवंतास [ देह सादृश्यामुळें, देह स्वाधीन करण्यामुळें ( अतिदेश, दोघ, उद्देश, हेतू ) ] बाह्य ज्ञानाचा रंग आला म्हणजे असें होऊं लागतें.

दृश्य, विषय, बाह्य, विश्व ( दृश्य जग ) पुरुषज्ञान—

"प्रकाशकक्रियास्थितिशीलं भूतेंद्रियात्मकं भोगापवर्गार्थम् दृश्यम् "।

अर्थः—स्थूळ आणि सूक्ष्म तत्त्वें, त्रिगुण आणि मनादि इंद्रियें त्यांच्या संयोगानें हें सर्व विश्व उत्पन्न झालें आहे, तें त्रिगुणात्मक व विविधरूपाचें आहे. प्रकाश, क्रिया आणि स्थिति असा त्याचा त्रिविध स्वभाव आहे, सत्वगुणामुळें तें प्रकाशमय आहे, रजोगुणामुळें तें क्रियात्मक आहे आणि तमोगुणामुळें तें जड आहे. हें विश्व कां उत्पन्न झालें ? याचा हेतू काय ? तो हेतू हा कीं पुरुषाला त्याचा अनुभव होऊन त्या अनुभवाच्या द्वारें त्याला मुक्ती मिळावी हाच त्याचा हेतू आहे. आपण सर्व शक्तिमान् आहों, परमेश्वरस्वरूप आहों ही गोष्ट पुरुष विसरला आहे."

'विषय ज्ञान–बाह्यज्ञानः'—"येथें प्रत्याहार हाच सर्व महत्त्वाचा होय.

योगसूत्रः—स्वस्वविषयासंप्रयोगे चित्तस्वरूपानुकार इवेंद्रियाणां प्रत्याहारा ।

इंद्रियांना त्यांच्या विषयांतून परतवून चित्तस्वरूपांत त्यांची स्थापना करणें यास प्रत्याहार म्हणतात.

**'विश्व'**:—"दृश्य जग, प्रकृती आणि द्रष्टा आत्मा यांच्या संयोगामुळेंच दोघांच्या शक्ती प्रत्ययास येतात. अज्ञान हें त्याचें कारण आहे. अज्ञानाचा अभाव झाला म्हणजे संयोगाचाहि अभाव होतो. संयोग हाच त्याज्य आहे. संयोगाचा त्याग हाच मोक्ष अथवा कैवल्य."

**'पुरुषज्ञान'**:—"सत्व हें प्रकृतीचें रूप असल्यामुळें पुरुषाहून तें भिन्न असून त्याच्या क्रियेनें निर्माण होणारें सुख आणि ज्ञान यांचा भोक्ता पुरुष हाच आहे. जेव्हां सत्वांतील अहंकार निघून जाऊन पुरुषाच्या ज्ञानरूपानें तें प्रकाशित होतें तेव्हां त्यास स्वार्थप्रत्यय अशी संज्ञा प्राप्त होते. कारण या स्थितींत प्रकृतीच्या गुणधर्माशीं त्याचा संबंध राहिलेला नसतो."] (१५६)

प्रकृति-शास्त्र समजतो, यज्ञ-विद्या उमजतो तो तर अहो ! किंबहुना स्वर्गातच आहे असें स्वतःस समजतो–स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ असें स्वतःस म्हणतो–मानतो. (१५७)

तो म्हणतो कीं आज माझ्या शिवाय दुसरा एकादा कोणीही सज्ञान नाहीं–माझें चित्त तर चातुर्याचें सर्व असेंच, जसें का सहस्रावधि तारांगणामध्यें चंद्रच एक जसा. माझें चित्त हें सर्व गगनासारखें व्यापक, चातुर्यरूपी चंद्रास–अंगच्या पाण्यास तर माझें चित्त गगनासारखें अगाध असें होऊन आहे. (१५८)

असें सत्व तें ज्ञानाच्या सुखामध्येंच ह्या जीवास संकोचाचें करून, जीवदशेस लोकलज्जेचें करून प्राण पाङ्गुळला करतें. बैलाची दशा ही उपमेची करून प्राण पाङ्गुळला करतें, सुख व ज्ञान यांची काढणी लावून बैलाप्रमाणें करतें (पाङ्ळयानें सर्वत्र वाहाणाऱ्या वायूशीं स्पर्धा करावी तसें). सुख ज्ञान सत्व, ज्ञान सत्व सुख, सत्व सुख ज्ञान, ह्या जीवदशेस लोकलज्जेनें बांधून–संकोचच एक सर्व असें करून मनाचें पाङ्गुळणेंच जसें अशा बैलाच्या उपमेचें बैलपणच (विधवत्व, कामासक्त, उंदीर, हत्तीचा कान, धर्म) एक सर्व असें करतें. [बैलाची वानी–वृषकेतु = कर्णाचा पुत्र. वृषपर्वा = शर्मिष्ठेचा बाप, शुक्राचार्याच्या मदतीनें त्यानें देवांशीं युद्ध केलें. वृष्णि = श्रीकृष्णाचा पूर्वज, एक यदुवंशीय राजा ]. (१५९)

आतां हाच सत्वगुण, रजानें ज्या कांहीं प्रकारांनीं ह्या शरिराचे ठायीं बांधला जातो तें सांगतों, ऐकण्याचें करावें (रज = लाल होणें, रंगविणें, प्रेम करणें, आसक्त होणें, संतुष्ट होणें, लाल करणें, प्रसन्नवश करणें). (१६०)

## रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ।
## तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥ ७ ॥

रजो रागात्मक विद्धिः—

रजः = सार जः–रजः = रजोगुण हा. रागात्मकं–रस रागः = (रस सारज्ञत्व) जिव्हेचें व सुख अनुशायीचें, रागाचें = राग म्हणजे आसक्ति, अनुरक्तता, प्रेम, अभिलाषा, इच्छा, कामना, कांक्षा, इत्यादींनी तेथीलचा आत्मा नटविला. आत्मबल सर्व जें तेंच तेथें महत्त्वास आलें, महत्त्व पाहूं लागलें असें. विद्धि = जाण. तृष्णासंग समुद्भवम् = तृष्णेचें सर्व कांहीं आपलें जें तेंच मुळीं येथें आपलें सर्व महत्त्व घेऊन असल्यानें जसें कां तें सर्व तृष्णाच मुळीं ह्या सागराएवढ्या अफाटपणाची अशी ती व मग तेथीलची हांव ही अशी असणारी ती जशी कां. तत् निबध्नाति = तें वितृष्णतेचें नच झाल्यानें तें आत्म्याचें गुणातीतत्व विलसल्यामुळें मोक्ष कां बंध अशा कल्पनांचें होतें. कर्मसंगेन देहिनम् निबध्नाति = कर्मसंगामुळें अलिप्त असा जो आत्मा त्यास बंधन करितें–कर्मच एक करणें–तेथेंच सर्व धांव ही घेतल्यामुळें तें नुसते कर्म, कर्मच एक कामच करीत राहाणें तें देहबुद्धीचें बंधन पावतें.

अन्वय :—कौंतेय। तृष्णासंग। समुद्भवम्। रागात्मकं। रजः। विद्धि। तत् (रजः)। कर्मसंगेन देहिनम् निबध्नाति। [सुखानुशयी रागः] आत्मकः। रसानां रागः राजते यत्र स ईश्वर भावः अथवा प्रेम रसः।

अर्थ :—हे कौंतेया, रजोगुण हा रागात्मक म्हणजे इच्छात्मक असून विषय तृष्णा, उत्कट वासना व विषयासक्ती यांपासून उत्पन्न होतो, असें जाण. तो विषयामधील प्रीतीच्या स्वरूपाचा आहे. तो जीवात्म्याला कामुक कर्मांच्या इच्छेनें, आसक्तीनें बद्ध करतो. तो भोगेच्छा ज्यायोगें उत्पन्न होईल अशाच कर्माकडे प्रवृत्ति उत्पन्न करतो. (७)

**हें रज याचि कारणें। जीवातें रंजऊं जाणें।**
**हें अभिलाखाचें तरुणें। सदाचि गा ॥ १६१ ॥**
**हें जीवीं मोटकें रिगे। आणि कामाच्या मर्दीं लागे।**
**मग वारया वळघे। तृष्णेचिया ॥ १६२ ॥**
**घृतें आंबुखूनि आगियाळें। वज्राग्निचें सादुकलें।**
**आतां बहु थेकुलें। आहे येथें ॥ १६३ ॥**
**तैसी खवळे चाड। होय दुःखासगट गोड।**
**इंद्रश्रीही सांकड। गमो लागे ॥ १६४ ॥**
**तैसी या तृष्णा वाटिनलिया। मेरूही हातां आलेया।**
**तर्‍हीं म्हणे एखादिया। दारुणाही वळघो ॥ १६५ ॥**
**आजि असतें वेंचिजैल। तरि पाहे काय कीजैल।**
**ऐसा पांगी वहिल। व्यवसाय मांडी ॥ १६६ ॥**
**जीविताची कुरूडी। वोवाळूं लागे कवडी।**
**मानी तृणाचिया जोडी। कृतकृत्यता ॥ १६७ ॥**
**म्हणे स्वर्गा हन जावें। तरी काय तेथें खावें।**
**ययालागीं धांवे। याग करूं ॥ १६८ ॥**


व्रतापाठीं व्रतें। आचरे इष्टापूर्तें।
काम्या वांचूनि हातें। सिवणें नाहीं ॥ १६९ ॥
पैं ग्रीष्मांतीचा वारा। विसांवो नेणे वीरा।
तैसा न म्हणे व्यापारा। रात्रंदिवस (रात्रिदेवो) ॥ १७० ॥
कायि चंचळ मासा। कामिनी कटाक्षु जैसा।
लंवलंवा हो तैसा। विजू नाहीं ॥ १७१ ॥
तेतुलेनि गा वेगें। स्वर्ग संसार पांगें।
आगीमाजी रिगे। क्रियांचिये ॥ १७२ ॥
ऐसा देही देहा वेगळा। ले (इला) तृष्णेचिया सांखळा।
खटाटोप वाहे गळां। व्यापाराचा ॥ १७३ ॥
हें रजोगुणाचें दारुण। देही देहियासि बंधन।
परिस आतां विंदाण। तमाचें तें ॥ १७४ ॥

तरुणें=प्रौढि, वाढ (१६१). मोटकें=स्वल्प, अप्रशस्तपणानें. मदि–मदी=मार्गीं. वारया=वाऱ्यावर. वळघे=बळ घेतो, वळतो (१६२). आंबुखूनि=शिंपडून, शिंतोडा टाकून. आगियाळें=होमकुंड. वज्राग्नीचें सादुकले (सांदुकले)=रखरखीत विस्तवाचें पेटलेलें, कां प्रदीप्त होणें. तेथें–येथें. आतां बहु थेकुलें आहे येथें=त्या प्रदीप्ततेच्या ठायीं लहान मोठे असा भेद आहे काय? तो अग्नि तर सर्व कांहीं भस्मच करितो (वज्र आणि अग्नि यांची जोडी साद करणारी ती ह्या कलरवास) (१६३). सबळे–स्वबळे–खवळे. चाड–आवड. सांकड=थोडीच, संकुचित (१६४). ते या–तैसि या. मेरुही=सोन्याचा पर्वतही [ अगा आंदळ्या अर्जुना। मेरुहि हाता आलिया होय साना। ऐसा आथि या मना। चुकीचा भावो। अध्याय ११ वा पहा ]. एखादिया दारुणाही वळघो=अधिक (भयंकर, कठिण, निर्दय) साहसास प्रवृत्त होतो (१६५). वेंचिजैल=खर्च होईल. परि–तरी. पाहे पां=उद्यां, पहांटेस, प्रभातीं. पांगी=आशेनें, अपेक्षेनें. वडिल=मोठाले. व्यवसाये–व्यवसाय=उद्योग (१६६). कुरोंडी–कुरुंडी=ओवाळणी, कुरवंडी. तृष्णाचिया–तृणाचिये. कृत्यकृत्यतां–कृतकृत्यता (१६७). ययालागी–इयालागी (१६८). काम्य वांचूनि–काम्यावांचुनि. सिवणे–शिवणें (१६९). रात्रिदिवो–रात्रंदिवस (१७०). कायि–काय. कटाक्षु जैसा–कटाक्ष कायसा. लंवलंवा हो–लवला हो. विजुही–विजूही (नाहीं)=मासा, स्त्रीकटाक्ष, व वीज यांना चंचल म्हणतात पण रजोगुणाच्या चंचलतेपुढें तीं कांहींच नाहींत (१७१). आगिमाजी–आगीमाजी=अगीमध्यें (१७२) ले–लेईला=घेतो. तृष्णेचिया सांखळा गळा वाहे=तृष्णेच्या (अभिलाषाच्या) सांखळया गळ्यांत अडकवून घेतो (१७३). देहि देहयासि–देही देहियासी=देहामध्यें, देही जो त्यास. दारुण (पाश, उक्ती)=वाग्बाण, टोंचणारें बोलणें. विंदाण=कौशल्य, लक्षण, लाघव (१७४).

प्रेम करणें का आसक्त होणें जें–वश करणें–का रंगविणें–लाल करणें याच कारणास्तव ह्या जीवदशेस रंजवावें कसें तें जाणतें–हें रज तर नेहमींच प्रेम, इच्छा, इच्छिणारें एक तरुणपण मर्जीचें–उत्कट इच्छेचें–प्रेमाचें–अभिलाषाचें होय. (१६१)

जीवदशेमध्यें हें अल्पसें प्रवेश करतें व कामाच्या मार्गास लागतें व मग लोभाच्या, इच्छेच्या म्हणजेच तृष्णेच्या वाऱ्यावरच मुळीं बळ घेतें–वाढतें. (१६२)

घृताचा (अज्ञान स्नेह) शिंतोडा होमकुंडावर शिंपडून विस्तवाचें प्रदीप्तपण! येथें प्रदीप्ततेच्या ठायीं कांहीं लहान मोठा असा भेद आहे काय? वज्र व अग्नि यांची दुक्कल–जोडी ह्या कलरवास साद करणारी, साह्य करणारी. तो अग्नि सर्व कांहीं भस्मच करतो. (१६३)



स॥विजुनाहि॥७१॥ तेतुलेनिगावेगा स्वर्गसंसारपंगे॥ अभीमाजिरिंगे॥ क्रियाचि
ये॥७२॥ ऐसादेहि देहावेगळा॥ लिलसेचि थासारखळा॥ खटाटोपवाहे गळा॥ व्यापा
राचा॥७३॥ हे रजोगुणाचें दारुण॥ देहि हि यासि बंधन॥ परिस आतां विदाण॥ तम
चेतें॥७४॥ श्लोक॥ ॥ तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनं॥ प्रमाद
लस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत॥८॥ टीका॥ ॥ व्यवहाराचेहि डो
ळे॥ मंदजेणपडळे॥ मोहरात्रीचे काळें॥ मेघुडेजें॥७५॥ अज्ञानाचे जियालें॥
तयायेकालागलें॥ जेणें विश्व भुललें॥ नाचत असे॥७६॥ अविवेक माहामंत्र॥
जें मौढ्य मद्याचें पात्र॥ हे असो माहनास्त्र॥ जीवासि जे॥७७॥ पार्था तें गात
मा रचुनि ऐसवमे॥ चोखुरि देहात्म॥ भानियाते॥७८॥ हे येकचि कीरउरि
रि॥ माजा लागे चराचरि॥ आणि तेथें दुसरि॥ गोठि नाहि॥७९॥ सर्व इंद्रिया
जाड्य॥ मनामाजी मौढ्य॥ माल्हाति दाराढ्य॥ आलस्याचे॥८०॥ अंगें आं
गमोडामोडि॥ कार्यजाति आनावडि॥ नुसतिपरवडि॥ जांभयांची॥८१॥ उघ
डियाचि दिठि॥ आदखणे नाहि किरिटि॥ नावविताचि उठि॥ वोसणाणि॥८२॥
पडलियें धोंडि॥ नेणें कानिमुरडि॥ तयाचि परि मुरकुंडि॥ उकलु नेणे॥८३॥
पृथ्वी पाताळें जावें॥ कां अकाश हि र्वयेवे॥ परि उठणें हें भावे॥ उपजो नेदि

लेखकाजवळ असलेल्या हस्तलिखित पोथीच्या १४ व्या अध्यायांतील अक्षराचा नमुना.

त्याप्रमाणें ही चाड, सबळ अशी आवड, कोड स्वबळानेंच कौतुकच एक तें स्वबळें करून खवळूं लागते, दुःखासकट गोड होते, दुःखासह गोडपणच एक तें घेऊन असतें. तेथें तर इंद्राची संपत्ती ही पण थोडीच कां संकोचित अशीच समजली होते. (१६४)

तशा तऱ्हेच्या ह्या आवडी, तृष्णा, इच्छा लोभाच्या झाल्यामुळें तेथें जेव्हां कां मेरूही, सोन्याचा पर्वतही पण जरी हातीं लागला, का हातीं आला, तेव्हां तरीही पण अधिक तर अशा साहसास प्रवृत्त होतो-तेथें साहस तें जसें कां निर्दय, कठिण का निष्ठुर म्हटलें. (१६५)

आतां ह्या वेळेस जें कांहीं आहे तें सर्व जर खर्च झालें, वेंचलें गेलें, तर उद्यां मग काय करावें अशा अपेक्षेनें, आशेनें, वडिल म्हणजे मोठमोठाले व्यवसाय उद्योग आरंभतो-मांडतो. (१६६)

जीविताची कुरवंडी करतो-जीवित हें ओंवाळून टाकतो, कवडीलाही महत्त्व देतो-तेथें तृणासारख्याहि क्षुद्रतेच्या गोष्टी प्राप्तीनें कृतकृत्यता मानतो-कृतकृत्य झालों असें मानतो-समजतो. (१६७)

तो म्हणूं करतो कीं अहो ! स्वर्गास जायचें तर तेथें खायचें काय ? आणि म्हणूनच तर यज्ञयाग करण्याच्या खटपटींत पडतो. (१६८)

व्रतावर व्रतें करतो, इष्टापूर्ती यज्ञ आचरतो-काम्यकर्माशिवाय मुळीं कशासही शिवत नाहीं-सर्व एक कांहीं काम्यकर्मच तेथें तो हात देतो, काम्य जर तरच तेथें हातानें स्पर्श करतो. (१६९)

ग्रीष्म ऋतु म्हणजे उन्हाळा संपतांना जो कांहीं वारा वाजतो, सुटतो तो तर मुळीं विसावाही जाणीत नाहीं, त्याप्रमाणें कामकाजाच्या म्हणजे व्यापाराविषयीं रात्र कां दिवस असें जाणतच नाहीं, रात्रंदिवस तो तेथें खपत असतो. (१७०)

त्याची ती व्यापार धंदा कामामध्यें लगबग लवलव ही तर विजे-विजूपेक्षांहि जास्त क्षणिकतेची ! अहो ! काय मासाचें तें चंचलपण अथवा कामिनीचा तो कटाक्ष, तेथीलच्या चाचल्यापेक्षांही ह्याचें तें चंचलपण अतिशयतेचें. अहो ! मासा, कामिनी कटाक्ष व वीज याना चंचल-क्षणिक म्हणतात पण तीं ह्याच्या चंचलतेपुढें काहींच नव्हत. (१७१)

अशा तऱ्हेच्या तेवढ्या तडफीच्या वेगानें स्वर्ग अथवा संसाराच्या अपेक्षेनें, इच्छेनें, आशेनें अनेक कामाच्या धगीमध्यें रिगतो. (१७२)

अशा तऱ्हेनें देहधारी जरी तरी देहावेगळाच मुळीं कीं तो झाल्यानें, जसा कां अभिलाषाच्या, लोभाच्या सांखळयाच जशा का गळयांत अडकवून घेतो असा कां अशा व्यापाराचा खटाटोप करून असतो. (१७३)

असें हें रजोगुणाच्या दारुण पाशाचें तें ( टोंचणारें बोलणें, वाग्बाण ) त्यानें तर देहधारीपणानें देहासच एक बंधन होणारें असें होय. यावर आतां तमाचें तें लाघव, विंदाण का कोशल्य तें सांगतों ऐक. (१७४)

## तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्व देहिनाम् ।
## प्रमादालस्य निद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

अज्ञानजं तमः विद्धि = अज्ञानावर उपस्थित होणारें तें तम जाण. सर्व देहिनाम् मोहनम् = सर्व देहधारी जे ( किंवा जीवात्मा ) त्यांना मोहिनी घालणारें, भुलविणारें, एक भुरळ पाडणारें, असें तें मोहनच एक असें जाण, देहधारी जो आत्मा-अशा अनेक देहधारींना भुली देणारें असे तें मोहन. प्रमाद आलस्य निद्राभिः = प्रमाद, आळस व निद्रा इत्यादींनी उपमर्द, कर्तव्यमूढता व नेहमीं झोपेंतच जसें असणें कांहींच न समजणें, दगडच जसा एक आदिनी. तत् निबध्नाति = तें तम जीवदशेस बांधून टाकतें, बंधनकारक करतें-होतें. भारत = हे भारता, अर्जुना ! तु = तसेंच पण हें तम जें आहे तें तर.

अन्वयः—सर्व देहिनाम् मोहनं । अज्ञानजं तमः । तु । विद्धि । तत् (तमः) प्रमाद आलस्य निद्राभिः । हे भारत । निबध्नाति ।

अर्थ :—हे भारता, तमोगुण हा अज्ञानापासून उत्पन्न होणारा असल्यानें तो सर्व प्राण्यांना सर्व देहधारींना मोहांत पाडणारा आहे, भुलविणारा आहे. तो जीवात्म्याला बेसावधपणा, प्रमाद, आळस आणि झोंप यांच्या योगानें बद्ध करतो. (८)

व्यवहाराचेहि डोळे । मंद जेणें पडळें ।
मोहो रात्रीचें काळें । मेहुडें जें ॥ १७५ ॥

अज्ञानाचें जियालें । तया एका लागलें ।
जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ १७६ ॥

अविवेक महा मंत्र । जें मौढ्य मद्याचें पात्र ।
हें असो मोहनास्त्र । जीवासि जें ॥ १७७ ॥

पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म ।
चौखुरी देहात्म । मानी यातें ॥ १७८ ॥

हें येकचि कीर शरीरीं । माजो लागे चराचरीं ।
आणि तेथें दुसरी । गोठी नाहीं ॥ १७९ ॥

सर्वेंद्रिया जाड्य । मनामाजी मौढ्य ।
माल्हाती दाठर्य (दाराढ्य) । आलस्याचें ॥ १८० ॥

आंगेंआंग मोडामोडी । कार्य जाती अनावडी ।
नुसती परवडी । जांभयांची ॥ १८१ ॥

उघडियाचि दिठी । देखणें नाहीं किरीटी ।
नाळविताचि उठी । "ओ" म्हणोनि ॥ १८२ ॥

पडलिये धोंडी । नेणें कानीं मुरडी ।
तयाचि परी मुरकुंडी । उकलूं नेणें ॥ १८३ ॥

पृथ्वी पाताळे जावो । कां आकाशही वरी येवो ।
परी "उठणें" (जीवें) हा भावो । उपजों नेणें ॥ १८४ ॥

उचित अनुचित आघवें । झांसुरितां नाठवे जीवें ।
जेथिच्या तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ १८५ ॥

उभउनि करतळें । पडिघाये कपोळें ।
पायांचें सिरियाळें । मांडू लागे ॥ १८६ ॥

आणि निद्राविशि चांग । जीवीं आथी लाग ।
झोंपीं जातां स्वर्ग । वावो म्हणे ॥ १८७ ॥

ब्रह्मायु होईजे । मा निजेलियाचि असिजे ।
हें वांचुनि दुजें । व्यसन नाहीं ॥ १८८ ॥

वाटे जातां वोघें । कलहातांही डोळां लागे ।
अमृत परी नेघे । जरी निज आली ॥ १८९ ॥

तैंवींचि आक्रोशबळें। व्यापारे कोण्हे वेळे।
निगाले तरी आंधळें। रोश जैसे ॥ १९० ॥

केव्हां कैसें राहाटावें। कोणेसि काय बोलावें।
हें ठाकते कीं नागवे। हेंही नेणें ॥ १९१ ॥

वणवा मियां आघवा। पांखेचि पुसूनि घेयावा।
पतंगु या हांवा। घाली जेवीं ॥ १९२ ॥

तैसा वळघे साहसा। आकारणीचि धींवसा।
किंबहुना ऐसा। प्रमाद रूचे ॥ १९३ ॥

एवं निद्रालस्ये प्रमादीं। तम इहीं त्रिबंधीं।
बांधे निरुपाधी। चोखटातें ॥ १९४ ॥

जैसा वन्हीं काष्ठीं भरे। तैं दिसे काष्ठाकारें।
व्योम घटे आंवरे। तैं घटाकाश ॥ १९५ ॥

नाना सरोवर भरलें। जै तैं चंद्रत्व तेथें बिंबलें।
तैसें गुणागार्शीं (गुणाभार्शीं) बांधलें। आत्मत्व गमे ॥ १९६ ॥

पैं परिहरौनि कफवात। जैं देही आंटोपे पित्त।
तै करी संतप्त। देह जेंवीं ॥ १९७ ॥

कां वर्षा आतप जैसें। जिणोनि शीतचि दिसे।
तेव्हां होय हींव ऐसें। आकाश हें ॥ १९८ ॥

नाना स्वप्न जागृति। लोपुनि ये सुषुप्ति।
तैं क्षण एक चित्तवृत्ति। तोचि होये ॥ १९९ ॥

व्यवहाराचे हिंडोळे–व्यवहाराचेही डोळे. पडळें=पडद्यामुळें. मोहा रात्रिचे जाळे–मोहोरात्रीचें काळें=मोहरूपी अज्ञान रात्रीचा पाश अथवा अंधःकार. मेहुडें=आभाळ, मेघ (१७५). जियालें (ज्याले) =जन्मलेलें, उगवलेलें, जिव्हाळें, जन्मलेंपण. तया–जया. जेणें–तेणें (१७६). अविवेक महा मंत्र जें मौढ्य मद्याचें पात्र=सार बाजूस करून असार जें तेंच नेहमीं पुढें घेतलेलें असें जें कांहीं एक मूढतारूपी वारुणीचें (प्राशन) का मद्याचें घेणें (१७७). वर्म=गुह्य, वर्म (वर्त्मन्)=रस्ता, वर्तनक्रम. वर्म (वर्मन्)=आश्रय, उद्युक्त, तयार. चौखुरी देहात्म मानी यासी=चहुंखुरांनीं, चहुंकडून आत्म्यास देहच मानतो, समजतो, देह हाच आत्मा अशा उपमेनें देहासच मानतो, मान देतो. देह याते–देहातें. आत्ममानी चौखुरी=मन चंद्रमाचें वाहन घाताचें होणारें जसें कां असें–झोपेंतच जसा चौखुरी जाणारा (१७८). तेथें–तेथ (१७९). सर्व इंद्रिया–सर्वेंद्रिया. जाडये–जाड्य=जडपणा, थंडपणा. मौढये–मौढ्य=मूढ–चेतस्, मूर्ख. माल्हाती–माल्हातणें=अंगीकारतो, आश्रय पावे, अंगिकारणें. दाराढये–दार्ढ्यें=कठिणपणा, बळकटी. दाराढये=पाणिग्रहण, आढ्य, कठिण, बळकटी [दार=विवाहित स्त्री. दारक=पुत्र. दारिका=कन्या. दारकर्मन्–दारक्रिया=विवाह, लग्न, दारण (फोडणें). दारपरिग्रह, दारसंग्रह=विवाह. दारा=पत्नि, विवाहित स्त्री. दारुका=लाकडाची बाहुली. दारु=लाकुड, पितळ] (१८०). अनावडी=हौस कां आवड नसणें. परवडी–रेलचेल (१८१). म्हणोनि–म्हणौनि (१८२). पडलिये धोंडि नेणे कानीं मुरडी=मोठी थोरली जबाबदारी जरी अंगावर येऊन पडली तरी ती नच जाणण्यानें, अंगावर धोंडा पडला तरी, ज्याला कळत नाहीं, अथवा कानावर का कुशीवर वळत नाहीं, संकोच टाकीत नाहीं–लाजणेंच ह्या देहामधील लोकांना

तें जो सोडीत नाहीं-(इंद्रियाचा ब्रह्मगोलक तोच मुळीं पुढें झाला, वर आला, उभा झाला तरीपण डोळाच मुळीं उघडला जरी, तरी पाहाणें होत नाहीं-डोळाच मुळीं दुसऱ्या कोणीतरी आंत ओढून धरिला व तो ओढणारा जो तोच मुळीं पाहाणारा झाला. म्हणून येथें स्वतःचा विश्वासच मुळीं कान मुरडूं लागतो, श्रमणें टाळतो-तिकडे पाहाणेंच मुळीं करीत नाहीं-तेथें श्वास हाच जागें राहून जागवावा तरच बरें, म्हणून झोप नच येईल असें जें कांहीं वर्तन तेंच पाहावें). मुरकुंडी उकलूं नेणें=मुरकुंडी देऊन असणें जें तेथेंच मुळीं कामें आपलींशीं करावींत तें जो जाणत नाहीं (१८३). पाताळे-पाताळीं. उठणें=जीवें जीवो (१८४). उचित अनुचित=योग्यायोग्य, उचितानुचित. झांझुरिता=पेंगलेला, झोपेंत असतां, स्वस्थ निजला असतां, निश्चेष्ट पडला असतां. मेधा=(ध्यान, धारणाशक्ति) बुद्धि (वनस्पती) (पोपट, मध) (बोकड, मेधा) (१८५). पडिघाये कपोळे-(पडिघा=धरणें) गालावर हत ठेवून आधार देतो. पायाचें सिरियाळें=उशी, पायाचा आधार. मांडू लागे=गुडघ्यावर डोकें ठेवितो (१८६). निद्राविशि-निद्रेविषयीं. चांग-चांगू. आथी=मोठीच. लाग=आवड (१८७). ब्रह्मायु=ब्रह्मदेवासारखा दीर्घायु. मानिलियाची-मा निजेलियाची =निजून असावें-झोपेंतच असावें (हें एकच व्यसन) (१८८). वोघें-ओघें=सहज ओघाओघानें. कल्हातांहि =कण्हत असतांहि, कलंडतां, टेकतां, झोके खात असतांही, मोह मदिरेमुळें इतकें कण्हत असतांहि झोंप लागते तरी स्वस्थच ! (१८९). आक्रोशबळें=जबरीनें. व्यापारे=कर्म क्रिया. रोशे आंधळे=प्रेमानें आंधळे, अनुरागाचें, अनुरागरागाचें आंधळे प्रेम जसें रागास आलेलें तें-तेथें आंधळेंच झालेलें तें प्रेम (रागानें आंधळें, क्रोधानें आंधळें) (१९०). केव्हां-केधवां. ठाकते=साध्य की असाध्य. नागवे=नच साध्य होणारें (१९१). वणवा=दावानल, दावा-दावाग्नि-अरण्य, उष्णता. पांखेन्चि-पाखोनि, पंखानी झांकून घेईन अशी इच्छा. हांवा=इच्छा (वणवा लागला. कर्म रेखा पुसिली, तीच आतां अक्षरास आली अशी हांव धरिली, तेथें आंख घालून देवच एक, का एक विठ्ठलच उरला व तोच मी झालों जगा कां असें म्हणणारा तो पतंग) (१९२). वळघे=प्रवृत्त होतो. अकारणीन्चि=अकारणीच, वेदबाह्य कर्म करण्याची प्रवृत्ती, कशाचेही कारणें नच लागावें अशी प्रवृत्ती. (धिंवसा) प्रमाद=अपराध, उन्मत्तता, गैरसावधपणा (१९३). निद्रालस्य-निद्रा आलस्य. इहीं-यया. त्रिबंधि-त्रिविधी=(निद्रा, आळस व प्रमाद अशा तीन बंधांनी). चोखटातें =शुद्ध चैतन्यास (१९४). सरोवर=तळें (सरस्=मोठें सरोवर, पाणी) (सर म्हणजे हालणारें, बाण, हार). जैसे चंद्रत्व तेथें-तैं चंद्रत्व तेथ (१९६). परिहारौनि-पै परिहारौनि=हरून, कमी करून. आंटोपे=वाढते. देही-देह (१९७). वर्षा=पावसाळा. आतप=प्रकाश (उन्हाळा संपल्यावर हिंवाळयांत). सीतन्चि-शीतन्चि =पांढरा रंग [**सित्**=पांढरा रंग, शुक्र, नष्ट, पांढरा, बद्ध, रुपें. **सिता**=साखर, खडिसाखर, चांदणें, पौर्णिमा. **सीता**=नांगरलेली जमीन, नांगराचा तास. **सीत्कार**-सीत्कृति=थंडीमुळें कां हिंवामुळें निघणारा अस्पष्ट शब्द ]. हींव=देहामधील उष्णता. थडथडा हींव आल्यानें जसा सर्व देहाचा भार हाच तेज थंडी उभरून आल्यानें तेथें शांत तेज सत्व रज नव्हे कदाचित् पण आकाशच तें तेजाचें, सत्याचें, निळेंपिवळें जसें असें शांत चित्ताचें सात् चौ सत्याचें सुवर्णासारखें पिंवळें तेथें चित् शक्तीच ती पुढें झाली. हींव=थंडगार, थंडी वाजणें जें. आकाशही-आकाश हें (१९८). लपोनि-लोपोनि. क्षणु-क्षण. होये-होय (१९९).

ह्या तमाच्या लाघवानें तर व्यवहाराचे हिंडोळे-त्या डोळयावर पडदा, पडळ, अभ्र, बुरखा, सारा आल्यामुळें, दृष्टी मंदावली झाल्यानें तेथें तें तर मोहरूपी अज्ञान जाळी किंवा काजळी आलेली अशी पाशानें बांधणारी आकाशांतील तीं (ढग, मेघ, मेहुडे) अभ्रेंच होत जशीं कां. (१७५)

असें जें मोहन-ज्यासच मुळीं अज्ञानापासून उत्पन्न झालेलें लागलेलें होतें व ह्यावरच मुळीं सर्व विश्व भुललें होऊन नाचत असतें, असें तें मोह मेहुडें जें मोहरात्रीचें जाळेंच एक तें अज्ञानापासून जन्मलें, उगवलें, जिव्हाळयाचें असे त्याचमुळें की अहो विश्व का जीव हे भुलले होऊन इतस्ततः वावरत असतात. (१७६)

ह्या जीवदशेस तर मोहनास्त्र घातलें जसें कां असा तो अविवेक ह्याच मुळीं एक महामंत्रच जणूं–जो कां मूढ करणारें असें जें मद्य त्याचेंच मुळीं पात्र राहाण्याचें ठिकाण झालेलें असे ते होत. तेथेंच म्हणजे अविवेकांतच मुळीं नेहमीं दृष्टि लावून असणारे होत. (१७७)

हे पार्था! असें वर्म तें तम रचून असणारें–रचणारें तें तम जाण–जें कीं चहुंकडून–चहुंखुरांनी ह्या देहासच मुळीं आत्मा समजतें, आत्मा मानतें, देहासच आत्मा मानण्यांत तें मनाचें बळ हें, चारही खुरांवर जसे उशी घेणारे, चारही खुरांनीं जसें चंचलपण शिकलेलें तें मनचंद्रमाचें वाहन घाताचें होणारें जसें कां झोपेंतच चौखुरी जाणारा. (१७८)

असें हें एकच मुळीं जें ह्या शरीरामध्यें होणारें तेंच कीं अहो! चराचराच्या ठायीं माज घेऊं लागतें व मग तेथें दुसरी एकादी कसलीही मुळीं गोष्टच नाहीं, कसलीही तेथें दुसरी बुद्धि नसते. (१७९)

तेव्हां सर्व इंद्रियांना जाड्य, जाडपणा कां थंडपणा आल्यामुळें व मनामध्यें तर मूढपणच मूढचेतसपण–मूर्खपणच एक आल्यानें आळ्य असेंच एक पाणिग्रहण अंगिकारतो–कठिपणाचें बळकट असें एक दार्ढ्य घेऊन असणारें असें सर्व आळसपणच एक, दार्ढ्यपणानेंच आळस अंगिकारतो. (१८०)

आंगानें आंगाचें अंग मोडून कार्यजात जेवढें म्हणून तेथें मुळींच कांहीं आवड हौस नसणारी–तेथें तर अहो नुसती जांभयांची रेलचेलच एक–कार्य कर्म–जात तेथीलचीं अंगेंच मुळीं मोड मोडून आळसच एक अंगिकारिला, अशी सर्व गोष्टींमध्यें अनावड, अनादर, हौस नाहीं–आवड नाहीं–अनावडच एक घेऊन असणें जें कां. (१८१)

उघडलेल्या दृष्टीनें, दृष्टि व्यापक करून–दृष्टि उघडी अशी स्पष्ट करून पाहाणेंच नाहीं जेथें तेथें तर जसें कां नच आळविलें तरी, भलत्यास आळविणें झालेलें तेथेंच मुळीं हा ओ देतो–ओ देत उठतो जो. (१८२)

जबाबदारी आली असतां जाणत नाहीं, कानावर का कुशीवर वळत नाहीं–वळणें हें जाणत नाहीं, त्याचप्रमाणें एकदां का पायी मुरकुंडी घालून बसला तर तेथीलचें उकलणें हें ज्यास समजत नाहीं असा तो होतो–असतो–अंगावर येऊन पडलेली मोठी थोरली जबाबदारी ती नच जाणल्यानें अंगावर धोंडा पडला तरी ज्यास कळत नाहीं–अथवा ह्या कानाचें त्या कानावर, का ह्या कुशीचें त्या कुशीवर जो वळत नाहीं–संकोच टाकीत नाहीं–लाजणेंच ह्या देहामधील लोकाना तें जो सोडीत नाहीं (इंद्रियांचा गोलक जरी पुढें झाला–उभा झाला, डोळा उघडा जरी तरी पाहाणें होत नाहीं–डोळाच मुळीं दुसऱ्या कोणी तरी आंत ओढून धरिला झाल्यामुळें तो ओढणारा जो तोच मुळीं पाहाणारा झाला–म्हणून येथें स्वतःचा विश्वासच मुळीं कान मुरडूं लागतो, श्रमणें ऐकणें टाळतो, तिकडे पाहाणेंच मुळीं करीत नाहीं. तेथें श्वास हाच जागें राहून जागवावा तरच बरें म्हणून झोप नच येईल, आळसणें नच होईल असें जें कांहीं वर्तन तेंच पाहावें लागणारें –मुरकुंडी देऊन असणें जें तेंच मुळीं कामास कसें आपलेंसें करावें–कामें आपलीशीं कशीं करावींत तें जाणत नाहीं. (१८३)

पृथ्वी रसातळीं जावो कां आकाश हें अंगावर तुटून पडो तरी जीवें कां प्राणें जगणें जगावें कां जागावें, उठावें, जीवित्व जगणारें तें कसें तें पाहावें तरी असा भावच मुळीं उत्पन्न होत नाहीं. (१८४)

योग्य काय? अयोग्य तें कोणते? उचित तें कां! अनुचित तें योग्य का अयोग्य जें तें सर्वेच्या सर्व पेंगत असलेला जसा, का झोपेंत असलेला जसा, निश्चेष्ट! तेथें जीव गेला तरी जागेपण तेथें कसचें न काय!! ती आठवण येणारी कां होणारी ती होतच नाहीं. तेथें तर अहो! जेथें आहे तेथेंच मुळीं जेथच्या तेथेंच पेंग आला असतां, झोपेंत पेंगत असतां, लोळावें अशी ती मेधा धारणाशक्ति, ध्यान, बुद्धि–होऊन असलेली ती! (१८५)

तळहाताचा आधार घेऊन, तळहात उमे करून, डोक्यास आधार देतो, डोकें तोलून धरतो–हताश झालेला अशा हताशाप्रमाणें गाल हातावर टेकून बसतो–गुडघ्यांत डोकें घालतो, डोक्यास गुडघ्याचा आधार देतो, गुडघ्यांत डोकें घालून बसतो. पायाचा आधार मांडूं लागतो–पायाचें पुष्कळसें असें जाळें शिरीं मांडूं लागतो, डोक्यास पायाचा आश्रय घेतो [ आल = पुष्कळ, जाळ, कपट. आल जाल = कपट जाल ] (१८६)

झोपेविषयीं चांग म्हणजे दातांची शुभ्रता–( चुका नांवाची वनस्पती ) हीच मुळीं जीवभावाच्या अति गोडीची तीच मुळीं पुढें घेऊन नातेवाईकीची करून असतो. झोपीं जातांना, झोप आली तर मोठी आवड घेऊन–मोठ्या आवडीनें झोपींच जातो, त्या झोपेच्या सुखापुढें स्वर्गसुखही तुच्छ मानतो, स्वर्गापेक्षां झोंपच आवडून घेऊं लागून स्वर्ग तर काय अहो ! निश्चयानेंच तुच्छतेचा असा मानतो. (१८७)

ब्रह्मदेवासारखा दीर्घ जीविताचा–दीर्घायु व्हावें–ब्रह्मतत्व काय नेहमींच अस्तित्वांत असणारें–असा दीर्घ काळ झोपीं गेलेला व्हावें त्यामुळें जसें कां आयुष्यच दीर्घ म्हणजे विस्तृत झालें तेथें असेंच निजून असावें, झोपेंतच असावें असें हें त्याचें मानणें जिकडे तिकडे मानिलें व्हावें–ज्यांनी त्यांनीं अहो ! खरेंच कीं त्याचें म्हणणें असें म्हणावें–मानावें त्याशिवाय दुसरें कांहींहीं व्यसन नाहीं. एवढेंच काय तें एक व्यसन–म्हणजे आसक्ति, छंद, नाद, असमर्थता, पाप, निरर्थक उद्योग तो. (१८८)

रस्त्यानें जातां जातां सहज प्रसंगानेंच ओघाओघानेंच कण्हत असतांहि ( कलंडतांहि, झोके खात असतांहि-झोंप लागते, मोह मदिरेमुळें इतकें कण्हत असतांही स्वस्थच कीं अहो ! झोंप लागते. नित्य नीज –निजर म्हणजे झोंप आली तर, कोणी त्यास अमृतही पण देऊं लागलें तर तें तो नाकारतो व झोंपच प्रिय करून असतो. (१८९)

तसेंच जबरीनें आक्रोश म्हणजे शिव्याशाप देतां देतांहि, निंदा करतां करतांहि, का ओरडतां ओरडतांहि जबरीनें व्यापार कर्म क्रिया, कामकाज धंदा करण्यास कोणी कांहीं एकादे वेळेस बाहेर निघाले–निघणें झालें तर जसें कां आंधळेंच तें प्रेमाप्रेमाचें, अनुरागारागाचें जसें प्रेमच तें पण रागानें आंधळें का ओघानें आळलें. (१९०)

केव्हां कसें रहाटावें–व्यवहारावें–कुणाबरोबर कसें का काय बोलावें तेथें पुढें असलेलें जें कोणी तें उभें आहे किंवा कसें किंवा पुढें आलेलें काम तें साध्य आहे का असाध्य आहे–किंवा नच साध्य होणारें–का नच आकळिलें होणारें असें, तेंही पण जाणत नाहीं कीं. (१९१)

तेथें त्याचें जसें कांहीं हांवेने, ईर्षेनें असणें तें जसें कां पतंगच एक असा–परवाना–जीवच एकपण पक्षीच एकपण कां आपल्या पंखांनी वणवा दावानल दाव तो, सर्व पुसून घ्यावा कीं अहो ! अशी हांव इच्छा करणारा जसा कां (अहो ! सूर्यानें म्हटले कीं वणवा हा सर्व आपल्या अंगावर घेऊन बाजूंनीं गिळून टाकावा तर काय अहो ! ज्ञानसूर्यानें ते प्रारब्धाचे डोंगर उसंतावे लागणारे ते त्या प्रारब्धाबाबत आपण जबाबदार आहोंत असें म्हणणें केव्हांहि नव्हेच ). (१९२)

जीवच एक अशी पतंगासारखी हांव बांधणारा-तसा साहसास, अविचारास, जबरीस, धाडसास (साहस म्हणजे अग्नि विशेष) प्रवृत्त होतो. कांहीं एकादें काम केलेलें तें कशाचेही कारणीं नच (व्हावें) लागावें अशी अहेतुकता, निःस्वार्थता–कारण नसतांना उन्मत्तता, गैरसावधपणा, अपराध, प्रमाद, वेदबाह्य कर्में करण्याची प्रवृत्ती अकारणीच लागावी ती जशी असाच एक प्रमाद का अपराध करणें आवडतें–रुचतें. (१९३)

त्या निद्रा, आळस व प्रमाद अशा तीन बांधण्याच्या साधनांनीं शरीर हें त्या तीन बंधांनीं त्रिबंधांत फसविलें असें करतें. शरीर हें तीन तऱ्हांनीं आडविलें धरिलें, रचलें, बंधन केलें गेलें असें होतें तेथें (देह–

विशेष गुण–कारण–हेतु–कुटुंबपोषणासक्ति) उपाधि रहित जें शुद्ध चैतन्य तेंच मुळीं जसें कां बांधलें गेलें, जसें तीन बंधांनीं धारण केलें, गुंडाळलें, वसविलें, रोविलें जसें कां. (१९४)

जेव्हां का वन्हि काष्ठामध्यें भरून असतो–काष्ठ वन्हिमय होतें–तेव्हां तर वन्हि हाच मुळीं कीं, काष्ठाच्या आकारानेंच दिसतो, आकाश व्योम जेव्हां का घटानें आवरिलें व्यापिलेलें असें=तेव्हां तर तें आकाशच मुळीं घटाकाश म्हटलें जसें होय. (१९५)

अथवा भरलेल्या तळ्यामध्यें (चंद्रत्व × चंद्र) चंद्राचें बिंब पडलें असतां जसें तें तळें सरोवरच मुळीं जसें चंद्राच्या प्रभेनें, बिंबानें भरलेलें आहे असें दिसतें, त्याप्रमाणें गुणांच्या आभासानें, भ्रामक हेतूनें, प्रकाशानें, सादृश्यानें, भासानें (आभास=पुष्कळ धर्म व्हावा ह्या हेतूनें परधर्म आचरणें जें) बांधलें असें आत्मत्व जें तें दिसतें–गणतें. (१९६)

कफ व वाताची फेड करून, कफ व वात ते निरसन करून, कफ व वात दूर करून, त्याग करून, निवारण करून, लपवून का औदार्याचे करून–का अनादराचे करून जेव्हां का हा देही आत्मा (परिहार्य=करभूषण, कडे) का प्राणी, मनुष्य (देहिनी=पृथ्वी) पित्तामुळें गर्वाचा होतो, पित्त हें गर्व धरून असतें, प्रौढि मिरवितो, ऐट करतो, फुगतो, विस्ताराचा होतो (पोटांत गुरगुरतो) तेव्हां देह हा संतप्त, तापलेला, श्रांत, पीडित, सुकलेला असाच केला होतो–देह संतप्त म्हणजे सुकलेला होतो जसा कां. (१९७)

अथवा वर्षाऋतूमध्यें म्हणजे पावसाळ्यामध्यें (वर्षा अवसायः=शरद् ऋतु) आतप म्हणजे ऊन हें जिणलें होऊन [सीत म्हणजे (सीत्कार, सीत् कृती म्हणजे थंडी, दुःख इत्यादीमुळें होणारा अस्पष्ट आवाजच मुळीं) दिसूं लागतो] शीत म्हणजे (मंद, आळशी, मूर्ख, थंड) थंडीच (पाणी, कफच) मुळीं दिसूं लागतें. तेव्हां तर आकाश हें जसें हींवच एक असें होतें कीं, थडथडा वाजणारें हींव असेंच आकाश होतें–हींव तें आकाश होतें का आकाश मुळीं हींव झालें असें होतें. (हिंवणें–श्वस=उद्यां, भविष्यकाळ. श्वसन=वायू, श्वासोच्छ्वास, सुस्कारा, स्पर्श. श्वास=वर्णाचा बाह्य, प्रयत्न विशेष, ब्रीद). (१९८)

अथवा स्वप्न व जागृतीचा लोप होऊनच कीं सुषुप्तीही येते. तेव्हां एक क्षणभरच मुळीं चित्तवृत्ति म्हणजे मनाचा कल, मनोव्यापार [सुषुप्ति=गाढ निद्रा, ज्ञानशून्य जीव अवस्था-(सुषुप्तं=सुषुप्ति)] हा ती सुषुप्तीच होते, त्या सुषुप्तीचा सर्वथैव होतो कीं. (१९९)

**सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ।**
**ज्ञानमावृत्यतुतमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥**
**रजस्तमश्चाभिभूय सत्वं भवति भारत ।**
**रजः सत्वं तमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥ १० ॥**

सत्वामुळें सुख, रजामुळें सुखदुःखमिश्रित प्रवृत्ति व तमामुळें अज्ञान. सत्वं सुखे संजयति=सत्व हें सुखाची इच्छा उत्पन्न करतें, जोडतें, सुखामध्यें असावें असें (संग जनयति) आंग सत्व पाहूं करतें, सत्वामुळें सुखाचा लोभ येतो, सुखांत असावें असें होतें. रजः कर्मणि (संजयति)=रजोगुणामुळें क्रियेमध्यें प्रवृत्त होतो–कर्मामध्यें हालचाल करूं लागतो–वावरूं लागतो. तमः तु ज्ञानम् आवृत्य संजयति उत् प्रमादे=ज्ञानास आवरून धरून तम हें प्रमादामध्यें प्रवृत्त करतें–उत् म्हणजे प्रमाद हाच उपस्थित होतो, तम प्रमादाशीं संयुक्त होतो.

**अन्वयः**—भारत । सुखे संजयति सत्वं । कर्मणि रजः संजयति । तमः तु ज्ञानम् आवृत्य । प्रमादे उत् संजयति ।

अर्थः—हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, सत्वगुण सुखाविषयीं आसक्ति (नियुक्तता) उत्पन्न करतो, रजोगुण हा कर्मास प्रवृत्त करतो व तमोगुण हा ज्ञानाला झांकून टाकून प्रमादामध्यें, अकर्तव्यामध्यें किंवा असावधपणाविषयीं आसक्ति उत्पन्न करतो. (९)

सत्वं, रज, तम, अभिभूय, भवति=सत्व हें सत्वास येतें तेव्हां तें स्वतः रज व तम यांना पराभवून प्रकाशमय होतें. रजः सत्वं तमः च एव (अभिभूय भवति)=रजोगुण हा स्वतः प्रकाशित होऊन, सर्व प्रकाशाचा होऊन, सत्व व तम यांना दडपून टाकून रजपणास येतो. तथा च तम, सत्वं रजः (अभिभूय भवति)=तमोगुण हा स्वतः सर्व प्रकाश होऊन सत्व व रज यांचा जोर कमी करतो. स्वतः तें तम तमोगुणाचें होतें.

अन्वयः—भारत। सत्वं। रज। तम। च। अभिभूय। भवति। रजः। च। सत्वं। तम। अभिभूय। रज एव (भवति)। तथा तमः सत्वं रज (अभिभूय) (तथा) तमाः (भवति)।

अर्थः—रजोगुण व तमोगुण यांना पराभूत करून सत्वगुण हा स्वतःची वाढ करतो, स्वतःस प्रगट करतो, स्वतःस उत्थापन देतो. सत्व व तमोगुण यांचा मोड करून रजोगुण हा बळावतो. तसेंच सत्व व रजोगुणांना जिंकून तमोगुण हा वृद्धिंगत होतो. (१०)

**तैसीं रजतमें हारवीं। जैं सत्वमाज मिरवी।**
**तैं जीवां करवी म्हणवी। सुखिया ना मी॥ २००॥**
**तैसेंचि सत्व रज। लोपुनि तमाचें भोज।**
**वळघे तैं सहज। प्रमादी होये॥ २०१॥**
**तयाचि परि गा धाटी। सत्व तमातें पाठी।**
**घालुनि जेव्हां उठी। रजोगुण॥ २०२॥**
**तेव्हां (कर्मे) कर्मावांचूनि कांहीं। आन सौंदर्यचि नाहीं।**
**ऐसे मानी देही। देहराज॥ २०३॥**
**त्रिगुण वृद्धि निरूपण। ती श्लोकीं सांगितलें जाण।**
**आतां सत्व (सत्वादि) वृद्धि लक्षण। सादर परियेसी॥ २०४॥**

रजतमें–रजतम. माज=वृद्धि. सुखिया ना मी=मी सुखी आहें ना अहो !! (२००). ओज=तेज, जळ. वळघे=प्रवृत्त होतें. प्रमादि–गैरसावध. होये–होय (२०१). तयाचि परि गा धाटी–तयाचि गा परिपाठी (धाटी=शैली, चलाखी, वाह ! क्या खूब !). परिपाठ=संवय, शिरस्ता, पद्धत, इच्छेची हांव. तमाचे पाठि–तमाते पोटि (२०२). कर्मे वाचोनि–कर्मावांचुनि. सौंदर्यचि=गोमटें. ऐसी मानी देही–ऐसे मानी देही. देहराज–देहराजु (२०३). ती–तीन. सत्व वृद्धि–सत्वादि. परिसा–परियेसी (२०४).

तशा त्या ज्ञानशून्य जीवावस्थारूप मनाच्या कलानें अथवा मनोव्यापारानें रजोगुण–म्हणजे जसें फुलांतील पराग–सूक्ष्म कण असे मनोविकार पाप म्हटले ? तसेंच तम तें तमोगुण म्हणजे–मोह, मूर्च्छा, अज्ञान, दुःख, निद्रा, संसार, प्रकृति (पाप) हें हारवितो–त्यांना हार देतो, जिंकतो, चोरतो, दूर करतो, गमावितो व मनोविकार प्रकृति नेवविली झाल्यानें रज तमाचा पराभव करून सत्वच मुळीं म्हणजे अस्तित्व, स्वभाव, गुणधर्म, मन, बुद्धि, चित्त, स्थैर्य, मूलतत्व, जीवात्मा मुळीं वृद्धि माज घेतो–(सत्वं भवति)–ज्ञानावर माजतो तेव्हां तर त्या जीवाकडून कीं म्हणविणेंच करतो कीं अहो मी किती तरी सुखी (=वरूण पुरी) सद्गुणी सुखी–सुखिया आहें ना (सुखात्मा=परमात्मा, ब्रह्म. सुखोत्सव=पति. सुखाकृता–सुख+कृत= सुखकारक). (२००)

तसेंच सत्व म्हणजे स्वभाव का गुणधर्म तसेंच रज म्हणजे पुरुषांतील सूक्ष्म कण मनोविकार हे लोपले होऊन–तमोगुणानें मोह निद्रा प्रकृति संसाराचें तें ओज, तेज, जळ प्रवृत्त होतें तेव्हां तर अगदीं सहजासहजींच मग गैरसावध असा प्रमादि म्हणजे चुकीचा झाल्यानें झिंगलेला म्हणजे गबाळया, गाफील होतो. (२०१)

असाच परिपाठ पडल्यामुळें किंवा अशीच ती तऱ्हा, शैलि का धाटी पडल्यामुळें सत्वास कां तसेंच तमोगुणास म्हणजे स्वभावास व संसारास पाठीमागें घालून, दाबून दडपून टाकून, पाठीमागें टाकून रजोगुण हा उठतो जेव्हां कां. (२०२)

तेव्हां तर अहो कर्म करणें हेंच एक–कर्माच्या व्यापामध्यें गुंतून असणें हेंच सर्व सौंदर्य तेथें दुसरें कांहींच तितक्या सुंदरपणाचें नाहीं असें देहराज आत्मा मानतो. (२०३)

तिन्हीं गुणांमधील त्रिगुणाची वृद्धि ही एक एका गुणाची ती कशी होते तें निरूपण करून सांगितलें–निरूपण, निरूपिती परी म्हणजे आकार पाहाणें, शोध, चौकशी, व्याख्या का विचार निदर्शनानें सांगण्याचें केलें तें ६।७।८ ह्या तीन श्लोकांनी–आतां यावर सत्व वृद्धीचें लक्षण मूळ तत्व जीवात्मा मन, बुद्धि, चित्त, स्थैर्य व स्वभाव अस्तित्व वृद्धि पावलें तें मनःपूर्वक ऐकण्याचें करावें–तें ऐकण्यास सादर असावें. (२०४)

**सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते ।**
**ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥**

गुणवृद्धीने प्रदर्शनतेचें तें—

अस्मिन् देहे सर्व द्वारेषु, प्रकाश, उपजायते=ह्या देहामधील सर्व द्वारामध्यें प्रकाश उत्पन्न होतो. ज्ञानं यदा तदा=तेथें ज्ञान म्हणजे वेदन, संवेदन जेव्हा होऊं लागतें, वृत्ति येऊं लागते तेव्हां. सत्वं विवृद्ध सत्वं उत् इति=सत्व अधिकतेमुळें सत्वच एक उपस्थित होऊं लागून सत्वाचें म्हणजे ज्ञानाचें होतें, सत्वच एक विविधतेचें होतें, ज्ञानकलाच ती जशी कां.

अन्वयः—अस्मिन् देहे । यदा । सर्व द्वारेषु । ज्ञानं उपजायते । प्रकाश उपजायते । तदा । सत्वम् । विवृद्धं विद्यात् उत् । इति ॥ ११ ॥

अर्थः—या देहामध्यें सर्व द्वारांत म्हणजे इंद्रियांत व अंतःकरणांत ( मन, बुद्धि व ज्ञानेंद्रियें ) जेव्हां प्रकाश म्हणजे चेतनता, तेजस्विता अथवा तरतरीतपणा व ( ज्ञान ) विवेक उत्पन्न होतो, तेव्हां सत्वगुण वाढला असें समजावें. (११)

**पैं रजतम विजये । सत्व गा देहीं इये ।**
**वाढतां चिन्हें तियें । ऐसीं होती ॥ २०५ ॥**

**जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समाति बाहेरी वोसंडे ।**
**वसंती पद्म-खंडे । दति जैसी ॥ २०६ ॥**

**सर्वेंद्रियाच्या आंगणी । विवेकु करी राबणी ।**
**सांचचि करचरणीं । होती डोळे ॥ २०७ ॥**

**राजहंसापुढें । चांचूचेनि आगरडे ।**
**तोडी जेंवी झडे । क्षीरानिराचें ॥ २०८ ॥**

**तेविं दोषादोषविवेकी । इंद्रियें होती पारखी ।**
**नियेमु बारे पाईकी । वोळगे तैं ॥ २०९ ॥**

नाइकणें तें कानुचि घाळी । न पहावें ते दिठीचि गाळी ।
अवाच्य तें टाळी । जीभचि गा ॥ २१० ॥
वातीपुढें जैसें । पळोलागे काळवंखे ।
निषिद्ध इंद्रिया तैसे । समोर नव्हे ॥ २११ ॥
धराधर काळें । महानदी उचंबळे ।
तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥ २१२ ॥
आगा पुनिवेच्या दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं ।
ज्ञानीं वृत्ती तैसी । फांके सैंध ॥ २१३ ॥
वासना येकवटे । प्रवृत्ती वोहटे ।
मानस विटे । विषयावरी ॥ २१४ ॥
एवं सत्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें ।
आणि निधनही घडे । तेव्हां जरी ॥ २१५ ॥
तन्हि जैसी घरीची संपत्ति । आणि तैसीचि उदार धैर्य वृत्ति ।
मा परत्रा आणि कीर्ति । कां न व्हावें ॥ २१६ ॥
कां पाहालेनि सुयाणें । जालेया परगुणें ।
पढियंते ये पाहुणे । स्वर्गौनियां ॥ २१७ ॥
मग गोमटेया तयां । जावळी असें धनंजया ।
तेवीं सत्विकी जाणे देहा । के आथि गा ॥ २१८ ॥
जे स्वगुणी उद्भट । घेउनि सत्व चोखट ।
निघे सांडूनि कोपट । भोग क्षेम (क्षम) हे ॥ २१९ ॥
अवचटे ऐसा जो जाये । तो सत्वाचाचि नवा होये ।
किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियां मार्जी ॥ २२० ॥
स ग पा धनुर्धरा । रावो रायेपणें डोंगरा ।
गेलिया अपुरा । होय काई ॥ २२१ ॥
नातरि येथिचा दिवा । नेला सेजिया गांवां ।
तो तेथें तरी पाण्डवा । दीपूचि कीं ॥ २२२ ॥
तैसि ते सत्वशुद्धि । आगळी ज्ञानासी वृद्धि ।
तरंगावो लागे बुद्धि । विवेकावरी ॥ २२३ ॥
पैं महदादि परिपाटी । विचारून सेवटीं ।
विचारासकट पोटीं । जिरोनि जाये ॥ २२४ ॥
छत्तिसां सदतिसावें । चोविसां पंचविसावें ।
तिन्हीं नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ २२५ ॥
ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असें जया सुगम ।
तया सवें निरोपम (निरोपण) । लाहे देह ॥ २२६ ॥
याचि परी देख । तम सत्व अधोमुख ।
बैसोनि जैं आगळिक । धरी रज ॥ २२७ ॥

प्रज्ञा आंतुलीकडे न समाति बाहेरी वोसंडे=प्रज्ञा अंतर्यामीं न राहिल्यामुळें बाहेर सांडते. वसंतीपद्म-खंडे दति जैसी=वसंत ऋतूंत पद्माचे समूह शोभाच मुळीं ती दति होय [दति म्हणजे पखाल किंवा चर्म. येथें कमळ अथवा वृक्ष ह्याविषयीं बोलणें केलें तर तेथें त्या वृक्षावरील साल अथवा मुळाकडेसच म्हणजे खालपट अशी जी त्या वृक्षाची मुळाकडूनच पाणी घेण्याची ती दति अथवा कांति कां चमक ती म्हणून वृक्षयोनीकडे हा शब्द योजला जेव्हां तेव्हां तेथें साल अथवा मुळाकडेस दृष्टि-आदर-लक्ष असाच अर्थ होय] (२०६). रावणी=सेवा, चाकरी. सांचन्नि करणीं (करण=क्रियेचें साधन, कारण, इंद्रिय, अर्धी तिथी)-सांच करचरणा-सांचच कर चरणीं. (होती डोळे)=हातापायास डोळे येतात (२०७). चांचूचेनि-चांचुचे. आगरडे=टोंक, अग्र. झडे-झगडे. क्षीरानिराचें-क्षीरनीरांचे=क्षीरास-नीराशी-नीराचे लागलेले झडे ते हंस तोडतात (२०८). पारखी-पारखणारी, निवाडा करणारी. बारे पाईकी=सेवा करितो. ओळगे=आला असतां (२०९). वाळी=टाकून देतो. पाहाणे-पाहणें (२१०). वातीपुढें-वाती पुढां. काळवंखे-काळोखे=अंधारे. निषेध-निषिद्ध. नव्हे-नोहे (२११). धाराधर-धराधर (काळें)=पावसाळ्यांत. पघळे=पसरते (२१२). सैंघ=पुष्कळ (२१३). हें चिन्ह-इये चिन्हें. फुडें-पुढे=होती पुढें, खरी अशी (२१५). उदार=औदार्य. परत्र आणि कीर्ति=परलोकीचें वर कीर्तीचें. न व्हावें-नोहावे (२१६). पाहालेनि=उगवण्यानें. सुयाणें=सुगी-सुकाळ. परगुणें-पक्कान्न. पढियंते ये पाहुणें स्वर्गीनिया-पढिये पाहुणें स्वर्गीनि ये=आवडते पूर्वज स्वर्गाहून पाहुणे म्हणून येतात; पर, इंद्रिय, सूक्ष्म, श्रेष्ठ (इंद्रियांना भाव आला तेथें पाहुणा उगवला) (२१७). जवळी-जावळी=जवळची. उपमा-उपमा बरोबरीची, जवळ जवळ तोच एक जसा. सत्विकी-सात्विकी-सत्वे-सत्वी-सत्ववत् कीं. जाणे देहा के आथिगा=मृत्यूनंतर तो कोठें जाईल बरें? सत्ववत् हें रूप होतें, सत्विन् हें रूप होत नाहीं (१) सत्व-सत्वात्मा=लिंग देह. सत्वतनु=वासुदेव. सत्व लक्षण=गर्भ चिन्ह. सत्ववत्=शरीर, विष्णु, सत्व. विप्लव=बेशुद्धि. सत्वस्थ=योगी. (२) अस्तित्व, स्वभाव, गुणधर्म, प्राण, मन, चित्त, बुद्धि, चित्तस्थैर्य, धैर्य, जीवात्मा, मूळतत्त्व, पदार्थ, सद्गुण, मत्य, बल, उत्साह, उद्योग, प्राणी, भूत, संपत्ति, निश्चय, सत्व रज तम ह्या गुणत्रयांपैकीं पहिला, वृक्ष (२१८). सद्गुणी-स्वगुणी (उद्भट-उत्+भट्ट=(भट्=पोसणें, रक्षणें, वेतन देणें, बोलणें), धनी, श्रेष्ठ, विद्वान् (एक पदवी), (भट्टार=पूज्य, धनी, स्वामी, श्रेष्ठाची पदवी). जे सत्व गुणी उद्भट्ट=स्वधर्मानें उत्कृष्ट वागणारा, भोगाचें स्थान जें हें शरीर तें सोडून बरोबर शुद्ध सत्व घेऊन निघतो. कोपट=देह कोपट. भोग क्षम-मोक्ष क्षेम (२१९). अपुरा=तरी त्याला थोडेंच उणें पडणार आहे? रायेपणें=राजैश्वर्य घेऊन (२२१). सेजिया=जवळच्या, नजिकच्या (२२२). तरंगा वो=तरंगावो=पोहूं लागतो (२२३). महदादि परिपाटी=जेथें त्रिगुणत्व हें समतोलानें तोललेलें असें पद्धतीचें, व्यवस्थेचें, अनुक्रमाचें, चालरीतीचें, सविस्तर कथन केलेलें असें (२२४). चतुर्थ=शुद्ध सत्व (२२५). निरोपम-निरुपम=ब्रह्म-निष्ठाच्या कुळांत (२२६). यांचि परी=इयाचिपरी. बैसोनि=खालीं बैसवून, दडपून. जे-जैं. आगळिक=वाढ (तम सत्व अधोमुख तेथें रज बसून वाढ घेतो) सत्व तम अधोमुख असें तेथेंच मुळीं बसून रज हा आगळिक (महत्त्व, वाढ) धरून असतो (२२७).

रजोगुणावर व तमोगुणावर जय मिळवून-विजय पावून जेव्हां कां सत्व हें ह्या देहाच्या ठायीं का जीवात्म्यामध्यें वाढतें, वृद्धि पावतें, तेव्हां लक्षणें तीं खालीं दिल्याप्रमाणें होतात. (२०५)

वसंत ऋतूमध्यें कमळांचे समूह त्यांची शोभाच मुळीं ती दति होय-मुळाकडेच ती कांति, द्रव, चमक वसत असलेली तेथें सत्ववृद्धीमुळें प्रज्ञा (स्वयंदात्री सरस्वती, विचारशक्ति, ज्ञानशक्ति) ही भरभरून आल्यानें आदर का सर्व लक्ष मुळाकडेच दिलें होतें व आंत सामावली न होऊन-अंतर्यामांत न सामावल्यामुळें बाहेरच वोसंडते. (२०६)

सगळ्या मनाच्या ठायीं अथवा ज्ञानाचें का कर्माचें जें साधन हात, पाय, डोळे इत्यादि सर्व इंद्रियांच्या खुल्या जागेमध्यें, आंगणामध्यें, वाहानाच्या ठायीं (सुंदर स्त्री ही पण अंगण म्हटली) विवेक, सारासार विचार,

तसेंच एकांतच मुळीं सेवाचाकरी करणारा राबणारा झाल्यानें, खरोखर अहो साचेपणानेंच मुळीं ह्या इंद्रियाच्या ठायींच शरीराला, हातापायांना कां करणांच्या करण्यासच मुळीं डोळे होतात–डोळे म्हणजे ज्ञानदृष्टि येऊन असते (करणि म्हणजे लिहिणें का लेखनाच्या ठायींच मुळीं डोळे येऊन असतात). करण=शरीर, इंद्रिय (सं.), ताल, साधन, कारण, हेतु, धंदा. (२०७)

चोंच व पाय तांबडे असलेला शुभ्र हंस–राजहंस–म्हटलेला जो त्याच्यापुढें चांचुचे टोकांनी, अग्रांनी क्षीरनीराचे झडेच झगडे मुळीं ते तोडले होतात (क्षीर=दूध, पाणी) (नीर=पाणी, रस). क्षीराचे नीराशीं कां नीराशीं क्षीराचे लागलेले ते झगडेच मुळीं खरा निवाडा झाल्यानें मिटविले होतात. (२०८)

तसें दोष, उद्देश, हेतू, कारण अथवा अव्यंग, पुण्य, सद्गुण, आरोग्य, धर्म, इत्यादि संबंधीं एकांत का सारासार विचार हा पारखणारा का निवाडा देणारा तो कसा तें इंद्रियांना समजत नाहीं–तेथें इंद्रियें पारखीं म्हटलीं पण नियम आला असतां तो नियमच मुळीं सेवा करणारा असतो, होतो. (२०९)

नच ऐकावें जें तें कानच मुळीं टाकून देतो, न पाहावें जें तें दृष्टीच मुळीं गाळते–तें ती पाहात नाहीं, अवाच्य=बोलण्यास येत नाहीं तें; अवाच्य=बोलण्यास अयोग्य का बोलण्यासारखें जें नाहीं तें तर जीभच मुळीं टाळते (अवाच्=दक्षिणेकडचा. अवाच्य देश=स्त्री गुह्यांग). (२१०)

शब्द हा प्रकाशाचा असला तर, कां दिवा हातांत असला तर, किंवा दिव्यापुढें जसें अज्ञान काळोख पळूं लागतें, नाहींसें होतें त्याप्रमाणें निषिद्ध जें असेल का निषेध केलेला आहे ज्याचा तें तर इंद्रियांच्या समोरच मुळीं होत नाहीं कीं. (२११)

धाराधर (धाराधर=मेघ, तरवार) काळे म्हणजे पावसाळ्याच्या दिवसांत (धारा=प्रवाह, वृष्टि, चाक, कीर्ति, संतति, गति घोड्याची, शस्त्राची धार) मेघमालेनें (विद्युत्) रेखेनें मेघाचा वर्षाव झाला म्हणजे यथाकाल मेघवृष्टीनें काले वर्षतु पर्जन्यः। महानदी म्हणजे समुद्रगामिनी नदी जेव्हां उचंबळून येते तशी बुद्धि (प्रशस्त शास्त्राच्या ठायीं) शास्त्राविषयीं प्रशस्त होते, शास्त्रजातांच्या आज्ञा, धर्म, नियम शासनांच्या ठिकाणीं प्रसर घेऊन असते, पसरते, पुढें होते, व्यापकत्व घेऊन असते, फैलावते. (२१२)

पौर्णिमेच्या दिवशीं चंद्रप्रभा ही धांव घेऊन सर्व आकाश व्यापते, प्रकाशते, आकाशच सर्व प्रकाशणारी होते, कुबेर नगरीच जशी का प्रकाशाची एक (चंद्रकिरणांनी जशी) त्याप्रमाणें ज्ञानाच्या ठायीं वृत्ति (वागणूक, वर्तनक्रम, व्यवहार) ही पुष्कळपणानें अतिशयच फांकते, फैलावते, प्रकाशणारी होते. (२१३)

वासना एकवटते [सर्व वासना गोळा होऊन, ऐक्यभावास येऊन एकत्रित होतात, एकवटतात], प्रादुर्भाव प्रवृत्ति वोहटूं लागते, वसरते, मन हें इच्छेवर, ऐच्छिकावर, विषयावर विटतें. (२१४)

याप्रमाणें जेव्हां कां चित्तस्थैर्य होतें, सत्व वाढतें तेव्हां अशीं हीं चिन्हें, लक्षणें खरीं पुढें होतात. यावरही जर कां कांहीं एकादे वेळेस तेव्हां निधन म्हणजे मरणही घडलें कां प्राप्त झालें तरीही सुद्धां अहो! (२१५)

जशी का घरींच पिकविलेली भक्ति–कर्म, ज्ञान संपत्ति (घरचीच ती सर्व कौटुंबिक संपत्ति जशी कां गृह–परिन), कुटुंबवत्सलता, उदार धीर वृत्ति, तेथें अहो परलोकीचें आणि वर कीर्तीचें कां न व्हावें बरें? (२१६)

अहो असेंही होतें कीं सुयाणें म्हणजे सुगी, सुकाळ, सुबत्ता, झाल्यानें स्वर्गलोकींहून पढियंते–आवडते असे पूर्वज पाहुणेच म्हणून पक्वान्नें तीं सेवण्यास येतात कीं जी. (२१७)

अशा त्या गोमट्या, चांगल्या पाहुण्यांस उपमा द्यावयाची ती जशी कां उपमा बरोबरीनें पूर्वजच जसा कां जवळ जवळ तोच एक, हे धनंजया! होय असा त्याप्रमाणें सत्ववत् कीं तो शरीरधारी जाणावा (तें सत्ववत् कसें असतें तें येथें बरोबर उतरलें, उपमा नटली असा सत्ववान् कीं). (२१८)

तेथें आत्माच एक नटला, सगुण सीमा ती श्रेष्ठपणानें रक्षिली, पोसली, बोलली, वेतनच तें जसें असें तें चोखट चांगलें सत्व घेऊन आहे, स्वधर्मानें उत्कृष्ट वागणारा भोगाचें स्थान जें हें शरीर तें सोडून (देहबुद्धीचा नच होऊन) आपल्या बरोबर शुद्ध सत्व घेऊन असतो, निघतो तो तर देहरूपी कोपट सांडून भोग, मोक्ष, क्षेम, कुशल, सत्वच घेऊन वागतो–वावरतो. (२१९)

अकस्मिततेनें असा जो जातो तो तर शुद्ध सत्वच तारुण्य घेऊन आलें असा तरुणतर ज्ञानियामध्येंच जन्मणारा–उगवणारा होतो–ज्ञानियाचा सात्विक देहच त्यांस मिळतो–ज्ञानियामधील जो जन्म म्हणजे ज्ञानच प्रत्यक्ष तो पावून असतो. (२२०)

हे धनुर्धरा, पार्था, सांग बरें कीं राव जो आहे तो आपल्या रायपणानें जरी डोंगरास कां पर्वतावर गेला तरी तेथें तो अपुरा असा केव्हां तरी असतो काय? तसा तो केव्हांही नसणारच कारण त्याची ती रायपणाची सीमाच त्याचे बरोबर केव्हांही असणारीच. (२२१)

अहो येथचा दिवा शेजारच्या गांवास नेला तरी तो हे पाण्डवा! तेथें दिवाच ना! (२२२)

तशी ती सत्त्व शुद्धि म्हटली ती तर ज्ञानासच एक विलक्षणतेची वृद्धि जशी कां होय. तेथें बुद्धि ही सारासार विचारावरच मुळीं तरंगणारी असते–पोहत असते. (२२३)

महत्तत्त्व अथवा महत् आदिकरून जेथें त्रिगुणत्व समतोलानें तोललेलें असें (पद्धतीचें, व्यवस्थेचें, अनुक्रमाचें, चालीरीतीचें, सविस्तर कथन केलेलें असें) परिपाठाचें झालेल्या विचारामध्यें विचारून ['समबुद्धी कर्मयोगांत आरूढ झालेला, ज्यास कर्म हें कारण साधन सांगितलें आहे तसेंच योगारूढ झाला म्हणजे मनाची शांति येण्यास (दम) इंद्रियदमन हेंच ज्ञानपरिक्तेचें साधन सांगितलेलें] शेवटीं तो विचारासहित–विचारासुद्धां ज्ञानाच्या पोटींच जिरोनी जातो कीं. (२२४)

छत्तीस तत्त्वांना [भूतें ५, अहंकार १, बुद्धि १, अव्यक्त १, इंद्रियें १०, पंच वि. ५, मन १, इच्छा १, द्वेष १, सुख १, दुःख १, संघात १, चेतना १, धृति १, इंद्रियांचे विषय ५=३६] तर हेंच एक त्या छत्तिसाहीवरचें असें सदतिसावें (तेंच मुळीं एक चतुर्थी भक्ति कां ज्ञानोत्तर सीमा भक्तीची, का ब्रह्मनिष्ठाच्या कुळीचें होणें तेंच तें होय–तेंच आतां असेंही म्हटलें कीं) चोवीस तत्वांनांही जें परम सीमेचें पंचविसावें तत्व तेंच हें शुद्धसत्व होय–तेथें तर तिन्ही हे त्रिगुणात्मक उरतच नाहीं व चतुर्थ जें शुद्ध सत्व तेंच मुळीं सर्वतोपरी सर्व महत्त्व घेऊन असणारें. (२२५)

असें जें सर्वांहीमध्यें उत्तम तेंच पुरुषाचें उत्तमत्व ज्यास अगदीं सुगमतेनें जवळचें झालें आहे त्याचे बरोबरीचें होणेंच एक असा निरुपम देह पावून असतो. (२२६)

याचप्रमाणें असें पाहा कीं तमोगुण व सत्वगुण हे दोन्ही जेव्हां कां बसल्यानें अधोमुख होऊन, दडपले होऊन, जेव्हां कां एक आगळेपणानें महत्त्वानें असणें असें रज हें वाढ घेऊन असतें. (२२७)

**लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा।**
**रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ॥ १२॥**

भरतर्षभ=भरत ऋषभ=भरत कुलामधील योगीच जसा अशा श्रेष्ठ पुरुषा, अर्जुना! लोभः=हें हवें, तें हवें असें हावेचें होणें जें व त्यापुढें जी कांहीं प्रवृत्ति ती आपलें सर्वपणानें उचल घेऊन असते. प्रवृत्ति

आरंभः=कर्माकडे प्रवृत्ति वृत्ति ही कर्म क्रिया करण्याकडेसच लागून असते. कर्मणां अशमः=कर्माचें व्यापकपण हेंच अतिशय व्यापाचें होऊन असतें, मनास कसलीही शांतता नसते. (कर्मणा स्पृहा)=इच्छा हीच एक कर्म करणारी तेथें स्पृहणीय असेंच ह्या मनानें घेतल्यामुळें सर्व प्रवृत्ति कामकाज करण्याकडेच असते. एतानि गुणाः रजस्य विवृद्धे जायन्ते=असे हे गुण—लोभ—कर्म—प्रवृत्ति स्पृहा तेथें रजाच्या आधिक्यामुळें उत्पन्न होतात.

अन्वयः—भरतर्षभ। प्रवृत्ति आरंभः। लोभः। कर्मणाम् अशमः प्रवृत्तिः स्पृहा। एतानि गुणाः रजस्य विवृद्धे जायन्ते।

अर्थः—रजोगुणाची वृद्धि झाली असतां कर्माची प्रवृत्ति, भोगेच्छेच्या कर्माचा आरंभ, उत्कट इच्छा, अशांति व विषय भोगाची लालसा हे विकार उत्पन्न होतात. (१२)

आपलिया कार्याचा। धुमाड गावी देहाचा।
माजवी तैं चिन्हांचा। उदो ऐसा ॥ २२८ ॥

पांजरली बाहाट्ठळी। करी वेगळ वेटाळी।
तैसी विषयीं सरळी। इंद्रियांतें होये ॥ २२९ ॥

परदारादिक पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे।
मग सेळियेचेनि तोंडें। सैंघ चारी ॥ २३० ॥

हा ठावोवरी लोभ। करी स्वैरत्वाचा राब।
वेटाळितां अलाभ। तें तें उरे ॥ २३१ ॥

आणि आड पडिलिया। उद्यम जातां भलतेयां।
प्रवर्तना धनंजया। हातु न काढी ॥ २३२ ॥

तेंवींची एखादा प्रासाद (प्रसाद)। कां करावा अश्वमेध।
ऐसा अचाट छंद। घेऊनि उठी ॥ २३३ ॥

नगरेंचि रचावी। जलाशयें निर्मावी।
महावनें लावावी। नानाविधें ॥ २३४ ॥

ऐस ऐसा अफाटीं कर्मीं। समारंभ उपक्रमी।
आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरें न म्हणें ॥ २३५ ॥

सागरही सांडी पडे। आगी न ल्हाये तीन कवडे।
ऐसें अभिलाषी जोडें। दुर्भरत्व ॥ २३६ ॥

स्पृहा मना पुढांपुढां। आशेचा घे दवडा।
विश्व धांपे चाडा। पायातळीं ॥ २३७ ॥

इत्यादि वाढतां रजीं। इये चिन्हें होती साजी (सहजीं)।
आणि ऐसा समाजीं। वेंचे जरी देह ॥ २३८ ॥

तरि आघवांचि ईहीं। परिवारला आन देही।
रिगे पर योनीही। मानुषेची ॥ २३९ ॥

सुरवाडेसी भिकारी। रिघे (वसो) पां राज मंदिरी।
तरी काय अवधारी। रावो होईल ॥ २४० ॥

**बैल तेथें करबाडे। हें न चुके गा फुडें।**
**नेयिजो कां वऱ्हाडे। समर्थाचेनि ॥ २४१ ॥**
**म्हणोनि व्यापारा हातीं। उसंतु देहा ना राती।**
**तैसयाचिये पांथीं। जुपिजे तो ॥ २४२ ॥**
**कर्म जडाच्या ठाईं। किंबहुना होये देही।**
**जो रजोवृत्तिच्या डोहीं। बुडोनि (निमे) निगे ॥ २४३ ॥**
**मग तैसाचि पुढती। रज सत्व वृत्ती।**
**मिळुनि ये उन्नती। तमो गुण ॥ २४४ ॥**

देहाच्या गांवी धुमाड माजवि = देहरूप गांवांत धुमाकूळ घालतो–माजवितो. उदो–उदयो (२२८). वाहाटुळी पांजरली = वावटळ उठली. परी (वरी) वेगळ (वेगळीं) वेंटाळी = वेगळाले पदार्थ एकत्र करते. वेंटाळी = एकत्र करते. विषयीं सरळी इंद्रियांतें होये (इंद्रियें होती–इंद्रियां होय) = मोकळीक, मोकळीं यथास्थितपण (२२९). परदारादि कपडे–परदारादिक पडे. विरुद्ध = निषिद्ध. (असें वाटत नाहीं) सळियेचे तोंडे सैंध चारी = इंद्रियें वाटेल तशीं चरूं देतो (२३०). हा ठावोवरी लोभ = लोभ एवढा स्वैर संचार करतो कीं जी वस्तू याच्या समोर येत नाहीं तेवढीच सुटते, वस्तू वेगळी वेटाळिली (निराळिली) तेथें अलाभाची ती झाली तेवढीच ह्याच्यापासून सुटली, उरली (२३१). आणि–आणि आड (आड पडणें = नमस्कार घालणें, आड पडणें). उद्यम जातां–उद्यमा जाती. भलतेयां–भलतीया. प्रवृत्तता–प्रवृत्ति–प्रवर्तता (हातुन काढि) = हवे ते उद्योग पुढें दिसले कीं करूंच लागतो (२३२). प्रसाद–प्रासाद (२३३). ऐसैया अफाटी–ऐसा अफाट. समारंभ उपक्रमी = रंभ, आरंभ, अचाट कामाचा आरंभ करतो. उपक्रम = योजनापूर्वक आरंभ. समारंभ = कृत्य (कर्म, उद्योग) करणें. दृष्टादृष्ट कामीं = इहलोक व स्वर्ग ह्या विषयींच्या वासना संकल्पांना (२३५). सांडी–सांडोवा (पडे) = हार खाईल. कवडे–कवड्या (अगदीं तीन कवड्या किंमतीची होईल) (२३६). स्पृहा–मना = (इच्छा, उत्सुकता, वाञ्छा, श्लाघा) मनानें स्पृहणीय, इच्छिण्याजोगें. आर्तीचा–आशेचा. दवडा = धांव. विश्व धांपे चाडा पायातळीं = हौस व लोभ यांच्या पायाखालीं सारें विश्व घातलें आहे (२३७). साजी-सहजीं, सज्ज, सिद्ध. ऐसा समाजी = ऐशा माजी (समाज = मेळा, जमाव, संबंध, [ हत्ती ] ). वेंचे जरी देह = या स्थितींत देह पडला तर (२३८). ही–इही, आघवा, इहलोकीच्या व्यवहारांत, परिवारांत आशा इत्यादि परिवारासह वावरला, दुसऱ्या देहाशीं ह्या देहानें तरीसुद्धां पण सुखानेंच मनुष्य योनींतच वसतो, रिघतो (२३९). रिघे = वसे (२४०). करबाडे = कडबा. नेमिजो कां वऱ्हाड समर्थाचेनि = समर्थाच्या वऱ्हाडाबरोबर गेलेल्या बैलास केव्हांही कडबाच त्यास काय पोळया कां पक्वान्नें मिळणारीं (२४१). उसंतु देहा ना राती = विश्रांती दिहा (देह दिवसां) ना रात्री. तैसे याचे–तैसयाचिये. प्रांथी–प्रांती = पंक्तीला (२४२). कर्म जडाच्या–कर्मठाच्या. देही–देहधारी होतो, जन्मास येतो. निगे–निमे (२४३). मिळूनि–माळोनी (२४४).

तें रज तर आपल्याच कार्याचा धुमाकूळ धुमाळी ह्या देहाच्या गांवामध्यें माजवितें तेव्हां जीं कांहीं चिन्हें उदय घेऊन असतात तें आतां सांगण्याचें करतों. (२२८)

वावटळ उठली (पांजरली वाहटुळी) ती वेगवेगळे पदार्थ एकत्र करते–वेटाळून घेते–आवरून असते, त्याप्रमाणें इंद्रियविषयांच्या ठायीं अशीच मोकळीक, यथास्थितपण ह्या विषयइंद्रियांच्या ठायीं होतें. (२२९)

परस्त्री पण ती पर ऐसी निषिद्धतेची, विरुद्धतेची असावी कां व्हावी असें आवडत नाहीं, असें वाटत नाहीं. (परदाराच्या ठायीं जी कांहीं कपडेपणाची सीमा ती निषिद्ध आहे असें त्यास वाटत नाहीं) त्यामुळें तर शेळीचें तोंड जसें वाटेल तें चरतें तशीं तो आपलीं इंद्रियें मोकळीं सोडून वाटेल तशीं चरूं देतो. (२३०)

तेथें लोभ तर एवढा स्वैरपणाचा संचार करतो कीं जी वस्तू त्याच्या समोर येत नाहीं तेवढीच काय ती सुटते, जी वस्तु वेगळी वेटाळिली निराळिली गेली झाल्यानें तेथें अलाभाची ती झाली–ती तेवढीच एक त्याच्या पासून सुटली कां उरली होते. (२३१)

अहो ! आड पडलेल्या भलत्याहि व्यापारास, उद्यमास नमस्कार घालणेंच केलें तेथें प्रवर्तणें तेंच एक करूं लागतो–हे ( हवे ) हवे उद्योग पुढें दिसले कीं तो ते करूंच लागतो, तेथें माघार घेत नाहीं. (२३२)

त्याचप्रमाणें कर्तृत्वतेचें प्रसन्नपण महत्त्व तेथें एखादा प्रासाद उभारणें अथवा अश्वमेधासारख्या यज्ञाचें करणें असा अचाटतेचा छंदच एक घेऊन प्रवर्तू लागतो, उठतो, करण्यास लागतो, त्यांतच गर्क होत असतो. (२३३)

अनेक अशीं नगरें रचावींत, बहुविध जलाशय, तलाव निर्माण करावेत, विविधतेचे बागबगीचे–वनवनें लावावींत. (२३४)

अशा अनेक अफाट प्रकारच्या कर्मामध्यें–कर्माच्या समारंभाचा–नेहमीं आरंभच एक पुढें होऊन असलेल्या उपक्रमामध्यें कृत्य कर्म उद्योग करणें तसेंच दृष्ट का अदृष्ट अशा इहलोक व स्वर्गलोक ह्याविषयींच्या संकल्पांना–इच्छांना–कामाना–पुरे म्हणत नाहीं. (२३५)

अहो ! सागरही एकादे वेळेस हार खाईल ! उल्हासे, आग, धग, ही पण तीन कवडी किंमतीची होईल, अशा तऱ्हेच्या पोट भरणाऱ्या इच्छा ज्यांनीं कधीं पोट भरल्याचें समाधानच मुळीं येणारें नव्हे, अशा ह्या अभिलाषाच्या होऊन असतात. (२३६)

नेहमींच मनानें इच्छिण्याजोग्या इच्छा स्पृहणीय अशा वाञ्छा, श्लाघा ह्या वाढतच असतात–आशा ही नेहमींच धांव घेत असलेली, हौस व लोभ यांच्या पायाखालीं सारें विश्वच घातलें आहे. (२३७)

इत्यादि रजोगुण वाढला असतां नेहमींच अगदीं ताजींतवानीं, सिद्ध सज्ज असलेलीं अशीं चिन्हें, लक्षणें वर येऊं लागतात व आतां येथें अशामध्यें असा हा माजा सहिततेचा देह जरी समुदायामध्यें–समाजामध्यें, वेंचला गेला, आटविला, कां खर्चला गेला, कां देह पडला तरी. (२३८)

आपणच ह्या इहलोकींच्या अवघ्या व्यवहारांत, परिवारांत आशा, इच्छा, वाञ्छा, श्लाघा, इत्यादि परिवारासह ह्या देहानें दुसऱ्या देहाशीं वावरला तरी सुद्धां पण सुखानेंच मनुष्य पर योनींतच वसतो–रिघतो. (२३९)

देवपणास भिकारी = अहो संसार साधला नाहीं, परमार्थ आवरला नाहीं, अशामध्येंच मुळीं जी अपक्क स्थिति, अर्धी संसाराची व अर्धी परमार्थाची झालेली स्थिति तेथें तर एक सुखाडच मुळीं जसा कां तो देवांनीही पण वाञ्छावा असा मध्येंच मुळीं हा आयुष्य भानु हारपला तर तेथें अर्धे मन संसारीचें तर अर्धे परमार्थाचें असा भिकारीच = तो. तो जरी राजमंदिरामध्यें रिघावा का वस्ती करून आहे, का असला तरीपण काय तो अहो ! राव असा होणारा होईल ? (२४०)

अहो ! बैल तेथें कडबाच मुळीं मिळणारा असें हें खरें पण तें कांहीं चुकूं नकोस. अहो ! समर्थाच्या वऱ्हाडाबरोबर गेलेल्या बैलास केव्हांहि कडबाच मिळणार ! काय तेथें पक्वान्नें त्यास मिळणारीं होतील ! होतात ? (२४१)

असें आहे म्हणून व्यापार, उद्योग, कर्म, कामकाजाच्या हातीं जो लागला आहे तेथें ह्या देहास–देह ( दिवसा ना रात्री ) विश्रांती नाहींच, अशाच्या पंक्तीला बसलेल्यांमध्येंच त्याची गणना होऊन त्यास तर त्याच पंक्तीस बसविलें होतें–जुंपिलें होतें. (२४२)

कर्मजड जे कर्मठ त्यांचे ठायीं बहुतेक करून जो ( देहधारी ) रजोगुणाच्या डोहामध्यें बुडून असलेला, बुडून बाहेर निघालेला, तो देहधारी होतो—जन्म घेतो, जन्मतो. (२४३)

वर मग तसाच रजोगुणाची व सत्वगुणाची वृत्ति गिळून टाकून अथवा गाळून टाकून तमोगुण हा उन्नतीस, उत्कृष्टपणास, उत्कर्षास, उद्धटपणास, श्रेष्ठत्वास येतो. (२४४)

**अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च।**
**तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥**

कुरुनंदन=कुरुकुलोत्पन्न पांडुकुमरा, कुरुकुलांतील आनंदनंदन जसा! अप्रकाशः=वेदन संवेदन नाहीं—भाव नाहीं असा ज्ञानप्रकाशच मुळीं जेथें नाहीं तेथें करावें काय, न करावें काय हें कांहींच न समजणारें. अप्रवृत्तिः=काम करण्याकडे किंवा प्रवृत्तीच मुळीं कमलीही नाहीं—वृत्ति ही आपली आपण पाहावी अशी प्रवृत्तीच मुळीं, अशी इच्छाच मुळीं, नच होणारी. प्रमादः=उपमर्द, उरमटपण किंवा बेतालपण वृत्तीचें जें. मोहः=नको तेंच करूं लागणारें जें; भलत्या वेळीं भलतेंच असें मोहून जाणें जें तें, कांहींहि नच सुचणें जें. तमस्य विवृद्धे एतानि जायन्ते—तमोगुणाची वृद्धि झाली असतां वरील गुण उत्पन्न होतात.

अन्वयः—हे कुरुनंदन। तमस्य विवृद्धे एव एतानि जायन्ते। अप्रकाशः। अप्रवृत्तिः। प्रमादः। मोहः। च। एव।

अर्थः—हे कुरुनंदना, तमोगुण वाढला असतां अंतःकरणांत व इंद्रियांत मंदपणा, सुस्तपणा, बेसावधपणा व भ्रामकपणा हे दोष उत्पन्न होतात. त्यामुळें कर्तव्यकर्मामध्यें अप्रवृत्ति, प्रमाद व मोह उत्पन्न होतात. (१३)

**तैंचि जिये लिंगें। देहींचे सबाह्य सांगें।**
**तिये परिस चांगे। श्रोत्रबळें ॥ २४५ ॥**
**तरी ऐसें होय (होय ऐसें) मन। जैसें रविचंद्र हीन।**
**रात्रीचें कां गगन। आंवसेचिये ॥ २४६ ॥**
**तैसें अंतर असोस। होय स्फूर्तिहीन उद्वस।**
**विचाराची भाष। हारपे तैं ॥ २४७ ॥**
**बुद्धि मेचवेना धोंडी। हा ठावोवरी मवाळे सांडि।**
**आठवे देशधडी। जाला दिसे ॥ २४८ ॥**
**अविवेकाचेनि माजे। सबाह्य शरीर गाजे।**
**येकलेनि घेपे दीजे। मौढ्यं तेथे ॥ २४९ ॥**
**आचारभंगाची हाडें। रुपती इंद्रियांपुढें।**
**मरे जरि तेणेंकडे। क्रिया जाये ॥ २५० ॥**
**पाहि आणीक येकहि दिसे। जें दुष्कृति चित्त उल्हासे।**
**अंधकारि देखणें जैसें। डुडुळांचें ॥ २५१ ॥**
**तैसें निषिद्धाचेनि नांवें। भलतेंये भरे हांवें।**
**तिये विषी धांवे। घेती करणें ॥ २५२ ॥**
**मदिरा न घेतां डुले। सन्निपातेविण बरळे।**
**निःप्रेमेचि भुले। पिसे जैसें ॥ २५३ ॥**

चित्त तरी गेले आहे। परी उन्मनी ते नोहे।
ऐसे माल्हातिजे मोहे। माजिरेनि ॥ २५४ ॥

किंबहुना ऐसैसी। इये चिन्हें तम पोसि।
जैं वाढे आयतीशी। आपलिया ॥ २५५ ॥

आणि हेंचि होय प्रसंगें। मरणाचें जरि (पडे) खागें।
तरी तेतुलेनिही रिगे। तमेसी तो ॥ २५६ ॥

राई राईपण बीजी। सांठऊनि अंग त्यजी।
मग विरुढे तैं दुजी। गोष्टी आहे गा ॥ २५७ ॥

पैं होय दीपकळिका। येर आगी विझो कां।
कां जेथें लागेल तेथें अधिका। तोचि होये ॥ २५८ ॥

म्हणोनि तमाचिये लोथें। बांधोनियां सकल्पातें।
देह जाय तै माघौतें। तमाचेचि होये ॥ २५९ ॥

आतां काय हें बहुहे। जो तमोवृद्धि मृत्यु लाहे।
तो पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी (क्रिमि) ॥ २६० ॥

लिंगें = लक्षणें. देहींची–देहींचे (२४५). ऐसें होय–होय ऐसें (२४६). अंतर असोस–अंतःकरण निःशेषेंकरून अज्ञान भरित; निःशेष निरासाचें अंतर. उद्वस = शून्य (२४७). बुद्धि मेचवेना धोंडी = दगडानें सुद्धां बुद्धीचे उपमान मान घेववत नाहीं, इतका दगड. मवाळे = मृदुत्व. आठवे–आठवो (२४८). मौढ्य = मूर्खपणा, अज्ञान (२४९). आचारभंगांची = अनाचाराची. मरे जरी तरी तेणेंकडे क्रिया जाय = मरे जरी तरी अनाचाराचीच त्याची क्रिया होते, असते (२५०). परि–पै. उल्हासे–उससे. अंधकारी–आंधारी. डुडुळांचे = दिवाभीतांचें (२५१). तैसे निषिद्धाचेनि नांवें = निषिद्धाच्या नांवानें तर, निषिद्ध जरी तरी तेथें. भलतिये–भलतेंहि. तिये विषी–तिये विषयीं. धांवे–हाव भरे. घेती करणें (कर्णे) = इंद्रियें पापाकडेच धांवतात (२५२). बोळे–बरळे. निःप्रेमेचि–निष्प्रेमेचि (२५३). चित्त तरी गेले आहे–चित्त थाऱ्यावर नाहीं, पण ही कांहीं योग अवस्था उन्मत्ती ती ही नव्हे. माल्हातिजे मोहे माजिरेनि = अशा उन्मत्तपणा आणणाऱ्या मोहाच्या स्वाधीन केला जातो; चित्त मोहपाशांत अडकून पडतें; पकडले जातें, मोहाच्या स्वाधीन होतें (२५४). तम पोषी = तमोगुण पोसतो, तमोगुण पुष्ट करतो, उभारतो, उपभोगतो, व्यक्त करतो, धारण करतो. आयतीशी–ऐतिशी = परिवारासह, सामुग्रीसह (२५५). खागे–पडे खागे = बोलावणें येतें. रिगे–निगे (२५६). राई राईपण बीजी = दमादमानेंच येणारी ही मनोव्यथेची आधीं ही अंगावर घेऊन सांठवितो, व सांठल्यावर आंगच मुळीं टाकून देतो. विरूढे तै = फळास येतें तेव्हां. दुजी = निराळीच एक तेथें गोष्ट मग (२५७). होय–होऊनि. कळिका–ज्योत. जेथें–जेथ. लागले–लागेल. तेथें–तेथ. अधिका–असका = संपूर्ण. होये–आहे (२५८). लोथें–लोथेत = गाठोड्यांत. ते–तै. माघौतें–मागौते. होये–होय (२५९). हें बहुवे–बहे–येणे बौहे = बहु बोलणें तें काय (२६०).

तेव्हांच मुळीं तीं जीं चिन्हें, लक्षणें देहींचीं, अंतर्बाह्य सांगतेचीं तीं तो मूर्तिमंत देही जो देहधारी त्याची सबाह्य [सबाह्य–सहित, बाहेरचें, परकें, हलक्या जातीचें, बाहेरच्या प्रदेशाचें तें]–बाह्यासहित अशीं लक्षणें तींच मुळीं तो होतो–अशी ती आतां तूं श्रोत्राच्या बळानें ऐकण्याचें कर (कुंडलानें कांहीं कान शोभा पावत नाहीं पण श्रुत वेदशास्त्र प्रसिद्ध जे, त्यानेंच पण वेदरूपी वचन ऐकणें जें त्यानेंच तो–तसा देह हा परोपकारानेंच साजतो–शोभतो, चंदनानें नव्हे). (२४५)

तेथें होत असलेलें जें मन तें जसें रवि का चंद्रहीन असें—जसें का अवसेच्या रात्रीच्या वेळचें गगन तें. (२४६)

तसें अंतर अंतःकरण निःशेषेंकरून अज्ञानभरित असेंच (निःशेष निरासाचें नाकारणारें—विनाशक असें अंतर—अंतःकरण तें) स्फूर्तिहीन व शून्य असें (उद्वस) तेथें तर अहो विचाराची—समजुतीची गोष्टच मुळीं ती हारणारी होते, हारपते. (२४७)

बुद्धि मेचवेना धोंडी म्हणजे बुद्धीचें उपमान मान दगडानें सुद्धां घेववत नाहीं, इतका दगड. त्याचे ठिकाणीं मवाळपण का मृदुपण हें तर केव्हांहि ती दगडाची उपमा सांडणारें होतच नाहीं—पाषाणास पाझरच मुळीं कसला तो फुटत नाहीं—स्मरण का आठवण ही तर दिगंतरापलिकडची झालेली तेथें आठवणच मुळीं कसला तो नाहीं (इतका दगड). (२४८)

समुच्चयेंकरून असलेला अविवेक म्हणजे विचारशून्यता तेथें समूह परत्वें जो कांहीं अविचार अथवा भ्रम माज घेऊन असतो—आहे, त्यानें तर सर्व शरीर आंत बाहेर कीं गडबडीनें गाजत असलेले, तेथें एकच मूर्खपण अथवा अज्ञानाचें हें एकटेंपण तें विचारशून्यत्व, तेंच मुळीं देवघेव (देवघेवीचा व्यवहार) करणारें असें तेथें जें कांहीं घेतलें जातें तें मूढपणच एक, कां द्यावें जें कांही तेंहीपण अज्ञानच, मूढपणच, मौढ्यच एक. (२४९)

पुढेंच मुळीं इंद्रियाच्या समोर तीं अनाचाराचीं निषिद्ध (अन्न—गैरचाल, गैरवर्तनाची, गैर आचाराची ती) हाडें—आटुळी—बी—आटुळया—बिया—अस्थि नर—रुपतात, खुपतात व मरतो तरीसुद्धां—मरे तरीही अनाचाराचीच त्याची क्रिया असते—अनाचाराकडेच सर्वथैव त्याची क्रिया, गति, हालचाल होते (अस्थियुज—अस्थिशृंखला—अस्थिसंहार इत्यादि, हस्तिशुंडा वनस्पति, अस्थिभृंगिन्, अस्थिसंहारक=पक्षी विशेष) [ अस्थिभंग=मारी वनस्पति. अस्थिभेदिन्=मर्मभेदी ]. (२५०)

येथें असें पाहा कीं—अहो! तेथें आणखी काय दिसतें असें पुसाल तर तें म्हणजे दुष्कृती म्हणजे पातकाकडेच (पापीपणाकडेच—दुष्टपणाकडेच) चित्त उल्हसित होणारें. उल्लसित—पसरलेलें कां विकसित—आनंद उल्लास—उल्हास घेणारें असतें जसें, कां दिवाभिताचें पहाणें तें म्हणजे अंधःकारामध्येंच कीं एक [ पिंगलिका=बगळा, दिवाभित. पिंगल=गाजर. पिंगल=पिंगळा पक्षी—दिवाभित, सूर्यपारिपार्श्वक विशेष, दक्षिण दिग्गज (पिंगल लोह=पितळ) ]. (२५१)

वर्ज केलेले जे, का दूषित जे, असे निषिद्ध जरी, तरी तेथें निषिद्धाच्या नांवानें तर भलतीच हांव घेऊन असतो. म्हणून इंद्रियें तीं त्या पापाकडेच, हावेंतच, दुषिताकडेच मुळीं (इंद्रियें म्हणजे करणें तीं) धांव घेऊन असतात—गति का हालचाल करून असतात. (२५२)

मदिरा (मदिराक्षी=सुलोचना स्त्री) (म्हणजे मद्य) न घेतलेला मुळीं, तरी सुद्धां डुलतो, खुलतो, त्रिदोष का सन्निपात झाल्याशिवायच मुळीं बरळतो—निःप्रेमें—निष्प्रेमें म्हणजे अगदीं प्रेमशून्य असा जरी तरी भुलतो, जसें का पिसेंच एक लागलेलें, प्रेमाच्या नांवानें—रिकामा, खिन्न, निर्दय, निरुत्साही, निस्तेज, तुच्छ असा जरी [ निःस्नेह=शुष्क, निर्दय, आबळ झालेला. निःसत्व=दुर्बळ, नीच, असत्य, अविद्यमान. शुष्क=कृश, पोकळ, निष्फळ, अकारण, कठोर. शून्य=रिकामें, खिन्न, निरुत्साह, निस्तेज, भ्रमिष्ट, अमंगल, तुच्छ, अभावाचा तसा जरी ] तरी पण (मोहक पदार्थानेंच जसा का भुलावा तसा) भुलतो [ अमिष=चैन, मांस, निष्कपटपणा, निष्कपटी. आमिष=मांस, भक्ष्य, इच्छा, मोहक पदार्थ, लांच, नजराणा, जीवनोपाय ]. (२५३)

[ चित्त तेथें जाऊन आहे, नाहिंसें झालें आहे, आपलें ठिकाण सोडून आहे, चित्त तर मुळींच थाऱ्यावर नाहीं पण ही कांहीं योगअवस्था उन्मनी ती नव्हे असें तें चित्त] उन्मत्तपणा आणणाऱ्या मोहरूपी

तांबड्या वस्त्राच्या आधीन झाल्यानें माल्हातिजे म्हणजे स्वाधीन झाल्यानें मोहाच्या अंगिकारानें बळावलें आहे चित्त तें मोह पाशांत अडकून मोहाच्या स्वाधीन झालें, भांबावलें, तें थाऱ्यावरच मुळीं नाहीं असें होय पण चित्तानें दुसरे ठायीं जाणें व तेथें लयानें तन्मय होणें ही योगअवस्थाच मुळीं एक, पण येथें कांहीं योग भूमिका, मनोलयाची अवस्था, उन्मनी नांवाची ती कांहीं ही नव्हे [ उन्नमनं = उन्नती = उद्धटपणा, श्रेष्ठत्व, ध्वज वर करणें, उत्कर्ष, उंच. उन्नयन = ( उन्नय = मोहरा, वाद, खल. उन्नाह = उच्छृंखलपणा, बांधणें, वृद्धि, पुढें येणें ) अनुमान, वर नेणें ( उन्नय, उन्नाय ) ( नाहोजानी = विठ्ठल नाहो जानकी जानी–नाय–नय–नयन–नमन – अनुमान बांधणें ) ] पण विलयच एक का नाहिंसें होणेंच एक चित्ताचें तें. (२५४)

बहुत काय लिहावें पण अशा तऱ्हेचीं तीं चिन्हें तम पोसून असतें–पुष्ट करतें, वाढवितें, व्यक्त करतें, उपभोगतें, धारण करतें, उल्लसित करतें–उभारतें जेव्हां कां आपल्या परिवारासह का सामुग्रीनें–आयितीच –विस्तारानें––प्रतापानें–आहतीनें परिणामानें तें वाढ घेऊन असतें [ आयतन = शरीर, प्राणमार्ग स्थान, आधार, देऊळ, वेदी. आयन–आयति–आयत्त. आयत = ओढलेले, उंच ( स्वर ), दूरचे, दीर्घकाळ, लांब. आयत–आयति = चिरकाल राहाणें. आयतिछदा = केळ. आयतस्तु = भाट. आयति = ऐश्वर्य, प्रताप, क्रिया, संयोग, रांग, उत्पत्ति, मनोनिग्रह, लांबी, विस्तार, भविष्यकाळ. आयत्त = स्वाधीन, झटणारा, आरंभलेलें. आयत्ति = ताबेदारी, प्रेम, हद्द ]. (२५५)

आणि हेंच जर कां सहज प्रसंगानेंच कीं अहो मरणाचें बोलावणेंच एक तसें झालें तरी सुद्धां तितक्या त्या वाढीच्या कीं तमानेंच तो तेथें जातो–रिघतो. (२५६)

तमोगुणामुळें अंगावर येणारी, ती तर दमादमानेंच येणारी ती मनोव्यथेची आधी, ती आपल्या अंगावर घेऊन सांठवितो व सांठल्यावर आंगच मुळीं टाकून देतो ; व मग तें सर्व कांहीं फळास येणें जें कांहीं एक तेथें तर अहो निराळीच कीं एक गोष्ट आहे कीं !!! (२५७)

अहो एक दीप कळिका–दिव्याची ज्योत होऊन इतर दुसऱ्या ज्या कांहीं मोठमोठ्या आगी त्या तर अहो विझेनात कां विझल्या तर; पण अहो ही एक लहानशीच मुळीं ती दिव्याची ज्योत तरी पण ( जेथें कांहीं लागतें, का लागलें तेथें तर अधिकाधिक होऊनच कीं ती आग कां आगीच जशी कां लागली अशी ) अधिकच होत जाते. (२५८)

असें नव्हे म्हणून तमाच्या गाठोड्यामधें, लोभेमधें–तमाच्या संकल्पांना, उद्देशांना बांधून ठेवून–घेऊन जर का देह हा गेला तर परत पुन्हां माघारी तेंच कीं अहो तसें तमाचेंच कीं होणें होतें. (२५९)

आतां असें हें बहुत बोलणें तें कशास ? पण जेव्हां का ह्या प्रवृद्धीवरच मुळीं मरण आलें, पावलें, लाधलें तर अहो पशु अथवा पक्षी कां झाड अथवा कृमीच एक होणें होतें. (२६०)

## यदा सत्वे प्रवृद्ध तु प्रलयं याति देहभृत् ।
## तदोत्तमविदाँल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

कोणत्या गुणामध्यें देहप्रलय म्हणजे मरण आलें असतां गती मिळणारी ती कोणती किंवा कोणत्या लोकांत तो प्राणी पावतो तें.

सत्वे प्रवृद्धे देहभृत् प्रलयं याति यदा = जेव्हां सत्वगुण वाढला असतां प्रलय होतो म्हणजे मरण येतें तेव्हां. उत्तमविदान्–अमलान्–लोकान् प्रतिपद्यते = पुरुषास जाणणारा जो उत्तम लोक–तसेंच अमल म्हणजे शुद्ध ज्ञानच जेथें अशा लोकांना तो प्राप्त होतो–लोकांना योग्य होतो.

अन्वय :—सत्वे प्रवृद्धे । देहभृत् यदा प्रलयं याति । तदा । अमलान् उत्तम विदान् लोकान् प्रतिपद्यते ।

अर्थ :—मानवी प्राणी जीव जेव्हां सत्वगुणाची वृद्धि असतां मरण पावतो, तेव्हां उत्तम कर्में करणारांच्या दिव्य, निर्मळ (अमलान् उत्तम विदान् लोकान्) अशा स्वर्गादि लोकांना प्राप्त होतो. तो उत्तम ज्ञानी पुरुषांच्या दिव्य लोकांना (सत्य, वैकुंठ, कैलास इत्यादींना) जातो. (१४)

**येणेंचि पैं कारणें। जें निफजे सत्वगुणें।**
**तें सुकृत ऐसें म्हणें। श्रौतसमो ॥ २६१ ॥**

**म्हणोनि तयां निर्मला। सुख ज्ञानी सरळा।**
**अपूर्व येक फळा। सात्विकातें ॥ २६२ ॥**

श्रौतसमो–श्रुतिसमूह=वेदसिद्धांत, श्रुति समय (२६१). सरळा=सहज. ये–येक. येक फळा–ये एक फळा (फळ)=एक फळच फळास येतें. सात्विकातें–सात्विक तें (२६२).

या कारणास्तव दमादमानेंच येणारी ती मनोव्यथेची आधी, ती अंगावर घेऊन असण्यापेक्षां जें कांहीं सत्वगुणानें निपजेल तेंच कीं सुकृत म्हणावें असें सर्व श्रुतींनीही पण एकमतानें म्हटलें आहे. वेदसिद्धांत, श्रुतिसमय का समूहही पण असेंच म्हणतो कीं. (२६१)

म्हणून त्या स्वच्छ अशा निर्मळास–निर्मळपणामुळें सरळ अशा आर्जवाचा जो त्यास–सुख शांतीचा सरळ मोकळा, प्रशस्त, तसेंच ज्ञानच सज्ञानतेचें, जाणतेपणाचें तें केव्हांही सरळच असा निवाडा करणारें, तेथें अपूर्वपणाचा असाच एक–एक फळा–चिदाकाशाची भूमिका अपूर्व अशी शुद्ध निळें ब्रह्मच तें एक–भूमिका–रंग–रचना–फळा होऊन आहे असा भूमिका रंग–ह्या सात्विकांस येऊन असतो. सरळ, सहज एक, फळ, सात्विकास (फळास), रचनेस, निळिया–अंबरी तें सात्विक येतें–सात्विकासच तें फळ लागतें–फळ तें येतें. [काफळा = कायफळ. कफेलु = भोकर. कफल = कफकारक. कफेणि = कोपर. कफिन् = कफग्रस्त. काय = १. ब्रह्मदेवासंबंधीं. २. देह. ३. झाडाचा बुंधा. ४. विण्यांचा सांगाडा. ५. समूह. ६. घर. ७. राजधानी. ८. लक्ष्य, निशाण. ९. मूळस्वभाव. १०. भांडवल. ११. प्राजापत्य विवाह. १२. उत्सव. १३. अनामिका व कनिष्ठिका यांचे मूळ हे प्रजापति तीर्थ. १४. ब्रह्मदेवास दिलेली आहुती. फल–फळ = स्त्री रज, फळा, फळी, रुंद अर्थी, ढाल, वृषण, पट, देणगी, प्रतिबिंब ].

**रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ।**
**तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥**

रजसि प्रलयं गत्वा = रजोगुणामध्यें प्रलयंगत्वा म्हणजे मरण प्राप्त झालें असतां. कर्मसंगिषु जायते = कर्मयोग साधणाऱ्याच्या संगतीमध्येंच, सांगाती–जन्म होतो. तथा तमसि प्रलीनः = प्रलीन म्हणजे विलीन–जीवित हें तमोगुणांत विलीन झालें म्हणजे–तमोगुणांत मरण आलें असतां. मूढयोनिषु जायते = जेथें ज्ञानाचा गंधच मुळीं नाहीं अशा मूढ अथवा अज्ञान योनीमध्यें जन्म होतो. (दिङ्मूढ, कर्तव्यमूढ, जेथें ही वाचाच मुळीं नाहीं अशा योनीमध्यें).

अन्वयः—रजसि प्रलयं गत्वा । जायते कर्मसंगिषु । तथा । तमसि प्रलीनः । जायते मूढ योनिषु । (रजसि प्रलयं गत्वा प्रलीनस्तमसि ).

अर्थः—रजोगुणाचा उत्कर्ष असतां मरण आलें तर कर्मासक्त लोकांत संसारांत मनुष्य लोकांत उत्पन्न होतो. त्याचप्रमाणें तमोगुणांच्या वृद्धिकालीं तमोगुण वृद्धिंगत असतां मृत्यु आला तर पश्वादि मूढ योनींत तो उत्पन्न होतो. (१५)

**मग राजसा जिया क्रिया। त्या इंद्रावणी पिकलिया।**
**जे सुख चितारूनिया। फळती दुःखें ॥ २६३ ॥**

**कां निंबोळियाचें पीक। वरी गोड आत विख।**
**तैसें तें राजस देख। क्रियाफळ ॥ २६४ ॥**

**तामस कर्म जितुकें। अज्ञान फळचि पिकें।**
**विषांकुर विखें। जयापरी ॥ २६५ ॥**

इंद्रावणी पिकलिया–इंद्रवारुणी फळलिया = कडू वृंदावन. सुखे चितारूनिया ( फळती दुःखें ) = सुखाचा रंग दाखवितात पण फळ दुःखाचेंच देतात ( चित्र–चितरी–विचित्रे–विचित्रतेनें मन मोहविण्यानें मनच चितारलें गेलें–चित्रित केलें तेथें मन हेंच चित्र झालें. (२६३). क्रियाफळी = वर वर गोड पण आंत वीषच जसें (२६४). फळचि–फळेचि. विषयांकुर–विषांकुर ( विखे ) = वाढलेला विषांकुर तसलींच फळें देतों, तामस कर्माला अज्ञानाचीं फळें येतात. विषांकूर वाढला कीं त्याला तसलींच फळें येतात, त्याप्रमाणें तामस कर्माला अज्ञानाचींच फळें येतात. जयापरि–जियापरि (२६५).

मग ज्या कांहीं राजस क्रिया ( तेथें तम तें कसलें अध्ययन तें, पितृयज्ञ तो कसला का ईश्वर सेवा ती कुठें ? ) त्या कडूवृंदावनाचीं–इंद्रावणीचीं पिकलेलीं फळें तीं सुखाचा रंग दाखवितात पण फळ दुःखाचेंच देतात–तेथें मनच मुळीं विचित्रतेनें मोहविलें गेल्यानें मनच चितारलें गेलें, चित्रित झालें, तेथें मन हेंच चित्र झालें, चित्रच एक चितारलें–केलें. (२६३)

कडू लिंबानें निंबोळ्याचे फळास येणें–पीक तर वरून अति गोड दिसणारें, वरवरच गोड असें पण आंत विखच कीं एक तसें तें राजस क्रियाचें फळ होय. (२६४)

जेवढें म्हणून तामस कर्म तें तर अज्ञानरूपी फळच फळरूपानें पिकणारें; ज्याप्रमाणें अहो विषास केव्हांही विषाचेच अंकूर येणारे ना ? विषांकूर वाढला कीं तसलींच फळें येतात, तामस कर्माच्या अज्ञानाचींच फळें येतात. (२६५)

**कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलं ।**
**रजसस्तु फलं दुःखं अज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥**

गुणाचें फल; प्रवृत्ती प्रभाव, भाव गुणातीतत्व, अमृतत्व. सुकृतस्य कर्मणः निर्मल सात्विकं फलं आहुः = सु म्हणजे उत्तमतेचें केलेलें कर्म जें तें पुण्य म्हटलें आहे म्हणजे सत् कृत सु–कृत–सुसंकृत असें जें कर्म तें निर्मळ असें सात्विक फल देणारें, असें विद्वान् लोक म्हणतात ( उत्तम कर्मे करणारा देहधारीपणास येतो ). तु रजसः फलं दुःखं आहुः = पण रजोगुणाचें फल दुःख म्हटलें आहे तेथें सुखाचें तें जरी तरी मनाला विश्रांती नसल्यामुळें तें दुःख असेंच समजलें आहे. तमसः फलं अज्ञानं आहुः = तमोगुणाचें फल अज्ञान म्हटलें आहे; तेथें विवेक का वृत्ति का भाव का साधन इत्यादींचे नामही नच ऐकूं येणारें असें तें अज्ञान अंधारेंच एक निव्वळ ह्या देहामध्यें पोषणास आलेलें.

अन्वयः—सुकृतस्य ( सुख, ज्ञान व वैराग्य ) कर्मणः निर्मलं सात्विकं फलं आहुः । तु । रजसः ( कर्मणः ) दुःखं फलं ( आहुः )। तमसः ( कर्मणः ) अज्ञानं फल ( आहुः )।

अर्थः—पुण्यकर्माचा परिणाम ज्ञानमय ( निर्मळ ) व सात्विक असतो. त्याचें फळ सुखाचे, ज्ञानाचे व वैराग्याचे रूपानें असतें. तसेंच राजस कर्माचें फळ दुःख, व तामस कर्माचें फळ अज्ञान सांगितलें आहे. राजस कर्माचा परिणाम दुःखकारक व तामस कर्माचा परिणाम अज्ञानकारक होय. (१६)

**म्हणौनि बारे अर्जुना। येथें सत्वचि हेतु ज्ञाना।**
**जैसा कां दिनमाना। सूर्य हा पैं ॥ २६६ ॥**
**आणि तैसेंचि हें जाण। लोभासी रज कारण।**
**आपुलें विस्मरण। द्वैतां (अद्वैता) जेंवी ॥ २६७ ॥**
**मोह अज्ञान प्रमादा। येया मेळया दोष वृन्दा।**
**पुढती पुढती प्रबुद्धा। तमचि मूळ ॥ २६८ ॥**
**ऐसें विचाराच्या डोळां। तिन्ही गुण वेगळ वेगळा।**
**दाविला जैसा आवळा। तळहातीचा ॥ २६९ ॥**

रज–जय (?). अद्वैता–द्वैता (२६७). येया मेळया–यया मैळेया. दोष वृंदा = कोटिसंख्या, बाजारांत गर्दी जशी तसें मोह, अज्ञान व प्रमाद हेंच मुळीं दाटून आलेलें, गर्दी करून असणारें तेथें घोळका, गर्दीच झाली जशी–मेळया [ मिळवणी–भेसळलेलें. मेळावा–अव्यक्त. मैळेया = मळलेलें. दोषवृन्द = दोषसमूहाचा मेळा. (ब्रह्मवृंद = ब्रह्मगण.) गण = समूह, केळीचा घड, कोटीसंख्या. वृंद = मांदी, समुदाय, समूह, घोळका, गर्दी, जमाव ] (२६८). विचाराचा–विचाराचिया. दाविला–दाविले. विचाराचा डोळा = सात्विकाचा सर्व विस्तार जेवढा तेवढा सर्व त्यांनीं आपलासा केला. (अनुष्ठान, निष्ठा, जन्मव्रत.) तळ हातीचा आवळा = करतल आमलक (उघड मेळ बसणें, स्पष्टपणें, समता, सांगता) (२६९).

असें आहे म्हणून अगा हे अर्जुना! येथें एकलें सत्वच मुळीं ज्ञानास हेतू जाण. जसा कां सूर्यच मुळीं ह्या दिनमानांस करणारा तो. (२६६)

हें रज तर लोभासच लोलंगतेस लोलभत्वास मुळीं एक कारण होऊन असतें जसें कां स्वतःचें विस्मरणच मुळीं तें! मग काय द्वैत जोडी म्हण, कां अद्वैत एकटें म्हण. [(द्वैत = जोडी, भेदभाव, जीव व ईश्वर निरनिराळे मानणें जें). जय = इंद्रिय निग्रह, जिंकून मिळविणें, वीररस. द्वैतीयिक = दुसरा. अद्वैत = एकटें, द्वैतरहित, अद्वितीय, तादात्म्य, ऐक्य, ब्रह्म व जग यांचें ऐक्य, ब्रह्म]. (२६७)

प्रमाद मोहौ–दोष (घोळका, गर्दी, जमाव) समूहाचा. मेळा = एकत्रित होणें–तोच मोह. दोषसमूहाचा मेळा तोच अज्ञान व दोषसमूहाचा मेळा तोच प्रमाद असें हे प्रौढ अशा–जागृत अशा, हुशार व विद्वान् अशा अर्जुना, हेंच मुळीं वारंवार तमच म्हटलें. (२६८)

विचाराची जी दृष्टि आहे–जे विचारी आहेत, ज्यांना सारासार विचाराची दृष्टि आहे–बुद्धीनें जे सडोळस आहेत त्यांना वेगवेगळेपणानें हे तिन्ही गुण गुणारूपाचे झाले. तेथें स्पष्टपणच एक जसें कां तळ हातीचा आवळा, तसें दाखविलें. (२६९)

## सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।
## प्रमाद मोहौ तमसौ भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

सत्वात् संजायते ज्ञानम् (समं जायते–संजायते) = सत्वापासून, सत्वासह जन्मतें जें ज्ञान सत्वामुळें होतें. रजसः (समं जायते–संजायते) लोभ एव च = रजोगुणापासून–रजोगुणासह वर्तमान जो जन्मतो तो लोभ जाण. रजोगुणामुळें लोभ जन्मतो. च प्रमाद मोहौ भवतः तमसः अज्ञानम् एव = (भवतः = होणारे) आणि प्रमाद व मोह असे दोन्ही एक झालेले, उपस्थित असे, जेव्हां तमोगुणामुळें होतात तेव्हां तें अज्ञान जाण. तमोगुणामुळें मोह, प्रमाद इत्यादि अज्ञान जन्मतें, उपस्थिततेचें होतें. भवतः–प्रभावतः = दोन्हींनी –प्रमाद, मोह–होण्याचें करून. भवतः = उपस्थित, हजीर, चालता असा. प्रमाद मोहो हें द्विवचन म्हणून हे दोन्हीं एकमेकांशी अति संघट्टनेनें असलेले होत. जेथें प्रमाद तेथें मोह असणारच व जेथें मोह तेथें प्रमाद असणारच केव्हांही हें नेहमीं लक्षांत असावें.

अन्वयः—सत्वात् ज्ञानं संजायते । च । लोभ एव रजसः । (संजायते) । प्रमाद मोहौ भवतः ( प्रमाद मोह असें जें होय तें अज्ञानात्मक तें तमोगुणाचें जाण ) अज्ञानम् एव तमसः ।

अर्थः—सत्वगुणांपासून ज्ञान उत्पन्न होतें, रजोगुणांपासून लोभ उत्पन्न होतो व तमोगुणापासून प्रमाद, मोह, अज्ञान, बेसावधपणा व भ्रम हीं उत्पन्न होतात. (१७)

**तंव रज तम दोन्हीं । देखिले प्रौढ पतनीं ।**
**आणि सत्वा वांचुनि नाणी । ज्ञानाकडे ॥ २७० ॥**
**म्हणोनि सात्विका वृत्ति । येक जाले जन्मवृत्ति ।**
**सर्व त्यागे चतुर्थी । भक्ति जैसी ॥ २७१ ॥**

रजतम–रजतमे. दाविले–दाविली. प्रौढ पतनीं = पातकाचीं, अवनतीचीं, नरकगतीचीं करणारीं अशीं शर्तीचीं–मोठीं साधनें (२७०). सात्विका–सात्विक. एथ–एक. झाले–झाले गा, [जन्मवृत्त, जन्मवृत्ति, जन्मव्रती]. सर्व त्यागे चतुर्थी भक्ति जैसी = चौथी म्हणजे ज्ञान भक्ति, पराभक्ति ( श्रद्धापर होण्याचें तें उपासना कांडाचें, व भक्ति जी ती जेव्हां का सम ब्रम्ही स्थिर झाली म्हणजे तेथें ज्ञानभक्ति हीच सर्वस्वतेस आली तेथें स्वयं ब्रह्मच तें ज्ञानस्वरूप होऊन आल्यानें आतां येथें चतुर्थी भक्ति ही सर्व प्रकारें त्यागावर उभी होऊन ज्ञान झाली. तिन्हीं गुणांचें होणें जें तें तर पतन पहाण्यास प्रौढ (नवोढा प्रौढा × प्रौढ नवोढा) त्यागानें ही सात्विक वृत्ती एकटीच ही सर्व सात्विकाचें जन्मव्रत घेऊन आल्यानें तेथें सर्व श्रेष्ठ अशी चौथी–तिन्ही गुणांच्या पलिकडील जी ज्ञानरूप चौथी भक्ति–ती भक्तीच मुळीं ज्ञान झाली (२७१).

हेतूचे ( का उगमाचे ) विचित्रतेमुळें कारणच एक कीं होणारे असे हे रज व तम दोन्हीही पतन देणारे मोठ्या शर्तीवरच कीं नरकास नेणारे आहेत असें. ज्यांनीं सात्विकाचा सर्व विस्तार आपलासा केला आहे त्यांनी–( अनुष्ठान–निष्ठा, जन्मव्रत ) त्याना तर हे रज व तम हेच तर पातक करविणारे–अधोगतीला नेणारे पातकच एक प्रौढ ( = धीट, निर्भिड, गर्विष्ठ, वादग्रस्त, विवाहित, जोराचे, दांडगे, वर उचललेले, निर्भिड स्त्रीच जशी, पोक्त, वाढलेले, प्रफुल्लित ) असे आहेत, असें जाणलें; तेथें पतन म्हणजे अस्त, जातिभ्रंश इत्यादि, पडणें, उतरणें, उडणें इत्यादि अप्रतिष्ठा, अकीर्ति, अवनति, मरणच एक, पातक, लोंबणेंच एक तें जाण. (२७०)

आणि असें तें प्रमादमोहौ जाणलें झाल्यानें तें सात्विक वृत्तीनेंच एक जन्मव्रताचें झालें. त्यांनी सर्व कांहीं त्याग करून चतुर्थी भक्तीच ज्ञानोत्तर अंगिकारिली [ जन्मप्रतिष्ठा = जन्मभूमि, आई. जन्म = आयुष्य, जन्मभूमि, पिता, लोक, जाति. व्रत = अनुष्ठान, पुण्यकर्म, निष्ठावचन ( व्रतादेश = उपनयन ). जन्मभाज्– जन्मभृत = जीवित साफल्य झालेला प्राणी ]. ( २७१ )

## ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ।
## जघन्य गुणवृत्तिस्था आधोगच्छंति तामसाः ॥ १८ ॥

सत्वस्थाः ऊर्ध्वं गच्छंति = सत्वस्थ जे असतात ते ऊर्ध्व गतीचे–स्वर्गलोकींचे–होतात. राजसाः मध्ये तिष्ठन्ति = रजोगुणाच्या वृत्तीचे जे ते मध्येंच म्हणजे मनुष्य लोकींच राहातात. सकाम कर्म करणारे लोक मधल्या मनुष्य कोटींत म्हणजे धड उन्नती नाहीं व अवनति नाहीं अशा स्थितींत रहातात. तामसाः जघन्य गुणवृत्तिस्थाः अधोगच्छंति = व तमोगुणाचे जे निकृष्ट वृत्तीनें असणारे ते अधोगतीस जातात. जघन्यः = कटिबंध, कनिष्ठ, पाठीमागचा, नीच गुणाचा व वर्तनाचा आश्रय करणारे जे शूद्र गुण वृत्तीचे ते–अगुण –अवगुण असे धड उन्नती नाहीं व अवनती नाहीं अशा अधोगतीस जातात.

अन्वयः—सत्वस्थाः ऊर्ध्वं गच्छंति । राजसाः मध्ये तिष्ठन्ति । जघनि अगुण वृत्ति स्थाः । तामसाः । अधः गच्छन्ति ।

अर्थः—सात्विक वर्तनाचे पुरुष उन्नतीला जातात, अथवा सात्विक पुरूष स्वर्गादि लोकांना जातात. राजस वर्तनाचे लोक मनुष्यलोकीं राहतात, अथवा मध्यम स्थितींत राहतात आणि निकृष्ट गुणांच्या वृत्तींत राहणारे तामस लोक अधोगतीस जातात. (१८)

**तैसें सत्वाचेनि नटनाचें। असणे जाणे जयाचे।**
**ते तनुत्यागे स्वर्गींचे। राये होती ॥ २७२ ॥**

**याचि परि पैं रजे। जिहीं कां जिजे मरिजे।**
**तिहीं मनुष्य होईजे। मृत्युलोकीं ॥ २७३ ॥**

**तेथें सुखदुःखाचें खिचटें। जेविजे एकचि ताटें।**
**जेथ ईये मरण वाटे। पडिले नुठी ॥ २७४ ॥**

**आणि तयाची स्थिती तमीं। जे वाढोनि निमे भोग क्षमीं।**
**ते घेती नरक भूमी। मूळ पत्र ॥ २७५ ॥**

**एवं वस्तूचिया सत्ता। त्रिगुणासी पांडुसुता।**
**दाविली सकारणता। आद्यवीचि ॥ २७६ ॥**

नटनाचे–नडनाचे=आचरणानें, विकासानें, अभिनय करणें जें, कापणें का प्रकाशणें जें, वर्तणूक, रीति, व्यापारणें जें, वाढ, उमलणें जें. तनुत्यागे–तनुत्यागी. राये–राय (२७२). याचि–इयाचि (२७३). खिचडे=मिसळणी, मिश्रण, खिचडी. ये–इये. पडली–पडले (२७४). निमे–निमती=बुडी मारून असतात, गढून असतात, बुडालेले, तल्लीन होतात. भोग क्षमीं=देही. मूळपत्र=सनद, आमंत्रणपत्र (२७५). वस्तु–सद्वस्तु (२७६).

[ चतुर–चतुर्थ–चतुर्थी–चतुर्थिका. चतुर वर्ग=धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ. चतुर भद्र=धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य यांनीं युक्त. चतुरपाद=१) पशु २) खटल्याचें काम–१ फिर्याद. २ कैफियत. ३ पुरावा. ४ निकाल. ३) धनुर्वेद–१ ग्रहण. २ धारण. ३. प्रयोग. (४) प्रतिकार. चतुरदश=चौदावा, निर्गुडी. चतुरकर्ण=फक्त दोन माणसांनीं ऐकलेलें. चतुरषष्ठी=चौसष्ट, ऋग्वेद. चतुर सन=विष्णू (सनक, सनंदन, सनत्कुमार, सनात हीं रूपें). चतुरव्यूह=१ विष्णु, २ वैद्यशास्त्र–रोग, आरोग्य, निदान, भैषज्य.]

तसें सत्वाच्या नटनाच म्हणजे आचरण्यानें, (विकासानें अभिनय करणें जें, वर्तुणुक, रीति, व्यापारणें, प्रकाशणें, वाढ होणें का उमलणें तें) ज्याचें असणें, जगणें, व्यवहारणें, बोलणें–चालणें असतें ते तनु त्यांगा नंतर स्वर्गींचे राय होतात–अधिकारी होतात. (२७२)

याचप्रमाणें ज्या का रजानें, रजोगुणानेंच ज्यांनीं का जगण्याचें केलेलें, का मरण्याचें केलेलें हें जीवित त्यांनीं ह्या मृत्युलोकीं (मनुष्यधर्म गौरवाचें असें) मनुष्यत्व व्हावें असें होय. (२७३)

त्यांनीं तेथें म्हणजे ह्या मृत्युलोकीं, काय सुख अथवा काय दुःख ह्याची मिसळीची–मिसळणीची–मिश्रणाची एक खिचडीच, एकाच ताटामध्यें जेवण्याची केली. ह्या मरण्याच्या वाटेंतच जे पडलेले ते तर केव्हांही मुळीं उठण्याचें, उभें होण्याचें का बाजूस होण्याचें नावच मुळीं घेत नाहींत. (२७४)

स्थितितमोगुणामध्यें त्यांनीं तर ह्या भोगक्षम अशा देहामध्येंच बुडी दिली–तेथेंच ते बुडून आहेत, तल्लीन झालेले असे, ते तर नरकभूमीचें मूळ पत्रच एक घेतात. त्यांना तर असेंच तें पान का पत्र मिळालें

होतें. तेथें कसचें तें सनद का आमंत्रणपत्र, (पत्र तें एक पर्ण, लेख, पंख, वाहन, तोंडावरील वेलबुट्टी) पण तें मूळच मुळीं (मूळ का पाळ-पिढीजाद नोकर, आश्रित इत्यादिची) सनद म्हणावी का न. पण तेथें श्रित असे नरकभूमीचे-सोंगाचे-विषयाचे-पायरीचे-पातकी असेंच देह धरणें-वागविणें जें तें होय. (२७५)

वस्तूच्या सत्तेनें त्रिगुणासच आलेली ती कार्यरूपता कार्यस्वरूपाची झालेली अशीच सर्व ती हे पांडुसुता दाखविली. (२७६)

**नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।**
**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥**

द्रष्टाः = ज्ञानी. अनुपश्यति = समजतो. गुणेभ्यः च परम् = गुणांच्या अत्यंत पलिकडे असलेलें पर तत्व ओळखतो. मद्भावं सः अधिगच्छति = तेव्हां तो माझ्या स्वरूपाला, भावाला प्राप्त होतो.

अन्वयः—यदा द्रष्टा । गुणेभ्यः अन्यं कर्तारं न इति । अनुपश्यति । तथा । गुणेभ्यः । च । परं वेत्ति । तदा । सः मत् भावम् अधिगच्छति. ।

अर्थः—प्रकृतीपासून उत्पन्न होणाऱ्या या गुणांखेरीज कोणी कर्ता नाहीं असें जेव्हां द्रष्टा म्हणजे ज्ञानी समजतो आणि तिन्हीं गुणांच्या पलिकडील तत्त्व म्हणजे पर ओळखतो, तेव्हां तो माझ्या भावाला म्हणजे स्वरूपाला प्राप्त होतो. ज्यावेळीं जीवात्मा म्हणजेच क्षेत्रज्ञ किंवा साक्षी, त्रिगुणाहून वेगळा कर्ता आहे असें पाहातो आणि गुण व गुणविकार यांहून आत्मा अलिप्त आहे असें समजतो, तेव्हां तो जीवात्मा माझ्या स्वरूपाप्रत प्राप्त होतो. (१९)

पैं वस्तु वस्तुत्वें आसके । तें आपणपें गुणासारिखें ।
देखोनि कार्य विशेषें । अनुकरें गा ॥ २७७ ॥
जैसें कां स्वप्निचेनि राजे । जैं परचक्र देखिजे ।
तैं हारी जैत होईजे । आपणचि ॥ २७८ ॥
तैसें मध्योर्ध्व अध । हे जे गुणवृत्ति भेद ।
ते द्रष्टा वांचूनि शुद्ध । वस्तुचि असे ॥ २७९ ॥
परि हे वाहाणी असो । तऱ्ही तुज आन न दिसो ।
परियेसे ते सांगतसो । मागील गोष्टी ॥ २८० ॥
तरी ऐसें निजनिजें । सामर्थ्यें तिन्हीं साहजें ।
होती देह व्याजें । गुणचि हे ॥ २८१ ॥
इंधनाचेनि आकारें । आगि जैसा अवतरे ।
कां अवगे तरुवरें । भूमिरस ॥ २८२ ॥
नाना दहिंयाचेनि मिसें । परिणमे दूध जैसे ।
का मूर्त होय उसे । गोडीजेंवी ॥ २८३ ॥
तैसें हें सां(स्वां)तःकरण । देहचि होती त्रिगुण ।
म्हणोनि बंधासि कारण । घडे कीर ॥ २८४ ॥
परि चोज हें धनुर्धरा । जे येवढाहि गुंफिरा ।
मोक्षाच्या संसारा । उणा नव्हे ॥ २८५ ॥

गुण आपलालेनि धर्में। देहीचे माधुते साउमे।
चाळितांही न खोये। गुणातीतता ॥ २८६ ॥

ऐसी मागुति मुक्ति असे सहज। ते आतां परिसवूं तुज।
जे तूं ज्ञानांबुज। द्विरेफ कीं ॥ २८७ ॥

आणि गुणी गुणाजोगे। चैतन्य नव्हे मागे।
बोलिलो ते स्वांगे। तैंवीचि हें ॥ २८८ ॥

तरी पार्था जै असें। बोधलेनि जीवें दिसे।
स्वप्न कां जैसें। चेइलेनि ॥ २८९ ॥

ना तरी आपण जळीं। बिंबले तीरौनि कळी।
विचलन होत कल्लोळीं। अनेक धा ॥ २९० ॥

कां नटलेनि लाघवे। नटु जैसा न झकवे।
तैसें गुणजात देखावे। न होनिया ॥ २९१ ॥

पैं ऋतुत्रयें आकाशें। धरुनिया जैसें।
ने दिजेचि येवो वोसे। वेगळेपणा ॥ २९२ ॥

तैसें गुणी गुणा परौतें। जें आपणपें असें आईते।
तिये अहं बैसे अहंते। मूळिकेचिये ॥ २९३ ॥

तै तेथुनि मग पाहतां। म्हणे साक्षी मी अकर्ता।
हे गुणाचि क्रियाजातां। नियोजन ॥ २९४ ॥

सत्व रज तमाचा। मेर्दी पसरू कर्माचा।
होत असे तो गुणाचा। विकारु हा ॥ २९५ ॥

ययामाजि मी ऐसा। वनीं कां वसंतु जैसा।
वन लक्ष्मी विलासा। हेतु भूत ॥ २९६ ॥

कां तारागणी लोपावे। सूर्यकांती उद्दीपावे।
कमळीं विकासावे। जावे तमे ॥ २९७ ॥

ये कोणाच्या काजि कांहीं। सविति जैसि नाहीं।
तैसा अकर्ता मी देही। सत्तारूप ॥ २९८ ॥

मी दाऊनी गुण देखे। गुणता हे मिया पोखे।
याचेनि विशेषे। उरे ते मी ॥ २९९ ॥

ऐसेनि विवेकें जया। उदो होय धनंजया।
ये गुणातितत्व तया। आर्थ पंथे ॥ ३०० ॥

असिजे–असिके=संपूर्ण (२७७). जे–जै. तरि–तै (२७८). अधस्–ऊर्ध्व–अधोर्ध्व–मध्य ऊर्ध्व. हे जे–जे हे. दृष्टि वांचोनि–दृष्टि वांचूनि रे=अवलोकन शक्ती कां बुद्धि नेत्राशिवाय नुसत्या दिसण्या पुरतेच (२७९). वाहाणी=बोलणें. परियेसी–परिसी (२८०). निजनिजे–जाणिजे. सामर्थ्य–सामर्थ्यें. गुण–देह (पाठभेद). गुणव्याजे=देहामुळेंच, देहाच्या निमित्तानें (२८१). अग्नि–आगि. आवेगे–आंगवे.

**आंगवे तरुवरे**=भूमिरस अंगाच्या रूपानें दिसतो–माती, पाणी, खाणी ती (२८२). **नाना**=अथवा. **देहि याचेनि**–दह्याचेनि (२८३). **हे**–इये. **स्वांतःकरण**–सांतःकरण. **देहीच होतांति**=देहिच्या देहीच, शरीरामध्यें. **होताति**–होती. **कीर**–कीं रे (२८४). **चोज**=नवल, आश्चर्य. **जे येवढाहि गुंफिरा**–येवढा जे ही गुंफीरा=(गुंतागुंत). **नव्हे**–नोहे (२८५). **गुण**–त्रिगुण. **आपुलालेनि**–आपुलालिया. **देहिचें माघुते साउमे**=देहीचे मागले पुढलें (साउमें=पुढील क्रियमाण). **खोमे**=उणी होत नाहीं (खोमणे=टोंचणें, अपाय करणें) (२८६). **मागुती**–मा गुंती. **मुक्ती**=गुणातीतता. **ज्ञानांबुझ**–ज्ञानांबुज. **द्विरेफ**–द्विरेफु (२८७). **गुणाजोगे**=गुणधर्माप्रमाणें (मनाजोगें म्हणजे मनधर्माप्रमाणें जसें). **नव्हे**–नोहे. **मागे**–उणें. **खांगे**–खागे=कथन, तात्पर्य, प्रमेय, खागे, आमंत्रण (२८८). **जै**–जे. **अैसे**–ऐसे (२८९). **बिंबले**–बिंबलो (तिरौनि कळी–तिरावरून कळणारे). **विचलत**–विचलन. **होत**–होता (२९०). **ठकवे**–झकवे. **न होनिया**–न होऊनियां (२९१). **ऋतुत्रये**–ऋतुत्रय=पावसाळा, उन्हाळा, हिंवाळा. **ओझे**–वसे–वोसे–वोझे=न्यूनत्व, कमीपणा, उणेपणा, हलकेपणा, अल्पता (२९२). **गुणि**–गुणी. **बैसे**–बैसे. **अहंते मुळिकेचि**=अहं ब्रह्मास्मिच्या मूळ स्थितींत (२९३). **ते**–पै. **गुणाची (क्रियाजातां) नियोजनां**–**गुणचि (क्रियाजाता) नियोजित** (२९४) (२९५) (२९६) (२९७). **ये**–यया. **कोणाचा**–कोणाच्या–कोणाचिया–कोणाचीया. **काजि**–काजे. **सवित्री**–सवितया–सविता–सविति. **जैसी**–जैसा (२९८). **पोखे**=वाढते, पोशिली जाते. **याचेनि**–ययाचेनि. **विशेषे**–निःशेखे (२९९). **अर्थ पथे**–**ऊर्ध्व पंथे**=उत्तम मार्गानें, पुरुषार्थ, उन्नतीमार्गास अवलंबिल्यानें (३००).

वस्तूच वस्तूपणानें सर्व ती वस्तु स्वतःच गुणसदृश होऊन (गुणसदृशता पाहून विशेष कार्यावरच मुळीं अनुकरते, विशेष कार्यपरत्वें गुण अनुकरण करते) गुण वसवते. (२७७)

स्वप्नांतल्या राजानें शत्रूचें सैन्य का शत्रूचा हल्ला पहावा तेथें जिंकणें तें अथवा गय खाणें तेंही पण आपणच तें राजानें होऊन असावें असें होय जसें, तेथें जय मिळाला तरी तो आपणासच, राजासच कीं, अथवा हार खाल्ली तरी तीहीपण राजासच–त्याजला–आपणासच ना ? (२७८)

तसें मध्य, ऊर्ध्व अथवा अध जे गुणवृत्तीचे भेद ते पाहाण्या दिसण्यापुरतेच फक्त; पण तेथें शुद्ध वस्तूच एक जाण. (२७९)

अशी ही काहाणी असूं देत; पण तुजला तेथें वस्तूच एक दिसावी–तेथें वस्तूच एक तूं पाहून–होऊन असावेंस–असें जें मागें बोलिलें तेंच आतां तेथच्या बुद्धिमतीच्या गोष्टी पुन्हां सांगूं. (२८०)

नित्य ते निज (नित्य ते नित्याचे) सहजपणावरच मुळीं तीं सामर्थ्यें त्या सामर्थ्यैकरून गुण निमित्ताचे–निमित्तानें गुण असे होतात, टणत्करण धनुष्याचें जसें, असे गुण लाविलेले–लागलेले–ते गुण होत. (२८१)

इंधनाच्या आकारानें–इंधनास उल्लंघून–अग्नि जसा प्रवेशाचा होतो, अग्नि तीर्थ स्थानानें अवतरतो अथवा भूमिरस तो अंगवला म्हणजे तरुवराच्या आंगच्या रूपानें दिसतो–माती पाणी खाणी ती (२८२)

अथवा दह्याच्या निमित्तानें दूधच जसें तें पालटलेलें नम+परि (णम्)=वांकणें, बदल पावणें, परिणाम होणें, घडणें, पिकणें, जीर्ण (वृद्ध) होणें, (वै.) पचणें, जिरणें, पिळणें, लाभणें, वेळ जाणें, पिकवणें, विकास करणें, वेळ घालविणें होतें–दूधरूपी भांडवलच तें पूर्ण वाढलेलें दह्याच्या रूपानें–बदल, विकास का रूपांतर त्या दुधाचें दह्यानें कां दह्यामुळें समजलें जाणारें–किंवा उसानें ती गोडीच मुळीं मूर्त म्हणजे आकारली जशी; मूर्तिमंत गोडीच एक ती उसाचे आकारानें दृश्य तीं; सत्यतेची ती गोडी उसाच्या आकारानें मूर्त कठिण अशी मिश्रित प्रतिबिंबित=दृश्य आकाराची ती, कांड्या कांड्यावर डोळा असलेली ती देहाचे–जीवात्म्याचे–निमित्तानें दूध तेंच परिणमूं लागलें [सुळयानें ढुसण्या देणारा हत्तीच जसा–आकारला गेला]. (२८३)

तसें शक्ती अंतर–अंतःकरण इंद्रियें इत्यादि हे देहच मुळीं त्रिगुणतेचे असे होय (तिही गुणांनी गुण लाविलेला हा देह) आणि म्हणूनच हा देह अथवा देहबंध कां–हे त्रिगुण म्हणजेच देह हेच (विकारवशतेमुळें) बंधास कारण असे घडले होते. (२८४)

पण येथें नवलाचें तें असें बोलणें म्हणजे आश्चर्यच एक कीं एवढीही जरी गुंतागुंत तरीपण ती कांहीं मोक्षाच्या संसारास उणीवतेची होत नाहीं–तेथेंही पण मोक्ष हा पावणाराच–मोक्षरूपी तो (ऐहिक जीवित) संसार व्हावाच असें जें कांहीं एक योगाचें अंग तेथें ही त्रिगुणात्मकतेची गुंतागुंती ती कांहीं कोणत्याहि प्रकारें मोक्षाच्या का योगाच्या अंगास उणीव देणारी का आणणारी नव्हेच [संसार=जन्ममरण प्रवाह, ऐहिक जीवित प्रवाह, मार्ग, गति, फळ (सां.), विश्व, संसार गुरु=१ मदन. २ जगत्‌गुरु. संसारमार्ग=योनि]. (२८५)

आपुलाल्या–आपआपल्या धर्मानी चालणारे गुण तेथें पुण्यकर्म, नीति, प्राविण्य, स्वभाव, योग्यता इत्यादीनी देहीचें, जीवात्म्याचें देहप्रारब्ध मागचें संचित पुढचें (साउमे) क्रियमाण तेंही जरी चालण्याचें, तपासण्याचें केलें तरी पण तेथें गुणातीतता ती म्हणजे त्याचें ईश्वरत्व तें कांहीं न खोमे म्हणजे उणें कां उणीवेचें होत नाहीं, ती गुणातीतता कांहीं टोंचत नाहीं, अपाय करणारी होत नाहीं. (२८६)

अशी ही एक सहज गुंती आहे–अशी मुक्तीच [लाक्षणिक अर्थ सुटका, सुटण्याचें साधन, मोक्ष, त्याग (नीतिशतक), ऋणफेड, फेंक] एक सहजतेची–जी ती आतां जो तूं ज्ञानरूपी कमलावरील भ्रमरच एक जसा गुंजारव करणारा–स्वाद घेणारा–त्या तुजला ऐकविण्याचें करूं. (२८७)

[गुणी (गुणी म्हणजे धनुष्य), गुणयुक्त, सद्‌गुणी, शुभ का मुख्य तेथें धनुष्य गुण हें गुण लावण्याजोगें तें चैतन्य काहीं उणें असें नाहीं असें जें कांहीं बोलिलों तें जसें कां आमंत्रण स्वीकारून बोलिलेलें प्रमेय कथन.]

गुणाम गुणधर्माप्रमाणेंच [गुण = १ सत्व, रज, तम इत्यादि त्रिगुण प्रत्येकीं. २ सहा गुण = संधि, विग्रह, यत्न, आसन, संश्रय, द्वैध. ३ (न्या.) रूपादि २४ गूण—१ रूप, २ रस, ३ गंध, ४ स्पर्श, ५ संख्या, ६ परिमिति, ७ पृथक्त्व, ८ संयोग, ९ विभाग, १० परत्व, ११ अपरत्वक, १२ बुद्धि, १३ सुख, १४ दुःख, १५ इच्छा, १६ द्वेष, १७ यत्न, १८ गुरूत्वक, १९ द्रवत्व, २० स्नेह, २१ संस्कार, २२ अदृष्ट, २३ भूतत्व, २४ शंकु. {तसेंच अवधुताचे चोवीस गुरू ते म्हणजे पृथ्वी, वायू, आकाश, उदक, अग्नि, चंद्र, रवि, कपोत, अजगर, समुद्र, पतंग, मधुकृत्, हत्ती, मधु हरण करणारा पुरुष, हरिण, मत्स्य, पिंगला, कुरर पक्षी, बालक, कुमारी, बाण करणारा कारागीर, सर्प, कोळी, कुंभारीण माशी (भागवत ११/७)} ४ (व्या.) अ, ए, ओ हे वर्ण. ५ माधुर्य, प्रसाद, तेज हे गुण. ६ रूपादि पंचविषय. ७ दिव्याची वात. ८ मनुष्य, पदार्थ इत्यादींचा मूळ धर्म]. मनाजोगे–मनधर्माप्रमाणें (चार आश्रम, आश्रम धर्म—१ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ्य, ३ वानप्रस्थ, ४ संन्यास हे चार आश्रम धर्म. आश्रमधर्म=तपस्व्याचें व्रत). गुण लावणें तेथें चैतन्य कांहीं उणें नव्हे असें जें तात्पर्य बोलिलों तसेंच हेंहीपण येथें बोललों. (२८८)

(तात्पर्य गुणरूपी धनुष्यांस मनासारखे गुण लावणें तेथें चैतन्य कांहीं मागें सरत नाहीं–उणें असत नाहीं–असें जें कांहीं बोलिलों तसेंच हेंहीपण प्रमेयच एक असें हें) तसें पार्था जेव्हां कां असें असतें तेव्हां जीवास बोध झाल्यावर जसें दिसतें तसेंच हेंही होय–जागें झाल्यावर स्वप्न जैसें कां. (२८९)

अथवा आपलें आपण जळामध्यें बिंबलेलों तें जलामधील प्रतिबिंब बिंबलें आहे तें आपणांस तीरावरून समजतें व तेंच मुळीं अनेक कल्लोळांनी विचलित होतें, प्रेरिलें होतें. आपण जळांत बिंबलों तेथें तें बिंबलेंपण अनेक कल्लोळांनीं, लाटांनीं विचलित झालें, हाललें, ढळलें, क्षुब्ध झालें कां होतें तें तीरावरून समजतें. (२९०)

अथवा नटलेपणाच्या लाघवानें, चंचलतेनें, हलकेपणानें, कोमलतेनें, नट जसा झकविला जात नाहीं, ठकविला होत नाहीं–तसें गुणजात, गुणरूप नच मुळीं होऊन–गुण उत्पत्ति प्रकार ते पहावे–व्हावे–होऊन असावे. (२९१)

आकाशानें तिन्हींही ऋतूंना पावसाळा, उन्हाळा, हिंवाळा धरूनही तेथें जसें आपल्या वेगळेपणास कांहीं न्यूनत्व येऊं देणें नाहीं. (२९२)

तसें गुणाच्या ठायीं गुणाच्याही पलीकडील होणें जेंस्वतःच्या ठायीं आईतेंच असतें–तेथें त्या आईते, पणावरच मुळीं तें अहं, अहं ब्रह्मास्मि ह्या मूळच्या अहंतेच्या स्थितीवरचतें वसतें. (२९३)

मग तेथून पाहातां तो म्हणूं करतो कीं, साक्षी मी अकर्ता आहें. हे गुणच मुळीं क्रियाजातांना व्यवस्था देणारे, नेमणुकीचे करणारे योजनेचे होत. गुणच क्रियाजातांना नियोजित, नियोजना–नियोजन आज्ञा करणारे–तगादा लावणारे–बांधणारे, पिटणारे, उपडणारे व नेमणारे–युक्त करणारे–प्रेरणारे–असे होत. (२९४)

सत्व, रज, तम भेदावरच मुळीं कर्माचा तो प्रसर विस्तार पसारा–पुढें जाणें, गति, पसरणें, वेग, जोर-प्रेमाची याचना, प्रणय, अवकाश, संधि जो होत आहे तोच मुळीं हा गुणांचा विकार म्हणजे रूपांतर, फेरफार, मनोविकार का चित्तक्षोभ तो होय. (२९५)

ह्यामध्यें मी असा जो कोणी–जसा का वनामध्यें वसंतच तो तो तर वनश्रीच्या–वनलक्ष्मीच्या विला-सासच मुळीं हेतुभूत, उद्देश, निमित्त, उगम, पुरावा, नित्यसिद्ध असा अनादि होय. (२९६)

सूर्य उगवल्यानें तारांगणांनीं लोपावेंच लोपावें–सूर्यकांत मण्यांनीं उद्दीप्त व्हावें (क्षुब्ध करावें), सजीव करावें, उत्तेजन द्यावें, उत्तेजन हेतूचें व्हावें (अति ताप संतप्त होणें जें), कमळांनीं उमलावें, तमांधकारानें नाहिंसें व्हावें. (२९७)

इत्यादिकाहि कोणाच्या काजाचें होणें हें कांहीं सूर्याचे ठायीं नाहीं जसें (सवितृ=सूर्य, संवित्ति=वुद्धि, सवित्री=जननी) तसा मी देही जीव–आत्मा अकर्ता भेद निवृत्ति का तादात्म्य असा सत्तारूप जाण. (२९८)

मीच स्वतःस स्वतःला दाखवितों, देखणेंपणानें असून गुण पाहातों, देखतों, गुणता–गौणत्व, सद्‌गुण, कां गुणणेंही मीच मुळीं पोसतों–मजमुळेंच गुणता, अप्रधान कमी महत्त्वाची, औपचारिक ती पोसिली होते –वाढते व असें तें गुणतेचें तें जेव्हां निःशेष पूर्ण, सर्व, विशेष–निशेख तेथें जें कांहीं उरतें तें मी जाण. (२९९)

असें होत होत का अशा ह्या गुणतेवरच (उपचारात्मक जवळचें होणें, जीवित गोडींत बसणें, प्रीति उभी झाली ज्यायोगें तेथेंच राहाणें) उपचारात्मक सद्‌गुण गुणण्यानें कां गुणत्वेवरच मुळीं विवेकानें जो कांहीं विवेक उदयास आणिला होतो उदोचा हा (उदयाचल, उत्कर्ष, सिद्धि, समृद्धि) प्रभाव होतो हे धनंजया! तेथें त्यांस अर्थ, इच्छा (पंथानें) मार्गानेंच मुळीं गुणातीतत्व, ईश्वरत्व येतें अथवा ऊर्ध्व पंथेंच उत्तम मार्गानें पुरुषार्थास उन्नतिमार्गास अवलंबिल्यानें गुणातीतत्व—ईश्वरत्व येतें. (३००)

## गुणानेतानतीत्य त्रीन् देही देहसमुद्‌भवान् ।
## जन्ममृत्यु जरा दुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

देहसमुद्‌भवान्=ह्या देहाच्या उत्पत्तीला कारणीभूत अशा. त्रीन् गुणान् अतीत्य=तीन गुणांचें जो पुरुष अतिक्रमण करितो. अमृतम् अश्नुते=अमृतत्वाला योग्य होतो–परमानंदाचा उपभोग घेतो. जन्ममृत्यु जरा दुखैर्विमुक्तः = जन्म, मृत्यु, जरा इत्यादि दुःखांपासून वेगळा होऊन.

अन्वय :—देही। देहसमुद्भवान्। एतान् त्रीन् गुणान् अतीत्य। जन्म मृत्यु जरा दुःखैर्विमुक्तः। अमृतम् अश्नुते ॥

अर्थ :—देहामधील वृत्तीसमूहापासून दृष्टोत्पत्तीस आलेल्या तीन गुणांचें जो अतिक्रमण करतो, तो जन्ममृत्यूजरादि दुःखांपासून मुक्त होऊन परम आनंदाचा उपभोग घेतो, अमृतत्वाला प्राप्त होतो, जीवन्मुक्त होतो. (२०)

आतां निर्गुण असे आणिक। तें तूं जाणे अचुक।
जें ज्ञानें केले टीक। तयाचि वरी ॥ ३०१ ॥

किंबहुना पण्डुसुता। ऐसा तो माझी सत्ता।
पावे जैसी सरिता। सिंधुत्व गा ॥ ३०२ ॥

नळिके वरुनि उठिला। जैसा शुक शाके बैसला।
तैसा मूळ हता वेठला। तो मी म्हणोनि ॥ ३०३ ॥

अगा अज्ञानाचिया निदा। जो घोरत होता बद्बदा।
तो स्वरूपीं प्रबुद्धां। चेहला कीं ॥ ३०४ ॥

पैं बुद्धि भेदाचा आरिसा। तया हातौनि पडिला वीरेशा।
म्हणौनि प्रतिमुखाभासा। मुकला तो ॥ ३०५ ॥

देहाभिमानाचा वारा। आतां वाजो ठेला वीरा।
तैं ऐक्य वींचि सागरा। जीवेशा हे ॥ ३०६ ॥

म्हणौनि मद्भावेसी। प्राप्ति पाविजे तेणें सरिसी।
वर्षांती आकाशी। घनजात जेवी ॥ ३०७ ॥

तेवि मी होऊनि निरुता। मग देहीचि ये असता।
नागवे देह सम्भूता। गुणासी तो ॥ ३०८ ॥

जैसा भिंगाचेनि घरें। दीप प्रकाशु नावरे।
कां न विझेचि सागरे। वडवानळ ॥ ३०९ ॥

तैसा आला गेला गुणाचा। बोध न मैळे तयाचा।
तो देही जैसा व्योमीचा। चंद्र जळीं ॥ ३१० ॥

तिन्ही गुण आपलालिया प्रौढी। देहि नाचविती बागडी।
तो पाहोंही न धाडी। अहंते ते ॥ ३११ ॥

हा ठाववरी। नेहटोनि गेला अंतरी।
आतां काई वर्ते शरीरी। (हें) कांहीं नेणे ॥ ३१२ ॥

सांडूनि आंगीची खोळी। सर्प रिगालिया पाताळी।
ते त्वचा कोण साम्भाळी। तैसें जाले ॥ ३१३ ॥

कां सौरभ्य जीर्ण जसा। (आमोद) मिळोनि जाये आकाशां।
माघारा कमळ कोशा। नयेचि तो ॥ ३१४ ॥

पैं स्वरूप समरसें। तयांही (ऐक्य) गा जाले तैसें।
तेथें किंधर्म हें कैसें। नेणे देह ॥ ३१५ ॥

म्हणौनि (जन्म) जरा मरण। इत्यादि जे साही गुण।
ते देहीचि ठेले कारण। नाहीं तया ॥ ३१६ ॥

घटाचिया खापरियां। घटाचा भंगी फेडिलिया।
महदाकाश अपैसयां। जालेंचि आहे ॥ ३१७ ॥

तैसी देह बुद्धि जाये। जै आपणपां आठौ होये।
तै आन काहि (चिन्हा) आहे। तें वांचुनी ॥ ३१८ ॥

येणें थोरें बोधलेपणें। तया गा देहीं असणें।
म्हणौनि तो मी म्हणे। गुणातीत ॥ ३१९ ॥

या देवाचिया बोला। पार्थ अति सुखावला।
मेघें संबोखिला। मयोरु जैसा ॥ ३२० ॥

तूं–तो. जाण–जाणे. ज्ञानी–ज्ञाने. टिक–टीक=टिळा, भूषण (३०१). पंडुसुता–पांडुसुता (३०२). शाके–शाखे. अहंता–अहंते. वेढला–वेठला–ठेला (३०३). स्वरूपी–स्वरूपीं (३०४). आरसा–आरिसा. प्रतिमुखाभासा–मुखाप्रति मुख भास, प्रतिबिंबरूप दिसणारा आभास (३०५). विरळा=वीरा. वीचि सागरा=समुद्राला व तरंगाला [समुद्र, समुदाय, (उपमा)] (३०६). निरुता=खरा. ये=ह्या. देहीचि ये असतां=असतोच असतो जेथें तेथें ह्या देहामध्यें. देहसंभूता=देहापासून उत्पन्न झालेल्या, देहास योग्य अशा (३०८). गुणा आपलालिया प्रौढी हेचि नाचविती बागडी तो पाहोहि न धाडि अहंतेते=गुण आपलालिये प्रौढि, देहे नाचविती बागडी (सोंग), तो पाहोही न धडी अहंतेते=तो त्या गुणाकडे ढुंकूनसुद्धां पाहात नाहीं, तेथील अहंता आपल्यावर घेत नाहीं, तो त्या अहंतेचा होत नाहीं (३११). गेला–ठेला. कांही–हेही (३१२). खोळी=कात. रिघालिया–निघालिया. पाताळीं=बिळांत (३१३). न येचि–नागवेचि (३१४). तयाहि=ऐक्य. तेथें–तेथ. किं धर्म=कोणताही धर्म. तैसे–कैसे. देहा–देह (३१५). जरा–जन्मजरा (षडूर्मींपैकीं) गुण–ऊर्मी (३१६). आपैसया–अपैसया. आहे–असे–(३१७). आठौ–आठव. ते–तै. काहि–चिन्ही आहे=दुसरें कांहीं नाहीं. हे–ते (३१८). थोरे–थोर. बोधिले–बोधले. तया–तयासी (३१९). या–यया. संबोखिला=पाचारिला, तृप्त केला. मयोरु=मोरू, मोर (३२०).

आतां यावर निर्गुण जें परमात्मा म्हटलें–का त्रिगुणातीत ब्रह्म म्हटलें तें आणीक एक दुसरें आहे, तें तूं अचूकपणें जाण. जे कां ह्या ज्ञानानेंच कीं त्या निर्गुणावरच मुळीं भूषण असें केलें आहे, टिळाच एक लेइला आहे–स्पष्ट केलें आहे. (३०१)

हे पांडुसुता! बहुत काय लिहावें, पण असा तो निर्गुणत्वें ज्ञानभूषण तो माझी सत्ता पावतो–जशी नदी ती सिंधुभूषणत्वें–सिंधूस सिंधू करण्यास भूषणभूत झाल्यानें–सिंधुत्व पावते. (३०२)

शुक नलिका न्याय–तेथें शुक तोच मुळीं नलिकेवरून–दांडीवरून उठला व शाखेवर जाऊन बसला, तसा मूळ अहंता–'अहं ब्रह्मास्मि'–अहंतेनेंच वेष्टिला ठेला तो जीवात्मा मीच कीं अहो ईश्वरत्वाचा तो. (३०३)

अगा जो अज्ञानाच्या झोपेनें बदबदा घोरतच होता तोच आतां स्वरूपी–स्वस्वरूपी, हे विद्वान् अर्जुना ! चेईला जागा झाला कीं. (३०४)

पण बुद्धिभेदाचा आरसा बुद्धि [(ज्ञान, मति, विचार, समजूत, हेतू, प्रकृति, शुद्धीवर येणें–युक्ति, उपाय)–निश्चयरूप अंतःकरण वृत्ति मधीलचा–वृत्तीमध्यें भेदच एक पाहिल्यानें भेदाचा तो निराळेपणा, फरक, भिन्नभाव, प्रकार, पाहिल्यानें आरसा तो त्याच्या हातून पडला, हे वीरेशा अर्जुना, आणि म्हणून तो मुखा प्रतिमुख भास जो अथवा प्रतिबिंबरूपी दिसणारा आभास तो त्यास दिसेना.] भेदरूपी आरसा त्याच्या हातून पडला म्हणूनच तर त्यास एक तो मुखाभास तो भानूच जसा प्रकाशणारा असा झाला. (३०५)

आतां देह अभिमानाचे वारे, विरळाच कीं तो एक अशा वीरास लागेना तसें तरंगाचें व सागराचें ऐक्यच झालें तसें हें जीवाचें व ईशाचें ऐक्य हें होय. (३०६)

म्हणून माझ्या भावानें होण्याचें झाल्यानें सरिसेपणाची अशीच प्राप्ति त्यानें पावाती असें केव्हांही जसें कां वर्षाकाळच्या समाप्तीवरच कीं, आकाशामध्यें घनजात सर्व ते आकाशांतच लय पावले, स्थिर झाले, आकाशच झाले. (३०७)

जीवित, जीवन, प्रेम, प्रीतीचा 'जीवन्ती' ! अशा ह्या जीवात्मभावानें असतां जीवात्म्याचें दृश्य का मधुरतरतेचा तो प्रीतिसंगम तेथें सगुणरूप तेंच सर्व प्रियत्व घेऊन आहे. जेथें जीवितच मुळीं विसरलें होतें असें तें मी, तेंच कीं अहो अगदीं खरेखुरेपणानें होऊन आल्यानें मग ह्या देहींमध्यें असतां, असतांच मुळीं कीं तो ह्या देहसंभूत–देहास जडलेल्या–देह अनुरूप–देह सहिततेच्या–देहयोग्य देहास जोडलेल्या गुणास तर मुळींच सांपडत नाहीं. (३०८)

भिंगाच्या घरानें दीप प्रकाश फांकणारा तो तर अहो दिव्यानें मुळींच कीं आवरला जात नाहीं. तेथें दीपाचें प्रकाशत्व हेंच प्रकाशा प्रकाशानें प्रकाशा प्रकाशावर होणारें कां असणारें केव्हांही अथवा काय अहो वडवानळ जो सागरांत जन्मलेला तो तर सागराचें गंभीरपण का अफाटपणच मुळीं एक असा तो कांहीं सागरानें विझविला होणारा नव्हेच, होत नाहीं. (३०९)

त्याप्रमाणें देहसंभूत गुण विकारच तो ते काय आले अथवा नाहिंसे झाले, दूर झाले, कां गेले तर बोध समाधानतेचा तो तो कांहीं त्या विकाराच्या येण्यानें का जाण्यानें मळला जात नाहीं तेथें त्या देहीस–जीवात्म्याला–उपमा ती म्हणजे आकाशांतील चंद्रच कीं एक ह्या देहरूपी जळामध्येंच प्रकाशून आहे असा. (३१०)

तीनही गुण आपआपल्या शर्तीनेंच जसे गुणविकाराचे व्हावेच ते अशी प्रौढी मिरवणारे, ते तर ह्या देहीस–जीवात्म्यास देहानेंच मुळीं जसें का एक आनंदानें घेतलेलें स्वैर संचाराचें सोंगच एक जसें असें नाचवीत असले, तरीही सुद्धां (तो तर त्या गुणाकडे–देहोहं अशी भावनाच मुळीं नच उठणारी झाल्यानें तेथें विकाराचें, गुणाचें तें नांवच मुळीं पुढें नच झाल्यानें) तो, त्या गुणाकडे ढुंकूनही पहात नाहीं. देहधारणा देहभावना देह बुद्धीची करून म्हणजे देहोहं ही अहंता भावना घेऊन त्या गुणांना पाहाण्यास आपली देहधारणा धाडीत नाहीं, विकारांना वश होत नाहीं, तो त्या अहंतेचा होत नाहीं. (३११)

असा हा ठावच सर्व एक, अंतरामध्यें अंतःकरणाच्या ठायीं निहटिला म्हणजे आपल्या ठावाचा का सर्वस्वाचा झाल्यानें तेथें शरीराच्या ठायीं जें कांहीं घडत का वर्तत आहे तेंहीपण जाणत नाहीं. तो देहि–जीवात्मा व्योमिचा चंद्रच जसा का जळि तसा त्याचा बोध कांहीं गुणानी मळविला–मळला होत नाहीं. (३१२)

आंगीची देहसंबंधीची-अवयवाची खोली सांडून, कात टाकून देऊन, सर्प बिळांत म्हणजे अधोलोकीं -पाताळीं गेला असतां त्याची ती कात कोण ते सांभाळणारे ह्या येथें ! ( तरुण होऊन, पुनरूज्जीवनाचा होऊन सर्वांगीं आलेला कांचबिंदू काढून टाकून पुन्हां सडोळस होतो, तसें झालें आहे.) [ त्वच्=स्पर्शेंद्रिय, त्वचा, साल, कातडें. त्वचित्वच्=साग, बांबू, दालचिनी. सर्पतृण=मुंगूस. सर्पविद्या=गरुड. सर्पहन्= मुंगूस, गरुड. सर्पारि=गरुड, मोर, मुंगूस. सर्पेष्ट-सर्पावास=चंदन. (३१३)

सुगंध जीर्ण असा झाला म्हणजे तेथीलचा तो आमोद आनंद-देखणा सुगंध आकाशास मिळून जातो; तो कांहीं परत त्या मूळच्या कमल कळीस-कमल कोशास-येत नाहीं. [ (जीर्णपर्ण; कदंब जीर्णव्रज=वैक्रांत मणि ) कमळ=पाणी, तांबें, फुफ्फुस, आकाश, ब्रह्मा, लक्ष्मी, सुंदर स्त्री ( कमल ख×ष×क खंड=कमल समूह ). कोश=कळी, पेटी, आच्छादन, संपत्ती, कोय, शेंग, गोल (नेत्र), आत्म्याचें आवरण-अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद हीं पांच, दिव्य, शपथ, अंगरखा, सोनेरुपें किंवा त्याचा पदार्थ, कणीस, बीजकोश, पायताण, जोडा ]. (३१४)

( पण स्वरूपाशीं तन्मय का ऐक्य समरसतेचें )-स्वरूप समरसतेशीं ऐक्य झालें तसें तेथें देहानें कोण-ताही धर्म जाणणें नाहीं-( किम्-निंद्य का सदोष इत्यादि अर्थीं अथवा किम् म्हणजे कोण, काय, काय उपयोग ! कां कोणी कांहीं तरी ! )-प्रश्न, कारण, प्रकार, विकल्प-देहाचा धर्म, तो कोणता का हें कसें आहे तें तो जाणत नाहीं. देहास का देहाचा धर्म कोण काय ? कां सदोष असा तो ह्या देहास तावीत नाहीं. (३१५)

म्हणून ऊर्मी म्हणजे क्षुद्, तृषा, जरा, मृत्यू, शोक व मोह हे जीवाचे सहा धर्म ह्या सहा गुणोर्मींना गुणच म्हटले, गुणच म्हणावें कां तें देहावरच परिणाम करणारें जीवात्म्यासच म्हणजे देहीसच होत, देहीसच लाविले होतात, ते कांही त्या स्वरूपी समरसलेल्यास नाहींत-ते कांहीं देह कारणाचें कां शरीर हेतूचे होऊन त्याजवर परिणाम करीत नाहींत.

व्यापकत्वानें असणारा जो जीवात्मा, जीवात्म्याचें व्यापकत्व तेंच येथें ह्या ऊर्मींनी परिणाम केलें जातें, ह्या ऊर्मींना वर आणणारें होय-पण आत्मकारण म्हणून तें कांहीं ह्या देहावर, शरीरावर परिणाम करणारें नव्हे. ( कारण काय तर तें स्वरूपीच सर्वथा रममाण असल्यानें तेथें निर्मळ असें स्वरूपच एक आत्मरूपच तें आपलें दिव्य पुढें घेऊन असलेलें. ) (३१६)

खापराचा घट तेथें घटाच्या फोडण्यानें (घटत्व फेडल्यानें) घटाकाश तें मूळच्या महदाकाशामध्यें आहेच आहे असें असलेलेंच तें घटाकाश फेडण्यानें मूळच्याच महदाकाशीचें झालेलेंच झालें आहे-असलेलें तें तेथेंच आहे. (३१७)

त्याप्रमाणें कीं देहबुद्धि नाहींशी झाली ( योग बुद्धीच एक सर्व परिणमून आहे-स्वरूपी समरसून आहे ) जर तेथें स्वसर्वस्वाचा ( स्वरूपाला ) आठवच एक स्वसर्वस्व पाहून आहे. तेव्हां तेथें स्वसर्वस्वाशिवाय दुसरें तिसरें कांहींहीं नसणारच हें केव्हांही स्वसर्वस्वावांचून तेथें दुसरें कांहीं असतें काय ? स्वरूपच एक तेथें असणार केव्हांही. (३१८)

अशा उंचावलेल्या महत्त्वाचा-समृद्धतेच्या थोरपणास आलेल्या बोधलेपणानेंच, बोधानें त्यानें तर आत्माच एक होऊन असणें तें आणि म्हणूनच मी म्हणतों कीं तो गुणातीत म्हणजे स्वस्वरूपी तन्मय असा होय, ईश्वरच होय, तेंच ईश्वरत्व कीं ब्रह्मत्व कीं होय. (३१९)

अशा ह्या देवाच्या बोलण्यानें तर पार्थास अतिशय सुख झालें-तो सुखाच्या अतिशयतेचा झाला. जसा का मेघानें संबोखिलेला-पाचारिलेला, तृप्त केलेला मोरच एक. (३२०)

## कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।
## किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

पुरुषास मुक्ति व्हावी हा हेतू देह, जगत्, आदि हेतु बुद्धि. कैर्लिंगैः=गुणातीत तो कोणत्या लक्षणांनी युक्त असतो, तेथील हेतूचें का बुद्धिप्रभावाचें महत्त्व किंवा हें जगत् विश्व, जें त्याचें आदीपण हें तो कसें पाहातो. पुरुषाला मुक्ति प्राप्त करून देणें हा त्याचा हेतु आहे. त्रीन् गुणान् अतीत भवति= त्रिगुणातीत होतो. आचारः किम्=त्याचा आचार कसला असतो. एतान् त्रीन् गुणान् कथं अतिवर्तते= ह्या तीन गुणांना तो कसा अतीत होतो, उल्लंघून जातो, अतिवर्तते गुणाचे व्यवहारांत वर्तणें तें कसें युक्ततेप्रत घेतो, योजनेप्रत घेतो, योजितो (उल्लंघितो).

अन्वय :—हे प्रभो ! कैर्लिंगैः (सः पुरुषः) एतान् त्रीन् गुणान् अतीतः भवति । (तस्य) आचारः किम् । (सः) च एतान् त्रीन् गुणान् कथं अतिवर्तते ॥

अर्थ :—अर्जुन म्हणाला, हे प्रभो ! त्रिगुणांना उल्लंघून गेलेला, तीन गुणांच्या पलीकडे गेलेला पुरुष कोणत्या लक्षणांनीं युक्त असतो, त्याचा आचार कसा असतो व कोणत्या उपायांनीं तो तिन्हीं गुणांच्या अतीत होतो, तिन्ही गुणांचें अतिक्रमण कसें करतो, तिन्हीं गुणांच्या अतीत होण्याचें साधन तें कोणतें ? (२१)

**तेणें तोषे वीर पुसे । जी कोणें चिन्हे तो दिसे ।**
**जयामाजी वसे । ऐसा बोधु ॥ ३२१ ॥**

**तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे ।**
**हे सांगिजो माहेरे । कृपेचेनी ॥ ३२२ ॥**

**या अर्जुनाचिया प्रश्ना । तो षड्गुणांचा राणा ।**
**परिहारू आकर्णा । बोलतसे ॥ ३२३ ॥**

कोणें चिन्हीं–कोण्ही चिन्हे (३२१). गुणे–गुण निस्तरणे–निवारण करतो (३२२). बोलतसे–बोलत असें (३२३).

त्यायोगेंकरून वीर पार्थ अति प्रसन्न झाला, संतोषास आला व विचारूं लागला कीं, अहो स्वामी ! (कोणत्या लक्षणाचा तो दिसतो, कसल्या चिन्हांनीं तो पाहिला होतो–दिसला जातो–तो दिसतो तो कोणत्या चिन्हांनीं–जीवाचें सूक्ष्म स्वरूप, लिंग, खूण, इत्यादींनीं) ज्याच्या ठायीं असा बोध वस्ती करून आहे त्याचीं चिन्हें–लक्षणें तीं कशीं असतात, तो कसा वागतो, बोलतो, चालतो, व्यवहारतो, त्याचा तो आविर्भाव, चेहरा इत्यादि कसा असतो. (३२१)

अहो ! आपण कृपावंत असे, आईबापासारखे, माहेर घरच एक असे आहांत, कृपाच एक सर्व मूर्तिमंत अशी त्या आपण मजला सांगावें कीं तो निर्गुण–काय कसा आचरतो–वागवितो व गुण जे म्हटलेले, जीवधर्मांच्या उर्मीच त्या येथें निवेदिल्या पुढें केल्या, दाखविल्या–ते तो कशाप्रकारें करून निस्तरतो, निवारतो, स्वतःवर परिणमून घेत नाहीं. (३२२)

अर्जुनाच्या अशा ह्या प्रश्नावर षड्गुण चक्रवर्ति ते भगवान् श्रीकृष्ण सहज रावच कीं, का राजा–राणाच एक ते, त्यांनीं बोलणें तें समर्थनतेचें करून, त्याच्या शंका दूर करून, शंकांचें निरसन करून सांगत आहेत तें ऐकावें, बोलत आहेत तें तेथें आपलें सर्व लक्ष देऊन ऐकण्याचें करावें. (३२३)

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥**

प्रकाशं, प्रवृत्तिं, मोहम्=ज्ञान, प्रकाश, बुद्धीला होणारा व त्यावर उभी होणारी प्रवृत्ति–प्रवर्तणें, वर्तणें, सद्वर्तन का आशाळभूत होणें जें. न द्वेष्टि संप्रवृत्तानि=प्रवृत्ती चालू ठेविली तरी–प्रवृत्तींत बसला तरी तेथें कदाचित् नच आवडल्यामुळें द्वेष करणारा होत नाहीं. न निवृत्तानि कांक्षति=व निवृत्त झाल्यावर पुन्हां आशा धरून बसणें नाहीं–तेथीलची आशा करून असणें नाहीं.

अन्वय:—पाण्डव! प्रकाशं न द्वेष्टि (प्रकाशितानि कर्माणि न द्वेष्टि) च। प्रवृत्तिं न संप्रवृत्तानि कर्माणि (कर्मे चालू ठेवीत नाहीं) च। कर्माणि निवृत्तानि मोहं च न कांक्षति।

अर्थ:—श्री भगवान् म्हणाले सत्त्व गुणाचें कार्य प्रकाश, रजोगुणाचें कार्य प्रवृत्ति व तमोगुणाचें कार्य मोह हीं प्राप्त झालीं असतां जो विषाद मानीत नाहीं, द्वेष करीत नाहीं, खेद करीत नाहीं व निवृत्ती झाली असतां पुन्हा इच्छा करीत नाहीं तो गुणातीत होय (२२)

**म्हणे पार्था तुझी नवाई। हें इतुलेंचि पुससी काई।**
**ते नांवचि तया पाहीं। साचे लटिकें ॥ ३२४ ॥**

**गुणातीत जया नावें। तो गुणाधीन तरि नव्हे।**
**ना होय तरी नागवे। गुणांयर्या ॥ ३२५ ॥**

**परि आधीन कां नागवे। हेंचि कैसेनि जाणावें।**
**गुणाचिये उरवरवें। माजी असतां ॥ ३२६ ॥**

**हा संदेह जरी वाहासी। तरी सुखें पुसो लाहासी।**
**परिस आतां तयासी। रूप करूं ॥ ३२७ ॥**

**तरी रजाचेनि माजें। देही कर्माचें आणोजें।**
**प्रवृत्ति जें घेइजे। वेटाळुनी ॥ ३२८ ॥**

**तें मीचि कां कर्मठु। ऐसेनि ये श्रीमाठु।**
**कां दळिद्रलिये बुद्धि विटू। तोहि नाहीं ॥ ३२९ ॥**

**अथवा सत्वेंचि अधिकें। जें सर्वेंद्रियांही ज्ञान फांके।**
**तैं सुविद्यता तोखे। उभजेही ना ॥ ३३० ॥**

**कां वाढलेनि तमें। न गिळिजेचि मोह भ्रमें।**
**तैं आज्ञानत्वें न श्रमे। घेणें ही नाहीं ॥ ३३१ ॥**

**पैं मोहाच्या अवसरीं। ज्ञानाची चाड न धरी।**
**ज्ञानें कर्में नादरी। होता न दुःखी ॥ ३३२ ॥**

**सायं प्रातर्माध्यान्हां। या तिही कालाची गणना।**
**नाहीं जेंवी तपना। तैसा असे ॥ ३३३ ॥**

**तया वेगळाचि कायी प्रकाशें। ज्ञानत्व यावें असें।**
**काय जळार्णव पाऊसें। सांजा होये ॥ ३३४ ॥**

**ना प्रवर्तलेनि कर्मे । कर्मठत्व तयां कां गमे ।**
**सांगे हिमवंत हिमें । कांपे काई ॥ ३३५ ॥**
**नातरी मोह आलिया । काई पां ज्ञाना मुकिजेल तयां ।**
**हो मा आगी तें उन्हाळयां । जाळवतसे ॥ ३३६ ॥**

नांवचि–नामचि ( गुणातीत हें नांव ). साचे–साच = सत्य ( लटिके ) (३२४). होये–होय. उरवरें– रवरवे = हालचालींमध्यें (३२६). ये–तरी. आणोजे–आणोजे = मोड, अंकूर. जरि–जै (३२८). कां–एक अहो. ऐसेनिया ( श्रीमाट्ट )–ऐसा नये–ऐसे न ये–ऐसेन ये. श्रीमाट्ट = अभिमान (अंग फार पटपट करीत आहे असें जें कांहीं संसार प्रपंचा–व्यवहारामधील बोलणें–तेथें भोगाकरितां चिथवणें केलेले अथवा प्रकृति ही धर्मधारणेच आणावी लागणारी–आणिली व्हावी तेथें व्रतास येणें का साधुसेवा; ज्यायोगें धर्मप्रतिष्ठा, ब्रह्म प्रतिष्ठेवर प्रामाणिक झाली जशी कां ). दळिद्रिलिये–दळिद्रलिये (बुद्धि) = ज्ञानदान नच करणें कां तें जसें बुद्धि दारिद्र्यामुळें. तेही–तोही (३२९). सत्वेंचि–सत्वें कीं. सर्वेद्रियांही–सर्वेद्रियींही. उभेजे–( उभजे ) हिना = फुगणें, रुसणें, भरून किंवा गढून जाणें होत नाहीं ( सुविदः = अंतपुर सेवक ) सुविद्यता (३३०). घेणें ही नाहीं = पाहाणें, घेणें देणें तें परस्पर विचारसरणींची देवघेव, सारासार विचार वाहाणें, बरा विचार तोही तो घेत नाहीं–सुखाचें देणें घेणें तेंही पण तो पाहात नाहीं. न गिळिजेचि = रजामध्येंही तम वाढलें तर मोहानें भ्रमांत पडून सबंध गिळिला गेला कां सर्वांगी मोहानें व्यापला गेला–तेथें घेणें देणें नच करणें हें एक अज्ञानच पण तें तो पाहातच नाहीं (३३१). होता ना–होता न. नादरी = फिरवीत नाहीं (३३२). वेगळाचि कायि ( काय ) = दुसरीकडून, काय त्याहून वेगळें जें तेथून, काय प्रकाश पडल्यावर, मगच ज्ञानत्व– ज्ञातत्व यावें असें नाहीं, कारण तोच मुळीं ज्ञान असल्या कारणानें ज्ञानत्व–ज्ञानित्व; का–कायि, साजा– ताजा = अवर्षणानें सज्ज, तयार. होये–होय (३३४). मोहो–मोह. हो मा–महा = नवल नव्हे काय अहो कीं. उन्हाळेया–उन्हाळयां. जाळवतसे–जाळवत असे (३३६).

हे पार्था येथें तर तूं कसा आहेस म्हणावा तर अहो मोठ्याच नवलाचा एक असा असूनही हें इतकेंच तें काय विचारण्याचें करतोस तें, पण असें पाहा कीं येथें तो तर अमुक एका नांवानें संबोधिलेला असूनही पण त्यास तें नावानें जाणलें जाणें का हांक देणें, तें तर खरें आहे असें म्हणावें तर खरेंही आहे व तें लटिकेच एक असेंही आहे नसतेंच एक तें असें म्हणावें तो तें तर तसेंही आहे. (३२४)

गुणाना अतीत म्हणावा तर गुणाच्या आधीन केव्हांही नव्हें असाच कीं, कदाचित् तसा आधीन म्हणावा तर तो ह्या गुणामध्यें अथवा गुणांना तर केव्हांही सांपडणारा नव्हेच–होतच नाहीं. (३२५)

पण येथें आतां आधीन ( आधी = व्याघ्र बुद्धि. आधीनां = ताबेदारी, नागवे अंग–आंग.

१ नच अवयव युक्त करणें तें.
२ अंगद देशीचा राजा, रहिवाशी, इत्यादि
३ कोमल शरीर ).

अथवा नागवे हेंच मुळीं कसें जाणलें जावें–कसें जाणवलें होतें कसेंही तरीपण कदाचितच जाणवतें ह्या गुणांच्या उरवरवीमध्यें, कां हालचालीचें तें सर्व त्या आधीनतेमध्यें असतें म्हणून येथें तें काय केलें असतां जाणवतें–समजलें होतें. (३२६)

अशी शंकाच एक जर कां तूं घेऊन आहेस तर–संदेह शंका वाहतो आहेस तर खुशालपणें तें विचारण्याचें कर–सहज सुखानेंच तें विचारणें तें कसें तें तुजपुढें येऊन आहे–करितां आतां ऐक, त्यास रूप देऊन सांगण्याचें करूं. (३२७)

रजोगुणाच्या माजानें आत्म्याच्या ठायीं कर्माचे जे कांहीं मोड अंकूर उगवतात–उताविळपण कां उत्कंठितपण एक तेथें परिणाम करीत असलेलें–तें प्रवृत्तीनेंच जेव्हां कां आवरून, वेटाळून–अंगीं वेढून घ्यावें. (३२८)

तेव्हां तर अहो मीच कीं एक मोठा कर्मठ असा [घराचें आढेंच (मट्टकं) जसें कां एक असा ब्रह्माकार उगवणारा–ब्रह्म आकारलें जसें] श्रीमाट्ट म्हणजे अभिमान (माठरः = सूर्याचा परिपार्श्वक विशेष, व्यास, विप्र) तो तर एक डौलच वाहाणारा असा असतो, पण हें जर नाहीं तर दरिद्रपणाची बुद्धि–ज्ञान दान नच देण्याची ती कंजुषपणाची सीमा अथवा अहो बुद्धि दारिद्रयास नच कंटाळणें तें तेंही नाहीं. अहो, बुद्धीचें दारिद्र्य त्याचाही पण अगदीं मुळींच वीट तो कसलाही येईना, कीं असेंही नाहीं (अंग फार मटमट करीत आहे असें जें कांहीं संसार प्रपंची–व्यवहारामधील बोलणें तेथें भोगाकरितां चिथवणें केलेलें का प्रकृती ही धर्मधारणेस आणावी अशी व्रताची का साधुसेवेची प्रतिष्ठा, ती ब्रह्मप्रतिष्ठेवर प्रामाणिक झाली असेंही नाहीं). (३२९)

उरलेलें नफ्याचें अथवा वाजवीहून जास्त विपुलतेचें, जोराचें का बळकट असें सत्व तें त्यानें जेव्हां कां सर्वांही इंद्रियांना ज्ञान प्रकाशतें, सर्वेच्या सर्व इंद्रियांच्या ठायीं ज्ञान फांकतें तेव्हां सुविद्यतेच्या तोषानें –फुगून बसत नाहीं का गढून जात नाहीं–विद्यमान म्हणजे हल्लीं असलेल्या–वर्तमानकाळच्या प्राणानें उकार विष्णूरूप त्यासही भजत नाहीं अथवा उभय जे प्रकृतिपुरुष–पुरुषनारी–त्यांनाहीपण भजावें असें पाहात नाहीं. (३३०)

तम वाढलें, अधिक झालें असतां मोहास वश होऊन का भ्रमिततेनेंच मुळीं कीं त्या तमाकडून स्वतःवर चढवून कां स्वतःस गिळवून व्यापून घेतलें असें जें कांहीं अज्ञान तेथें तर तो श्रमच, थकवा, खेद, तापच मुळीं मानीना, श्रम होत आहेत असें त्याचे मनानें घेणें का पाहाणें होईना–नाहींच. (३३१)

मोहाच्या वेळेस ज्ञानाची आवड, चाड, क्रिया, दया, थट्टा, मोह, प्रेमास्पदता धरीत नाहीं–ज्ञानकर्म तीं नच आदरावीं असें करीत नाहीं–तेव्हां दुःखी नच होतां मोह सर्व अवसराचा, तेथे ज्ञान चाडीचें का आवडीचें व्हावें असें त्या मोहास तो (ज्ञानाचे) करीत नाहीं–मोहास ज्ञान सांगत बसत नाहीं–मोहाच्या वेळेस (शहाणा कां ज्ञानाचा) म्हणून जाणिवेनें तीं कर्में–तीं कर्में मोहामच मुळीं महत्त्व दिलें व कर्म फेटाळिलीं, फिरविलीं असें करीत नाहीं, वा दुःखी होत नाहीं–तेथें अवमरच तो दुःखी होण्याचा- सर्व दुःखीच कां कष्टी कीं तो एक असाच प्रसंग ज्ञान लक्षण नच सन्मानिलें व मोहच एक तेथें महत्त्व घेऊन असलेला–तरी पण तो तेथें दुःखी होत नाहीं. (३३२)

सूर्य तो सूर्यच! प्रातःकाळ, मध्यान्हकाळ का संध्याकाळ हे तिन्ही काळ तेथें होत असलेले पण तेथें तो तपन सूर्य काय त्या काळाची ती गणना–पर्वा–करीत बसतो? (३३३)

अहो ईश्वरत्व तें! कां ज्ञानाच तो प्रत्यक्ष! तेथें तो प्रकाशेंकरून तो काय निराळा असा आहे? अहो तो तर सर्व प्रकाशच एक. तेथें आतां जाणीव का शहाणीव ती कांहीं दुसरीकडून–त्याहून वेगळें जें तेथून प्रकाश आल्यावर मगच ज्ञानत्व यावें असें नाहीं. कारण तोच मुळीं ज्ञान असल्यानें एकाद्या निराळ्या ठिकाणच्या (त्याहून वेगळ्या) प्रकाशानें–प्रकाशाच्या निराळेपणानें का वेगळेपणानें तें ज्ञान यावें असें नाहीं–अहो समुद्र, जलार्णव तो काय पावसावरच मुळीं साजा असा? नेहमीं समुद्रतेनें सज्ज म्हणावा. तो समुद्र तर पाऊस असो वा नसो केव्हांहि समुद्रच (साजात्यं म्हणजे सजातीयपणाचा–प्रेमाचा–प्रेम हेंच मुळीं ईश्वर म्हटलें त्या प्रेमाचा). (३३४)

(कर्मानें पुढें चालणें झालें–कर्मच मुळीं उद्भवलें, घडलें, वागलें, केलें, प्रचारांत आणलें, चालू ठेविलें, प्रेरणेचें झालें, उत्पन्न केलें) कर्माच्या ठायीं प्रवृत्त झालें तरच कर्मठत्व एरव्हीं नाहीं असें नाहीं कर्म तें वागलें –वागणारें, व्यवहारणारें तें कर्म त्यानेंच काय त्यास कर्मठत्व–ब्रह्म आकारलेंपण–कर्मठपण जाणवतें, भासतें, वाटतें, असें नव्हे–अहो प्रवृत्ति ही म्हणावी तर सविकारं उदाहृतं अशी प्रकृतीच एक सर्व तेथें पुण्य का पाप अशाच प्रकृतीच्या आधीनतेमुळें विकाराचा डाव येणारा, पण येथें तर मुळीं ईश्वरत्वच, का ब्रह्मच एक असा. तेथें प्रकृतीच्या आधीनतेचें होणें नाहींच, ब्रह्मच व्यापकत्वानें असलेलें, तें अहो सर्वेच मुळीं हिम तें–तेथें हिमाचा पर्वतच तो महान् असा त्यानें काय हिम म्हणजे थंडीनें कांकडत असावें असें नाहींच. बर्फाचा पर्वत तो काय बर्फ थंड म्हणून भितो, कंप पावतो, हालतो ? नामाचा महिमा तो काय नामानें कंपित होणारा ? नामास भिणारा ? [हिम=कमळ, कापूर, चंदन, चंद्र, हेमंत (हिंवाळा), रेणुक, बीज, बर्फ, दंव, हिमालय. हिमवंत=हिमालय, हिमवत् हिमद्रुम=महानिंब वृक्ष. कंपन=शिशिर ऋतु–माघ व फाल्गुन, ताप नाहिंसा करणारा, कांपणें (कामूपणें). शिशिरापगमः=वसंत. कंप=हालणें, कंपणें, कंपित होणें. कंपाक=वारा. (३३५)

अथवा मोह आला तेथें काय तो ज्ञाना तया मुकिजेल ? काय ज्ञान त्यापासून दूर होईल ?–ज्ञानीच तो काय तें ज्ञान त्यास हरवण्याचें कां मुकण्याचें करील ? दूरचें होईल–त्यास सोडून जाईल ? अहो ! हें मोठें नवलच एक नव्हे काय, कीं काय उन्हाळ्यानें–मोहानें खडखडित वाळलेपण नामाचें जें त्यानें (का उन्हाळे लागल्यानें, उन्हपाण्याचा झरा त्यानें–ऋतूंपैकीं उन्हाळा त्यानें) वैराग्याग्नीसी–आगच जी एक तिजलाच मुळीं जाळण्याचें करावें (करील) असें नाहीं–वैराग्याग्नि ब्रह्माग्नि जो महान् असा त्यास काय उन्हाळा जाळूं शकेल ?

[उन्हाळा=१ तापन, पीडक, सूर्यसंबंधीं, सूर्य, सूर्यकांतमणी, मदनबाण विशेष. २ पीडणें. ३ नरक वि. ४ सोनें. तापनीय=सोन्याचें. निष्क=भार सोनं. तापत्य=१ अर्जुन, २ कौरव. आतप= उन्ह, आतपत्र. आतप वारण=१ छत्री, अब्दागिरी. २ राजछत्र. आतपलंघन=उन्हाची बाधा. आतपाभावः=छाया. आतापोदक=मृगजळ.]

उदासीनाचा देह ब्रह्मरूप । नाहीं पुण्यपाप लागत त्या ॥ १ ॥
अनुताप अंगी अग्निचिया ज्वाळा । नाही मृगजळा विझो येत ॥ २ ॥
दोष ऐसा नांवे देहाचा आदर । विटले अंतर अहंभावे ॥ ३ ॥
तुका म्हणे जाय नासोनिया खंती । तंवचि हे चित्ति बद्धता ते ॥ ४ ॥

## उदासीनवदासीनो गुणैर्योनविचाल्यते ।
## गुणावर्तंत इत्येव योऽवतिष्ठतिनेंगते ॥ २३ ॥

उदासीनवत्=(प्रेक्षक सभासद–जसा बाहुल्यांचा खेळ नाटक पाहातो तसा) तटस्थ. आसीनः (आस–असणें)=असलेला. गुणैः न विचाल्यते=गुण (वे.) देह का अगुण (दोषः) हे आपआपल्या कामांत आहेत तेथें तो प्रेक्षकच एक जसा इतका स्तब्ध असल्यानें त्या गुणकार्यांनी तो चळत नाहीं. गुणावर्तंत इति एव=गुणांचे येण्या जाण्यानें–गुणच वागत आहेत, वर्तत आहेत असेंच तो समजून असतो आणि म्हणून–'गुणच सर्व कांहीं आहेत' असें समजून असतो. अवतिष्ठति=स्थिर असतो. न इंगते= ढळत नाहीं, हालत नाहीं, सत्वगुण, सत्व धर्मामध्यें का सत्कर्मात वागत आहे, रजोगुण विषयामध्यें का तमोगुण हा मोहादिकांत वागत आहे असें समजून जसें कां हें सर्व कांहीं होत जात असतें पण तो तर उगाच असतो जसें कां सूर्याच्या सत्तेनं, का प्रकाशानें लौकिक व्यवहार होणारे ते पण सूर्य तर उगाच असतो.

अन्वयः—यः। उदासीनवत् आसीनः। गुणैः न विचाल्यते। गुणाः वर्तंत इति एव। यः। अवतिष्ठति। न इंगते। च।

अर्थः—उदासीनाप्रमाणें म्हणजे साक्षीभूत राहून तटस्थाप्रमाणें त्रिगुणांच्या विकारांनीं विचलित होत नाहीं, गुणच गुणांत वर्तत आहेत असें मानतो, गुणच आपआपलीं कर्मे करीत आहेत असें मानतो व स्थिर असतो, परमात्म्याच्या ठायीं ऐक्य बुद्धीचा असतो व त्या ऐक्यापासून चळत नाहीं, तो गुणातीत होय. (सत्वगुण, सत्वधर्म का सत्कर्मात, रजोगुण विषयामध्यें व तम मोहामध्यें वर्तत आहे हें तो पाहात असतो. तो स्वतः मुळींच चळत नाहीं). (२३)

तैसें गुणागुण कार्य हें। आघवेंचि आपण आहे।
म्हणौनि येकैके नव्हे। तडातोडी॥ ३३७॥

येवढियां प्रतीती। तो देहां आलासे वस्ती।
वाटे जातां गुंती। मार्जी जैसा॥ ३३८॥

तो जिणता ना हारवी। तैसा गुण नव्हे ना करवी।
जैसी कां श्रोणिवी। संग्रामीची॥ ३३९॥

कां शरीरा आंतुल प्राण। घरीं आतिथ्याचा ब्राह्मण।
नाना चोहटां स्थान। उदास जैसा॥ ३४०॥

आणि गुणांचा यावां जावां। चळे ढळे ना पाण्डवा।
मृग जळाचा हेळावा। मेरु जैसा॥ ३४१॥

हे बहुत काय बोलिजे। व्योम वारेनें न वचिजें।
कां सूर्य न गिळिजे। अंधकारें॥ ३४२॥

स्वप्न कां गा जियापरी। जागतियाते न सिंतरी।
गुणी तैसा अवधारी। न बंधिजे गा॥ ३४३॥

गुणासी कीर नातुडे। (परि) दुरूनि जें पाहे कोडे।
तें गुण दोष सांईखेडे। सभ्यु जैसा॥ ३४४॥

सत्कर्मे सात्विकीं। रजे ते रजो विषि।
तममोहादिकीं। वर्ततसे॥ ३४५॥

परी तयाचि गा सत्ता। होती गुणक्रिया समस्तां।
हे फुडे जाणे सविता। लोकिकां जे॥ ३४६॥

समुद्रचि भरती। सोमकांतचि द्रवती (पाझरति)।
कुमुदे विकासती। चंद्र तो उगा॥ ३४७॥

कां वाराचि वाजे विझे। गगने निश्चल असिजे।
तैसा गुणाचिये गजबजे। डोलेना जो॥ ३४८॥

अर्जुना येणे लक्षणे। तो गुणातीत जाणणें।
परीस आतां आचरणें। तयाचीं(चे) जीं(जे)॥ ३४९॥

गुणागुण कार्य–गुणकार्य. येकैके–एकेका. नव्हे–नोहे. ताडातोडि=ताटातुट, वेगळेपणा, विभक्तपणा (३३७). येवढिया–येवढे या गा. गुंती माजीं=अडचणींत. वाटे जातां गुंती माजीं जैसा–वाटे माजी गुंती जाता जैसी (३३८). जिणता=जिणणारा, जय पावणारा. हारवी=हरणारा, हारी खाणारा. श्रोणिवी=भूमी (श्रोण=श्रवण. श्रोणी=रस्ता) (३३९). आंतुल–आंतील=नटणें, एकजीव, प्राणच सर्व. स्थान=स्थाणु (३४०). आणि–परि. यावा=उत्कर्ष. जावां=निरसन (३४१). कायि–काय. वारेने–वारेनि. वचिजें–वीजिजें. ओजावी–जीविजे=आकाश जिवंत केलें जात नाहीं, हालत नाहीं, रडविलें जात नाहीं. सूर्य न–सूर्य ना (३४२). जागतियाते–जागतयाते. सिंतरी=फसवी. गुणि–गुणी. गा–तो गा (३४३). दुरूनि–परि दुरूनि. सांईखेडे–साईखडे=बाहुले. सभ्यु=सभासद (३४४). सत्कर्म–सत्वधर्म. रजे–रज. रजोविषी (विषयीं)–रजविषय कीं. वर्ततसे–वर्तत असें (३४५). तयाचि–तयाचिया. लोकि काजे–लोकिकां जे–लौकिका जेवी.

देहेंद्रियमनोबुद्धि प्रकृतिभ्यो विलक्षणम्
तद्वृत्ति साक्षिणं विद्यात् आत्मानं राजवत् सदा ॥ १७ ॥
व्यापृते* ष्विद्रियेश्वात्मा व्यापारी वा विवेकिनाम्
दृश्य तेऽभ्रेषु धावत्सु धावन्निव यथाशशी ॥ १८ ॥
आत्मचैतन्यमाश्रित्य देहेंद्रिय मनोधियः
स्वकीयार्थेषु वर्तंते सूर्यालोकं यथाजनाः ॥ १९ ॥

* व्यापृत=गुंतलेला. धंदाउद्योगांत व्यापलेला. (३४६)

कुमुदे–कुमोदे. विकाशती–विकासति. चंद्र–चंद्रु (३४७). वाजे=वाहातो. विझे=शांत होतो. डोलेना जो=डुलणें, अस्थिर होत नाहीं, ढळत नाहीं–स्वतःकडे मुळींच महत्व मानीत नाहीं; गुणांच्या गजबजींत तो मुळींच पडत नाहीं (३४८). (आचरणें) तयाची जी–तयाचें जें (३४९).

सत्व, रज, तम गुणांचें कार्य अथवा अगुणांचें म्हणजे दोष व्यसन निरुपयोगी असें जें (म्हणजे निर्गुण ईश्वराचें–मोक्ष, कैवल्य, परब्रह्म, दोष, व्यसन) कार्य तेथें रूपादि पंचविषयांचें असणें नाहीं असें जें कांहीं सर्व, तें एक आपणच तेथें होय, कां आहे म्हणूनच कीं तेथें गुण, एक एके गुणास, गुणांना एक एकाच्या, एकेका ताटातुटीचे, विभक्तपणाचे, वेगळेपणाचें होत नाहीं. (३३७)

(एवढ्या अगा ह्या प्रतीतीनेंच अहो तो देहामध्येंच वस्तीस आला–आहे, देहधारणाच एका वस्तीची झाली आहे–त्याचीच वस्ती ह्या देहामध्यें झाली आहे–वस्तीसच तो आला.) ह्या एवढ्या देहाप्रती तो–राहाण्यासच आला आहे, वस्त्राच्या दशेस आला आहे, सहज वाटेनें, मार्गानें जातां जातांच मुळीं जसा कां (मार्ग=विश्वास, खात्री, ज्ञान, अनुभव, ख्याति, आनंद, आदर तोच मुळीं) अडचणींत आला, गुंतागुंतीचा झाला–गुंतीमध्यें आला. (३३८)

तो जिणणार का जय पावणार अथवा हरणारा का हारी खाणारा तसा गुण होणारा–गुणकारी होणारा–नच अथवा गुण घडविणाराही पण कां गुण होऊन गुण करविणारा कां गुणांकरवि करणारा असाही नव्हे. जशी कां संग्रामीची (समग्र ब्रह्मभूमि देह) भूमिच–फळीच एक ती.

[ गुण=१ मनुष्य पदार्थ इत्यादींचा मूळधर्म.
२ गुणवान्. ३ फायदा, उपयोग, दिव्याची वात, विण्याची तार, रूपादि गुण, त्याग, आचारी. (३३९)

तो केव्हांही उदासच असणार! जसा कां शरीरांतील प्राण नटला, एकजीव झाला, अतिथी आलेला ब्राह्मण का चव्हाट्यावरील स्थान जसें, का स्थाणु जसा. (३४०)

तेथें गुणाचा उत्कर्ष कां गुणांचें निरसन तें कांहीं तेथें चळणारें, का हालणारें, ढळणारें नव्हेच! हे पांडवा! मेरु कांही मृगजळाच्या हेलकाव्यानें चळणारा का ढळणारा नव्हे, होत नाहीं. (३४१)

असें हें बहुत बोलून काय करावयाचें आहे. पण व्योम–आकाश कांहीं वाऱ्यानें जिवंत केलें जात नाहीं (जीविजे विजिजे), रडविलें जात नाहीं, उठविलें जात नाहीं, का सूर्य तो अंधकारानें गिळिला जात नाहीं. (३४२)

ज्याप्रमाणें स्वप्न कांहीं जागत्यास फसवीत नाहीं त्याप्रमाणें हें जाण कीं, गुणी म्हणजे गुणामध्येंच का गुणांनीं तो बांधिला जात नाहीं. (३४३)

(जेव्हां दुरूनच पाहाणें तें कौतुकाचें असें केलें तर तें गुणास कीर आकळत नाहीं, जसा बाहुल्यांचा खेळ दुरून पाहाणारा प्रेक्षक तेथील गुणदोष न पहातां, एक कौतुकच पहातो. तेथें गुण कसचे नि दोष कसचा, तें तर सूत्रधारानें दाखविलेलें एक कौतुकच होय) म्हणून प्रेक्षकच एक जसा तो गुणांना दुरून पाहाणारा तेथें कसचें बाहुल्यांचें–देहधारीमधीलचें गुण दोष पाहाणें तें. (३४४)

सत्व हें आपल्या धर्मानें अथवा कर्मानें सात्विकतेनें वर्तत असतें–रज तें तर राजसतेनें व तम हें मोहप्रमादादिकामध्येंच वर्तत असतें. (३४५)

पण वस्तूच्या सत्तेवरच, सूर्यप्रकाशावरच मुळीं समस्त गुण (योग) क्रिया होतात असें हें खरें होय –जसें कां सूर्यप्रकाशानें जन वन अवलोकन तें कां सूर्यच मुळीं लोकांत रूढ असलेल्या प्रापंचिक का सामान्य प्रकाशाचा ना? (३४६)

चंद्र तो उगा आहे तरी समुद्रास भरती येते–सोमकांत द्रवतात, चंद्रविकासिनी कमळें विकासतात, पण चंद्रमा तर आपला उगाच असतो कीं. (३४७)

वाराच मुळीं वाजतो–वाहतो, बंद होतो, शांत होतो; आकाश तें तर निश्चळ असेंच असतें. त्या आकाशाप्रमाणें तो तर गुणाच्या गाज्यावाज्यानें केव्हांही अस्थिर होत नाहीं, डुलत नाहीं, ढळत नाहीं, स्वतःकडे मुळींच महत्त्व घेत नाहीं, मानीत नाहीं, गुणाच्या गजबजींत तो मुळींच पडत नाहीं. (३४८)

हे अर्जुना! त्या इतक्या लक्षणांनीं–चिन्हांनीं तो गुणातीत (ईश्वरत्वच जसें कां) जाणावा–आतां त्या गुणातीताचीं तीं आचरणें कशीं असतात तें सांगतों एक. (३४९)

## समदुःख सुख स्वस्थः सम लोष्टाश्म कांचनः ।
## तुल्य प्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

तुल्यः=सम=दुःखमुख स्वस्थः=सुख का दुःख (द्वंद्व हें सारखेंच असें समजून जो स्वस्थ असतो. सम, लोष्ट, अश्म काञ्चन=त्यास हें ढेंकूळ, कां तो दगड, कां तें दुसरें सोनें असें नाहीं–तेथें सर्व समताच एक–समदृष्टीच एक पाहाणारी अशी ती, निष्पाप, उत्तम, निस्चिछतेची–निष्कामतेची. तुल्य प्रियः अप्रियः अधीरः=आवडतें असें का नच आवडणारें असें अप्रिय तेथें धीर हा नच टाकिला जाऊन एक समतोलपण तेथें पाहिलें, आवडणारें असें आवडतें, व नावडणारें असें नच आवडणारें असें तें दोन्हीं एकाच धीरावर उभें असें असल्यानें तेथें धीर जो म्हणजे प्राण जो तो कांहीं मुळींच अधीरतेचा होऊन तेथीलचा झाला नाहीं. असें समतोल मानणें–तेथें प्राणच मुळीं तोलला गेला–आवड नावड हीं दोन्ही प्राणामुळेंच तीं प्राणानें

तुळिलीं गेल्यानें समतुल्य झालीं–एका तोळाचीं झालीं व तेथें प्राणानें हालणेंच केलें नाहीं, प्राण हा धीर, उदार, गंभीर, सम असा स्थिर असा तो अधीरतेचा झाला नाहीं. तुल्य–समप्रत्यय–निंदा का आत्मस्तुति–ही वर सांगितल्याप्रमाणेंच जशी कां अधीरपणाची निंदेमुळें का धीरपणाच्या आत्मस्तुतीमुळें तसें नाहीं. तेथें आत्मप्रत्ययावरच दोन्हीं उभे असल्यानें एक जें आत्मस्तुतीचें तें परनिंदा करणारें असेंच म्हटलें गेल्यानें तेथें (आत्म-प्रत्यक्षत्व) (पर–अपरोक्ष–अप्रत्यक्ष–सूक्ष्म–इंद्रियाचें तें) दोन्हीं ती एक आत्मस्तुति घेतली तर परनिंदेचा दोष येऊं पाहाणारा म्हणून येथें तें स्तुतीचे जें, कां संसिद्ध तें असें जें कांहीं तें दोन्हीं बाजूंना समतोल करून पाहाणारें असल्यानें तेथें स्तुति का निंदा हीं तुल्य प्रत्ययाचीं होत. कारण आत्मस्तुति ही परनिंदेनें तोलली गेल्यामुळें तेथें दोन्हींही आत्म्याच्या सासिद्धतेवर टेकणारी असल्यानें दोन्हीं व्यर्थच होत, सम होत, तुल्य होत, तेथें आत्माच एक विराजमान व त्याच्या सत्तेवरच तें गुणाचें येणें जाणें का प्रदर्शन होणारें.

अन्वयः—सुखदुःख सम । स्वस्थः । काञ्चन, अश्म, लोष्ट, समः । प्रिय अप्रिय तुल्य । धीरः । स्तुतिः निंदा । आत्मसम् तुल्य ॥ २४ ॥

अर्थः—तसेंच सुख दुःख ज्याला सारखेंच असतें, त्यावर परिणामकारक होत नाहीं, जो स्वस्थ म्हणजे शांत, आत्मनिष्ठ असतो, ज्याला माती, दगड व सोनें सारखेंच असतें, जो निःस्वार्थी असतो, निरिच्छ असतो, स्वार्थाचा लोभ धरीत नाहीं, प्रिय व अप्रिय ज्याला समान, आवड नावड ही ज्याच्या ठायीं नसते, जो धैर्याचा पुरा व ज्याला स्वतःच्या निंदेची व स्तुतीची पर्वा वाटत नाहीं, तो गुणातीत होय. (२४)

तरी वस्त्रासि पाठी पोटी । नाहीं सुत वांचूनि किरीटी ।
ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ॥ ३५० ॥

म्हणौनि सुखदुःखा सरिसें । कांटाळे आचरे ऐसें ।
रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ॥ ३५१ ॥

येऱ्हवीं तरी साहजें । सुख दुःख तेंचि सेविजे ।
देहजळीं होइजे । मासोळी जें ॥ ३५२ ॥

आतां तें तव तेणें सांडिलें । आहे सस्वरूपेसींचि मांडिले ।
सस्यांतीं निवडिलें । बीज जैसे ॥ ३५३ ॥

कां वोघ सांडूनि गांग । रिघोनी समुद्राचें आंग ।
निस्तरी लगबग । खळाळाची ॥ ३५४ ॥

तेंवि आपणपांचि जयां । वस्ती जालि गा धनंजया ।
तया देहीं आपसयां । सुख तैसें दुःख ॥ ३५५ ॥

रात्रि तैसें पाहालें । हें धारणा जेंवि एक जालें ।
आत्माराम देह आंतलें । द्वंद्व तैसे ॥ ३५६ ॥

पैं निद्रिताचेनि आंगेसी । साप तैसी उर्वशी ।
तेंवी स्वरुपस्था सरसी । देही द्वंद्वें ॥ ३५७ ॥

म्हणौनि तयाचा ठाईं । शेणा सोनया विशेष नाहीं ।
रत्नां गुंडयां कांहीं । नेणिजे भेद ॥ ३५८ ॥

घरा येवो पां स्वर्ग । कां वरी पडो वाघ ।
परि आत्मबुद्धिसी भंग । कदा नोहे ॥ ३५९ ॥

**निवटलें न उपवढे। जाळिन्नलें न विरुढे।**
**साम्य बुद्धि न मोडे। तयापरी॥ ३६०॥**

**हा ब्रह्मा ऐसेनि स्तुतिजो। कां नीच म्हणोनि निंदिजो।**
**परी नेणें जळों विझो। राख जैसी॥ ३६१॥**

**तैसी निंदा आणि स्तुति। न ये कोण्हेचि व्यक्ती।**
**नाहीं आंधारें कां वातीं। सूर्याघरीं॥ ३६२॥**

सुये=घाली (३५०). म्हणौनि–म्हणोनि. दुःख–दुःखा. कांटाळे=माप, वजन. रिपुभक्तां जैसें हरीचें देणें (३५१). साहजें–सहजे (३५२). सस्वरूपेसीं–स्वस्वरूपेंची. सस्यांतीं=धान्याच्या मळणीच्या शेवटीं (३५३). गांग निस्तरी–गांगे निस्तरिली (३५४). देहीं आपसयां–देहीं अपैसया (३५५). पाहालें=उजाडल्यावर, पहांटे, दिवस उगवल्यावर. धारणा=खांबाला (धारणें=माजणें, व्यापणें). आत्माराम देह (देही)–आत्माराम देहा. आंतलें–नटलें (३५६). सरसि–सरिसी. देहि–देही (३५७). तयाचां ठायी–तयाच्या (तयाचिया) ठाईं. सेणा–शेणा. गुंडयां–गुंडिया. भेद–भेदु (३५८). वरी पडो=प्राप्त होवो, येवो (३५९). निवटले न–निवटले न–निवटेल न=मेलेले न. उपवढे=जागे, जिवंत होत नाहीं (निमल्यावर पोट दुखत नाहीं). जळीनले–जाळिन्नले=जळलेले. (साम्य बुद्धि) न मोडे=मोडत नाहीं, तिला मोड येत नाहींत, फाटे फुटत नाहींत (३६०). स्तुतिजो–स्तविजो. राख–राखोंडी (३६१). अंधार–अंधारे. वाति=दिवा, बत्ती (बोलणारी का शब्दाची) (३६२).

हे किरीटी! वस्त्रास पाठ पोट सर्व कांहीं सूतच असतें तेथें दुसरें तिसरें कांहीं असत नाहीं, त्याप्रमाणें तो आपल्या दृष्टीनें माझेंच रूप चराचरीं पाहातो–डोळ्यामध्यें भरून घेऊन असतो, चराचरीं माझ्याच रूपानें पाहात असतो. (३५०)

म्हणून सुख अथवा दुःख तो सारख्याच वजनानें कां मापानें वागवितो, आचरतो–रिपु हो अथवा भक्त हो तेथें श्रीहरीचें देणें तें दोघांस सारखेंच होय.

पुण्यवान् करणारे, सुख देणारे व आनंदच एक असे ते [जीवात्मा व देहधारीपण ते देहच तेथें दिसणारे (जीवात्मा होणेचें) सुख अथवा कष्ट, शोक, पीडा, कष्टी होणें, अहो देहधारीच एक कीं असें हें] एकाच काट्यानें तोलले होऊन वागविले होतात, रिपु अथवा भक्त हो त्यास श्रीहरीचें देणें तें (सुख देणारें अथवा कष्टी करणारें तें एक सारखेंच म्हटलें). (३५१)

एरव्हीं पाहिलें असतां अगदीं स्वाभाविकतेवरच–मूळचेंच असें तें (जीवात्म भावाचें) सुख का देहाएवढेपणाचें दुःख तेव्हांच मुळीं भोगावें लागतें, जेव्हां का त्या देहरूप जळामध्यें एक मासाच कां मांसोळी (सहजेही=अस्वाभाविक) होऊन असावें जर कां. (३५२)

आतां त्यानें तर तें (देहधारीच एक देहबुद्धीचा) अस्वाभाविक तें त्यागिलें आहे व (जीवात्मा) स्वरूपासहिततेचें होणें तेंच एक तो होऊन आहे–जसें कां धान्याच्या मळणीच्या शेवटीं बीज एक तेंच निवडिलें होतें. (३५३)

अथवा गंगेचें पाणी–गांग–तें समुद्राच्या आंगी रिघून असल्यानें तेथें खळाळाची ती लगबग सहजच निस्तरिली करते. (३५४)

त्याप्रमाणें ज्यास आपल्या सर्वस्वामध्येंच स्वस्ती–वस्ती झाली आहे हे धनंजया! त्या जीवात्म्यास आपसुखच आपोआपच मग सुख तसें दुःख हें असणारच–आपोआपच कीं. [जीवात्माच एक सर्व पैग

घेऊन आहे तेथें आपलीच आपल्या सर्वस्वाच्या ठायीं वस्ती झाली, गृहास आले (वसति=राहणें, राहण्याची जागा, घर, रात्र) तेथें मग जसें सुख तसें दुःख हें असणारच–हें आपसुखच ओघाओघानें आलें] एकदां आत्मानंदावर उभा होतों, कीं कधीं तर देहच मी आहें असें मानल्यानें तेथें दुःखच एक क्षणभर वाटणारें असें हें होणेंच असतें (३५५)

रात्रींच जसें कां पाहिलें–तेथें खांबच एक व्यापून आहे तसे देह हे उजाडल्यावर–दिवस उगवल्यावर खांबच जसे असे ते व्यापकपणानें, माजानें, धारणेनें एकवटले; व दिवस उगवल्यावर जे व्यापकत्वानें असणारे देह ते–तेथें दोन्ही ती रात्रीची दिवसाची पाहाणी एक झाली. तेथें देह आत्माराम झाले–तें तसें आत्माराम-तेनें द्वंद्वच एक नटलें असें होय, देही आत्मा देहच आत्माराम झाले असें आंतले नटले, उपमा नटली. (३५६)

अहो जो झोपी गेला आहे त्याच्या अंगावरून अंगाला तर साप तशीच उर्वशी–त्याप्रमाणें स्वरूपाच्या ठायीं स्थिर जो त्यास देही म्हणजे जीव–आत्मयाचीं द्वंद्वें तीं सारखींच होत–आत्मभाव तेथें काय साप काय उर्वशी ह्या दोहोंठायीं सारखेपणच एक, व देहभाव तेथें मात्र साप तो साप व उर्वशी ती उर्वशी; पण निद्रिस्त जो त्याच्या अंगास, मनास तर दोन्हीही सारखीच होत कीं–त्याप्रमाणें (योगनिद्रा) का स्वरूपाच्या ठायीं 'स्थ' निजलेला (निद्राण) स्थिर जो त्यास ह्या जीवात्म्याचीं का जीवभावाचीं तीं द्वंद्वें हीं एकासारखींच होत. (३५७)

म्हणूनच तर कीं अहो त्याच्या ठिकाणीं, काय शेण का काय सोनें, तेथें विशेष म्हणजे अधिक असें, का प्रकाराचें असें अथवा असामान्य गुणाचें असें तें कांहींच मानिलें होत नाहीं. रत्न काय किंवा दगड काय तेथें दोन्ही दगडच म्हटले म्हणून दगडच जे तेथें भेद तो कसचा?–कसलाही जाणवला जात नाहीं–पण रत्न तें रत्नच व दगड तो दगडच! [रत्न=उत्तम वस्तू, हिरेमाणिक रत्नें. रत्नगर्भा=पृथ्वी. रत्न सानू=मेरुपर्वत. रत्नसु=पृथ्वी. रत्नाकर=समुद्र, रत्नाची खाण. रत्नावली=रत्नाचा सर. रत्नि=मुंढा हात, मूठ]. (३५८)

घरास स्वर्ग येवो अथवा वाघ तो वरपडा होवो तरी आत्मबुद्धीस–स्वरूपी अंतःकरण शक्तीस–तर केव्हांही भंग नाहींच. (३५९)

मेलेले जिवंत होणें नाहीं (निमाल्यावर पोट दुखणें नाहीं), जळलेलें तें (मोडास येत नाहीं–मोड घेत नाहीं) त्यास मोड फुटत नाहींत, त्याप्रमाणें फुलेंच भ्रमर झाले–गगन तेच मेघ झाले–अशी जी साम्य बुद्धि ती मोडत नाहीं, तिजला मोड येत नाहीं–फाटे फुटत नाहींत. (३६०)

अहो हा तर ब्रह्मदेवच कीं एक, ब्रह्माच प्रत्यक्ष, ईश्वरी ज्ञानच तो, असें म्हणून त्याची स्तुति करावी, अथवा क्षुद्रक नीचच कीं एक असें म्हणून निंदावें, तिरस्कारावें जरी, तरी मुद्दां राख जशी जळण लांकुड फाटा नव्हे तेथें जळण, पेटवण का विझण तें कसचें!!! राख जसें जळणें जाणत नाहीं का विझणें तें कसें तेंही जाणत नाहीं असा जो. (३६१)

त्याप्रमाणें काय निंदा कुटाळी ती कसल्याही कोणत्याही व्यक्तीस येत नाहीं, रूपाची होत नाहीं, स्पष्टतेस कां जीवदशेस कां पदार्थरूपास येत नाहीं, तसेंच स्तुति कां प्रशंसास्तव तोही पण कसल्याही व्यक्तीस मिरवणारा नाहीं–अहो सूर्य जो आहे तो तर सर्व जगास माहीत असाच आहे, तो काय वातीनें दाखविला जाणारा का अंधःकार–काळोख तेथें असणारा–अहो सर्व प्रकाशच जेथें दीप्त असा तेथें काळोख तर केव्हांही प्रकाशाचाच कीं एक होणारा ना! तेथें अंधारें म्हणणें हें तरी कसचें तें!!! (३६२)

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।**
**सर्वारंभ परित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥**

तुल्य = सम–समतोल. मानअपमानयोः = मान अथवा अपमान मानिले कां अवमानिले तेथें हर्ष का अमर्ष हे नच आले–तेथें बाल्यबुद्धीचें जसें का असेंच घेऊन एका आपल्या त्या वृत्तीला नच अमर्षास्पद केलें असें सम. मित्रअरिपक्षयोः = मित्रसम जें वागणें ह्या गुणांनी का रिपूप्रमाणेंच एक तें वर्तणें ह्या देहामध्यें. तेथें वृत्ती ही समतोल ठेविली (देहा होती रोग तरी का म्हणावे आप्तवर्ग) असें तेथीलचें तें ह्या देहामध्यें वागणें जें तिकडे नच आपली वृत्ति देतां स्वरूपीच स्थिर झाले जे त्यांना एक समतोलपणा साध्य झाला–सिद्ध होऊन आला, असा होय. सर्व आरंभ परित्यागी = (सर्व जगत् हें ईश्वरानें व्यापिलें आहे, तेथें प्रवृत्तीं हीच मुळीं कर्माचा आरंभ पहाणारी, अशा ठिकाणींचें जें मुळींच होत नाहीं तो मुक्त आत्माच जसा एक) आतां जर त्या तसल्या वृत्तीस आप्तपणाचें केलें तर सर्वच्या सर्व हें जन्मणेंच जेथून आलें तेथेंच पाहाणें व त्या स्वरूपाचें होणें हें कोणत्या गांवचें असें विचारणें होणारें म्हणून त्यांनीं कसलाहि जीवित आरंभभार नच घेतां–एका स्वरूपीच राहाणें केलें तेथें गुणांचें तें येणेंच नाहीं, गुणाचें होणेंच नाहीं–एक गुणातीतत्वच वर्तत असलेलें–तो कोणाचा मित्र नाहीं, तो कोणाचा शत्रू नाहीं, तो कांहीं कोणाकडून मान चाहत नाहीं किंवा कोणी झिडकारलें तरी अपमान वैराकाराचा वाहून असत नाहीं–असा तो निस्पृह त्यास कर्मसंगाची किंवा कर्मफळाची इच्छा नाहीं असा निरिच्छ किंवा समशांत, अहो ब्रह्मकल्प जरी फिरलें तरी त्यास तें कायतें एका पक्षाचें होणें का कसलें तें मित्रत्व का कायसें तें शत्रुपण असें जें कर्माच्या आरंभाचें म्हणजे कर्मफलाचें इच्छिणें हें ज्यास नाहीं असा तो गुणातीत निस्पृह असा जाणावा–जीवन्मुक्त जाणावा.

अन्वय :—सः गुणातीत उच्यते । यः । सर्व आरंभ परित्यागी । यः । मान अपमानयोः तुल्यः (समानः) । यः । मित्र अरिपक्षयोः (समानः) तुल्यः ।

अर्थ :—जो मानापमान यांत सारखा, आदर व अनादर याविषयीं निःस्पृह, मित्र व शत्रुपक्ष या दोहोंस सारखा म्हणजे न्यायानें व हितबुद्धीनें वागणारा व सर्व कर्मात जो कर्तृत्वाभिमानांचा त्याग करतो, निष्कर्म असा, त्या पुरुषास गुणातीत म्हणतात. त्याच्या ब्रह्मत्वावरच का जीवन्मुक्तदर्शनें तोलले गेलेले असल्यानें तेथें एक जें ब्रह्म तेंच मुळीं आपल्या परम ठावाचें झालेलें असें होय–गुणातीतच तो, का ब्रह्मच तो किंवा जीवन्मुक्तच एक तो. (२५)

**ईश्वर बुद्धि पूजिला । का चोर म्हणोनि गांजिला ।**
**कीं वृष गर्जी (वृक जगीं) वेढिला । केला रावो ॥ ३६३ ॥**

**कां सुहृद पासीं आले । अथवा वैरी वरपडे जाले ।**
**परि नेणें रातीं पाहाले । तेज जेवीं ॥ ३६४ ॥**

**साही ऋतु येतां आकाशे । लिंपिजेना जैसे ।**
**तेवि विषम (वैषम्य) मानसे । जाणिजेना ॥ ३६५ ॥**

**आणीक येक पाहीं । आचारू तयाचा ठाईं ।**
**तरी व्यापारासि नाहीं । जाले दिसे ॥ ३६६ ॥**

**सर्वारंभा उटकलें । प्रकृतिचे तेथे मावळले ।**
**जळती कां कर्मफळें । ते तो आगी ॥ ३६७ ॥**

**दृष्टादृष्टाचेनि नांवे। भावोचि जीवीं नुगवे।**
**(ते सेविजे (कां) स्वभावे। पैठे होये ॥ ३६८ ॥**

**सुखे, ना, [श्वसणें (सिंहासन)] शिणे। पाषाण कां जेणे माने।**
**तैसी सांडी मांडी मने। वर्जिली असे ॥ ३६९ ॥**

**आतां किती हाचि विस्तारु। जाणे ऐसा आचारु।**
**जयाचा तोचि साचारू। गुणातीत ॥ ३७० ॥**

**गुणांते अतिक्रमणे। घडे उपाये जेणे।**
**ते आतां आइक म्हणे। श्रीकृष्णनाथ ॥ ३७१ ॥**

बुद्धि–म्हणोनि. वृकजगीं–वृकगजी = बैल व हत्ती यांनीं (३६३). सुहृदपासी–सुहृदापासी. वरी–वरपडे = चढाव करून आहे (३६४). विषम–वैषम्य (३६५). आचरू–आचारू. तयाच्या–तयाचिया (३६६). उटकले = दूर झाले. प्रकृतीचे–प्रवृत्तीचें. तेथें–तेथ. मावळले–मावळे. का–गा (३६७). भावोचि–भावचि. जिवि–जीवी. सेविजे–सेवि जे कां. पैठे होय = प्राप्त होय, माप होये (होय) (३६८). शिणें–नेणें. तैसि–तैसा (३६९).

ईश्वरच एक असें म्हणून–ईश्वरत्वाची बुद्धि ठेवून पूजिला, अर्चिला, सन्मानिला का आदरिला अथवा स्तेनच एक, चोरच एक, ठकच एक म्हणून गांजिला, लाजविला, (वृकजगी–वृषजगी) बैल व हत्ती यांनीं वेढिला, पांघरविला जाऊन–होऊन रावच [स्वामी, धनी, संरक्षक, प्रभु, एक] केला. (३६३)

सुहृद अंतरीचे झाले, जवळ आले कां वैरी वरपड झाले तरी (नेणतेंपणच एक, नेणतें बाळच जसें एक, असा हा जसा का) सूर्यतेजच एक जें त्यास कांहीं रात्रीं अथवा पहांट असें नाहीं. (३६४)

सहाही ऋतूंचे येण्यानें जसें आकाश लिंपत नाहीं, तसें मनाच्या (विजोड कां उंचसखल, दुःसह का दुर्बोध) विषमतेनें असणें जो जाणत नाहीं, त्याच्या मानसामध्यें केव्हांही विषम, दुर्गम, दुःसह भाव असत नाहीं. (३६५)

आणखी एक तें असें आहे कीं, त्याच्या ठायीं आचार–(रीती, वर्तणुक) व्यवसाय अभ्यासाचा झाला म्हणजे कामांत गुंतलेला असा अशी हालचाल दिसत नाहीं. त्याच्या आचाराची हालचाल मुळींच दिसत नाहीं. (३६६)

सर्वारंभास दूर झाले–प्रकृति विकाराचे–ते मावळले–मावळते असे तेथें तो तर वैराग्नीच–ब्रह्माग्नीच एक असा म्हणून अगा! कर्मफळें तर ज्ञानाग्नीनें नाहिंशीं झालीं. (३६७)

काय (दैव) दैवीचें पावणें अथवा अकस्मित आलेलें संकट! प्राक्तन पाहावें, तो, तो तर भारच जीवी नच उगवल्यानें भोगावें लागतें जें, तेथें स्वभावच मुळीं एक माप घेऊन चालत असलेला (तो तर प्राप्त असा दृष्ट का अदृष्टाचें मापच एक, त्यामुळें देवभाव नच उगवता, सेवावा असा, स्वभावच दैवी मापाचा झालेला). (३६८)

प्रारब्ध म्हणावें तर भावच उगवत नाहीं, प्रारब्ध पुढें घेऊन असावें तर प्रारब्ध महत्त्व मानीत नाहीं, जें कांहीं स्वभावेंकरून सेवन करतो तेंच प्राप्तीचें होतें. सुख झालें म्हणून कां सुखाच्या आसनानें सिंहच झाला–हृदय उभरून आलें–अथवा शिणल्यामुळें हृदय खालीं बसलें असें होत नाहीं–जसें का पाषाण धोंडा पाषाणाचें प्रमाणच एक, अमूक एक घेणें का अमुक एक त्यागणें असें सर्व त्यानें सोडलेलें असतें–संकल्प–विकल्प त्याच्या ठायीं नसतात. (३६९)

आतां असा हा विस्तार कोठवर करावा पण एवढें जाण कीं असा ज्याचा आचार आहे, वर्तणूक रीती ज्यास तोच खरा गुणातीत (ईश्वरत्व, ब्रह्मत्व) जाण. (३७०)

गुणाच्या मर्यादेचें उल्लंघन, गुणांचा विपरीतपणा, गुणाचा अनादर तो ज्या कांहीं इलाज–सामदामादि साधन–उपायें करून घडला होईल–दुरुस्त केला जाईल तें आतां सांगतों तें ऐक असें श्रीकृष्णनाथ म्हणाले. (३७१)

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**
**सगुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥**

अव्यभिचारेण=एकाधीन, एकनिष्ठ असें. समतीत्य=सम् अतीत्य=येथें उपमा का प्रमाण हेंच पार उल्लंघिलें गेलें व त्या जीवनमुक्ततेसच पाहूं केलें असें तें गुणातीतत्व. ब्रह्मभूयाय कल्पते=तिन्ही देवांचा कल्प तोच जसा एक जीवनमुक्ताचा, का ब्रह्मच तें सर्व, असें तेथें तें अमृतत्व पाहून असणारें–किंवा ब्रम्हत्वास योग्य होणारें होय.

अन्वयः—यः मां अव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। स एतान् गुणान् अतीत्य। ब्रह्मभूयाय कल्पते। च।

अर्थ :—आणि जो पुरुष (ज्ञानविज्ञानमय) अव्यभिचारी म्हणजे एकनिष्ठ भक्तियोगानें माझी सेवा करतो, मला भजतो, तो या तीन गुणांना पूर्णपणें उल्लंघून ब्रह्मरूप होण्यास योग्य होतो (ब्रह्म भूयाय कल्पते) कारण, अमृत व अविनाशी ब्रह्माची, शाश्वत धर्माची व अखंड, एकरस आनंदाची प्रतिष्ठा (प्रतिमा, आश्रय, स्थान) मी आहें. (२६)

**तरि व्यभिचार रहित चित्तें। भक्तियोगे मातें।**
**सेवि तो गुणातें। जाकळूं शके ॥ ३७२ ॥**

**परि कोण मी (मी कोण) कैसी भक्ति। व्यभिचारा काईसी व्यक्ति।**
**हे आघवीचि निरुती। होआवी लागे ॥ ३७३ ॥**

**तरी पार्था परियेसा। मी तंव येथ ऐसा।**
**रत्नीं कीळावो जैसा। रत्नचि (की) तो ॥ ३७४ ॥**

**कां द्रवपणाचि नीर। अवकाशचि अंबर।**
**गोडी तेचि साखर। आन नाहीं ॥ ३७५ ॥**

**वन्हि तोचि ज्वाळ। दळाचि नांव कमळ।**
**रूख तेंचि डाळ। फळादिक ॥ ३७६ ॥**

***अगा हिंव जे आकर्षले। तेचि हिमवंत जेवि जालें।***
**नाना दूध मुराले। तेंचि दही ॥ ३७७ ॥**

**तैसें विश्व येणें नांवें। हें मीचि पैं आघवें।**
**आतां चंद्रबिंब सोलावें। न लगे जेवी ॥ ३७८ ॥**

**घृताचें थिजलेपण। न मोडितां घृतचि जाण।**
**कां नाटितां कांकण। सोनेचि ते ॥ ३७९ ॥**

तुकलितां पटु । तंतुचि आहे स्पष्टु ।
न विरवितां घटु । मृत्तिका जेविं ॥ ३८० ॥

म्हणौनि विश्वपण जावे । मग (तैं) माते घेआवें ।
तैसा नोहे आघवे । सकटचि मी ॥ ३८१ ॥

ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ती म्हणिजे ।
येथे भेद कांहीं देखिजे । तरी व्यभिचार तो ॥ ३८२ ॥

या कारणें भेदातें । सोडोनि अभेद चित्तें ।
आपणया सकट माते । जाणावे गा ॥ ३८३ ॥

पार्था सोनयाची टिका । सोनयासी लागली देखा ।
तैसें आपणपे आणिका । मानावे गा ॥ ३८४ ॥

तेजाचा तेजोनि निघाला । परि तेजीच असे लागला ।
तया रश्मि ऐसा भला । बोध होआवा ॥ ३८५ ॥

पै परिमाणु (परमाणु) भूतळीं । हिमकणुका हिमाचळीं ।
मजमाजीं न्याहाळीं । अहं तैसें ॥ ३८६ ॥

हो कां तरंग लहान । परि सिंधूसि नाहीं भिन्न ।
तैसा ईश्वरू मी आन । नोहेचि मा ॥ ३८७ ॥

ऐसेंनि बा समरसें । दृष्टि जैं उल्हासे ।
तें पैं भक्ति ऐसें । आम्ही म्हणों ॥ ३८८ ॥

आणि ज्ञानाचे चांगावें । येचि दृष्टी नावें (मानावें) ।
योगाचें ही आघवें । सर्वस्व हें ॥ ३८९ ॥

सिंधु आणि जळधरा । माजीं लागली अखंड धरा ।
तैसी वृत्ति वीरा । प्रवर्ते ते ॥ ३९० ॥

कां कुहेंसी आकाशा । तोंडी सांदा नाहीं जैसा ।
तो परम रसु (पुरुषीं) तैसा । एकवटे गा ॥ ३९१ ॥

(प्रति) बिंबोनि बिंबवरी । प्रमेची जैसी उजरी ।
ते सोहंवृत्ति अवधारी । तैसी होये ॥ ३९२ ॥

ऐसेनि मग परस्परें । ते सोहंवृत्ति जैं अवतरे ।
तैं तियेंही सगट सरे । अपसयां ॥ ३९३ ॥

जैसा सैंधवाचा रवा । सिंधु माजी पांडवा ।
विरालिया विरावा (विरवावा) । हेंही ठाके ॥ ३९४ ॥

नातरी जाळुनि तृण । वन्हिही विझे आपण ।
तैसें भेद नासुनि जाण । ज्ञान (ही) नुरे ॥ ३९५ ॥

माझें पैलपण जाये । भक्त हें ऐलपण ठाये ।
अनादि ऐक्य जें आहे । तेंचि निवडे ॥ ३९६ ॥

आतां गुणाते तो किरीटी । (जिणे या) जिणया नव्हती गोठी ।
जें येकपणांही मीठी । पडो सरली ॥ ३९७ ॥

किंबहुना ऐसी दशा । ते ब्रह्मत्व गा सुदंशा ।
हें तो पावे जो ऐसा । माते भजे ॥ ३९८ ॥

पुढती इहीं लिंगीं । भक्त तो माझा जगीं ।
हे ब्रह्मता तयालागीं । पतिव्रता ॥ ३९९ ॥

जैसे गंगेचेनि वोघें । डळमळित जळ जें निघे ।
सिंधुपद तया जोगे । आन नाहीं ॥ ४०० ॥

तैसा ज्ञानाचिया दिठी । जो माते सेवी किरीटी ।
तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं । चूडारत्न ॥ ४०१ ॥

या ब्रह्मत्वासीच पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था ।
याचि नांव चौथा । पुरुषार्थ गा ॥ ४०२ ॥

परी माझे आराधन । ब्रह्मत्वीं होय सोपान ।
येथ मी हन साधन । गमैन हो ॥ ४०३ ॥

सेवि तो–सेवी तो. जाकळूं–जाळूं=जिंकूं (३७२). परि–तरी. व्यभिचारा–अव्यभिचारा–विभिचार (विचार)–अभिचार. काय–कायसी. निरुती=व्याख्या, निश्चय (३७३). तरी पार्था परियेसा=अहो पार्था ऐका, पार्था अहो तुम्ही ऐका. किळावो=तेज. तो–की तो (३७४). आणि–तोचि (३७५). तोचि–तेचि. दळचि–दळाचि. डाळ=ढाळ=फांदी (३७६). हिंव=हिम (३७७). घेई–आतां. सोळावे–सोलावें=पूर्ण चंद्रच एक तेथें कला नाहीं ज्यास असा तो आतां कलेचा तो चंद्र करावा लागत नाहीं (३७८). कां नाटितां–कां पां आटिता (३७९). आहे–असे. नुकलिता–न उकलितां (३८०). नोहे–नव्हे (३८१). येथे–येथ (३८२). अभेद चित्तें–अभेदे चित्तें. आपणया सकट–आपणासकट (३८३). सोनयाची टिका–सोन्याची टीक. देखा–देख. आणिका–आणीक. गा–ना (३८४). तेजोनि निगाला–तेजौनि निघाला. तेजीच–तेजीचि (३८५). परिमाणु–परमाणु. कणिका–कणु. अहं–आहं=स्वव्यक्तित्व, स्वउपदेशित्व (३८६). जै–जे. ते पै भक्त–ते भक्ति पै (३८८). येचि दृष्टि नावे–इयेचि दृष्टि मानावें=ह्या दृष्टीनें मानून घ्यावें (३८९). धारा–धरा. वृत्ति प्रवर्ते=भजन, भक्त, भक्ति ह्या त्रिपुटीनें परमात्माच आहे अशी वृत्ति (३९०). कुहेसी=विहिरीला. रसु (आस्तिक्य रस)–पुरुषीं (३९१). उजरी=उत्कर्ष. होये–होय (३९२). आपसया–अपैसया (३९३). विरालिया–विरवावा–विरालेया विरावा (३९४). जाळोनि–जाळुनि. नासोनि–नाशुनि. ज्ञान नुरे–ज्ञानही नुरे–ज्ञान मुरे (ज्ञान गिळुनि, गावा गोविंद रे) (३९५). ठाये=स्थिर होतें (नाहींसें होतें?) (३९६). जिणया–जिणें या (३९७). सुदंशा=मर्मज्ञा (३९८). भक्तु–भक्त (३९९). होये–तो होय. चूडारत्न=मुकुटमणी (४०१). या–यया. पुरुषार्थ–पुरुषार्थु (४०२). आराधन=सेवा, विधान. येथे–तेथ. गमैन–गमेन=वाटेल (४०३).

*व्यभिचाररहित चित्तानें, नियमाविरुद्ध न वागण्यांत मन ठेवून नियम भंग का अयोग्य कर्मास विचार नच देऊन–भक्तियोगानें, ज्ञानसेवायोगानें, जो मला भजतो, सेवतो तो गुणांना जिंकूं शकतो–आकळूं शकतो.* (३७२)

तरी मी कोण आहें? भक्ति ती कशास म्हणतात? ती भक्ति कशी असावी? अव्यभिचाराचें रूप तें कसलें, असें हें सर्व कांहीं जें भक्तीविषयीं तेथें (स्वर–व्याख्या) निश्चय असावा लागतो–तेथें स्वर तो निश्चयाचा करावा लागतो. (३७३)

तरी हे पार्था! अहो तुम्ही ऐका कीं मी येथें ह्या भक्तीमध्यें अशा प्रकारचा आहे, कीं जसा किळावा रत्नाचा प्रकाश तो रत्नच ना? तो रत्नच कीं (प्रकाश रत्नाचा तो रत्नच होय ना?) रत्नामधील तेज जसें रत्नच तें. (३७४)

अथवा द्रवपण तेंच पाणी, अवकाशच अंबर, गोडी व साखर एकच तेथें दुसरे का कांहीं असतें? (३७५)

वन्हि तोच ज्वाल (ज्वाला)! दळपत्र तेंच कमळ कीं! त्यास कमळ म्हणावें ना! रूख झाड, तेंच खांदी का डहाळी फळ आदिकरून ना? (३७६)

अगा हिम जें कां आकर्षिलें गेलें तेंच मुळीं हिमवान् म्हटलें जसें! कां दूध मुरालें तेंच दहीं होय. (३७७)

त्याप्रमाणें, विश्व या नांवानें हें सर्व कांहीं मीच जाण. चंद्रबिंब कांहीं सोळावें करावें लागत नाहीं–पूर्ण चंद्रच एक तेथें कला नाहींत ज्यास असा, पौर्णिमेचा चंद्र तो, आतां कलाचा करावा लागत नाहीं. (३७८)

थिजलेलें–आळलेलें–घट्ट झालेलें तूप तें नच बिघडवितां तूपच होय. अथवा सोन्याचें कंकण तें जरी आटविलें नाहीं तरी सोनेंच एक कीं तें. (३७९)

वस्त्र नच उघडून दाखविण्याचें केलें, नच उकलिलें तरी तेथें स्पष्ट असा तंतूच एक; घट नच विरवितां मातीच ती म्हटली होते ना–घट विरविला नाहीं तरी मातीच ना ती? (३८०)

असें आहे म्हणून विश्वपण तें बाजूस करावें, हरवावें व मगच मजला ध्यावें कां पहावें, अंगिकारावें कां भोगावें असें नाहीं, तर अवघ्या विश्वासहित मीच जाण (३८१)

अशा तऱ्हेनें मजला जें जाणणें तीच अव्यभिचारी भक्ति म्हणावी–येथें जर का एकादा भेद, दुजेपणा पाहिला–पाहावा असें मनावर घेतलेंस तर तोच व्यभिचार जाण. (३८२)

या कारणास्तव भेदास (बुद्धिभिन्न–भाव–प्रकार बुद्धि भेदाची नच करितां ती) सांडून टाकून–अभेद अशा चित्तानें–अंतःकरणानें–मनानें आपणां स्वतःसकट मजला जाणावें (३८३)

हे पार्था! सोन्याची केलेली टिक–चमकी ती तर सोन्यासच लाभली, जीवित वालभ प्रेम तें तर प्रेमासच जीवित लाभलें असें केव्हांही म्हणून आपणा स्वतःसारखें जीवितवल्लभत्व प्रेमाचे–मान्य दुसऱ्यांना मानावें कीं. (३८४)

अहो! तेजाचेंही जें तेज त्या तेजापासून निघालेला तरी पण तो केव्हांही तेजामध्येंच कीं असलेल्या–चिकटलेल्या–लागलेल्या अशा सूर्यकिरणांप्रमाणेंच कीं भला भला असा बोध तो असावा–व्हावा कीं. (३८५)

ह्या भूतलाच्या ठायीं परमाणू महत्त्व पावून आहेत, बर्फाची कणिका हिमाचलाच्या ठायीं महत्त्व पाहून आहे, त्याप्रमाणें मजमध्यें अहं जें तें पहा–न्याहाळ. येथें अहं म्हणजेच स्वव्यक्तित्व सरूपत्व होय–स्वउपदेशित्व होय. मज बोध सूर्यामध्येंच कीं, मीच तें अहंपण माझे (तुझें) आपणा स्वतःचें रूपच व्यक्तीस आलेलें तें पाहा–तेथें अहं जाऊन बोधच एक–तूंच कीं–उरणारा होय–अहं जें म्हटलेलें तेंच तें होय. (३८६)

तरंग लहान जरी, तरी पण सिंधूहून कांहीं वेगळा, कां निराळा नाहीं, सिंधूला तो भिन्न नाहीं, सिंधूच्या ओळखीचा तो केव्हांही त्याप्रमाणें, ईश्वरी–गुणातीती–ब्रह्मत्वीं ईश्वराचे ठायीं, गुणमुक्ततेमध्यें, ब्रह्म जें त्याचे ठिकाणीं अहो नवलच एक कीं, मज ईश्वरावांचून दुसरें तिसरें कांहींही नसणारच केव्हांही ! तेथें ईश्वरत्वच एक गुणातीतत्वच तें कां ब्रह्मत्वच तें कीं ! (३८७)

अशा बा ! (बाप ! बाप ! ) समरसतेनें ऐक्यानें, उल्हासानें, आनंदानें, प्रकाशानें, जेव्हां का दृष्टि भरभरून असते–अशी जी ऐक्य भावनेची श्रद्धा मेधा–स्वधा–आनंद दृष्टि–तिचेंच नांव भक्ति (३८८)

अहो ज्ञानाचे चांगावे, ह्या सृष्टीमधील सरस्वती बीजाचें चांगुलपण, तें ती हीच आनंद दृष्टि मानावी ह्या दृष्टीनांवें दृष्टीसच चांगुलपण असें नांव दिलें–ही दृष्टि तीसच चांगुलपण म्हटलें व योग सर्वस्व का यागाचेंही सर्व सर्वस्व तेंहीपण हीच विकसित अशी ऐक्याची दृष्टि होय–( याग, यज्ञ, योग, क्रिया त्याच मुळीं जीवात्मा व परमात्मा यांच्या संयोगांत म्हटलें ). (३८९)

हे अर्जुना ! सिंधू आणि मेघ, वर्षा व धारा यांमध्यें अखंड अशी एक धारच लागली, सीमाच झाली कां जशी, तशी ती वृत्ति ते प्रवर्ते–ती वृत्ति वर्तनपर कर–ती वृत्ति वागीव–त्या वृत्तीनेंच वागणारा हो, वृत्ति, क्रिया, वागणूक, सेवा, मनःस्थिति, अवस्था ती, निर्वाह, आहार, वर्तनक्रम दृष्टींतच असते–रहाते–वागते, यत्नाची होते, व्यवहारते–वृत्ती प्रवर्ते तेथें भजन, भक्त व भक्ति ह्या त्रिपुटीनें परमात्माच आहे अशी वृत्ति वागते–व्यवहारते. (३९०)

विहिरीच्या तोंडी आकाशा सांधा नाहीं जसा, तसा तो परम आस्तिक्य रस पुरुषीच, पुरुषामध्येंच–पुरुषाचे ठायींच एकवटून असतो. (३९१)

प्रतिबिंबापासून तो बिंबापर्यंत जशी प्रभेची–शोभेची–प्रकाशाची उजरी–उत्कर्ष ती सोहं वृत्ति, ती, तशी होते हें जाण. (३९२)

अशा तऱ्हेनें मग परस्पर–प्रतिबिंब बिंब–कुहा–आकाश [ सिंधुजलधारा, अखंडधारा–ज्ञानाचे चांग यागाचें सर्वस्व हीच दृष्टि होय–तरंग लहान पण सिंधूशीं अभिन्न. तसा मी ईश्वराहून निराळा, ईश्वरी आन–दुसरा नव्हे–ऐसेनि सामरसे दृष्टि उल्हासे ती भक्ती आम्ही म्हणतों ] परस्पराच्या–एकमेकांच्या ठायीं ती सोऽहं परमात्मा तो मीच अशी वृत्ति अवतरते तेव्हां तेथें त्या वृत्तीसकट आपोआपच महत्व प्रकटतें–तेथें वृत्ति पुरते. (३९३)

हे पांडवा ! अशी वृत्ति झाली म्हणजे सैंधवाचा–मिठाचा कण सिंधूंत विरल्यावर (मग तो सिंधूंत विरवावा असें नाहींच–तो तर अगोदरच मुळीं विरालाच विराला कां विरला असल्यानें) त्याचें विरणें थांबतें. (३९४)

*अथवा असें जाण कीं तृण जाळून वह्नि आपण विझतो तसें भेदबुद्धि नाहींशी करून ज्ञानही तें उरत* नाहीं, तें मुरून असतें त्याचा परिणाम उरून राहातो (ज्ञान गिळुनि गावा गोविंद रे). (३९५)

माझ्यामधील जें पैल पैलपण तें नाहींसें होतें, व भक्तांचें जें अगदीं अलिकडचें ऐलपण तेंच तें होऊन येतें, तेथें अनादि असें जें ऐक्य आहे तेंच निवडिलें होतें, उरतें माझ्यांत व भक्तांत पैलपण व अलिकडेपण–ऐलपण दोन्हींही नष्ट होतात आणि दोघांतलें मूळचें अनादि ऐक्य तेवढें उरतें. (३९६)

हे पार्था ! तेथें आतां गुणांना जिंकण्याच्या गोष्टीच मुळीं नसतात, रहात नाहींत–असत नाहींत–उरत नाहींत. तेथें एकपणच सर्व एकपणासच मिठी पडली कीं. (३९७)

हे मर्मज्ञ अर्जुना ! बहुत काय पण अशी जी दशा तीसच ब्रम्हत्व म्हणावें, तेंच मुळीं ब्रम्हत्व होय व तें असें अव्यभिचारीपणें मजला जो भजतो त्यासच लाभतें. (३९८)

ह्या लिंगामुळें–चिन्हांमुळें तो ह्या जगीं माझा भक्त म्हटला होतो व त्याची ती ब्रम्हता तीच मुळीं पतिव्रतेप्रमाणें त्याचें तें व्रत चालविते. (३९९)

गंगेच्या ओघानें जें कांहीं जल डळमळितपणें वहात (जात) असतें–निघतें तेथें एक सिंधूपदच त्यास केंव्हांही मिळणारें होय. तेथें त्यास दुसरें काय मिळणार ? (४००)

तसें हे किरीटी ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिलें असतां जो याची सेवा करतो तोच कीं ब्रह्मतेच्या मुकुटावरीलचें चूडारत्न–शिरोरत्न–जाण. (४०१)

हे पार्था ! ह्या ब्रह्मत्वासच कीं (सायुज्यता, एकरूपता, सारखेपणा असें नांव आहे) सायुज्य का मोक्ष म्हणतात–यासच चौथा पुरुषार्थ–१ धर्म, अर्थ, काम, मोक्ष ह्या साध्यवस्तू व २ प्रयत्न–पुरुष–असें नांव आहे. (४०२)

| | |
|---|---|
| ह्या ब्रह्मतेमच ब्रह्मत्वासच मुळीं | ब्रह्मदेवत्वासच |
| ह्या समर्थ-तेसच मुळीं | मदन बाण्यासच |
| सत्तेसच | ईश्वरभाव, प्रभुत्व |
| श्रीमंततेसच | सामर्थ्य, ईश्वरत्वास, परमात्मसत्तेसच |
| श्रेष्ठत्वासच | स्तोत्रासच, मंत्रतेसच, ब्रह्मतेजास, मोक्षासच |
| स्वामीपणास | स्वरूपतेसच |
| राजतेसच | तत्वज्ञतेसच |
| पतिपणास | ब्रह्मदेवाचा लोक = ब्रह्मलोक. |

[ पुरुष = जीव, कामगार, मनुष्य, पुरुष (उंची), परमात्मा, आत्मा. विश्वाचीं घटक सातत्वें = पंच-महाभूतें, अहंकार व महतत्व. पुरुष अंग = शिस्न. पुरुषकारः = उद्योग, पौरुष, पराक्रम (सं.). पुरुषमेधः = मनुष्ययज्ञ. पुरुष शीर्षकः = पुतळा, मुखवटा. पुरुषसारः = पुरुष श्रेष्ठ, मेरु.

मधूर–मधुरिमन् = माधूर्य, गोड, गोडी गुलाबी, मोहक, प्रिय, माधुर्य. मधुदीप = मदन. मधुदूत = आम्र. मधुद्रः = भ्रमर, इरसाल आंबा, चिमणा, बदाम. मधुमय = साखर, मध व तूप. मधु = वसंत, सुखावह, जीवन्ती (व.), फुलांतील मध, जल, दूध, माधुर्य. मधुउच्छिष्ट–मधुउत्थं = मेण. मधुपर्क = वर, ऋत्विज, शिष्ट, इत्यादींचा आतिथ्य विधि आणि आतिथ्य. मधुपर्किकः = मधुपर्काच्या वेळीं स्तुति करणारा. मधुप्रिय = बळराम. मधुफल = खजूर, खरबुज, आंबा, द्राक्ष, मोहाचा माड. मधुमजन = अक्रोड. मधुमस्तक = करंजी. मधुव्रत = भ्रमर. मधुसारथी = मदन. ]

धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या साध्य वस्तु तेथें माझें आराधन आराधना–उपासना सिद्धीस जाणें तेथेंच सज्ज होणें–सर्व प्रसन्न करणें–विषयसुख, इच्छा, नैपुण्य, पालन, ऐश्वर्य, सिद्धि, समृद्धी, बीज, विशाखा (शोकनाशन–विशोकः) तें. राधेय = कर्ण. राद्ध = सर्वांगपूर्ण मिळालेलें, सिद्धीस गेलेलें. तें ब्रह्मत्वाचे ठायीं सोपान–जिना–शिडी–पायरी होतें पण येथें मी ब्रम्ह जो तें साधन आहे असें कदाचित् वाटेल बरें कां ! (४०३)

**ब्रम्हणो हि प्रतिष्ठाऽहममृतस्याव्ययस्य च ।**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥**

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोध्यायः ॥

ब्रम्हणः = ब्रम्हाची. अव्ययस्य = शाश्वत अशा अविनाशी तत्वाची. एकांतिकस्य = सर्व एकांताची जागा.

अन्वय :—अहं ब्रम्हणः हि ( प्रतिष्ठा )। अमृतस्यहि ( प्रतिष्ठा )। अव्ययस्य च ( प्रतिष्ठा )। ( तथा ) एकांतिकस्य सुखस्य च प्रतिष्ठा ॥

अर्थ :—अमृतत्वरूपीं अविनाश अशा ब्रह्माची प्रतिष्ठा, आश्रय, प्रतिमा मीच आहें. तसेंच शाश्वततेच्या अशा धर्माची व एकान्तिक अशा सुखाची, अखंड एकरस अशा आनंदाचीही, प्रतिष्ठा ( प्राणप्रतिष्ठा ) आधार मींच आहें.

तरी ज्ञणिं ऐसे । तुझ्या चित्तीं पैसे ।
पैं (पर) ब्रह्म आन नसे । मी वांचुनी ॥ ४०४ ॥

अगा ब्रह्म या नांवा । अभिप्रावो मी पाण्डवा ।
मीचि बोलिजे आघवा । शब्दीं इहीं ॥ ४०५ ॥

पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनी नव्हेती सुवर्मा ।
तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाहीं ॥ ४०६ ॥

अगा नित्य जे निष्कंप । अनावृत धर्मरूप ।
सुख जे उमप । अद्वितीये ॥ ४०७ ॥

विवेक आपले काम । सारूनि ठाकी जे धाम ।
(ते) निष्कर्माचे निस्सीम । किंबहुना मी ॥ ४०८ ॥

ऐसैसें हो अवधारा । तो अनन्याचा सोयरा ।
सांगतसे वीरा । पार्थासी पैं ॥ ४०९ ॥

येथ धृतराष्ट्र म्हणे । संजया हें तूते कोणें ।
पुसिलेंनविण बायाणे । कां बोलसी ॥ ४१० ॥

माझी अवसर ते फेडी । विजयाची सांगें गुढी ।
येरू जीवीं म्हणे सांडीं । गोठीं इया ॥ ४११ ॥

संजयो विस्मय मानसीं । आहा करूनी रसरसीं ।
म्हणे कैसें पां देवेसीं । द्वंद्व येया ॥ ४१२ ॥

तऱ्ही कृपाळु तो तुष्टो । यया विवेक हा घोटो ।
मोहाचा फिटो । महारोग ॥ ४१३ ॥

संजयो ऐसें चिंतितां । संवाद तो सांभाळितां ।
हरिखाचा येतु चित्तां । महापूर ॥ ४१४ ॥

म्हणोनि आतां येणें । उत्साहाचेनि अवतरणें ।
श्रीकृष्णाचें बोलणें । सांगिजेल ॥ ४१५ ॥

**तया अक्षरातील भावो। पाववीन मी तुमचा ठावो।**
**आईका म्हणें ज्ञानदेवो। निवृत्तीचा ॥ ४१६ ॥**

तरी ह्मणि (ह्मणे) ऐसे–कदाचित् न ऐसे. तुझिया–तुझ्या. पैसे=वाटेल. परब्रम्ह–परंब्रम्ह–ब्रम्ह.

अविद्यकं शरीरादि दृश्यं बुद्बुदवत् क्षरम्।
एतद् विलक्षणं विद्यादहंब्रम्हेति निर्मलम् ॥ ३० ॥ (आत्मबोध)

नित्य शुद्ध विमुक्तैकमखडानंदमद्वयम्।
सत्यंज्ञानमनन्तंयत्परंब्रम्हाहमेवतत् ॥ ३५ ॥ (आत्मबोध)

वांचोनि–वांचुनि (४०४). आगा–अगा. इहि–इहीं (४०५). दोनी नव्हती=एकचि ते. भेद–भेदु (४०६). अनावृत=उघडें, न झांकलेलें. उमप=अपार. अद्वैतीये–अद्वितीय (४०७). विवेकु–विवेक. सारोनि ठाकिजे–सारूनि (ठाकी)–ठाके जे (४०८). ऐसे ऐसे–ऐसैसे. अनाथाचा–अनन्याचा=एकनिष्ठ जे त्यांचा (४०९). येथे–येथ. पुसलेनवीण–पुसले–निविण (४१०). माजि अवसर ते फेडी=माझी चिंता ती (फेड) नाहींशी कर. गुढी=महत्वाचें चिन्ह. येवो जिवीं–येऊ जीवी (४११). विस्मय–विस्मयो. आह्वा करोनि रसरसी–अहा करूनि रसरसी (सरिसी)=संतापून. पाह्वा देवेसी द्वंद्व येया–पां देवेसी द्वेषु (दुजाभाव, निंदणें, आत्मस्तुति, परनिंदा) यया (४१२). तरि–तरी. विवेकु–विवेक (४१३). हारिखाचा–हरिखाचा. महापूर–महापुरू (४१४). उत्सायाचेनि–उत्साहाचेनि (४१५). ठावो=ठिकाण, अंतःकरण (४१६).

म्हणून त्वरिततेनेंच तुझ्या चित्तामध्यें असेंच एक महत्त्व येऊन असावें कीं, मीच मुळीं ब्रह्म कीं मजवांचून दुसरें तिसरें कांहीं एक ब्रह्म आहे असें नव्हे. (४०४)

हे पांडवा! ब्रह्म या नांवाखालीं प्रीतीचा उद्देश तो अभिप्राय प्रिय तो मीच–व ह्या शब्दांनीही पण मीच सर्व एक बोलावा–म्हणावा. (४०५)

हे सुवर्मा! असें पाहा कीं चंद्रमा आणि चंद्रमंडळ–मंडळ आणि चंद्रमा हीं कांहीं दोन नव्हत, त्याप्रमाणें (माझ्यांत व ब्रह्मांत) मजमध्यें व ब्रह्म जें त्यामध्यें भेद नाहीं. (४०६)

हे पार्था! नित्य ब्रह्म जें निष्कंप असें, नच हालणारें, नच कंप पावणारें असें निश्चल, अनावृत म्हणजे अनाहत–शाबुत कोरें कापड–जसें मोक्षधर्मरूप–सुख जें अपार असें, अद्वितीय असें द्वैतरहित, एकटें, अद्वितीय, तादात्म्यतेचें, ऐक्याचें (ब्रह्म व जग यांचें ऐक्य, ब्रह्म व जग यांचे ऐक्याचा आनंद–ब्रह्मानंद). (४०७)

विवेक, सारासार विचार, वैराग्य, आपलें सर्व काम सारून जें स्थान–धाम, पावतें, गांठतें तें तर अहो, परमसीमेचे निश्चित निर्णय सिद्धांत सार जाण. करा करीता प्रजेस पीडन जें, तेथें त्या पीडनामधून सुटलेलें असें निस्सीमतेचें तात्पर्य तें किंबहुना मीच कीं. (४०८)

असें बहुत प्रकारानी-तऱ्हांनीं समजविलेलें तें–अहो ऐकत आहांत ना कीं, ऐकत आहांत ना! तो अनन्याचा–अनाथांचा, एकनिष्ठ जे त्यांचा, सखा सोयरा, कुलीन भला असा तो भगवान्, त्या वीर पार्थाला सांगत आहे. (४०९)

आतां येथें धृतराष्ट्र राजानें म्हटलें, कीं हे संजया असें हें आताचें जें कांही तूं सांगत आहेस तें तुजला कोणीही पुसल्या–विचारल्याशिवायच कीं, तुझें सांगणें होत आहे, असें वायाच तें बोलणें कशास बोलत आहेस तें! (४१०)

माझी अवसर चिंता ती नाहींशी करावीस, विजयाच्या गुढीसंबंधाचें चिन्ह तें महत्त्वाचें असें तें कसें होईल तें सांग. यावर, संजयानें आपल्या जीवीच म्हणून केले कीं, संजयाने मनांतच म्हटले कीं–ह्या अशा गोष्टीं सोडून दे. ह्या विजयगुढीसंबंधीं, गोष्टींविषयीं, तर अहो! बोलूंच नये. (४११)

कारण काय, तर संजयाच्या मानसामध्यें अतिशय विस्मयच एक येऊन आहे कीं अहो ! दुजाभाव का निंदणेंच एक पुढें घेऊन असल्यानें, त्यानें तर आम्हास एक रसिकतेंत (किमयेंतच) आसक्त करून–देवांचा शिल्पी–कोण काय काय उपयोग ! अतिशय विकल्प प्रकार कारण–संतापणेंच दिलें. अहो ! दैव जें त्याजबरोबरच हा द्वेष करीत आहे. द्वंद्वच एक, दुजाभावच एक, का निंदणेंच एक असें देवासी याचें; व येथें त्याजमध्यें एक द्वंद्वच [जोडपें, जोडी, मिथुन, सुख दुःख, इत्यादि परस्पर विरुद्ध वस्तुद्वय, संशयवाद जसे] लागून राहिलें आहे. (४१२)

तरी अहो ! कृपाळ, कृपाळ ! लोक कृपाळ ! तो अहो ! प्राणच कीं आपला तो ! आतां संतुष्ट व्हावा; तृप्तीप्रत, संतोषाप्रत येऊन तृप्तीचा व्हावा, आनंद पावावा, खुष व्हावा, त्याम तर विवेक हा सारासार विचार, वाटाघाट, खल, पृथकतेचें करून नीर क्षीर जसा वरचेवर, पुन्हः पुन्हः साधावा, एकांत सांपडावा व मोह जो बेशुद्धीचा एक, मूर्च्छा आलेली ती, मतिभ्रमाचें घोटाळणें–चुकीचें आश्चर्य, दुःख त्या देहालाच आत्मा मानणें तें–देह प्रेमाचें वेड तें, अथवा फाजिल आत्मविश्वास तो, तोच मुळीं महत् तत्व जें त्याचें रूप आ–रोगतेचें झालेलें तें व्याधि दुखणें–दुखण्याचा का व्याधीचा तो महिमा, प्रताप, निरोगीपणा पाहो, तेथीलची शंका निरसो, चुकीचें आश्चर्य तेंच दुःख तेथें शंका फिटली असें होवो (४१३)

संजयानें असें चिंतितां चिंतितांच मुळीं तो अहो संवाद सांचाळला व्हावा. सांभाळतां सांभाळतांच कीं अहो, हारिख आनंदाचा एक पूरच त्याच्या चित्तास आला, चित्तास पूरच आनंदाचा येत आहे, येऊन आहे ! अहो ! (४१४)

आतां त्या हर्षाच्या पुरानेंच मुळीं त्याचें चित्त तें उत्सवाचें–अनुरागाचें झालें. उत्साहास आलें. म्हणून आतां त्या उत्साहाच्या, उल्हासाच्या प्रकरण समृद्धीच्या [आनंदाचें तेज तें सुखदायक असें तें चित्तांत] उतरण्यावरच कीं, अवतरण्यावरच कीं पायरी पायरीचें कसें तें त्याजवरच कीं भगवान् श्रीकृष्णाचें तें बोलणें तें सांगणें होईल. (४१५)

अहो ! त्या भूलोकावरील जशी कां ती स्वर्गगंगाच मुळीं त्या पृथ्वीस पावन करावें म्हणून भेटण्यास आली, पावली व ती सरस्वतीच कीं प्रगट अशी, तांबुस असें प्रेमोल्लासाचें तें, ग्रंथारंभीं देवता–आगमनार्थ स्तुतीच एक असें तें, तेथीलच्या अक्षरामधील शिव जो ब्राह्मण त्यापासून अक्षरांचें जें एक सांचपण तें जीवात्म्याचें अविनाशीपणच एक; परमात्मा शिवाचें अथवा विष्णूचे बोलणें तें, तें तर मोक्षच म्हटलें–यज्ञ तपणेंच म्हटलें–बोलणें तें वेदच म्हटलें, देहपाणीच कीं एक, आकाशच कीं एक वस्तूच कीं ती अहो ! असें जें अक्षर त्यांतील भाव, महत्व, प्रेम, प्रीति, प्रिय प्रियपण आसक्ति, निष्ठा, भावना भक्ति, धर्मगुण लीला, कल्याण, रक्षण, आत्मा, देवता, दैव, स्वभाव, इच्छा, रूपांतर, प्रभुत्व, विभूतीनें तुमचा आपला स्वतःचा ठावच सांपडला असें करीन–असें श्रीनिवृत्तीचे श्रीज्ञानदेव म्हणतात कीं तें आता ऐकण्याचें करावें. (४१६)

याप्रमाणें, श्रीज्ञानदेवांनी रचिलेल्या श्रीगीता भावार्थ दीपिकेमधील चौदावा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्री (गीता) भावार्थ दीपिकायां ज्ञानदेव विरचितायां

'गुणत्रयविभागयोगो नाम' चतुर्दशोऽध्यायः ।

शुभं भवतु । मूळ श्लोक २७, टीका ४१६, एवं ४४३ ॥

ॐ तत्सत् ।

# स्पष्टीकरण

## ‘भजन, गायन’

नाद बिंदू कळा ज्योति । स्वरूपी विलया जाति ।
श्रुति नेति नेति । म्हणति जेथे ॥ १ ॥

नाहि मज वाड । सकळ उपाधि ।
एका मंगळनिधि । कल्पूनिया ॥ २ ॥

श्रीरामी रमता मनु । निवडिता नये मनु ।
सुख सांगता शिणु । हरतु असे ॥ ३ ॥

पदा पिंडा दाटणी । रूपाची ।
निरूपा निरंजनी । विठ्ठला चरणी ज्ञानदेवो ॥ ४ ॥

अर्थः—नाद बिंदू कळा ज्योति ह्या परमात्मा स्वरूपाच्या ठिकाणीं लयाला जातात. आणि ज्या ठिकाणीं श्रुति नेति नेति म्हणून माघारी फिरतात–असा एक परम मंगळनिधि श्रीविठ्ठल आहे–त्याच्यावांचून मला कोणत्याहि उपाधीची आवड नाहीं. श्रीरामाच्या ठिकाणीं रमलों असतां शरीर किंवा मन याची निवड करतां येत नाहीं, म्हणजे दोन्हीं रामरूपच होतात. त्याचें सुख वर्णन करीत असतां सगळे शीण नाहिंसे होतात. निरूप जें निरंजन पद त्याच्या ठिकाणीं शरिराची किंवा नामरूपाची आटणीं होऊन श्रीविठ्ठलाचे चरणीं श्रीज्ञानदेव रममाण आहेत.

सकळ मंगळ निधि । श्रीविठ्ठलाचे नाम आधी ॥ १ ॥
म्हण का म्हण का रे साचे । श्रीविठ्ठलाचे नाम वाचे ॥ २ ॥
पतित पावन साचे । श्रीविठ्ठलाचे नाम वाचे ॥ ३ ॥
बाप रखुमादेवी वराचे । श्रीविठ्ठलाचे नाम वाचे ॥ ४ ॥

अर्थः—जो सर्व मंगळाचा निधी आहे व ज्याचें पतित पावन हें ब्रीद आहे अशा श्रीविठ्ठलाचें नामच प्रथम उच्चारणें कर असा उपदेश श्रीज्ञानेश्वर महाराज मुमुक्षूंना करतात.

—(ज्ञा. ग. आळंदी देवाची)

**पान—१** (१) आचार्या–आचारवान् पुरुषोवेद. (३) सर्व विसावया–“ विठोबा विसाविया विसाविया । पडो देई पाया ॥ १ ॥ बहु खेद क्षीण । झालो सोसुनिया वन ॥ २ ॥ बहुता काकुळती । आलो सोसिली फजिती ॥ ३ ॥ केली तुजसाठीं । तुका म्हणें येवढी आटी ॥ ४ ॥”. (१०) घावतुजे–घावतु जे. चार–चोरे. (११) कोणा बोध–कोणाबंध. (१३) बोले–बोला. **पान २**—(४) लपीथपी–लपिथपि. (२०) घावतुजे–घावतु जे. (२३) कोण–कोणा. (२७) शिंपल्यास–शिंपल्यांत. **पान ४**—(१) मतिपत्र–मसिपत्र. **पान ७**—(२०) मम–मज. गथोद्यन–ग्रंथोद्यम. (२२) थारावी–थोरावी. (२८) उयथिजै–उदयिजो. (३२) मोठी–समुद्रास मिळणारी मोठी. **पान ८**—(७) ग्रंथोद्यन–ग्रंथोद्यम. **पान १२**—(२६) वासंत–वसंत. **पान १५**—क्षेत्रज्ञा–क्षेत्रज्ञ. **पान १९**—(३६) क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानें जग निर्माण होतें; आणि गुणाचा संसर्ग घडल्यानें आत्मा संसारी होतो. प्रकृतीच्या तावडींत आत्मा गेल्यानें त्याला सुखदुःखें भोगावीं लागतात–एरव्हीं वस्तुतः आत्मा गुणातीत आहे. असंग अशा आत्म्याला संग कसा घडतो ? प्रकृती पुरुषाचा संबंध कोणता ? गुण किती आहेत ?

ते आत्म्याला कसे बंधक होतात ? तें आतां श्रीकृष्ण सांगणार आहेत. **पान २०**—(१४) श्लोकाचा अर्थ. **पान २१**—जायलया–जायेलया. **पान २२**—(४२) वेदांनी ज्यांचा डंका वाजविला आहे, गुंजित केला आहे, तें पर ज्ञान वस्तुतः आपलेंच आहे पण संसार स्वर्ग इत्यादींच्या नादीं आपण लागल्यामुळें आपणांस तें परकें झालें आहे–याला पर म्हणजे श्रेष्ठ म्हणण्याचें कारण काय तर ह्या एका ज्ञानापुढें इतर ज्ञानें स्वप्नवत्–मिथ्या होतात. आणि ह्या ज्ञानाचा उदय झाल्याबरोबर तीं लोपतात. (४९) ह्या ज्ञानानें आपली मूळची स्वयंसिद्ध स्थिति म्हणजे मोक्ष हातीं येतो. व मग ते ज्ञानीपुरुष विषयाकडची मनाची प्रवृत्ति मनानेंच हटवून स्थूल व सूक्ष्म देह ओलांडून विश्रांति पावतात–आणि मत्समान होतात–आमच्यांत कोणताही भेद उरत नाहीं. **पान २३**—(२१) अर्थ–ह्या ज्ञानाचे जवळजवळ आश्रित होऊन माझ्या साधर्म्याला पावलेले सिद्ध पुरुष, विविध सृष्टीच्या उत्पत्तीकालीं जन्मत नाहींत, प्रळय काळीं व्यथित होत नाहींत. (३२) पाहिले–पहिले; सृष्टीचे–सृष्टीचें. **पान २४**—(१४) वर 'सृष्टीची उत्पत्ती' हा मथळा घ्यावा. **पान २६**—(२९) निर्घातिल–निमतील. (६६) अर्थ–आतां ह्या मायेच्या संगानें अनेक जगें मी कशीं निर्माण करतों तें ऐक–माझ्या संगरूपी बीजानें प्रकृतीला भूतमात्राचें पीक येतें–म्हणून तिला 'क्षेत्र' म्हणतात. प्रकृति मायेला 'महत् ब्रह्म' असेंही म्हणतात. **पान २७**—(४) त्रिगुणसाध्य–त्रिगुणसाम्या. (५) ब्रह्मच–महत् ब्रह्मच. (१६) ओवी वर घेणें. अर्थ–हे भारता ! माझी महत् ब्रह्मरूपी योनी प्रकृति अथवा महत्तत्व, हीच सर्व भूताची योनी अथवा गर्भस्थान आहे तेथें मी चिदंश म्हणजे चेतन समुदायरूप गर्भ स्थापन करतों. त्या जड व चेतन संयोगापासून सर्व भूतांची उत्पत्ती होते. (३) ३२–वोझे–वांझे. **पान २८**—(१८) नांव सृष्टी मीचि–नजर अंथरलेली असा सृष्टी नजारा. **पान ३०**—आले निदिजे–निवांत निजे. **पान ३१**—(३१) चित्रास–चित्तास. **पान ३४**—(३३) परिणभूत–परिणमून. **पान ३५**—(८६) स्वरूप स्मरण नसलें म्हणजे हिचे खेळ चालतात. **पान ३६**—(३) होते, जीव जन्मतो. (५) बांधीन–बांधीव. **पान ३७**—अवयव=साधन, घटक, द्रव्य, व्यक्ती, शरीर, भाग, सांग, अनुमान. (२७) अर्थ—हे कौंतेया ! सर्व योनीमध्यें ज्या मूर्ती म्हणजे शरीरधारी प्राणि जन्मतात, त्या शरीरधारी प्राण्याची कां मूर्तीची योनी–भूतभेद अनेकपणानें असलेलें महत्ब्रह्म होय–जन्माचें कारण बीज तें स्थापना करणारा मी पिता जाण (४). (२८) विनट–निकट. संकल्प–संकल्प करणें त्यांस आवडतें, अहंकार हाच त्याचा विनट कां विकट असा खेळगडी आत्मज्ञान झालें कीं हें बाळ संपतें ह्या ज्ञानानेंच त्याचा शेवट होतो. "**संकल्प**–अभंग—भूती भगवद् भाव । मात्रासहित जीव । अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥ १ ॥ ऐसी गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन । सकळ गर्जतिल तेणें । अनुभवे निर्भर ॥ २ ॥ माझे तुझे हा विकार । निरसता एकंकार । न लगे कांहीं फार । विचाराचे करणें ॥ ३ ॥ तुका म्हणें दुजे । हे तो नाहीच सहजे । संकल्पाच्या काजे । आपोआप वाढले ॥ ४ ॥" **पान ३८**—(३२) आंत–आन. (३४) बंदु–बंधू. (३५) बंदु–बंधु (भाऊबंद). **पान ४०**—(३४) कमळ–विश्वबीज कलिका कमल. **पान ४१**—(२१) आन–विश्वभ्रांत. (२६) (१३६) जाणणे ते लागते=तेथें तें आपलें यथार्थ स्वरूप न कळाल्यानेंच कीं मी बद्ध आहें कीं मुक्त आहें असा प्रश्न उद्भवतो. **पान ४३**—(१०) बंध=देहबंध, शरीर बंधन, संबंध, अटक, मन लावणें, संसारपाश. बंधु=सोबती, बंधनस्थान, नातलग, भाऊ, मित्र, नियमन करणारा, भाऊबंद. (३४) पंचत्व–पंचतत्व. **पान ४६**—१० मुजे–मुझे. (२५) मोह–लोभमोह. **पान ४७**—(१०) आसुडतो–हांसुडतो. (३४) दोघ–दोष. **पान ४८**—(१८) प्रकृति–प्रवृत्ति (७) पुरुष=(योगसुत्रावरून) पुरुष हा स्वत:ला सृष्ट पदार्थांशी एकरूप मानूं लागला म्हणजे आपण शुद्ध व अनंत आहोंत ह्या वस्तुस्थितीचा त्याला विसर पडतो. पुरुष हा प्रेम करीत नसून तो स्वत:च केवळ प्रेममय आहे–प्रेम करणें ह्यांत कर्ता आणि क्रिया हीं भिन्न आहेत असा बोध होतो. पुरुषाच्या ~~ठिकाणीं असा~~ भेद संभवत नाहीं. तो स्वत:च प्रेममय आहे, प्रेमस्वरूप आहे, स्वयंप्रकाश आहे.

आपण स्वतः अनंत असून स्वतःला मर्त्य समजतो व स्वतःच्या सुखासाठीं अनेक कल्पनांत गोंधळतो. हा भ्रम आहे. ह्यालाच 'माया' म्हणतात–चालू स्थिती ही क्षणिक आहे–सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव हाच आपला सत्गुरु आहे–सर्व प्रकारें अनुभव येत असतां आपलें ईश्वरत्व न विसरण्याची खबरदारी घेतली पाहिजे. **पान ४९**—(२९) वाटिनलिया–वाढिनलिया. (३२) कुरूढी-कुरूंढी.

**पान ५२**—(१०)+मद=कैफ, धुंदी, गर्व, उत्कट कामेच्छा, इच्छा, हर्ष. मदी=मद्यपात्र. (३४) कळ्हाताही–कल्हाताहि. **पान ५३—श्लोक ११ ते १५ हे एकत्र येथें घ्यावेत व त्यांच्या ओव्या २०५ पासून २६० अखेर समजाव्यात.** (७) आकारणी (=बोलावणें, पैज, आव्हान)–अकारणीच. (१३) जैं ते–जैसे. (२०) तोचि–तेचि. (१०) ओळी नंतर मथळा तीन श्लोकांनीं त्रिगुण ते आत्म्यास कसें बांधतात ? तें ऐका. ओव्या १९८–१९९ ह्या श्लोक नवव्याच्या खालीं घेणें. **पान ५४**—(३०) मात् चौ सत्याचे सुवर्णामारखे–सत्वाचें सुवर्णामारखें पिवळें. **पान ५९**—(२१) उत्–उत (किंकर्तव्यता=मार्ग, उपाय.) **पान ६०**—(९) एकवटे=एका ब्रह्मींच एकवटतात, एका ब्रह्म प्राप्तीच्या ठायींच केंद्रीभूत होतात. (११) "एवं सत्व वाढे तें हेचि फुडे। आणि निधनही घडे तेव्हां जरी" ॥ ओव्या २१५–२२७, ह्या श्लोक पंधराखालीं घेणें. (२३) संग–सांग. **पान ६१**—(३१) खालीं मथळा घेणें तें–सत्वगुण प्राबल्याचीं लक्षणें. **पान ६४**—ओव्या २३८–२४५ व २५६ ते २६० ह्या श्लोक पंधराखालीं घेणें. (९) खालीं मथळा घेणें तें रजोगुणाचें प्राबल्य झालें म्हणजे. (१९) पवर्तना–प्रवर्तता. (३४) वसो–वसे. **पान ६५**—(२) नेयिजो–नेइजो. (८) मिळूनि-गिळूनि. (२६) नेमिजो–नेइजो. **पान ६६**—(५) उद्योग–ते उद्योग. **पान ६७**—(१३) अप्रवृत्तिः–अप्रवृत्तिः। च। (१७) मथळा तमोगुणाचें प्राबल्य झालें म्हणजे. (१८) १) श्रोत्रबळें मनासंबंधी. २) वेदपारंगतता बळानें. (२२) अंतर=अंतःकरण. (२५) आठवे–आठव. (३०) पाहि आणिक येकहि–पैं आणीकही येक. (३२) भलतेये–भलत ये. **पान ६८**—(२५८) **पा. भे.** पैं होऊनि दीपकळिका। येर आगी विझो कां। का जेथ लागे तेथ असका। तोचि (तमचि) होय ॥ (११) सकल्पाते–संकल्पाते. (१२) देह–देहे. (२९) लागले–लागे. **पान ६९**—(७) आठवणच–आठवच. **पान ७०**—(१०) आहतीने–आईतीनें. (२२) लागले–लागे का लागली. (२८) प्रवृद्ध–प्रवृद्ध. **पान ७१**—(४) येथें ओव्या २१५–२२७ घ्याव्यात व ह्या ओव्या २६१–२६२ श्लोक १६ च्या खालीं घ्याव्यात. (१६) सत्वच मुळीं ह्या ज्ञानास हेतू जाण=पुण्यकर्म. (३५) प्रमादमोहो हें द्विवचन का द्वंद्व समासाचें जसें श्लोक ९×१७ सुखज्ञान, कर्मलोभ, प्रमादमोह–भाजीभाकरी, द्वंद्व समासच जसा. **पान ७२—१** येथें +ओव्या २३८ ते २४५ व २५६ ते २६० घेणें=२३८–२४५, २५६–२६०, २६३–२६५. **पान ७३**—ह्या १६ व्या श्लोकाखालीं ओव्या २६१–२६२ घेणें व ह्या २६६-२६९ ओव्या श्लोक १७ खालीं घेणें म्हणजे २६६ ते २७१ ह्या श्लोक १७च्या ओव्या होतील. **पान ७४**—रज तम हे शर्तीनें पतन करणारे व सत्वावांचून ते ज्ञानाकडे नच येणारे असे आहेत (२७०). **पान ७५**—(१) अगुण=दोष अथवा निरूपयोगी वृत्तीचे. (७) राये–राय. (१०) एकचि–येकेचि=ताटानेंच एका. चतुर्व्यूह=वासुदेव, आत्मा। संकर्षण, जीव। प्रद्युम्न, मन। अनिरुद्ध, अहंकार। **पान ७६**—(१७) मथळा–गुणातीतता–स्वरूपता–गुण हे देहाच्या निमित्तानें देहाचें रूप धारण करतात आणि बंधास कारण होतात. पण यामुळें कांहीं आत्म्याच्या गुणातीतत्वाला कमीपणा येत नाहीं. येथें चौदाव्या श्लोकाचा अभिप्राय दाखवून हें प्रकरण संपविलें आहे. (२१) मध्यौर्ध्वे–मध्योर्ध्व. (२७) आगि–अग्नि. (२८) अवगे–आवेगे. (३०) गोढीजेवी–गोढी जेवी.

श्लोक ९ पासून श्लोक १७ अखेर यथार्थ मांडणी खालीलप्रमाणें आहे:—

श्लोक ९–ओव्या १९५–१९९
श्लोक १०–ओव्या २००–२०४
श्लोक ११ ते १५–ओव्या २०५–२६०
श्लोक १६–ओव्या २६१–२६२
श्लोक १७–ओव्या २६३–२७१

विवृद्ध, विकार, परिणाम, आरंभ, विवृद्ध=वाढ, विकास, वाढविणारा, कांपणें. प्रवृद्धे विलयं गति ('प्रवृद्ध'=वृद्धिंगत, जोराचा, प्रौढ, पसरलेला, फुगलेला. गर्विष्ठ–वाढ, पोषण, उत्कर्ष, गौरव, आनंद, जयजयकार, अभिनंदन, समृद्धता. **पान ७७**—(१) माघुते–माघुत. (२) खोये–खोमे. (३) मागुती–मागुंती (मुगुती); (१४) ने दिजेचि–नेदिजेचि; अकर्ता भेदनिवृत्त, तादात्म्यतेचा; (३०) आर्थ–अर्थ. **पान ७८**— कहाणी–वाहाणी–बोलणी का बोलणें. **पान ७९**—(१८) तेज–ओज. गुण–काव्यगुण. **पान ८०**—(३०) अतीत्य=मागें टाकून. (३२) उत्पत्तीला कारणीभूत–उत्पत्ति बरोबरच हेतूचें झालें. अमृत=देव, अमरत्व, धन्वंतरी, अमर, सूर्य, प्रजापति विष्णू, शंकर, अमरनाडी, स्वर्ग, सोमरस, चार ही संख्या, तेज, मोक्षसाधन, तत्त्वज्ञान. **पान ८१**—(३) देहामधील वृत्तीसमूहापासून दृष्टोत्पत्तीस आलेल्या तीन गुणांचें–देहाबरोबरच उत्पत्ती हेतूचे झालेले जे तीन गुण त्यांचें. (४) अमृतत्त्वाला=अमरत्वाला, तत्वज्ञानाला, देवपणाला (६). (३०१)=आतां त्रिगुण म्हणून जें आहे तें ह्याहीवर आणीक एक (दुसरें) आहे, कारण ह्या ज्ञानानेंच मुळीं तें निर्गुण आपल्या निवासस्थानाचें का ज्ञानाच्या आपल्या ठावठिकाणाचें केलें आहे. (१०) शाके–शाखे. (१३) चेहला–चेईला. (१४) हातौनि–हातोनि. (२०) तेवि–तेंचि. (२१)–देहसम्भूत=देहाबरोबरच उत्पत्ती का जन्महेतूचे झालेले जे गुण. ये–ह्या. (२६) आपुलालिया–आपुलालिये. (२८) नेट्टोनि गेला=जोर करून आहे. (२९) काई–काय. (३०) सांडुनि–अगा सांडुनि. (३३) नयेचि–न येचि. **पान ८२**—(२) किंधर्म=कोण, काय उपयोग ? कोणी एक किंवा कांहीतरी, विकल्प, प्रश्न [श्लोक ११ विवृद्धंसत्वमित्युत–उत–किम् उ, किम् उत=संशय, विशेषच, कसले, विकल्प (किम् कर्तव्यता=मार्ग उपाय)] (३) साहीगुण–षड्‌र्मी–क्षुधा, तृषा, जरा, मृत्यु, शोक व मोह हे जीवाचे ६ धर्म (उर्मि= जीवधर्म, लाट, प्रवाह, प्रकाश, वेग, ओळ, संकल्प, पीडा, समुदाय, परिणाम, वस्त्राची निरी, चुणी इत्यादि). अवस्थाषट्क=वस्तूंची उत्पत्ती, अस्तित्व, वृद्धि, बदल, क्षय व नाश. गुण=मनुष्य, पदार्थ इत्यादींचे मूळधर्म. गुण=रूपादि पंच विषयासहित विषय. महदाकाश–आकाश=प्रकाश, शून्य (ग.) (महत् आत्मन्=(सां.) बुद्धि, परमात्मा, बलिष्ठ, थोर मनाचा, श्रेष्ठ, बुद्धीचें सर्वगत्व. (१८) देहास योग्य=देहासहित, उत्सुक, अतिशय; तें त्रिगुणातीत ब्रह्म जसें कां व्हावें बोटानें दाखविलें आहे. (२९) अभंग—

"कसें बोटानें दाखवूं तुला । पाहे अनुभव गुरूच्या मुला ।
नको सोडूं देठिच्या मुळा । सोड अंजुळी आपुल्या कुळा रे ॥ १ ॥
ज्या ठायी चळ ना ढळ । विश्व जयाचे सत्तेने खेळ ।
अणु रेणु व्यापक सकळ । तेथें चळ ना अचळ रे ॥ २ ॥
जेथे डोळिया दृष्टि पुरेना । तेथें वृत्तीचे कांहीं चालेना ।
तेथे बुद्धीचा रीघ होईना । तेथे मनाची धांव पुरेना ॥ ३ ॥
काय पाहासी तूं भोंवते । येता जाता जवळी असते ।
तुझ्या पायाखाली तुडवते । तुझ्या डोळ्यामध्यें दिसते गा ॥ ४ ॥
ही खूण त्या ओळखुनि घ्यावी । गुरूपुत्रा जाऊनी पुसावी ।
तो नेउनि तुला दाखवी । सोय सांगितली ज्ञानदेवी गा ॥ ५ ॥

**अर्थः**—"ज्ञानदेव चांगदेवास उखाणें घातल्याप्रमाणें प्रश्न विचारतात." हे शिष्य ! तुला परमात्मा बोटानें कसा दाखवावा ? तो अनुभवानेंच कळणारा आहे. मूळ अधिष्ठान न सोडतां आपल्या कुळावर तिळांजळी दे. कारण देहात्म बुद्धीमुळें कुळाचा अभिमान वाटतो. तें परब्रह्म असें कीं त्याच्या सत्तेवर हें जगत् असतें. तें हालण्या चालण्याची क्रिया करीत नाहीं. म्हणजेच तें अक्रिय आहे. तें डोळ्याने अगर मनोवृत्तीनेंही दिसत नाहीं. त्याच्याबद्दल बुद्धीनें कोणत्याहि प्रकारचा निश्चय करतां येत नाहीं. बरें तूं आपल्या भोंवतालीं पाहूं जाशील तर तें तुझ्या पायाखालींही तुडविलें जातें आणि तुझ्या डोळ्यांतही असलेलें दिसतें-ज्ञानेश्वर महाराज म्हणतात वरील गोष्टी ह्या लक्षांत घेऊन गुरूला शरण गेलास म्हणजे ते तुला आत्मस्वरूपाची ओळख करून देतील.

**पान ८३**—दिव्याचें जें भिंगाचें घर त्यानें दीप प्रकाश केव्हांही फांकणाराच कां पसरणाराच तो कांहीं दिव्यानें का दीपानें आवरला जात नाहीं. तेथें दीपाचें त्या प्रकाशणें तें प्रकाशा प्रकाशावरच प्रकाशाचें होणारें अथवा असेंही म्हणूं कीं, सागरांत जन्मलेला वडवानल जो सागराचें गंभीरपण का अफाटपण तें कांहीं सागरानें विझविलें जाणारें नव्हेच ! तो वडवानल तर केव्हांही सागराचें गंभीरपणच वाढतें करणारा असें भिंगाचें घर देह–(कांचेसारखी ही काया व माती ती तर माया होय) तेथें प्रकाशरूपी वात हाच गुण तो दिव्यानें, जीवात्म्यानें का देहरूपी दिव्यानें आवरिला का आडविला जाईल असें नाहीं. अहो ! अगोदर भिंगरूपी आकाश दिसतें व मग आंतील वस्तू नजरेस पडतात–अखंड अशा ब्रह्मावर जग हें आकाशासह पाहिलें होतें–ब्रह्म हेंच मुळीं आधारभूत तें आकळल्याशिवाय नामरूपात्मक सर्व कांहीं–बुद्धि, मति पुढें होतच नाहीं. म्हणून मनुष्यानें जग हें पाहात असतांना आपली बुद्धी नामरूपात्मक होऊं न द्यावी तरच बरें व मगच द्वैत भावाची ती गोष्ट नाहीशी होते. सुखच एक केवळ सदैव उरतें–सच्चिदानंदाचा आनंदच कीं हा–(येथें आत्मा का शिष्याशिवायच ज्यास हें आकळतें त्यास तो, उपदेशरूपच जाणवा–त्यास उपदेशाची जरूरी नाहींच). (२२) गुण–वात (तेल स्नेह दिवा प्रकाशत) तेवत असणारा. (२५) गुण विकाराचे=गुण (वात स्नेह प्रकाश) विकासाचे. **पान ८४**—(१) खोली–खोळ. (१२) पण आत्मस्वरूपी ऐक्य का ब्रह्म; देहाने-देहाचा. (१५) तो–तो ब्रह्मनिष्ठ, (१४) देहाचा धर्म–बाल, तरुण, वृद्ध (जरा) इत्यादि. (२५) घटाकाश–घटाकाश घट. (२६) आहे–आपोआपच कीं आतां तेथिचें झालेंच आहे. **पान ८५**—(१) अर्जुन उवाच–(१२) तीन–निर्गुण झालेला तीन. (२९) तो–तो गुणातीत. **पान ८६**—(१) श्रीभगवान् उवाच $\frac{३}{२}\frac{२}{०}$. (३२८) मथळा–गुणाधीन व गुणातीत यांचीं लक्षणें किंवा त्या मधील फरक, $\frac{३}{३}\frac{२}{३}$. कायी–काय, देह, प्रकाश, $\frac{३}{३}\frac{२}{४}$. सांजा–साजा. (१५) गुणायया–गुणा यया. ऐसेनिये–ऐसा न ये. **पान ८७**—(२१) श्रीभगवान् म्हणाले—

'**कर्म**'—कल्पद्रुमातळी ब्रह्म पुंजाळले कैसे दिसते सुनीळ तेज गे मन पाहाता, वेणू वेद ध्वनि नाद उमटताति सहज गे बाईये ॥ १ ॥ आनंदे गोपाळ गोधने राखली तळी यमुनेच्या पाबळी कर्म-काठी करी घेऊनिया वळ त्या देतसे पाचांच्या मेळी गे बाईये ॥ धृ ॥ ऐसा जिकडे तिकडे उभारोनि बाहो हाणतो थोरेनि कोणे तयाच्यिया कर्मा होतसे निवृत्ती काय पुरवील एवढे तप गे बाईये ॥ २ ॥ गोवळेपणाचेनि वेषे अमरी सेविजे, ऐसे बोलताति सवंगडे, येरू नियेराच्यिया उच्छिष्टा झोंबती नेणो तया काय जोडे गे बाईये ॥ ३ ॥ मुनिजना स्तविता संतोष न पवे तो हुमली घेता हासे ब्रह्मादिका । बोलाची अक्षरे कोण जाणे प्रेम कैसे गे बाईये ॥ ४ ॥ ऐसा साही दर्शना वर्णिता पवाडु नाहीं आणि गोवळेपणे वेष नवल सांगु मी काई । बाप रखुमादेवीवर विठ्ठल सेविलिया वांचूनि नेणवे केलिया काहि गे बाईये ॥ ५ ॥

*अर्थ* :—कल्पवृक्षाच्या दाट छायेखालीं तें परब्रह्म श्रीकृष्णाचें रूप कसें तेजःपुंज दिसत आहे पाहा ! त्या श्रीकृष्ण परमात्म्याच्या मुखावर सुंदर नीळ वर्णाची शोभा दिसत आहे पाहा. त्याच्या वेणूंतून जो

नाद निघत आहे त्यांत स्पष्ट वेदवाक्याचे ध्वनि सहज निघत आहेत गे बाईये. त्या थंडगार जळ असणाऱ्या यमुनेच्या तीरावर तो भगवान् गोपालकृष्ण गाई राखीत आहे पाहा. (गाई ह्याच कोणी जीव अशी कल्पना करून) तो श्रीकृष्ण गाईचें शुभाशुभ कर्म हीच कोणी एक काठी हातांत घेऊन त्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणें सुखदुःख भोगण्याकरितां त्यांना पंचमहाभूतांच्या स्वाधीन करतो. ह्याप्रमाणें सर्वत्र व्याप्त ज्याचें स्वरूप असा भगवान् श्रीकृष्ण आपले बाहू उभारून मोठ्या रागानें (त्या जीवाच्या दुष्टकर्मामुळें) त्या गाईंना हाणीत आहे–पण मौज ही आहे कीं त्याच्या काठीच्या स्पर्शानें त्या गाईच्या म्हणजे लक्ष्यार्थानें जीवाच्या सर्व कर्माची निवृत्ति होऊन जाते, केवढें हें त्या गाईचे किंवा जीवाचें म्हणा–पूर्व जन्मीचें तप आहे हो! भगवंताचा प्रसाद मिळण्याकरितां इंद्रादिदेव गोपाळाचें सोंग घेऊन खऱ्या गोपाळाच्या उच्छिष्टाकरितां त्यांच्याशीं भांडत असल्याचें गोपाळ भगवंताजवळ सांगत आहेत. पण असें सोंग घेण्यानें त्या इंद्रादिदेवांना भगवंताचा प्रसाद मिळणें शक्य आहे काय? अर्थात् नाहीं. मोठमोठ्या मुनींनी भगवंताचें संस्कृत वाणीनें स्तवन केलें तरी तें देवास आवडत नाहीं. तोच भगवान् आपल्या बरोबरीच्या सोबत्यांनी आपल्याबरोबर हुंबरी तुंबरी केली तर मोठ्या आवडीनें हांसतो. ब्रह्मदेवादिकांनीं त्या भगवंताचीं नुमतीं स्तुतिस्तोत्रें गायन करावींत पण त्यांना साक्षात् भगवद्दर्शन नाहीं. त्या गवळ्यांच्या पोरांबरोबर काय त्याचें प्रेम आहे म्हणून सांगावें! अशा श्रीकृष्णाचें वर्णन साही शास्त्रांना करतां येत नाहीं. त्या श्रीकृष्णानी गवळ्याचा वेष घ्यावा हें किती नवल आहे म्हणून सांगावें! रखुमादेवीवर बाप श्रीविठ्ठल ह्याची सेवा केल्याशिवाय वाटेल तें केलें तरी तो श्रीकृष्ण जाणला जाणत नाही गे बाईये. —(ज्ञा. गा. देवाची आळंदी).

**पान ८८**—(१) माजाने गुणातीत पुरुष आत्मप्रवृत्तीनें वेढला जाऊन कर्मे करतो–. (२) जेव्हां कां (आवरून–वेटाळून–अंगी वेढून घेणें होतें) वेढलें होतें. (३) मोठा कर्मठ असा–कर्माच कर्ता असा. (४) उगवणारा–उगवला. (५) विप्र)–त्यास स्पर्श करीत नाहीं तो तर. (९) नाहीं) अथवा कर्म निष्फळ झाल्याबद्दल त्याला खेद वाटत नाहीं. (१३) नाहीं. सत्वगुण प्रबळ होऊन सर्व इंद्रियांत ज्ञान फांकतें तेव्हां ज्ञानगर्वानें तो फुगत नाहीं. (१६) नाहीच. तमोगुण अधिक झाल्यास तो मोहाला बळी पडत नाहीं. **पान ९०**—(८) मथळा गुणानीताची लक्षणें–पुढें चालू. (९) एकैके–एकेके (२१) गा–तो (२४) सत्कर्में–सत्वधर्म; रजे–रज. **पान ९१**—(२३) तेथें गुण एक एके, गुणास गुणाचा, एक एकाच्या एकेका ताटातुटीचें विभक्तपणाचें वेगळेपणाचें होत नाहीं, गुणकार्य आपणच आहों हें तो जाणत असल्यानें एक एका गुणानें चित्त विचलित होत नाहीं. (२९) आला म्हणून ह्या देहरूपी धर्मशाळेंत वस्ती करून आहे. (३२) नव्हे. उदासीन असतो–उदासीन आहे. **पान ९२**—(१२) म्हणून तटस्थ प्रेक्षकच एक जसा. **पान ९४**—(१९) असतो त्यास ह्या विश्वांत एका आत्मतत्वावांचून दुसरें कांहींही नाहीं. (३५) सुख–आत्मपणाचें का तें ब्रह्म मी असें; दुःख=तरी कधीं देहच मी असें दुःख. **पान ९५**—(४) असते–पंचदशीच्या तृप्ती दीपामधील अहंकाराचे तीन प्रकार—१ तादात्म्य मुख्य. २ गौण–कधीं मी ब्रह्म तर कधीं मी देह, अज्ञान काळीं देह व आत्मा मिळून मुख्य एक तो तादात्म्य; ज्ञानकाळीं कधीं मी ब्रह्म तर कधीं मी देह असे दोन. **पान ९६**—(२९) लिपिजेना–लिपिजेचिना. (२८) (नेणें रातीं पाहालें तेज जैंवीं)=सूर्यतेज रात्र का दिवस पाहात नाहीं. **पान ९७**—(१) भावोचि=देहभाव भार. (२) ते सेविजेका=भोगावें असेंच सहजतेनें प्राप्त होतें. मापच एक भोगावें महजपणें प्राप्त झालेलें तें असेंच होय. (६) जयाचा–जयातें. (७) अतिक्रम–उल्लंघन, अनादर. (२४) वैराग्नीच–वैरागर, वैराग्याग्नि. **पान ९८**—(१७) मथळा 'अव्यभिचारी भक्ति म्हणजे काय?' (३७५) हें सगळें विश्व म्हणजे मींच अशा रीतीनें माझें ज्ञान होतें–म्हणजेच माझी अव्यभिचारी भक्ति होय. (२८) हिंव जें आकर्षिलें=हिम=चंद्र, कापूर, हेमंतऋतु=चित्त वेधलें, कसोटीस लाविले, आकर्षिलें. **पान ९९**—(३८२) या विश्वांत व माझ्यांत कांहीं भेदभाव पाहिला कीं तो

झाला व्यभिचार, पण सर्व भेद सोडून एकाग्र मनानें स्वतः आपणांस माझ्या वेगळें न समजतां मला जाण. (३८४) सुवर्णाची स्थिति दशा ( मोट, निवास, ठिकाण ) ते–सुवर्णास लागली पहा तसे आणीक ते म्हणजे सर्वत्रच आहेत असें मानावें. (११) लागला–संचारला. (१३) हिमकणुका–हिमकणु कां. (१४) मजमाजीं न्याहाळीं अहं तैसें–ईश्वरी मी आन नोहेचि पा–माझ्यामध्यें तूं आहेसच ! समुद्राची लाट कितीही लहान असली तरी ती समुद्राहून भिन्न नाहीं. तसा मी ईश्वराहून निराळा नाहीं असें समज. (१६) ईश्वरू–ईश्वरी. (१७) समरसें उल्हासे दृष्टी ते भक्ति आम्हि म्हणों–अशी जी दिव्य भावनेची आनंदित दृष्टि तिचेंच नांव भक्ति–ज्ञानाचे चागावे दृष्टि नावें मानावें योगाचेही आघवें सर्वस्व हें = ज्ञानाचा चांगुलपणा व योगाचें सर्वस्व म्हणजे हीच ऐक्याची विकासित दृष्टि होय. (२१) मेघापासून समुद्रापर्यंत जसी अखंड जलधारा असावी त्या प्रमाणें त्या पुरुषाची वृत्ति असते. **पान १००**—मग गुणांना जिंकण्याची गोष्टच रहात नाहीं–ही स्थिति म्हणजेच ब्रह्मत्व. (११) या ब्रह्मत्वाला सायुज्य अथवा मोक्ष म्हणतात. (१३) माझी सेवा ब्रह्मत्वाचें साधन होते. म्हणून मलाहि ब्रह्मत्वाचें साधन समजशील तर तसें नाहीं. मी आणि ब्रह्मत्व भिन्न नाहीं.

**पान १०१**—(१९) जर का माझ्यांत व विश्वांत. (२९) मजमध्यें अहं पहा–माझ्यामध्यें तूं आहेसच. २२, २७, ३२, वृत्ति, सोहं वृत्ति ज्ञानहि–जेथून वृत्ति उत्पन्न होते तें ब्रह्म, ज्याचे ठाईं ती वृत्ति असते तें ब्रह्म, आणि स्वतः वृत्तीहि ब्रह्मच! अशी ती वृत्ति एकदां बनली कीं मग मिठाचा खडा समुद्रांत विरला म्हणजे–जसें त्याचें विरणें थांबतें त्याप्रमाणें ज्ञानामध्यें भेदबुद्धि नष्ट झाली म्हणजे तें ज्ञानही नष्ट होतें–म्हणजे मुरून असतें–तें ज्ञान केवलरूप होऊन असतें. **पान १०२**—(२६) थांबते–तेथें वृत्ति मुरते, मुरून असते, केवळ ज्ञान अशी होते. **पान १०३**—(४) चिन्हालिंग–पदार्थमात्रांस नांव आहे तेंच लिंग म्हटलें. **पान १०५**—आत्मबोध श्लोक ३० चा अर्थ—केव्हांहि शरीर आदि करूनही क्षर पुरुषभाव–पदार्थ दृश्यें जीं तीं अवियक्त, अन्यत्व, अशीं क्षणिक बुडबुड्यासारखीं–क्षर म्हणजे नाशिवंत अशीं होत–पण याहून निराळें का विलक्षण जें तें निर्मळ आहे, ब्रह्म मीं आहें असें जाण. (३५) नित्य शुद्ध विमुक्त युक्तसहीत एकच एक आवड अखंडरूप अद्वय सत्य ज्ञानम् अनंतम् जें परम श्रेष्ठ असें ब्रह्म तें मींच आहें. ओवी ६८ शाळिका =

स्वर्ग जयाची साळोंखा। समुद्रपाणी पिंड देखा ॥
शेषासारिखी बैसका। जो आधार तिहीं लोका ॥ १ ॥
लिंग देखिलें देखिलें। त्रिभुवनीं विस्तारलें ॥ २ ॥
मेघधारीं तपन केलें। तारापुष्पीं वरी पूजिलें ॥
चंद्रफळ ज्या वाहिलें। ओवाळिलें रविदीपें ॥ ३ ॥
आत्मनैवेद्य समर्पिलें। ब्रह्मानंदीं मग वंदिलें ॥
ज्योर्तिलिंग मग ध्याइलें। ज्ञानेदेवीं हृदयीं ॥ ४ ॥

अर्थः—स्वर्ग हा त्या परमात्मरूप शिवाची साळुंका आहे; समुद्राच्या भोंवतालची जागा ही त्या साळुंकेला आधार आहे; शेषासारखी शिवलिंगाला बसावयाची जागा आहे, आणि असा हा परमात्मा शंकर त्या त्रैलोक्यास आधार आहे. अशा प्रकारचें त्रैलोक्यांत व्याप्त असलेलें परमात्मा शंकराचें लिंग, ज्ञानेश्वर म्हणतात मीं पाहिलें. सूर्यानें मेघधारांच्या योगानें त्याला अभिषेक केला, आकाशांतील तारांगणांच्या फुलांनीं त्याची पूजा केली, चंद्र हें फळ वाहिलें आणि सूर्यरूपी दिव्यानें त्याची आरती केली, आत्मस्वरूपाचा नैवेद्य दाखवून ब्रह्मानंदानें वंदन केलें आणि मग ज्ञानेश्वरानें त्या ज्योतिर्लिंगाचें हृदयांत ध्यान केलें, म्हणजे अभेद निश्चय केला.

**पान १०६**—( १४ ) सांचोळला–सांभाळला.

**पान ३९**—१ एवं आत्मा श्लोक ४२ (आ. बो.) अर्थः—आत्मा व जीवात्मा-अरणौ ध्यान मंथने-हे दोन्हीं घर्षणानें तेथें सत् बुद्धिरूप मंथन दंड योजून निजध्यासरूपी दोर ओढतां क्षणींच शुद्ध ज्ञानाग्नी प्रगटतो–तेथें मूळ अज्ञान पळून जातें. व मग संशय विपर्यासरूपी धूम सांडून प्रज्वलित ज्ञानाग्नि विलसतो त्या ज्ञानाग्नीची अत्यंत ज्वाला तेव्हां उपशम पावते. मग सहज सामान्य सोज्वळ प्रकाश ज्ञप्तिरूप असतो.

**पान ४०—'सच्चिदात्मनि'**—जो नित्य विष्णु तोच जगदाकार कंद होय-त्यानेंच स्थावरजंगम तसेंच विविध व्यक्ति आपणच झाल्यानें सर्व कांहीं व्यापिलें आहे–मानव, देव, यक्ष, किन्नर, भूत, पिशाच्च, विद्याधर, तिर्यक् योनिवृक्ष, गिरी इत्यादि सर्वाठायीं आत्माच अनस्यूत विणलेला असा; माती घटास अनस्युत का मिश्रीत का विणलेला असा तंतू तो पटास म्हटला, सर्व अलंकारास सुवर्ण जसें मिश्रित–तसा आत्मा व्यक्तिमात्रामध्यें आदि, मध्य, अवसानीं वर्ततो पण अज्ञानानें त्या जन्मास (एक आत्माच सर्व विविध असें भाविलें होत आहे) ईश्वरानें मायावशेंकरून जग कल्पिलें तें जीवानें अविद्यावशेंकरून सत्य मानलें असें उभयांनीं (ईश्वर व जीव) मिळून कल्पिलेलें हें सर्व जग मातीच्या ठायीं कुंभारानें कल्पिलेला घट तो, तो मिऱ्हाईकानें सत्य मानून मोल देऊन विकत घेतला.

आत्मा अरणौ अर्थ—(२) याप्रमाणें आत्मारूप अरणी वेदिका घर्षणानें–अग्नि मंथन करण्याचें लाकूडच एक जसें ह्या आत्मारूप अरणीवर ध्यानानें सतत मंथन केलें असतां ज्ञानज्वाला ही उदित होते व ती सर्व अज्ञानरूप इंधनास भस्म करते.

**पान ४०**—३ उपाधिरहित आकाश । सर्वगत अविनाश विष्णू ज्ञानेंद्रियाचा ईश हृषीकेश–(९) १ ज्याप्रमाणें अनेकविध उपाधिप्रत आलेलें आकाश–चिदाकाश हें ज्ञानेंद्रिय स्वामी, हृषीकेशका विभु असें झालें तेथें उपाधिभेदामुळें भिन्न असेंच दिसतें–पण तो भेद नाहींसा झाला म्हणजे तर केवळ स्वरूपच एक उरून असतें. २ उपधिरहित आकाश—

**पान ९१**—श्लोक १७ प्रकृति प्रकृतिमंततेची झालेली, काय देह, इंद्रिय, मन व बुद्धि हीं सर्व अद्भूतपणच घेऊन असल्यानें तेथें चकीत होऊन जाऊं नये: तर वृत्तिसाक्षी जो आत्मा, जो साक्षित्वें असणारा, त्या त्या वृत्तीसच मुळीं प्रकाशित करणारा, विराजमान करणारा, तेथें आत्म्याच्या सत्तेनं बुद्धि इंद्रियें आपआपल्या विषयीं प्रवर्ततात, त्यासच जाणून घेऊन तेंच होऊन असावें. वृत्तीच्या प्रकाशाचें नेहमीं होऊन असावें. श्लोक १८ कामकाज धंद्यामधें गुंतलेल्या इंद्रियांमुळें आत्मा हा धंद्याचा का कामकाज व्यापाराचा नेहमीं दिसतो. तसेंच तो समंजस, विचारी, किंवा न्यायाधीश असा दिसत असलेला, तो अभ्रामुळें चंद्र जसा धांवता आहे, तसा दिसतो. श्लोक १९ काय मन, काय देह, काय इंद्रिय किंवा काय बुद्धि, ही सर्व आपुलकीच्या, स्वतःच्या मालकीच्या, विषयाच्या हेतूवर, आत्मा नित्यज्ञानस्वरूप, चैतन्याचा आश्रय घेऊन वर्तत असतात—जसें सूर्य प्रकाशानें जन हे वर्तत व्यवहारत असलेले दिसतात.

**पान ११०**—१६ (त्रिगुण) निर्गुण. **पान १११**—१९ (आरसा का शिष्याच)–आरशाशिवायच. २९ (राखली) राखति. ३१ (कोणे) कोपे. **पान ११२**—१६ (जाणत) जाणारा. २३ (गुणाचा) गुणाना.

# स्पष्टीकरण

## ‘ अनुक्रम ’

**पान ५**—(२५) लाघवीपाद–लाघविया. (२०) सुखरूपणास–सुखरूपपणास. **पान ७**—(२७) भवस्वर्गादि–भवस्वर्गाच्या. (५) भिक्षा = खंडोबाचे माले = गळयांत नांगर घालून गुरुगृहीं मागितलेली भिक्षा. **पान ९**—(१३) स्वप्नीही–स्वप्नहि. (१५) अशी–जशी. **पान ११**—(१) व–व त्यामध्यें. **पान १२**—(१०) त्यामुळेंच–देखणेपणामुळेंच. (१७) बंध = रचना. बांधून टाकला = आवळून घेतला. (२४) ते–आवडलेपणानें बंधनच एक तें. **पान १३**—(५) साधनानें–द्वयानें. (२०) अथवा–कीं अथवा. **पान १४**—(३३) जाणणाऱ्यास–मानणाऱ्यास. **पान १६**—(३) असे–असा. **पान १७**—(१) माजविती–माजवितो. (१९) स्थितीत–स्थितीत समाजी. (२०) समाज–......... (२३) व्यापाऱ्याच्या –व्यापाराच्या. (३१) मुळी–मुळी कसची ? (३२) माणसाचे–तमोगुणयुक्त माणसाचे. (३३) माप–उपमान, मान. **पान १८**—(१) मूर्खपणाच–मूर्खपणा. (९) दारूने–दारू. (१०) दिसतो–खुलतो, झुलतो. **पान २०**—(२९) बंधास–आवडलेपणाने बंधास. (३१) रिणत–परिणत. (३२) बंधनाला–आवडलेपणानें बंधनाला. (३५) उजी–उणी. **पान २१**—(१०) (आहे) आहो. (१३) (तेथीलचें आहे)–तें तेथीलचें आहेपण. (१७) (त्याप्रमाणें) वगळणें. (२७) उन्नति = अर्थरूपी पुरुषाच्या. (२८) पावतो. कारण काय तर इतका वेळ जो घोर निद्रेत होता तो आतां आत्मज्ञानानें स्वरूपीं जागा झालेला असतो. (३१) अशा तऱ्हेची–निर्गुण, वेगळे आगळेपणावरच कीं अशा तऱ्हेची. (३२) शुकाच्या–शुकनलिका न्याय विसर्जन. (३३) (३०० ओवींतील वाक्य). **पान २२**—(२) माझ्या भावावर–आत्मस्वरूपावर. (४) घनजात हे सर्व आकाश झाले–साम्य (१६९/८). (१६) जाणत नाहीं–जाणिवेचे, शहाणिवेचे, का दिमाखाचे असत नाहीं. (३१५) हे देहास समजत नाहीं, तो देह कांहीं जाणत नाहीं = हें तो जाणत नाहीं, तो देहधर्माचा होत नाहीं (देहाचा वारू न पाहे जसें का. देहच मुळी त्याच्या जाणिवेचा नसतो, तेथें मग कसचें तें देहजीव उर्मीचें त्यानें होणें तें). (२४) (महाकाश) वगळणें. (२६) (आपल्या सर्वस्वाचा) वगळणें. (२७) आपल्या सर्वस्वाचा–आपलें सर्वस्व असा. (३३) निर्गुण–गुणातीत, वेगळा, निराळा, आगळेपणाचा. (३४) आचरतो–तो सेवा कशी करतो. (३७) श्रवण–तेथें श्रवण. **पान २३**—(१) व्हावी–व्हावी असा अभिप्राय. (२) तेथें–पण तेथें (६) पाहूं–सांगू (९) आले–आले तेथें. (१८) दळिली–दरिद्रळिली गेली व असे (करीत) होत असतांना. (१९) सर्व इंद्रियेंही पण हातानें प्रकाशलीं–हातापायांना डोळे आले कां सर्व इंद्रियें सडोळस झालीं. (३६) उन्हाळणानें–उन्हाळ्यानें जाळला जाईल–दाहकत्वानें परिणाम केला होईल ? (३७) देहब्रह्म–देहब्रह्मरूप. **पान २४**—(९) व्योम–वाऱ्यानें व्योम हें हालत नाहीं–हें कांही रडविलें, जिवंत केलें का उठविलें होत नाहीं. (११) अंतरच–अंतरच का आकाश. (२५) (घेत्रो)–घेतो. मद्रूपे आत्मरूपाचे ऐसे आहे, चराचर दिठी दृष्टींत सूर्य घालतो–ऐसे सूये दिठी चराचर मद्रूपे = सर्व चराचर आत्मरूपच आहे, अशा दृष्टीनें तो चराचर पाहातो–त्याची दृष्टी चराचराच्या ठायीं माझें रूपच एक विते. (२६) प्रेमानें–सजातीय, परमात्माच एक. (२९) मनावर–मनाचा स्वभावच मुळीं चंचल असा तो त्यावर देहबुद्धीचें जडत्व म्हणजे चिदाकाशांतील जें चेतस् तें अचेतस् असें. (३६) जाणारे–येणारे व जाणारे. **पान २५**—(३) होय–होय स्थाणूस रात्र का दिवस सारखाच तसें देहातील द्वंद्वें नटलीं का शोभलीं तेथें आत्मारामच एक तो झाला. (५) द्वंद्वें–स्वरूपस्थ जो त्यास देही जीवात्म्याची जीवभावाची काय सुखाची किंवा काय दुःखाची तीं द्वंद्वें सारखींच होत. (७) वाघाची उडी अंगावर पडो–त्यागाची आंच लागो. (१०) असतो–(साम्य—जैसें वृक्षपण बीजासी आलें । कीं मेघ हे गगन झाले । तैसे अनेकत्व जेथ समावले । तें साम्य म्हणिपे ॥ १६९/८ ॥)

(११) नीचनवे–नीच का नवे. (१३) रूपव्यक्तीची–व्यक्तीयोगरूप (मी माझिया विभूति। विभूति अधिष्ठीलिया व्यक्ति। हे आघवे योग–प्रतीति। एकचि मानुनि असे। म्हणोनि निःशंक पहा योगे। मज मीनले मनाचेनि आंगे। येथ संशय करणें नलगे। तोचि शुद्ध झाला ॥ १०८/९/१०). (१४) विशेष अशा व्यक्ति प्रकृतिचा–व्यक्ति योगरूप झाली असा. (१८) सहादि–सहाही. (२०) आणीक एक तऱ्हेनें त्यास पहा–आणखी विशेषसें असें त्याच्यामध्यें जें कांहीं असतें तें असें की. (२३) कस लाही–कसलाही. (३६८) दैव का संकट अशा तऱ्हेचा देहभावभार जीवी उगवत नाहीं. सहजच जें प्राप्त का स्थिर झालेलें तें स्वभावेंकरूनच भोगावें असें होतें. ३० (३६९) सुखावणें का शिणणें अशी सांडी मांडी ज्याच्या मनानें वर्जिलेली असते ज्यानें असा (पायरीचे चिरे। वरी संत हिरे। पाय देती।) का नुसताच एक साधा दगड असें नच मनावर घेणारा अचल असा.

ओवी ३६७—ज्याच्या मनांत सगळी समता असते. विषयतेला मुळींच वाव नसतो मग कर्म कोठून येणार ?

ओवी ३६८—वासना त्याच्या ठायीं नसते, त्यामुळें जें सुख अथवा दुःख येईल तें तो मुकाट्यानें स्वीकारतो.

ओवी ३६९—संकल्प विकल्प सगळे त्यानें सोडलेले असतात, त्यामुळें सुखावणें का शिणणें (निर्बुद्धि जसा तसें) त्याच्या ठायीं नसतें असा जो पुरुष तोच गुणातीत जाणावा.

**पान २६**—(७) आकर्शिलें तेचि हिमवंत जेवि झाले–त्रिगुणसाम्य गुणमयीचें होणें, आईसीचें होणें, आकर्शिलें मूळमायेंत अथवा गुणमयींत परतविले गेले. (९) सोलून टाकून–कला अथवा पदर बाजूला करून. (१५) तत् (ईश्वरत्व) रूप ब्रह्म. (१७) माझें ज्ञान–ज्ञान एक. (२१) ते–ते देह विश्व. (२२) सुवर्णाची टीक स्थिति बोट ठिकाणच की जीवितरूपी सुवर्णास लागली आहे की अहो! असे आणिक ते आपले स्वतःचे सर्वस्वच आहेत असें मानावें. (२४) बुद्धि बोधि–सत्व जीवित प्रेम बोधच संचारला, एक. (२६) पाहा–तैसे अहं मजमाजीं न्याहाळीं = माझ्यामध्यें तूं आहेसच. (३१) आनंद–आनंदित. (३२) ज्ञानयोग–सोहंवृत्ति. विकसीत का आनंदीत दृष्टी, ज्ञानोत्तर भक्ति. ब्रह्म भूः. (३५) योग–योग होय.

**पान २७**—(३) विहिरीचा–विहिरीचें तोंड आकाशाच्या दांडयानें सांदलें आहे कां जोडलें नव्हे, तेथें समरसताच एक सर्व. (१०) पुरुषार्थ–मोक्ष. (१९) ब्रह्मत्व–अभिप्राय ईश्वरत्व. (३४) (४१३) मथळा–मागणें–भरतवाक्य. **पान २८**—तुम्हांस–तुम्हांस आपल्या सर्वस्वाच्या ठायीं. (६) आपल्या–आपल्या सर्वस्वाच्या.

---

हें पुस्तक वि. दा. लिमये, यांनीं इंडिया प्रिंटिंग वर्क्स, ९ बेकहाउस लेन, फोर्ट, मुंबई, येथें छापिलें व तेथेंच प्रकाशित केलें.

# संत वचनें—संत दर्शन

१. प्रगटले ज्ञान । नारायण मूर्ती तें ॥ १ ॥
अनुभवचि घेवो हांवा । विनंती देवा करूनिया ॥ २ ॥
देखो वेखी वदे वाणी । पडिलिया कानीं प्रमाण ॥ ३ ॥
तुका म्हणे योग क्षेम । घडे ते वर्म साधावे ॥ ४ ॥

२. जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवें ॥ १ ॥
सहज पूजा याचि नांवे । गळित अभिमान व्हावे ॥ २ ॥
अवघें भोगितां गोसावी । आदि अवसानि जीवि ॥ ३ ॥
तुका म्हणे शीण । न धरितां नव्हें भिन्न ॥ ४ ॥

३. आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनि अनुभवावा ॥ १ ॥
आवडी आवडी कलेवरा कलेवरी । वरिले अंतरी ताळा पडे ॥ २ ॥
अपूर्व दर्शन माते पुत्रा भेटीं । रडे मागे तुटी हर्षे योगे ॥ ३ ॥
तुका म्हणे एके कळते दुसरे । बरियानें बरे आहाचे आहाच ॥ ४ ॥

४. भक्ति ते नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मी भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥
देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥
उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥ ३ ॥
तुका म्हणे मज कळते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ४ ॥

५. तेहि नव्हे जे करितां कांही । ध्याता ध्याई तेही नव्हे ॥ १ ॥
तेहि नव्हे जे जाणवी जना । वाटे मना तेही नव्हे ॥ २ ॥
त्रास मानिजे कांटाळा । अशुभ वाचाळा तेहि नव्हे ॥ ३ ॥
तेहि नव्हें जे भोंवती भोंवे । नागवे धांवे तेहि नव्हे ॥ ४ ॥
तुका म्हणे एकचि आहे । सहजीं पाहे सहज ॥ ५ ॥

६. संतभेटती आजि मज । तेणे झालो चतुर्भुज ।
दोन्ही भुजा स्थूळीं सहज । दोनि सूक्ष्मी वाढल्या ॥ १ ॥
आलिंगनें सुख वाटे । प्रेमें चिदानंद गोठे ।
हर्षे ब्रह्मांड उतटे । समूळ देह मीपण ॥ धृ० ॥
या संतासी भेटतां । तुरे संसाराची व्यथा ।
पुढती पुढती माथा । अखंडित ठेवीन ॥ २ ॥
या संतांचें देणें । कल्पतरूहुनि दुणें ।
परिसा परिस अगाध देणें । चिंतामणी ठेंगणा ॥ ३ ॥
या संता परिस उदार । त्रिभुवनी नाहीं थोर ।
मायबाप सहोदर । इष्ट मित्र सोयरे ॥ ४ ॥
कृपा कटाक्षे न्याहाळिले । आपुल्या पदीं बैसविले ।
बापरखुमादेवीवरे विठ्ठले । भक्ता दिधले वरदान ॥ ५ ॥

आज मला संत भेटले; त्यामुळें मी चतुर्भज झालों. दोन भुजा स्थूळ आहेतच; आनंदाच्या आणखी दोन सूक्ष्म वाढल्या. संतांना आलिंगन देतांना अतिशय सुख वाटतें. त्यांच्या ठिकाणीं असलेलें प्रेम चिदानंदरूप होतें. आनंद तर ब्रह्मांडाबाहेर जातो. आणि शरीरावरचा अहंभाव समूळ नाहिंसा होतो. ह्या संतांच्या भेटींत संसाराची व्यथा नाहिशी होते. त्यांच्या चरणांवर मी वारंवार मस्तक ठेवीन; ह्या संतांचें दान कल्पतरूपेक्षां जास्त आहे. परिसापेक्षांही अधिक आहे. चिंतामणी तर त्याच्या दानापुढें अगदीं ठेंगणा आहे; आईबाप, सहोदर किंवा इष्टमित्र यांच्या पेक्षांही जास्त कल्याण करणारे संत आहेत. फार काय सांगावें त्रिभुवनांतही संतांच्या इतकें मूर्तिमंत औदार्य कोणी जाहलें नाहीं. ते ज्या ज्या (ज्याच्या) कडे कृपादृष्टीनें पाहातात त्याला आपल्या योग्यतेला आणून बसवितात. याप्रमाणें रखुमादेवीवर बाप जो श्रीविठ्ठल त्यानें आपल्या भक्ताला वरदान दिलें. (देवाची आळंदी ज्ञा. गा.)

## आकार स्थूल जात—

ओवी २१८ (१४)

'अवघियाची दैवा जन्मभूमि हे सेवा—'

४३१ (१३) 'मग देहांति नवल बुद्धि वाहे'

७. आकार स्थूल नाशिवंत। हे तरि जाईल भूमि आंत।
तयावरि हरि चालत। तेणे होईल कृतकृत्य ॥ १ ॥
देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो ॥ ध्रु०॥

दुजा गुण आपी मिळे। तरि मी होईन गंगाजळ।
हरि अभिषेक अनुदिनी। सुखे सर्वांगावरि खेळे ॥ २ ॥

तिजा गुण तेजरूप। तरि मी होईन महादीप।
हरि रंगणी दीपमाळा दीप। उजळीन समीप ॥ ३ ॥

वायु व्यापक चौथा गुण। तरि विंजणा होईन।
हरि अष्टांगें निववीन। ऐशा दृढ धरिन खुणा ॥ ४ ॥

आकाश पांचवा गुण। तरि मी प्रासादीं राहीन।
बाप रखुमादेवीवरा। अखंड तुझे अनुसंधान ॥ ५ ॥

अर्थः—भगवत् उपासकाची देहत्यागानंतरची भगवत् उपासनेविषयीं किती निष्ठा असते तें ह्या अभंगांत दाखवितात. स्थूल शरीराचा आकार नाशवंत असल्यामुळें तो केव्हांतरी भूमींत जाणार–तो अशा भूमींत मी घालीन कीं त्यावरून भगवान् श्रीहरी चालतील; त्यामुळें मी कृतकृत्य होईन. माझा हा देह जावो किंवा राहो पांडुरंगाचे ठिकाणीं माझा अत्यंत दृढ भाव आहे. शरीरांतील दुसरा गुण पाणी हा आहे. तें पाणी मी गंगाजळांत मिळवीन; त्याचा भगवंतांना रात्रंदिवस अभिषेक होईल, त्यामुळें सुखाने मी हरीच्या सर्वांगावर खेळेन. तिसरा गुण तेजरूप आहे तो मी महातेजांत मिळवून मी हरीच्या अंगणांत दीपमाळ होऊन हरीजवळ दीप उजळीन. चवथा गुण सर्वत्र व्यापक वायू तो मी पंख्यांत शिरून त्याने हरीची अष्टांगें निववीन. असा दृढ हेतू माझ्या मनांत आहे. आतां आकाश पांचवा गुण आहे तो मी प्रासादीं म्हणजे मंदिरांत आकाश होऊन राहीन; रखुमादेवीच्या वरा बापा श्रीविठ्ठला याप्रमाणें मी तुमचें अखंड अनुसंधान करीन असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. (देवाची आळंदी ज्ञा. गा.)

**पान १३**—इवेचा दिसे—अथी २९

८. मंगल मूर्ती तूं की मनाचिया लावण्यबाणा । वेधी वेधक तू सहजगुणा ।
सगुण निर्गुण न कळे तुझे विंदान कैसे । आपचि घर दाटुन रिगसी ।
तेथे नवलाव वर्णूं काय । कोणा रया ॥ १ ॥

वर्णिता तुझे गुण । मना मौन पडे ।
कळिकाळ बापुडे । काय करील आम्हां ॥ ध्रु० ॥
ध्यानमूर्ती तुझी मनें अलंकारली । मना माझारी संसरली ।
संचरता इंद्रियें सुमन पदी । तुजविण न दिसे आन बोली ।
तेथे भिन्न भिन्नपणे कोणा पाहो दातारा । दिठी सुखाचेनि सुखे स्थिरावली रया ॥ २ ॥

बाप रखुमादेवी वर विठ्ठले । की आनंदाचे वोळले ठेले ।
ओतप्रोत सधन । नावेक नुरे काही एक केले ।
तुझे तुज गार्‍हाणे । किती देऊ दातारा ।
बोलविता भले नव्हे रया ॥ ३ ॥

अर्थः—हे श्रीहरीकृष्णा ! काय तुझी मूर्ती मंगलरूप आहे ! तुझ्या मुखावरील लावण्यरूप बाणानें माझ्या मनाचा वेध केला आहे. सहज स्वरूप स्थितीचें बोधक तूंच आहेस–तुझ्या स्वरूपाचा निर्धार करूं गेलें असतां तूं सगुण आहेस कीं निर्गुण आहेस याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. तेव्हां तूं अमूकच आहेस असा कसा निश्चय करावा ? आपण स्वतः सृष्टी निर्माण करून त्यांत बळेंच आपण प्रवेश करतोस. हा तुझ्या कृतीचा चमत्कार कोणी वर्णन करावा ? तुझें गुणवर्णन करूं गेलें असतां मन तुझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं तटस्थ होतें मग तेथें गरीब बिचारा काळ आम्हाला काय करील ? म्हणजे आमचा नाश कसा बरें करील ? तर (तो) आमचा नाश करणार नाहीं. अशी तुझी मूर्ती मनांत अलंकृत केली असतां त्या मनांत तुझा आपोआपच प्रवेश होतो. तसा प्रवेश झाला म्हणजे मन तर भगवंतरूप होतें–तशीं इंद्रियेंही मनाप्रमाणें होतात. मग तुझ्या स्वरूपावाचून दुसरें दिसत नाहीं. म्हणून बोलतांही येत नाहीं–अशा ऐक्य स्थितींत मनाचा उपरम झाला असतां त्या ठिकाणीं भिन्नभावानें कोणास पहात बसूं ? कारण तुझ्या स्वरूपसुखामध्यें मनाची दृष्टी सुखामध्यें स्थिर झालेली असते–रखुमादेवीचा वर जो बाप श्रीविठ्ठल हा आनंद स्वरूपानें मनांत येऊन राहिल्यामुळें ओतप्रोत घनानंद मूर्तीशिवाय यत्किंचित् सुद्धां करण्याला कांहीं शिल्लक रहात नाहीं. हें तुझ्या स्वरूपाचें वर्णन हे श्रीहरी तुझ्यापुढें किती करूं ? तेव्हां तुझ्याविषयीं कांहीं वर्णन न करणें हेंच चांगलें असें श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. (देवाची आळंदी ज्ञा. गा.)

OSMANIA UNIVERSITY LIBRARY HYDERABAD-7